# श्री समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे
# अमृतमहोत्सवी स्मृतिग्रंथ

संपादक

**सुनील चिंचोलकर**

■ **प्रकाशक / मुद्रक :**
समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे

■ © समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे

■ **मुखपृष्ठ व आतील चित्रे**
श्री. हेमंत सरदेसाई
(श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड यांच्या सौजन्याने)

■ **प्रथमावृत्ती :** एप्रिल २०१२

■ **अक्षरजुळणी :**
एच. एम. टाइपसेटर्स,
११२०, सदाशिव पेठ, पुणे ३०.

■ **मुद्रणस्थळ :**
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ, पुणे ३०.

■ **देणगी मूल्य रुपये दोनशे**




|| श्रीहरिः ||

**आचार्य स्वामी गोविन्ददेव गिरि**

समन्वय कुटीर,
रामझोला,
हरिद्वार (उत्तराखण्ड) - २४९४१०
दूरभाष : (०१३३४) २६०१५६, २२६९१०
फॅक्स : (०१३३४) २६०९८१

धर्मश्री,
गुरुकुली दत्तमंदिर के सामने,
पुणे विद्यापीठ मार्ग, पुणे ४११०१६
दूरभाष : (०२०) २५६५२५८९
फॅक्स : (०२०) २५६५२०६९


## साभिनन्दन शुभकामना!

राष्ट्रगुरु समर्थ रामदास स्वामी महाराज यांचे जीवन व संपूर्ण वाङ्मय ईश्वरभक्त, देशभक्त, कर्मयोगी सर्व सत्पुरुषांना आणि सामान्य लोकांनाही आपल्या ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी अखंड स्फूर्तीचा झरा ठरले आहे, हे इतिहाससिद्ध सत्य होय. सामान्य मानवी जीवनाला दैवी सद्गुणांची झळाळी प्रदान करण्याचे अद्भुत सामर्थ्य त्यात आहे. व्यवहाराच्या पहिल्या पायरीपासून अध्यात्माच्या शेवटच्या स्थितीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर सर्व अंगांनी मार्गदर्शन करणारे असे अन्य कोणा एका महापुरुषाचे साहित्य उपलब्ध नाही.

या अमूल्य ग्रंथसंपत्तीचे संकलन, संग्रह व संरक्षण करण्याचा ध्यास धुळे येथील थोर सत्पुरुष कै. नानासाहेब देव यांनी घेतला ही या राष्ट्रावरील परमेश्वरी कृपाच होय. श्रद्धेय नानासाहेबांनी या ध्येयाने झपाटले जाऊन आपले उभे आयुष्य त्यासाठी समर्पित केले. प्रचंड प्रवास, सततची दगदग आणि अखंड धडपड करीत त्यांनी गोळा केलेल्या साहित्याने त्यांचे घरच भरून गेले म्हणून त्यांनीच सत्कार्योत्तेजक सभेला दान केलेल्या भूमिवर या ग्रंथसंग्रहासाठी समर्थ वाग्देवता मंदिराची भव्य वास्तू उभी केली.

या महन्मंगल घटनेला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. कै. नानासाहेबांनी पाहिलेल्या स्वप्नानुसार समर्थ वाग्देवता मंदिराचे कार्यकर्ते ग्रंथसंपदेचे जतन, चित्रीकरण, संशोधन, जनजागरण व समर्थभक्तिसंवर्धनाचे कार्य करण्यासाठी अत्यंत नेटकेपणाने व धडाडीने झटत आहेत हे पाहून मनःकमल फुलून येते. श्रद्धेय कै. नानासाहेबांच्या पुण्यस्मृतिला अभिवादन, कार्यकर्त्यांचे हार्दिक अभिनंदन व संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी शुभकामना!

जय जय रघुवीर समर्थ!

वसंतोत्सव
दि. ८ मार्च २०१२

शुभाकांक्षी
स्वामी गोविंददेवगिरिः


| समन्वय सेवा ट्रस्ट | महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान | संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुल | गीता परिवार |

Email : swamigovindadev@dharmashree.org

# संपादकीय...

पौराणिक वाङ्मयामध्ये काही चमत्कार आढळतात. हे चमत्कार घडले असतील किंवा नाही याबद्दल दुमत असू शकते. पण अलीकडच्या काळात काही माणसे अशी होऊन गेली की, त्यांचे जीवन म्हणजे चालता-बोलता चमत्कारच होता. अवघ्या ३५ वर्षांच्या परिश्रमाने एक नवे साम्राज्य निर्माण करणारे शककर्ते शिवराय... अवघ्या ३०व्या वर्षी आपल्या प्रगल्भ विचाराने समस्त जगतावर अद्वैताची पताका फडकविणारे स्वामी विवेकानंद... टिळक, सावरकर ही सारी माणसे पौराणिक चमत्कारांपेक्षा महान होती. कै. शंकर श्रीकृष्ण ऊर्फ नानासाहेब देव हे देखील असेच अद्‌भुत व्यक्तिमत्त्व होऊन गेले. एका आयुष्यात माणूस एवढे काम करू शकतो यावर विश्वास ठेवावा लागतो कारण नानासाहेबांचे जीवन ज्यांनी जवळून पाहिले अशी काही मंडळी आजही हयात आहेत. आपला वकिलीचा व्यवसाय प्रामाणिकपणे सांभाळून सामाजिक, राजकीय, संशोधन आणि साहित्य या विविध क्षेत्रांत नानासाहेबांनी जी उंची गाठली ते एक अविश्वसनीय सत्य आहे. समर्थ सांप्रदायिकांवर त्यांचे असलेले ऋण समर्थभक्त कधीही विसरू शकत नाहीत. या १०० वर्षांत समर्थांवर जे लिहिले आणि बोलले गेले त्या सगळ्यांना समर्थ संप्रदायाचा अधिकृत इतिहास पुरविण्याचे काम कै. देव यांनी केले. तनाने आणि मनाने झिजणारी माणसे सहसा धनाने झिजू शकत नाहीत. नानासाहेब देवांनी समर्थ संप्रदायासाठी वणवण हिंडून शेकडो बाडे गोळा केली आणि ही बाडे अभ्यासकांना सहजोपलब्ध व्हावीत, म्हणून स्वत:ची जागा संस्थेला देऊन त्यावर 'समर्थ वाग्देवता मंदिर' ही भव्य वास्तू उभी केली. त्यांनी आपले सर्वस्व समर्थ संप्रदायासाठी पणाला लावले. त्यांनी आपला गणेश नावाचा मुलगादेखील या कार्यासाठी अर्पण केला होता. दुर्दैवाने तो अल्पायू ठरला आणि 'पुत्र मरे बापाआधी' या भोगाला नानासाहेबांना सामोरे जावे लागले. जांब येथील श्रीसमर्थ मंदिर आता ८०व्या वर्षात पदार्पण करीत आहे, तर समर्थ वाग्देवता मंदिराला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत.

नानासाहेबांना समर्थहृदय असे म्हटले जाते. आतापर्यंत होऊन गेलेली समर्थभक्तांची मांदियाळी लक्षात घेता देवांना समर्थ हृदयसम्राटच म्हणावे लागेल. त्यांनी लिहिलेले त्रिखंडात्मक समर्थचरित्र असो, करुणाष्टकाची प्रस्तावना असो अथवा 'रामेण रामदासेन लिखितम्' वाल्मीकी रामायणावरील लेख असो, त्यांची समर्थभक्ती शब्दांच्या पात्रातून गंगौघाप्रमाणे ओघवती वाहत असते. त्यांच्या समर्थप्रेमाचा एखादा अंश आपल्यात संक्रमित व्हावा म्हणून या स्मृतिग्रंथाचे संपादकपद मी स्वीकारले. देवांचे कार्य हे ईश्वरी कार्य असल्यामुळे आणि त्याला समर्थकृपेचे अधिष्ठान असल्यामुळे देवांच्या पश्चातही हे शिवधनुष्य विविध कार्यकर्त्यांनी यशस्वीरीत्या पेलले. गेली ७५ वर्षे हा वाग्यज्ञ अखंडपणे चालू आहे. यातून अनेकांना पीएच.डी.चे पायसदान मिळाले. वाग्देवता मंदिराच्या अभ्यागत गृहात राहून अनेकांनी विविध संतवाङ्मयाचे विचारमंथन केले. अनेक दुर्लभ चित्रे, बखरी, विविध संतांचे समग्र साहित्य असे हजारो ग्रंथ याठिकाणी उपलब्ध आहेत. धुळे म्हणजे समर्थ संप्रदायाचे सरस्वती मंदिर आहे. ज्यांच्याकडून देवांनी समर्थभक्तीची प्रेरणा घेतली त्या इतिहासाचार्य राजवाडेंचा 'चाफळ क्षेत्रातील संस्मरणीय वस्तू'

हा लेख वाचला म्हणजे ही मंडळी समर्थांच्या प्रेमाने कशी वेडी झाली होती ते पाहून मन आदराने झुकते. विशेष म्हणजे देशस्थिती बदलावी, भारताला त्याचे वैभव पुनश्च प्राप्त व्हावे या धडपडीने देवांनी हा सारा प्रपंच केला. सध्याच्या राष्ट्रीय समस्यांवर समर्थांचे जीवन आणि विचार हेच सर्वश्रेष्ठ औषध आहे अशी देवांची प्रामाणिक धारणा होती आणि म्हणून त्यांनी समर्थ विचारांचे दालन भावी काळातील अनेक पिढ्यांसाठी खुले केले.

या स्मृतिग्रंथामध्ये महाराष्ट्रातील थोर अभ्यासक आणि लेखक यांचेकडून मुद्दाम लेख मागवून घेतले. लेख मागविताना वेदांत, भक्ती, कर्म, शिक्षण, व्यवस्थापन, राजकारण या विविध विषयांना स्पर्श होईल याची काळजी घेतली आहे. २०व्या शतकात होऊन गेलेल्या काही थोर समर्थभक्तांचे परिचयही दिले आहेत. याखेरीज अरविंद, चाणक्य, विवेकानंद, कबीर, शंकराचार्य या सगळ्यांची समर्थविचारांशी साम्य दाखविणारी लेखमाला आढळेल. समर्थांचे संगीत-चिंतन, समर्थांचे सृष्टिविज्ञान, समर्थांची कीर्तन परंपरा, दक्षिण भारतातील समर्थ संप्रदाय अशा विविध पैलूंना मान्यवर अभ्यासकांनी स्पर्श केला आहे. संग्राह्य ठेवावासा वाटेल असाच हा विचारांचा ठेवा आहे. या स्मृतिग्रंथाचे समर्थभक्त स्वागत करतील याची खात्री वाटते. मंदिरातील बाडांची देवांच्या सुपुत्राने दिलेली माहिती नवीन अभ्यासकांच्या दृष्टीने मौलिक आहे. ज्यांनी अजून समर्थ वाग्देवता मंदिर पाहिले नाही त्यांना हा ग्रंथ वाचल्यावर आपण जीवनातील कोणत्या अनमोल ठेव्याला वंचित होत आहोत याची जाणीव होईल. हे मंदिर म्हणजे सरस्वतीच्या उपासकांचे विश्रांतिस्थळ आहे. त्यांनी येथे यावे, रमावे, रंगावे आणि येथीलच होऊन जावे. ज्यांना संशोधनकार्यात काही सेवा द्यावयाची असेल त्यांनी विश्वस्तांशी संपर्क साधावा आणि कार्याच्या प्रवाहात सामील व्हावे.

हा स्मृतिग्रंथ तयार करताना थोर समर्थभक्त श्री. शरद कुबेर यांनी जे मौलिक सहाय्य केले ते मी कधीही विसरू शकणार नाही. स्मृतिग्रंथ जास्तीत जास्त चांगला व्हावा याचा त्यांनी ध्यासच घेतला होता. सत्कार्योत्तेजक सभा, धुळे आणि वाग्देवता मंदिराचे पदाधिकारी मा. डॉ. विवेकानंद चितळे आणि मा. डॉ. सोमनाथ जोशी यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. वै. सोनोपंत मामा दांडेकर, कै. न. चिं. केळकर, कै. शंकर श्रीकृष्ण देव, कै. गणेश शंकर देव यांचे जुने लेख पुनर्मुद्रित केल्याने स्मृतिग्रंथाला एक ऐतिहासिक सुगंध प्राप्त झाला. माझे मित्र श्री. हेमंत जोशी यांनी युद्धपातळीवर काम करून हा ग्रंथ छापून वाचकांच्या हाती सादर केला याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

**–सुनील चिंचोलकर**
अजिंक्यनगर, हिंगणे खुर्द,
पुणे - ५१
मोबाईल. ९४२३७४२४४४

## खालील मान्यवरांनी श्री समर्थ वाग्देवता मंदिराच्या वाङ्‌मयमूर्तीच्या दर्शनाने प्रसन्नता व्यक्त केली –

१) श्री समर्थांचे अतिदुर्मिळ वाङ्‌मय आपण एके ठिकाणी गोळा केलेले पाहून आपले कौतुक करावे तितके थोडेच आहे. श्री समर्थांप्रमाणे घळीत बसून चिंता करीत बसणाऱ्या श्री. शंकरराव देवांना पाहून मन संतोष पावले. या संस्थेतून समर्थांचा संदेश सर्व राष्ट्रभर पसरो, असे मी इच्छितो.

**स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर – १५-३-१९४०**

२) समर्थांची वाङ्‌मयमूर्ती पाहून आनंद झाला. ही मूर्ती सर्वांना प्रेरणादायी ठरो.

**आचार्य विनोबा भावे – ७-२-१९३६**

३) श्री. नानासाहेब देवांनी इतक्या चिकाटीने आणि दीर्घोद्योगाने आपल्या राष्ट्राच्या परम वंदनीय स्फूर्तिदात्याची स्मृती जागृत करण्याचे हे महनीय कार्य पाहून अत्यंत कृतज्ञता वाटली. सर्वांनाच गुरुस्थानी शोभणाऱ्या या राष्ट्रगुरूचे स्मरण आजही हिंदू समाजाला तारक आहे. श्री समर्थांच्या तेजस्वी संदेशाचे सम्यक् ज्ञान व्हावे अशी व्यवस्था केल्याबद्दल सर्व हिंदू समाजाने त्यांचे सदैव आभारी असावे. श्री. नानासाहेब देवांनी केलेल्या उपकारातून ऋणमुक्त होण्यासाठी या कार्याद्वारे हिंदूंचे राष्ट्रीय जीवन उज्ज्वल करावे.

**माजी सरसंघचालक मा. स. गोळवलकर**

४) श्री समर्थ वाग्देवता मंदिर पाहून माझे हृदय भक्तीने भरून आले. पूज्य नानासाहेब देव यांचे हे जीवनकार्य आहे. त्यांची भावना या मंदिरात रंगलेली पाहून अपार भावना हृदयात उचंबळतात.

**साने गुरुजी – २४-६-१९३६**

५) श्री समर्थ वाग्देवता मंदिर का अवलोकन कर बड़ी प्रसन्नता हुई । मंदिर के संचालक प्रबंधक बधाई के अधिकारी है । शासन के सहयोगसे दुर्लभ पाण्डु लिपियोंको पुरी तरह सुरक्षित रखने का कार्य शीघ्र पुरा होना चाहिए । मैं संस्था की उत्तरोत्तर उन्नति और सफलता की कामना करता हूँ ।

**माजी प्रधानमंत्री – अटलबिहारी वाजपेयी । १५-८-१९८५**

६) समर्थ वाग्देवता मंदिर या संस्थेची माहिती होतीच. आज समर्थांची कृपा झाली आणि मंदिर पाहाण्याचा योग आला. मनाला समाधान वाटले. 'श्री' सर्व योग्य ते करवून घेतात.

**स्वामी विद्याशंकर भारती – शंकराचार्य, करवीर पीठ – २९-१२-१९८५**

७) राष्ट्र निर्माण कार्य के अद्वितीय संत समर्थ रामदास से सम्बधित साहित्य, उनके स्वयं के हस्तलिखित ग्रंथ आदि का संग्रह केंद्र इस नाते यह स्थान एक तीर्थस्थान है, उन सब के लिए जो राष्ट्रभक्त है । यह स्थान स्थाई निधि स्वरूप है । इसका संवर्धन प्रत्येक नागरिक का परम कर्तव्य है ।

**मा. नानाजी देशमुख – १६-१२-१९८७**

८) आज समर्थ मंदिरात प्रवेश करताना मन भारावून गेले. आपल्या राष्ट्राचे सामर्थ्य समर्थांच्या मार्गदर्शनाने पुन्हा एकदा वाढावे अशी समर्थ चरणी प्रार्थना आहे.

**लक्ष्मीबाई केळकर**

९) हे मंदिर म्हणजे महाराष्ट्राचा रत्ननिधी आहे. समर्थांची तेजस्वी वाणी येथे एकत्र अभ्यासण्यास मिळणे हा लहान-सहान लाभ नव्हे. मला विश्वास वाटतो की या तपश्चर्येचे फळ केवळ साहित्यिक न होता आध्यात्मिकही होईल.

**काकासाहेब कालेलकर – ६-११-१९३५**

१०) मंदिराचे अंतरंग दर्शन घेताना परम समाधान वाटले. हे मंदिर उभारून शंकरराव देवांनी स्वत:चे स्मारक आपल्या जिवंतपणीच करून ठेवले आहे, असे म्हणण्यात अतिशयोक्ती नाही. श्री समर्थ परंपरेत एवढे मोठे संप्रदाय कार्य दुसऱ्या कोणीही केले नाही.

**ल. रा. पांगारकर – १८-६-१९३८**

११) मंदिराचे दर्शन घेण्यासाठी आलो होतो. मंदिराच्या उत्कृष्ट कार्याविषयी सर्वांचे एकमत आहे. या कार्यात माझा काही अंश असावा अशी फार दिवसांची इच्छा आहे. ती पूर्ण होईल तेव्हा खरे.

**ना. सी. फडके – २७-१०-१९४७**

१२) धुळे येथे तपस्यामूर्ती प. पू. नानासाहेब देव यांचे दर्शन घेण्याचा योग आला. हे केवळ सद्भाग्य होय. नानासाहेबांच्या तपस्येने अर्चिलेल्या मूर्तीचे यापुढे कोण अर्चन करणार असा प्रश्न त्यांची थकलेली काया पाहून मनास पडतो. श्री. समर्थच आपला भावी उपासक निर्माण करून नानासाहेबांची तपस्या सार्थकी लावल्याविना राहाणार नाहीत.

**बाळशास्त्री हरदास – ६-१०-१९५२**

१३) महाराष्ट्र साहित्याचा व्यासंग करणाऱ्यास हे उत्कृष्ट साधन मोठ्या तपश्चर्येने श्री. देव यांनी सिद्ध केले. हा त्यांचा प्रचंड उद्योग अविस्मरणीय आहे.

**गो. स. सरदेसाई – २०-१-१९४६**

१४) समर्थ भक्ताग्रणी देवांनी उभारलेल्या मंदिरातून समर्थांचे काव्य आणि समर्थकालीन इतिहास चिकित्सक अभ्यासकाकडून बाहेर पडणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने येथे संशोधनास कितीतरी वाव आहे. त्यातून राष्ट्रजागृतीचे तेजस्वी स्फुरण संशोधकांनी फैलावले पाहिजे.

**पु. पां. ऊर्फ बाबुराव गोखले, कराड.**

१५) श्री समर्थ वाग्देवता मंदिरात जुने ग्रंथ, दुर्मिळ साहित्य, शिवाजी महाराज-संभाजी महाराज या महापुरुषांची सुंदर हस्ताक्षरे पाहायला मिळाली. एका उदात्त आणि पवित्र वातावरणात विहार केल्यासारखे वाटले. समर्थ भक्त देवांविषयी मन आदराने भरून आले.

**विद्याधर गोखले – १५-१२-१९५४**

१६) हमारा सच्चा गौरव और सच्चा धन यह ज्ञानभंडार ही है । इसे प्रकाशित करने के लिए सरकार को विशेष ध्यान देने की जरूरत है । यह ज्ञानभंडार देखकर अत्यंत प्रसन्नता और गौरव अनुभव होता है ।

**राधा देवी गोयंका – ६-१२-१९५५**

१७) श्री नामदेवांचे अभंग व श्री नाथांचे भावार्थ रामायण याकरिता म्हणून समर्थ वाग्देवता मंदिरात बसून काही बाडे पाहिली. असे वाटू लागले की संत वाङ्मय संशोधन करून ते प्रसिद्ध करणे असेल तर वाग्देवता मंदिरात गोळा केलेली बाडे वाचल्याशिवाय ते केल्यास काम अपुरे राहील.

**प. पू. शं. वा. तथा मामासाहेब दांडेकर**

१८) मुझे तो यह मंदिर देखके आश्चर्य के सिवाय कुछ समझ में नहीं आता है । इस तरह की शान्ती परमेश्वर से हमे किस जनम में प्राप्त होगी ।

**जानकीबाई बजाज – ३-४-१९३७**

❀

## अनुक्रम


- श्रीसमर्थवाग्देवतेची प्रार्थना / चौंडे महाराज, वाई / ११
- श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे आणि श्रीराम समर्थ वासुदेव स्वामी मठ, कण्हेरी (ता. खंडाळा) जि. सातारा कण्हेरी मठाचा अभ्यास / श्री. उल्हास वासुदेव गोसावी / १३
- वाग्देवता मंदिर एक ज्ञानभांडार / श. धों. नगरदेवळेकर / १५
- श्री समर्थ वाग्‌देवता मंदिर, पथदर्शी अहवाल / प्राचार्य डॉ. सो. त्र्यं. जोशी / २८
- सत्कार्योत्तेजक सभा एक समग्र दर्शन / डॉ. विवेकानंद आत्माराम चितळे / ३५
- श्री समर्थ वाग्देवता मंदिर व इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ (साहित्याची लेणी) / ले. श्रीपाद माधव नांदेडकर / ४१
- श्री समर्थ वाग्देवता मंदिरातील संग्रहाचे स्वरूप / गणेश शंकर देव / ४५
- इवलेसे रोप लावियले द्वारी तयाचा वेलू गेला... / प्रा. सौ. व्ही. व्ही. निफाडकर / ५१
- श्री हनुमंत स्वामिकृत श्री समर्थांची बखर (प्रस्तावना) / गणेश शंकर देव / ५५
- ।। श्री दिनकरबुवा रामदासी यांचे स्मरण ।। / मारूती बुवा रामदासी / ५७
- प.पू. आण्णाबुवा कालगावकर / नीला अभ्यंकर / ५९
- शिवथरघळचे "मामा" / सौ. मीरा लिमये / ६३
- रामदासी गणेशदास ऊर्फ स्वरूपानंद महाराज / सौ. हर्षदा प्रशांत जोशी / ६६
- श्री समर्थ रामदास स्वामींचे अनन्य भक्त योगीराज श्री. स. स. गणपतराव महाराज कन्नूर यांचा अल्प परिचय / सौ. मुक्ता शिवरामपंत वैद्य / ७०
- श्रीसमर्थ वाग्देवता मंदिराचे संस्थापक देव महोदय / अनंत भालचंद्र चितळे / ७५
- आदर्श रामदासी - श्रीदत्ताबुवा / शरद कुबेर / ८१
- "श्री समर्थ गोसेवेसाठी अनंतदासा । पाठविले तुम्हा शिवराये ।।" / दिलीप महाजन / ८६
- वारकरीसंप्रदाय व समर्थसंप्रदाय / वै. शंकर वामन ऊर्फ सोनोपंत मामा दांडेकर / ८९

■ चाणक्य ते समर्थ राष्ट्रधर्माचा सेतू / राष्ट्रसेवक शंतनू. सू. रिठे / १०६
■ श्रीमदाद्यशंकराचार्य व समर्थ रामदास स्वामी / डॉ. श्री. द. देशमुख. / १११
■ कबीरदास और रामदास / प्रा. स. म. परळीकर / ११६
■ दासबोध आणि संकेतकुबडी / कल्याण काळे / १२३
■ ''साधू दिसती वेगळाले । परीं तें स्वरूपी मिळाले ।'' / डॉ. जगदीश मा. करमळकर / १३०
■ प.पू. श्रीधरस्वामी आणि समर्थ संप्रदाय / डॉ. अजित कुलकर्णी / १३७
■ ब्रह्मक्षत्र योगी श्रीसमर्थ रामदास आणि महायोगी श्रीअरविंद / प्रा. प्रभाकर पुजारी, पुणे / १४०
■ समर्थ रामदास आणि स्वामी विवेकानंद / डॉ. शिरीष लिमये, पुणे / १४७
■ १७ व्या शतकातील ''समर्थ रामदास, जॉन मिल्टन आणि लॉक'' / प्रा. डॉ. वामन वासुदेव गोगटे / १५४
■ अभ्यास मोडी कागदपत्रांचा / अरुण मा. उमराणी / १६०
■ श्रीसमर्थ रामदास स्वामींची माता : राणुबाई यांचे मनोगत / सौ. शुभदा देशपांडे / १६२
■ ।। तंजावर प्रांतातील रामदासी पंतांचे वाङ्मयीन साहित्य ।। / रामचंद्र भीमराज गोस्वामी / १६८
■ समर्थ वाग्देवता मंदिरातील हस्तलिखिते आणि नानासाहेब देव / मधुकर रामदास जोशी, नागपूर / १७६
■ रामदासी कीर्तन / डॉ. यशवंत पाठक / १८१
■ दासबोध : परिवर्तनाचे प्रभावी साधन / श्रीनिवास रायरीकर, पुणे / १८५
■ दक्षिणेतील समर्थ संप्रदाय / दत्तात्रय व्यंकटराव रत्नाळीकर / १९०
■ समर्थांचे स्वत:सिद्ध स्वरूप : आत्माराम / प्रा. डॉ. शं. रा. तळघट्टी, पुणे / १९४
■ समर्थ संप्रदाय आणि निंबरगी संप्रदाय नामस्मरणाद्वारे आत्मज्ञानाची प्राप्ती / प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे / २०२
■ समर्थांचे सृष्टिविज्ञान / सौ. वीणा शंकर तळघट्टी / २१०
■ श्री समर्थ रामदास स्वामींचे शैक्षणिक विचार / डॉ. सौ. सुनंदा लोहकरे / २१९
■ चोरेगांवचे आत्मारामबुवा / प्रमोद संत / २२३
■ प्रपंच - परमार्थातील गतिमान संतुलन / दिलीप कुलकर्णी / २२७
■ समर्थ रामदासांचे संगीत चिंतन / सूरमणी डॉ. पं. कमलाकर परळीकर / २३३
■ देवांचे दासबोधसंपादन कार्य / डॉ. मुकुन्द नागेश देशपांडे / २४५
■ दासबोधातील वेदान्त / डॉ. सौ. रजनी पतकी / २५०
■ ''श्री समर्थ रामदास लिखित 'बाग प्रकरण' / अश्विनी ज. केळकर / २५७

■ आत्मभावी व्यवस्थापन / प्रा. डॉ. सोमनाथ जोशी / २६१
■ समर्थ रामदासांची हिन्दी पदावली / प्राचार्य रा. तु. भगत / २६६
■ 'समर्थ' कुटुंब संस्था : 'माणूस' घडवणारी प्रयोगशाळा! / प्रवीण दवणे / २६८
■ चाफळक्षेत्राच्या हद्दीतील श्रीसमर्थांच्या संस्मरणीय वस्तू / इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे / २७५
■ श्री समर्थांचा सुंदर मठ कोणता? / समर्थहृदय देव / २८०
■ श्री हनुमंत स्वामिकृत श्री समर्थांची बखर / गणेश शंकर देव / २८५
■ श्रीसमर्थ रामदास व श्रीशिवछत्रपती / श्री. नरसिंह चिंतामण केळकर, पुणे / २८७
■ श्रीसमर्थरामदासस्वामी व छत्रपतिशिवाजीमहाराज यांज संबंधाने– चाफळखोऱ्यातील
एक स्त्रीगीत / संशोधक - इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे / २९२
■ कवी विनायक जनार्दन करंदीकर / २९४
■ सत्कार्योत्तेजक सभेचे स्व. श्रीमती जा. र. देशपांडे
मुक्तद्वार वाचनालय, धुळे (तालुका अ वर्ग वाचनालय) / २९५
■ रामेण रामदासेन लिखितम् वाल्मिकी रामायण – राष्ट्रीय परिषद / श्री. शरद कुबेर, भक्तिधाम, सातारा / २९८
■ संत श्री निंबरगीकर महाराज यांचे तत्त्वज्ञान / गुरुनाथ महाराज कोटणीस, 'कैवल्य धाम' सांगली / ३००
■ श्रीसमर्थ वाग्देवता मंदिराची अधिष्ठात्री देवता / *रमेण – रामदासेन लिखितम्*
*श्री वाल्मिकी रामायणम्* / कै. शंकर श्रीकृष्ण देव / ३११
■ ब्रह्मांडव्यापिनी रामोपासना / ३१९
■ समर्थ रामदासांची कृष्णभक्ती / सुधाकर चिंचोलकर, कर्वेनगर पुणे / ३२०
■ श्री समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे / अमृत महोत्सव स्मृतिग्रंथासाठीचे पृष्ठदात्यांची नावे / ३२३

## गोजीवनदास कै. चौंडे महाराज विरचित

# श्रीसमर्थवाग्देवतेची प्रार्थना

*जय जय समर्थ सद्गुरुवर्या । प्रवर्तवें महत्कार्या ।*
*इच्छा पूर्ण करावी आर्या । अनाथबंधू ॥१॥*

*असमर्थ धर्मा करणें समर्थ । तरीच म्हणवावें समर्थ ।*
*बालकाची इच्छा यथार्थ । पूर्ण करणें दयाळा ॥२॥*

***श्रीसमर्थवाग्देवतामंदिर । धुळें येथें योजिलें साचार ।***
***पाचारिती 'देव' सत्वर । महानुभाव परिवारें पातले ।।३।।***

*वाग्देवता अवतार भला । धर्मसंजीवनी मंत्र लाभला ।*
*राजाधिराज हा शोभला । ग्रंथामाजीं ॥४॥*

*जयानें अवघें राष्ट्र चेतलें । अधर्मा पायातळीं घातलें ।*
*देवपक्षी लोक मातले । विजयी झाले सर्वत्र ॥५॥*

*दोन्हीं सामर्थ्ये एकवटलीं । कलिकाळाची छाती फाटली ।*
*समर्थ राज्याची दौंडी पिटली । आर्यावर्तीं ॥६॥*

*विजयश्रीचे भगवे झेंडे । मोडलीं अधर्माचीं पाखांडें ।*
*धर्मबुडव्यांचीं काळीं तोंडें । होवोनि गेले देशघडी ॥७॥*

*समर्थ शिवबाचा प्रताप । तेधवां कोणें केलें माप ।*
*आतां स्वधर्मावरी कोप । योग्य काय दयाळा ॥८॥*

*स्वधर्माकरितां केलें तप । तीर्थपर्यटनाचा केला व्याप ।*
*स्वधर्म अवनार्थ ग्रंथव्याप । समर्थरायें मांडिला ॥९॥*

***समर्थांचा कैसा प्रताप । समर्थांचा कैसा केला व्याप ।***
***जनास येईल आपोआप । साक्ष येथें ।।१०।।***

***समर्थअवतार ग्रंथरूपें । प्रगट झाला निजप्रतापें ।***
***दर्शनमात्रें महत्पापें । विलया जाती ।।११।।***

***इहपर लोकींचें भाग्य । जयास पाहिजे यथायोग्य ।***
***तेणें धरावा सत्संग श्लाघ्य । समर्थ ग्रंथांचा ।।१२।।***

***समर्थवाग्देवता प्रगटली । भक्तिज्योत भडकली ।***
***विजयश्री येवोनि धडकली । भूमंडळीं ।।१३।।***

***तैसें जरी पुनरपि व्हावें । तरी समर्थवाग्देवतेस जागवावें ।***
***निजकंठीं वागवावें । ताइता ऐसें ।।१४।।***

***वाग्देवतांनो प्रगट व्हावें । जनताअंतरीं रिघावें ।***
***दौर्बल्य अवघें हकलून द्यावें । ऐशा प्रसंगीं ।।१५।।***

***कोठें आमुचा स्वामी समर्थ । सांगाल कां जी यथार्थ ।***
***कृपेवांचुनी आमुचा अनर्थ । चुकणार नाहीं ।।१६।।***

***वाग्देवतांनो बोला बोला । कासया धरियला अबोला ।***
***आमुचे अपराध पोटीं घाला । क्षमा करा सर्वस्वीं ।।१७।।***

*'परम अन्याय करूनि आला । आणी साष्टांग नमस्कार घातला ।*
*तरी तो अन्याये क्षमा केला । पाहिजे श्रेष्ठीं ॥'*

*ऐसें समर्थ बोलती । आधार आला माझे चित्तीं ।*
*आतां साष्टांग नमन आपणांप्रती । अनन्य भावें अर्पितों ॥१८॥*

*क्षमेची येऊं द्यावी प्रचीत । समर्थ वचनासाठीं नेमस्त ।*
*आतां जाहलों निश्चित । कृपेकारणें ॥१९॥*

*जयजयाजी वाग्देवते । पतितोद्धारक कृपावंते ।*
*करुणासागर होवोनि माते । बालकातें सांभाळी ॥२०॥*

*मी तो पातकांचा राशी । दाद लावा समर्थापाशीं ।*
*पतीतपावन या ब्रिदाशीं । सांभाळील माझा समर्थ ॥२१॥*

*श्रीसमर्थवाग्देवते । परम इच्छा असे मातें ।*
*कांहीं अर्चवें आपणांतें । परी साहित्य दिसेना ॥२२॥*

*मोदकाचा नसतां लेश । स्नान कैसें घालूं अंबेस ।*
*सद्भावाच्या चंदनास । कोठें पाहूं दयाळे ॥२३॥*

*सुमनांची नाहीं वार्ता । खोळंबा झाला हाराकरितां ।*
*काम क्रोध धूपा करितां । ज्ञानाग्नी तो दिसेना ॥२४॥*

*पंचप्राणाची ज्योती । कैची उजळावी आरती ।*
*कैसी करूं अर्चनभक्ती । सद्गुरुमूर्ती दयाळे ॥२५॥*

*संतोष घडतां अर्चन भक्ती । त्याची नकळे मजला युक्ती ।*
*येथें द्रव्य भक्तिज्ञानविरक्ती । लेश नाहीं तयाचा ॥२६॥*

*कैसें तोषवावें मन । हें मज द्यावें जी सांगोन ।*
*कैसें ध्यान धारणा समाधीसाधन । समाधान कशाचें ॥२७।*

*ऐकोनियां ब्रिदाचा डंका । येथ पातलों सोडोनि शंका ।*
*नांवासाठीं अज्ञ बालका । कृपादान कराल कीं ॥२८॥*

*पतीतपावन नांवासाठीं । समर्थें करावी कृपादृष्टि ।*
*वृथा कासया व्हावें कष्टी । ऐसा पतित पाहतां ॥२९॥*

***जय हो समर्थवाग्देवते । कृपादान अर्पावें मातें ।***
***भारतजनता एकचित्तें । निज चरणातें लावावी ॥३०॥***

*परस्परें प्रेमसंबंध । जडेल ऐसा व्हावा बोध ।*
*आपल्या कृपें शक्ती अगाध । भारतासी लाभावी ॥३१॥*

*कृपा करोनि सांगा वर्म । काय चुकलें जी आमुचें कर्म ।*
*जेणें करोनि आमुचा धर्म । दुबळा झाला ॥३२॥*

*कोणीही यासी बडवावें । कोणीही यासी तुडवावें ।*
*कोणी यासी बुडवावें । निःशंकपणे ॥३३॥*

*पूर्वी आपल्या कृपाबळें । धर्मा भाग्य लाभलें आगळें ।*
*समर्थशिवप्रतापबळें । स्वधर्मलळे पुरविले ॥३४॥*

*आतां होऊं नका खिन्न । धर्ममूर्ति झाली विच्छिन्न ।*
*गायत्रीचा नुरला मान । प्राणदान मागतसे ॥३५॥*

*आतां होवोनियां उदार । करा धर्माचा उद्धार ।*
*बालक आपल्या चरणांवर । वारंवार लोळतसे ॥३६॥*

***वाग्देवता कामधेनू । 'देव' गोपाल करी दोहनू ।***
***दुग्धपरमार्थ अमृतपानू । बालकालागीं मिळालें ॥३७॥***

# श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे आणि श्रीराम समर्थ वासुदेव स्वामी मठ, कण्हेरी (ता. खंडाळा) जि. सातारा या मठाचा अभ्यास

***श्री. उल्हास वासुदेव गोसावी***

*विश्वस्त श्रीरामसमर्थ वासुदेव स्वामी मठ, कण्हेरी*

श्रीसमर्थांचे शिष्य वासुदेव स्वामी हे समर्थांच्या हयातीतच प्रतिसमर्थ म्हणून मान्यता पावलेले, विवेक-वैराग्य संपन्न सत्पुरुष होऊन गेले. खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांनीही त्यांची 'भले भगवतभक्त' अशी प्रशंसा केली आहे. अशा श्री वासुदेव स्वामींची संजीवन समाधी कण्हेरी येथे आहे. तथापि त्यांचे चरित्राविषयी किंवा त्यांच्या लिखाणाविषयी मठामध्ये काहीही उपलब्ध नाही.

आमचे घराण्यात परंपरेनुसार चालत आलेल्या आख्यायिकेनुसार उत्तर पेशवाईच्या काळात गमाजी-यमाजी मुतालिक यांनी कण्हेरी मठ जाळला. त्यावेळी मठातील सर्व कागदपत्रे जळाली. त्यामुळे हनुमंत स्वामींच्या बखरीतील आख्यायिकेव्यतिरिक्त अन्य चरित्राची साधने उपलब्ध नाहीत. अशा परिस्थितीत स.भ. श्री शरदरावजी कुबेर यांचे मार्गदर्शनानुसार मी धुळे येथील श्री समर्थ वाग्देवता मंदिरात स्वत: उपस्थित राहून संबंधित बाडे धांडोळली. त्यावेळी काही माणिकमोती हाताशी आले आणि स.भ. कै. नानासाहेब देवांच्या कार्याचा मोठेपणा ध्यानी आला. त्या माणिक-मोत्यांपैकी काही थोडे. श्री वासुदेव स्वामींची रचना –

१) आत्मबोध १५ ओव्या (स.वा.मं.बाडांक ६८६)

२) श्रीमद्भगवद्गीता अध्याय ९ ओवीबद्ध, प्राकृत टीका (फक्त १५ ओव्या उपलब्ध) (स.वा.मं.बाडांक ६८६)

३) रामाचे श्लोक (स.वा.मं.बाडांक १५०९)

४) स्फुट रचना (स.वा.मं.बाडांक ६८६,१५०९) श्लोक, पदे, सवाया वगैरे.

एवढी वासुदेवस्वामींची रचना उपलब्ध झाली आहे. यांची नाममुद्रा वासुदेव, भ्रमर वासुदेव अशी असल्याचे दिसते. लिखाणात संत दामाजी, मुक्ताबाई, चांगदेव यांचे उल्लेख आहेत. समर्थांच्या मनाच्या श्लोकाच्या धर्तीवर त्यांनी रामाचे श्लोक रचले आहेत. ते २५ आहेत.

श्री वासुदेव स्वामी यांची शिष्यपरंपरा अशी आहे – वासुदेवस्वामी – शिष्य माधव – शिष्य पुरुषोत्तम – शिष्य भीमस्वामी. यापैकी माधवस्वामींच्या काही रचना स.वा. मंदिरात मिळाल्या आहेत. त्यांचा तपशील –

१) बाडांक ७३ राम नामेरंगारे – पद

२) बाडांक २९० जाई मानवा शरण हरीला (पद)

३) बाडांक १२०४ राम राम तिनकू हमारो (पद)

४) बाडांक १२०४ अबहुनी न्यारो राम हमारा (पद)

५) बाडांक १२०४ जीव शिवाया मुनी जनाचा (पद)

६) बाडांक १२०४ वाल्मिक चोरा प्राण आधारा (पद)

७) बाडांक ६२ नरदेह जानो रे

८) बाडांक ६२ सुस्वरमोचन ये हे रामा (पद)

९) बाडांक ६२ जोगी कोण तो भिकारी

१०) बाडांक १३५ वाल्मिक तरला रे तरला

११) बाडांक ४७० वाणीच ते वर्ते

वासुदेव स्वामी यांच्या कण्हेरी मठांच्या परंपरेत शिरवळ, मर्ढे, महिसगांव (कुर्डुवाडी) व पसरणी (वाई) असे मठ नंतरच्या काळात निर्माण झाले. त्यापैकी मर्ढे मठातील सनदा व इतर पत्रव्यवहार समर्थ वाग्देवता मंदिरात उपलब्ध आहे. तसेच पसरणी मठातील मूळ महंत – रघुनाथस्वामी यांच्या चरित्रात्मक बखरीचा एक अध्यायही या ठिकाणी उपलब्ध आहे.

कण्हेरी मठातील अन्य उपलब्ध कागदपत्रांत शके १७०३ हे हस्तलिखित पंचांग उपलब्ध झाले आहे. ते पंचांग वासुदेव स्वामींचे प. शिष्य पुरुषोत्तम स्वामी यांचे कार्यकाळातील असून त्यावरील गणपती, सरस्वती व विष्णू यांची चित्रे तत्कालीन चित्रकलेची कल्पना देतात.

अशा प्रकारे एक मोठे घबाडच हाती आले आहे. ज्यांच्याबद्दल काहीच उपलब्ध नव्हते, त्यांच्या इतक्या रचना उपलब्ध झाल्या, हेही नसे थोडके!

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

## *श्री समर्थ वाग्देवता मंदिर–*

# एक ज्ञानभांडार

***श. धों. नगरदेवळेकर***



श्री समर्थ वाग्देवता मंदिराची स्थापना सन १९३५ रोजी शिवराज्याभिषेक दिनी झाली. हे ज्ञानभांडार आहे. संस्थेचे संस्थापक श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांचेच हे कर्तृत्व आहे. सन १८९२ ला त्यांनी सत्कार्योत्तेजक सभेची स्थापना केली. तेव्हापासून सतत श्री समर्थ रामदास स्वामींचे जुने मठ, अन्य संतांचे मठ यांना श्री देव यांनी प्रत्यक्ष भेटी दिल्यात. तेथील परिस्थितीचा अभ्यास केला. तेथील मठपतींना भेटून त्यांचेशी संवाद साधून त्यांचेकडे असलेली जुनी कागदपत्रे, जुने ग्रंथ आणले. त्यांचा संग्रह केला. पूर्वीचे संत अभ्यासक यांचेकडे असलेली कागदपत्रे मिळविली. असा कागदपत्रांचा मोठा संग्रह या संस्थेत आहे.

ही कागदपत्रे भारतीय सर्व भाषांमधली आहेत. साधारणत: शंभर ते सहाशे वर्षांपूर्वीची ही कागदपत्रे आहेत. ती संस्कृत, उर्दू व प्राकृत भाषेतही आहेत. देवनागरी, उर्दू, मोडी अशा विविध लिपींमध्ये कागदपत्रे उपलब्ध आहेत.

विशिष्ट विषयांच्या कागदपत्रांचा एक गठ्ठा करून ते गठ्ठे व्यवस्थित ठेवण्यात आलेले आहेत. या प्रत्येक गठ्ठ्यास बाड असे म्हणतात. श्री समर्थ वाग्देवता मंदिरात अशी हजारो बाडे आहेत. या बाडांमध्ये असलेले कागदसुद्धा विविध आकारांचे आहेत. काही कागदांची लांबी २३/२४ फूट सुद्धा आहे.

स्वत: श्री शंकरराव देव यांनी अनेक कागदपत्रांचा, बाडांचा अभ्यास केला व त्या बाडांत कोणते ज्ञान आहे, कोणते विषय आहेत हे अभ्यासले. त्यानंतर त्या बाडांची सूची तयार करण्यात आली. सूचीत बाडांची माहिती देण्यात आली आहे. तसेच सूचीच्या मागे वर्णाक्षरानुसार संबंधित विषयांची किती बाडे उपलब्ध आहेत हे दर्शविण्यात आले आहे. आतापर्यंत चार सूची खंड प्रसिद्ध झाले असून, सूची खंड १,२,४ मध्ये एकूण २२८७ बाडांची माहिती आहे व सूची खंड ३ मध्ये ८६७ संस्कृत बाडांची माहिती आहे. अशा एकूण ३१५४ बाडांची माहिती सूची खंड रूपांत उपलब्ध आहे. तरी सुद्धा अद्यापही हजारो बाडांचा अभ्यास होऊन सूची खंड तयार करावयाचे आहेत.

श्री समर्थ वाग्देवता मंदिरात सूची खंड तयार करण्याचे काम नित्य चालू असते. गेल्या काही वर्षांत आणखी साधारणत: एक हजार बाडांचे सूचीकरण झाले आहे. तसेच जे सूची खंड प्रसिद्ध झाले आहेत त्यातील बाडांचे वर्णनात्मक सूची खंड सुद्धा तयार झाले आहेत.

संग्रहात सध्या असलेल्या बाडांमध्ये श्री समर्थ कृत व समर्थविषयक रचना, पोथी, पत्रे, मंत्रतंत्र, चित्र, युद्ध, ज्योतिष, औषधे, डफगाणी, प्रश्नोत्तरे व इतर बाडे

अशा विविध रसांचे ज्ञान आहे. संस्थापक पूज्य श्री शंकर श्रीकृष्ण देव यांनी गावोगाव हिंडून कष्टाने हे ज्ञानामृत जमा केले आहे. त्या ज्ञानामृताच्या विविध रसाचे घडे श्री समर्थवाग्देवता मंदिरात भरून ठेवण्यात आले आहेत.

*अगाध परमात्म्याची करणी । सकळ शास्त्रे मंथन करुनी ।*
*गीता नवनीत काढूनी । धनंजयासी दिधले ॥*

त्याचप्रमाणे पूज्य देव यांनी ज्ञानामृताच्या अनेक रसांचा संग्रह करून तो अभ्यासकांना उपलब्ध करून दिला आहे. या संस्थेत येणाऱ्या संशोधक, अभ्यासक यांना ही कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच त्यांची अभ्यासासाठी सोय करण्यात येते. श्री समर्थ वाग्देवता मंदिरात संपूर्ण भारतातून तसेच परदेशातून सुद्धा लोक येतात. त्यांची राहण्याची व्यवस्था येथे केली जाते. येथे संशोधन व पीएच.डी.चा अभ्यास करण्यासाठी लोक येत असतात. काही लेखक संदर्भ शोधण्यासाठी सुद्धा येतात.

असा विविध रसांचा, ज्ञानामृताचा खजिना येथे उपलब्ध आहे. आलेल्या लोकांनी त्यातून आवश्यक ते ज्ञान घेतल्यास तो खजिना कमी न होता वाढत जातो. यात असलेल्या विविध तऱ्हेच्या ज्ञानरसांची माहिती पुढे देत आहे.

### श्री समर्थविषयक बाडे

श्री समर्थ वाग्देवता मंदिरातील संग्रहात बहुतेक बाडे समर्थविषयक आहेत. त्यात समर्थांच्या रचना किंवा समर्थांवर लिहिलेले माहितीपर ग्रंथ आहेत. तसेच समर्थांची आरती, त्यांच्यावर तयार करण्यात आलेले श्लोक पद-पदांतरे अशा अनेक रचना आहेत.

बाड क्रमांक ३४० यात एकच कागद असला तरी ते महत्त्वाचे बाड आहे. त्यात श्री अनंत कवींनी श्री समर्थांवर तीन श्लोक केले आहेत.

*जेणे राघवमूर्ति मांडव सुतेचीये तिरीं स्थापिली ।*
*जे ध्यानी विधिशंकरादि हृदयीं हत्यं कजीं भाविली ।*
*तीचें ध्यान धरूनियां गिरिवरी जो गुप्त रहातसे ।*
*ऐसा सद्‌गुरू जो अनंतकवीचा बद्धास तारीतसे ॥१॥*
*जेणे रुद्र दहा मनोहर जगीं येकागळे स्थापिले ।*
*प्रत्येकी अकरा बिघे नृपतिच्या मुद्रांकिती अर्पिले ।*
*त्या त्या नागरिका जना नवविधा भक्तिसी लावितसे ।*
*ऐसा सद्‌गुरू जो अनंतकवीचा बद्धास तारीतसे ॥२॥*
*उछाहस्थळ चाफळीं परिमहा घळयेत जो की वसे ।*
*शाहाजीसुत भोसला गडपती शब्दासी पाळीतसे ।*
*बुद्धीचा उदधी महाबळ निधी कार्यासी केला असे ।*
*ऐसा सद्‌गुरू जो अनंत कवीचा बद्धासि तारीतसे ॥३॥*

तिसऱ्या श्लोकातील तिसरा चरण दिवाकर गोसावी यांना उद्देशून आहे. दिवाकर गोसावी हे महाबळेश्वरचे राहणारे असून त्यांची 'बुद्धी ही महाबळ' आहे असे श्री समर्थ म्हणाले होते. बुद्धिवंत असल्यामुळे राजाकडे जाण्या-येण्याचे काम श्री समर्थांनी त्यांच्याकडे सोपवले होते. श्री समर्थांचा व्याप बराच मोठा होता. त्यामुळे दिवाकर गोसावी हे राजकारण शाखेवरील मुख्यमंत्री होते, असे म्हणता येईल. बाड क्रमांक ३४३ मध्ये समर्थकृत नऊ प्रकरणे असून, त्यात पूर्वारंभ, पंचसमासी, आत्माराम यांचा समावेश आहे. बाड क्रमांक ३४४, ३४५ व ३४६ मध्ये सुद्धा समर्थकृत आत्माराम, पंचसमासी, पंचमान इत्यादी प्रकरणे आहेत.

बाड क्रमांक २३७ हे ३३६ पानांचे असून त्यांत श्री समर्थ स्तवनपर पाच अष्टके आहेत. पाचही मिळून बेचाळीस श्लोक होतात व शेवटी एक स्वतंत्र श्लोक आहे–

*या पंचरत्नमपि चाष्टकमादरेण ।*
*संकीर्तयत्यनुदिनं हरिदासवृंदे ।*
*अण्णाख्यपंडितमसौ हृदि विस्मरेत्किम् ।*
*एषा कृतिर्यदमुना गदिताग्रगण्या ॥१॥*

या बाडातील दुसरे प्रकरणही महत्त्वाचे आहे. त्यात

श्री पंडित श्रीकृष्ण यांनी शास्त्राधारे श्री समर्थांच्या पंथाचे समर्थन केले आहे. बाड क्रमांक ३६६ व ३६८ मध्ये श्री समर्थकृत सुंदरकांड आहे. तसेच युद्धकांड व काही पदे आहेत.

बाड क्रमांक ३९७ हे चाफळ खोऱ्यातील संग्रहातले आहे. त्यात श्री समर्थ यांच्या स्तवनपर काही कागद आहेत.

*सर्वा मते सत्पथ रामदासी । दे संपदासी हरि आपदांसी ।*
*हरूनि माया दृढ हे पदासी । दासी अशांच्या स्तविजे पदासी ॥*

हे महत्त्वाचे बाड आहे. चाफळ खोऱ्यातील श्री सांप्रदायिक विविध विषय यात आहेत. बाड क्रमांक ४५२ मध्येही श्री समर्थांची बरीच पद-पदांतरे व श्री समर्थकृत रामायणातील सुंदरकांड व युद्धकांड आहे. काही श्लोक सुद्धा आहेत.

बाड क्रमांक ६७० मध्ये सुद्धा श्री समर्थांची पदपदांतरे दिलेली आहेत. श्री समर्थ रामदास चरित्राचे तेरा श्लोक त्यात आहेत. तसेच संत देवदासांची श्री समर्थ रामदास स्वामींवर दोन स्फुटे आहेत. त्यातील एक खाली देत आहे.

*समर्थ रामदास हा । उदास दास तो पहा ।*
*जनास ना कळे स्थिती । मनासी ना कळे गती ॥१॥*
*प्रपंच वारिला सळें । विवेक लाधला बळें ।*
*समस्त हेत सारिला । रिपु बळेची मारिला ॥२॥*
*कृदांत काय बापुडें । कदा न पाहे वाकडें ।*
*उदास दास नाचती । नभांत घोष गाजती ॥३॥*
*भला समर्थ दास हा । प्रयोजिला चि या पहा ।*
*उदास वृत्ति फारसी । मनांत वृत्ति साहसी ॥४॥*
*जनांत रामदास रे । बहुत मान्य त्यास रे ।*
*तया पदी च वास रे । करीत देवदास रे ॥५॥*

या संग्रहातील बाड क्रमांक ११६६ हे सुद्धा महत्त्वाचे बाड. त्यात श्री समर्थांची पदपदांतरे आहेत. श्री आत्माराम यांनी रचलेली समर्थविषयक पाच पदे यात आहेत. ती पाचही पदे सज्जनगड, रामदासांचे कार्य, भक्तांवरील कृपा इत्यादींची माहिती देणारी आहेत. बाड क्रमांक ११६७ हे सुद्धा समर्थांच्या पदपदांतराचे बाड आहे. त्यास ३८० पाने आहेत. समर्थांची एकूण १०२२ पदे त्यावर आहेत. आरंभी अनुक्रमणिका असून पदांची आद्याक्षरे दिली आहेत. विविध रागांची पदे एकत्र केली आहेत. यांत कल्याण कृत दासबोधाची आरती व श्री समर्थांची आरती सुद्धा आहे. बाड क्रमांक ११६८ हे सुद्धा श्री समर्थांच्या अभंगाचे बाड आहे. यास दोनशे चोवीस पाने आहेत. दोन्ही बाजूंस अनुक्रमणिका आहे. घाटी ताळ, चाली यानुसार अभंगांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. शेवटी अभंगांचा तपशील दिला आहे. त्यात एकूण अभंग ४१५, कडवी ४२८५ पाने ५६ अशी माहिती आहे. बाड क्रमांक ११६९ समर्थ कृत स्फुट श्लोक आहेत व बाड क्रमांक ११७१ मध्ये श्री समर्थकृत १६५ पदे असून, आणखी भूपाळ्या व भजने आहेत. बाड क्रमांक ११७२ मध्ये श्री समर्थकृत करुणाष्टके आहेत. बाड क्रमांक ११७४ मध्ये श्री समर्थकृत सुंदरकांड, अंतर्भाव व बरीच करुणाष्टके आहेत. श्री समर्थ स्तवनपर संस्कृत प्राकृत स्तोत्रे आहेत. त्यातील एक ओवी खाली देत आहे –

*ज्याच्या बोलें राम डोले स्वभावें ।*
*वंदू रामी रामदासांसी भावे ॥१॥*

आत्मारामकृत पदे व अभंगाचे बाड क्रमांक ११७७ दोनशे चव्वेचाळीस पानांचे आहे. त्यात काही मजकूर कानडी भाषेतही आहे. श्री समर्थ रामदास स्वामींचे चरित्र लिहिण्याची आत्माराम महाराजांना खूप तळमळ लागली होती. आपले दुःख त्यांनी खालील रचनेद्वारे व्यक्त केले आहे.

*स्वामी रामराया आता विज्ञापना ।*
*भाकूं तव करुणा सत्ता नाही ॥१॥*
*देहेपात होत न वाटे ची दुःख ।*
*परी आस्था येक उरली असे ॥४॥*

*करिशील तू आता पूर्ण मनोरथ ।*
*भक्तवेळयीत ब्रीदासाठी ॥५॥*
*दोष न पाहता नवा च प्रारब्ध ।*
*निर्मुनी सावध करी देवा ॥६॥*
*दासलीळा गाऊं देई शक्ति मती ।*
*जपाची समाप्ती होऊ देई ॥७॥*
*संतसाधुशिष्य वर्गासी भेटवी ।*
*बोलवी चालवी हितगुज ॥८॥*
*काही गुरुसेवा करावी दीनानाथा ।*
*वारी मोहचिंता धैर्य देई ॥९॥*
*मग आत्मारामा पदी देई ठाव ।*
*जडऊनी ब्रह्मैव भावपूर्ण ॥१०॥*

श्री समर्थांविषयी साहित्य असलेली तसेच श्री समर्थकृत पदपदांतरे श्लोक, ग्रंथ, ओव्या, करुणाष्टके असलेली बहुसंख्य बाडे अभ्यासकांना या संग्रहांत उपलब्ध आहेत.

**पोथीपत्रासंबंधी बाडे**

या संग्रहात विविध संतांच्या पोथ्या, त्यांची पाने व पत्रे आहेत. या प्रकारची माहिती असणारी दोनशे ब्याण्णव बाडे आहेत. बाड क्रमांक ३५ मध्ये 'विवेक जालिया देवाचा योग!' हे बारा ओव्यांचे समर्थांचे आज्ञापत्र आहे. 'निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू?' हे श्री समर्थांनी शिवाजी राजांना लिहिलेले पत्र बाड क्रमांक ३५ मध्ये आहे. बाड क्रमांक ७४ मध्ये श्री अनंतसूत यांनी लिहिलेले श्लोकबद्ध पत्र आहे. त्यातील पहिला व शेवटचा श्लोक खाली देत आहे.

*हा भाव माझा चरणारविंदी ।*
*ठेवूनियां मी चरणासी बंदी ।*
*चिंता असे त्या निज सेवकाची ।*
*तैसी असावी मज सेवकाची ॥१॥*
*धरूनि भाव लिहिले अपुल्या करें ।*
*परिसिजे विनती करुणा करें ।*
*तृप्त होईन मी हृदयांतरी ।*
*ठेविला दृढ भाव चरणावरी ॥२७॥*

या संग्रहात बाड क्रमांक २१८ मध्ये ज्ञानदेवकृत उत्तर गीतेची सदतीस पानांची एक प्रत आहे. बाड क्रमांक २१९ मध्ये श्री समर्थ कृत पंचीकरणाच्या १७५ वर्षांपूर्वीची एक व २२५ वर्षांपूर्वीची एक अशा दोन प्रती आहेत. बाड क्रमांक २२० मध्ये जगन्नाथकृत बोधवैभव ह्या पोथीची तीस पाने आहेत. त्यात मूळ संस्कृत श्लोक व टीका आहे. एकूण ७१२ ओव्या त्यात आहेत. जगन्नाथ म्हणजे कल्याणस्वामींचे तळवडे मठपती जगजीवन होय. या ग्रंथरचनेत खालील ओव्या आहेत.

*सदगुरुसेवेचा गौरव । ते चि बोधाचे वैभव !*
*तेथे पाहिजे केवळ भाव । गुरुसी चातुर्य नावडे ॥*
*केवळ मूर्ख जगन्नाथा । त्यासी ऋषिकृपेवीण अन्यथा ।*
*उपाय नसे ऐसें संता । निश्चयेसी कळावें ॥*

पोथी-पत्रासंबंधीच्या बाडांत बाड क्रमांक ३८४ अतिशय महत्त्वाचे आहे. त्यास एकशे नव्वद पाने आहेत. त्यात श्री समर्थकृत आरत्या, अभंग आहेत. त्यातील काही अद्यापपर्यंत प्रसिद्ध झालेले नाहीत. या शिवाय श्री समर्थकृत खालील प्रकरणे आहेत–
१) दासबोधी ज्ञान दशक । कोणे समासी कोण विवेक ॥
२) यथायोग्य घालावे वय । अन्वय प्रसंग चुको नये ॥
३) कोणाचा भर्वसा न धरावा । आपला आपण विचार पहावा ॥

अशा तऱ्हेची नऊ प्रकरणे यात दिलेली आहेत. तसेच या बाडात अनंत कवींची कविता आहे. शिवाय त्यांचेच श्लोक आहेत. त्यांत श्री समर्थ स्तवनपर सहा श्लोक आहेत. त्या बाडातील कवितांपैकी तेरा श्लोकांचे प्रकरण विशेष महत्त्वाचे आहे. अभ्यासक त्या श्लोकांचा अर्थ लावू शकतील. त्यापैकी एक श्लोक खाली देत आहे.

*सह्याद्रीचा निकट भाग कृतोपकारी ।*
*जो क्षेमदायक बरा अति सौख्यकारी ।*
*नामे प्रसिद्ध गड भैरव हा शिवाचा ।*
*तेथे महोत्सव करी सुत भार्गवाचा ॥१॥*

बाड क्रमांक ३९४ यास ८१३ पाने असून, त्यात एकनाथी भागवत आहे. ही सर्वांत जुनी प्रत आहे. यांत साधारण पंधराशे श्लोक असून ओवीसंख्या वीस हजार आहे. यांत असलेली लिपी श्री समर्थांच्या काळापूर्वीची आहे. अशी ही सुंदर व प्रदर्शनीय प्रत आहे.

ग्रंथकार सहजानंद गोसावी व त्यांचे गुरू नारायणानंदमुनी यांनी श्रीमद् भगवद्गीता पदबोधिनी टीका हा ग्रंथ लिहिला आहे. तो बाड क्रमांक ४२७ मध्ये उपलब्ध आहे. हा अतिशय महत्त्वाचा ग्रंथ आहे. त्यास ४१७ पाने आहेत. शके १६१६ मध्ये हा ग्रंथ पूर्ण झाला आहे.

बाड क्रमांक ५३७ श्री ब्रह्मानंद यांची सटीक गुरुगीता आहे. ही गुरुगीता ओवीबद्ध असून ओवीसंख्या १०८३ आहे. श्री ब्रह्मानंद यांचे गुरू श्री संत शिव होय. श्री शिवांना प्रत्यक्ष श्री गोपालकृष्णाचा अनुग्रह होता असे श्री ब्रह्मानंद म्हणतात –

*तया उद्धव धनंजयाचें । भाग्य येकवटले साचें ।*
*ते कलीयुगी शिवाजीरुद्राचे । हृदयी वसले ॥१०२५॥*
*एवं उद्धव अर्जुन शिव । गोपाळे अनुग्रहिले स्वमेव ।*
*स्वहस्ते कवळ घाली देव । जयाच्या मुखी ॥१०२६॥*
*तव कलयुगीं श्री गोपाळें । शिवाचे मुखी दहीभात कवळीले ।*
*पूर्ण केले जनाचे डोळे । देखते झाले ॥१०२८॥*
*गोपाळे शिवाचे माथा । ठेविला हस्तु ॥२०३२॥*

श्री समर्थ शिष्य देवदास यांचे अभंग व श्लोक असलेले बाड क्रमांक ७७९ हे अतिशय महत्त्वपूर्ण बाड आहे. या बाडास ३८४ पाने आहेत. हे सबंध बाड कदाचित संत देवदास यांच्या स्वत:च्या हस्ताक्षरातील असावे. त्यांची कविता प्रेमळ व भक्तिभावाने ओथंबलेली आहे. या बाडात प्रयत्नवादाची शिकवण आहे. तो कर्मयोगच आहे. तन, मन, धन लावून तुम्ही कार्य केल्यास निश्चित यश येते. असे संत देवदास खालील श्लोक पंचकांत शिकवितात.

*जें जें करावें तें तें चि होये । करीचना ते काहीं न होये*
*म्हणोनि यत्नि घाली मनाला । ते भाग्य येते नेमस्त त्याला ॥१॥*
*यत्नी तयाला तो देव पावे । प्रयत्न नाना करीत जावे ।*
*सुचीत चित्ते तो वीवरेना । तयास काही बरें सुचेना ॥२॥*
*देणार बुद्धी तो देव ध्यावा । धाती होतो हृदिस्थ तेंव्हा ।*
*सुचे बरेंसें त्याचे दयेने । प्रयत्न तैसा कीजे तनाने ॥३॥*
*दे देव दाता जैसी च बुद्धी । तैसे करावे ते कार्य सिद्धी ।*
*तनें मनेंसी कांहीं झिजेना । तयास कांहीं हो भाग्य येना ॥४॥*
*येणे प्रकारे जाणे विचारू । जो जाणता हो नेमस्त थोरू ।*
*त्या मस्तकी हो श्रीराम आहे । हा देवदासु सांगे उपाये ॥५॥*

श्री समर्थ वाग्देवता मंदिराचे संग्रहात अशा तऱ्हेच्या अनेक महत्त्वपूर्ण पोथ्यांची पाने, पोथ्या आहेत. श्रीमद् भगवद्गीता, रामायण त्यातील विविध भाग या शिवाय दुर्लभ व महत्त्वपूर्ण अशा पोथ्या व ग्रंथ सुद्धा आहेत. देवदास चैतन्यांकित कृत करुणामृत ग्रंथ, मुकुंदराज कृत विवेकसिंधू, ज्ञानदेव विरचित अनुभवामृत, सचित्र पंचरत्न गीता, श्री एकनाथकृत स्वात्मसुख, श्री शंकराचार्य विरचितं सौंदर्यलहरी स्तोत्रम्, रुद्रपद्धती संस्कृत ग्रंथ, शारदा तिलक संस्कृत ग्रंथ असे महत्त्वपूर्ण अनेक ग्रंथ या पोथीपत्रांच्या बाडांमध्ये सापडतात. बाड क्रमांक ८९७ मध्ये सटीक कळज्ञान ग्रंथ आहे. तो मूळ संस्कृत ग्रंथ असून, संस्कृत श्लोक ४४ व ३८३ ओव्या आहेत. ग्रंथ महत्त्वाचा आहे. त्यात हटयोग, लययोग, मंत्रयोग, राजयोग इत्यादी विषयांचे प्रतिपादन आहे. त्या ग्रंथामधील चार श्लोक खाली देत आहे.

*परि केलियाविण करणि । केवि सिद्धितें पावे प्राणि ।*
*जैसा भोजनेविण कव्हणी । तृप्त नव्हे ॥३२९॥*
*नां तरी परदिपिची वार्ता । नेत्र न धाति ऐकतां ।*
*यात्रा केलियाविण तत्वता । न पचणें जेवि ॥३३०॥*
*तैसे शब्दि प्रतिपादन । करित असति सर्व जन ।*
*परि आंगे जेवि साधन । न घडे कवणा ॥३३१॥*
*जो साधून पाहिल । तयासी देहसिद्धी होईल ।*
*येर ते अवघडिं पडतिल । काळामुखिं ॥३३२॥*

## मंत्रासंबंधी बाडे

या संग्रहांत मंत्र, तंत्र, यंत्र यासंबंधी एकवीस बाडे आहेत. पूर्वीच्या काळी मंत्राचा उपयोग अनेक ठिकाणी केला जात होता. त्यावेळची समाजस्थिती व लोकांची प्रवृत्ती यावरून कळून येते. अनेकांचा मंत्र, तंत्रयंत्र यांवर विश्वास होता. बाड क्रमांक ३७१ मध्ये विचित्रवीर हनुमंते मालायंत्र, शकुनवंतीची माहिती देण्यात आली आहे. बाड क्रमांक २४३ मध्ये सुद्धा सहदेव भाडळी व मंत्रयंत्रे बरीच आहेत. बाड क्रमांक ८०८ मध्ये निरनिराळे शकून यांची माहिती आहे. त्यातच पिसाळलेला कुत्रा चावला तर त्यावर मंत्र सांगितला आहे. याशिवाय अनेक मंत्र, तंत्र या बाडांत आढळतात.

बाड क्रमांक ९०७ हे चौसष्ट पानांचे आहे. अभ्यासक संशोधक यांना अभ्यासण्यायोग्य हे बाड वाटते. या बाडात साधारणत: पन्नास मंत्र, यंत्रे व तोडगे दिलेले आहेत. गुरांना रोग होऊ नये. मिरगीपासून मुक्त व्हावे व इतरही अनेक आजार, व्यथा यातून सुटका होण्यासाठी या बाडात मंत्र, यंत्र व तोडगे सुचवले आहेत. कुस्तीच्या वेळी पहिलवानास यश मिळावे, त्याने योग्य झुंज द्यावी म्हणून पहिलवानासमोर म्हणावयाचा मंत्र यात आहे. तसेच या बाडात दाताचा, पोटशुळाचे मंत्रही देण्यात आलेले आहेत. या बाडांत हीव जाण्याचे, भूतचेष्टा न होण्याचे व लहान बाळांना दृष्ट लागू नये म्हणूनही मंत्र आहेत. चोराच्या भयापासून मुक्ती व पिसे जाण्याचे इत्यादी अनेक प्रकारची यंत्रे बाडात दिली आहेत. जारण, मारण, उच्चाटण हे सर्वकाही या बाडात पाहावयास मिळते.

जारण, मारण, स्तंभन, मोहनादी मंत्रयंत्रतंत्राचे प्रयोग बाड क्रमांक १२८० मध्ये सुद्धा देण्यात आलेले आहेत. या बाडात असे सत्तर ते पंचाहत्तर प्रयोग आहेत. हे बाड एकशे बत्तीस पानांचे आहे. श्री रामानंद गुरू, बेंगळूर ईश्वरजी, खादरसाहेब, नागपट्टणनागलिंग, पंडाराम, श्रीनिवास कवी या मान्यवर तज्ज्ञांनी मंत्र सांगितले आहेत. हे सर्व मंत्र अनुभवसिद्ध आहेत, यात संदेह नाही. सत्य आहे असे आश्वासन या बाडात दिलेले आहे. या बाडात मराठी, कानडी, गीर्वाण, हिंदुस्थानी अशा चार भाषा वापरल्या आहेत. हे बाड वाचून जिज्ञासूंची करमणूक होईल. तसेच त्यांना तत्कालीन लोकांच्या मन:स्थितीची नीट कल्पना येईल.

बाड क्रमांक ४१, ९६ या मध्ये एक एक कागद मंत्राचा आहे. बाड क्रमांक नऊशे सोळा मध्ये अनिरुद्ध सरस्वती देवतामंत्र दिलेला आहे. या पोथीचे एकच पान आहे. परंतु त्यात मंत्राचे महत्त्व कथन केले आहे. मात्र या बाडात वापरलेली लिपी अत्यंत जुनी म्हणजे ४००/५०० वर्षांपूर्वीची आहे.

## चित्र असलेली बाडे

या बाडांच्या संग्रहात विविध विषयांचे अनेक संतांचे साहित्य आहे. पद्य व काव्यरचना आहेत. तसेच बाडांमध्ये चित्रे सुद्धा आहेत. त्यामुळे बाडांचे सौंदर्य वाढले आहे. चित्र बघताच मन प्रसन्न होते. आनंद होतो व वाचनात गोडी निर्माण होते. संग्रहातील तेवीस बाडांमध्ये चित्रे आहेत.

साधारणत: आठ ते दहा बाडांमध्ये देवाच्या विविध अवतारांची चित्रे आहेत. त्यात श्रीराम, मारुती, सीता, शंकर-पार्वती, श्री गुरुदत्त यांची अतिशय सुंदर चित्रे आहेत. चार-पाच बाडांमध्ये संत-महंताची चित्रे आहेत. बाड क्रमांक त्रेपन्नमध्ये महंत कल्याणस्वामींचे चित्र आहे. पांघारी मठातून आणलेल्या बाड क्रमांक दोनशे पन्नासमध्ये त्या मठाच्या मूळ पुरुषाचे चित्र आहे. बाड क्रमांक एक हजार एकशे अठरामध्ये सद्‌गुरू बसलेले आहेत व भक्त हात जोडून उभा आहे असे चित्र आहे. या शिवाय विविध प्रकारचे नक्षीकाम, वेलबुट्ट्या, रंगीत चित्रे यांनी पोथ्यांची पाने सजवण्यात आलेली आहेत. निसर्गरम्यचित्रे विविध प्राणी, फुले, वनस्पती अशी चित्रे पाहून मन प्रसन्न व शांत होते. बाड क्रमांक सातशे बत्तीस साधारणत:

३५० वर्षांपूर्वीचे आहे. या बाडात साधारणत: त्या काळातील दागिने, कपडे चित्रकला या विषयीची माहिती आहे. तसेच त्यात एकूण पंचवीस चित्रे असून, ज्यांना गतकाळाचा अभ्यास करावयाची इच्छा असते, आवड असते त्यांना हे बाड अत्यंत उपयुक्त आहे.

बाड क्रमांक सहाशे अठ्ठावीस हे साधारणत: २७५ वर्षांपूर्वीचे आहे. चित्रांच्या बाडातील एक सुंदर बाड आहे. ही सचित्र पंचरत्नगीता आहे. सर्वांगसुंदर अशी ही पोथी आहे. यात शंभर सुंदर चित्रे आहेत. बावीस सोनेरी वेलबुट्या आहेत. सर्व चित्रे रंगीत आहेत. प्रत्येक अध्यायात सुरुवातीला व मध्ये चित्रे आहेत. गीतेचा दहावा अध्याय विभूतियोग आहे. त्यात ईश्वराच्या विविध विभूतींची माहिती आहे. विभूतियोगाच्या अध्यायातील विभूतीच्या माहितीसंबंधी जे श्लोक आहेत, त्यानुसार विभूतीचे चित्र आहे. प्रत्येक चित्राखाली संबंधित श्लोकातील चरण लिहिला आहे. त्यामुळे चित्रांकडे बघत एकेक विभूतीची अनुभूती घेत बाडाचा अभ्यास करता येतो.

बाड क्रमांक अठराशे बहात्तर हे साधारणत: २०० वर्षांपूर्वीचे आहे. श्री समर्थ वाग्देवता मंदिरात श्री समर्थ रामदास स्वामींचेच साहित्य मोठ्या प्रमाणात आहे. हे बाड सुद्धा श्रीमद् ग्रंथराज दासबोधाचे आहे. डोमगाव मठातून ही प्रत झाली आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे ही अतिशय सुंदर व सचित्र प्रत आहे. प्रत्येक दशकाच्या प्रारंभी व मधून मधून सुद्धा यात चित्रे आहेत. नवविधा भक्ती हा चौथा दशक आहे. त्या दशकातील प्रत्येक समासाच्या प्रारंभी सुंदर चित्र रेखाटण्यात आले आहे. सर्व बाडांत साधारणत: चाळीस चित्रे आहेत. पौराणिक चित्रांमुळे हे बाड अभ्यासकाचे चित्त वेधून घेते.

भगवंताचे अवतार, संत, नक्षीकाम अशी अनेक प्रकारची चित्रांची बाडे आहेतच. बाड क्रमांक बावीसशे चौसष्ट मात्र वेगळ्याच प्रकारच्या चित्रांचे आहे. चित्रांच्या बाडातील हे वैशिष्ट्यपूर्ण बाड आहे. त्यातील चित्रे शास्त्रोक्त आहेत. निरनिराळ्या प्रकारचे रोग जाण्यासाठी व रोगमुक्त होण्यासाठी विविध यंत्रे व त्यांची चित्रे यात देण्यात आलेली आहेत. अभ्यासकांना निश्चितच संशोधनासाठी हे उपयुक्त आहे.

बाड क्रमांक बावीसशे पंचाऐंशी हे सुद्धा चित्राच्या बाडांत महत्त्वपूर्ण आहे. ही पोथी बरीच लांब-रुंद आहे. पोथीची पाने पिवळ्या रंगाने रंगविलेली असून, चारही बाजूंना सुंदर नक्षीकाम केलेले आहे. त्यातील चित्रे नयनमनोहर आहेत. पोथी लिहिणारा निश्चितच उत्कृष्ट चित्रकार होता, हे त्यातील चित्रे बघितल्यावर जाणवते. पोथी पानांवरील वेलबुट्या, झाडे, पाने, फुले सर्वच बहारदार आहेत. मधूनमधून माणसे, पशुपक्षी यांच्या ललित आकृती सुंदर रंगकाम करून मनोवेधक केल्या आहेत. कृष्णलीलेची चित्रेही अनेक ठिकाणी आहेत. काही ठिकाणी गणपती, तर काही जागी साधुसंत, अन्य पानांवर तुळशी वृंदावने व वटवृक्षही मनास आनंद देतात. पोथी पृष्ठावरील काही नागाची चित्रे फारच प्रेक्षणीय आहेत. अत्यंत सुंदर असे हे सचित्र बाड आहे. चित्रे अवलोकण्यातही मनास आनंद मिळतो.

## युद्धासंबंधी बाडे

श्री समर्थ वाग्देवता मंदिरातील संग्रहात युद्धासंबंधी त्रेपन्न बाडे आहेत. त्यात श्री समर्थकृत युद्धकांडाची सर्वांत जास्त म्हणजे चोवीस बाडे आहेत. श्री कृष्णदास मुद्गल यांची एकोणीस बाडे आहेत. काही पोथ्या अपूर्ण आहेत. गिरिधरकृत छंदोरामायणातील श्लोकसंख्या ६३८ असून, गिरिधरकृत मंगलरामायणातील युद्धकांडातील श्लोकसंख्या ९२४ आहे. वाल्मिकी रामायणाची युद्धकांड असलेली दोन बाडे संग्रहात आहेत. एकनाथी भावार्थ रामायण व तुळशीरामायण यांची प्रत्येकी एक प्रत सध्या उपलब्ध आहे. मोरोपंतकृत मंत्र रामायण यांची दोन बाडे संग्रहात आहेत. त्यातील बाड क्रमांक सहाशे सहा हे पूर्ण असून, त्यात युद्धकांड पूर्ण आहे. मात्र बाड क्रमांक चवदाशे पंचवीसमध्ये युद्धकांड अपूर्ण आहे.

बाड क्रमांक सहाशे त्रेपन्न मध्ये एकूण नऊशे सव्वीस पत्रे असून, त्यात युद्धकांडाची दोनशे चव्वेचाळीस पत्रे आहेत. बाड क्रमांक सहासे चौपन्न मध्येही युद्धकांडाची १७३ पत्रे आहेत. युद्धांचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांना वाचनास, अभ्यासास अशा तऱ्हेचे भरपूर साहित्य या ठिकाणी उपलब्ध आहे.

श्री समर्थकृत सुंदरकांड व युद्धकांडाचे अतिशय सुंदर बाड या संग्रहालयात उपलब्ध आहे. त्याचा अनुक्रमांक तीनशे बावीस आहे. ही बाडाची प्रत प्रेक्षणीय आहे. प्रदर्शनात ठेवण्यासाठी योग्य वाटते. या बाडातील पृष्ठांचा आकार ८ १/४'' × ६'' असा आहे. प्रत्येक पानावर तीन श्लोक लिहिले असून, बाडातील पानांची संख्या पाचशे आहे. सुंदरकांड व युद्धकांड ही दोन्ही कांडे मिळून १४६२ श्लोक आहेत. प्रत्येक पानावर चौफेर समासासारखी जागा सोडली आहे. त्या जागेला सुंदर पिवळा रंग लावला आहे. बाडाचे वेष्टन सुद्धा पिवळ्या रंगाचे आहे.

दिवाकरांचे चिरंजीव रामचंद्र यांच्या अक्षरातले बाड क्रमांक ३५८ हे एक प्रचंड बाड आहे. हे बाड सुद्धा अतिशय प्रेक्षणीय आहे. या बाडात युद्धकांडातले प्रसंग १३,१४ व १५ आहेत. हे प्रसंग कृष्णदास मुद्‌गलकृत युद्धकांडातील आहेत. यातील ओवीसंख्या ३१७ आहे. या बाडात युद्धकांडाशिवाय अन्य पासष्ट विषय आहेत. असे हे सर्व संग्राहक व उपयुक्त बाड आहे. या बाडाचा विशेष म्हणजे या बाडाच्या पहिल्या पानावर यात असलेल्या प्रकरणांची अनुक्रमणिका देण्यात आलेली आहे. पूर्वीच्या बाडांमध्ये अशा तऱ्हेने अनुक्रमणिका लिहिलेल्या आढळत नाहीत. तसेच प्रकरण संपल्यावर पानावर शिल्लक असलेल्या जागेवर मराठी, संस्कृत सुभाषिते दिलेली आहेत. त्यामुळे बाडाचे सौंदर्य तर वाढतेच; परंतु अभ्यासकांना योग्य पान काढून पटकन आपला विषय हाताळता येतो.

बाड क्रमांक १४८ हे सुद्धा युद्धासंबंधी बाड असून ते प्रेक्षणीय बाड आहे. युद्धकांडाच्या तेराव्या म्हणजे शेवटच्या शतकाच्या ९५ श्लोकापाशी याचा शेवट झाला आहे. युद्धकांडाशिवाय सुंदरकांडाचेही श्लोक यात आहेत. या बाडात पानाच्या प्रत्येक बाजूवर पाच श्लोक आहेत. बाड क्रमांक २५५ ही सुद्धा समर्थकृत युद्धकांडाची सुंदर प्रत आहे. कागद सुंदर आहे, अक्षर सुंदर आहे. प्रत्येक पानावर तीन श्लोक लिहिले आहेत. त्याकाळी लेखनक्रिया किती आस्थेने चालत असे त्याची साक्ष देणारी जी अनेक बाडे आहेत, त्यापैकी हे एक बाड होय. साधारणत: ३२५ वर्षांपूर्वीचे हे बाड असले तरी ते अद्यापही प्रेक्षणीय आहे.

बाड क्रमांक ६०६ मध्ये मोरोपंतकृत मंत्र रामायण संपूर्ण असावे, परंतु या संग्रहालयात त्या बाडाची २६ ते १४१ पानेच उपलब्ध आहेत. यात युद्धकांड पूर्ण आले आहे. दर तेरा आर्यानंतर मंत्रसंख्या नमूद केली आहे. याप्रमाणे युद्धकांडाचे ६६ मंत्र असून, ८५८ आर्या आहेत.

बाड क्रमांक ६५३ मध्ये युद्धकांडाची २४४ पाने आहेत. त्याचा लेखनकाल – ''१६९३ खर नाम संवत्सरे पौष वद्य १३ त्रयोदश्यां भानुवासरे' असा नमूद करण्यात आला आहे. बाड क्रमांक ६५४ मध्ये सुद्धा वाल्मीकीय रामायणापैकी चार कांडे आहेत. त्यात युद्धकांडाची १७३ पाने असून, त्यात सुरुवातीला ''कुजंतं राम रामेति...'' हा श्लोक आहे.

### ज्योतिषसंबंधी बाडे

भारतात ज्योतिषशास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अनेक नामवंत ज्योतिषी, ज्योतिषशास्त्राचे अभ्यासक भारतात होऊन गेले. आजही अनेक लोकांना ज्योतिषशास्त्राची आवड आहे. त्यांचा अभ्यासही सतत चालू असतो. अशा सर्व लोकांसाठी श्री समर्थ वाग्देवता मंदिरातील संग्रहात ज्योतिषासंबंधी अनेक बाडे अभ्यासासाठी उपलब्ध आहेत. या संग्रहात ज्योतिषविषयक

बेचाळीस बाडे आहेत. त्यांत फलज्योतिष, भविष्यकथन, प्रश्न व मुहूर्त पाहणे, ग्रहांचे मंत्र, वास्तुशास्त्र, यंत्रे तसेच पंचांगशास्त्र यांची माहिती आहे. लग्नाच्या घटिकांची माहिती या बाडांमध्ये संशोधक अभ्यासू शकतात. ज्योतिषविषयक अनेक ग्रंथसुद्धा बाडांच्या रूपांत येथे उपलब्ध आहेत.

ज्योतिषशास्त्रात पारंगत असणाऱ्यांना व त्याच शास्त्राचा अभ्यास करण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी संस्कृत, कानडी भाषेतीलही ग्रंथ येथे उपलब्ध आहेत. बुद्धिविलास ज्योतिष संस्कृत ग्रंथ, व्यवहारसार, खेटरत्नाकर, तिथीरत्नाकर, चिंतामणी रत्नाकर, प्रश्न व मुहूर्त पाहण्याचा प्राकृत ग्रंथ, महादेवी हा तीनशे पानांचा प्रचंड ग्रंथ अशा तऱ्हेचे ग्रंथ या संग्रहात आहेत.

पंचांगांचीही अनेक बाडे उपलब्ध आहेत. बाड क्रमांक ८४१ मध्ये शके १७४४ चे संपूर्ण पंचांग, बाड क्रमांक ९१७ मध्ये शके १७६७ चे संपूर्ण पंचांग आहे. तसेच बाड क्रमांक ९१३ मध्ये पंचांग सारीणी हा ज्योतिष ग्रंथ असून, त्यात शके १५४४ पासूनची उदाहरणे संग्रहित केली आहेत. बाड क्रमांक १६४७ मध्ये शके १७६७ व विविध शकांचे एकूण ४३ पंचांगांचे मोठे दफ्तर आहे. बाड क्रमांक ५९४ हे सुद्धा पंचांगविषयक बाड आहे. त्यात संपूर्णपणे पंचांग विषयच हाताळला आहे.

बाड क्रमांक दोनशे सत्तेचाळीस हे ज्योतिषशास्त्र विषयाचे महत्त्वूपर्ण बाड आहे. पांघरी मठातून आणलेल्या बाडांपैकी एक बाड आहे. त्यात चोर प्रश्न, नष्ट प्राप्ते उपाय, द्रव्य व्यवहार याची माहिती आहे. वधुप्रवेश, विवाहे वर्ज्य कर्माणि, पाटचक्र, ग्रामचक्र, रुद्रपट, ब्रह्मपट यांचाही अभ्यास यात आहे. सध्या लोकांना आवश्यक असे- वास्तुशास्त्र प्रकरण सुद्धा यात समाविष्ट आहे. तिथी विचार, वार विचार, नक्षत्र विचार, मासफळ यांची संपूर्ण माहिती यात देण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांना योग्य सल्ला देण्यासाठी तत्संबंधीची माहिती यात असून, नांगरास पेरणीस रोप लावण्यास योग्य मुहूर्त याचेही ज्ञान या बाडाच्या अभ्यासाने होते. संस्कृत वचनांचा आधार घेऊन प्राकृतात त्याचा विचार या बाडांत उपलब्ध आहे. ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण माहिती व समग्र विषय यात अंतर्भूत आहेत.

बाड क्रमांक पंधराशे साठ हे साधारणत: चारशे पन्नास वर्षांपूर्वीचे आहे. यात ज्योतिषाची एकोणतीस पाने असून, त्यात संवत १५८७ ते संवत १६३० या संवत्सरातील भविष्य ज्योतिषशास्त्राचे आधारे कथन केले आहे. हे बाड त्या विषयातील तज्ज्ञ व इतिहासाच्या अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त आहे.

बाड क्रमांक सहाशे अठ्ठ्याहत्तर मध्ये अनेक मंत्र, तंत्र, यंत्रे आहेत. ज्योतिषाचा भाग कानडी लिपीत आहे. बाड क्रमांक नऊशे एक हे पूर्ण ज्योतिषविषयाचे बाड आहे. त्याला ६८ पाने असून, ते शके १६३५ मध्ये लिहिले आहे. त्यात गोपिराज दैवज्ञसुत, रामकृष्ण कृत गोत्र निर्णय वगैरे प्रकरणे आहेत. बाड क्रमांक बावीसशे चौसष्ट मध्ये फलज्योतिषाचा अभ्यास आहे. तसेच पुढील तीन पानांवर यंत्राची चित्रे व माहिती देण्यात आली आहे. उर्वरित बाडांत काही औषधे व त्यांची माहिती देण्यात आली आहे. बाड क्रमांक दोन हजार दोन मध्ये योगिनीदशा, ज्योतिषपोथी, ग्रहांच्या दशा, अंतर्दशा, प्रत्येक राशीचे फळ अशी ज्योतिषविषयक विविध माहिती आढळते. ज्योतिषकार, ज्योतिषअभ्यासक, संशोधक यांना खरोखरच अत्यंत मोलाचा हा ठेवा आहे. यात ज्योतिषविषयांच्या सर्व प्रकारांची माहिती उपलब्ध आहे.

### औषधांची माहिती असलेली बाडे

या संग्रहात औषधासंबंधी पंचेचाळीस बाडे आहेत. वनस्पतींपासून तयार होणारी खोकला, हगवण, अतिसार इत्यादी सर्व रोगांवरील औषधांची माहिती येथील बाडांत आहे. रोग होऊ नये, म्हणजे रोगप्रतिबंधक औषधांची माहिती सुद्धा संग्रहातील बाडांत आढळते. अनेक औषधे चूर्ण, भस्म, वनस्पतींची पाने, बिया यांपासूनची असून

ती सर्व भारतीय वैद्यकशास्त्राप्रमाणे असावीत. औषधांबरोबरच काही ठिकाणी बुक्का तयार करण्याच्या क्रियासुद्धा देण्यात आलेल्या आहेत. मानवांसाठी तर औषधे आहेतच; परंतु घोड्यांसाठी सुद्धा विविध औषधे सुचवण्यात आलेली आहेत.

घोड्यांसाठी औषधांची पाच बाडे याठिकाणी उपलब्ध आहेत. बाड क्रमांक एकशेचोवीस हे सावळाराम बुवांकडील संग्रहात होते. मूलत: ते बाड डोमगाव मठातीलच आहे. त्यात डोमगाव मठात बरेच मोठमोठे घोडे असल्याचा उल्लेख आहे. इतरही मठांत अनेक ठिकाणी घोडे होते. घोडे हे प्रवासाचे साधन असल्याने त्यांच्या आरोग्याचीही काळजी त्या काळात घेत असत. त्यामुळे घोड्यांच्या औषधाची यादी बाडांमध्ये आढळते. या बाडांत घोड्यांना चारावयाचे वोखद व घोड्यांच्या जखमांना लावायची वोखदे या औषधांची माहिती देण्यात आली आहे.

संग्रहातील बाडांमध्ये औषधांची माहिती आहे. तसेच काही वैद्यकीय ग्रंथ सुद्धा बाडांमध्ये आढळतात. बाड क्रमांक आठशे पासष्ट मध्ये ९९ पानांचा 'वैद्यकसार' नावाचा महत्त्वाचा प्राकृत ग्रंथ आहे. इंग्रजीतील हुबेहूब Materia Medica या धर्तीवर औषधांच्या गुणधर्मांचे विवेचन करणारा वैद्यकशास्त्राचा हा अपूर्व ग्रंथ आहे. ग्रंथाचा लेखनकाल, लेखक यांची माहिती सुद्धा त्यात आहे. ग्रंथातील नोंद पुढीलप्रमाणे आहे. 'शके १५९९ पिंगलनाम संवत्सरे फाल्गुन सुध १० वार ब्रहस्पतवार ते दीसी वैद्यकसार पुस्तक कृष्णाजी नायेक भावार्थी या लिहील हस्ताक्षर दिन नारायण विठ्ठल खुडेगावकर लिहील असे.'' बाड क्र. ९३७ मध्ये वैद्यकशास्त्राचा ग्रंथ आहे. तो अपूर्ण आहे. त्यातील अध्याय १०वा ८ पानांचा आहे. बाड क्रमांक दोनशे त्रेचाळीस मध्ये धन्वंतरी ग्रंथ आहे. बाड क्रमांक ९३६ मध्येही वैद्यकशास्त्राचा अपूर्ण ग्रंथ आहे. बाड क्रमांक १६५४ मध्ये त्र्यंबकी नावाचा वैद्यकीय ग्रंथ आहे व बाड क्रमांक १७२३ मध्ये रामविनोद नावाचा ग्रंथ आहे. बाड क्रमांक १५३० मध्ये नमूद केलेली सर्व औषधे ओवीबद्ध आहेत.

औषधे तयार करण्याची माहिती सुद्धा काही बाडांमध्ये देण्यात आली आहे. बाड क्रमांक १२७१ त्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण बाड आहे. या बाडास १६६ पाने आहेत. त्यात श्रीरामबाणमात्रा तयार करण्याची कृती दिलेली आहे. तसेच वैद्यकशास्त्रानुसार उपयुक्त रस, भस्म करण्याच्या विविध क्रिया यात देण्यात आलेल्या आहेत. औषधे, तोडगे, विजयघुटिका प्रयोग इत्यादी वैद्यकशास्त्रातील विषयांची माहिती या बाडात अभ्यासकांना पाहावयास मिळू शकते. आता सध्या प्रचारात नसलेल्या, अगदी निराळी सूर्यनमस्कारांची बारा नावे या बाडात आढळतात. वैद्यकशास्त्रांच्या अभ्यासूंना अतिशय मार्गदर्शक व उपयुक्त असे हे बाड आहे.

बाड क्रमांक ७९५ हे सुद्धा औषधशास्त्रांचे महत्त्वाचे बाड आहे. यात दारुण संग्रहणी नाशार्थ मधुपाकी हिरडी करण्याची क्रिया देण्यात आलेली आहे. तसेच हेमगर्भ करावयाची क्रिया सुद्धा यात पाहावयास मिळते. संनिपात, हगवण, अतिसार, रक्तपिती या रोगावर योग्य उपाययोजना, त्यासाठी आवश्यक औषधे यांची माहिती या बाडात आहे. मूळव्याधीचे विविध प्रकार, फुटलेले कान यावरची औषधयोजनाही या बाडात आढळते. या बाडास ३८ पाने आहेत. बाड क्रमांक ८३८ हे सुद्धा महत्त्वाचे बाड आहे. यात सुद्धा विविध औषधयोजना सुचविल्या आहेत. ताम्रभस्मक्रिया, पुरुषत्वास क्रिया या बाडात दिलेल्या आहेत. तसेच मर्दूमीस औषध, खोकल्याचे औषध, गंडमाळा औषध अशा अनेक औषधांच्या कृती यात नमूद केल्या आहेत.

बाड क्रमांक १२११ मध्ये सुद्धा रोगनिवारणार्थ काही औषधे सुचविण्यात आली आहेत. पित्त व दमा हे अतिशय हट्टी रोग आहेत. ते सहसा बरे होत नाहीत. त्यावरही औषधे या बाडात दिलेली आहेत. तसेच 'मुरडा' या रोगासाठी सुद्धा औषध सांगितले आहे. विविध रोग, त्यावर योग्य व उपयुक्त औषधे अनेक बाडांत सुचविली

आहेत. परंतु रोग होऊ नये, रोगापासून मुक्त राहावे यासाठी सुद्धा बाड क्रमांक १४५१ मध्ये औषधे सुचविली आहेत. या बाडांत अकरा प्रकारच्या रोगांचा प्रतिकार करण्यासाठी रोग परिहारक मात्रा, लेह, औषधे यांची माहिती देण्यात आली आहे.

### डफगाणी

डफगाणी, पहाटगाणी या संबंधी सहा बाडे या संग्रहात आहेत. बाड क्रमांक ६१८ हे अगदी महत्त्वपूर्ण बाड आहे. त्यास ४२० पाने आहेत. संग्रहातील पृथ्वीमोलाची जी काही बाडे आहेत, त्यापैकीच हे बाड आहे. यात पूर्वार्ध पदे २३९, स्फुट पदे १७, आरत्या १३, उत्तरार्ध पदे ३३७, परिशिष्ट पदे ६, गोंधळ २ आहेत. तसेच या बाडांत पूर्वार्धानंतर डफगाणी व पहाटगाणी आहेत. ह्या सर्व रचना घरगुती भाषेत, हृदयात प्रवेश करणाऱ्या व गालातल्या गालात हसविणाऱ्या आहेत.

*शिवराव देवराव द्यानतराव दलपतराव*
*दिनकरराव दळबटराव धारेराव ॥१॥*

असे अकरा कडव्यांचे एक डफगाणे माणसांच्या नावाचेच आहे. ही माणसे कदाचित त्या काळातील त्या प्रदेशातील काही महत्त्वाची असावीत.

निरनिराळे धंदे, कारखाने यावर ३२ कडव्यांचे धार्मिक पंथावर २० कडव्यांचे, अरण्ये, यातील शोभा, त्यातील जनावरे यावर २७ कडव्यांचे अशी अनेक विषयांवर दंडिगाणी आहेत. तीर्थावळीचे दंडिगाणे सुद्धा या बाडात आहे. श्री समर्थांची अप्रकाशित कविताही या बाडात आहे. या बाडातील महत्त्वाचे पद येथे देत आहे.

*देव देवावरी देऊळ । देवळा वर्ताब्रह्म गोल ।*
*त्यापरते शून्य मंडळ । परता देव ॥१॥*
*देव परता ना आरता । देव वर्ता न खालता ।*
*देव निश्चळ पुरता । सर्वा ठाई ॥२॥*
*देव अनंत अपार । देवनिर्गुण निराकार ।*
*त्याचा शोधावा विचार । साधुपासी ॥३॥*
*दास मौजेने बोलिला । शोध शोधावा आपुला ।*
*व्यर्थ कासया गलबला । जन्मवरी ॥४॥*

बाड क्रमांक ७४८ हे सुद्धा महत्त्वाचे बाड असून, त्यास ९२ पाने आहेत. या बाडात फक्त गिरीधरांची पदपदांतरे आहेत. तसेच साधारणत: २५ डफगाणी आहेत. त्यातील काही वचने मनाला चटका लावणारी आहेत. काही पदे खाली देत आहे –

*१) देवें श्रीगुरुहातीं दिल्हें । समर्थ वैधें उपचारिलें ।*
*दुखणें ठाईचे काढिलें । नवल जालें ॥४४॥*
*२) जाली वृत्ति उदासीन । उडोनी गेले प्रपंचभान ।*
*असो जावो हे धन कण । ऐसा भावो ॥५१॥*
*३) इतुकें समर्थांनें केलें । मीपण माझें समूळ नेलें ।*
*गिरीधर बाळक धन्य जालें । प्रचीतीनें ॥५३॥*

### प्रश्नोत्तरे

श्री समर्थ वाग्देवता मंदिराच्या संग्रहात प्रश्नोत्तराची सुद्धा बाडे आहेत. बाड क्रमांक ५३४, ५७१, ९०२, १३७८, १३९६ यामध्ये प्रश्नोत्तर स्वरूपात गद्य किंवा पद्यरचना आहेत. बाड क्रमांक १३७८ मध्ये वाक्यरचना गद्य स्वरूपात असून, साधारणत: तीनशे पाच प्रश्न विचारले आहेत व त्याची समर्पक उत्तरे देण्यात आली आहेत. बाड क्रमांक १३९६ मध्ये मात्र १०१ प्रश्न असून त्याची ओवीबद्ध उत्तरे देण्यात आली आहेत.

बाड क्रमांक ९०२ मध्ये ४० पाने आहेत. प्रत्येक पानावर एक प्रश्न व त्याचे उत्तर अशी चाळीस प्रश्नोत्तरे या बाडांत आहेत. 'गावाला गेल्यावर काय होईल? व्यापारात फायदा होईल का? रोग बरा होईल का?' अशा तऱ्हेचे प्रश्न व त्यांची उत्तरे त्यात आहेत. बाडाच्या प्रश्नाचे स्वरूप खाली देत आहे त्यावरून त्यावेळची भाषा याचा परिचय होईल.

"गावास गेलिया काय होईल की नव्हे, हा उदीम करोता बरवे की काये, हे केने ठेविता लाभ होईल की नव्हे, हा रोगु बरवा होईल की नव्हे, हे गुरू गेल ते

गवसेल की काये, हे रीण येईल की न ये, यासी लेकरे काये गुण नव्हती, गर्भीनीस पुत्र की कन्या होईल, आवंदा कटक होईल की काये''

बाड क्रमांक ५५१ मध्ये प्रश्नोत्तरे श्लोकांमध्ये दिली आहेत. त्यातील एक प्रश्नोत्तर खाली दिले आहे–

प्रश्न : गर्भधाप्रति डोळसे झकविलें ते अंध कूपि पडे ।
सदवैद्यें जरी वंचिले तरि जिणे रोग्यासी कैसे घडे ।
जैसी निष्ठुर बाळकासि जननी ने घे जसी पै कडे ।
तैसी हे गति आमुची तरी विठो अन्याय कोणाकडे ।।

उत्तर : बोले विठ्ठल भक्तराज सखया मी सर्व सर्वांतरी ।
नांदे सर्व समान व्यापकपणें तंतू जसा अंबरी ।
असें सदगुरूच्या मुखे नुमगती गुंतोनी देहाकडे ।
आत्मा आपण नेणती नर कुडे अन्याय हा त्याकडे ।।

### इतर बाडे

युद्ध, औषध इत्यादी विषयांवर अनेक बाडे या संग्रहात आहेतच; परंतु या शिवाय अन्य बावीस विषयांवर एक ते चार पर्यंत बाडे संग्रहात आहेत. या सर्व बाडांना इतर बाडे म्हणून संबोधण्यात आले आहे. सर्व बाडांमध्ये पदपदांतरे, ओव्या आहेतच त्या बरोबर इतर विषयांची माहिती सुद्धा आढळते. बाड क्रमांक ४५४ व १५१९ मध्ये करुणाष्टके, मनाचे श्लोक, प्रात:स्मरण आहे व साराशोधावयाचा प्रकार, यादी दास्त दारू, चंद्रज्योतीची दारू भोईनळेची दारू, दारू करण्याची क्रिया यांचीही माहिती आढळते.

सनदा व पत्रें यासंबंधी चार बाडे येथे उपलब्ध आहेत. बाड क्रमांक ५३६, ६२०, ६२७, ७५६ मध्ये सनदांसंबंधी माहिती आहे. बाड क्रमांक ६२७ मध्ये कागदाच्या तीन गड्ड्या आहेत. त्यात आनंदमूर्तींच्या मठातील ७७ अस्सल सनदांच्या नकला, दुसऱ्या गड्डीत ४२ सनद पत्रांच्या नकला कृष्णराव करमरकर यांनी करून ठेवल्या आहेत. तिसऱ्या गड्डीत आनंदमूर्तींचे चरित्र आहे.

भजने, गायन, कीर्तन, आरत्या, आख्यान व राग या सर्व विषयांवर विविध बाडांत माहिती आहे. बाड क्रमांक १२४९ ला एकशेचाळीस पाने आहेत. त्यात रामजन्म कथा, ताटिका वध, सीतास्वयंवर अशा आठ विषयांवर कीर्तने दिली आहेत. कीर्तनात श्रीसमर्थ केशव, कृष्णदास, एकनाथ, गिरिधर अशा अनेक संत कवींची पदपदांतरे, ओव्या यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. बाड क्रमांक ११६५ मध्ये अनेक भजने आहेत. त्या भजनांचे नमुने खाली दिले आहेत.

१) रामदास माऊली । अंतर्यामी राहिली ।।
२) गुरू कल्याण माऊली । निशिदिनि वदनीं गाईली ।।
३) गुरू दत्तात्रय माउली । करी कृपेची साऊली ।।

बाड क्रमांक १२२० हे ११८ पानांचे असून, हे सबंध बाड गायनीकलेचे आहे. यात आदिताळ, आनंदभैरवी, मोहन, शंकराभरणी, कल्याणी इत्यादी रागांतील तत्प्रांतीय पदे दिली आहेत. बाड क्रमांक ५४९ यात निरनिराळ्या रागांसंबंधी माहिती आहे. बाड क्रमांक १८८३ यात आख्यान असून बाड क्रमांक १९४४ मध्ये आरत्या आहेत.

गणिते, रसायन, भूगोल, व्याकरण, रीत असे विषयही काही बाडांत देण्यात आलेले आहेत. बाड क्रमांक ६०४ मध्ये गणिते सोडविण्याच्या रीती दिलेल्या आहेत. बाड क्रमांक ५३४ मध्ये व्याकरणाचे काही कागद आहेत. बाड क्रमांक १६२२ मध्ये भूमिगोळ, भूगोल व इतिहास इत्यादी माहिती लेखकांनी दिली आहे.

बाड क्रमांक ४७० मध्ये दुष्काळासंबंधी माहिती आहे. त्यात श्री समर्थकालीन दुष्काळाचे सविस्तर वर्णन आलेले आहे. बाड क्रमांक ४७८ मध्ये पावसासंबंधी माहिती असून, ती श्लोकरूपात देण्यात आलेली आहे. हे मेघांचे श्लोक शिवराम यांनी केले आहेत. अशा तऱ्हेने ढग, पाऊस, दुष्काळ अशा निसर्ग परिस्थितीवर

सुद्धा संग्रहातील बाडांतून माहिती उपलब्ध आहे.

बाड क्रमांक १८९२, २०२४, २०८७ व २१३९ मध्ये नाटके आहेत. बाड क्रमांक ३५ मध्ये शकुनवंती हे ४९ श्लोकांचे संस्कृत प्रकरण आहे. शेवटचा श्लोक खाली दिला आहे.

*क्षकारे लभते भाग्यं राज्यसन्मानमेव च ।*
*संपदा विविधा तत्र प्रमाणं च प्रजायते ॥४९॥*

बाड क्रमांक ४२३ मध्येही शकुनावलीचे कागद आहेत. फाशावर 'नारायण' ही अक्षरे चारही बाजूंस कोरून जे दान पडेल त्यावरून शकुन पाहाण्याचे पंचेचाळीस प्रकार दिलेले आहेत. शकुनासंबंधी अजून दोन बाडे या संग्रहात आहेत. याशिवाय बाड क्रमांक ११४७ मध्ये लाखेपासून शाई तयार करण्याची रीत दिली आहे, तर कामशास्त्र या विषयावर बाड क्रमांक १२२६ व २१४७ मध्ये माहिती देण्यात आलेली आहे.

बाड क्रमांक ११४४ मध्ये वर्गणीच्या सहा प्रकारच्या याद्या देण्यात आल्या आहेत. आप्तवर्गशिष्यसमूह, संतसाधुयोगेश्वर, वैदिक, जमीदार, साहुसराफ उदीमदार, रोजगारी व्यापारी, गाव गाना या सहा याद्यांवर मथळ्याच्या जागी पुढीलप्रमाणे नोंद आहे. 'स्वस्ति श्री बहुधान्य नाम संवत्सर चैत्र प्रतिपदा गुरुवार ॥ रामदासी संस्थान नवनीत नदितटी मठ अपचंद येथील उपासना चालायास धर्मवंत सहकारी संग्रह । प्रतिवर्षी भिक्षा पोहचावी ॥ तेथील सेवक आत्माराम गोसावी विनवणी ॥

बाड क्रमांक १५३४ हे टिपणाचे बाड आहे. त्यात शककारक राजे, दशविध विप्र लक्षणे, अष्टादश यति नवरत्न, चर्तुदशविद्या, चौसष्ट कला, नवविधा भक्ती अशा वीस-पंचवीस विषयांवर टिपणे केलेली आहेत. बाड क्रमांक १६९४ मध्ये इंग्लंड देशाचे वर्णन आहे. हे वर्णन श्री. नाना नारायण यांनी केलेले आहे. प्रस्तावनेमध्ये ज्ञानापासून मिळणाऱ्या लाभांचा विचार आहे. वर्णन वाचून त्यावेळची भाषा व विचार यांचे आकलन होते.

इतर बाडे यामध्ये साधारण बावीस, तेवीस विषयांवर एकूण चाळीस बाडे आहेत. सर्व बाडे महत्त्वपूर्ण व अभ्यासकांना निश्चितपणे उपयोगी आहेत.

# श्री समर्थ वाग्देवता मंदिर, पथदर्शी अहवाल

**प्राचार्य डॉ. सो. त्र्यं. जोशी**

*अध्यक्ष, श्री समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे*

*जयांचे केलिया स्मरण । होय सकल विद्यांचे अधिकरण ।*
*तेचि वंदू श्रीचरण । श्रीगुरूंचे । –ज्ञानेश्वरी १*

राष्ट्रगुरू समर्थ रामदास स्वामींचे स्मरण करून श्री समर्थ वाग्देवता मंदिराची अमृतमहोत्सवी पथदर्शी वाटचाल अध्यक्ष म्हणून मी समोर ठेवतो. हा एका अर्थाने संस्थेच्या दस्तऐवजाचा, संस्थेच्या कार्याचा ऐतिहासिक आढावा आहे. संस्थेचा विकास, आजच्या योजना व भावी नियोजन या प्रमुख अंगाने विचार मांडावे असे योजले आहे. श्री, रा, म, स, म, र्थ या सहा अंगाने या लेखाची मांडणी आहे.

**श्री** - प्रत्यक्ष १९३५ साली दृश्यस्वरूपात श्री समर्थ वाग्देवता मंदिर ही संस्था अवतरली असली, तरी खरी १९०३ पासूनच कार्यरूपाने अवतरली आहे. म्हणजे कार्यस्वरूपात या संस्थेची शताब्दी वाटचाल आहे. संस्था संस्थापक स. भ. नानासाहेब तथा शंकर श्रीकृष्ण देव यांनी १९०३ सालापासूनच समर्थ साहित्य संशोधन सुरू केले. १९३५ सालापर्यंत त्याची व्याप्ती एवढी वाढली की, त्या संग्रहाचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केल्याशिवाय पर्यायच उरला नाही.

दिवसागणिक व विविध प्रदेशांच्या भेटीतून एवढे संशोधन साहित्य, हस्तलिखित, अन्य साहित्य गोळा होऊ लागले की, १९२७-२८ पासूनच जेव्हा नानासाहेबांनी ३००० पेक्षा अधिक बाडांचे संशोधन केले. सूची तयार केल्या. ते पाहाण्यासाठी स्वतंत्र इमारत व व्यवस्था निर्माण करावी लागली.

कै. देवांनी १८९७ पासून धुळ्यास वकिली करावयास सुरुवात केली. त्याच वेळेपासून संसाराबरोबर समर्थ कार्य, राष्ट्रकार्य करावयास सुरुवात केली. तेव्हापासून ते याकरिता दौरे आखत. सोबत कै. गोपाळ रावजी गोगटे वकील (भुसावळ), व कै. श्री. विष्णु सीताराम रणदिवे त्यांच्याबरोबर असत.

लो. टिळकांनी त्यांचे कार्य पाहून नानासाहेबांना व गोगटे वकिलांना सिंहगडावर बोलावून घेतले व तेथे मठातून जमविलेल्या कागदपत्रांची, संग्रहाची विगतवारी कशी लावायची, त्याचे संशोधन कसे करावयाचे यासंबंधी मार्गदर्शन केले. राष्ट्रप्रेरणा स्थान म्हणून या संशोधनाचा उपयोग होईल असे विचार मांडले. खरे तर येथेच श्री समर्थ वाग्देवता मंदिराची सुरुवात झाली. ३० वर्षांच्या कालावधीत जमा झालेल्या साहित्याकरिता एक वास्तू उभारायचे ठरविले. ज्येष्ठ शुद्ध १३ शके १८५७ (१४ जून १९३५) श्री समर्थ वाग्देवता मंदिराची भव्य वास्तू उभी राहिली. मंदिर पाहाताच ही एक ऐतिहासिक वास्तू आहे, असे तिचे वैशिष्ट्य लक्षात येईल, अशी योजना होती.

त्यामुळे सुरेख, सुडौल, दगडी चिरेबंद अदाह्य (अग्निविरोधक) अशी भव्य वास्तू उभारली गेली.

**रा** - ज्येष्ठ शु. १३ (शिवराज्याभिषेक दिनी) इंदोरच्या महाराणी मातोश्री इंदिराबाई होळकर (इंदौर) यांच्या हस्ते इमारत उद्घाटन सोहळा झाला. ही देवांची खासगी जागा त्याच दिवशीला जागेचे दानपत्र करून (सुमारे ३६०१ चौ. फूट एवढ्या क्षेत्रफळाची (७५ x ४८ चौ. फूट) जागा व विश्वस्त मंडळ तयार करून त्यांच्यामार्फत राष्ट्रास समर्पित केली. त्याच वेळी समारंभ संपल्यावर मंदिर सदस्यांची पहिली बैठक झाली. त्यास प्रामुख्याने लोकसभेचे पहिले अध्यक्ष कै. श्री. दादासाहेब मावळणकर, कै. श्री. नानासाहेब देव, कै. श्रीमंत प्रतापशेठ, कै. भारतीया शेठ, कै. ॲड. विनायकराव जोशी, कै. ॲड. जोगळेकर, कै. ॲड. गोपाळराव गोगटे, कै. रणदिवे बंधू, कै. दाते शास्त्री, कै. कवी विनायक इ. मंडळी व गावातील प्रतिष्ठित सज्जन मंडळी उपस्थित होती.

नानासाहेब देवांनी सर्व संमतीने विश्वस्त मंडळ निश्चित केले. श्री. जोगळेकर अध्यक्ष व नानासाहेब देव कार्याध्यक्ष (सचिव) असे ठरले. सत्कार्योत्तेजक सभेचे सचिव व समर्थ वाग्देवता मंदिराचे कार्याध्यक्ष त्या दोन्ही पदांवर एकच व्यक्ती असल्यास दोन्ही संस्थांचे कार्य एकमेकांना पूरक ठरतील असे लक्षात घेऊन या दृष्टीने नानासाहेब कार्याध्यक्ष झाले. संस्थेची घटना तत्काळ करून विश्वस्त मंडळाची शासकीय दप्तरी नोंद करवून घ्यावी असे ठरले.

घटनेप्रमाणे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असे होते.

१) श्री समर्थ वाङ्मयाचे, साहित्याचे संकलन करणे.

२) या साहित्याचे संशोधन करणे.

३) संशोधित साहित्याचे प्रकाशन करणे, प्रसार करणे.

४) साहित्याच्या संशोधनाकरिता लोकांना, बुद्धिवंतांना आवाहन करणे.

५) अन्य संतांचे वाङ्मयाचाही अभ्यास करणे.

**म** - नानासाहेब देवांनी सर्व प्रपंच, राजकारण, समाजकारण सांभाळून एवढ्या साहित्याचे संशोधन केले होते की, ते पाहून माणसास आश्चर्यच वाटते. श्री समर्थ रामदास स्वामींनी त्यांच्या हयातीत जेवढे प्रचंड वाङ्मय निर्माण केले होते त्याचे सर्वांचे संशोधन नानासाहेबांनी केले होते. त्याच्या सर्व नोंदीवर नुसती नजर फिरविली की आपल्याला त्याचे गांभीर्य लक्षात येते.

| | संशोधित पृष्ठ संख्या |
|---|---|
| १) अभंगात्मक प्रकरणे | ३८७० |
| २) अष्टाक्षरी पाच लघुकाव्ये | ५५५ |
| ३) अष्टाक्षरी प्रकरणे | १६७० |
| ४) श्लोकबद्ध प्रकरणे | ३२६२ |
| ५) ओवीबद्ध अकरा लघुकाव्ये | २७४१ |
| ६) श्रीमत् दासबोध | ७७५१ |
| ७) पदपदांतरे | ३५०० |
| ८) अवांतर प्रासंगिक प्रकरणे | ३००० |

नानासाहेब देवांनी विविध समर्थ मठांतून फक्त समर्थांचेच साहित्य आणले होते असे नाही. त्या मठातून उपलब्ध सर्व साहित्य म्हणजे- ऐतिहासिक कागदपत्रे, इतर संतांचे साहित्य व औषधीय, यंत्र, तंत्र, मंत्र यांचे साहित्य असा सर्व सांस्कृतिक ठेवाच गोळा केला होता. अन्य साहित्याचा आढावा घ्यायचे तर असे म्हणता येईल की येथे श्री समर्थ संप्रदायाच्या बहुतेक मठांतील विखुरलेले उपलब्ध वाङ्मय निगुतीने जतन करून ठेवण्यात आले आहे. त्यात समर्थांच्या प्रमुख व अन्य शिष्यांची लिखिते, शिवछत्रपतींचे निवाडे, सनदा, महजर येथे आपणास पाहावयास मिळतील. येथे समर्थांच्या स्वहस्ताक्षरांतील एकमेव गद्य पत्र व वाल्मीकी रामायण उपलब्ध आहे. समर्थ महंतांनी उपलब्ध करून दिलेली नाणी, ताम्रपट, गीत गोविंद चित्रे इत्यादी समग्र भांडार आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे सुमारे ६०० संत (समर्थ संप्रदायाव्यतिरिक्त) यांचे मूळ साहित्य उपलब्ध असल्याने

कोणत्याही संत वाङ्मयाचा अभ्यास करावयाचा असल्यास श्री समर्थ वाग्देवता मंदिराच्या भेटीशिवाय अपूर्ण राहातो असे म्हटले जाते. म्हणून विद्या वाचस्पती पदवीकरता येथे येणे अनिवार्य ठरते. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ यांच्या वाङ्मयाबरोबर येथे इतर संतांनी केलेली चरित्रे, स्वयंवर, आख्याने, पोवाडे, लावणी, बखरी, फटके तसेच ऊर्दू वाङ्मय ही मूळ स्वरूपात उपलब्ध आहे. मराठीसोबत हिंदी, उर्दू, पंजाबी, मारवाडी आणि संस्कृत भाषेतील ३१४४ हस्तलिखित बाडे देव यांनी उपलब्ध करून दिली आहेत. त्या सर्वांचे सूचीकरण झाले आहे. त्यानुसार भाषा प्रमुख धरून बोलावयाचे झाल्यास ६० टक्के मराठी भाषेत, १० टक्के संस्कृत भाषेत, हिंदुस्थानी ८ टक्के, कानडी ६ टक्के, गुजराती ३ टक्के व इतर भाषांत फारशी, तेलगू, अरबी, मारवाडी, हिंदी, पंजाबी अन्य भाषांत याचा प्रत्येकी एक टक्का ग्रंथ साहित्य, जाणकार व अभ्यासाकरिता उपलब्ध आहे. काळासंबंधित बोलावयाचे झाले, तर १०० वर्षापूर्वीची १४०, १५० वर्षापूर्वीची ५२९ बाडे, २०० वर्षापूर्वी ७१७, २५० वर्षापूर्वीची ४६३ बाडे, ३५० वर्षापूर्वीची १८८, ३०० वर्षापूर्वीची ५ बाडे उपलब्ध आहेत. विषय मध्यवर्ती धरून पाहिल्यास युद्धासंबंधी पत्रे, ज्योतिषासंबंधी, जमाखर्च, चित्रे, यंत्र, तंत्र, मंत्र औषध, गायनासंबंधी व किरकोळ ६९ विषयांवर बाडे उपलब्ध आहेत.

असा दुर्मिळ, अलौकिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक आध्यात्मिक ठेवा येथे जपून ठेवला आहे. म्हणून हे ज्ञानपीठ आहेच. आतापर्यंत १३५ संशोधक अभ्यासकांची नोंद येथे आहे. त्यांना त्यांची पीएच.डी. पदवी पण प्राप्त झाली आहे. नानासाहेब देवांचे दोन व शिवाजीराव भावे यांचे दोन असे एकूण ४ सूची खंड अभ्यासकाला अभ्यासाची दिशा दाखविण्यास उपलब्ध आहेत. शिवाय १९८६ साली प्रा. डॉ. केतकर यांनी केंद्र सरकारच्या अनुदानातून टाकळी मठाची सविस्तर विवरण सूची तयार केली आहे. त्याची संदर्भपत्रके पण उपलब्ध आहेत.

**स** - एक वास्तुवैशिष्ट्य व ज्ञानपीठांतील संग्रह या अंगाने (श्रीराम) आपण श्री समर्थ वाग्देवता मंदिराचा आढावा घेतला. आता (समर्थ) या तीन पैलूंतून ऐतिहासिक वाटचाल, कार्यदिशा व भविष्याचा वेध या अंगांचा आपण विचार करणार आहोत.

कालखंड १९३५ ते १९७८, कालखंड १९७९ ते १९८४ व १९८५ ते २०११ असे प्रगती, विशेष उपक्रम या संबंधित कालखंड मानले आहेत.

अ) पहिला कालखंड- श्री. नानासाहेब देवांच्या मार्गदर्शनाखालीच १९३५ ते १९५७ या कालावधीत दौरे, अभ्यासगट चर्चा, परिषदा यामुळे श्री समर्थ वाग्देवता मंदिर हे समर्थ ज्ञानपीठ म्हणून उदयास आली. मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे नानासाहेब देवांनीच जवळजवळ ३००० बाडांचे स्वत:च संशोधन केले. २००० बाडांची नीट सूची करून रचना लावली व ९० ग्रंथ प्रकाशित केले. अभ्यास, परिषदांमुळे येथे अभ्यासक पुष्कळ यावयाचे. सुरुवातीस उल्लेख केल्याप्रमाणे ज्येष्ठ शु. १३ शके १८५७ (१४ जून १९३५) ला मंदिराचे उद्घाटन झाले व घटना तयार करून मंदिराची व्यवस्था लावून नानासाहेब देवांचे भारतभर दौरे सुरू झाले. नानासाहेब प्रभावी वक्ते होते त्यामुळे त्यांच्या भाषणास हजारो लोक यावयाचे. त्यामुळे मंदिराशी खूप जणांचा संपर्क आला. अभ्यासकही चांगल्या संख्येने मिळाले. त्यामुळे अभ्यागत गृह बांधले गेले. श्री. गोपाळरावजी गोगटे व रणदिवे बंधू यांनी अभ्यासाकरिता अभ्यागत आश्रमात रात्रंदिवस मुक्काम ठोकला. रात्री ११ वाजेपावतो नानासाहेब देव असायचे. ते रोज १/२ बाडे संशोधकास आणून द्यावयाचे. १९५० पर्यंत काम जोरात होते. पण नानासाहेबांचे चिरंजीव वारले. त्यामुळे त्यांचे लक्ष उडाले. तरी इतरांनी ते काम चालू ठेवले. १९५८ ला नानासाहेब वारल्यानंतर त्यांचे चिरंजीव मोरेश्वर देव व शिदोरे

यांनी काम पाहिले. १९६९ साली शिदोरे वारले व मोरेश्वर देव १९६० पासून नागपूरला गेले. त्यानंतर वासुदेव गोपाळ गोगटे यांनी १२ वर्षे सचिव व कार्यकारी विश्वस्त म्हणून काम पाहिले.

चाळीसगावचे जोगळेकर वकील ४-५ वर्षे अध्यक्ष होते. नंतर नाशिकचे विद्या वाचस्पती विष्णुजी क्षीरसागर हे अध्यक्ष होते. त्या वेळी संस्थेस उत्पन्नाचे साधन काही नव्हते व कार्यकर्तेही नव्हते म्हणून काम रोडावले. परंतु गोगटे, म. वि. कुलकर्णी या लोकांनी ही खिंड लढविली. त्यांनी संग्रहाचे संरक्षण व जतन हे नीटपणे केले. त्यावेळी शासकीय वार्षिक अनुदान फक्त रु. १४० मिळत होते.

ब) १९७८ ते १९८४ बाहेरगावचे कार्यकर्ते अधिक संख्येत असल्याने मंदिराची पूर्ण व्यवस्था लागत नाही हे पाहून त्यावेळी स्थानिक कार्यकर्ते सभासद म्हणून अधिक संख्येने करून घेण्यात आले. गावातील रावसाहेब ओगले, डॉ. चितळे. डॉ. महाजनी, प्राचार्य ग. ब. जोशी, प्रा. खेर, प्रा. श्याम जोशी इ. मंडळी सभासद झाली. लोकसंग्रह नसल्याने मंदिराचे कामकाज मागे पडले. या दृष्टीने विचार झाला. याकरिता प्रथम १९७८ साली सभेतर्फे सार्वजनिक वाचनालय सुरू करण्यात आले. मंदिराची माहिती व्हावी म्हणून प्रचार दौरे काढावयाचे ठरले. पुढे १९८५ ला मंदिराचा सुवर्णमहोत्सव असल्याने प्रचार या विषयावर भर देण्यात आला. लोकांचा स्थानिक सहभाग व्हावा म्हणून भजनी मंडळ सुरू करावे व त्याकरिता मूर्तीची स्थापना करावयाची असे ठरले.

१) इंदूरच्या दादा जोशींनी अशी मूर्ती १९८५-८७ सुवर्णमहोत्सव काळात राजस्थानमधून करून आणली व त्या मूर्तीबरोबर रथयत्रा काढण्यात आली. ती रथयात्रा महाराष्ट्रातील बहुतेक प्रमुख मठ, समर्थांची स्थाने व ११ मारुती म्हणजे धुळे ते जांब जन्मस्थान. नंतर मराठवाडा, नगर, सातारा, कोल्हापूर, पुणे, नाशिक, धुळे अशी झाली. रथयात्रा दिनांक १२ मार्च १९८६ ते ३ एप्रिल १९८६ अशी २१ दिवस झाली. यात ११ जिल्हे, ४४ तालुके, ७० गावे जोडली गेली. सज्जनगडची एकगाडी, मारुतीबुवा व शेंबेकर यांच्या नेतृत्वाखाली काही कार्यकर्त्यांसह होती. दुसरी गाडी विश्व हिंदू परिषदेचे मंडळी, मंत्री जोशी यांच्या कार्यकर्त्यांबरोबर होती. तिसरी गाडी धुळ्याची मूर्ती, पादुका यांसह होती. धुळ्याचे डॉ. खटावकर, कुबेर, दिनेश कुलकर्णी, विवेक कुलकर्णी, व्यवहारे (जळगाव), मा. श्याम जोशी अशी मंडळी होती. प्रत्येक गावी हजारो लोकांनी सहभाग दिला. अविस्मरणीय असा हा कार्यक्रम झाला. जवळजवळ अर्ध्या महाराष्ट्रातून हा दौरा झाला.

२) सुवर्णमहोत्सवी वर्षास १-६-८५ रोजी मुसलमानी अष्टक व दासबोधाची मुखपत्रे या पुस्तकांच्या प्रकाशनाने सुरुवात केली. धारचे गणेशभक्त दादा जोशी हे प्रमुख अतिथी व नगराध्यक्ष वसंतराव पिंगळे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

३) समर्थ संप्रदायातील मठपती, संस्था कार्यकर्ते, विद्वान अभ्यासू यांचे एक शिबीर १६, १७ नोव्हेंबर १९८५ मध्ये धुळ्यास जो. रा. सिटी हायस्कूलमध्ये आयोजित केले होते. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील ५०० स्त्री-पुरुष स्वखर्चाने उपस्थित होते. 'समर्थ संप्रदाय' कार्य, विस्तार, संघटन हा प्रमुख विषय होता. दि. १७ ला मोठी प्रभातफेरी निघाली. गावकरीचे संपादक कै. दादासाहेब पोतनीस समारोप समारंभाचे अध्यक्ष होते.

४) तरुणांचा सहभाग वाढावा, समर्थ वाङ्मयाचा अभ्यास व्हावा म्हणून महाराष्ट्र राज्यस्तरावर महाविद्यालयातील तरुणांकरिता एक निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा जानेवारी १९८६ साली आयोजित केली. पुणे, मुंबई, मराठवाडा, विदर्भ, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर सर्व भागांतून चांगला प्रतिसाद मिळाला. सुमारे १७ विद्यार्थ्यांना बक्षीस वितरणाचा कार्यक्रम झाला.

५) त्या वेळच्या दासनवमीच्या कार्यक्रमात सुवर्णमहोत्सवानिमित्त हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग होता. चार एप्रिल १९८६ करवीर पीठाच्या शंकराचार्यांच्या अध्यक्षतेखाली रामदासी संप्रदायाचे दैवत समर्थमूर्ती व पादुका प्रतिष्ठापनेचा सोहळा संपन्न झाला. त्या अनुषंगाने प्रवचन, कीर्तन, समूहगीत गायन, प्रभात फेरी, रंगीत पारदर्शिकेच्या आधारे समर्थ जीवनदर्शन असे विविध कार्यक्रम संपन्न झाले.

६) त्याच वेळी कार्याचा अधिक प्रसार व्हावा म्हणून प्रासंगिक स्वरूपात जळगावी उपकेंद्र सुरू केले. उद्घाटन आचार्य अविनाश व श्री. प्रभाकर पाटील यांचे हस्ते झाले. यात संगीत साधना हा कार्यक्रम उत्कृष्टपणे झाला. श्री. दत्ता डावजेकर हे उपस्थित होते. १९८५ ते २०११ या काळात स्थायी स्वरूपात नीतिशिक्षण हा प्रकल्प राबविण्यात आला. १९८७ ला याची सुरुवात झाली. व्यक्तिगत व सामूहिक पातळीवर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. इ. ३ री ते इ. ९ वी पर्यंतचा अभ्यासक्रम तयार करून मुलांकरिता राबविला. जवळजवळ ४०-५० शाळांचा सहभाग होता. अजूनही तोच सुरू आहे. अभ्यासक्रम हा श्री. वि. वि. पाणदारे यांनी तयार केला. त्याचा प्रसार धुळे, नंदुरबार, अमरावती, सातारा, सांगली, नाशिक इ. ठिकाणी झाला. त्यात क. द. देशमुख, प्रा. श्याम जोशी, श्री. शरद कुबेर यांचा वाटा मोठा होता. त्यामुळे वय वर्षे ८ ते २० या दरम्यानच्या विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांसाठी १९८७ पासून श्री. कै. प्रभुदेसाई व्याख्यानमाला व कै. गोगटे व्याख्यानमाला सुरू झाल्या. शिवाय दर एकादशी दिवशी महिला भजनी मंडळे येणे सुरू झाली. त्यामुळे मंदिरात लोकांची वर्दळ वाढली.

१९९३ साली सत्कार्योत्तेजक सभेचा शताब्दी महोत्सव होता. त्या वेळी समर्थ वाङ्मयाच्या अभ्यासास गती मिळावी, अधिक जणांचा सहभाग वाढावा म्हणून सभेमार्फत भारतीय विद्यार्थी संशोधन केंद्र सुरू करण्यात आले. समर्थ साहित्यावर आधारित छोटे-मोठे प्रकल्प केंद्र व मंदिर यांचेमार्फत घेण्यात आले. मंदिर सैद्धान्तिक व केंद्र उपयोजनात्मक भाग पाहायचे. उदा. दासबोधावर आधारित व्यवस्थापन, पर्यावरण, वैज्ञानिक वृत्ती, स्त्री सहभाग, विकास, दरवर्षी किमान १ चर्चासत्र योजले.

सर्वांत मोठा प्रकल्प २००० साली घेण्यात आला. पंचकोषात्मक व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प धुळे, वनवासी कन्या छात्रालय (वनवासी कल्याण आश्रमाचे) धुळे, हे छात्रावास प्रयोगासाठी दत्तक घेतले होते. या प्रयोगात ३० कार्यकर्ते (१० डॉक्टर, १० शिक्षक, ४ योगतज्ज्ञ, ६ व्यवस्थापकीय कर्मचारी) सहभागी झाले होते. हा प्रयोग यशस्वी होऊन त्यावर एक ग्रंथही तयार झाला. तो ग्रंथ विविध शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांत संदर्भ ग्रंथ म्हणून उपलब्ध आहे. प्रकल्पाची पूर्ण शैक्षणिक जबाबदारी प्राचार्य डॉ. श्यामराव जोशी यांनी, तर आर्थिक जबाबदारी कै. श्री. शरदराव भदादे व श्री. अजयजी लड्ढा यांनी सांभाळली. या प्रयोगात सहभागी झालेल्या सर्व मुलींचे शारीरिक (आरोग्य), बौद्धिक, भावनिक प्रगती झाली होती हे प्रमाणित चाचण्यांनी निश्चित केले होते.

दुसरा अभिमान वाटेल असा कार्यक्रम इ.स. २००० साली घेतला होता. समर्थ साहित्यावर आधारित मानसशास्त्राच्या अंगाने एक अखिल भारतीय मानसशास्त्र परिषद (३१ जाने., १ व २ फेब्रु. २००२) धुळे येथील टेक्निकल हायस्कूलध्ये श्री समर्थ वाग्देवता मंदिर प्रामुख्याने व सहकारी संस्था म्हणून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव ज्ञानप्रबोधिनी पुणे व धुळे शिक्षणशास्त्र संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली होती. प्राध्यापक, प्राचार्य, विभागप्रमुख, कुलगुरू व मानसशास्त्राचे विद्यार्थी व रुची असलेले नागरिक यांचा सहभाग होता. त्यांची संख्या १८० होती व निबंध १२० चे वाचन झाले.

भारतीय मानसशास्त्र या विषयास भारतात गती मिळाली. सर्व प्रांतांतून याला उपस्थिती होती. यातून संस्थेच्या भारतीय विद्या संशोधन केंद्रात भारतीय दृष्टिकोनातून मानसशास्त्रीय समुपदेशन व व्यवस्थापन अभ्यासक्रम सुरू झाला. दिलासा मार्गदर्शन केंद्र सुरू झाले. समर्थ वाग्देवता मंदिराने शैक्षणिक जगतात नव्या दृष्टीने पदार्पण केले.

**म** - कार्यदिशा – या सर्वांचा परिणाम संस्थेच्या वाढीवर चांगला झाला. भारतात व आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव गेले. वेगळ्या विद्यापीठात निबंध वाचण्याकरिता आपले कार्यकर्ते गेले होते. पीएच.डी. चे अधिक विद्यार्थी आले. कार्याचे वर्गीकरण करावयाचे म्हटले, तर १) स्वास्थ्यदर्शन, २) कार्यदर्शन, ३) संग्रहदर्शन, ४) समाज मार्गदर्शन, ५) समाज सहभाग असे म्हणता येईल. हे पैलू डोळ्यांसमोर ठेवून समर्थ वाग्देवता मंदिराचा २००९-११ असा अमृत महोत्सव घेण्यात आला. विषय निवडला होता 'संघटित भारत समर्थ भारत'. या अनुरोधाने भारतातील नामांकित लोकांचा सहभाग असलेले असे २० कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाचे उद्देश अधिक जणांशी संपर्क, कार्याची व्याप्ती वाढविणे असे होते. म्हणून योगशास्त्र, मेंदूशास्त्र क्रियायोग, योग स्वास्थ्य वनवासी मेळावा, स्त्री चर्चासत्र, गीतगायन, नाम चिंतन सांस्कृतिक कार्यक्रम, दासबोध पारायण (६ दिवस) आत्मभावी व्यवस्थापन शिबीर (सज्जनगडावर १७-१८ जुलै) असे कार्यक्रमाचे स्वरूप होते.

दि. १ एप्रिल २०११ ला समर्थ वाग्देवता मंदिराचा अमृतमहोत्सव व डॉ. चितळे यांचा अमृतमहोत्सव एकत्रितपणे मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात आला. अध्यक्ष म्हणून स्वामी गोविंद देवगिरीजी व प्रमुख वक्ते म्हणून रा. स्व संघाचे सरकार्यवाह भय्याजी जोशी होते.

अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने सध्या १) संशोधन कार्य, २) बाड संरक्षण कार्य (Digilization) व

३) वाल्मिकी रामायण प्रकल्प हे तीन मोठे प्रकल्प सुरू केले. संशोधनकार्यात मोडी लिपीत मठांचे व कण्हेरी मठाच्या कागदपत्रांचा अभ्यास व सूची खंड तयार करणे यात ६७.५ हजार रु.चे शासकीय अनुदान मिळाले. हे काम माजी कार्याध्यक्ष श्री. नगर देवळेकर यांनी चांगले मार्गी लावले. बाडसंरक्षण, अत्याधुनिक पद्धतीने संगणकीकरण काम सुरू आहे. त्याची जबाबदारी श्री. उदय जोशी सांभाळतात. त्यांना तांत्रिक तज्ज्ञ मार्गदर्शक म्हटले आहे. रामायण प्रकल्पाची जबाबदारी श्री. शरद कुबेर पाहातात.

**र्थ** - अखंड भारतातून १६ व्या, १७ व्या शतकातील हे वाङ्मय गोळा झाले असल्याने यास ऐतिहासिक मूल्य आहे. त्याचप्रमाणे सांस्कृतिक व आध्यात्मिक मूल्य पण आहे. म्हणजे हा ठेवा संपूर्ण भारताच्या ऐतिहासिक सांस्कृतिक व आध्यात्मिक मूल्यांचा परिपोष करणारा एक 'सांस्कृतिक मानदंड'च आहे. केवळ

सांस्कृतिकच नव्हे, तर कै. नानासाहेबांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे समर्थ अशी राष्ट्रीय व्यक्ती होऊन गेली की समर्थांचे स्मरण हे राष्ट्राचे जीवन व समर्थांचे विस्मरण हे राष्ट्राचे मरण याही अर्थाने या ज्ञानपीठाचे संरक्षण, संवर्धन व संशोधन होणे गरजेचे आहे.

ही संस्था धार्मिक नाही. सांप्रदायिक नाही, तर शुद्ध ज्ञानगंगा आहे. कोणीही यावे कोणत्याही समाजाच्या, धर्माच्या व्यक्तीने यावे व आपल्या क्षमतेप्रमाणे ज्ञानकणांचे ग्रहण करावे. आध्यात्मिक भगिरथीच्या - ज्ञान, कर्म व भक्ती या प्रवाहाचे ही संस्था 'प्रयाग' आहे. त्याचप्रमाणे जहाल, मवाळ, क्रांतिकारक या स्वतंत्र चळवळीच्या स्वातंत्र्यगंगेचेही प्रयाग आहे. म्हणजेच आध्यात्मिक व राष्ट्रीय असे देदीप्यमान केंद्र आहे.

समर्थ रामदासांनी प्रेयस व श्रेयस या दोन्ही धर्मांच्या बाजूंचे चिंतन केले व त्यांचे अनुकरण समाजाने करावे, अशी मार्गदर्शक सूत्रे आपल्या साहित्यात गोवली. त्यामुळे हे वाङ्मय आजच्या काळातील ऐहिक जीवनास उपयुक्त होऊ शकते व त्या दृष्टीने संशोधन होणे गरजेचे आहे. समर्थ वाग्देवता मंदिराने भविष्याचा वेध घेताना 'संशोधन' याचा विचार याही संदर्भात केला. आत्मभावी व्यवस्थापन व भारतीय संदर्भात मानसशास्त्रीय समुपदेशन या दोन नवीन विषयांचा, तंत्रांचा समाज मनास स्वास्थ्य मिळेल व प्रगती होऊ शकेल असे संशोधन सुरू केले. या संशोधनात सर्वांचा सहभाग वाढावा म्हणून ''ब्रह्मर्षी दत्तमहाराज कवीश्वर शिष्यवृत्ती' देणार आहोत. याकरिता कायम निधी जमवून त्याच्या व्याजातून शिष्यवृत्ती दिली जाईल. भविष्यकाळातील हे एक महत्त्वाचे आवश्यक पाऊल उचलले आहे. दुसरे महत्त्वाचे पाऊल म्हणजे साहित्य ५०० वर्षांपूर्वीपासूनचे असल्याने कागदाचे आयुष्य कमी होत चालले. तो अतिजीर्ण होत चालला. तो कायम स्वरूपात टिकावा म्हणून अत्याधुनिक तंत्राने त्याचे जपणे, संरक्षण आवश्यक आहे. त्याचे डिजिटल (संगणीकरण) करणे हे होय. ते पण काम सुरू केले आहे व तिसरे संस्थेचे अधिष्ठान असलेले वाल्मिकी रामायण प्रकल्प हा आंतरराष्ट्रीय स्तरावरचा प्रकल्प हाती घेतला आहे.

या आणि अशा प्रकारच्या अनेक उपक्रमांना धनसंचयाची गरज आहे. मंदिराच्या ग्रंथालयास या वर्षापासून वार्षिक १५००० अनुदान मिळू लागले आहे. त्याचाही ई-ग्रंथालय स्वरूपात विकास होणे आवश्यक आहे. आपण सर्व उदार व्यक्तींनी संस्थेच्या सर्व उपक्रमांना सढळ हाताने मदत करावी. कायम निधी निर्माण करण्यात सहभागी व्हावे. कायम निधी १०००० पेक्षा अधिक रक्कम देणाऱ्याचे नाव नामफलकावर येईल. संस्थेस '८० जी' कलमान्वये मिळणारी देणगी आयकर सवलतीस पात्र आहे. श्री समर्थ वाग्देवता मंदिराच्या बँक ऑफ बडोदा, रामवाडी शाखा, धुळे येथे खाते क्रमांक १८७४०१०००१०३५५ वर ऑनलाईन पैसे भरता येतील.

कायम निधी खालील कारणास्तव जमा होणार आहे.

१) ब्रह्मर्षी दत्तमहाराज कवीश्वर बाडसंशोधन शिष्यवृत्ती - ५०,००,०००

२) संस्थेतील बाडांचे अत्याधुनिक तंत्राने संरक्षण, जपणूक - ५०,००,०००

३) वाल्मिकी रामायण संशोधन प्रकल्प - ५०,००,०००

४) वास्तुविकास प्रकल्प (प्रदर्शनी संग्रहालय) - २,५०,०००

५) अन्य नित्य कार्यक्रम विकास निधी - २,२५,०००

*सत्कार्योत्तेजक सभा, धुळे*

# एक समग्र दर्शन

***डॉ. विवेकानंद आत्माराम चितळे***

*अध्यक्ष, सत्कार्योत्तेजक सभा, धुळे*

उभ्या महाराष्ट्राने ज्या संस्थेच्या कार्याचा गौरव करावा अशा धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेने आपल्या अस्तित्वाची शताब्दी पार करून वाटचाल सुरू ठेवली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात समाजप्रबोधन विविध कामांद्वारे करून राष्ट्र उभारणीचे काम परिश्रमपूर्वक केलेल्या संस्थांमध्ये स. सभा अग्रभागी होती. भक्ती, शक्ती, संघटन व उद्बोधन या मार्गांचा अवलंब करून खानदेश सजग ठेवण्याचा या संस्थेने प्रयत्न केला. समाजाभिमुखता हा समर्थकार्याचा गाभा व तेच पाथेय घेऊन स. सभा आतापर्यंत विविध उपक्रमांद्वारे आपली वाटचाल करीत आहे. स्वधर्म, स्वभाषा, स्वदेश व स्वसंस्कृती यांचा परिपोष करण्याचे कार्य प्रथमपासूनच स. सभेने डोळ्यांसमोर ठेवले. त्यासाठी प्रसंगी विविध संस्था निर्माण केल्या.

समाजाची अस्मिता जागृत करण्यासाठी प्रारंभी सार्वजनिक गणेशोत्सव, शिवराज्याभिषेक दिन, दसरा संमेलन, स्वदेशी पुरस्कार ही संस्कारमूल्ये असलेली व्रते संस्थेने हाती घेतली. प्रत्यक्ष संस्कार व तदनुसार कृती हे एक संस्थेचे अंग आहे, तर वाङ्मय संशोधन व ग्रंथ प्रकाशन यांद्वारे विचार जागरण व प्रसार करणे हे दुसरे अंग आहे. समाज प्रबोधनाचे कार्य व्याख्यानमालांतून, संस्कार करण्याचे काम विविध विद्यार्थी- स्पर्धांतून, भारतीय परंपरा, समर्थ विचार प्रसारण व विजीगिषु राष्ट्रीय वृत्ती चेतविणारे वाङ्मय प्रकाशन, भक्तीचे अधिष्ठान निर्माण करण्यासाठी दासनवमी उत्सव याद्वारे संस्थेची वाटचाल अविरतपणे सुरू आहे.

श्री समर्थ रामदास स्वामींच्या वाङ्मयावर व जीवितावर स्वच्छ प्रकाश पाडण्याचे सारे श्रेय स. सभेलाच आहे. समर्थ वाङ्मय म्हणजे आपला वेद आहे, देव आहे. सशक्त व्हा, प्रयत्नवादी बना, आळस टाकून देऊन संघटित व्हा आणि संघशक्तीच्या साहाय्याने स्वराज्य स्थापना करून स्वधर्म आणि स्वसंस्कृती यांचे संरक्षण करा हा समर्थांचा तेजस्वी संदेश महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत पोहोचविण्याचे काम संस्थेने केले आहे. आतापर्यंत स. सभेने सुमारे १३२२३ पृष्ठांच्या १७३ ग्रंथांचे प्रकाशन केले. जांबेचे श्री समर्थ मंदिर, धुळ्याचे श्री समर्थ वाग्देवता मंदिर, शके ११४० ते १७४० या सहाशे वर्षांच्या काळात महाराष्ट्रातील धार्मिक विचारांचा प्रवाह कसा वाहत होता हे कळण्याची विपुल साधने ज्या संग्रहात आहेत असा वाग्देवता मंदिरातील हस्तलिखितांचा संग्रह व रामदास आणि रामदासी मासिकाद्वारे रामदासी वाङ्मयाचा प्रचार व प्रसार ही संस्थेची दृश्यकार्ये आहेत. स. सभेने विविध मार्गांनी एकच एक गोष्ट महाराष्ट्राच्या मनावर ठसविण्याचा सारखा प्रयत्न चालविला आहे. देशकार्य करावयाचे, समाजात देशसेवेची स्फूर्ती उत्पन्न करावयाची,

ज्ञानज्योत प्रदीप्त करावयाची अशी तरुणांना कार्य प्रवृत्त करणारी ध्येयसरणी राहावी म्हणून स. सभेचा जन्म झाला आहे.

***भाषा प्राकृत उन्नतीस चढवा काया करा अर्पण ।***
***आर्यावर्त हितास द्या, सतत सत् कार्यास उत्तेजन ।।***

हाच सभेच्या स्थापनेचा उद्देश होता. रामदास आणि रामदासी ग्रंथमाला, इतिहास आणि ऐतिहासिक ग्रंथमाला, महाराष्ट्र धर्म ग्रंथमाला यांचा आणि प्रकाशनांच्या पसाऱ्याचा खटाटोप स. सभेने आजपर्यंत केला तो कशासाठी? महाराष्ट्राला आपल्या पूर्व दिव्याचे विस्मरण होऊ नये व भावी काल रम्य घडविण्यासाठी अखंड प्रयत्न करावेत हे सर्वांच्या मनावर बिंबविण्यासाठीच.

आपण मोठे कसे होऊ? हाच विचार मनात घोळत असणारे या संस्थेचे संस्थापक कै. शंकर श्रीकृष्ण तथा नानासाहेब देव हे होते. आपण कोण होतो, कोण आहोत आणि कोण होऊ याचाच विचार करणाऱ्या सभेचे लक्ष रामदासी वाङ्मयाकडे वळले. इ.स. १९०३ मध्ये. 'रामदास आणि रामदासी' ग्रंथमालेचा पहिला भाग 'श्रीमत दासबोध' सभेने प्रकाशित केला. ज्याच्या अभ्यासाने स्वराज्य मिळविण्याची आणि स्वराज्य राखण्याची दिशा दिसू लागेल असा विचार त्या पाठीमागे होता. स्वधर्म आणि स्वसंस्कृती रक्षिण्याचे सामर्थ्य ज्या योगे येईल अशा साहित्याचा आणि कार्याचा पाठपुरावा सभेने सतत केला. आळसाचा तिरस्कार आणि प्रयत्नांचा पुरस्कार समर्थ वाङ्मयाने सतत केला आहे. सशक्त व्हा, प्रयत्नवादी बना, आळस टाकून देऊन संघटित व्हा आणि संघशक्तीच्या साह्याने स्वराज्य परं वैभवाकडे न्या हा समर्थांचा तेजस्वी संदेश भारताला देण्याचे काम आजपर्यंत विविध उपक्रमांतून स. सभेने केले आहे. सभेचा ध्रुवतारा किंवा सर्वांची अंतर्यामीची इच्छा एकच 'रामराज्य करणे सर्वत्र हो'.

धुळ्यात इ.स. १९ मे १८९३ शुक्रवार दुपारी ४ ज्येष्ठ शु ४ शके १८१५ या दिवशी स. सभेची स्थापना झाली. एके रात्री धुळ्यातील ४ नागरिक करंदीकरांच्या माडीवर एकत्र जमले व पुण्याच्या सद्वर्तन प्रवर्तक मंडळींच्या धर्तीवर एक मंडळ स्थापण्याचे त्यांनी ठरविले व त्यास सत्कार्योत्तेजक मंडळी असे नाव ठरले. हे चार धुळेकर म्हणजे कै. नानासाहेब देव, कवि विनायक जनार्दन करंदीकर, श्री. माधवराव घाणेकर व श्री. काशिनाथ पांडुरंग तथा काका पिंपळखरे. दुसऱ्या दिवशी सकाळी विनायक कवींनी एक श्लोकाष्टक तयार करून आणून दिले (ते या लेखाशेजारी दिले आहे) त्यानंतर न्यू इंग्लिश स्कूल, खोलगल्ली या शाळेचे हेडमास्तर श्री. गणेश जनार्दन आगाशे यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची सभा भरली. त्यामध्ये सत्कार्योत्तेजक मंडळीची स्थापना जाहीरपणे झाली. नंतर 'मंडळी'च्या ठिकाणी 'सभा' हे नाव घालण्यात आले. नागरिकांच्या सभेत एक धुळेकर नागरिक श्री. कृष्णराव पुंडलिक यांनी संस्थेच्या नावाला 'ते नाव मोठे आहे' म्हणून आक्षेप नोंदविला. त्यावेळी श्री. नानासाहेब देवांनी त्यास लगेच उत्तर दिले की, 'मी जिवंत आहे तोवर हे नाव बुडू देणार नाही.' याच सभेत कवी विनायक यांनी तयार केलेल्या श्लोकाष्टकाच्या प्रती उपस्थितांत वाटण्यात आल्या.

तत्कालीन धुळ्याच्या परिस्थितीत शाळेत मिळणाऱ्या ज्ञानापलीकडे विद्यार्थ्यांची ज्ञानकक्षा जात नसे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांत भारतभूमीचा अभिमान, तिची सेवा, तिच्यातील विभूतींची पूजा याचे ज्ञान पसरविणारे पुण्याच्या कॉलेजात शिकून धुळ्यात आलेले काही मोजके तरुण होते व त्यांचे मुकुटमणी श्री. शंकर श्रीकृष्ण देव हे होते. हे प्रबोधनाचे/व्याख्यानाचे सत्र दगडी शाळेच्या आवारात व पांझरा नदीच्या काठावरील वाळवंटांत चाले. या तरुण मंडळींच्या ध्येयसरणीत सातत्य टिकविण्यासाठी एखादी संस्था निर्माण केली पाहिजे असे वाटू लागले व या गरजेपोटी सत्कार्योत्तेजक सभेचा जन्म झाला. या

संस्थेचा आत्मा प्रथमपासून श्री. शंकरराव देवच राहिले. ते शीर्षभूत होते. देशातील तरुणवर्गास वाट दाखविण्यास व त्यांचे ध्येय जागृत ठेवण्यास अशा संस्थेची आवश्यकताही होती. स. सभेच्या स्थापनेस ज्या मित्रांनी कै. नानासाहेब देव यांना दुजोरा दिला, त्यांनी पुढेही आयुष्यभर कै. देव यांच्या राष्ट्रसेवेच्या सर्व कामांत त्यांना मदत केली. स. सभेच्या स्थापनेत ओजस्विता होती व त्यामुळे अनेकांना आयुष्यभर उत्तेजन मिळाले, प्रकाश मिळाला.

सत्कार्योत्तेजक सभा धुळ्यास स्थापन करण्यात प्रमुख कै. नानासाहेब देव असले तरी त्यांना साहाय्यभूत होणारे श्री. चांदोरकर आणि श्री. भट यांचा झालेला मिलाफ त्रिमूर्तीच्या स्वरूपाचा- प्रयागच्या त्रिवेणी संगमासारखा झाला असे म्हणण्यास हरकत नाही. श्री. देव व श्री. भट ही दोन माणसे खरोखर व्यक्ती नसून संस्थाच होत. श्री समर्थ वाग्देवता मंदिर व राजवाडे संशोधन मंदिर ही त्यांच्या तपश्चर्येची फळे होत. स. सभेच्या प्रयत्नांना कै. राजवाडे यांचेही साहाय्य होत गेले. या सर्वांनी सभेची अमोल सेवा केली. त्यांनी स. सभा नुसती टिकवलीच असे नव्हे, तर जनता जनार्दनाच्या डोळ्यांत भरेल अशी सभेची कार्यनिर्मिती केली. सन १८९३ ते १९०५ अशी १२ वर्षे स. सभेची तपश्चर्येत गेली. ही सभेची बाल्यावस्था होती. या तपश्चर्येची फलश्रुती म्हणजे 'समर्थांचा दासबोध' सन १९०५ मध्ये विजयादशमीस स. सभेतर्फे प्रकाशित झाला. नंतर जांबेत श्री समर्थ मंदिर झाले (सन १९३२). श्री. समर्थ वाग्देवता मंदिर आकाराला आले (सन १९३५) समर्थ संघाची स्थापना झाली (सन १९४०) मुक्तद्वार वाचनालय सुरू झाले (१९८५) व भारतीय विद्या संशोधन केंद्र उभे राहिले (सन १९९३). इ.स. २००९ ते २०११ या काळात श्री समर्थ वाग्देवता मंदिराचा साजरा झालेला अमृतमहोत्सव म्हणजे कै. नानासाहेब देव व त्यांचे सहकारी व संस्थेचे कार्यकर्ते यांनी केलेल्या अविरत कार्याचाच अमृतमहोत्सव आहे.

संस्था स्थापनेच्या वेळी स. सभेचे जे सभासद होते, त्यातील बहुतेक धुळे येथील हायस्कूलमधील अभ्यासक्रम संपवून बाहेर पडलेले होते. पांझरा नदीच्या वाळवंटात बसून एकत्र विचारविनिमय करणाऱ्या मंडळींची एक संस्था काढावी अशी कल्पना कै. नानासाहेब देवांच्या मनात आली व सत्कार्योत्तेजक सभा जन्मास आली. सभेचे सभासद होण्यास कोणताही दर्जा लागत नव्हता, वार्षिक वर्गणी ४ आणे होती. आठवड्यातून २ दिवस कोणीतरी इंग्रजीत अगर मराठीत एखाद्या विषयाचा मुद्दाम अभ्यास करून त्यावर व्याख्यान द्यावे असे ठरले. जागा खासगी इंग्रजी हायस्कूलचे आवार. काही दिवसांतच भाषणाचा कार्यक्रम सुरळीत सुरू झाला. लवकरच शिवाजी व गणपती उत्सव सभेतर्फे धुळ्यात सुरू झाले. रायगड स्मारकासाठी घरोघर फिरून वर्गणी गोळा झाली. दसऱ्याचा सण साजरा करण्याचा नवीन पायंडा पाडला. नाना फडणीसांचा शतसांवत्सरिक उत्सव साजरा केला गेला. त्या काळात बाल्यावस्थेत सभा एवढे करू शकली यातच सभेचे कौतुक वाटते. स. सभेने वैदिक स्कूल काढले, दुष्काळाचा कायदा जिल्ह्यातील लोकांस समजावून देण्याचे काम सभेच्या मंडळींनी केले.

या बाल्यावस्थेच्या काळात सभेची ३ प्रकाशने झाली.

१) १८९९ मध्ये छत्रपती श्री शिवाजी महाराज व शिवजन्मोत्सव

२) १९०० मध्ये 'आपण कोण' कै. शिवरामपंत परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली लोकमान्यांच्या उपस्थितीत पुण्यात सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यात कै. नानासाहेब देवांनी दिलेले व्याख्यान.

३) १९०३ मध्ये 'जपानची मर्दुमकी'

प्रारंभीच्या काळात स. सभेचे लक्ष प्रकर्षाने रामदासी वाङ्मयाकडे गेले नव्हते, ते १९०३ सालानंतर गेले.

सुरुवातीच्या काळात एखादा ग्रंथ नेमून तो सर्वांनी वाचून त्यावर चर्चा करणे व स्वतंत्र व्याख्यानमाला गुंफणे एवढीच कामे स. सभेकडून त्या वेळी होत. अनेक निबंधांचा एक ग्रंथ तयार करून प्रकाशित करण्याची कल्पना तेव्हापासून दिसून येते. सध्याचा श्री समर्थ वाग्देवता मंदिर अमृतमहोत्सव स्मृतिग्रंथ त्याचाच आविष्कार आहे असे म्हणावे लागेल. मंदिरातील शेकडो ग्रंथांचे संपादन आणि प्रकाशन करण्याचे काम स. सभेस अजून पार पाडावयाचे आहे.

प्रारंभीच्या काळात स. सभेने केलेल्या हालचाली पुढीलप्रमाणे सांगता येतील.

शके १८१५ (सन १८९३) सत्कार्योत्तेजक सभेची स्थापना

शके १८२५ (सन १९०३) रामदासी वाङ्मयाकडे लक्ष गेले.

शके १८२७ (सन १९०५) दासबोध ग्रंथाचे प्रकाशन.

शके १८२७ (सन १९०५) रामदास आणि रामदासी ग्रंथमाला सुरू.

शके १८३७ (सन १९१५) रामदास आणि रामदासी मासिकाची जोड मिळाली.

शके १८३८ (सन १९१६) इतिहास आणि ऐतिहासिक मासिक सुरू.

इतिहास आणि ऐतिहासिक ग्रंथमालेचे ८ भाग बाहेर पडले. शके १८२७ (सन १९०५) आत्माराम छापखाना काढला व स. सभेचे सर्व साहित्य त्यात छापले जाऊ लागले.

यावरून प्राकृत भाषा उन्नतीस चढविण्यासाठी, सांप्रदायिक वाङ्मयाचा प्रसार व्हावा म्हणून आपल्या उज्ज्वल इतिहासाचे सम्यक ज्ञान व्हावे म्हणून आरंभापासून स. सभेने मोठा व्याप उभा केला. या व्यापामुळेच जांबेस श्री समर्थ मंदिर बांधले गेले. श्री समर्थ वाग्देवता मंदिर धुळे ही संस्था उभी राहिली. अखिल भारतीय स्वरूपाचा श्री समर्थ संघ जन्मास आला आणि रामदास आणि रामदासी मासिक सुरू झाले. कै. देवांनंतर संस्थेने सरकारमान्य मुक्तद्वार वाचनालय सुरू केले व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ मान्यताप्राप्त भारतीय विद्या संशोधन केंद्राचा पाया घातला (सन १९९३) ही सर्व कार्ये स्वतंत्र आहेत. प्रत्येक कार्याचे चालक वेगळे, जमाखर्च वेगळे, घटना वेगळ्या, परंतु सर्व कार्याचे श्री समर्थ भक्तिप्रेम हे मूळ सूत्र कायम ठेवले आहे. संस्थेचा कार्यविस्तार असा आहे -

सत्कार्योत्तेजक सभा इ.स. २०११

- समर्थ मंदिर जांब
- समर्थ वाग्देवता मंदिर
  - मुक्तद्वार वाचनालय (शासन मान्य)
  - भारतीय विद्या संशोधन केंद्र (उ. म. विद्यापीठ मान्य)
- रामदास आणि रामदासी
- समर्थ संघ

### रामदास आणि रामदासी मासिक (सन १९१५)

या मासिकाचा पहिला अंक शके १८३७ (इ.स. १९१५) ज्येष्ठ शु. १३ ला निघाला. सांप्रदायिक ग्रंथांचे प्रकाशन व सांप्रदायिक विचारांचे प्रदर्शन करण्याचा उद्देश व रामदास आणि रामदासी ग्रंथमालेला पूरक ठरणे असा हेतू ठेवून हे मासिक निघाले. त्याने समर्थ वाङ्मय व विचार प्रकाशन व प्रचार याचे प्रचंड काम गेल्या शंभर वर्षांत केले. प्रारंभी असे ठरविण्यात आले की, मासिकाची पृष्ठे ४० असावी. (संप्रदायाचे ग्रंथ व कागदपत्रे यासाठी २४ पृष्ठे + सांप्रदायिक विविध विषय १६ पृष्ठे) प्रत्येक महिन्याच्या शुद्ध १३ ला मासिक प्रकाशित व्हावे व त्याची वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह

रु. २ असावी असे ठरले. कै. देवांनंतर 'रामदास आणि रामदासी' काही काळ प्रतिमास प्रकाशित होऊ शकले नाही. नंतर त्याचा वार्षिक अंक जळगावी संस्थेच्या उपकेंद्रातून निघू लागला. तोही कालांतराने बंद पडला. आता गेली १५ वर्षे धुळ्याहून त्रैमासिक म्हणून रामदास आणि रामदासीचे वर्षात ४ अंक प्रकाशित होतात. वार्षिक वर्गणी रु. ५० आहे. सभासद संख्या ४०० आहे. समर्थ विचार, समर्थ वाङ्मय, अन्य संत साहित्य व संस्थावृत्त या त्रैमासिकातून सध्या दिले जाते.

प्रारंभीच्या काळात रामदास आणि रामदासी ग्रंथमालेस मासिकाची जोड करावी व काही ग्रंथ मासिकांत प्रसिद्ध करावेत म्हणजे माला गुंफण्याचे काम शीघ्रतर होईल असा विचार करून हे मासिक पुस्तक सुरू झाले. ग्रंथमालेच्या योगाने ग्राहकांची भेट घेण्याचा प्रसंग वर्षातून एकदा येत असे; पण मासिक पुस्तकामुळे दरमहा ग्राहकांच्या भेटीला जाण्याचा योग येऊ लागला व सध्या ते काम दर तीन महिन्यांनी साधले जाते. या मासिकामुळे समर्थकार्याला जास्त मदत व्हावी हा उद्देश मासिक सुरू करण्यात होता. मासिकाच्या द्वारे संशोधन वृत्त वेळच्या वेळी वाचकांस निवेदन करता येईल. मठातील प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथांची नवीन माहिती ताबडतोब सांगता येईल. श्री समर्थ स्थानांची माहिती देता येईल. सांप्रदायिक आचार-विचाराबद्दल चर्चा करता येईल व संप्रदायाची सेवा सहकारितेने करण्यास एक उत्कृष्ट साधन होईल हे सारे हेतू बाळगून मासिक सुरू करण्यात आले व संस्थेचे मुखपत्र म्हणून आजतागायत सुरू ठेवलेले आहे.

वाङ्मयाच्या आणि इतिहासाच्या क्षेत्रापलीकडे या मासिकाद्वारे २ गोष्टी प्रामुख्याने देवांच्या काळात झाल्या. कै. देवांच्या संग्रहातील बाडांची क्रमवार जंत्री (वर्णनात्मक यादी) या मासिकांत 'श्री रामदासी संशोधन' या नावाने देण्यात येत असे. जीर्णोद्धारविषयक वृत्त व जमलेल्या निधीचा हिशेब मासिकात नियमितपणे आल्यामुळे जांबेस श्री समर्थ मंदिर उभारणीच्या कामात मोठीच मदत झाली व आर्थिक व्यवहारात पारदर्शकता आली.

प्रथम कै. नानासाहेब देवांनी समर्थांच्या उपदेशाचे रहस्य स्वत: समजावून घेतले व मासिकाद्वारे समर्थांचा उपदेश सर्व महाराष्ट्राला पोहोचविण्याचे कार्य केले. ही कै. देवांची मूर्तिमंत तपश्चर्याच आहे. कै. देवांनी केलेल्या व्यापाची माहिती मासिकातून जनतेस देऊन जनतेची सहानुभूती मिळविण्याचे कार्य मासिकाद्वारे झाले. कै. देवांच्या काळात मासिकाच्या मुखपृष्ठाचा रंग भगव्या रंगासारखा असे. आतील बरेचसे लिखाण कै. देवांचे असे. त्यांची भाषाशैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या अंत:करणातील जिव्हाळा तीव्र असल्यामुळे भाषा परिणामकारक होई. हे मासिक म्हणजे सामान्यत: साहित्यसेवा आहे. विशेषत: ही श्री समर्थ सेवा आहे. स्थूलमानाने आत्मोन्नतीचा मार्ग दाखविणारे हे साधन आहे.

लोकाश्रयाशिवाय व लोक सहभागाशिवाय सामाजिक चळवळ यशस्वी होऊ शकत नाही याचे संस्थेस भान आहे. त्याकरिता जनसंपर्क वाढविण्यासाठी संस्थेचे शासनमान्य मुक्तद्वार वाचनालय आहे व भारतीय विद्या संशोधनद्वारे चालणारे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ मान्यताप्राप्त मानसशास्त्र पदविका अभ्यासक्रम व नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ मान्यता प्राप्त मुख्याध्यापक अभ्यासक्रम सुरू आहेत. आपले उपक्रम चालविण्यासाठी संस्थेच्या आवारात ४ मोठी सभागृहे स. सभेने बांधली आहेत. मंदिरातील संग्रहाचा अभ्यास करण्यासाठी येणाऱ्या अभ्यासकांची व्यवस्था संस्थेच्या आवारातील अभ्यागताश्रमात होत असते. मंदिरात असलेल्या मोडी कागदपत्रांचे देवनागरीत लिप्यांतर करण्याचे काम सध्या सुरू आहे. पूर्वी प्रकाशित झालेले पण आता दुर्मिळ असलेले ग्रंथ पुन्हा प्रकाशनाचे काम अव्याहतपणे संस्थेतर्फे सुरू असते. संकेत कुबडी, वेण्णाबाईंचे सीतास्वयंवर,

दासबोध, मनाचे श्लोक यांचे झालेले प्रकाशन ही काही उदाहरणादाखल आहेत. काही संरक्षित ग्रंथ मागणीप्रमाणे झेरॉक्स करूनही दिले जातात. दासनवमी उत्सवानिमित्त वर्षभर विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा शाळांतून घेतल्या जातात व त्याचा भव्य बक्षीस समारंभ दासनवमीस होतो. दासनवमीस प्रभाती मनाचे श्लोक म्हणत निघणारी विद्यार्थी व नागरिक यांची प्रभातफेरी व रथसप्तमीस सामूहिक सूर्यनमस्काराचा कार्यक्रम हे सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरले आहेत.

कै. नानासाहेब देवांच्या नंतर संस्थेचा प्रकाशन विभाग निरंतर सुरू आहे. समर्थांच्या दासबोधाचे, मनाच्या श्लोकांचे, लघुकाव्याचे प्रकाशन संस्थेतर्फे सातत्याने सुरू असते.

देव, धर्म, संस्कृती यांचे आयुष्य शतकांनी मोजले जाते. अशी शतके मोजली जाण्यास शतकानुशतके कार्यरत असलेल्या सत्कार्योत्तेजक सभेसारख्या संस्थांचे दीर्घायुष्य साधनीभूत होत असते. समाजाची सेवा सर्व अंगांनी करणारी व समर्थ विचारांच्या आधारे राष्ट्रप्रेरणा निर्माण करणारी स. सभा ही संस्था गेली ११८ वर्षे सातत्याने काम करते आहे, आपण म्हणू या की, ही संस्था चिरायू होवो. या संस्थेचे कार्य निरंतर चालू राहावे असा संकल्प करू या.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

## !! जीवितमहिमा !!

''आहे जीवित भासमात्र'' - रड ही गाउं नका हो!
नका झोपा घेत असे मनुष्य, मृतवत् लेंखूं नये त्यास कां?
बाहेरून दिसे तशी नसते वस्तुस्थिती दुःखदा
''आहे जीवित तथ्यपुर्ण'' - हृदयीं ही गांठ बांधा सदा ॥१॥
''जाउनी पडलों चितें म्हणजे केले खऱ्या सार्थका,
आम्ही मेळविली'' - असें न समजा- ''आहेस तूं मृतिका
मातीला मिळशील'' - सद्वचन हें आत्म्यास लागू नसे.
भोगावे सुखदुःख केवळ, न हा संसारहेतु असे ॥२॥
आहे जी स्थिती आज तीहुनि उद्या काही करावी बरी.
विद्या विस्तृत, वेळ अल्प अगदी, तैशात ती धावरी!
छाती थोर, तथापि, निषत्य सुचवी प्रत्येक ठोका जना
आला मृत्यु समी-सावध असा का चालवा यत्न ना? ॥३॥
आहे जीवितयुद् विश्वसमरी मोठे सदा चाललें,
धीरें त्यात लढुन, नाव जगती ह्या गाजवा चांगले,
गोते खाल, न चालता- बिनवितों - त्या मेंढरांचे व्रत,
गेल्याचाच करीत शोक बसणे बाई ही पद्धत ॥४॥
भावी काल किती हि सौख्यद असो, जाउं नका त्यावर
आहे ही घडी आपली - न गमवा. यत्नास व्हा सादर.
चित्ती धैर्य धरा. सदा भरंवसा ठेवा हरीच्या वरी
संसाराब्धि तरावयास तरणी ही एक आहे खरी. ॥ ५॥
झाले आजवरी महापुरुष जे त्यांची चरित्रे पहा.
''व्हावे आपणही तयांसम'' - तुम्हा लाभेल हो! बोध हा.
जाताना जग सोडुनी, उमटवा मागे पदे आपली
कालाच्या पुलिनी जनास सरणी घालून द्या चांगली. ॥६॥
संसारब्धि तरून जात असतां, जो सांपडे एकटा,
फेरे घेत फिरे, बळी जन पडे तो बापडा संकटां,
जीवाशा नुरली- अशा दिसतां ती पावले आपली
मित्रांनो न गमले काय, ''मजला संजीवनी लाधली?'' ॥७॥
यासाठी, कर जोडुनी बसू नका- बांधा कशी कंबर.
घाला भीक न संकटा- प्रतिदिनी यत्नास व्हा सादर.
भाषा प्राकृत उन्नतीस चढवा- काया करा अर्पण-
आर्यावर्त हितास. द्या सतत सत्कार्यास उत्तेजन. ॥८॥

# श्री समर्थ वाग्देवता मंदिर व इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ
## (साहित्याची लेणी)




**ले. श्रीपाद माधव नांदेडकर**

*क्युरेटर, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे*


हस्तलिखिते व ऐतिहासिक कागदपत्रे यांचे संकलन, संरक्षण व संशोधन करणाऱ्या दोन संस्थांचा पाया २० व्या शतकाच्या पूर्वार्धात कै. शंकर श्रीकृष्ण तथा नानासाहेब देव यांनी धुळ्यात घातला व कै. वि. का. राजवाडे यांचे समग्र साहित्य एकत्र करून राजवाडे संशोधन मंडळ स्थापले. समर्थ वाग्देवता मंदिर व राजवाडे संशोधन मंडळ या दोन्ही संस्था संत साहित्य व मराठ्यांच्या इतिहासाची साधने या विषयांत महाराष्ट्रातच नव्हे तर भारतास भूषणभूत ठरल्या. अग्रेसर राहिल्या. कै. नानासाहेब देव यांची ही ऐतिहासिक स्मारकेच आहेत.

महाराष्ट्र राज्य विविधतेने नटलेले राज्य आहे. राज्याला थोर परंपरा लाभली आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात थोर व्यक्ती होऊन गेल्या व त्यांच्या कार्यामुळे त्या-त्या जिल्ह्याची ओळख होऊ लागली. संशोधन क्षेत्रात धुळ्याचे नाव महशूर झाले ते वाग्देवता मंदिर व राजवाडे संशोधन मंडळामुळे असे म्हणावे लागेल. त्यामुळे धुळेकरांना या संस्थांचा फार अभिमान आहे.

धुळे- मालेगाव रस्त्यावर श्री समर्थ वाग्देवता मंदिराची वास्तू भव्य दगडी इमारतीत विसावलेली पाहून मन प्रसन्न होते. ही वास्तू म्हणजे तिचे संस्थापक कै. शंकर श्रीकृष्ण तथा नानासाहेब देव यांचे स्मारकच आहे. अलौकिक बुद्धिमत्ता, अफाट वाचन, सुंदर हस्ताक्षर, सहिष्णू व विचक्षण वृत्ती या प्रतिभाशाली गुणांमुळे कै. देवांनी १९ मे १८९३ मध्ये धुळ्यात सत्कार्योत्तेजक सभेची मुहूर्तमेढ रोवली. या संस्थेच्या वाटचालीतून श्री समर्थ वाग्देवता मंदिर १९३५ मध्ये आकारास आले आणि या संस्थेचा अमृतमहोत्सवही नुकताच संपन्न झाला. कै. देवांना इ.स. १८७१ ते १९५८ असे ८७ वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य लाभले आणि हे आयुष्य समर्थ कार्यार्थ खर्ची पडले. त्यांनी राष्ट्रकारण केले, समाजकारण साधले व त्याचबरोबर समर्थकारणही केले. समर्थांच्या वाङ्मयाच्या संशोधनाचा पाया कै. देवांनी घातला. ते संशोधन कार्य एवढे प्रचंड झाले की त्यातून गोळा झालेली ग्रंथसंपत्ती सांभाळण्यासाठी श्री समर्थ वाग्देवता मंदिराची वास्तू अस्तित्वात आली.

विद्यार्थी जीवनात कै. नानासाहेब देवांचे प्रेमाचे संबंध लो. टिळक, नामदार गोखले, शि.म. परांजपे यांच्याशी प्रस्थापित झाले होते. कै. महात्मा गांधी हे तर त्यांच्या शेजारीच विद्यार्थिदशेत राहात. डॉ. राजेंद्रप्रसाद व अरबिंदबाबू स्वातंत्र्य चळवळीतील सहभागामुळे त्यांच्याशी जोडले गेले. समर्थ वाङ्मयाच्या अभ्यासाला अशा रीतीने राष्ट्रीय विचाराचे अधिष्ठान प्राप्त झाले. राष्ट्र उभारणीसाठी समर्थ वाङ्मयाच्या संशोधनाची किती जरुरी आहे हे त्यांना पटले व समर्थांचे स्मरण म्हणजे राष्ट्राचे जीवन व

त्यांचे विस्मरण म्हणजे राष्ट्राचे मरण अशी खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली.

इ.स. १९०३ मध्ये त्यांची व वि. का. राजवाडे यांची भेट झाली. समर्थ रामदासांच्या दासबोधाची एक जुनी प्रत श्री. वि. का. राजवाडे यांनी कै. देवांना दिली व त्या प्रतीचे संशोधन व अभ्यास करण्यास सांगितले. समर्थ विचारांच्या अभ्यासाने कै. देवांच्या राष्ट्रीय विचारांना खतपाणीच मिळाले. पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळात निबंध वाचनाच्या प्रसंगी राजवाडे, देव व भट यांच्या वारंवार भेटी होत व हे समानधर्मी संशोधक वृत्तीचे गृहस्थ असल्यामुळे देव राजवाडे यांना धुळ्यास घेऊन आले. ते अखेरपर्यंत राजवाडे धुळ्यासच राहिले. ३१ डिसेंबर १९२६ ला धुळे येथे राजवाडे यांचे निधन झाले. इ.स. १९२७ मध्ये देव व भट यांनी धुळे येथे राजवाडे यांचे स्मारक म्हणून राजवाडे संशोधन मंडळाची स्थापना केली व ऐतिहासिक कागदपत्रांच्या संशोधनाचा पाया घातला गेला.

यापूर्वी सत्कार्योत्तेजक सभेतर्फे 'इतिहास व ऐतिहासिक' मासिक ऐतिहासिक कागदपत्रांच्या संशोधन वृत्तासाठी निघत असे व त्याचे काम राजवाडेच पाहात. सत्कार्योत्तेजक सभेच्या रामदासी कार्यात देवांबरोबर राजवाडे प्रथमपासून सहभागी होते. सर्व संत मंडळींत राजवाडे यांना रामदासांबद्दल अधिक ममत्व वाटे. एकनाथ पूर्वकालीन ज्ञानेश्वरीचे संशोधन हा सत्कार्योत्तेजक सभेचा ग्रंथ राजवाडे यांनी तयार केलेला आहे.

१९०३ ते १९३२ या काळात देशात अनेक ठिकाणी फिरून गोळा केलेला संत साहित्याच्या हस्तलिखितांचा संग्रह श्री समर्थ वाग्देवता मंदिरात ठेवलेला आहे व संशोधनासाठी संशोधकांना उपलब्ध करून दिला आहे. असे मानले जाते की, संत वाङ्मयाचा अभ्यास वाग्देवता मंदिरातील बाडे धुंडाळल्याशिवाय पार पडू शकत नाही. कै. देव यांची इच्छा होती की समर्थ रामदास स्वामी यांचे साहित्य केवळ वाचन, पारायण, पठण, अभ्यास यापुरतेच मर्यादित न राहाता त्यातील जीवनमूल्यांचे तत्त्वज्ञान प्रत्यक्ष आचरणात उतरावे व व्यक्ती राष्ट्रभक्त बनावी.

समर्थ वाग्देवता मंदिराच्या संग्रहांत शिवछत्रपतींची अस्सल पत्रे आहेत, समर्थांच्या झोळीत टाकलेली सनद आहे. १४ व्या वर्षी टाकळीस स्वहस्ते लिहिलेले वाल्मिकी रामायण आहे. समर्थांच्या हस्ताक्षरातील त्यांच्या शिष्यास लिहिलेले गद्य पत्र आहे. काही सचित्र पोथ्या आहेत, कल्याणस्वामींनी स्वहस्ते लिहिलेले समर्थ वाङ्मय आहे (कल्याण पोथा), विविध भाषेतील ग्रंथराज दासबोधाच्या प्रती, विद्यावाचस्पती पदवीसाठी मंदिराच्या साहित्यातून तयार झालेले प्रबंध, शाहू महाराज, राजाराम महाराज यांची पत्रे, अनेक पोथ्या, बखरी, कागदपत्रे (मोडी व देवनागरीतील) यांची ही खाण आहे. शिवाय काही ताम्रपट, ताडपत्रे, प्रतापगडावरील देवीचे शिक्के हेही येथे पाहाण्यास मिळतात. ही ग्रंथसामग्री वेगवेगळ्या समर्थ मठांतून गोळा केलेली आहे.

समर्थ वाग्देवता मंदिरातील संशोधित व असंशोधित कागदपत्रे जपून ठेवणे व अभ्यासकांना उपलब्ध करून देणे हे काम संस्था करते. त्याकरिता संगणकाच्या मदतीने डिजिटलायझेशन करण्याचे काम आता सुरू केले आहे. त्यामुळे कोणाला कोठूनही कोणताही संदर्भ देऊन त्याला हवे असलेले साहित्य संस्थेकडून मिळविता येईल.

संशोधनाचाच पाया असलेले समर्थ वाग्देवता मंदिराचे धुळ्यातील जुळे भावंड म्हणजे राजवाडे संशोधन मंदिर हे होय. दोन्ही संस्थांचा उद्देश जुन्या कागदपत्रांचा शोध घेऊन संशोधन करणे व हे काम करण्यासाठी तरुण वर्गास प्रेरणा देणे हेच आहे. दोन्ही संस्थांचे संस्थापक एकच होते. ९ जानेवारी १९२७ ला राजवाडे संशोधन मंडळ उभे राहिले आणि त्यामध्ये हयातभर कै. वि. का. राजवाडे यांनी गोळा करून संशोधित केलेली ऐतिहासिक कागदपत्रे व ग्रंथ या संस्थेत विराजमान झाले. मंडळाची इमारतही भव्य आहे, दगडी आहे. भर धुळे शहरात

आहे. त्याच्या शेजारीच असलेली श्री सरस्वती देवीची हातात वीणा घेतलेली भव्य मूर्ती आपले लक्ष वेधून घेते.

कै. राजवाडे यांना साहित्य गोळा करून संशोधन करण्यास कै. देवांच्या मानाने कमी काळ मिळाला. त्यांनी आपल्या हयातीत मराठ्यांच्या इतिहासाची साधने या विषयाचे २२ खंड तयार केले की ज्यातील माहिती अधिकृत व विश्‍वसनीय मानली जाते. खानदेशातील कदमबांडे यांची कैफियत, शिंदखेड्याचे राऊळ यांचे दप्तर, सुलतान परगण्याचे दस्तऐवज, विविध सनदा, खानदेशातील होळकरांची सत्ता व त्यासंबंधीचे कागद या संस्थेत अभ्यासास उपलब्ध आहेत. मराठ्यांनी आपल्या कर्तृत्वाने आक्रमकांशी जो लढा दिला, त्या मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी तसेच मराठ्यांच्या राजकीय, सामाजिक, प्रशासकीय, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व वैचारिक संस्कृतीवर प्रकाश टाकणारी अस्सल संदर्भ साधने राजवाडे मंडळात उपलब्ध आहेत. यामध्ये शेकडो कागदपत्रे मराठी, फारशी, हस्तलिखिते, वतननामे, महजर, करारपत्रे आहेत. काही कागद मोडीत आहेत, गुजराथीत आहेत. भारतभर पायपीट करून भ्रमंती करून अहोरात्र भटकून राजवाडे यांनी परिश्रमपूर्वक ती मिळविली आहेत. विविध राजघराण्यांतून गोळा केलेल्या कागदपत्रांचाही त्यात समावेश आहे. नंदुरबार येथील प्रसिद्ध कानुगो देसाई यांच्या घराण्यातील कागदपत्रे येथे अभ्यासास मिळतील. अशा अप्रकाशित कागदपत्रांचा अभ्यास करणे व ती समाजाच्या माहितीसाठी टीपांसहित प्रकाशित करण्याचे काम राजवाडे संशोधन मंडळ करीत असते.

राजवाडे मंडळात ऐतिहासिक कागदपत्रांबरोबरच काही हस्तलिखिते व जुन्या पोथ्याही आपणास पाहाण्यास मिळतात. राधामाधव विलास चंपू, विवेकसार, वेडीया नागेश, जानकी स्वयंवर, नवरसराग माला, विलासमणि मंजिरी, योग चिंतामणी असे ग्रंथ अभ्यासाकरिता उपलब्ध आहेत. येथील कागदपत्रांत मराठी काव्य, कथा, पुराणे, आरत्या, स्तुतिग्रंथ, मराठी कोश, चरित्रे, अंकगणित, जमाखर्च, भूमिती, भूगोल यांचाही समावेश आहे. मंडळातील हस्तलिखिते व ग्रंथ यांच्या सूचीचे पुस्तकही प्रसिद्ध झाले आहे.

राजवाडे मंडळात जुन्या कागदपत्रांचे एक विशेष दालन आहे. त्यामध्ये विविध वंशावळी, आज्ञापत्रे, इनामपत्रे, बक्षिसपत्रे, दानपत्रे, माफी पत्रे, कबुलायल, कर्जरोखे, हुंडी, जाब, जमाबंदी, निवाडा पत्र, शनवार वाडा नकाशा, अष्टप्रधान मंडळ अशी विविधता सापडते. मंडळास भेट देणाऱ्यांचे लक्ष वेधून घेणारी व कुतूहल जागृत करणारी गोष्ट म्हणजे इमारतीत रांगेने शिस्तीत उभ्या असलेल्या पाषाणाच्या ७५ मूर्ती. त्या धुळे, नंदुरबार, जळगाव जिल्ह्यांतील विविध ठिकाणांहून आलेल्या आहेत. चित्रकलेचे एक वैशिष्ट्यपूर्ण दालन मंडळात आहे. तात्यासाहेब भट यांचे पूर्वज त्र्यंबकशास्त्री भट हे सवाई माधवराव पेशवे व दुसरे बाजीराव यांच्याकडे चाकरी करीत होते. त्यांनी गोळा केलेला तो चित्रसंग्रह आहे. सचित्र ५ पोथ्या आहेत. सुमारे ५ हजारांपेक्षा अधिक हस्तलिखिते आहेत. ऐतिहासिक कागदपत्रांची संख्या ३० हजारांच्या पुढे जाईल.

इतिहास संशोधनाला वाहिलेले 'संशोधक' नावाचे त्रैमासिक राजवाडे संशोधन मंडळातर्फे १९३२ पासून नियमितपणे प्रकाशित केले जाते. संस्थेमध्ये देश-विदेशातून अभ्यासक येतात. त्यांच्या निवासाची सोय संस्थेतर्फे होऊ शकते. मंडळाच्या आवारातच कै. बाळासाहेब मुंदडा सभागृह असून, त्यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, सभा-संमेलने, चर्चासत्रे यांचे आयोजन केले जाते. मंडळाची २६ प्रकाशने आज विक्रीस उपलब्ध आहेत. या पुस्तकांमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, अमृतानुभव, गीताई धर्मसार, धुळे व नंदुरबार जिल्ह्याचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, निबंध संग्रह, नागपूरकर भोसले यांचे चिटणीसी बयान नंदुरबार दप्तर, शिवछत्रपतींची १०९ कलमी बखर, आज्ञापत्रे, योग, चिंतामणी, वेडिया नागेश, नवरस रागमाला आणि इ.

वि. का. राजवाडे यांच्या समग्र साहित्याचे १० खंड, मराठ्यांच्या इतिहासाची साधने ११ खंड शिवाजीची राजनीती, राजवाडे यांचे चरित्र (Sources of Maratha History ५ खंड) असे ग्रंथ विक्रीसाठी संस्थेत उपलब्ध आहेत. याशिवाय राजवाडे संशोधन मंडळ ग्रामदेवता कोष, संस्थेतील दुर्मिळ ग्रंथांचे पुनर्मुद्रण, आदिवासी संस्कृती दालन, अभ्यास केंद्र हे नवीन प्रकल्प हाती घेत आहे.

श्री समर्थ वाग्देवता मंदिर व राजवाडे संशोधन मंडळ या संस्था धुळे शहराचे वैभव आहेत. पारतंत्र्याच्या काळात अनेक श्रेष्ठ व्यक्तींनी विविध उपक्रमांद्वारे स्वातंत्र्याची भावना जोपासण्यासाठी प्रेरणादायी ठरू शकतील असे उपक्रम उभारण्यासाठी आपले सारे आयुष्य वेचले. त्या व्यक्तींमध्ये कै. नानासाहेब देव व कै. इ. वि. का. राजवाडे ही नावे अग्रभागी आहेत. समर्थांनी म्हटल्याप्रमाणे 'अभ्यासे प्रगटावे' यास अनुसरून महाराष्ट्रात एका बाजूस असलेल्या धुळ्यासारख्या गावात या दोघांनी प्रचंड व्यापाच्या दोन संस्था निर्माण केल्या व पुढच्या पिढीला संशोधनाचा वारसा दिला. त्यांच्या स्मृतीस अनंत प्रणाम.

# श्री समर्थ वाग्देवता मंदिरातील संग्रहाचे स्वरूप

**_गणेश शंकर देव_**

*एलएल.बी. धुळे*

*जे वडिली निर्माण केले । ते पाहिजे पाहिले ।*
*काये काये वडिली केले । किती पाहावे ॥ १५.९.२२*
*(दासबोध)*

१) ''गेल्या अठ्ठावीस वर्षांत झालेले श्रीरामदासी संशोधन'' या मथळ्याखाली शके १८५२ पासून श्रीरामदासी मासिकात आपले संशोधनवृत्त महाराष्ट्रास सादर करण्यास ती. शंकर श्रीकृष्ण देव यांनी आरंभ केला. आतापर्यंत सत्कार्योत्तेजक सभेने जो संग्रह केला, त्यापैकी एक एक बाड हाती घेऊन, ते किती वर्षांचे जुने असावे, त्याची पृष्ठसंख्या किती, त्याची स्थिती काय, त्याचा लेखनकाल कोणता, लेखक कोण, त्यात कोणाकोणाची कविता आहे, त्यात नवीन काही प्रकरणे आहेत की काय, त्यावरून कोणत्या नवीन गोष्टींचा बोध होतो, अशा स्वरूपाचे प्रत्येक बाडाचे टाचण संशोधनवृत्तांत करण्याचे काम चालू झाले व ते अद्यापि चालू आहे. संशोधन वृत्ताच्या पहिल्या खंडात अशा रीतीने चवदा ठिकाणच्या ५३६ बाडांची नोंद करण्यात आली आहे. दुसरा खंड चालू आहे. त्याची पहिली २४० पृष्ठे आतापर्यंत रामदासी मासिकात प्रसिद्ध झाली असून, त्यात पुढील ५३७ ते ११०९ म्हणजे आणखी ५७३ बाडे नोंदण्यात आली आहेत. पहिला खंड संपूर्ण व दुसरा खंड झाला तितका, असे दोन्ही खंड हातात घेऊनच मी आपणांस ही माहिती सादर करीत आहे.

२) याशिवाय अजून सरासरी इतकीच बाडे व सुमारे दोन अडीच हजार कागदपत्रे यांची नोंद व्हावयाची आहे, असा अंदाज आहे. रामदासी संशोधनाच्या ४०८ पृष्ठांच्या पहिल्या खंडाला ६२ पानांची विस्तृत आणि व्यापक (Exhaustive) सूची जोडण्यात आली आहे. अशीच सूची दुसऱ्या खंडालाही देण्यात यावयाची आहे. हे दोन्ही खंड म्हणजे या संग्रहाच्या वर्णनात्मक याद्याच (Descriptive Catalogues) होत. कोणाही अभ्यासकाला आपणास हवे असलेले बाड, या सूचीवरून नेमके काढता येईल. ज्या ज्याचा जो व्यासंग असेल, त्याला त्याप्रमाणे या सूचीचा उपयोग होणार आहे. उदाहरणार्थ, एखाद्यास अमृतरायांची तेवढी कविता पाहावयाची असेल, त्याने सूचीत अमृतराय पाहिले म्हणजे ते कोणकोणती बाडे पाहावी ते सांगतील. ज्यांची आतापर्यंत नोंद झाली आहे, अशी ११०९ बाडें या मंदिरात कपाटातून अनुक्रमाने लावून ठेवलेली आहेत. प्रत्येक बाडाला खाली वर जाड पृष्ठिपत्रे लावली असून, तांबड्या फितीने ती बांधण्यात आली आहेत आणि पृष्ठितलावर बाडाच्या क्रमांकाची चिठी लावण्यात आली आहे. ज्याची नोंद व्हावयाची

आहे, असा मुख्यत: तंजावरकडील व कारंजे वगैरे भागातील सारा संग्रह दोन-तीन कपाटांत तूर्त तसाच ठेवण्यात आला आहे. त्याचे काम यापुढे सुरू होईल.

३) हे सारे आपल्या पूर्वजांचे जुने ठेवणे आहे. महाराष्ट्राने आपले सारे ऐहिक वैभव ओवाळून टाकावे, इतका तो संग्रह बहुमोल आहे, असे त्याचे वर्णन कोणी कोणी करतात. याचा अर्थ इतकाच की, असा हा बहुमोल संग्रह आहे. असा हा संग्रह आजपासून काही शर्तींवर महाराष्ट्राच्या मालकीचा होत आहे. त्या संग्रहाचे किंचित अंतरंग, मला जसे समजले असेल तसे ते आपणांस निवेदन करावे, अशी मला आज्ञा झालेली आहे.

४) पहिल्या ५३६ बाडांतच गेल्या चार-पाचशे वर्षांतील लहान-मोठ्या, ज्ञात-अज्ञात, प्रकाशित-अप्रकाशित **अशा ४५९ कवींची** थोडी फार कविता आलेली आहे. बाकी उरलेल्या संग्रहांत या ४५९ पैकी जरी बरेच कवी आणि ग्रंथकार येतील, तरी त्याशिवाय आणखी सुमारे शे-दोनशे नवीन नावे उपलब्ध होतील. आद्यकवी मुकुंदराज यांच्यापासून पेशवाईच्या अंतकाली होऊन गेलेले भक्त मंजरी मालाकार राजाराम प्रासादी यांच्यापर्यंत म्हणजे सुमारे ६०० वर्षांच्या काळात जे संतकवी होऊन गेले, त्यापैकी पूर्वी ऐकूनही ठाऊक नव्हते असे सुमारे शंभर तरी कवी या संग्रहात आढळतील, असा भीतभीत केलेला अंदाज आहे. नोंदलेल्या बाडांपुरतेच म्हणावयाचे तर बहेरू, सहजबोधसिंह, एका शामनाथ, नित्यानंद, नृसिंहसुत, जयरामजजांकित, काकात्मज, शिवसुत मच्कुंद, पामर, आनंदराम, भवानी गंगू, विजय, आलमखान, दीन सदाशिव, गुंडा, भाऊ, बापू शामराज, मोरो शाम, भट गोपाळ, शुरू बाबा, स्वानंदस्वामी, आहिक्यबोध, सदानंद, सुखबोध वगैरे अनेक कवींची ओळख महाराष्ट्रास प्रथम याच संग्रहावरून झाल्याचे दिसून येईल.

५) संस्कृत, हिंदुस्थानी, गुजराथी, मारवाडी व कानडी या भाषांतील ही थोडीफार कविता या संग्रहात आहे.

६) या संग्रहात इतरांची श्री समर्थस्तवनपर व इतर प्रकाशित आणि अप्रकाशित कविता तर आहेच, पण खुद्द श्रीसमर्थांचीही पूर्वी कोठेही प्रसिद्ध न झालेली, अशी बरीच कविता आहे. त्या कवितेचा अजून एक भाग निघावयाचा आहे. सत्कार्योत्तेजक सभेने प्रसिद्ध केलेला, श्रीरामदासी ग्रंथमालेतील तिसरा भाग, श्री समर्थांची कविता, मनाचे श्लोक, करुणाष्टके व पदपदांतरे ही श्री समर्थांची कविता सभेने ज्या बाडांवरून छापली, ती सारी बाडे या संग्रहात आहेत. सभेने छापलेला दासबोध, डोमगाव येथील मठात असलेल्या खुद्द श्री कल्याणस्वामींच्या हातच्या मूळ प्रतीवरून छापलेला आहे. त्या मूळ प्रतीवरून तंतोतंत केलेली श्रीमत्‌दासबोधाची एक प्रत या संग्रहात ठेवण्यात आली आहे.

७) श्री समर्थांचे चरित्र व रामदासी संप्रदाय यावर नवीन प्रकाश पाडणारी, श्री समर्थांची व इतरांची अनेक पदपदांतरे या संग्रहात आहेत. शिवराम म्हणजे उद्धव हा उलगडा होऊन दिवाकर व उद्धव यांच्या वादावर नवीन प्रकाश या संग्रहामुळे पडला; तुकाराम आणि श्रीसमर्थ यांच्या भेटीचा एक नवीन प्रसंग या संग्रहावरून महाराष्ट्रात विदित झाला, हनुमंतस्वामींची बखर खरोखर लिहिली कोणी व तिची विश्वसनीयता किती, हे ठरविण्याला या संग्रहाचा उपयोग होणार आहे. हनुमंतस्वामींनी मूळ बखर शके १७११ त लिहिली. ती त्रोटक होती, तिचा विस्तार करून मल्हार रामराव चिटणीस व रंगो लक्ष्मण यांनी शके १७३९ त नवीन बखर तयार केली व ही नवीन तयार झालेली बखर आज हनुमंतस्वामींच्या नावावर मोडत आहे, या गोष्टी या संग्रहावरून स्पष्ट झाल्या आहेत. सज्जनगडी आपल्या चितास्थानी श्री हनुमंताचे देवालय बांधावे, अशी आज्ञा आपला अवतार समाप्त करण्यापूर्वी श्री समर्थांनी केली असल्याचे कागदपत्राच्या पहिल्या खंडातील अठ्ठेचाळिसाव्या लेखांकावरून दिसून येते; या गोष्टीला उद्धवांच्या कवितेत दुजोरा मिळतो. त्या देवालयातील

मारुतीच्या मूर्तीचा आकार कसा असावा आणि स्वरूप कसे असावे, हेही श्री समर्थांनी अगोदरच सांगून ठेवले असल्याचे उद्धवांच्या कवितेवरून कळते; लेखांक ४८ चे ते पत्र व उद्धवांची कविता असणारे ते बाडही या संग्रहात आहेत; कोणत्याही चरित्रग्रंथात आढळून न येणारी श्रीसमर्थांच्या स्वप्नसाक्षात्काराची माहिती या संग्रहात असलेल्या श्रीसमर्थांच्याच एका करुणाष्टकावरून महाराष्ट्राच्या कानी प्रथम आली. अशा श्रीसमर्थ चरित्रपर व अवांतर शेकडो महत्त्वाच्या बाबी या संग्रहावरून पुढे येत आहेत व येणार आहेत.

८) ''निवृत्तेश्वरी'' नावाचा ग्रंथ पूर्वी कोठे ऐकूनही ठाऊक नव्हता. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीप्रमाणे, निवृत्तिनाथांचा निवृत्तेश्वरी नावाचा अठरा अध्यायांचा ग्रंथ होता, एवढीच अपूर्व माहिती महाराष्ट्रास प्रथम ४१ व्या बाडांकावरून झाली, तर त्या ग्रंथाच्या पहिल्या आठ अध्यायांची तीनशे वर्षांपूर्वीची एक प्रत या संग्रहात असल्याचे बाडांक ३५० वरून महाराष्ट्रात जाहीर झाले. महाराष्ट्रास अपरिचित असलेले, प्रकाशनयोग्य असे अनेक ग्रंथ या संग्रहात आहेत. असे ग्रंथ निदान पाचशे तरी असावेत, असे म्हणतात. या संग्रहात ज्योतिषाचे ग्रंथ बरेच आहेत. मंत्र, यंत्र, तोडगे, शकुन, प्रश्नांच्या रीती, नानाविध रोगांची नाना औषधे याविषयी ही विपुल माहिती या संग्रहांवरून होण्यासारखी आहे. काही काही बाडांतून जमाखर्च आहेत, त्यांचा उपयोग त्या वेळची आर्थिक स्थिती जाणण्यास होईल. या संग्रहात असलेल्या एकनाथी भागवताच्या पृष्ठमात्रेच्या प्रतीइतकी जुनी प्रत महाराष्ट्रात दुसरीकडे कोठेही आज तरी उपलब्ध नाही. हनुमंत स्वामीकृत बखरीच्या सात-आठ प्रती आहेत, पण त्याशिवाय मराठी राज्याची बखर, प्रतापसिंह महाराजांची बखर अशा इतरही बखरी आहेत, बाबाजी भोसले यांच्यापासून शाहूमहाराज दक्षिणेत येऊन राज्य करू लागेपर्यंतचा भोसले घराण्याचा वृत्तांत या संग्रहात आहे.

९) जांबगाव, चाफळचे उपाध्ये, चाफळचे ढवळे, मेढे, उंबरजमठ, शिराळ्याचे देशपांडे, मनपाडळें मठ, पारगाव मठ, डोमगावमठ, शिरवळचा बाजी गोसाव्यांचा मठ, टाकळीमठ, महाबळेश्वर, मर्ढे येथील सिद्धामृत मठ वगैरे ठिकाणची मिळून सुमारे ७००-८०० कागदपत्रे सत्कार्योत्तेजक सभेने आतापर्यंत छापली आहेत. याशिवाय इतर ठिकाणची दीड-दोन हजार कागदपत्रे प्रकाशनाची वाट पाहात या संग्रहात पडून आहेत.

१०) बाळाजी विश्वनाथ, नानासाहेब पेशवे, थोरले माधवराव, माधवराव नारायण प्रधान, मोरो त्रिमल, मोरेश्वरसुत भैरव प्रधान, मोरेश्वर पंडितराव, नीळकंठ मोरेश्वर, रामचंद्र नीळकंठ अमात्य, परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी, श्रीनिवास परशुराम प्रतिनिधी, श्रीनिवास गंगाधर प्रतिनिधी, भगवंतराव त्र्यंबक प्रतिनिधी, श्रीकराचार्य पंडितराव, नारो शंकर सचिव, राणोजी शिंदे, सेनापती संताजीराव घोरपडे, सर्जेराव घाटगे, कल्याणस्वामी, कल्याणांचे बंधु दत्तात्रय, हनुमंतस्वामी, उंब्रजमठपति केशवस्वामी, कल्याणशिष्य मुद्गल गोसावी, उद्धव गोसावी वगैरे सांप्रदायिक व ऐतिहासिक थोर व्यक्तींची हस्ताक्षरे तर या संग्रहात आहेतच, पण त्याशिवाय शाहूमहाराज, राजाराममहाराज, संभाजी महाराज, **खुद्द श्री शिवछत्रपती आणि श्रीसमर्थ** यांची हस्ताक्षरे या संग्रहात आहेत. महाराष्ट्राने अजून ते पूर्णपणे मान्य केलेले नाही, पण श्रीशिवछत्रपतींची ''मोर्तबसूद'' अशी स्वदस्तुरची अक्षरे असलेली, निरनिराळ्या काळातील काही पत्रे या संग्रहात आहेत. रघुनाथभटांना श्रीसमर्थांनी स्वहस्ते लिहिलेले ते ५२ ओळींचे पत्रच काय, पण खुद्द श्रीसमर्थांनी स्वत: केलेली वाल्मिकी- रामायणाची प्रत या संग्रहात आहे.

११) प्रत्येक बाड न् बाड व पत्र न् पत्र पाहावेसे वाटावे. पण त्यातही विशेष प्रेक्षणीय आणि प्रदर्शनीय अशा अनेक वस्तू या संग्रहात आहेत. त्यापैकी काही प्रदर्शनमेजात (शोकेसमध्ये) निराळ्या ठेवल्या आहेत, त्या आपण अवश्य पाहाव्या. कल्याणांनी स्वहस्ते

लिहिलेले, श्रीसमर्थांच्या कवितेचे, वेबस्टरच्या डिक्शनरीएवढे, ते प्रचंड बाड पाहावे, या बाडाचे अक्षर कसे सुंदर एका टाकाने लिहिलेले आहे, अग्नीच्या दिव्यातून ते जणू विजयी होऊन सुरक्षित बाहेर पडले आहे. स्वानुभवदिनकरकार दिनकरांच्या हस्ताक्षराचे, पोथीचे ते शेवटचे पान अवलोकावे, कल्याणांनी दिवाकरांना लिहिलेल्या त्या पत्रावरून नजर फिरवावी, अनेक थोर, थोर पुरुषांची हस्ताक्षरे पहात पहात श्री शिवछत्रपतींची ''मोर्तबसूद'' ही स्वदस्तुरची अक्षरे असलेल्या त्या पाच-सहा पत्रांकडे वळून दृष्टी स्थिर करावी, तोच २०।। इंच लांबीचा, ८। इंच रुंदीचा आणि २।।। इंच जाडीचा तो प्रचंड पोथा डोळ्यांसमोर येतो. तो इतका मोठा आहे की, त्याला पोथी न म्हणता पोथा म्हणण्यात येते, ते कसे बरोबर आहे हे मनात येऊन त्याच्या प्रचंडपणाचे आश्चर्य वाटू लागते न लागते तोच, त्याच्या शेजारीच असणाऱ्या मुठीत मावणाऱ्या दासबोधाच्या चिमुकल्या प्रतीकडे नजर जाऊन त्या प्रतीचे कौतुक वाटते. पलीकडे ही काय चित्रे दिसतात म्हणून पाहावे तो १५० रुपयांना सभेने विकत घेतलेली ''सचित्र पंचरत्नी गीता'' दिसते. ही गीता सभेला दीडशे रुपयांना मिळाली असेल, पण जर्मनीतला एखादा तज्ज्ञ माणूस तिची किंमत दीड-दोन हजार रुपये सहज करील. गीतेतील त्या अप्रतिम चित्रांचे कौतुक करीत जरा पलीकडे नजर फिरवावी, तो **श्री समर्थांनी रघुनाथभटांना स्वहस्ते लिहिलेले ते पत्र** दृष्टीस पडते आणि 'तुमचे मन मजवरी बहुत आहे ते तुमचे आवडीच्या गुणे कल्याण होईल ऐसे नेमस्त चिन्ह दिसते' हा श्रीसमर्थांनी रघुनाथभटांच्या निमित्ताने जणू महाराष्ट्रासच कायमचा आशीर्वाद दिलेला आहे व आत्मकल्याणाचा मार्ग दाखविला आहे की काय, असा विचार मनात येतो तो शेजारीच असलेली, श्रीसमर्थांनी आपल्या वयाच्या चवदाव्या, पंधराव्या, सोळाव्या, सदतिसाव्या आणि एकेचाळिसाव्या वर्षी लिहून पुरी केलेली **वाल्मिकी- रामायणाची प्रत** पाहाण्यात येऊन तेथेच मन विराम पावते.

१२) या वस्तू व इतर काही प्रेक्षणीय बाडे मंदिरात वरच्या मजल्यावर प्रदर्शनमेजात आपणास पाहावयास मिळतील. या दर्शनार्थ ठेवलेल्या बाडांत गिरिधरांची रामायणे व वाके, दासोपंतांच्या गीतार्णवातील टपोऱ्या अक्षराचा नववा अध्याय, उद्धवांच्या हातची बाडे, ग्रंथराज दासबोधाची जन्मभूमी असलेल्या शिवथरच्या घळीत लिहिली गेलेली अनुभवामृताची प्रत, निश्चयाचा महामेरू, कोणाचा भरवसा न धरावा, अखंड सावधान असावे इत्यादी महत्त्वाची प्रकरणे, श्रीसमर्थकृत रामायणाची सुंदर प्रत इत्यादी बाडांकडे आपले लक्ष्य अवश्य जाईलच. या प्रदर्शनमेजात आणखी एक कौतुकास्पद वस्तू आहे ती म्हणजे प्रतापगडावरील **श्रीरामवरदायिनी देवीचे शिक्के** उमटविलेला कागद होय. ते शिक्के आपण पहावे व त्याखालील मजकूर वाचावा अशी विनंती आहे.

१३) मनाला उद्विग्नता वाटावी, असे या संग्रहात काहीच नाही, असे मात्र आपण समजू नये. या बाडांचे संपादन करीत असता कित्येक बाडांची झालेली दुर्दशा पाहून संपादकांनी अनेकदा दु:खोद्गार काढले आहेत. बाडांक ७७० आणि ७७१ ही दोन बाडे प्रदर्शनमेजात मुद्दाम ठेविलेली दिसतात. ती बाडे आपल्या अज्ञानाचे आणि अनास्थेचे उत्तम प्रदर्शन करीत आहेत. कदाचित हा काळाचाही परिणाम असेल. ही दोन्ही बाडे बरीच मोठी आहेत. पण पावसाचे पाणी पडून पडून त्या बाडांची एकच लठ्ठ भाकरी किंवा भाकरीपेक्षाही समर्पक दृष्टांत द्यावयाचा तर एकच लठ्ठ गोवरी बनली आहे. वाग्देवतेच्या चरणी निवेदन न करावे, तर कोणापुढे हे गाऱ्हाणे मांडावे?

१४) या संग्रहावरून नवीन कवींची जशी माहिती होते, तशी हल्ली ज्ञात असलेल्या कवींची काही अप्रकाशित कविताही या संग्रहात आढळते. श्रीसमर्थांशिवाय इतर साधुसंतांची हल्ली प्रकाशित असलेली कविता कशी

अशुद्ध छापलेली आहे आणि त्यामुळे अर्थाचा अनर्थ कसा होतो किंवा काही अर्थच कसा होऊ शकत नाही, याची दहावीस ठळक ठळक मनोरंजक उदाहरणे रामदासी संशोधन वृत्तांत प्रसिद्ध झालेली आहेत. त्यापैकी दोनच आज आपल्यासमोर आणीत आहे.

१५) अर्थाचा अनर्थ करणारे उदाहरण ३५८ व्या बाडाची नोंद करताना देण्यात आले आहे. त्या बाडात इतर प्रकरणांबरोबर १०८ श्लोकांची हरिराजकृत ''रामार्याटीका'' आलेली आहे. ही टीका शके १८०८ मध्ये श्री. जनार्दन बाळाजी मोडक यांनी काव्येतिहास संग्रहात छापली होती. टीकेच्या उपसंहारातील दुसरा श्लोक मोडकांनी काव्येतिहास संग्रहात असा छापला :

*सत्पुत्र त्याचा हरिराज नामें ।*
*करी न विद्या न विधान नेमें ।*
*करूनि आर्याश्रय अर्थ त्याणें ।*
*समर्पिला रामपदीं सुखानें ।।*

''जुन्या काळी बाळबोधीत पुष्कळदा र हे व्यंजन मोडी न सारखे काढीत. वाचणारा सावध नसला तर र चे न वाचून जातो. तसे मोडकांचे या श्लोकात झाले. त्यांनी र ऐवजी न वाचला आणि ध्या चे द्या वाचायला त्यांना काहीच कठीण गेले नाही.'' पण याचा परिणाम मात्र

*करी रविध्यान विधान नेमें ।*
ऐवजी
*करी न विद्या न विधान नेमें ।*

असे छापण्यात होऊन अर्थाचा अनर्थ झाला.

१६) दुसरे उदाहरण अशुद्ध पाठामुळे अर्थच कसा होत नाही याचे आहे. ते रामदासी संशोधनवृत्तांत २०७ या बाडाची नोंद करताना देण्यात आले आहे. या बाडांत इतरांची कविता आहे, तसेच तुकारामांचे काही अभंगही त्यात आहेत. सन १८९६, सन १९०३, सन १९०८ व सन १९१२ या साली निरनिराळ्या प्रकाशकांनी तुकारामांची गाथा प्रसिद्ध केली आहे. या सर्व गाथांतून काना, मात्रा, वेलांटी अशा किरकोळ फरकाने तुकारामांचा खालील अभंग आढळतो.

*अनंत जन्में जरी केल्या तपरासी ।*
*तरी हा न पवसी म्हणे देह ।।ध्रु.।।*
*ऐसे जे निधान लागलेसे हाती ।*
*त्याची केली माती भाग्यहीना ।।१।।*
*उत्तमाचे सार वेदाचें भांडार ।*
*ज्याच्याने पवित्र तीर्थे होती ।।२।।*
*म्हणे तुकयाबंधु आणिक उपमा ।*
*नाही या तो जन्मा द्यावयासी ।।३।।*

हा अभंग लक्षावधी लोकांनी भाविकपणे वाचला आणि ऐकला असेल, पण अर्थांतरी मन न घालता भाविकपणाने केवळ पारायण करणारेच बहुतेक. पण ज्या कोणी या अभंगाचा अर्थ करण्याचा प्रयत्न केला असेल, अशांच्या मनात या अभंगात काही तरी चुकते आहे, अशी शंका आली असेल ही ''तरी हा न पवसी म्हणे देह!' म्हणजे काय? 'म्हणे देह' याचा काय अर्थ? कोण म्हणे?'' उत्तमाचे सार किंवा वेदाचे भांडार असे वर्णन कोणत्या देहाचे करतात? तीर्थांनाही ज्याच्या योगाने पवित्रपण येते, असे काय आहे? अशा शंका ज्यांना आल्या असतील, त्यांच्यापुढे सुद्धा वरीलप्रमाणे अशुद्धच अभंग टाकला, तर त्यांनी तरी त्याचा काय अर्थ करावा?

पण या संग्रहातील २०७ व्या बाडात तुकारामांचा हा अभंग आढळतो व ''या अभंगाचा जो गाभा तेवढाच नेमका अधर उडवून प्रकाशकांनी त्यास कसे निर्जीव करून सोडले आहे, हे लक्षात येते.'' २०७ व्या बाडातील तो अभंग असा -

*अनंत जन्मांतरी केल्या पुण्यरासी ।*
*तरी हा न पवसी ब्राह्मण देह ।।ध्रु.।।*
*ऐसे हे निधान लागलेसे हाती ।*
*त्याची केली माती भाग्यहीना ।।१।।*
*उत्तमाचे सार वेदाचे भांडार ।*
*ज्याचेनी पवित्र तीर्थे होती ।।२।।*

*तुका म्हणे दुजी आणिक उपमा ।*
*नाही तो या जन्मा द्यावयासी ।।३।।*

१७) महाराष्ट्राच्या कानी इतक्या विस्ताराने ही हकिकत दुसऱ्यांदा घालण्याचा हेतू असा की, आपल्या सर्व संतकवींच्या काव्यांच्या शुद्ध आवृत्त्या काढण्याची किती आवश्यकता आहे, हे महाराष्ट्राला पटावे आणि ''यापुढे कोणाही संतकवीच्या काव्याची संपूर्ण आणि शुद्ध प्रत काढावयाची झाल्यास या संग्रहाकडे वळल्यावाचून तसे करणे जवळजवळ अशक्य होईल,'' हे महाराष्ट्राच्या ध्यानी यावे.

१८) असे या संग्रहाचे थोडक्यात स्वरूप आहे. ''या बाडाला मोल नाही, याच काय, पण कोणत्याच बाडाचे मोल करता यावयाचे नाही. ही आपल्या महाराष्ट्राची बहुमोल अशी खरी संपत्ती आहे. विद्येची विलक्षण चाड आणि पूर्वजांचा निस्सीम अभिमान असलेली स्वतंत्र राष्ट्रे असली संपत्ती डोक्यावर घेऊन नाचतील. नाचतातच, आपण पाहातो आणि ऐकतो.'' असे या संग्रहाचे वर्णन, कल्याणांच्या त्या बाडाची नोंद करताना रामदासी संशोधनवृत्तांत करण्यात आले आहे आणि नुकतेच गेल्या महिन्यात आपण केसरीत वाचलेच की, शेक्सपीअरला डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या इंग्लंडात त्याच्या ग्रंथाचे एक जुने हस्तलिखित ३१०० पौंडांना नुकतेच विकण्यात आले आणि त्यापूर्वी त्याच्या अशाच दुसऱ्या हस्तलिखित ग्रंथसंग्रहाला बारा हजार पौंडांवर किंमत आलेली होती. बारा हजार पौंड म्हणजे सहज दीड लाखांवर रुपये होतील.

१९) मग ज्या संग्रहात महाराष्ट्राच्या श्रीशिवरायादी छत्रपतींची हस्ताक्षरे आहेत, खुद्द श्रीसमर्थांचे स्वदस्तुरचे पत्र आहे, त्रिभुवनात दुसरीकडे कोठे नसलेली, श्रीसमर्थांनी स्वत: लिहिलेली संपूर्ण वाल्मिकी-रामायणाची प्रत आहे, अनेक ऐतिहासिक आणि सांप्रदायिक थोर व्यक्तींची हस्ताक्षरे आहेत, इतिहासाची साधने असणारी दोन-अडीच हजार कागदपत्रे आहेत, महाराष्ट्राच्या सहाशे वर्षांच्या काळातील बहुतेक साधुसंतांची थोडीफार कविता आहे. शके ११४० ते १७४० या सहाशे वर्षांच्या काळात महाराष्ट्रातील धार्मिक विचारांचा प्रवाह कसा वाहत होता, हे कळण्याची विपुल साधने ज्या संग्रहात आहेत, अशा या संग्रहावरून पाश्चात्त्य राष्ट्रांप्रमाणे प्रत्येक गोष्टीची किंमत रुपये आणे पै त न करणाऱ्या महाराष्ट्राने आपले सारे ऐहिक वैभव ओवाळून टाकावे, असे कोणी म्हटले तर ते अगदीच वावगे होईल काय?

# इवलेसे रोप लावियेले द्वारी तयाचा वेलू गेला...



**_प्रा. सौ. व्ही. व्ही. निफाडकर_**

_सत्कार्योत्तेजक सभेचे भारतीय विद्या संशोधन केंद्र, धुळे_

समर्थ वाग्देवता मंदिरात कै. नानासाहेब देवांनी जे अमूल्य ग्रंथभांडार दीर्घ परिश्रमाने गोळा करून ठेवले आहे. त्याचा उपयोग समाजास, संशोधकांना व्हावा. त्यांच्या माध्यमातून हा ज्ञानगंगेचा प्रवाह समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत जाऊन पोहोचावा असा विचार सत्कार्योत्तेजक सभेच्या व वाग्देवता मंदिराच्या पदाधिकाऱ्यांनी केला आणि त्यातून १९९३ साली भारतीय विद्या संशोधन केंद्राची स्थापना झाली. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने मान्यता दिलेल्या केंद्राचे उद्‌घाटन त्यावेळचे कुलगुरू डॉ. नि. कृ. ठाकरे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी राज्याचे नगरविकास मंत्री श्री. अरुणभाई गुजराथी व प्रमुख पाहुणे जिल्हाधिकारी श्री. अरविंद रेड्डी होते. या उद्‌घाटन समारंभाला जोडूनच संस्थात्मक व्यवस्थापन भारतीय दृष्टिकोन या विषयावर ३ दिवसांचे चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चाला मार्गदर्शक म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्यवस्थापन क्षेत्रातील मान्यता पावलेले डॉ. तांबवेकर पूर्ण वेळ उपस्थित होते.

**अ)** भारतीय विद्या संशोधन केंद्र स्थापन करताना संस्थापकांनी काही प्रमुख उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवली होती.

१) भारतात निर्माण झालेल्या भारताच्या ज्ञानशाखांवर परिणाम करणाऱ्या सर्व विद्याशाखांचे संशोधन, प्रकाशन, प्रसारण करणे.

२) पर्यावरण समृद्ध करणे, पर्यावरण प्रदूषणासंबंधी उपाययोजना आखणे व आवश्यक ती कार्यवाही करणे.

३) कृषी, वैद्यक, शिक्षण, जलव्यवस्थापन, सामाजिक विज्ञान, मनोविज्ञान, अध्यात्म इ. शास्त्रांचा भारताच्या संदर्भात अभ्यास करणे.

४) आर्थिक विकासासंबंधी संशोधन व ग्रामीण विकास प्रकल्प राबविणे.

५) आवश्यक ते सेवाप्रकल्प उभारणे.

६) समान ध्येयांच्या अन्य संस्थांशी सहकार्य करणे व सहकार्य घेणे.

७) आवश्यक वाटल्यास स्वतंत्र ग्रंथालये, प्रयोगशाळा, संशोधन प्रकल्प, सेवाप्रकल्प, विविध संख्या, इमारतीची निर्मिती करणे.

८) संस्थेच्या कामांसाठी बीज भांडवल रूपाने संपत्ती गोळा करणे व तिचा विनिमय करणे.

९) वैज्ञानिक, आध्यात्मिक, सामाजिक संशोधनाकरिता शिष्यवृत्ती, पुरस्कार देणे.

१०) देशप्रेम, संस्कृतिवर्धन, विज्ञानदृष्टी, राष्ट्रीय एकात्मता संबंधात सक्रिय सहभाग घेणे.

**आ)** या संस्थेतर्फे जे विशेष उपक्रम राबविण्यात आले ते थोडक्यात खालीलप्रमाणे -

१) १९९२-९३ - राज्यस्तरीय व्यवस्थापन परिषद कुलगुरू (उ.म.वि.), राज्य शिक्षणमंत्री यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

२) १९९३-९४ - चर्चासत्र- सुशिक्षित महिलांची सामाजिक स्थिती.

३) १९९४-९५ - भारतीय घटना - चर्चा - प्रदर्शन.

४) १९९५-९६ - ग्रंथालय संघ अधिवेशन, पुस्तक प्रकाशन- राज्यस्तरीय.

५) १९९६-९७ - पर्यावरणसंबंधी प्रकल्प, धुळे जिल्हा पर्यावरण व मानवीसंबंध - केंद्रास सादर.

६) १९९७-९८ - विज्ञान भारती अधिवेशन, जलव्यवस्थापन, महिला व विज्ञान, वित्त, पारंपरिक विज्ञान- राज्यस्तर.

७) १९९८-९९ - क्लोनींग/ टिश्यूकल्चर- व्याख्यान.

८) ९९-२००० - १) पर्यावरण समस्या निबंध स्पर्धा.

९) २०००-०१ - २) वैद्यकीय कचरा- जैविक/ अजैविक परिसंवाद.
३) गणिती यांचा सहभाग.

१०) २००१-०२ - पंचकोष व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प, वनवासी कल्याण आश्रम पथदर्शी प्रकल्प.

११) २००२-०३ - भारतीय मानसशास्त्र अखिल भारतीय मानसशास्त्र परिषद वेगवेगळ्या विद्यापीठांतील कुलगुरू, प्राचार्य, प्राध्यापकांचा सहभाग - राष्ट्रीय स्तर या परिषदेचे फलित म्हणजे विद्यापीठात भारतीय मानसशास्त्र हा विषय पदव्युत्तर स्तरावर सुरू करण्यात आला.

१२) २००३-०४ - दिलासा मार्गदर्शन केंद्र - पालक व विद्यार्थी यांच्या दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी आणि समस्येमुळे निर्माण होणारा ताण सुसह्य करण्यासाठी माध्यमिक शाळांशी संपर्क साधून समुपदेशन केंद्र संस्थेने तयार केले. ते आजतागायत यशस्वीपणे चालू आहे. संस्थेने मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र समुपदेशन कक्ष निर्माण केला आहे. या केंद्रामार्फत समाजातील विविध स्तरांतील व्यक्ती विविध समस्या घेऊन या केंद्रात येतात आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने समस्या सुटण्यास मदत होते. हा उपक्रम वर्षभर राबविला जातो. यासाठी श्री. डॉ. जी. बी. चौधरी तज्ज्ञ मार्गदर्शक, केंद्राचे अध्यक्ष डॉ. एस. टी. जोशी आणि संचालिका प्रा. सौ. निफाडकर हे सतत प्रयत्नशील असतात.

१३) २००३-०४ - शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम - मुक्त विद्यापीठ, नाशिक शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, प्राध्यापक, शिक्षक यांना व्यवस्थापन कौशल्य चांगल्या प्रकारे अवगत व्हावे व त्या कौशल्याचा त्यांच्या दैनंदिन कामकाजात उपयोग व्हावा यासाठी संस्थेने यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या सहकार्याने अभ्यासक्रम तयार केला. तो २००४ पासून सुरू झाला. आज त्याला शिक्षकांची प्रवेशाची गर्दी असते. संस्था हा अभ्यासक्रम उत्तम रीतीने राबवीत असल्याने भविष्यातही या अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वाढता राहील, यात शंका नाही.

१४) २००४-०५ - विज्ञान वार्तालाप
जागतिक कीर्तीचे प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. जयंतराव

नारळीकर व सौ. मंगलाताई नारळीकर यांनी संस्थेला भेट दिली. त्या निमित्ताने धुळे शहरातील शाळा व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांशी विज्ञान वार्तालापांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

१५) २००५-०६ - D.S.M. - च्या वर्गाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने मुक्त विद्यापीठ कुलगुरू व प्रतिनिधींची संस्थेला भेट- कुलगुरूंच्या हस्ते Glimes of Indian Psychology या मासिकाचे प्रकाशन.

१६) २००६-०७ - युनोच्या लर्निंग टू बी या जागतिक पाहणीच्या अहवालात असे म्हटले आहे की, सन २०२० पर्यंत जगातील शे. ४०-५० टक्के लोक मनोरुग्ण अवस्थेच्या दिशेने जात असतील आणि त्यांना मानसिक समुपदेशनाची गरज भासेल. भारतीय विद्या संशोधन केंद्र ही सामाजिक बांधीलकी जपणारी संस्था असल्याने भविष्यकाळातील परिस्थितीवर मात करण्यासाठी समुपदेशन करणारे समुपदेशक (कौन्सिलर) आपण निर्माण करावेत या भावनेतून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न असलेले दोन कोर्सेस १) सर्टिफिकेट जो १२ वी नंतरच्या विद्यार्थ्यांसाठी, २) पी. जी. डिप्लोमा इन सायकॉलॉजिकल कौन्सिलींग असे दोन अभ्यासक्रम तयार केले आहेत. या अभ्यासक्रमांना आज विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद आहे.

१७) २००९-१० - आत्मभावी व्यवस्थापन (Spiritual Management)
भारतीय विद्या संशोधन केंद्राने १७, १८ जुलै २०१० या दोन दिवसांत सज्जनगडावर परळी नागरी सहकारी बँकेच्या सहकार्याने बँकांमधील अधिकारी वर्गासाठी आत्मभावी व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेत उद्बोधन करण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शकांना बसविले होते. या कार्यशाळेच्या यशस्वितेनंतर इतर अनेक ठिकाणाची बोलावणी कार्यशाळेच्या आयोजनासाठी संस्थेला आली आहेत. केंद्र आत्मभावी व्यवस्थापनाचा स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करीत आहे.

१८) २०१०-११ - वाल्मिकी रामायण परिषद - वाल्मिकी रामायण ही संस्थेची अधिष्ठात्री देवता आहे. समर्थ रामदासांनी १२, १३ व्या वर्षी टाकळीला लिहिलेल्या वाल्मिकी रामायण ग्रंथाचे आजच्या काळात संशोधन व्हावे. जगातील इतर वाल्मिकी रामायणाच्या प्रतींबरोबर त्याचा तौलनिक अभ्यास व्हावा, आजच्या काळात वाल्मिकी रामायणाची भाषा ही लोकांना समजण्यास कठीण वाटत असल्याने शुद्ध सोप्या भाषेतील संस्कृत वाल्मिकी रामायण सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचावे आणि भारतीय संस्कृतीचा हा अमूल्य ठेवा लोकांच्या नित्य वाचनात असावा या हेतूने आंतरराष्ट्रीय स्तरावर ग्रंथाचे संशोधन, संकलन व प्रकाशन करण्याचा संकल्प आहे. या प्रकल्पात संस्कृत भाषेतील गाढे विद्वान मदत करीत आहेत. त्यातील पहिला टप्पा म्हणून १३, १४ ऑगस्टला पहिली वाल्मिकी रामायण परिषद आयोजित करण्यात आली. पुढील कामही वेगाने सुरू आहे.

**प्रकाशने –**

१) पंचकोषात्मक व्यक्तिमत्त्व विकास - लेखक डॉ. सो. त्र्यं. जोशी

भारतीय दृष्टिकोनातून मनुष्य हा निसर्ग व समाजाचा एक घटक असल्यामुळे व्यक्तिमत्त्व विकास साधताना स्वत:ची गुणसंपदा व समाज, निसर्गातील घटकांशी योग्य समन्वय कसा साधता येईल याचे प्रयोगासहित वर्णन यात केलेले आहे.

२) संस्थेने आयोजित केलेल्या अखिल भारतीय मानसशास्त्र परिषदेत जे प्रबंध वाचले गेले त्या प्रबंधाचे संकलन करून संदर्भग्रंथ तयार केला आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांना संदर्भग्रंथ म्हणून लावलेला आहे.

**भावी योजना –**

आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या संस्थांच्या सहकार्याने काम करणे हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून खालील उपक्रम संस्थेतर्फे सुरू होणार आहेत.

१) मंत्र- यंत्र- तंत्र व मानसोपचार -
हरिद्वार येथील चतुरंग आखाडा प्रमुख डॉ. देशपांडे यांच्या सहकार्याने या विषयातील संस्थेच्या संग्रही असलेल्या बाडांचा अभ्यास करणे.

२) ऊर्जा व्यवस्थापन :
व्यक्तीचे कार्य त्याच्या अंगी असलेल्या ऊर्जाशक्तीच्या विकसनावर व तिच्या योग्य विनिमयावर अवलंबून असते. अशीच ऊर्जा अंतरिक्षात व निसर्गात असते. या विश्वचैतन्याचा, ऊर्जेचा अभ्यास व त्याचा व्यक्तिमत्त्व विकासासाठी कसा उपयोग करून घेता येईल असा अभ्यास त्रिपदी परिवार- डॉ. प्रदीप तराणेकर, इंदौर यांच्या सहकार्याने करणे.

३) मानसशास्त्रीय समुपदेशन यासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा असावी. P.G. डिप्लोमाच्या अभ्यासक्रमासाठी सुसज्ज ग्रंथालय असावे. विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र अभ्यासिका असावी.

४) दिलासा मार्गदर्शन केंद्रामार्फत इथे सतत समुपदेशन (counseling) केले जाते त्यासाठी साऊंडप्रुफ खोली असावी. पालकांना, समस्याग्रस्त व्यक्तीबरोबर आलेल्या व्यक्तींना बसण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी.

५) इथे शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विद्यार्थिनींची संख्या लक्षणीय असते. तरी या विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र लेडीज रूम व अटॅच टॉयलेट असावे.

६) गाईडन्ससाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना बसण्यासाठी व प्रत्यक्ष गायडन्ससाठी स्वतंत्र केबिन असावी.

संस्थेने स्थापनेच्या वेळी ठरविलेली उद्दिष्टे जास्तीत जास्त साध्य करण्याचा प्रयत्न संस्थेचे कार्यकर्ते अविरत करीत आहेत. आमची भविष्यातील मोठी स्वप्ने ही आहेत. ती नुसतीच बोलून दाखविण्यापेक्षा ती सत्यात उतरविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत राहाणे हेच आमचे कर्तव्य समजतो व यासाठी समर्थांकडून प्रेरणा घेऊन हा संशोधन प्रवाह सतत विकासाच्या दिशेने वाहत राहावा यासाठी समर्थांचेच आशीर्वाद मागतो आहोत.

शेष समर्थ कृपा.

# श्री हनुमंत स्वामीकृत श्री समर्थांची बखर

## प्रस्तावना

***गणेश शंकर देव***

### १) या बखरीचे महत्त्व

आपल्या त्रिखंडात्मक श्री समर्थ चरित्राच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ''श्री समर्थावतार'' या प्रथम खंडातील ''ग्रंथारंभ'' या प्रकरणात आधारभूत ग्रंथांना नमन करताना ती शंकर श्रीकृष्ण ऊर्फ नानासाहेब देव यांनी प्रथम स्थान या बखरीला दिले आहे. त्या ठिकाणी ३ ते ६ या परिच्छेदात ती नानासाहेब लिहितात :

''(३) श्री हनुमंत स्वामीकृत श्रीसमर्थांच्या बखरीचे मजवर अनंत उपकार आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या तिचे प्रामाण्य कसेही असो, प्रथम तिने माझे मन श्री समर्थ चरणांकडे वेधून घेऊन मला कायमचे ऋणी करून ठेवले आहे. तुमच्याप्रमाणेच मीही ती सर्वस्वीच प्रमाण मानतो असे नव्हे, पण म्हणून मी तिला दूर सारीत नाही. बडोदे येथील लक्ष्मण महाराजांच्या मठातील आचार विचारवान निष्ठावंत रामदासी कै. दादामहाराज मला एकदा म्हणाले, तेच मी सर्वांना सांगेन. दादामहाराज म्हणाले, जसे रोज श्रीमत् ग्रंथराज दासबोधातील दोन समास आणि श्री श्लोक मनाचे अकरा नित्य नियमाने वाचावयाचे, तसाच प्रत्यही नियमाने बखरीतील काही भाग क्रमश: वाचीत जावा. मीही सर्वांना नम्रतापूर्वक सुचवीन की काय चिकित्सा करावयाची असेल, ती पुढे करा, आधी भक्तिभावाने बखर वाचा, ती वाचून श्रीसमर्थचरणी तुमचे भक्तिप्रेम जडले, म्हणजे मग करवेल तितकी चिकित्सा साऱ्या जन्मभर करा, त्या चिकित्सेने तुमचे भक्तिप्रेम दृढावतच जाईल, पण आपण आधीच संशयवृत्तीने चिकित्सा करू लागू, तर श्रीसमर्थ आपणांकडे पाठ फिरवितील आणि त्यांचे चरण मात्र आपणांस दुरावतील.

४) श्री समर्थ वाग्देवता मंदिरात बखरीच्या ज्या अनेक प्रती आहेत, त्या पाहून असे दिसते की, या बखरीवर वेळोवेळी अनेक संस्कार झाले असावेत. ही बखर रचली गेली तेव्हापासूनच तिच्यावर आक्षेपही घेण्यात आले होते, असे बाडांक ३९६ मधील एका पत्रावरून दिसते. पण हे सर्व खरे असले तरी बखरीत वर्णन केलेले सर्व प्रसंग, दिलेल्या शकमित्या, सांगितलेल्या सर्व गोष्टी केवळ निराधार आणि काल्पनिक असतील, असे मानणे कठीण आहे. माझ्या अल्प मतीला पटेल, तेथे मी बखरीला शरण जाऊन तिचा आधार घेणार आहे.

५) ऐतिहासिक पुराव्यांत बखरीपेक्षा कागदपत्रांचे महत्त्व विशेष होय, असे प्रतिपादण्यात येत असते. हे प्रतिपादन मला सर्वस्वी मान्य करवत नाही. आज जगात

सर्वत्र चाललेले राजकारण आपण पाहातच आहोत. तसेच त्याचे स्वरूप पूर्वकाळातही असले पाहिजे. राजकारण सर्वकाळी सारखेच असणार. राजकीय धोरणामुळे कागदपत्रांतील मजकूर खराच असतो, असे आजचे राजकारण पाहून आपणास खात्रीने म्हणता येईल काय? तीच कथा सर्व काळ्या राजकारणी कागदपत्रांची. ते काही असो, मला स्वत:ला कागदपत्रांइतक्याच बखरीही महत्त्वाच्या वाटतात. बखरींची भाषा, ही मला जिवंत वाणी वाटते. ती जिवंत माणसांनी जिवंत लोकांसाठी लिहिलेली असते. कोणतीही एखादी पूर्वकालीन बखर घ्या आणि हल्लीच्या काळात जे ऐतिहासिक ग्रंथ लिहिले गेले आहेत किंवा लिहिले जात आहेत, त्यांच्याशी ताडून पाहा. तुमच्या तत्काळ लक्षात येईल की, एकाची वाणी जिवंत माणसाची असते, तर दुसऱ्याची मेलेल्या माणसाची असते. स्वातंत्र्य हे जिवंतपणाचे लक्षण होय व पारतंत्र्य म्हणजे मृत्यूच. स्वातंत्र्यात सत्य निर्भय असते, पारतंत्र्यात सत्यकथनाला भ्यावे लागते. स्वातंत्र्यात मन मोकळे असते, पारतंत्र्यात त्यावर दडपण पडलेले असते.

स्वातंत्र्याच्या काळात बखरी लिहिल्या गेलेल्या असल्यामुळे वाचकांच्या मनाला त्या फार चटका लावतात. हनुमंत स्वामीकृत बखरीची गोडी आमच्या भाषेत केव्हाही येणे शक्य नव्हे. आम्ही मेलेली माणसे. आताशी कोठे जिवंत होऊ पाहात आहोत. श्रीसमर्थांचीच बखर असे नव्हे, तर स्वतंत्र काळात लिहिलेली कोणतीही बखर पाहा व अलीकडच्या काळातील कोणत्याही लेखकाच्या ऐतिहासिक लिखाणाशी ती ताडून पाहा, म्हणजे दोहोंतला फरक सहज दिसून येईल. हा दोष हल्लीच्या लेखकांचा, तुमचा, माझा किंवा आणखी कोणाचाही नसून तो भिन्न परिस्थितीचा परिणाम होय.

६) तात्पर्य, हनुमंत स्वामीकृत बखरीला माझे शतश: प्रणाम आहेत. तिची भाषा फार मोहक आहे. श्रीसमर्थ कार्यात माझा जन्म तिच्या पोटी झाला, याचा मला केव्हाही विसर पडत नाही. मी तिला माझी आई मानतो. आईच्या कुशीत निजताना बालकाला जो निरतिशय आनंद होत असतो, त्याचा अनुभव बखर वाचीत असता मला येत असतो.

## २) ही प्रत

अशी ही बखर म्हणजे श्री समर्थ वाग्देवता मंदिरातील बाडांक १८५२ होय. ती प्रकाशित करण्याचा योग सभेला आज आला. मात्र "श्रीसमर्थावतार" ग्रंथाच्या परिशिष्टातील "बखरीवरून शकावली" हे परिशिष्ट ती. नानासाहेबांनी या प्रतीवरून केलेले नव्हे. सुमारे ६०-६१ वर्षांपूर्वी शके १८१० मध्ये यदुवंशीय ठक्कर गोवर्धनदास लक्ष्मीदास यांनी मुंबई येथे जगदीश्वर छापखान्यात छापून प्रसिद्ध केलेल्या बखरीच्या दुसऱ्या आवृत्तीवरून त्यांनी ती शकावली तयार केली आहे. बखरीची पहिली आवृत्ती त्याही पूर्वी १८ वर्षे म्हणजे शके १७९२ मध्ये निघाली होती.

बाडांक १८५२ ती. नानासाहेबांना आंबड येथील रा. विनायकराव देशपांडे यांचेकडून मिळाले. त्या बाडाची शके १८३२ चैत्र शुद्ध १५ ला तयार केलेली नकल आम्हांस आयती मिळाली. ती नकल मुळाबरोबर ताडून पाहून आता प्रसिद्ध होत आहे.

वास्तविक श्री समर्थ वाग्देवता मंदिरातील या बखरीच्या इतर प्रतींबरोबर ही प्रत ताडून पाहून आढळणारे विशेष येथे देता यावयास हवे होते, पण ते होऊ शकले नाही. इतके मात्र खरे की, या प्रकाशनाने आम्ही मात्र एका ऋणातून मुक्त होत आहोत.

# ।। श्री दिनकरबुवा रामदासी यांचे स्मरण ।।



***मारुती बुवा रामदासी***

*मु.पो.सज्जनगड-सातारा*

श्री दिनकरबुवा रामदासी बिवलकर हे कोकणातील नांदिवडे या गावातील होते. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये नांदिवडे हे गाव छोटेसे आहे. अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर असलेल्या या लहानशा गावात श्री सितारामपंत बिवलकर राहात असत. या बिवलकर घराण्यात सन १९११ साली नांदिवडे येथेच श्री दिनकरबुवा रामदासी यांचा जन्म झाला. त्यांचे बालपण नांदिवडे येथेच गेले. नंतर त्यांचे शालेय शिक्षण लौकिकदृष्ट्या मॅट्रिकपर्यंत यशस्वी झाले होते. शिक्षणाच्या कालावधीत ते स्वत: भगवद्गीता, श्री मनाचे श्लोक या दोन ग्रंथांचा अभ्यास करीत होते. श्री माधवशास्त्री शेंड्ये यांचेकडे जाऊन श्री गीता पठण आणि मनोबोधाचा अभ्यास करीत असत. शालेय शिक्षणाबरोबर धार्मिक ग्रंथांचा अभ्यास सुरू असल्यामुळे त्यांच्या विचारांची दिशा सहजच देवाधर्माकडे होती. आता आपल्या पुढच्या जीवनामध्ये आपण काय करावयाचे, कोणता मार्ग स्वीकारावयाचा, प्रवृत्तिमार्ग की निवृत्तिमार्ग याचा विचार सुरू झाला. दिनकरबुवा हे मूळचे गणपतीभक्त असल्यामुळे त्यांना गणपतीकडून या प्रश्नाचे उत्तर हवे होते. एक दिवस ते स्वत: गणपतीपुळ्याला गेले आणि गणपतीच्यासमोर बसून गणपतीची उपासना केली. नंतर गणपतीसमोर गणपतीच्या साक्षीने निवृत्तिमार्ग स्वीकारावयाचा हे निश्चित ठरविले. संध्याकाळी ते नांदिवड्यास परत आले. दुसरे दिवशी श्री दिनकरबुवांनी हे वृत्त आपल्या मोठ्या बंधूंना सांगितले. आता मी माझे सर्व जीवन परमेश्वराच्या सेवेकरिता वाहून घेणार आहे. परमार्थ करण्याकरिता तीर्थक्षेत्रावर जाणार आहे. दिनकरबुवांनी योग्य असा शुभदिवस पाहून घर सोडले आणि कोकणातून ते देशावर आले.

सातारा जिल्ह्यामध्ये कृष्णातीरी 'धोम' या नावाचे एक क्षेत्र आहे. त्या ठिकाणी पेशव्यांनी स्थापन केलेले नरसिंहाचे मंदिर आहे. श्री दिनकरबुवा हे सर्वप्रथम त्या नृसिंहाच्या मंदिरात राहून उपासना करू लागले. सकाळी जप करावा. नंतर गीता, मनाचे श्लोक वाचावेत, थोडेफार आत्मचिंतन करावे. माध्यांन्ही माधुकरी आणून भोजन करावे. ते धोमक्षेत्री असे दोन वर्षे राहिले होते. श्री समर्थ म्हणतात- साधकालाही देहप्रारब्ध भोगावेच लागते. ''ज्या ज्या वेळी जे जे होईल ते ते भोगावे। विवेकाला विसरूनी आपण कष्टी का व्हावे'' इ. सन १९४८ सालच्या राजकीय घडामोडीमुळे, त्या अस्वस्थतेमुळे ब्रह्मवृदांच्या घरी माधुकरी मिळणे कठीण झाले होते. अशा कठीण प्रसंगी श्री दिनकरबुवांना धोमक्षेत्र सोडावे लागले. श्री दिनकरबुवांनी धोमक्षेत्र सोडले आणि सन १९४८ साली सज्जनगडावर येऊन पोहोचले. त्यावेळी श्रीधरस्वामी महाराज सज्जनगडावर होतेच. श्रीधरस्वामीच्या

सांगण्यावरून श्री दिनकरबुवांनी सज्जनगडावरील श्री समर्थ सेवेत भाग घेतला. श्री समर्थ सेवेला सुरुवात झाली. त्यावेळी गडावरील व्यवस्था थोडी विस्कळीतच झालेली होती. श्रीधरस्वामींच्या प्रेरणेने त्याठिकाणी एक उपासना केंद्र सुरू झाले. त्या केंद्रामध्ये श्रीधर स्वामीजी, श्री बालाजीबुवा, श्री नारायण बुवा गोडसे, श्री दत्ता बुवा रामदासी, श्री नारायणबुवा मुळे, श्री दिनकरबुवा रामदासी, श्री कल्याण सेवक, श्री बाळकृष्णबुवा कुलकर्णी, श्री आण्णाबुवा कालगावकर ह्या मंडळींनी सांप्रदायिक उपासना चालविली होती. पुढे श्री समर्थ कार्याचा विस्तार वाढविण्यासाठी एक मोठी संघटना असावी म्हणून श्री श्रीधर स्वामीजींच्या प्रेरणेने सन १९५० साली श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड या संस्थेची स्थापना झाली. श्री बाबुराव वैद्य यांनी पुढाकार घेऊन या संस्थेचे रजिस्ट्रेशन करून सरकार दरबारी नोंद केली. याच काळात श्री माधवराव हिरळीकर, श्री कल्याण सेवक, श्री अय्याबुवा रामदासी, श्री नारायण बुवा करमरकर, श्री गोविंद बुवा गोडसे, श्री भास्करबुवा रामदासी ही मंडळी संस्थेत आली होती. श्री समर्थ सेवा मंडळ या संस्थेचा कार्यारंभ व्यवस्थित सुरू झाला. या संस्थेचे प्रथम अध्यक्ष श्री बाबूरावजी वैद्य, प्रथम खजिनदार श्री माधवराव हिरळीकर, प्रथम कार्यवाह श्री दिनकरबुवा रामदासी अशी ही मंडळी होती.

श्री दिनकरबुवा रामदासी यांचे व्यवस्थापन सुरू झाले. श्री समर्थ समाधीची पूजाअर्चा, महानैवेद्य आणि दैनंदिन उपासनेचा क्रम लावून त्या जबाबदाऱ्या सेवक वर्गावर सोपवण्यात आल्या. श्री दिनकर बुवांनी श्री समर्थ मठ, मंदिर, भांडारगृह ह्या इमारतींचा जीर्णोध्दार सुरू केला. अशोक बागेत दगडी फरसबंदी करण्याचे काम सुरू झाले. श्री सज्जनगड ते परळी ह्या पायऱ्या बांधण्याचे काम सुरू झाले. सर्व बाजूंनी कामे सुरू केल्यामुळे श्री समर्थ भक्तांचा उत्साह वाढला होता. बाहेरच्या समर्थ भक्तांकडून उत्तम प्रतिसाद मिळत होता. श्रीधर स्वामीजींनी आणि श्री बाबुराव वैद्य यांनी खूप पैसा गोळा करून दिला होता. पाच-दहा वर्षातच सज्जनगडाचा कायापालट झाला. ऊर्जितावस्था प्राप्त झाली. या सर्वांमध्ये श्री दिनकरबुवा रामदासी यांचे श्रम अत्यंत महत्त्वाचे होते. श्री दिनकरबुवा रामदासी हे अत्यंत कुशाग्र बुद्धीचे होते. ते स्वत: बांधकाम विभागातील तज्ज्ञ असल्यामुळे गडावरची बांधकामे उत्तम झाली आहेत.

श्री दिनकरबुवांच्या स्वभावात धीरगंभीर एक प्रकारची शांतता होती. ते स्वत: उत्तम साधक होते. श्री दिनकरबुवांनी श्रीधर स्वामीजींचा अनुग्रह घेऊन त्यांचे शिष्यत्व स्वीकारले होते. परमार्थ मार्गातील अध्यात्मज्ञानाचे मार्गदर्शन श्रीधर स्वामींच्याकडूनच घेतले होते. त्यामुळे श्री दिनकरबुवांची आध्यात्मिक भूमिका अतिउत्तम होती. श्री दिनकर बुवांनी श्रीधरस्वामींच्या बरोबर राहून वेदांताचा अभ्यास केला होता. स्वत:ची साधन उपासना, आध्यात्मिक आत्मचिंतनाचा अभ्यास असल्यामुळे त्यांचा अंतर्मुख परमार्थ उत्तम प्रगत होता. श्रीधर स्वामींच्या कृपेने श्री दिनकरबुवा हे आत्मानुभवापर्यंत पोहोचले होते. त्यामुळे त्यांच्या स्वभावात शांतता, गांभीर्य आणि समंजसपणा दिसून येत होता. श्री दिनकरबुवांनी श्री समर्थ सेवा मंडळाच्या कार्याचा व्याप खूपच वाढविला होता. सज्जनगड मासिक पत्रिका, ग्रंथप्रकाशन विभाग, श्री समर्थ पादुका प्रचार दौरा, पत्रद्वारा दासबोध अभ्यास वर्ग, तरुण साधक मंडळींची संघटना असे अनेक उपक्रम तयार केले आणि राबविले. श्री दिनकरबुवा रामदासी यांनी जीवनभर जे आपले योगदान दिले त्याबद्दल श्री समर्थ सेवा मंडळ ही संस्था त्यांची ऋणी आहेच. श्री दिनकरबुवा रामदासी हे या संस्थेचे कार्यवाह म्हणून तीस वर्षे या पदावर कार्यरत होते. शेवटी वयाच्या पासष्ठीनंतर किरकोळ आजाराने शांत झाले. एकोणऐंशी सालच्या चैत्र वद्य एकादशी दिवशी त्यांनी आपला देह सोडला.

कै. दिनकरबुवा रामदासी यांना भावपूर्ण नमस्कार करून मी इथेच थांबतो.

# प.पू. अण्णाबुवा कालगावकर



***नीला अभ्यंकर***

*कुमार परिसर, बी ३, कोथरुड, पुणे २९*

**श्रीरामसमर्थ**

*जाणावा तो नर देवचि साचार । वाचे निरंतर रामनाम ॥१॥*
*सगुणी सद्‌भाव नाही ज्ञानगर्व । तया लागी सर्व सारिखेचि ॥२॥*
*निंदकां वंदकां संकटी सांभाळी । मन सर्व काळी पालटेना ॥३॥*
*पालटेना मनी परस्त्रीकांचनी । निववी वचनीं पुढिलांसी ॥४॥*
*पुढिलांसी नाना सुखे देत आहे । उपकारी देहे लावितसे ॥५॥*
*लावितसे देहे रामभजनासी । रामी रामदासी हरिभक्ति ॥६॥*

या अभंगाप्रमाणे आचरण शुद्ध, सात्त्विक, तेजस्वी, कामक्रोध लोभरहित असे त्यागी, रामनामांत दंग असणारे स.भ.प.पू. गुरुवर्य आण्णाबुवा कालगावकरांचे जीवनचरित्र आपण थोडक्यात पाहाणार आहोत. आण्णांचे घराणे मूळचे कर्नाटकातील अथणी तालुक्यातील. मूळ आडनाव खुपेरकर. आण्णांचे घराणे विद्वान पंडितांचे. गुरुघराणे म्हणून लौकिक होता. सरस्वतीप्रमाणे लक्ष्मीही पाणी भरत होती. संपूर्ण महाभारत मुखोद्‌गत असणारे शामाचार्य खुपेरकर, त्यांचे पणजोबा, त्यांचा मुलगा गोपाळाचार्य, त्यांचे पुत्र नृसिंहाचार्य. आण्णाबुवा त्यांचे चिरंजीव. पुढे ते कालगावला येऊन कालगावकर झाले. १९०३ साली १० जानेवारी पौष शुद्ध १२ शके १८२४ साली आण्णांचा जन्म झाला. त्यांचे नाव शामाचार्य ठेवले होते. लहानपणापासून रामनामाची आवड. इतर मुलांप्रमाणे विटीदांडू, लगोऱ्या खेळ खेळलेच नाहीत. वयाच्या ११ व्या वर्षी त्यांनी आजन्म ब्रह्मचर्याची शपथ घेतली व ते व्रत नैष्ठिकपणे जन्मभर पाळले. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण औंधला झाले. ब्रह्मलीन नारायणबुवा रामदासी यांच्याकडून त्यांनी अनुग्रह घेऊन समर्थ संप्रदायाचा स्वीकार केला. घरात साधना होणार नाही हे जाणून एका वस्त्रानिशी ते नाशिकला गेले. अंधाऱ्या रात्री एकाने हात धरून पंचवटीला नेऊन सोडले. स्वत:ला रामाचा स्पर्श झाला, रामानेच बोट धरून पंचवटीत आणले असा त्यांचा पूर्ण विश्वास होता. पुढे ते मुंबईला डॉ. भडकमकरांच्या आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजला गेले. पण देशाच्या दु:स्थितीबद्दल अस्वस्थ होऊन त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेतली व कॉंग्रेसमध्ये एक स्वयंसेवक म्हणून प्रवेश केला. महात्मा गांधी, आचार्य काका कालेलकर, पुंडलिकजी कातगडे, पॉल रिचर्ड ह्यांच्यासारख्यांचा स्निग्ध संबंध त्यांना लाभला. असे कार्य कितीही महान असले तरी बहिर्मुखता वाढते व ध्येयापासून दूर जातो असे जाणून ते सावध झाले व राजकीय व्यापातून मुक्त झाले. आंगापूर, मसूर, सज्जनगड, हरिद्वार, हृषिकेश, पंढरपूर, कालगाव, सांगली या क्षेत्रांतील सांप्रदायिक मठांमध्ये कठोर तपश्चर्या केली. वयाच्या १८ व्या वर्षापासून श्रीमद् भागवताची १०८

पारायणे आणि प्रतिदिन १ याप्रमाणे श्री दासबोधाची ११३ पारायणे करून निराहार व ध्यानधारणा यात उमेदीचा काळ व्यतीत केला. देहदंडाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी एक आठवडाभर बाभळीच्या झाडावर बसून कठोर साधना केली. या साधनेचे फळ त्यांना अभयसिद्धी रूपाने मिळाले. जप सुरू असताना सापाच्या बिळात हातातील जपाची माळ पडली. जपात खंड पडेल हे जाणून त्यांनी बिळात हात घालून माळ हस्तगत केली. तारुण्यात पदार्पण करण्यापूर्वी त्यांनी वैराग्याशी सख्य जोडले व प्रापंचिक मोहापासून स्वत:ला निर्धाराने दूर ठेवले. पण ईश्वराने त्यांची परीक्षा पाहिली. बंधूच्या निधनामुळे सर्व घराचा भार त्यांच्यावर येऊन पडला. उत्तम शेती केली. निरासक्तपणे भावाचा संसार मार्गी लावून दिला. पुतण्यांचा प्रपंच नेटका करून देत असताना त्यांनी आपला परमार्थविवेक सोडला नाही. त्यांच्या आध्यात्मिक ग्रंथांच्या व्यासंगाने व चिंतनाने त्यांना सर्व बंधनांपासून निर्लेप राहाण्याचे मनोबळ दिले हे निश्चित. बुवांचे वाठार, अष्टा त्र्यंबकवाडी ह्या ठिकाणी गायत्रीची चार पुरश्चरणे केली त्यावेळी पारमार्थिक खूप अनुभव आले. तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'काय सांगो झाले । काहीचिया बाही' असा अवर्णनीय आनंद झाला. पुढे १३ कोटी रामनामाचा जप पूर्ण केला. सीना नदीच्या काठी असणाऱ्या कल्याण स्वामींच्या डोमगावला उपासना केली. नदीला खूप पूर आला तेव्हा आण्णांनी नदीची पूजा खणानारळाने ओटी भरून केल्यावर पूर ओसरला. कल्याणस्वामींनी स्वहस्ते लिहिलेल्या दासबोधाच्या प्रतीचे पारायण ३ दिवसांत आण्णांनी केले. दासबोध हाताळून खराब होईल म्हणून व्यवस्थापक यशवंतराव ती प्रत द्यायला तयार नव्हते, पण कल्याणस्वामींनी स्वप्नात आज्ञा दिल्याने व्यवस्थापकांना तो दासबोध द्यावा लागला. त्र्यंबकवाडी हे ठिकाण अष्टेपासून ५ मैल दूर- तिथे एकांतात साधना केली. माधुकरी मागायला जवळपास गाव नव्हते. पण 'ज्याचा सखा हरी त्यावरी विश्व कृपा करी' त्याप्रमाणे एकजण १/२ शेर दूध व ज्वारीचे पीठ आणून द्यायचा, दशम्या व दूध असा सात्विक आहार. रोज किमान १० तास बसून १० हजार जप करायचा असा निर्धार होता. नदीत मगरी खूप होत्या. पण चित्त शुद्धतरी । शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती । सर्प तया । अशी स्थिती होती. ऐनापूरला कवीश्वरशास्त्रींचा सत्संग मिळाला. त्यांच्याबरोबर महाभारताचे पारायण केले. रामाचार्य नावाच्या महापंडितांकडून ब्रह्मसूत्रातील भाष्य व टीका समजावून घेतली. मनात योजल्याप्रमाणे नियमित साधना होत होती. पहाटे ३-३॥ ला उठून स्नानाला जाताना रस्ता निर्मनुष्य पण 'तो जवळ आहे' हा भाव पक्का असल्याने भय कधी वाटले नाही. साधनाकाळात पूर्ण मौन पाळले, तेल-साबणाचा कधीच वापर केला नाही. साधकाची दशा । उदास असावी । उपाधी नसावी । अंतर्बाह्य ॥ ह्या तुकोबांच्या सांगण्याप्रमाणे वागणे होते. गुरुवर्य सोनोपंत दांडेकर, माध्वपीठाचे जगद्‌गुरू सत्यध्यानतीर्थ, प. पू. वरखेडकर, प. पू. धुंडामहाराज, बंडा महाराज, धारकरशास्त्री इत्यादी संतांचा संग बरेच दिवस मिळाला. दासगणू महाराजांना पंढरपूरला शांडिल्यभक्तिसूत्र समजावून सांगितली. पुढे सज्जनगडावर प. पू. श्रीधरस्वामींशी निकटचा संबंध आला. जवळजवळ ८ दशके व्रतस्थ राहून त्यांनी आपली साधना निर्विघ्नपणे पार पाडली. जणू त्यांच्या साधनेने सहस्रचंद्रदर्शन सोहळा पाहिला. समर्थांनी सांगितलेली उत्तम पुरुषांची लक्षणे त्यांनी अंगी बाणली होती. समर्थ सेवा मंडळाच्या स्थापनेपासून ५० वर्षे ते समर्थ सेवा मंडळाचे अध्यक्ष होते. समर्थबोध प्रसादरूपाने समाजात वितरीत करण्यासाठी त्यांनी सज्जनगड मासिकात वेळोवेळी लेख लिहिले व संपादकत्व स्वीकारले. समर्थ सदन साताऱ्याला स्थापण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. चाफळचे राममंदिर मफतलालांनी बांधले. मंदिर बांधण्याच्या वेळी आण्णा चाफळलाच राहायचे. जांबची श्रीसमर्थांची मूर्ती, शिवथरघळीतील रामसीतेच्या मूर्ती श्रीधरस्वामींबरोबर

जाऊन त्यांच्या उपस्थितीत प्रतिष्ठापना झाली. अनेक वर्षे चाफळचा रामनवमीचा उत्सव व मसुरचा हनुमान जयंतीचा उत्सव आण्णांनी केला आहे. दासबोध त्यांना मुखोद्‌गत होता. मी जेव्हा दासबोधाची ११३ पारायणे ११३ घरी केली त्या वेळी लक्षात आले की आम्ही १ ओवी वाचल्यावर दुसरी ओवी आण्णा लगेच म्हणायचे. ९५ वा वाढदिवस हैदराबादला झाला त्यावेळी आंध्र University चे Vice-chanceller अध्यक्ष होते. त्यांनी आण्णांची ओळख करून द्यायला भागवतातील ३-४ श्लोक निवडले होते. ते त्यांनी पाठ करायचा प्रयत्न केला होता. कार्यक्रमाच्या वेळी ते पाठ म्हणायला लागले, पण त्यांना आठवेना. आण्णा डोळे मिटून बसले होते. त्यांनी ते सर्व श्लोक एका दमात म्हटले. याचा अर्थ त्यांना भागवतातील अनेक श्लोक मुखोद्‌गत होते. १८-२० वर्षे त्यांनी भागवतसप्ताह केले आहेत. एकनाथी भागवताच्या श्लोकांचा मराठी अनुवाद त्यांनी केला आहे.

रामकृष्ण मठाचे अध्यक्ष स्वामी व्योमरुपानंदांची व आण्णांची भेट नागपूरला झाली. २ संतांची भेट किती आल्हाददायक असते हे मी डोळ्यांनी पाहिले आहे. ती अंतरंगाची भेट होती. सज्जनगडावर आण्णा अनेक वर्षे मंडळाचे अध्यक्ष म्हणून राहिल्याने अनेक सामाजिक, पुढारी, धार्मिक मोठमोठे संतांचे सान्निध्य आण्णांना लाभले आहे. एकदा नागपूरला आले असताना प. पू. जयेंद्र सरस्वती, मा. श्री. भा. वर्णेकर व आण्णा एकमेकांशी संस्कृतमध्ये चर्चा करत होते. सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांना भेटायला मी व आण्णा संघकार्यालयात गेलो असताना बाळासाहेब म्हणाले होते की, ९२ व्या वर्षी तुमची तब्येत उत्तम आहे. तुमच्यावर ईश्वरी कृपा आहे. ९२ व्या वर्षी चष्मा न लावता आण्णा पेपर वाचायचे. कान तीक्ष्ण होते, स्मरणशक्ती उत्तम होती. कितीही थंडी असो स्वेटर, शाल, मोजे कधी वापरले नाहीत. माझ्या मुलीच्या लग्नाला १ जूनला नागपूरला आले होते. ४६° temp. होते. एवढ्या कडक उन्हाळ्यातही पंखा, कुलर न लावता ५-६ दिवस ते राहिले. देहबुद्धी सोडल्याची ही लक्षणे आहेत. जेवताना बासुंदी, खीर, आमटी, भाजी सर्व एकत्र करून अन्न हे पूर्ण ब्रह्म समजून जेवायचे. श्री आण्णाबुवा शंभरीच्या घरात पोहोचले होते तरीही त्यांची प्रकृती, प्रज्ञा, धारणा, स्मृती तरतरीत होती. एकदा साताऱ्याच्या स्टेशनवर महाराष्ट्र एक्स्प्रेससाठी मी व आण्णा उभे होतो. गाडी २ मिनिटेच थांबायची. मी स्टेशनमास्तरांना विनंती केली की गाडीत महाराज चढेपर्यंत गाडी थांबवा. महाराज ९४ वर्षांचे आहेत. आयत्यावेळी गाडी पलीकडच्या platform वर येणार हे समजले. आता पलीकडे ब्रिजवरून जावे लागणार, सामानही बरेच होते. इतक्यात आण्णांनी platform वरून खाली उडी मारली व मला उतरायला हात दिला. आम्ही पलीकडे गेल्यावर लगेच गाडी आली. गाडीचे ड्रायव्हर म्हणाले, काळजी करू नका. महाराज चढेपर्यंत गाडी सोडत नाही व स्वत: ते आम्हाला मदत करायला आले. आण्णा म्हणाले, "अगं, ज्याने मला ९४ वर्षे सांभाळले तो राम मला आता सांभाळणार नाही का?" हा साधनेचा परिणाम. 'उपासनेचा मोठा आश्रयो । उपासनेवीण निराश्रयो' ही ओवी आण्णा सतत म्हणायचे, त्याची प्रचीती आली. रामावर पूर्ण निष्ठा होती, मुखात सतत रामनाम असायचे. ज्यांच्या घरी आण्णा वास्तव्याला जायचे ते घर आनंदाच्या शिखरावर असायचे. त्यांच्या नुसत्या अस्तित्वाने घरात आनंद असायचा. एकदा ते आमच्या घरून गेल्यावर माझी मुलगी म्हणाली होती की, "आपल्या घरून आई परब्रह्मच गेलंय असं वाटतंय." श्री देवदेवेश्वर संस्थान, पर्वती यांच्यातर्फे आण्णांना सारसबागेत पुरस्कार मिळाला होता. आ. विजयराव देशमुखांनी जिजामाता पुरस्कार समर्थसदनात आण्णांना दिला होता. लोकेषणा, वित्तेषणा या सर्वांपासून आण्णा दूरच राहायचे. नाहीतर पैसा, नावलौकिक खूप मिळवता आला असता. उंचेपुरे गोरेपान,

चेहऱ्यावर नेहमी हास्य, साधनेचे तेज मुखावर असल्याने एखाद्या तपोनिष्ठ ऋषीप्रमाणे आण्णा दिसायचे. एकदा विमानाने येत असताना वैमानिकाने येऊन साष्टांग नमस्कार घातला. असे लोभसवाणे, अत्यंत प्रेमळ नजर असणारे उत्तुंग व्यक्तिमत्त्व आण्णांचे होते. अनेकदा प. पू. आण्णा लहानसे कार्ड पाठवायचे. ४ ओळींचे पत्र असायचे, पण त्यातला आशय महान असायचा. तरी सद्गुरुकृपेविरहीत । सर्वथा न घडे स्वहित । येमपुरीचा अनर्थ । चुकेना येणे । सद्गुरूंच्या कृपेशिवाय जीवन व्यर्थ आहे. संसार मोठा वृक्ष असून विलक्षण आहे. प्राणिमात्र ह्यावर चढायचा प्रयत्न करतात व घसरून खाली नरकात पडतात. त्यातून सुटका करण्याचे काम केवळ सद्गुरूच करतात. पत्रातील काही भाग असा असायचा.

१) बुद्धीने सर्वकाळ परमात्म्याचाच विचार करावा व जीवनही परमात्मापर राहावे.
२) नित्य निरंतर भगवंताचे नामगुण लीला त्याचे मंगलमय स्मरण करण्यात मनाला रमवावे.
३) जीवनाचा प्रत्येक क्षण, प्रत्येक पदार्थ, प्रत्येक संबंध, प्रत्येक विचार, प्रत्येक कार्य सर्वांचा संबंध भगवंताशी जोडावा.
४) सारी आसक्ती, ममता ईश्वरावर ठेवावी. नित्य निरंतर ईश्वराची सेवा करावी.
५) जीवन रागद्वेष विरहित असावे. मद नसावा, शोक, विषाद संदेहाला दूर ठेवावे.
६) जीवन संयमी, नियमपूर्ण, सदाचारी, त्यागपूर्ण असावे. सर्वदूर तो आहे ही भावना ठेवावी.
७) उपासनेला जीवनात खूप अर्थ आहे. सर्व उपाधीस पुरे पडण्यास सामोरे जाण्यास पचविण्यास उपासना हवी.

ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे
त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे
मी ठेविते मस्तक ज्या ठिकाणी
तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही

**'जय जय रघुवीर समर्थ'**

# शिवथरघळचे "मामा"

**_सौ. मीरा लिमये_**

*डिबेनॉर सोसायटी, वंदना स्टँडजवळ, ठाणे ४००६०२*

*जन्मा आलियाचे फळ। काही करावे सफळ*
*ऐसे न करता निर्फळ । भूमिभार होये ।*

या ओवीतील मर्म मामांनी जाणले होते. १८ वर्षे समर्थ सेवा करून मामांनी आपले जीवन सार्थकी लावले. मामांचे भाग्य थोर. मामा निवृत्त झाले आणि शिवथरघळीचे काम मामांना मिळाले. कल्पक असणाऱ्या आणि हाडाचे शिक्षक असणाऱ्या या मामांनी घळीचा कायापालट केला. १८ मे १९९९ रोजी अचानक मामांची प्राणज्योत मालवली. आज ११ वर्षे झाली, तरी घळ म्हटले की मामांची आठवण येतेच.

१४ नोव्हेंबर १९२३, रायगड जिल्ह्यातील महाड या गावी मामांचा जन्म झाला. वडील प्राथमिक शिक्षक, त्यामुळे आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. त्यात वयाच्या ८ व्या वर्षी पितृछत्र हरपले. दोन बहिणी आणि आई यांची जबाबदारी. मोठा भाऊ या नात्याने मामांवर पडली. लहानवयातच मामा "मोठे" झाले. बालपण संपले. घरात कमावणारे कोणी नाही. शेतीवाडी नाही. विविध कामे करून मामा आपल्या आई, बहिणींबरोबर महाडला राहात होते.

१९४० साली मामा Matric झाले. त्यावेळी मोठ्या विवाहित बहिणीने मामांना मदत केली. आज समाधानाचा काळ पाहाण्यासाठी आपली ताई नाही, याचे मामांना फार दु:ख होत असे. अनेकदा तसे तू बोलूनही दाखवीत. या ताईच्या मुलामुलींना मामांनी अंगाखांद्यावर खेळविले. त्या भाच्यांमुळे ते सर्वांचेच मामा झाले. त्यांच्या मुलांचेही आणि समर्थ भक्तांचेही.

आर्थिक अडचण असली तरी मामांना भगवंतानी बुद्धीचे दान भरपूर दिले होते. Matric चा रिझल्ट लागला आणि महाडच्या शाळेत मुख्याध्यापक असलेल्या मा. चांदेसरांनी विचारले, "पुढे काय करायचे ठरविले आहेस?" मामांना काम करण्याशिवाय पर्याय नव्हता. दुसऱ्याच दिवशी मामा महाडच्या शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले. महाविद्यालयीन शिक्षण घेणे आर्थिकदृष्ट्या शक्यच नव्हते आणि घर चालवायचे तर अर्थार्जन करण्याची आवश्यकता होती. शिक्षक म्हणून काम सुरू झाले. शिक्षक म्हणूनच निवृत्त झाले. अत्यंत समाधानी वृत्ती असल्यामुळे, ते नेहमीच म्हणत असत, "पोटापुरते देई बाप्पा, मागणे लई नाही."

मामांच्या तरुणपणी, स्वातंत्र्यपूर्व चळवळीचे वातावरण सर्वत्र होते. डॉ. हेडगेवार, स्वा. सावरकर यांच्या विचारांचा मामांच्या मनावर चांगलाच प्रभाव होता. स्वाभाविकच सभोवतालच्या वातावरणामुळे मामा संघस्वयंसेवक झाले. दैनंदिन शाखेत जाणे, शरीर व मन कमावणे; हे ध्येय

बनले. त्यांना वाटे, टीचभर पोटाची खळगी भरण्यात सारा वेळ खर्च करण्यापेक्षा स्वातंत्र्यसंग्रामात उडी घ्यावी. मनात द्वंद्व होते. प्रापंचिक जबाबदारी आणि संघकार्य दोन्ही सुरू होते.

थोडा करारी स्वभाव. पण कष्ट करण्याची तयारी होती. रायगड जिल्ह्यात अनेक शाळांत त्यांनी काम केले. जवळपासच्या गावांमध्ये गरजू मुलांना शिकवण्यासाठीही जात असत. कधी पायी तर कधी सायकलने संघकामही चालू होतेच. गरजू दिसला की घासातला घासही काढून देण्याची तयारी असे. याचवेळी बाहेरून मामांनी बी.ए. ची परीक्षा दिली. संस्कृत व इंग्रजी भाषा आत्मसात केल्या. वयाच्या ५० व्या वर्षीसुद्धा अभ्यासाची तयारी होती; तेव्हा त्यांनी बी. एडची पदवी घेतली. संघाचेही तीन वर्षांचे (O.T.C.) शिक्षण तरुणपणीच घेतले. या त्यांच्या स्वभावाशी, या वातावरणाशी जुळवून घेणारी आमच्या आईच्या रूपातील सहधर्मचारिणीही त्यांना मिळाली होती. ४८ वर्षांच्या सहवासात दोघांनी एकमेकांना सर्वतोपरी साथ दिली.

हळूहळू प्रापंचिक जबाबदाऱ्या वाढल्या. पण कोठेही तत्त्वनिष्ठा ढळली नाही. ''संघकार्य करता येणार नाही'', अशी परिस्थिती त्यांनी केव्हाही सहन केली नाही. प्रसंगी अनेक वेळा नोकरी सोडली, शाळा बदलल्या, कोणाचे बंधन नको म्हणून नोकरी सोडून शिकवणी वर्ग सुरू केले. कधी विनावेतन, कधी अल्पवेतनदेखील स्वीकारले. खेडेगावातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन गावात शाळा सुरू करावी. त्यासाठी आठवडाभर कुटुंबापासून दूर राहावे. हा त्यांचा जीवनक्रमच बनून गेला होता.

१९४८ च्या संघबंदीच्या काळात तरुणवयात ते सत्याग्रही म्हणून तुरुंगात गेले. १९७५ च्या आणीबाणीत, सेवानिवृत्तीचे वय जवळ आले असताना १८ महिने 'मिसा'खाली तुरुंगात होते. घरात मिळवणारे कोणीही नाही. अर्धवट वयाची आम्ही मुले, वयोवृद्ध आई. पण याही काळात आमच्या आईने काटकसरीने संसार करून मामांना सर्व कामांमध्ये आनंदाने, समाधानाने साथ दिली. घरात स्त्री आनंदी व समाधानी असेल तरच पुरुष सामाजिक कार्य करू शकतो, हे स्वत:च्या उदाहरणाने आमच्या आईने पटवून दिले.

सेवानिवृत्तीच्या आधी दोनच वर्षे मामांच्या मोठ्या मुलाचा म्हणजे दादाचा स्वतंत्र व्यवसाय सुरू झाला. माझा विवाह झाला होता. जमेल तेवढा वेळ मामा दादाच्या व्यवसायासाठी देऊ लागले. ते कधी रिकामे बसल्याचे आम्ही पाहिले नाही. कधी थकले नाहीत. सतत कार्यमग्न. व्यवसायात दादाचा जम बसला. मामा हळूच तेथून बाजूला झाले. मग पुन्हा त्याच्या व्यवसायात डोकावले नाहीत.

सेवानिवृत्तीचे वेध लागले. निवृत्तीनंतर त्यांनी संघकार्य वा त्यांच्या आवडीचे काम करावे, पैसा मिळविण्यासाठी काही करू नये, असे आमच्या दादाने त्यांना स्पष्ट सांगितले.

सेवानिवृत्तीच्या आदल्याच दिवशी, मामा संध्याकाळी अंगणात फेऱ्या घालत होते. त्यांचे बालपणापासूनचे त्यांचे मित्र कै. बापूशेठ ओक सहज म्हणाले, ''काय रे, निवृत्तीनंतर काय करणार आहेस?'' मामांचे उत्तर ठरलेले होते, ''माझ्या सेवानिवृत्तीचा विचार संघाने केलाच असेल.'' पण बापूशेठनी 'शिवथरघळ' विषय मामांच्या मनात भरवला, ''महाडजवळचे समर्थक्षेत्र आहे. ते एक उत्तम संस्कार केंद्र व्हावे, तू लक्ष घालशील तर होईल.'' अशी इच्छाही व्यक्त केली. सर्व समर्थभक्तांचे भाग्य थोर म्हणून समर्थांच्या पावन भूमीला कै. मामांच्या कर्तृत्वाचा परीसस्पर्श झाला आणि १९७९ पासून शिवथरघळीचे नाव साऱ्या महाराष्ट्रात दुमदुमू लागले. मामांनी समर्थकार्यात स्वत:ला अक्षरश: झोकून दिले.

शिवथरघळ हे आता सर्व समर्थभक्तांचे, कार्यकर्त्यांचे

'घर' बनले आहे. एक कुटुंबच झाले आहे. येणारे सारे जण हे मामांची मुले, मुली, नातवंडेच. घळीमध्ये ओंकारआजीच्या रूपाने मामांना आईसुद्धा मिळाली. १९८१ पासून १९९९ पर्यंत सुंदरमठ सेवा समितीचे कार्यवाह म्हणून काम केले. अगदी अखेरच्या क्षणापर्यंत काम केले. ईश्वरी कार्य, निरपेक्ष बुद्धीने होत असल्यामुळे, मनी यावे ते पूर्ण व्हावे असे घडू लागले.

मे महिन्यात बालकांसाठी, दिवाळीच्या सुटीत महाविद्यालयीन मुलामुलींसाठी, ऑगस्ट महिन्यात प्रापंचिकांसाठी-सेवानिवृत्तांसाठी दासबोध अभ्यासवर्गाचे, संस्कार-वर्गाचे आयोजन होत राहिले. अनेक कार्यकर्ते तयार झाले. शिवथरघळीप्रमाणेच पुणे, सोलापूर,कोल्हापूर, शिरूर, हैदराबाद, अकोला, बारामती, ठाणे, इ. अनेक ठिकाणी हे वर्ग सुरू झाले. कोजागिरी पोर्णिमेपासून पुढे सात दिवस कै.अक्कांचा (आदरणीय कै. अक्का वेलणकर) दासबोध सखोल अभ्यासाचा वर्ग होऊ लागला. सर्वदूर पसरत चाललेल्या ह्या समर्थकार्याचा सुगंध दरवळू लागला. प्रेरणा होती मामांची, स्फूर्तिस्थान होते मामा!

दर्शनार्थींची निवास व्यवस्था, विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने शिवथरघळीत येणाऱ्या लोकांच्या निवासाची व्यवस्था उत्तम प्रकारे व्हावी, चांगल्या सुविधा मिळाव्या, सुंदरमठाचे वैभव वाढावे; असा मामांचा प्रयत्न होता. ते स्वत: देखील जास्तीतजास्त वेळ घळीतच असत.

१९८३ मध्ये समर्थ विद्यापीठाची स्थापना झाली. कै. मामा समर्थ विद्यापीठाचे कुलपती होते. विद्यापीठाच्या या कार्यात हजारो परीक्षार्थी, समीक्षक सहभागी झाले. पाच परीक्षांची पाच पुस्तके तयार झाली.

विविध कार्यक्रमांनी घळीचे ऐश्वर्य वाढले. घळीत येणाऱ्या लोकांनी आपापल्या गावात दासबोध मंडळे, संस्कार वर्ग, प.दा.अ असे उपक्रम सुरू केले. यातून समर्थ साहित्याचा प्रचार-प्रसार होऊ लागला. जीवनग्रंथ असणारा दासबोध घराघरांत पोहोचला. मामा नेहमी म्हणत असत, दासबोध हा रेशमी कापडात बांधून पूजेत ठेवण्याचा ग्रंथ नाही. जीवनग्रंथ आहे, त्यात सांगितल्याप्रमाणे आचरण केले पाहिजे. मामांनी स्वत:च्या आचरणातून ते दाखवून दिले.

शिवथरघळ हे पर्यटन क्षेत्र न होता धार्मिक, आध्यात्मिक केंद्र बनावे; स्थानिक गावकऱ्यांचा सहभाग असावा असाही मामांचा जाणीवपूर्वक प्रयत्न होता. दरवर्षी मामा घळीत येणाऱ्या समर्थ भक्तांना चातुर्मासात एक नेम देत असत. कधी रामनाम लिहिण्यास सांगत, तर कधी रोज एक समास वाचायला सांगत. कधी मुष्टिदान योजना, तर कधी धनदान योजना सांगत. १८ वर्षांत मामा पक्के भक्तिमार्गी बनले. सारा भरवसा त्या एका रामावर होता. सतत मुखात रामनाम असे. त्या रामाने मामांचा अखेरचा दिवस गोड केला. त्यांच्या कार्यक्षेत्री म्हणजे शिवथरघळीत, समर्थांसमोर १८ मे १९९९ या दिवशी पहाटे, मामा समर्थ चरणी विलीन झाले.

आज मामा देहाने आपल्यात नाहीत, पण घळीत मामांचे अस्तित्व जाणवते. ११ वर्षे झाली, मामांनी घालून दिलेल्या पायवाटेने, घळीतले सर्व कार्यकर्ते वाटचाल करत आहेत. समर्थ कार्य जोमाने सुरू आहे, मामांची इच्छा पूर्ण होते आहे.

# रामदासी गणेशदास ऊर्फ स्वरूपानंद महाराज


**सौ. हर्षदा प्रशांत जोशी**

*अस्मित्रा सोसा., सहवास कॉर्नर, कर्वेनगर, पुणे ४११ ०५२*


आपली धर्मभूमी भारत आसेतू हिमाचल संत-सत्पुरुषांच्या वास्तव्याने पुनीत झालेली आहे. वेगवेगळ्या पंथाचे आणि संप्रदायाचे अनेक संत-महात्मे या भूमीमध्ये होऊन गेले. संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत तुकाराम, समर्थ रामदासस्वामी, संत तुलसीदास, संत कबीर, संत मीराबाई, संत सूरदास, गुरुनानक, शंकराचार्य, रामकृष्ण परमहंस असे अनेक सत्पुरुष ज्ञात आहेत. पण प्रसिद्धी पराङ्मुखतेमुळे आणि कालौघात ज्यांची माहिती मिळत नाही अशा अज्ञात साधू-संतांची गणना कोण आणि कशी करणार? साधू-संतांनी जनमानसात भगवद्शक्तीचे बीज रोवले, हरिनामाच्या गजराने दशदिशा दुमदुमविल्या. त्यांच्या प्रेरणेने अनेक लोक भजनमार्गाला लागले. आणि त्यांच्या अंतरीचा ज्ञानदिवा प्रज्वलित झाला. जवळजवळ प्रत्येक गाव एखाद्या सत्पुरुषाच्या वास्तव्याने पावन झाले आहे. तिथे त्यांचा जयंती-पुण्यतिथी उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा होतो. गावची जत्रादेखील त्यांच्याच नावाने भरते.

महाराष्ट्रातील विदर्भामध्ये रामदासी गणेशदास ऊर्फ स्वरूपानंद महाराज हे एक थोर सत्पुरुष होऊन गेले. अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यात वऱ्हा नामक एक छोटेसे गाव आहे. तिथे जयरामजी बद्रे नावाचे एक भगवद्भक्त राहात होते. त्यांच्या प्रपंचाला परमार्थाची अपूर्व जोड होती. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या न्यायाने रामदासी संप्रदायाला भूषण ठरणाऱ्या गणेशदास महाराजांनी १८७२ साली जन्म घेऊन बद्रे घराण्याचा उद्धार केला. जयरामजींना (१) रामचंद्रदास, (२) चंपतराव, (३) दौलतराव असे तीन सुपुत्र झाले. त्यातील रामचंद्रदास हे पुढे गणेशदास ऊर्फ स्वरूपानंद या नावाने प्रसिद्ध झाले. 'बहुत सुकृताची जोडी म्हणून विठ्ठल आवडी' अशा वृत्तीच्या गणेशदास महाराजांना बालपणापासूनच भक्तीची, आध्यात्मिक श्रवण आणि ग्रंथाध्ययनाची गोडी होती.

या वऱ्हा गावातच यशवंतमहाराज चौधरी नावाचे मोठे विलक्षण सत्पुरुष राहात होते. या यशवंतमहाराजांना शिंपीस्वामींकडून अनुग्रह आणि संन्यासदीक्षा प्राप्त झाली होती. त्यांना सारेजण 'वऱ्हाड के स्वामी' म्हणत असत. गणेशदास महाराज गृहस्थाश्रमी होते. पार्वतीबाई ही त्यांची पत्नी. पण महाराजांचे संसारात अजिबात लक्ष नव्हते. त्यांचा सारा कल परमार्थाकडे होता. म्हणून त्यांनी **'स्वार्थ सांडून प्रपंचाचा । हव्यास धरिला परमार्थाचा । अंकित होईन सज्जनाचा ।'** या विचाराने प्रेरित होऊन यशवंतमहाराजांसारख्या अत्यंत थोर, विरक्त अधिकारी सत्पुरुषाकडून १८९९ साली अनुग्रह घेऊन साधना सुरू केली. यशवंतमहाराजांनी त्यांना 'गणेशदास'

हे नाव दिले.

गणेशदास महाराजांच्या मनात सज्जनगड आणि समर्थ रामदास यांच्याबद्दल विलक्षण ओढ होती. १९०५ साली ते सज्जनगडावर आले. तिथे त्यांनी अत्यंत श्रद्धापूर्वक समर्थांच्या समाधीची पूजा करून कीर्तनसेवा सादर केली. १९०८ साली म्हणजे वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी **'पुण्यमार्ग पोटी धरी । सत्संगाची वांछा करी । विरक्त जाला संसारी ।'** ही समर्थांची ओवी आचरणात आणीत प्रपंचाचा पूर्ण त्याग करून पूर्णवेळ पारमार्थिक जीवन जगण्यास सुरुवात केली. समर्थांनी ग्रंथराज दासबोधामध्ये सांगितल्याप्रमाणे-

***'विरक्ते करावी पुरश्चरणे । विरक्ते फिरावी तीर्थाटणे । विरक्ते करावी नानास्थाने । परम रमणीय ।।'*** **किंवा** ***'नाना तीर्थक्षेत्रास जावे । तेथे त्या देवाचे पूजन करावे । नाना उपचारी अर्चावे । परमेश्वरासी ।।'***

गणेशदास महाराजांनी १९०८ ते १९१२ ही पाच वर्षे तीर्थाटन केले. नाशिक, काशी, प्रयाग, जगन्नाथपुरी, अयोध्या, बद्रीनाथ, केदारनाथ, गोकूळ, मथुरा, वृंदावन, गोवर्धन, कुरुक्षेत्र, ओंकारेश्वर, हरिद्वार आदी क्षेत्री राहून तेथील देवतांचे अनुष्ठान केले. त्यांचा आशीर्वाद संपादन केला. अनेक साधू-संन्याशांशी पारमार्थिक चर्चा केली. पण शेवटी त्यांच्या लक्षात आले- **'बहु हिंडता सौख्य होणार नाही ।'** म्हणून त्यांनी भगवंताचा शोध अंतर्यामी घ्यावयाचे ठरविले. १९१३ साली तीर्थयात्रा पूर्ण करून ते वऱ्हा येथे परत आले. दोन वर्षे एकांतात राहून त्यांनी **'शिष्य येकांती बैसावे । स्वरूपी विश्रांतीस जावे । तेणे गुणे दृढावे । परमार्थ हा ।।'** ही समर्थांची शिकवण जीवनात उतरविली. समर्थांनी त्यांना ग्रंथराज दासबोधाचे अध्ययन करण्याचा आदेश दिला. त्यानुसार त्यांनी अध्ययन सुरू केले. तासन्तास ते ग्रंथराज दासबोधाच्या वाचन, मनन आणि चिंतनात रमू लागले. समर्थांनी त्यांना दासनवमीचे दिवशी प्रत्यक्ष दर्शन देऊन आत्मज्ञानाचा आनंद प्रदान केला. गणेशदास महाराज रामदासी महंत ठरले. ते स्वत:ला समर्थसेवक म्हणवून घेऊ लागले.

## वाङ्‌मयसंपदा

गणेशदास महाराजांनी ग्रंथराज दासबोधाचे चिंतन करीत असताना त्यातील १८४७ ओव्या निवडून 'संक्षिप्त दासबोध' तयार केला. 'रामदासी हरिपाठ' या नावाने २१ अभंगांची रचना केली. या हरिपाठातून त्यांनी नामस्मरणाचे महत्त्व, संसाराचे, दृश्य जगताचे मिथ्यत्व, सद्‌गुरू, माया, ब्रह्म आदी विषयांबाबत मार्गदर्शन केले आहे. महाराजांनी श्रीराम, सद्‌गुरू, साधू-संत, समर्थ रामदास, ज्ञानेश्वर महाराज, दत्तात्रेय यांच्यावर अतिशय भावपूर्ण आरत्या लिहिल्या आहेत. समर्थांची आरती मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषेतून लिहिली आहे, तर भगवान दत्तात्रेयांची आरती संस्कृतमधून लिहिली आहे.

गणेशदास महाराजांचे ६४ अभंग, ८ श्लोक, ८ मराठी पदे, २८ हिंदी पदे आणि पंचमुक्ती नारायणाची पोथी असे वाङ्मय उपलब्ध आहे. त्यांच्या अत्यंत प्रासादिक वाङ्मयातून अनेक पारमार्थिक विषयांबाबतचे अमूल्य मार्गदर्शन साधकांना मिळते. संसारात गुरफटलेल्या लोकांची अवस्था, नरदेही कसे दु:ख आहे, यातून बाहेर कसे पडावे, दांभिक साधक, दांभिक गुरू, परमार्थस्तवन, सद्‌गुरूंचे जीवनात असलेले अनन्यसाधारण महत्त्व, भजनमार्गाचा उपदेश असे अनेक विषय येऊन जातात.

महाराजांच्या अभंगांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची समर्थांवर असलेली दृढ श्रद्धा, आत्यंतिक प्रेम, कृतज्ञता यामध्ये दिसून येते. बहुतांश अभंगांमध्ये शेवटच्या चरणातून 'रामदास सांगे मात, रामदास सांगे सोई, रामदास सांगे स्पष्ट, रामदास स्वामी श्रेष्ठ, रामदासाचा उपकार, रामदासाचे कृपेने, रामदासाचे सत्तेने असा कृतज्ञतापूर्वक उल्लेख येतो. हे सारे काही मला मिळाले ते समर्थांच्या माझ्यावरील कृपेमुळे, प्रेमामुळे, त्यांनी मला आपला

म्हटल्यामुळे मिळाले हा महाराजांचा भाव वारंवार दिसून येतो. यावरून समर्थ रामदास हाच त्यांचा श्वास होता, प्राण होता. त्यांचे जीवनसर्वस्व होते हे लक्षात येते. महाराजांनी मराठी पदातून वेगवेगळ्या रूपकांद्वारे मार्गदर्शन केले आहे. काही रचना संत एकनाथ महाराजांच्या भारुडाप्रमाणे गूढ आणि कूट आहेत. उदाहरणार्थ- **'एक म्या नवलाव देखिला । बाप मुलीला भोगितो । तिचे पोटी पुन्हा जन्मतो । लग्न आईशी लावितो । मुलाचे पोटी बाप जन्मतो । अचंबा झाला ।।'**

महाराजांनी श्लोकांची रचना शार्दुलविक्रीडीत वृत्तात केली आहे. त्यातील ५ श्लोकांत वेदांत विचार मांडला असून, केवळ गुरुकृपेमुळेच माणसाला अद्वैतबोध प्राप्त होऊ शकतो हे सांगितले आहे. उदाहरणार्थ-

***'वेदासी साकडे श्रुती मुकी पडे शब्दासी जे कानडे ।***
***नाना साधनी नातुडे वरपडे घेताती ते कपडे ।***
***आहे ते तिकडे पहाल जिकडे हा देह त्यातच बुडे ।***
***ऐसे ते उघडे स्वरुपचि खडे गुरुविणा नातुडे ।।'***

या सर्व वाङ्मयामध्ये मुकुटमणी ठरावा, अशी पंचमुक्ती नारायणाची पोथी महाराजांनी लिहिली आहे. ही पोथी गुरु-शिष्य संवादरूपी आहे. शिष्याने गुरूंना प्रश्न विचारला आणि त्याची मुक्तीबद्दल असलेली ओढ, ज्ञानलालसा पाहून सद्‌गुरूंना गहिवरून आले. त्यांनी आपल्या शिष्याला बोधामृत पाजून त्याची तृष्णा शांत केली.

या पोथीमध्ये पाच अध्याय आहेत. सुरुवातीला पूजाविधी सांगितला आहे. त्यानंतर (१) सलोकता, (२) समीपता, (३) स्वरूपता, (४) सायुज्यता, (५) निर्गुण सायुज्यता अशा पाच मुक्तींचे पाच अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायामध्ये त्या मुक्तीबद्दलचे विस्तारपूर्वक वर्णन आले आहे. कशा पद्धतीचे आचरण आणि कर्म केल्यास कोणती मुक्ती मिळते ते सांगितले आहे. मनुष्य ज्या दर्जाची साधना करेल त्या प्रकारची मुक्ती त्याला मिळेल. अध्यात्मामध्ये चत्वार मुक्ती प्रचलित आहेत. महाराजांनी 'निर्गुण सायुज्यता' ही मुक्ती स्वयंस्फूर्तीने निर्माण केलेली दिसते. जसे तुकाराम महाराजांनी भक्तीला पंचम पुरुषार्थ म्हटले तसे महाराजांनी निर्गुण सायुज्यतेला पाचवी मुक्ती म्हटले आणि हीच अंतिम मुक्ती आहे असे ते मानतात. महाराजांच्या दृष्टीने हीच सर्वश्रेष्ठ मुक्ती आहे. कारण त्यात अहंकार, वासना यांचे पूर्ण विसर्जन असल्यामुळे मनुष्याला पुनर्जन्म नाही. निर्गुण सायुज्यतेमध्ये भक्ताला परब्रह्माची सत्ता प्राप्त होते. प्रत्येकाने ती मिळविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे त्यांचे सांगणे आहे. या सत्तेमुळे 'किंबहुना चराचर आपणचि जाहला' या प्रचितीचा आनंद मनुष्याला मिळतो.

महाराजांचे वेगळेपण असे की, त्यांनी वारकरी संप्रदाय आणि समर्थ संप्रदाय यामधील भेदाची भिंत पाडली. ब्राह्मणब्राह्मणेतर वाद गाडून टाकला. जे काम मी मी म्हणणाऱ्या मोठ्या मोठ्या प्रवचनकारांना आणि कीर्तनकारांना जमले नाही ते समन्वयाचे अद्‌भुत साहस महाराजांनी आयुष्यभर केलेल्या कठोर साधनेच्या, वैराग्य आणि भक्तीच्या बळावर करून दाखविले. ११ फेब्रुवारी १९२० साली त्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि समर्थ रामदास यांचे मंदिर वऱ्हा येथे उभे केले. महाराष्ट्रामध्ये असे मंदिर त्याकाळात प्रथमच होत होते. महाराजांचे बंधू चंपतराव बद्रे यांचे नातू श्री. अरुणराव आणि नातस्नुषा सौ. चंद्रप्रभाबाई सध्या या मंदिराची मोठ्या श्रद्धेने सेवा करतात. असेच दुसरे मंदिर अमरावतीपासून ७-८ मैलांवर नागपूर रस्त्यावर रहाटगाव येथे महाराजांनी उभे केले. १९२६ साली स्थापन केलेल्या या मंदिरातही संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि समर्थ रामदास यांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा केली. २७ फेब्रुवारी २००२ साली रहाटगावच्या रामेकर बंधूंनी या मंदिराचा जीर्णोद्धार करून भव्य मंदिर उभे केले. महाराजांना समर्थांनी जे ज्ञान दिले, त्यामुळे 'समर्था तुझे काय उत्तीर्ण व्हावे' या कृतज्ञतेच्या भावनेतून ही दोन मंदिरे त्यांनी उभी केली. सांप्रत स्थितीमध्ये वऱ्हा आणि रहाटगाव

ही अमरावती जिल्ह्यातील समर्थ आणि वारकरी संप्रदायाचा सुंदर मिलाप असलेली दोन मंदिरे जागृत भक्तिकेंद्र ठरली आहेत. दोन्ही संप्रदायांचे उत्सव मोठ्या श्रद्धेने, भक्तीने, एकोप्याने उत्साहात साजरे केले जातात. बद्रे आणि रामेकर परिवार ऐक्यभावनेने, प्रेमाने सेवा करून आपले जीवन धन्य आणि कृतार्थ करीत आहेत. श्री. व सौ. बद्रेंचा रामेकर परिवाराला मोठा आधार आहे.

संतांचे चरित्र चमत्काराशिवाय संपत नाही. चमत्कार करणे हा त्यांचा हेतू नसतो. पण संतांचे महत्त्व सामान्य माणसाच्या चित्ती ठसावे म्हणून भगवंत त्यांच्याकडून काही लीला करवून घेतो. गणेशदास महाराजदेखील त्याला अपवाद नाहीत. विस्तारभयास्तव फक्त एक उदाहरण आपण पाहू.

अमरावती जिल्ह्यात सालबर्डी येथे दर महाशिवरात्रीपूर्वी एकादशीला यात्रा भरे. महाराज आपल्या १००-१२५ शिष्यांसह दशमीलाच सालबर्डी येथे पोहोचत. या यात्रेतील प्रवासात एका रात्री अरण्यात उतरले असता गणेशदास महाराज रात्री कुणाला दिसेनात. अरण्यात कुठे नि कसे शोधावे ही मोठी समस्याच होती. पण रात्री शिष्यांना महाराजांची मोठी हाक ऐकू आली. सर्व मंडळी साहस करून महाराजांना शोधण्यासाठी रात्री अरण्यात निघाली. चार-पाच फर्लांग जाताच त्यांना एक भयानक वाघ दिसला. वाघाला पाहून सारेजण माघारी परतले. तासाभराने गणेशदास महाराजदेखील मुक्कामच्या जागी सुखरूप पोहोचले. त्यांनादेखील तो वाघ भेटला पण वाघाने त्यांना काही केले नाही. सत्पुरुष भेटले म्हणजे हिंस्र श्वापदेही त्यांची हिंसेची वृत्ती क्षणभर बाजूला ठेवतात. समर्थ घळीत किंवा चंद्रगिरीच्या डोंगरात किंवा जरंडेश्वरला वाघाबरोबर राहात असत. संतांनी त्या प्राण्यांची भाषा आत्मसात केलेली असते. म्हणून त्या श्वापदांना संतांची भीती वाटत नाही.

# श्री समर्थ रामदास स्वामींचे अनन्य भक्त योगीराज श्री. स. स. गणपतराव महाराज कन्नूर यांचा अल्प परिचय

**सौ. मुक्ता शिवरामपंत वैद्य**
*गुरुप्रसाद, कर्मवैभव सोसा., वारणाली रोड, विश्रामबाग, सांगली*

श्री. स. स. महाराज हे श्री समर्थांचा दुसरा अवतार असे म्हटले, तर ते वावगे ठरणार नाही. कारण दोघांच्याही जीवनात बरेचसे साम्य आढळून येते. श्री. स. स. महाराज यांचा जन्म दि. १८/९/१९०९, गणेश चतुर्थीस झाला. नऊ या अंकाला आध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्व असून, हा अंक शुभ मानल जातो. गणेश चतुर्थीस त्यांचा जन्म झाला म्हणून त्यांचे 'गणपती' असे नामकरण केले. श्री. शिवरामपंत व सौ. सरस्वतीबाई यांचे हे तृतीय पुत्ररत्न होत. माता गर्भवती होत्या तेव्हा त्यांच्या घरी श्री. स. स. भाऊसाहेब महाराज यांचे आगमन झाले व त्यांनी मातेला, 'तुझ्या उदरात वाढणारा गर्भ हा महान सत्पुरुष असून, तो कुळाचे व जगाचे कल्याण करेल.' असा आशीर्वाद दिला.

बालपणापासूनच गणपतीला देव पाहाण्याची तीव्र इच्छा होती. त्यांचे आजोबा रोज संध्याकाळी भजन करीत. लहान मुलेही भजनाला येत. एके दिवशी आजोबांनी मुलांना विचारले, 'बाळांनो! तुम्ही भजनाला का येता?' मुलं म्हणाली, 'आम्हाला प्रसाद मिळतो म्हणून!' पण बाळ गणपतीने मात्र उत्तर दिले, की 'भजनाने देव मिळतो म्हणून मी भजनला येतो.'

पुढे देवशोधन तसेच चालू होते. काही जणांनी सांगितले की, मंदिरात जाऊन रोज देवाला प्रदक्षिणा घातल्या, की देव सापडतो. त्यानुसार विजापूर येथील नरसिंह मंदिरात जाऊन रोज २१ प्रदक्षिणा घालू लागले. त्यावेळी त्यांच्या आत्या रुक्माक्का यांनी सांगितले की, 'सद्‌गुरूच देव दाखवू शकतात. मग सद्‌गुरूंचा शोध सुरू झाला, तेव्हा आत्या म्हणाल्या - 'एक सद्‌गुरू आहेत. त्यांची आणि तुझी गाठ घालून देते.' बाळ गणपतीला खूप आनंद झाला.

इ.स. १९२२ साली श्री. स. स. भाऊसाहेब महाराजांचे शिष्य श्री. स. स. सिद्धरामेश्वरमहाराज हे इंचगेरीतील श्रावण सप्ताह संपवून विजापूरला आले. विजापूर येथे शनिमंदिरात दोघांची प्रथम भेट झाली. एकमेकांची एकमेकांना ओळख पटली. आणि गणपतीने वयाच्या १३ व्या वर्षी त्यांचा अनुग्रह घेऊन, त्यांचे शिष्यत्व पत्करले आणि संप्रदायाच्या परंपरेनुसार रोज दासबोध वाचन व भजन करू लागले. त्यावेळी ते विजापूर येथील कृष्णपाठ शाळा येथे दुसरीत शिकत होते. श्री सद्‌गुरू आले, की ते प्रवचनालाही जात असत.

एकदा काय झाले, की विजापूर येथे छत्रे टॉकीजला 'राजा हरिश्चंद्र' सिनेमा लागला होता. वडील शिरस्तेदार

असल्याने पास होते म्हणून सर्वांनी सिनेमाला जायचे ठरविले. पण गणपतरावांना प्रवचनाला जायचे होते. वडिलांना नाही म्हणण्याची हिंमत नव्हती. त्यांनी आईला सांगितले, आईने आपल्या पतीला सांगितले की, गणपती प्रवचनाला जायचे आहे, मी सिनेमाला येत नाही म्हणतो. तेव्हा वडील म्हणाले, ''येत नसेल, तर राहू दे. उगीच बळजबरीने नेण्यात काय अर्थ आहे?'' वडिलांचे हे बोलणे ऐकून त्यांनी प्रवचन ऐकण्यास धूम ठोकली.

श्री. स. स. सिद्धरामेश्वर महाराजांचे एक महिना विजापूरमध्ये वास्तव्य होते. तेव्हा ते त्रिकाळ प्रवचन करीत. श्री. गणपतराव शाळेला दांडी मारून प्रवचनाला जात. रोज ते दप्तर घेऊन शाळेसाठी म्हणून बाहेर पडत आणि प्रवचनाला जात त्यामुळे घरी कोणालाही संशय आला नाही. पण एक दिवस हे बिंग फुटले. गणपतीचे शिक्षक वडिलांना रस्त्यात भेटले व म्हणाले, ''गणपती एक महिना झाला शाळेला येत नाही. त्याला बरे नाही काय?'' वडिलांनी वेळ मारून नेली पण खरी गोष्ट त्यांना समजली.

शाळा शिकत असतानाच विजापूर येथील सार्वजनिक वाचनालयातील सर्व धार्मिक ग्रंथ वाचले. इ.स. १९२८ साली ते मॅट्रिक झाले. नंतर एक वर्ष सांगली येथील विलिंग्डन कॉलेज, धारवाड येथील कर्नाटक कॉलेज एक वर्ष व दोन वर्षे पुणे येथील फर्ग्युसन कॉलेज येथे महाविद्यालयीन शिक्षण घेऊन इ.स. १९३२ मध्ये B.Sc. पदवी मिळविली. श्री. स. स. सिद्धरामेश्वरमहाराज वारंवार मुंबईला जायचे. तेव्हा श्री गणपतराव जमेल तसे ८।१० दिवस, १ महिना मुंबईला जात व सद्‌गुरू सेवा करून, प्रवचन ऐकत, पुण्यात असताना त्यांनी तेथील वाचनालयात उपलब्ध असलेल्या सर्व आध्यात्मिक ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास केला. त्याचप्रमाणे पाश्चात्त्य ग्रंथांचाही अभ्यास केला. आणि B.Sc. पदवीबरोबरच गुरुकृपेने आणि स्वप्रयत्नाने आत्मज्ञान प्राप्त करून घेतले, आणि एकांतात राहून गुरुसेवेला वाहून घेतले.

इ.स. १९३२ साली, श्री. स. स. सिद्धरामेश्वर महाराजांनी एका प्रवचनाच्या वेळी शिष्यांना, 'या क्षणी सर्वसंगपरित्याग करून एक वर्ष अज्ञातवासात जाण्यास कोण तयार आहे का?' असे विचारले, तेव्हा प्रथम श्री गणपतराव उठून उभे राहिले. त्यांच्याबरोबर नंतर ७।८ शिष्यही उभे राहिले. गुरुआज्ञेनुसार श्री गणपतरावांची संन्यास घेऊन भ्रमंती सुरू झाली. एकांतवासासाठी त्यांनी कृष्णातीर निवडला. माता-पित्यांना आपल्या मुलाने संन्यास घेतल्याची बातमी समजली. सैरभैर होऊन ते दत्तजयंती सप्ताहाच्या वेळी इंचगेरीला गेले आणि त्यांनी श्री. स. स. सिद्धरामेश्वर महाराजांना श्री गणपतीविषयी विचारले. तेव्हा श्री सद्‌गुरूंनी प्रथम त्यांचे सांत्वन करून, नंतर त्यांच्या कुटुंबाची चौकशी केली. त्यावरून त्यांना असे समजले की, श्री. शिवरामपंतांना पाच मुलगे, चार मुली असून दोन नंबरचा मुलगा मावशीला दत्तक दिला आहे. तेव्हा श्री. स. स. सिद्धरामेश्वर महाराज म्हणाले, ''तुम्ही एक मुलगा वंशवृद्धीसाठी दिला आहे. गणपती मला गुरुकार्यासाठी द्या.'' माता-पित्यांनी होकार दिल्यावर ते म्हणाले, ''गणपती येथेच आहे पण आताच तो तुमच्याकडे येणार नाही. योग्यवेळी त्याला मी तुमच्याकडे पाठवीन.'' माता-पिता-पुत्राची भेट झाली व श्री गणपतराव पुनश्च साधनेत गुंतून गेले. मातेच्या इच्छेनुसार श्रीसद्‌गुरुआज्ञेने गणपतरावांनी काषाय वस्त्रांचा त्याग करून, शुभ्रवस्त्रे परिधान केली व घराशी संबंध ठेवला.

इ.स. १९३४ साली श्री. शिवरामपंत सेवानिवृत्त होऊन विजापूरला आले. त्याचवेळी गुरुआज्ञेने श्री गणपतराव घरी आले. श्री गणपतरावांचे दोन मोठे बंधू परगावी होते व दोन लहान बंधू शिकत होते. अचानक एके दिवशी श्री शिवरामपंतांच्या पोटात दुखू लागले. दवाखान्यात दाखल केले. ऑपरेशन करतानाच त्यांची प्राणज्योत मावळली. त्यावेळी त्यांचेजवळ फक्त श्री.

गणपतराव होते. श्री. सद्‌गुरूंचे 'योग्य वेळी गणपतीला पाठवीन' याचा अर्थ आता उमगला. श्री गणपतरावांनी स्वत:च्या दु:खाला आवर घालून तसेच मातेचे व परिवाराचे सांत्वन करून, काही दिवस राहून पुन्हा सद्‌गुरूंकडे परतले.

इ.स. १९३६ साली अश्विन वद्य एकादशीस श्री. स. स. सिद्धरामेश्वरमहाराज मुंबई येथे स्वस्वरूपी लीन झाले. बाणगंगेत अग्नी देऊन त्यांचे एक सुंदर स्मारक उभारले. इंचेगिरीला आणून इ.स. भाऊसाहेब महाराजांचे दर्शन घेऊन बसवन बागेवाडी येथे अस्थी ठेवून, तेथे समाधी मंदिर उभारले. आणि नंतर सर्व शिष्यांनी मिळून चर्चा करून, श्री गणपतरावांनी इंचेगिरीची सर्व जबाबदारी स्वीकारावी असे ठरले. त्याप्रमाणे श्री गणपतरावांनी ती जबाबदारी स्वीकारून ते इंचेगिरीत राहू लागले. अधून-मधून साधन व एकांतवासासाठी सितीमनी, औदुंबर, महाबळेश्वर इत्यादी ठिकाणी जात.

त्यांचा शांत स्वभाव, प्रसन्न मुद्रा, सखोल ज्ञान आणि विषय पटवून देण्याची कला यामुळे लोक त्यांच्याकडे आकर्षित होऊ लागले व त्यांना अनुग्रह देण्याची विनंती करू लागले. इ.स. १९४४ पासून श्री. गणपतरावांनी अनुग्रह देण्यात सुरुवात केली. सांप्रदायिक प्रथेप्रमाणे सर्वजण त्यांना 'महाराज' असे म्हणू लागले. हळूहळू त्यांचा शिष्य समुदाय वाढू लागला. श्री. स. स. भाऊसाहेब महाराजांचे शिष्य श्री दत्ताप्पा पुजारी-रामतीर्थ यांनी श्री महाराज यांना रामतीर्थाला येण्याचा आग्रह केला म्हणून ते रामतीर्थलाही जाऊ लागले. तेथील ब्रह्मवृंद त्यांचे शिष्य बनले. इ.स. १९४८ साली म. गांधीजींची हत्या झाली. ब्राह्मणांची घरे आगीच्या भक्षस्थानी पडली. तेव्हा श्री. महाराज यांनी विजापूरमध्ये घरोघरी जाऊन धान्य, वस्त्र व पैसा गोळा केला व ब्राह्मणांचे सांत्वन करून त्यांना पुन्हा उभे केले व एक महिना तेथे वास्तव्य करून त्यांना बोध केला. यावेळी रामेश्वरभक्त श्री पांडण्णा त्यांच्या संपर्कात आले आणि रामेश्वराच्या आदेशावरून त्यांचे शिष्यत्व पत्करले. एवढेच नव्हे, तर नोकरी सोडून श्री महाराज यांच्याजवळच राहू लागले. इ.स. १९४९ साली विजापूरमध्ये श्री. पांडण्णांनी पुढाकार घेऊन एक स्वतंत्र सप्ताह साजरा केला. पुढे अंकलगीचे श्री. देसाई यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले व दत्तजयंती सप्ताह सुरू केला. इ.स. १९५३ मध्ये हुबळीत सप्ताह झाला. या सप्ताहात श्री. रामभट जोशी, ज्योतिषी, हुबळी पंचागकर्ते आले होते. त्यांची गाठ पडली. त्यांच्या आग्रहास्तव हुबळी किल्ल्यातील ईश्वर मंदिरामध्ये साजऱ्या होणाऱ्या चिदंबर जयंती उत्सवात उपस्थित राहून प्रवचन करू लागले. ही प्रथा इ.स. २००२ पर्यंत चालली. नंतर प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते जाऊ शकले नाहीत. दरवर्षी मे महिन्यातही हुबळीत वास्तव्य करून, प्रवचनाद्वारे लोकांना भक्तिमार्गाला लावले.

इ.स. १९५० साली कुळकायदा लागू झाल्यामुळे घरची शेती कुळाकडून सोडवून घेण्यासाठी श्री. महाराज यांचे नाव लावून शेती सोडवून घेतली आणि शेतात झोपडी बांधून काही दिवस तेथे, तर काही दिवस इंचगेरीमध्ये वास्तव्य करू लागले व काही दिवस भक्तांच्या गावी जाऊन त्यांना बोध करू लागले.

कन्नूरला जाण्यासाठी विजापूरहून रात्री उशिरा एकच बस होती. त्यांच्या भेटीला येणाऱ्या भक्तांना त्यामुळे खूप त्रास होत असे म्हणून श्री महाराज यांनी ओढ्याच्या जवळच्या जागेत एक खोली, स्वयंपाकघर व भजनासाठी एक छोटासा हॉल उभारून इ.स. १९६१ साली श्री. रामभट जोशी यांचेकडून वास्तुशांत करवून मग तेथे वास्तव्य करू लागले. येथे येणाऱ्या भक्तांना शांती मिळते आणि झोपडीत राहिलेल्याची आठवण म्हणून वास्तूचे नामकरण 'शांतिकुटीर' असे केले.

इ.स. १९५७ साली श्री महाराज यांचे शिष्य श्री. रामण्णा कुलकर्णी यांनी श्री. महाराज यांना गणेशचतुर्थीस

घरी बोलावून त्यांची पाद्यपूजा करून, त्यांचा वाढदिवस साजरा केला. नंतर त्याचे तीन दिवसांच्या सप्ताहात रूपांतर झाले. इ.स. १९६१ पासून हा जन्मोत्सव शांतिकुटीरमध्ये होऊ लागला. श्री महाराज या सप्ताहात प्रवचन करीत. ही बातमी भक्तांना कळली आणि इ.स. १९६२ पासून अनेक ठिकाणांहून भक्त येऊ लागले. त्यामुळे सप्ताह पाच दिवसांचा करण्यात आला. इ.स. १९६९ साली श्री. महाराज यांची षष्ट्यब्दी मोठ्या प्रमाणात करण्याचे भक्तांनी ठरविले. तेव्हा मंडप घालण्यासाठी आलेले श्री. मल्हारराव सोलापूरकर श्री महाराज यांचेकडे आकर्षित झाले व त्यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. त्यांच्याच पुढाकाराने आर.सी.सी.हॉल, पुढची जमीन विकत घेऊन भक्तनिवास वगैरे निर्माण झाले. पुढे हे काम वाढत जाऊन भक्तांसाठी १२० खोल्या, संडास, बाथरुम, गरम पाण्याची सोय, दत्तमंदिर तयार झाले. श्री महाराज स्वस्वरूपी लीन झाल्यावर त्यांची समाधीही दत्तमंदिराजवळच उभारण्यात आली.

श्री महाराज यांच्या मातोश्रींनी इ.स. १९७५ साली देह ठेवला. त्यांची समाधीही ओढ्याच्या काठी आहे. श्री महाराज यांची मातृभक्ती वाखाणण्याजोगी होती. त्यांच्या मातृसेवेला तोड नाही. मातोश्री शेवटपर्यंत त्यांच्या जवळच होत्या. श्री. महाराज रोज रात्री मातेचे पाय चेपत, तळपायांना तेल लावत. त्यांना घेऊन प्रवासाला जात. व्यासपीठावर त्यांना आपल्याजवळ बसवून घेऊन प्रवचन करीत असत.

शांतिकुटीर आश्रमात दरवर्षी श्री महाराज यांचा जन्मोत्सव साजरा होत असे. आणि पाच वर्षांनी म्हणजे ७०, ७५, ८०, ८५, ९०, ९५ हे उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे होत. या उत्सवात श्री महाराज आपले गुरुबंधू व इतर अनेक संतसत्पुरुषांना आमंत्रित करून त्यांचा बोध भक्तांना प्राप्त करून देत. इ.स. १९८९ साली आम्ही श्री महाराज यांचा 'शांतिकल्पद्रुम' हा चरित्र ग्रंथ प्रकाशित केला. तो ग्रंथ नाशिकचे श्री. एम्. एस्. गोसावी यांच्या वाचनात आला. ते दरवर्षी आपल्या मातापित्यांच्या स्मरणार्थ सद्गुरू पुण्यश्लोक शिव-पार्वती, प्रतिष्ठान तर्फे निरनिराळ्या विषयांतील महान व्यक्तींचा सत्कार करीत. ग्रंथ वाचल्यावर त्यांच्या मनाने असे घेतले की, या वर्षी आपण या महान सत्पुरुषाचा सन्मान-सत्कार करायचा. त्याप्रमाणे ते डॉ. प्रभुणे यांच्यासह कन्नूरला आले व श्री महाराज यांना हा विषय सांगून, नाशिकला येण्याची विनंती केली. प्रसिद्धीपराङ्मुख श्री महाराज यांनी या गोष्टीस स्पष्ट नकार दिला. पण डॉ. गोसावी वारंवार विनंती करीतच राहिले. तेव्हा श्री महाराज म्हणाले, ''तुम्ही आधी आमच्या सप्ताहास तीन दिवस येऊन राहा. आधी तुम्ही आमचे व्हा, मग आम्ही तुमचेच आहोत.'' डॉ. गोसावी यांनी ही अट मान्य केली व इ.स. १९९९ च्या सप्ताहात येऊन तीन दिवस राहिले. तेव्हा मात्र श्री महाराज यांनी नाशिकला येण्याचे कबूल केले व इ.स. २००० साली दि. ११ फेब्रुवारीस हा सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यात श्री महाराज यांना 'शांतिकल्पद्रुम', श्रेष्ठ नीतीज्ञ व अध्यात्म विद्येचे प्रणेते, प. पू. योगीराज' या बिरुदावलीने सन्मानित करून मानपत्र, शाल, श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

संत जग (समाज) सोडून राहात नाहीत. भारतात चाललेला भ्रष्टाचार, अत्याचार, बलात्कार, अराजकता हे ऐकून, पाहून श्री महाराज यांचे मन खिन्न होत असे. यावर उपाय काय याचे ते सतत चिंतन करीत. वय होत आले असल्याने या अन्यायाला विरोध करणारा एखादा पुढे येईल मग आपण त्याला पाठिंबा देऊ असा विचार करून, त्यांनी खूप वाट पाहिली. पण तसे कुणी पुढे आलेच नाही. म्हणून शेवटी त्यांनी स्वत:च इ.स. १९९३ मध्ये 'भारतीय सुराज्य संस्था' स्थापन केली व लोकांना अष्टप्रतिज्ञा घ्यायला सांगून आपल्या भक्तांना रामनवमी सप्ताहात गावोगावी जाऊन तिचा प्रचार करण्यासाठी

दिंडी-पदयात्रा काढण्याचा आदेश दिला. त्यानुसार कर्नाटकातून चार व महाराष्ट्रातून दोन दिंड्या निघत असून त्या नीति-भक्तीचा प्रचार करतात.

श्री महाराज यांनी इ.स. १९३२ साली श्री. स. स. सिद्धरामेश्वर महाराज यांचे आज्ञेने लेखणी हातात घेतली. ती इ.स. २००४ साली शेवटचा 'सुलभ आत्मज्ञान' ग्रंथ लिहूनच विसावली. भक्तांची गरज ओळखून भजनाचा अर्थ कन्नडमध्ये लिहिला.

संप्रदायाचा मुख्य ग्रंथ श्री. दासबोध हा मराठीत असल्याने कन्नड भक्त त्यापासून वंचित होते म्हणून श्री महाराज यांनी त्याचे कन्नडमध्ये भाषांतर केले. तो ग्रंथ अत्यंत लोकप्रिय झाला असून, आतापर्यंत त्याच्या सात आवृत्त्या निघाल्या आहेत. त्यानंतर मनाच्या श्लोकाचे भाषांतर करणे ओघानेच आले. त्यानंतर विवेककुंज, ध्यानयोग, यशस्वी जीवनदर्श, आत्मज्ञानद रसदूट, (आत्मज्ञानाची पंचपक्वान्ने) साधकर दारीदीप (साधकांचा दीपस्तंभ) अध्यात्मद अंगेनल्ली (अध्यात्माचे अंतरंग) अनुभव ज्ञान, आत्मानुभवद साधेनंगळू (आत्मानुभवाची साधने) इत्यादी स्वतंत्र ग्रंथाची रचना केली.

त्याचप्रमाणे सुराज्य संस्थेच्या वतीने जनजागृतीसाठी छोटी छोटी १०-१२ पुस्तके लिहिली. या सर्व पुस्तकांचे मराठी भाषांतर आम्ही केले असून, ती अध्यात्म भांडार कन्नूरमध्ये उपलब्ध आहेत.

कन्नड दासबोध ग्रंथाचे मराठीत भाषांतर करून, आम्ही तो १५ मे २०११ रोजी मा. सुनील चिंचोळकर आदी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित केला.

आश्रमाचे एक मुखपत्र असावे अशी श्री महाराज यांची इच्छा होती म्हणून आम्ही इ.स. १९७९ पासून 'शांतिकुटीर संदेश' नावाचे कन्नड व मराठी त्रैमासिक सुरू केले. गेली ३३ वर्षे ते यशस्वीपणे श्री सद्‌गुरूंचा संदेश घरोघरी पोहोचवत आहे.

श्री महाराज यांचा इ.स. २००४ साली ९६ वा जन्मोत्सव शांतिकुटीर आश्रमात मोठ्या वैभवात व धुमधडाक्यात साजरा झाला. त्यावेळी श्री महाराज यांची तब्येत अत्यंत खालवली होती. त्या अवस्थेतही त्यांनी तीनदा व्यासपीठावर येऊन भक्तांना दर्शन दिले. सप्ताह संपला. श्री महाराज यांचा निरोप घेऊन भक्त आपापल्या घरी परतले आणि पुढे दोनच दिवसांनी दि. २०/९/२००४ रोजी श्री महाराज स्वस्वरूपी लीन झाले. ही बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि भक्त पुन्हा आश्रमी परतले. आश्रम भक्तांनी फुलून गेला.

जनसागराचे ते अलोट स्वरूप श्री महाराजांवरील प्रेम व भक्ती दर्शवत होते. आश्रमातच प्रचंड भक्तसमुदायासमोर अग्निनारायणाने त्यांना आपल्या कवेत घेतले. पुढे आश्रमात त्यांची समाधी उभारण्यात आली. बघता बघता तेरा दिवस झाले. श्री सद्‌गुरूंचा महाप्रसाद घेऊन त्यांना अत्यंत भक्तिभावाने व श्रद्धेने साष्टांग प्रणिपात करून-

*'अखेरचा हा तुला दंडवत । तुला दंडवत ।*
*तुला दंडवत । तव सगुण रुपाला ॥'*

असे म्हणत, सद्‌गुरूंचे रूप मनी आठवून भक्त आपल्या घरी परतले.

# श्रीसमर्थ वाग्देवता मंदिराचे संस्थापक– देव महोदय

*अनंत भालचंद्र चितळे*

श्रीदेवांचा कार्यकाल आता किमान तीन पिढ्यांपूर्वीचा झाला आहे. पण त्यांचे वाङ्मय जुने आणि कालविसंगत न होता सदैव ताजे आणि कालसुसंगत, एवढेच नव्हे, तर महाराष्ट्र समाजाला अधिकाधिक आवश्यक ठरले आहे. नव्या पिढीला देव महोदयांचा परिचय करून देणे अत्यंत इष्ट होय म्हणून येथे थोडक्यात तो प्रयत्न करीत आहे. शंकर श्रीकृष्ण देव ही महाराष्ट्राच्या जीवनातील लोकमान्य-युगाची एक अनमोल देणगी होय. देवांची समर्थभक्ती त्यांच्या कट्ट्या राष्ट्रधर्मनिष्ठेतून निर्माण झाली. विद्यार्थिदशेपासूनच श्रीमत् दासबोध आणि विष्णुशास्त्र्यांची निबंधमाला ह्यांची छाप त्यांच्यावर होती. त्यांचे महाविद्यालयीन आयुष्य पुण्याला लोकमान्यांच्या छायेत विकसित झाले आणि अखेरपर्यंत ते टिळकांचे अंतेवासी म्हणून गणले जात. त्यांच्या रामदासी उद्योगावर लोकमान्यांनीही अधिकृत म्हणून शिक्कामोर्तब केले होते.

लोकमान्यांच्या चळवळीचे लोण उत्तर महाराष्ट्रात पोहोचविण्याचे आणि पसरविण्याचे श्रेय देवांचे आहे. धुळ्याच्या ह्या लोकप्रिय आणि निष्णात वकिलाने आपल्या सार्वजनिक आयुष्याची सुरुवात सत्कार्योत्तेजक सभेची स्थापना, आपले शिक्षण अंतिम अवस्थेत आले असतानाच आपल्या साथीदारांसमवेत केली आणि महाराष्ट्र वैदिक विद्यालयाची स्थापना, श्रीशिवजन्मोत्सव, सार्वजनिक गणेशोत्सव वगैरे कार्य धुमधडाक्याने सुरू केले. तरुण वयापासूनच त्यांनी राष्ट्रीय सभेच्या कार्यात रस घेतला. १९०८ च्या गाजलेल्या सुरतेच्या अखिल भारतीय अधिवेशनाआधी महाराष्ट्राची प्रांतिक परिषद धुळ्याला झाली आणि तिच्यावर जहाल पक्षाचा पूर्ण प्रभाव होता. लोकमान्य आणि परिषदेचे अध्यक्ष अरविंदबाबू घोष हे देवांकडेच उतरले होते. लोकमान्यांनी आरंभिलेल्या साराबंदीच्या शेतकरी चळवळीचा देवांनी खानदेशात इतका परिणामकारक प्रचार केला की तेथल्या युरोपीय जिल्हाअधिकाऱ्याने वैतागून उद्गार काढले की, ‘ह्या भागांत ब्रिटिशांचे राज्य आहे की आणखी कोणाचे?’’

राजवाड्यांच्या परिचयातून श्रीमत् दासबोधाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने सभेने एकदा जे रामदासी वाङ्मयाच्या प्रसिद्धीचे व्रत घेतले ते आजतागायत १०८ वर्षे चालू आहे. श्रीमत् दासबोधाचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी त्याकाळी रामदासी निरूपणांत प्रख्यात असलेले बडोदे-मठाधिपती दादामहाराज ह्यांची कीर्तने-प्रवचने त्यांनी धुळ्याला चार महिने घडवून आणली. सूक्ष्म अध्ययनाअंती त्यांची ती सुप्रसिद्ध ‘दासबोधाची प्रस्तावना’ लिहिली गेली. सन २००४ मध्ये ही प्रस्तावना लिहून शंभर वर्षे पूर्ण झाली. पण ती अगदी काल लिहिल्यासारखी उल्लसित आणि अवीट गोडीची भासते. तीव्र भावनांच्या तरुण

राष्ट्रभक्तांचे तर ते नित्यपाठाचे स्तोत्रच बनले. विनोबाजी तरुण असताना त्यांना ती शब्दश: कंठस्थ होती, असे त्यांचे बंधू शिवाजीराव सांगत. सावरकरांच्या मित्रमेळ्याला मार्गदर्शन करण्यासाठी ते नाशिकलाही जात. समर्थांच्या आणि संप्रदायाच्या त्या वेळी ज्ञात असलेल्या सर्व स्थानांस देवांनी अनेकवार भेटी दिल्या आणि एकेकाळी विद्यापीठांएवढ्या मोठ्या व्यापाच्या असलेल्या अनेक मठांत कालौघांत नष्ट होऊन उरलेल्या हस्तलिखित ग्रंथांचें आणि कागदपत्रांचे संशोधन प्रदीर्घ काळपर्यंत त्यांनी केले. त्या काळी प्रवासाची आधुनिक साधने फारशी नव्हती आणि अंतर्भागांतील बराच प्रवास केवळ बैलगाडीने वा पायी करावा लागे. त्यासाठी देवांनी अनेकदा बैलजोड्याही विकत घेऊन प्रतिवर्षी महिनोन् महिने अशा खडतर प्रवासात क्रमले आहेत. श्रीमत् दासबोधाच्या प्रकाशनानंतर रामदासी ग्रंथमालेतील मण्यांचे प्रकाशन अखंड चालू राहिले आणि त्यासाठी रामदास आणि रामदासी मासिक १९१५ मध्ये काढले गेले. भावनाप्रधान असूनही चिकित्सेत किंचितही उणे नसलेल्या एका व्यक्तीने संशोधनपूर्वक सव्वीस हजार पृष्ठे छापून प्रसिद्ध केल्याचे उदाहरण महाराष्ट्रातच काय, भारतातही बहुधा अपूर्व ठरावे.

इतिहासाचार्य राजवाड्यांच्या रूपाने महाराष्ट्रीय इतिहास संशोधनाचे केंद्र पुण्याहून धुळ्याला देवांमुळेच हालले. राजवाड्यांच्या साहचर्यातून एकनाथपूर्वकालीन ज्ञानेश्वरी, तिच्या भाषेचे व्याकरण, ऐतिहासिक सूच्या, समर्थपूर्वकालीन काही काव्यरचना, ज्ञानेश्वरी कोश इ. बहुत सामग्री छापली. ह्या सर्व छपाईसाठी देवांनी आत्माराम छापखाना काढला.

लोकमान्यांना सहा वर्षांची शिक्षा झाल्यावर त्यांनी प्रसिद्ध ताईमहाराज खटल्यातील बाबामहाराजांचे दत्तकपुत्र बालवयीन जगन्नाथमहाराज ह्यांना सांभाळण्याची जबाबदारी देवांवर सोपविली. गोविंदराव चांदोरकर, गोपाळराव गोगटे आणि भास्करराव भट ह्यांचे, सहाध्यायित्वापासून काव्येतिहासव्यासंग क्षेत्रात देवांना हार्दिक सहकार्य असे. पण देवांना आयुष्यभर विविध क्षेत्रांतील प्रत्येक व्यापात विष्णु सीताराम तथा आप्पासाहेब रणदिवे ह्यांचे आत्मीय सहकार्य लाभले. पाताळे तालमीतील उत्साही युवजन आणि रणदिवे बंधू ह्यांच्यामुळे धुळ्यात देव म्हणत ते होऊ शके. गांधीजींच्या चंपारण्यातील सत्याग्रहात देवांचे वडीलबंधू डॉ. हरि श्रीकृष्ण आणि रणदिवे ह्यांची स्वयंसेवक-चमूही सहभागी झाली होती. डॉ. देव हे गोपाळ कृष्ण गोखल्यांचे निकटवर्ती आणि भारत सेवक समाजातील स्थापना सदस्य होते. लोकमान्यांच्या पश्चात् गांधीजींच्या चळवळीत देव सहभागी झाले, पण त्यांचा कौन्सिलबहिष्कार देवांना मान्य नव्हता. खानदेशभर सर्वत्र पसरलेल्या पक्षकारांमुळे निवडणूक खर्च अवघा अडीचशे रुपये करून, मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळात देव घवघवीत बहुमताने निवडून आले. विधिमंडळाच्या सदस्यत्वाचे कर्तव्यही त्यांनी अतिशय चोखपणाने पार पाडले. प्रत्येक अधिवेशनानंतर ते अधिवेशनाची माहिती आणि भत्त्यांचा हिशोब जनतेला सभेद्वारे देत. काही काळ ते महाराष्ट्र खादी मंडळाचे अध्यक्ष होते. १९२८ चा गांधीजींचा खानदेश दौरा मिनिटन् मिनिट देवांनीच आखला होता, पण हळूहळू राष्ट्रीय सभेच्या अनुनयात्मक धोरणांशी त्यांचे मतभेद होऊ लागले आणि त्यांनी पक्षीय राजकारणातून आपले मन काढून घेतले.

रामदासस्वामी संस्थानच्या अधिकारपदावर त्यावेळी श्रेष्ठांचे वंशज श्री बापूसाहेब महाराज होते, आणि देवांच्या मठामठांतील कार्यास त्यांचा पूर्ण आशीर्वाद होता. सज्जनगडावर श्री समर्थ संप्रदाय जीर्णोद्धार मंडळ काढून जमविलेल्या वर्गणीतून देवांनी १९१८ मध्ये मठासमोरील अंगणाची दगडी फरशी केली. ऐतिहासिक कागदपत्रांतील वर्णनावरून शिवथरच्या घळीचा शोध देवांनी १९१० मध्ये लावला आणि तिच्याविषयी १९१५ च्या रामदासीच्या अंकात 'पृथ्वीवरील स्वर्ग' म्हणून लेखही लिहिला.

श्रीसमर्थांच्या जन्मस्थानी- मराठवाड्यातील आंबड

परगण्यातील जांब येथे श्री समर्थांचे मंदिर बांधण्याचा देवांनी निश्चय केला. निजामाच्या राज्यात जुन्या देवळांचीही जेथे नीट धडगत नव्हती तेथे मंदिर बांधण्यास शासनाची अनुमती मिळणे जवळ जवळ अशक्य होते. मुंबई इलाखा विधिमंडळाचे सदस्य म्हणून देवांनी सर्व पातळ्यांवर भरपूर प्रयत्न केल्यावर आणि निजामाचे दिवाण सर अकबर हैदरी ह्यांना भेटून स्थानिक वजनदार मंडळींचा उपयोग केल्यावर परवागनगी मिळाली. आसेतुहिमाचल आणि क्वेट्ट्यापासून कलकत्त्यापर्यंत दौरे-प्रचार-भाषणे करून महाराष्ट्रीय मंडळींच्या वर्गणीतून देवांनी जांबेचे श्री समर्थमंदिर बांधले, स्थापनेचा फार मोठा महोत्सव केला आणि संप्रदायाचे एक नूतन क्षेत्र निर्माण केले.

१९२६ मध्ये राजवाड्यांचे निधन झाल्यावर त्यांचे स्मारक म्हणून धुळ्यास राजवाडे संशोधन मंडळ स्थापण्यामध्ये देवांचा सिंहाचा वाटा होता. स्वत: विधिमंडळाचे निर्वाचित सदस्य असल्याने त्यांनी शासनाकडून मोठी जागा अनुदान म्हणून मिळविली आणि बेळगांवच्या साहित्य संमेलनात प्रभावी भाषण करून वाङ्मयप्रेमिकांचेही भरीव साहाय्य संपादिले.

मठामठांतून जमविलेली हजारो हस्तलिखिते आणि कागदपत्रे ह्या निरुपम राष्ट्रीय ठेव्याचे निरंतर संरक्षण व उपयोग ही व्हावीत आणि त्याचे अध्ययन व्हावे ह्यासाठी त्यांनी श्री समर्थ वाग्देवता मंदिराची धुळ्याला स्थापना केली. त्यात खुद्द श्री समर्थांच्या हातचे पृथ्वीमोलाचे एकमेव गद्य पत्र, त्यांनी तपस्येच्या तरुणवयात स्वत: लिहिलेली वाल्मिकी रामायणाची पोथी, अनेक शिष्यप्रशिष्यांची हस्तलिखिते आणि विख्यात ऐतिहासिक पुरुषांची हस्ताक्षरे, अशा हजारो दुर्मिळ लेखरत्नांचा समावेश आहे. ह्या संग्रहांतील प्रत्येक बाडाची चिकित्सात्मक माहिती रामदासी संशोधनाच्या दोन खंडांत त्यांनी ग्रंथित केली. नुसती नीरस सूची अशा स्वरूपाचे हे खंड नसून, त्यात संप्रदायाचे आणि शिष्यप्रशिष्यांचे अनेक अंगांनी दर्शन होते. भावी संशोधकांना ह्यात मार्गदर्शनही आहे. जागोजाग देवांची समर्थनिष्ठा प्रकर्षाने प्रतीत होते. ''रामदासी पंथ खरोखर भाग्यवान की त्याला देवांसारखे संशोधक लाभले,'' असे उद्गार थोर वाङ्मयसेवकांनी काढले आहेत. जांबेसारख्या खोलवरच्या खेड्यात - जेथे आधुनिक बांधकामाची एकही वस्तू लभ्य नव्हती आणि सामग्र्याने सौकर्य नव्हते अशा अवघड ठिकाणी श्री समर्थमंदिर, दासविश्रामधाम, धुळ्याचे वाग्देवता मंदिर, अभ्यागताश्रम, स्वत: देवांचा हरिहराश्रम हा निवास आणि सभेचे सभागृह ह्या सर्व वास्तूंचे सुरेख बांधकाम त्यांच्या परमस्नेह्यांचे चिरंजीव वास्तुविशारद वासुदेवराव गोगटे ह्यांनी केले. १९४४ च्या धुळ्यातील साहित्य-संमेलनाचे देव स्वागताध्यक्ष होते. अशी अनेक सार्वजनिक महत्त्वाची कामे नानासाहेब देवांनी पार पाडली आणि गोजीवन बाळकृष्णांची 'नाना मंडळे हालवी' ही कोटी सार्थ केली.

'दासबोधाचे कर्ते श्रीसमर्थ नव्हेत,' ह्या भय्याशास्त्री जामखेडकरांच्या म्हणण्याचा त्यांनी 'दासबोधाचे कर्ते दुसरे कोण असणार?' या प्रदीर्घ निबंधाद्वारे इतका बिनतोड प्रतिवाद केला की, त्या शास्त्रीबुवांनी महाराष्ट्रात पुन्हा म्हणून डोके वर काढले नाही. शिवसमर्थ भेटीच्या काळाच्या वादाला मात्र महाराष्ट्रातील गढूळ होत चाललेल्या सामाजिक वातावरणाचा संदर्भ होता. कागदपत्रांची, परिस्थितिजन्य, तार्किक अशी अनेक प्रकारची प्रमाणे उघड असताना एक नक्कल पत्र आणि राजकारण शब्द ह्यांच्या अर्थाची हवी तशी ओढाताण करण्यामुळे फाटकांच्या हातून विशिष्ट मंडळींच्या हाती कायमचे कोलीत मिळण्याचा धोका होता. देवांनी ठिकठिकाणी भाषणे देऊन ह्या वादाचा खरपूस समाचार घेतला आणि फाटक पक्षाची बंभेरी उडवून दिली. पांगारकर, आळतेकर, करंदीकर, माटे, पेंडसे प्रभृती मोठमोठे वाङ्मयकार देवांच्या पक्षात होते.

धुळे साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदाचा वाद विकोपाला जाऊ लागला, तेव्हा देवांनी स्वागताध्यक्षपदाचा राजीनामा दिला. अत्र्यांनी लिहिले, ''नानासाहेब नसतील

तर धुळ्यात काय उरेल? नुसते दगड अन् माती! देव स्वागताध्यक्षपदी नसलेल्या संमेलनाला येण्याचा नुसता भाडेखर्चही कोणी करणार नाही!'' 'देवांच्या भाषेसारखी स्वच्छ आणि झुळझुळीत भाषा आता दुर्मिळ झाली आहे,' अशी प्रशस्ती भाषाप्रभु कृ. पां. कुलकर्णी ह्यांनी केली आहे.

श्री समर्थांचे तत्त्वज्ञानच पुन्हा महाराष्ट्राच्या कर्तबगारीला उधाण आणेल आणि महाराष्ट्रधर्म जागवून भारतीय राष्ट्राला-भाषेला-संस्कृतीला भाग्याचे दिवस आणेल असा देवांचा ठाम आणि सार्थ विश्वास असल्यामुळे, श्री रामदासी बाण्याचा अंगीकार केलेले समर्थसेवक कार्यकर्ते ठिकठिकाणी निर्माण व्हावेत म्हणून त्यांनी श्रीसमर्थसंघाची स्थापना केली. समर्थसंघाचे अध्यक्ष होते, पुढे स्वतंत्र भारताच्या पहिल्या संसदेचे सभापती झालेले ग. वा. मावळंकर. संघाच्या चालनेचा प्रचार करण्यासाठी देवांनी उतारवयात सुद्धा बृहन्महाराष्ट्रात अनेक दौरे केले. अनंतमौनींचे अरुणाचलम् आणि मेरुस्वामींची मन्यारगुडी येथे दर्शन घेण्यासाठी केलेल्या दक्षिणेच्या दौऱ्यात त्यांनी रमणमहर्षींच्या आश्रमासही भेट दिली. 'रामसोहळ्या'त काय आल्हाद असतो, तो ह्या आश्रमात अनुभविला,' असे धन्योद्गार त्यांनी श्रीरमणांपाशी काढले. सुमारे ५७ वर्षे सत्कार्योत्तेजक सभेला स्वत:ची वास्तू नव्हती. देवांनी महाराष्ट्रातील जनतेचे साहाय्य मिळवून सभेच्या सभागृहाची बांधणी केली आणि आपला हजारो निवडक ग्रंथांचा दुर्मिळ संग्रह सभेला दिला.

आपल्या आयुष्याभराच्या समर्थवाङ्मयेतिहास-अवगाहनाने आणि प्रदीर्घ चिंतनाने त्यांनी समर्थांचे त्रिखंडात्मक चरित्र लिहून पूर्ण केले. श्री समर्थांचे तत्कालीन स्थितीच्या पार्श्वभूमीवरील साधार चरित्र, त्यांच्या वाङ्मयाच्या आढाव्याने त्यांचे अंतरंग दर्शन, श्री समर्थांच्या उपासनामार्गाची व समुदाय-संघटनेची ओळख आणि तिचे उदात्त तत्त्वज्ञान ह्यांचे दर्शन घडविणारा हा अपूर्व आणि अतुलनीय ग्रंथ अथांग गुरुभक्तिरसाने संपृक्त झालेला आहे. व्यक्तीच्या उद्धाराचा, महाराष्ट्राच्या उत्कर्षाचा आणि मानवतेच्या सार्थक्याचा मार्ग त्यात स्पष्ट केला आहे.

श्री समर्थांचे त्रिखंडात्मक चरित्र म्हणजे समर्थहृदय देवांच्या कार्यसिद्धीचा कळसाध्याय होय. ह्या तीनही खंडांतील प्रत्येक शब्द म्हणजे श्रीदेवांच्या आयुष्यभराच्या समर्थभक्तीचे आणि व्यासंगाचे फळच मानावे लागेल. 'मराठी वाङ्मयातील कौस्तुभ' असे ह्या ग्रंथाचे कौतुक समर्थनिष्ठ श्री. म. माटे ह्यांनी केले आहे. उत्तम भाषेमुळे मान्यतेस प्राप्त झालेले अनेक ग्रंथ असतात, पण काही मोजक्या ग्रंथांची अशी श्रेणी असते की त्यांच्यामुळे भाषेचाच सन्मान होतो. हा ग्रंथ ह्या कोटींतला आहे. रामदासी संप्रदायांत श्रीसमर्थपर वाङ्मयात देवांचे लेखन म्हणजे 'शेवटचा शब्द' मानले जाते. अशा ग्रंथांपासून अनेक दृष्टींनी समाजाला केवळ उच्च प्रतीचा लाभ व्हावयाचा हे ठरलेलेच आहे.

लहानपणापासून विशेष अपेक्षेने वाढविलेले त्यांचे थोरले चिरंजीव आणि एकमेव प्रिय शिष्य आबासाहेब ह्यांनी १९३४ ते १९५० ही सोळा वर्षे रामदासीचे अतिशय समर्थपणे संपादन केले. श्रीकल्याण आणि श्रीवेणाबाई ह्यांच्या चरित्रवाङ्मयशिष्यावलि ह्या स्वरूपाचे ग्रंथ तयार केले. आपला व्यासंग सखोल केला, अंत:करणात श्रीसमर्थांची भक्ती दृढमूल केली आणि देवांच्या त्यांच्यावरील विश्वासाला सुपुत्रत्वाचा आणि सच्छिष्यत्वाचा मोठा आश्वासक प्रतिसाद दिला. आबासाहेब हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हासंघचालक होते. अत्यल्प आजाराने आबासाहेब अकस्मात रामाज्ञा पावले आणि पुत्रशोकापेक्षा शिष्यशोकाचा - कार्यनाशाचा वयोवृद्ध देवांना जबर धक्का बसला. धीरोदात्तपणे त्यातूनही त्यांनी स्वत:ला सावरले. पण आपल्याच ध्येयवादाशी एकरूप झालेल्या चिरंजीवांच्या आठवणीने त्यांच्या दु:खाचा बांध फुटे आणि ते श्री समर्थांचा धावा करीत. श्रीसमर्थपर गोष्टींशिवाय अन्य बाबतींत त्यांच्या मनाने लक्ष घालणेच

जणू सोडून दिले आणि त्यांना विस्मरण होऊ लागले. रामरायांनाही जे चुकले नाही त्या भोक्तृत्वातून आजवर कोण सुटले आहे? देवांचे कार्य मंद झाले, ही संप्रदायाची आणि महाराष्ट्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली. देवांच्या मागे देवांच्या संस्था श्री. शिवाजीराव भावे, देवांचे भाचे नरहरपंत शिदोरे ह्यांनी चालविल्या आणि त्यानंतर विठूआण्णा भागवत, हणमंतराव वैष्णव, श्रीधरपंत नाईक, दादासाहेब चौधरी, वा. गो. गोगटे, विष्णुजी क्षीरसागर, डॉ. खटावकर, डॉ. चितळे, प्रा. पाणदरे, आदी मंडळींनी संस्थांचे यथाशक्ती संगोपन केले. १९७१ मध्ये देवांची जन्मशताब्दी पुण्यास मोठ्या प्रमाणात साजरी झाली आणि त्यासाठीच्या समितीने देवस्मृतिग्रंथ प्रकाशित केला. त्यात देवांचे सविस्तर चरित्र आणि देवांना मानणाऱ्या अनेक व्यक्तींच्या आठवणी, ह्यांनी देवांच्या जीवनकार्याचा परिचय करून देण्यात आला आहे.

रामदासी ग्रंथमाला आणि रामदासी मासिक ह्यात देवांनी सुमारे ५० वर्षे अखंड लेखन केले. रामदासी ग्रंथमालेतील सारभूत प्रस्तावना, रामदासी मासिकाची रंगीत पाने, सांप्रदायिक विविध विषय, सांप्र. वृत्त चर्चा जीर्णोद्धार, रामदासी संशोधन, श्रीसमर्थचरणी अर्पिलेले ११ सुमनहार ह्या सर्वांतील लेखनांतून त्यांच्या निरुपम व्यक्तिमत्त्वाचे दर्शन होते. तत्कालीन महाराष्ट्रीय समाजातही त्यांच्या कार्यचरिताबद्दल कसे कौतुक व आदर होता ते चित्रावांच्या अर्वाचीन चरित्रकोशावरून समजते. सद्‌गुरुस्तवराज आणि स्फुट कविता ह्या त्यांच्या कवन-संग्रहांत त्यांच्यातील भक्ताचे दर्शन घडते.

ह्या शतकाच्या पूर्वार्धात देव अमोघ वाणीचे एक गाजलेले वक्ते होते. ''ओज आणि आर्जव, सौजन्य आणि शालीनता, कळकळ आणि आवेश, भाषेची प्रतिष्ठा आणि विचारांची ऋजुता, लाघव आणि करारीपणा - वा वा! काय वर्णन करावे त्या भाषणाचे! सारा मंडप त्यांनी मंत्रमुग्ध करून टाकला. आपादमस्तक पांढऱ्याशुभ्र पोषाखातील गोऱ्यापान, तेजस्वी, उंचीला भरपूर असा हा समर्थभक्त जेव्हा नादमधुर आणि लयबद्ध वाक्ये उच्चारू लागला, तेव्हाच त्याने बोलता बोलता सभा जिंकली!'' असे त्यांच्या वक्तृत्वाचे यथार्थ वर्णन आप्पा पेंडसे ह्यांनी सुरसपणे केले आहे. विशेष लेखनशैलीचे ते सिद्धहस्त लेखकही होते. मोकळेपणा, प्रांजळपणा, सोज्ज्वळपणा, नेमकेपणा, प्रेरकपणा ह्या साऱ्यांचा मनोज्ञ संगम त्यांच्या लेखनशैलीत प्रत्ययाला येतो. वाचकाला विश्वासात घेऊन हितसंवाद करतच जणू, ते मोठ्या वेधकपणाने आपले मनोगत व्यक्तवीत. त्यांच्या प्रामाणिक, शुद्ध आणि तळमळीच्या उदात्त भावाने कोणीही भारला न गेला तरच नवल!

श्रीसमर्थचरित्रग्रंथसंप्रदायादी विषयक अध्ययन करताना देवांचे ग्रंथ हे पायाभूत आहेत. त्यांच्या आधारावरच अन्य मंडळींच्या पुढील रचना झाल्या व होत आहेत. गोजीवन बाळकृष्णबुवा चौंडे, ब्रह्मचारी विनायकबुवा मसुरकर, अनंतदासजी, धेनुदासजी, समर्थदास केशवबुवा, नारायणबुवा गोडसे, प. पू. श्रीधरस्वामी प्रभृती परमआदरणीय श्रीसमर्थभक्त मंडळी संप्रदायांत ह्या शतकाच्या पूर्वार्धात फार विख्याति पावली आणि ती सर्व देवांना अतिशय मानीत. 'मुख्य हरिकथानिरूपण । दुसरे ते राजकारण ।' ह्या श्रींच्या ओवीतील संतुलितता देवांच्या ध्येयधोरणात स्पष्ट दिसून येते. अध्यात्मसाधना हा जीवनातील अढळ ध्रुव असला तरी धर्म-संस्कृतीचे रक्षण आणि त्यासाठी त्यांच्या कठीण काळात अखंड सावधानतेने राजकारणाचा पुरस्कार, ही सुद्धा अपरिहार्य होत, असे सद्‌गुरुरायांनी आदेशिले आहे. त्याचे तंतोतंत आचरण देवांनी आयुष्यभर केले, हे त्यांचे अद्वितीय वैशिष्ट्य होय. ''एक वेळ दुर्जनांचा उपद्रव परवडला पण सज्जनांचे बाजूला राहाणे समाजाला अधिक महाग पडते,'' हे म्हणणे अगदी खरे आहे आणि प्रस्तुतची सामाजिक अवस्था ही ह्याच प्रकारची परिणामस्वरूप आहे, ह्याकडे सांप्रदायिकांनी दुर्लक्ष करू नये, अशी विनंती येथे अधिकार नसताही करावीशी वाटते. देवांच्या

जीवनातून हा बोध घेतला जाणे आवश्यक आहे.

त्यांच्या हस्ताक्षरावरून त्यांच्यात मुरलेली टापटीप आणि दक्षता दिसून येई. गडावर दूर एकांतांत सद्‌गुरुचरणांचे चिंतन करीत ते कसे बसत ते श्रीधरस्वामींकडूनच ऐकावे. सद्‌गुरूंचा प्रदीर्घ वावर झालेल्या शिवथरच्या सुंदरमठांतील पावन धूली मस्तकावर धारण केल्याशिवाय त्यांना राहावत नसे. श्रीसमर्थकार्यामध्ये येताना आधी स्वत:ला जाळून घ्यावे अशी त्यांची इशारत आहे. देव अतिशय प्रसिद्धिपराङ्‌मुख होते. आत्मौपम्याची ते मूर्तीच होते. रामदासी मासिकावर संपादक म्हणून त्यांचे नावही छापलेले नसे. स्वत: केलेल्या सर्व गोष्टींचे श्रेय ते सत्कार्योत्तेजक सभेच्या नावावर टाकीत. गडावर समाधिमंदिराच्या सभागृहात लावलेली त्यांची तसबीर त्यांनी काढायला लावली. 'आपुले सर्व हरावें । गुरूंचे सर्व राहावे' ही देवांची भूमिका होती. राष्ट्रगुरू समर्थांवर त्यांची प्राणापलीकडे निष्ठा होती. अनन्य भक्ती म्हणजे काय? ती जीवनात उतरणे म्हणजे काय? हे त्यांच्या आयुश्चरितात स्पष्ट होते. त्यांची संशोधन-लेखन-वक्तृत्व-प्रचार ही सारी आत्मिक उद्धारासाठी होती. तीच त्यांची अंतरात्म्याची उपासना होती, म्हणून त्यांत प्रबोध आणि प्रसाद अनुभवाला येतो. कोरडा अभ्यास त्यांना मान्य नव्हता. श्रीसमर्थवाङ्‌मयाचे अध्ययन भिजलेल्या अंत:करणानेच व्हावयाचे, उपास्य दैवताच्या आज्ञा पाळण्यानेच त्याची कृपा प्राप्त होऊ शकते, ही त्यांची सूत्रे होत. आपली विद्वत्ता पाजळणे असा मर्यादित हेतू त्यांचा लवमात्र नसे, हे त्यांच्या भूमिकेचा परिचय करून घेताना आधी ध्यानात घेतले पाहिजे. देवांची भूमिका लक्षात न घेता अन्यथा समज करून घेऊन त्यांच्या कार्यावर, सहृदयतेच्या अभावाने, विसंगत सूर उमटवून अन्याय केलेला क्वचित दिसतो, तेथे ही गोष्ट दृष्टिआड होता कामा नये. श्रीसमर्थचरणाची गोडी निर्माण झालेल्यांना देवांचे चरित्र उत्तुंग आदर्श वाटल्याशिवाय राहाणार नाही. देवांचे वाङ्‌मय सहृदयतेने वाचल्यास ही गोडी निर्माण झाल्याशिवाय राहाणार नाही. भाग्य महाराष्ट्राचे की, श्रीसमर्थचरणांचे दर्शन घडविणारी, त्यांची कृपा संपादावयास शिकविणारी अमर ग्रंथसंपत्ती मागे ठेवून देवांनी पुढीलांची कायमची व्यवस्था केली आहे. 'श्रीशिवसमर्थांचे स्मरण हेच राष्ट्राचे जीवन आणि त्यांचे विस्मरण हे राष्ट्राचे मरणच!' हा त्यांचा संदेश महाराष्ट्रधर्माची चाड बाळगणाऱ्या प्रत्येकाने हृदयावर कोरून ठेवला पाहिजे. श्रीसमर्थसंघ हे देवांचे अपुरे स्वप्न शक्य तेवढ्या लवकर प्रत्यक्षात आणल्याशिवाय रामदासांकित महाराष्ट्राला श्रीसमर्थकृपा वोळण्यासाठी दुसरा मार्ग नाही.

# आदर्श रामदासी - श्रीदत्ताबुवा



**शरद कुबेर**

*भक्तिधाम, पोवई नाका, सातारा ४१५ ००१*

**।। श्रीराम समर्थ ।।**

*आदिनारायणं विष्णुं ब्रह्माणंच वसिष्ठकम् ।*
*श्रीरामं मारूतं वन्दे रामदासंच श्रीधरम् ।।*
*नमः शान्ताय दिव्याय सत्यधर्मस्वरूपिणे ।*
*स्वानंदामृततृप्ताय श्रीधराय नमोनमः ।*
*दत्तात्रेयी ब्रह्मविद्या संवेद्या नंदविग्रहम ।*
*त्रिपान्नायणाकारं दत्तात्रेयमुपास्महे ।*
*।। जय जय रघुवीर समर्थ ।।*

परमपूज्य श्री दत्तामहाराजांचा जन्म ईश संकेताने भाद्रपद पौर्णिमा शके १८३५ रोजी श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथे जेरे वंशात झाला. त्यांच्या जन्माचेवेळी त्यांचे पिताजी बाळकृष्णपंत, प. पू. थोरले महाराज वासुदेवानंद सरस्वती यांच्या सेवेत गरुडेश्वरी मुक्कामी होते. पुत्रजन्माचे वर्तमान सांगून श्रीटेंबेस्वामींनी त्यांना वाडीस जाण्याची आज्ञा केली. पुढे श्री टेंबेस्वामींनी समाधी घेतली.

वाडीस यावेळी प्लेगने धुमाकूळ घातला होता. त्यात बाळकृष्णपंत निवर्तले. ते त्यांचा व्यवसाय होता, तो, तुकारामवृत्तीने करीत. तो सर्व बुडाला. भालचंद्र, थोरले बंधू - त्यांना दादा म्हणत- आई, बहीण यांना वाडी सोडावी लागली. दादा वयाने फार मोठे नव्हते. पण अकाली प्रौढपण आले. त्यांना शाहू छत्रपतींच्या सरकारी शाळेत शिक्षकाची नोकरी होती. काही काळाने ते बेळगावला फातरफेकरांच्या मळ्यात राहाण्यास गेले. तेथेच श्रीमहाराजांचे शालेय शिक्षण झाले. लगेच नोकरीही लागली, ती अक्कलकोटच्या शाळेत. तथापि मुख्याध्यापक अनेक गुणसंपन्न होते. त्यांचेशी काही जमले नाही. ती नोकरी सोडून दिली व बेळगावला आले. अर्थातच हे वडील बंधूंच्या मनाविरुद्धच घडले!

बेळगावला गणपत महाराज म्हणून होते. ते पंढरपूर वारी करीत. श्रीमहाराजांनी त्यांच्याबरोबर वारीला जाण्याच्या निमित्ताने बेळगाव सोडले व पंढरपूरला आले. चातुर्मासात प्रवचन, भजन, कीर्तनाचा मोठा रंग माजला होता. तेथे ते रमले. चातुर्मास संपला पण घरी परतण्याचा विषय नव्हता. तेथून कुठे जायचे हे ठरवले नव्हते. पण रस्ता चालतच होते. मंगळवेढ्यास काही काळ थांबले, पुढे नगर व नगर मार्गे रामरायाने त्यांना नाशिकला आणले. रामरायाचेच चिंतन करीत पावले टाकीत. डोळ्यांसमोर रामराय दिसत. अदृश्य झाले की तेथेच मुक्काम करायचा.

काळाराम मंदिरात एका ओसरीत, पसरण्यासाठी पथारी नव्हतीच, देह विसावला. गंगास्नान व श्रीरामदर्शन हीच दिनचर्या. शेजारी तशाच वृत्तीचा एक साधू होता. त्याने भिक्षा मागून काहीतरी खावे असे सुचविले. मग भिक्षा मागून आणू लागले.

पावसाळ्यात गंगेला पूर आलेला. आणलेली भिक्षा

रूक्ष. ती न पचल्याने एकदा अतिसार झाला. प्रत्येक वेळी बहिर्दिशेस गेले की, गंगास्नान करून येण्याचा नियम. अशक्तपणाने भोवळ येऊन घाटावरच पडले. पाऊस कोसळत होता. नदीचे पात्र तुडुंब भरून वाहत होते. पाऊस थांबल्यावर त्या साधूने शोध घेतला व त्यांना उचलून ओवरीत आणले.

काही काळ असाच गेला. प्रभु रामचंद्राने दक्षिणेस जाण्याची आज्ञा केली, निघाले. सातारला आले. कमानी हौदाजवळील तुळजा मंदिरात थांबले. तिथे एक तबलावादक होते. (तबलापेटी सुरतालाचे ज्ञान होतेच.) यांनाही थोडेसे शिकावेसे वाटले. १-२ दिवसांतच तबलावादकाच्या छंदीफंदी वागण्याचा अनुभव घेतला. जवळच श्रीसमर्थांचा सज्जनगड आहे असे कानावर होतेच. सातारहून निघाले व सज्जनगडावर दुपारी पोहोचले.

श्रीरामरायाचे, श्रीसमर्थांचे दर्शन घेऊन खंबाळा तळ्यावर पाण्यात पाय सोडून बसले होते. ती वेळ प. पू. भगवान श्रीधरस्वामींची माध्यान्ह स्नानाची होती. ते तळ्यावर आले. ह्या श्रांत तरुणाकडे पाहिले, विचारले, 'बाळ, कोठून आलास? भोजन प्रसाद घेतला का?' चेहऱ्यावरून सर्व दिसतच होते. यांनी श्रीस्वामींकडे पाहिले. श्रांत मनाला विश्रांती लाभली. 'बेळगांवाहून आलो. दत्ता नाव आहे.'

'चला, दत्ताबुवा बेळगावंकर, श्रीसमर्थांचा थोडा प्रसाद घ्या.' गेले. प्रसाद घेतला. श्रीस्वामींनी नामकरण केलेच होते. सर्वामुखीं तेच झाले.

हा दैवी संकेत होता. श्रीसमर्थांनी अवतार घेतला कीं कल्याण येणारच! रामकृष्ण एकटे येऊन कार्यसिद्ध होत नाही. पाठोपाठ विवेकानंद' यावेच लागतात! श्रीधर स्वामीजी अवतरले की सेवेत दत्ताबुवा असणारच!

श्रीस्वामींच्या सेवेत श्रीमहाराज रुजू झाले. श्रीस्वामीजींनी श्रीसमर्थ सेवेचा एक कठोर परीक्षा घेणारा मानदंड दिला. त्यांनी श्रीमहाराजांनाही त्याच मुशीतून तावून सुलाखून घेतले.

श्रीस्वामीजी तेव्हा बालाजी मठीत असत. श्री महाराजांना तिथेच जवळ ओवरीत राहावयास मिळाले. श्रीस्वामीजींचा दिवस पहाटे तीन वाजता ब्राह्ममुहूर्तावर उजाडे. ते तेव्हा तळ्यावर स्नानास जात. श्री महाराज तत्पूर्वी उठून स्नानादी उरकून जागेची स्वच्छता, स्वामीजींचे आसन व्यवस्थित करून ठेवीत. वस्त्र, पात्रे स्वच्छ, झळफळीत ठेवीत. निर्मळ जळ भरून ठेवीत. श्री स्वामींचे ध्यान-जप झाल्यावर श्रीसमर्थांच्या समाधीच्या सेवेस जात. अंगावर एखादेच वस्त्र असे. श्रीस्वामींचेही तसेच. दोघांनाही पसारा असा आवडतच नव्हता. लोकांचाही फार लळा नव्हताच. श्रीसमर्थ सेवेबरोबरच जप, ध्यान-धारणा, साधना, चिंतन, मनन, लेखन याव्यतिरिक्त दिनचर्येत बाकी सर्व गोष्टींचा अभावच होता.

श्रीस्वामींचे बरोबरच कर्नाटकात गेले. शिगेहळ्ळी मठात असत. जंगलातून लाकडे आणून देण्याची सेवा होती. त्यानिमित्ताने जंगलातील एकांताची, तशा स्थानांची गोडी वाढली. श्रीस्वामीजींची एकान्तस्थाने माहीत झाली. श्रीस्वामींनाही हे एकांतात कुठे जातात हे माहीत होते.

पुढे श्रीस्वामी वरदहळ्ळीस गेले. दोघेच होते. देवी मंदिरात वास्तव्य होते. पुढे याच देवळाच्या मागच्या टेकडीवर श्रीस्वामींसाठी शिखर कुटी बांधली. कुटी कसली? पावसापाण्याचा आडोसा! जमीन म्हणजे चिखलच. दाट जंगल, प्राण्यांचा आणि सर्प इंगळ्यादींचा तो परिसर. उजेडात सर्व व्यवहार उरकणे, बाकी सर्व किर्र अंधार. पिण्याचे पाणी मिळणे मुष्किल म्हणून श्रीस्वामींनी देवी मंदिरात तीर्थ निर्माण केले. आता पुढे मोठा तलावही झाला आहे.

शिखर कुटी टेकडीच्या शिखरावर, नंतर मध्ये मध्यकुटी बांधली गेली. तिथे श्रीमहाराज व गंगाक्कादी साधक राहात. कुंडाजवळ सेवक कुटी होती. आता ती नाही.

श्रीस्वामींनी श्रीसमर्थकार्याच्या प्रचारासाठी (पाद्यपूजेच्या निमित्ताने) कर्नाटकातील घर आणि घर पिंजून काढले

आहे. श्रीमहाराज बरोबर असायचे. पाद्यपूजा झाल्यावर स्वामीजी उठून चालू लागत. पादुकांवरील द्रव्य, फळे, प्रसाद तसाच राही. ते सर्व गोळा करून तेथील यजमान श्रीमहाराजांकडे देऊ लागल्यावर श्रीमहाराज त्यांना विनम्रपणे म्हणत, 'श्रीस्वामींनी हे इथे सोडून दिले आहे, मी कशासाठी त्यात गुंतून पडू?'

श्रीस्वामींनी रामपाठ आणि समर्थपाठाची रचना केली. ती समर्थांपुढे सादर करण्यासाठी यांना सांगितले. सज्जनगडावर आले आणि श्रीसमर्थसमाधीसमोर श्रीसमर्थ पाठ म्हटला. तेव्हा श्रीसमर्थांनी प्रत्यक्ष दर्शन दिले. (पुढे समर्थहृदय देवांनी हा समर्थपाठ रामदास रामदासीत प्रथम छापला.)

श्रीमहाराजांची प्रज्ञा आणि स्मरणशक्ती अलौकिक होती. कर्नाटकात प्रथम श्रीस्वामीजींच्या बरोबर गेले तेव्हा कानडी येत नव्हते. श्रीस्वामीजी कानडीत प्रवचन करीत. हे प्रवचनाचे शब्द लक्षात ठेवून कुटीवर आल्यावर कागदावर उतरवीत. मग श्रीस्वामीजी त्यांना मराठीत अर्थ सांगत. श्रीस्वामीजींच्या या काळातील सर्व रचनांचे कल्याणलेखक श्रीमहाराजच आहेत. श्रीस्वामीजी श्रीमहाराजांशी ग्रंथलेखनाच्या विषयासंबंधी अनेकदा चर्चा करीत. 'स्वात्मनिरूपणाची' रचना होत असताना छंदवृत्तांबद्दल दोघांमध्ये विचार होत असे. 'आर्य संस्कृती' ग्रंथसंहितेचे श्रीधरकुटीत पंडित विद्वानांसमोर वाचन होत असताना श्रीमहाराजांनी तेथे उपस्थित असावे असा श्रीस्वामीजींचा आग्रह असे. श्रीस्वामीजींचे चरित्र हे दोघे कुरगड्डीस एकांतात असताना श्रीमहाराजांनी लिहिले. त्यातील शब्दन्‌शब्द श्रीस्वामींनी तपासला. काही सूचना/बदल असतील तर भिंतीवर लिहून दाखवीत.

श्रीस्वामींच्या चातुर्मास-एकांतात श्रीमहाराज सेवेत असत. उर्वरित काळात श्रीस्वामींच्या ग्रंथलेखनासाठी रामतीर्थ होन्नावर-कर्नाटक, नर्मदाकाठ, गंगाकाठ अशा ठिकाणी एकटेच असत. सारा प्रवास बहुतेकवेळा पायीच असे. अतिशय भिडस्त स्वभावामुळे कोणास काहीच मागायचे नाही. श्रीसमर्थ करतील ती सोय! दुर्गम प्रदेशातील एखाद्या जलसन्निद्ध-देवालयात राहायचे. देवासमोर आजूबाजूचे लोक काय धान्य वगैरे ठेवीत तेवढ्या सामग्रीवर बाराची वेळ निभायची! भगवंत, भगवंताचा निसर्ग आणि श्रीमहाराज हेच एकमेकांचे निरंतर सांगाती!!

श्रीस्वामीजींचा लोकसंग्रह, शिष्य संप्रदाय वाढू लागल्यावर श्री महाराज गर्दीपासून दूर राहात. तथापि साधकांना अनुग्रह दिल्यावर श्रीस्वामीजी साधनेसाठी श्रीमहाराजांकडे सोपवीत. त्यामुळे गावात, शहरवस्तीत श्रीमहाराजांचे राहणे होऊ लागले. साधकांना मार्गदर्शनपर पत्रे लिहीत. गद्यापेक्षा पद्यरचनांवर स्वाभाविक भर होता. काही प्रासंगिक रचना, तत्त्वज्ञानपर निबंध, श्रीस्वामीजींच्या संस्कृत रचनांची मराठी समश्लोकी असे लेखन चालू असे.

श्रीमहाराजांची विचार मांडण्याची एक आकर्षक ढब होती. गहन-तत्त्वज्ञान अगदी साध्या शब्दांत ते व्यक्त करीत. समोरच्या साधकाचे अंत:करण ओळखून प्रसंगी धारदार शब्दाने त्याच्या शंकांचे निरसन करीत. साधनेच्या बाबतीत ते अतिशय कठोर होते. सांसारिकांच्या अडचणींचा विचार करूनच ते योग्य असे मार्गदर्शन करीत. पण अडचणींचा बाऊ केलेला त्यांना अजिबात आवडत नसे.

त्यांच्या स्वत:च्या गरजा अगदीच कमी होत्या. पैशामुळे अडून राहील अशी कोणतीच उपाधी त्यांनी कधी जवळ केली नाही. कुणावर अवलंबून राहाणे, कुणाला भरीस घालणे, कुणाकडून काही अपेक्षा ठेवणे ही वृत्ती मुळातच नव्हती. गर्दी वाढू लागली की, ते स्थळत्याग करीत. एकांत आणि मौन त्यांना अतिशय प्रिय होते.

श्रीस्वामीजींची त्यांच्यावर पूर्ण कृपा होती. अगदी अंतरंगातील गोष्टी ते श्रीमहाराजांना सांगत. 'अनेक देवता आपली कामे माझ्याकडून करून घेतात पण मला त्रास देणाऱ्या दुष्ट शक्तीबद्दल मला सूचनाही देत नाहीत.'

असे त्यांनी श्रीमहाराजांना एकदा सांगितले होते. 'शिष्य वेगे । स्वामीच होये ॥' सर्वश्रेष्ठ आत्मज्ञान ब्रह्मानंदात श्रीमहाराज मग्न असत. 'समपद गुरुशिष्या । ब्रह्म निर्द्वंद ने कां ।' अशा पदावर ते आरूढ होते. त्यामुळे सिद्धाचे सामर्थ्य आणि कृपादृष्टीचे स्वाभाविक धनी होते. पण सामान्य व्यवहारी जगात त्यांचे वागणे अगदी सहजसाधेच असे. ते जेथे जातील तेथील स्थानदेवता त्यांच्या दर्शनास येत आणि त्यांनी तेथे वास्तव्य करावे अशी प्रार्थनाही करीत.

नर्मदा प्रदक्षिणा त्यांनी निरंजन वृत्तीने केली. नर्मदा प्रदक्षिणेस निघताना श्रीस्वामींच्या दर्शनास गेले तेव्हा श्रीस्वामीजी काही पैसे वाटखर्चासाठी देऊ लागले. श्रीमहाराज 'नको' म्हणाले. श्रीस्वामींनी आग्रह करूनही घेईनात तेव्हा श्रीस्वामींनी कारण विचारले.

'स्वामीजी, भक्तांनी आपल्या चरणी अर्पण केलेला हा पैसा, संन्याशाचा झाला. संन्यासी म्हणजे प्रत्यक्ष अग्निदेव. हा पैसा केव्हा भस्मसात करून टाकेल, कळणारही नाही आणि आपले आशीर्वाद असल्यावर या भौतिक गोष्टींची गरजही नाही.'

श्रीमहाराजांच्या अगदी अंतरंग शिष्या म्हणजे शामाताई. श्रीगुरू सेवेने संतोष पावले की देवता वारंवार येऊन दर्शन देत असतातच. शामाताईंच्या श्रीगुरुसेवेने श्रीस्वामीजी आणि श्रीमहाराज प्रसन्न होते. मोरटक्क्यास असताना त्या नर्मदा स्नानास गेल्या असताना श्रीनर्मदामातेने त्यांना दर्शन दिले. सांगितले की, 'श्रीमहाराजांनी प्रदक्षिणा पूर्ण केली पण माझी आरती काही केली नाही.' श्रीमहाराजांनी मग नर्मदामातेची छानशी आरती केली. साधुदर्शने तीर्थे पवित्र होतात, आणि तेथील देवता साधुदर्शनासाठी किती आतूर असतात त्याची ही अशी गोड अनुभूती येते.

अनेक थोर साधू त्यांच्या भेटीस येऊन जात. 'श्रीमहाराजांचे दर्शन घेतले की माझी बॅटरी पूर्ण चार्ज होते. पुढील कार्यास प्रेरणा मिळते, उमेद येते' असे अनेक जण भेटून जाताना म्हणत. असा अनुभव आताही येतो.

श्रीमहाराजांच्या मनात चतुर्थाश्रम स्वीकारावा असे होते. श्रीकाशीस श्रीस्वामीजी मौन एकांतात असताना ठरवून ते व्यासकाशीला संन्यास घेण्यासाठी गेले; पण तेथील ज्या यतीवरांकडून दीक्षा घ्यायची ते अगदी अचानक अन्यत्र गेल्याने संन्यास घेता आला नाही. काशीस परत आल्यावर श्रीस्वामींनी त्यांना बोलावून घेतले. आपली काषायवस्त्रे त्यांच्या अंगावर घातली. श्रीसमर्थांचे आवाहन केले आणि श्रीसमर्थांकडून त्यांना मोक्षाची साथ म्हणून श्रीफल देवविले. 'सर्व अवस्थेतून मुक्ती मिळाल्यावर चतुर्थाश्रम वेगळा कशासाठी स्वीकारायचा?' अशी श्रीस्वामींनी त्यांची समजूत काढली.

श्रीमहाराजांना उपास्य देवतांचे वारंवार दर्शन होई. लक्ष्मी बंगल्यात त्यांचे वास्तव्य असताना भगवान श्रीविष्णूंनी त्यांना दर्शन दिले. भगवंताच्या अंशावतारांना भगवान श्रीविष्णूंचे दर्शन घडणे म्हणजे अवतार कार्य सिद्धीस गेल्याची ती प्रचीती असते.

अत्यंत अलौकिक धारणा असूनही श्रीमहाराजांनी त्याबद्दल स्वत:हून कधी अवाक्षरही काढले नाही. समोर येणाऱ्या भक्ताची मनोकामना पूर्ण अवश्य होई, पण त्याची वाच्यता नसे. भोळ्या-भाबड्या भक्तांबद्दल त्यांच्या मनात अपार करुणा असे. अशांना न मागताही इच्छेनुरूप लाभ होत असे. सर्व सिद्धी हात जोडून आजूबाजूला वावरत असूनही त्यांची उपेक्षा केली. श्रीमहाराजांनी स्वत:ची साधना कधीही सोडली नाही. 'गुरुदेवांचे भजन । हेचि सुखाचे साधन । भवरोग निवारण । दिव्यौषधी ।' हा दृढ निश्चयात्मक स्वभाव होता. त्यांचे आसन स्वच्छ, समतल आणि दृढ होते. वार्ध्यक्याच्या शरीरव्याधी असतानाही त्यांची ४/५ तासांची बैठक असे. वृत्ती समाधानी असल्याने नेहमी प्रसन्न, समाधानी असत.

श्रीस्वामीजींची मध्यान्ह भिक्षा सुरू असताना श्रीमहाराज मधुर स्वरांनी, उपनिषदांचे पठण करीत.

भिक्षेच्या वेळी श्रीस्वामीजी त्यांचेकडून उपनिषदांचे अभिश्रवण करवून घेत असत.

आत्मज्ञानपर उपनिषदांचे चिंतन नेहमी असे. वाणी मधुर आणि स्वरतालाची सूक्ष्म जाण असल्याने कधीकधी एकांतात भजनरंगात ते दंग होऊन जात. ते नियमित व्यायाम, योगासने, प्राणायाम करीत. आहार अगदीच थोडा होता. अगदी साधे जेवण त्यांना आवडे.

भक्तिधाममध्ये त्यांचे वास्तव्य १९७८ पासून दीर्घकाळ झाले. या वास्तव्यात एकवीस समासी, पूर्वारंभ, अंतर्भाव, आत्माराम इत्यादी ग्रंथांचे भावार्थ, मनाचे श्लोक, श्रीमत्‌दासबोध, स्वात्मनिरूपण, वेदेश्वरी, एकनाथी भागवत, श्रीमद्‌भगवद्‌गीता, विष्णूसहस्रनाम, शिवशांतस्तोत्रतिलकम, शिवमहिम्न, स्वात्मसुख, स्वानंदलहरी, ब्रह्मसूत्रभाष्य आदी ग्रंथांवर त्यांनी निरूपण केले.

त्यांना ध्वनिमुद्रण केलेले आवडत नसे. 'अंत:करणात शब्द मुरवून ठेवा' असे ते म्हणत. त्यामुळे त्यांच्या नकळत काही थोडे निरूपण ध्वनिमुद्रित करता आले. त्यांच्या लक्षात आले तर ते ताबडतोब ध्वनिमुद्रण थांबविण्यास सांगत. संपूर्ण शब्दमौक्तिकमाला शब्दबद्ध करता आली असती तर 'श्रीमहाराजांचेकडे बघून दासबोधाचा अर्थ लावावा. त्यांचे वागणे, बोलणे, लिहिणे, वाचणे, उठणे, बसणे, आदी सर्व दैहिक व्यवहार म्हणजे चालता-बोलता दासबोध आहे.' ह्या एका अतिशय वयोवृद्ध बुजूर्गाच्या उद्‌गारांची प्रचीती आली असती.



# "श्री समर्थ गोसेवेसाठी अनंतदासा । पाठविले तुम्हा शिवराये ।।"

***दिलीप महाजन***

*६, दिव्यकुंज सोसायटी, सुदर्शननगर, एम.आय.डी.सी.*
*डोंबिवली पूर्व, (ठाणे)*

कै. शंकर श्रीकृष्ण देव, प. पू. भगवान श्रीधर स्वामी, कै. बाबूराव वैद्य, गोजीवन श्री चौंडे महाराज, दिनकरबुवा बिलवलकर, अण्णाबुवा कालगांवकर, ल. रा. पांगारकर, अनंतदास रामदासी, विनायक महाराज मसूरकर आदी समर्थभक्तांची मांदियाळीच विसाव्या शतकात निर्माण झाली व या सर्वांच्या अथक परिश्रमांतून समर्थ संप्रदायाला पुनश्च वैभवाचे दिवस प्राप्त झाले.

या सर्व थोर समर्थ भक्तांमध्ये अनंतदासांचे स्थान खूप मानाचे आहे. आजीवन ब्रह्मचारी राहून सद्‌गुरू आज्ञेने गोसेवा, कीर्तन-प्रवचन व ग्रंथलेखन याद्वारे त्यांनी समर्थ संप्रदायाची खूप मोठी सेवा केली. सर्व संतांच्या गाथा आहेत पण समर्थांचा गाथा नव्हता ही उणीव सर्व-प्रथम अनंतदासांनी दूर केली. त्यांनी संपादन व प्रकाशन केलेला 'समर्थांचा गाथा' तर संप्रदायाच्या वाङ्‌मयातील 'कौस्तुभ रत्न' ठरला! या ग्रंथाला त्यांची स्वत:चीच प्रदीर्घ (१५० पानी) प्रस्तावना असून या प्रस्तावनेत त्यांनी 'शिवसमर्थ' संबंधांची ऐतिहासिक चर्चा तर्कशुद्ध मांडणीद्वारे व पुराव्यानिशी सादर करून टीकाकारांची तोंडेच बंद केली. 'सप्तकांडात्मक श्री दासायन' हे समर्थ रामदासांचे विस्तृत व मौलिक चरित्र आणि 'दासबोध प्रवेश' हा ग्रंथराज दासबोधावरील अभ्यासपूर्ण ग्रंथ या त्यांच्या वाङ्‌मयीन कलाकृतींनी अनंतदासांचे नाव समर्थ हृदयावर सुवर्णाक्षरांनी लिहावे एवढे ते मोठे होते.

'दासबोध प्रवेश' ग्रंथाला प. पू. भगवान श्रीधर स्वामींनी दिलेल्या आशीर्वचनात ते अनंतदासांबद्दल म्हणतात..

*'श्री दासबोध प्रवेशु । करवोनी केला तमोनाशु ।*
*सूर्योदयापरी अशेषु । अनंतदासे ।।*
*दासबोध प्रवेशद्वार । तराया सुखे संसार ।*
*प्रवेशावया मोक्षमंदिर । निर्मिले हे ।।*
*अनंतदासांचे कौतुक । करोनी तरोत सकळ लोक ।*
*धर्मनीति मुक्ति सुख । विश्वी नांदो ।।'*

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे अनंतदासांबद्दल लिहितात- 'कै. अनंतदास रामदासी यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात समर्थसेवा केली ती क्रांतिकारक देशभक्तांच्या त्यागाइतकी खडतर आणि समर्थांच्या वाङ्‌मयाइतकी ज्वलंत होती. एका बाजूला ब्रिटिशांचा अंमल, तर दुसऱ्या बाजूला निजामाचा सुलतानी अंमल देशावर रणरणत असताना श्री अनंतदासांचा निर्भय संचार अखंडपणे चालू होता. लोकजागृतीसाठी ते अहोरात्र वणवण हिंडत होते. ते दासबोध सांगत होते तसे जगत होते. मी त्यांचे लेखन वाचावयास आरंभ केला तेव्हा अगदी लहान शाळकरी वयाचा होतो. त्यांचा पहिला मोठा ग्रंथ मी वाचला तो 'समर्थांचा गाथा'. त्या ग्रंथाला अनंतरावांचीच स्वत:ची प्रस्तावना आहे. ही प्रस्तावना

म्हणजे श्री समर्थ- शिवकार्याचे साक्षात् दर्शन आहे. एवढा प्रेरक आणि विवेक-बोधक ग्रंथ श्री समर्थांच्या आणि शिवछत्रपतींच्या चरित्रावर साठ वर्षांपूर्वी तरी मराठीत दुसरा लिहिला गेला नाही.'

'श्री समर्थांच्या गाथा'च्या या प्रस्तावनेचे स्वतंत्र पुस्तक 'शिवसमर्थ योग' नावाने समर्थ रामदास चतु:शताब्दी जन्मोत्सव वर्षात प्रकाशित झाले. 'शिवसमर्थ योग' या पुस्तकाला विख्यात साहित्यिक कै. राम शेवाळकरांनी लिहिलेल्या प्रस्तावनेत ते म्हणतात... 'श्री अनंतदास रामदासी हे मोठे समर्थ भक्त व समर्थ साहित्याचे व्यासंगी, अभ्यासक व संपादक होते. समर्थांचे माहात्म्य व कार्य आभ्राच्छादित करण्याच्या प्रयत्नांमुळे अस्वस्थ होऊन, त्या चंचल आभ्रांचे निराकरण करण्याच्या निश्चयाने घेतलेल्या परिश्रमांतून त्यांचे हे पुस्तक सिद्ध झाले आहे. त्यांची तप:श्चर्या, पात्रता व अधिकार यांचा मागमूसही नसलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीच्या पदरात त्यांच्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना लिहिण्याचा मान द्यावा, हे निव्वळ समर्थकृपेमुळेच शक्य झाले, याची मला जाणीव आहे. समर्थकार्याबद्दल सहेतुक असमजामुळे व अपप्रचारामुळे अस्वस्थ होणे या आम्हां दोघांमधील समान गुणाने मला अनंतदासांच्या पुण्यकर्मात सहभागी होता आले, हे माझे भाग्यच!'

'सप्तकांडात्मक श्री दासायन' या समर्थ चरित्र ग्रंथाचेही पुनर्मुद्रण चतु:शताब्दी निमित्त झाले. पुनर्मुद्रित ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत समर्थव्रती आदरणीय श्री. सुनील चिंचोळकर म्हणतात-

'श्री अनंतदास कट्टर समर्थ सांप्रदायिक होते, पण अंधश्रद्ध वा भोळेभाबडे नव्हते. समर्थ वाङ्मयाचे ते गाढे अभ्यासक होते. त्यांनी सुमारे हजार पानी समर्थचरित्र तीन खंडांत लिहून काढले. एका अर्थाने हा ग्रंथ म्हणजे समर्थ संप्रदायाचा ज्ञानकोषच आहे. अनंतदास रामदासी चरित्रलेखन करताना समर्थांच्या प्रेमात कसे डुंबून गेले होते याचे प्रत्यंतर पानोपानी येते. विशेष म्हणजे जागोजागी समर्थांच्या सहवासातील गिरिधरस्वामींनी लिहिलेल्या 'समर्थप्रताप' ग्रंथातील ओव्या संदर्भासाठी दिल्या असल्यामुळे प्रसंगाची अधिकृतता वाढली. लेखक सांप्रदायिक असल्याने समर्थांचे अनेक चमत्कार त्यांनी दिले आहेत. पण त्या बरोबर त्या चमत्कारांची तर्कशुद्ध वैज्ञानिक मीमांसाही दिली आहे...'

अशा या थोर समर्थभक्त कै. अनंतदास रामदासी यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील भोर या संस्थानाच्या गावी 'लोहोकरे' घराण्यात झाला. वडील मोरेश्वर व आई रंगूबाई या आचारविचारसंपन्न माता-पित्यांच्या पोटी २३ मे १८८५ रोजी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव 'दत्तात्रय मोरेश्वर लोहोकरे! छत्रपती शिवाजी महाराजांकडे फडणीस 'लोहोकरे' त्यांचे हे वंशज! अनंतदासांचे सद्गुरू गोजीवन चौंडे महाराज म्हणतात...

*मुखी रामनाम हाती गोसेवा । लोहोकरे घराण्याचा फडणीस किताब बरवा । छत्रपतींचा सेवक ॥१॥*
*सच्छील, सदाचार कार्यक्षमता । स्वधर्म निष्ठपवित्रता । नित्यनेम एक निष्ठता । ऐतिहासिक सद्ग्रंथ लेखकू ॥२॥*
*ऐसा तुमच्या सद्वंशाचा वारसा । घेवोनी आलात खासा । श्री समर्थ गोसेवेसाठी अनंतदासा । पाठविले तुम्हा शिवराये ॥३॥*

बालपणापासून सद्ग्रंथ वाचन, सत्संग व ऐतिहासिक चरित्र श्रवणात रमणारा दत्तात्रय सर्वसामान्यांप्रमाणे बायका-मुलांच्या संसारात रमणे शक्यच नव्हते. स्कूल फायनलची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर काही दिवस त्यांनी वऱ्हाडात नोकरी केली व त्यानंतर उच्च शिक्षणाच्या निमित्ताने पुण्यात आले. पुण्यात आल्यावर योगायोगाने म्हणा किंवा पूर्वसंकेताने म्हणा, ते संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक, उत्तम प्रवचनकार व संपादक-लेखक म्हणून विख्यात असलेले कै. प. पू. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांच्या सहवासात आले.

कै. ल. रा. पांगारकर हे विशेषत्वाने समर्थप्रेमी व दासबोधाचे व्यासंगी अभ्यासक होते. परमार्थविषयाला वाहिलेले 'मुमुक्षु' नावाचे मासिक ते प्रकाशित करीत असत. पांगारकरांच्या सहवासात दत्तात्रयांना समर्थ चरित्राची

ओढ व दासबोध वाचनाची गोडी लागली. तरुण व कुशाग्र बुद्धीच्या दत्तात्रयाची या विषयातील वाटचाल व प्रगती पाहून पांगारकरांनी त्यांना मुमुक्षुचे सहसंपादकपद बहाल केले. दासबोधाच्या नित्यवाचनाने व अभ्यासाने दत्तात्रयांच्या जीवनाची दिशाच ठरून गेली. मुमुक्षुमध्ये काम करता करता ते खरेच 'मुमुक्षु' बनले. नोकरीची पराधीनता त्यांना अस्वस्थ करू लागली. 'पराधीनता रामदासी घडेना' या समर्थ उक्तीप्रमाणे जीवनाचे 'सार्थक' करून घेण्याच्या ध्येयाने त्यांना झपाटून टाकले... आणि एक दिवस पांगारकरांची क्षमा मागून ते सद्गुरूंच्या शोधार्थ बाहेर पडले. परमार्थ मार्गावर खडतर प्रवास करता करता ते काशीला जाऊन पोहोचले.

काशीत त्यांची गोजीवन श्री चौंडे महाराजांची भेट झाली व आपण योग्य ठिकाणी पोहोचल्याचे त्यांना जाणवले. चौंडे महाराजांनीही त्यांची कठोर परीक्षा घेतली व नंतरच त्यांना अनुग्रह दिला. चौंडे महाराजांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची पुढील वाटचाल सुरू झाली. नामस्मरण, अनुष्ठान, पुरश्चरणादी खडतर साधनेतून 'दत्तात्रयाचे' ते 'अनंतदास' झाले.

अनन्यभावे सद्गुरूस शरण गेलेल्या अनंतदासांनी गोवर्धन संस्थेचा वाई येथील कारभार, श्री समर्थ सांप्रदायिक उपासना पद्धतीचे संपादन, गोरक्षण मासिकाचे संपादन, गिरड मठाचे मठाधिपती अशा अनेक जबाबदाऱ्या सद्गुरुंच्या आज्ञेने स्वीकारल्या व यशस्वीपणे पार पाडल्या. अनंतदास कोणत्याही उपाधीत अडकणारे व रमणारे नाहीत हे ओळखून चौंडे महाराजांनी पुढे त्यांना समर्थ कार्यार्थ मराठवाड्यात पाठवले.

प्रतिवर्षी श्रीदासनवमीस योगीराज कल्याण स्वामींची पालखी परांडा-डोमगाव येथून सज्जनगडावर नेण्याची जबाबदारी चौंडे महाराजांनी अनंतदासांवर सोपवली व ती त्यांनी आजन्म पार पाडली. त्यांच्या नंतरही गेली सत्तेचाळीस वर्षे आजही ही परंपरा अव्याहत चालू ठेवणारी माणसे त्यांनी घडवली हे त्यांच्या कार्याचे विशेष म्हणावे लागेल.

समर्थ कार्याकरिता मराठवाड्यात सर्वत्र संचार करीत असताना त्यांच्या प्रेरणेने अनेक ठिकाणी १३ कोटी रामनाम जपयज्ञ झाले. ठिकठिकाणी दासबोध अभ्यासमंडळे स्थापन झाली. श्री रामहृदय व श्री रामरक्षा यांची अनुष्ठाने सुरू झाली. नित्य प्रवचने व ग्रंथ लेखनादी माध्यमातून अनेकांना त्यांनी उपासना मार्गाला लावले, अध्यात्म प्रवृत्त केले व त्याचबरोबर स्वदेश, स्वधर्म व स्वसंस्कृती यांचा अभिमानी असणारा निर्व्यसनी व सशक्त समाज निर्माण व्हावा यासाठी अविरत प्रयत्न केले. मराठवाड्यात त्यांचा शिष्य परिवार मोठ्या प्रमाणावर आहे.

'समर्थांचा गाथा', समर्थांचे विस्तृत व मौलिक चरित्र 'सप्तकांडात्मक श्री दासायन', 'संकेत कुबडी'चे प्रकाशन, विद्यार्थ्यांचे श्रीरामदास, रामदासी सांप्रदायिक उपासना पद्धतीचे संपादन, गोजीवन चौंडे महाराजांचे चरित्र, गोज्ञानकोषाचे संपादन व शेवटी ग्रंथराज दासबोधाच्या अभ्यासकांसाठी उपयुक्त असा 'दासबोध प्रवेश' अशी ग्रंथसंपदा निर्माण करून समर्थ सांप्रदायिक वाङ्मयात त्यांनी मोलाची भर घातली.

आयुष्याच्या शेवटच्या २-३ वर्षांत मराठवाड्यातील धाराशिव (उस्मानाबाद) येथे राहून त्यांनी दासबोध प्रवेशाचे लेखन शारीरिक अस्वस्थतेच्या अडचणीतून पूर्ण केले. ग्रंथाच्या प्रकाशनानंतर अल्पशा आजाराचे निमित्त होऊन धाराशिव येथेच २९ सप्टेंबर १९६३ या दिवशी त्यांनी इहलोकीची यात्रा संपवली. धाराशिव येथे त्यांचे भव्य समाधी व स्मारक मंदिर त्यांच्या शिष्य परिवाराने उभे केले असून, प्रतिवर्षी त्यांचा पुण्यतिथी उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. कडकडीत ब्रह्मचर्य, धगधगीत वैराग्य, मुखी-चित्ती सदैव रामनाम आणि सद्गुरू आज्ञेने अनन्यभावे समर्थ संप्रदायासाठी चंदनाप्रमाणे देह झिजविणाऱ्या अनंतदासांना साष्टांग प्रणाम...

*'चारित्रे अतिशुद्ध वाणी रुचिरा सौहार्द चित्ती वसे ।*
*नित्य श्री रघुनाथ चिंतन मनी तेजस्वी कांती दिसे ।।*
*संसारी परमार्थ साधक जना सन्मार्ग दावितसे ।*
*ऐशा पूज्य अनंतदास चरणी साष्टांग वंदीतसे ।।'*

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

# वारकरीसंप्रदाय व समर्थसंप्रदाय

*वै. शंकर वामन ऊर्फ सोनोपंत मामा दांडेकर*

माझ्या आजच्या व्याख्यानाचा विषय वारकरी संप्रदाय व समर्थसंप्रदाय असा आहे. आज श्रीशिवाजीमहाराजांच्या राज्यारोहणाचा दिवस असल्याने या विषयास एक प्रकारचे औचित्य आहे. कै. न्यायमूर्ती रानडे यांनी आपल्या 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' या पुस्तकात शिवाजी महाराजांनी राज्यस्थापना केली त्याची भूमिका श्री एकनाथप्रभृति जी संत मंडळी होऊन गेली त्यांनी तयार केली होती असे म्हटले आहे. कोणच्याही देशातील राज्यक्रांतीचा इतिहास जर आपण वाचला तर आपणांस असे दिसून येईल की, शत्रूवर तरवारी, बंदुका इत्यादी शस्त्रे चालण्याच्या पूर्वी त्या देशातील लेखकांची लेखणी कागदावर आधी चालू लागली होती. कारण हातात शस्त्र असले तरी त्याचा उपयोग शस्त्रधाऱ्याच्या मनात विरोचित भावना उत्पन्न झाल्याशिवाय होणारच नाही. शिवाय भावना उत्पन्न झालेली असली तर ती शस्त्र मिळविण्याच्याही प्रयत्नास मनुष्यास लावील. पूर्वीच्या साधुसंतांनी स्वधर्म, स्वभाषा, स्वतिहास याविषयी राष्ट्रात जागृती केली, समाजाची संघटना केली व त्याचा उपयोग शिवाजी महाराजांना झाला असे कै. न्यायमूर्ती रानड्यांनी म्हटले आहे.

मला वाटते आज ही धर्मप्रेमी वेगवेगळ्या पंथीयांच्यावर जबाबदारी आहे. पण दुर्दैवाने आपणास असे दिसून येते की, महाराष्ट्रात अगदी जवळ वावरणारे असे जे मोठे वारकरी व रामदासी दोन पंथ आहेत त्यातील पुष्कळ लोकांचे परस्परांविषयी अज्ञानजन्य दूषितग्रह आहेत. उदाहरणार्थ वारकरी कीर्तनात एखादी बिरबल बादशाहाची गोष्ट कतीर्तनकारांनी सांगितली तर चालेल, पण समर्थांची गोष्ट सांगितली तर लगेच त्यातील कट्टर नाक मुरडू लागतील. जेथे रामदासांची गोष्ट सहन होण्याची पंचाईत तेथे त्यांचे वचन प्रमाण म्हणून घेतल्यास ते मान्य होऊ नये यात नवल ते काय? जाता जाता येथे हेही सांगणे अवश्य आहे की अशी स्थिती सर्वत्रच आहे असे नाही. जे विद्वान या दोन्ही संप्रदायांतील थोर पुरुषांचा अधिकार जाणणारे आहेत त्यांना हे पसंत नाही. रामदासी संप्रदायातही असेच वारकरीसाधू व त्यांचे दैवताविषयी दुष्ट ग्रह आहेत. कीर्तनात 'रघुपतिराघव राजाराम' असे भजन करा अशी बोवांनी आज्ञा केली तरी सुद्धा जर काही श्रोते आपल्या स्वभावसिद्ध आलस्यानुरूप भजन म्हणत नसले व श्रोतृसमुदाय बहुतांशी वारकरी असला तर बोवास चटकन वाटते की हे लोक भजन करीत नाहीत याचे कारण आपण यांना 'रामराम' म्हणावयास सांगितले म्हणून. पण त्या कीर्तनकारबोवांच्या एवढी साधी गोष्ट लक्षात येत नाही की भागवत धर्ममंदिराचे कळस व वारकरी साधुतील अध्वर्यु तुकोबा यांचा सांप्रदायिक मंत्र

'रामकृष्णहरि' हा आहे, व वारकरी भजने 'रामकृष्णहरि' याच भजनाने सुरू होतात. समर्थप्रेमी एका इतिहासभक्त देशभक्ताने तर विठोबा हा विटेवर 'बद्धकटिकर' असा उभा आहे याचा अर्थ असा मांडला आहे की, हा गुलामांचा देव आहे. त्या देशभक्तांना समर्थांच्या मारुतीच्या उपासनेची थोरवी गावयाची होती. पण त्याकरता विठोबाच्या ध्यानाविषयी भ्रामक समजूत करून घेण्याचे कारण नव्हते. कारण या 'बद्धकटिकर' स्वरूपासंबंधाने श्रीमत् आद्यशंकराचार्य, व श्रीज्ञानेश्वर महाराज काय म्हणतात ते आपण पाहू. श्रीमत् आचार्य श्रविठ्ठलस्तवराजात म्हणतात :

*प्रमाणं भवाब्धेरिदं मामकानां नितंब:कराभ्यां धृतो येन तस्मात् ।*

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात :

*करा विठ्ठल स्मरण । नामरूपीं अनुसंधान ।*
*जाणोनि भक्तां भवलक्षण । जघन प्रमाण दावितो ॥*

तुकाराम महाराज तर या मूर्तीचे वर्णन करताना 'जो या असुरांचा काळ' असे करतात. पण इकडे या लोकांचे लक्ष कसे जाणार! असा परस्पर अज्ञानजन्य गैरसमज असल्यामुळे हे दोन्ही पंथ अद्वैती वैष्णवमार्गी असूनसुद्धा या दोहोंचे संबंध फारसे चांगले राहिले नाहीत.एवढ्याकरता आजच्या या मुहूर्तावर या दोन्ही पंथांच्या मुळाकडे पाहून यात साम्य किती आहे, भेद असल्यास खरोखरी किती आहे व कल्पित अथवा भ्रामक किती आहे याचा विचार आपल्यासमोर मांडण्याचा माझा मानस आहे. हेतू असा की, शक्य तर गैरसमज दूर होऊन हे पंथ आहेत यापेक्षा अधिक जवळ यावेत व महाराष्ट्रात पुनश्च एकदा मोठी धार्मिक संघटना व्हावी.

मी माझ्या व्याख्यानाचे पाच भाग करणार आहे.

(१) वारकरी व रामदासी या शब्दांचे अर्थ व त्या त्या संप्रदायाची अंतर व बाह्य लक्षणे.

(२) दोन्ही पंथांचा थोडक्यात इतिहास.

(३) दोहोंतील साम्य.

(४) दोहोंतील भेद (अ) यथार्थ व (ब) कल्पित.

(५) उपसंहार.

## १. वारकरी व रामदासी या शब्दांचे अर्थ व सांप्रदायांची आंतरबाह्य लक्षणे

प्रथम वारकरी व रामदासी या शब्दांच्या अर्थाचा विचार करणे अवश्य आहे. वारकरी हा शब्द 'वारीकर' या शब्दाचा अपभ्रंश आहे. ज्ञानेश्वरीत ''वारी'' हा शब्द येरझारा या अर्थी वापरलेला आढळून येतो. ज्ञा. अ. १८ ओ. १०६१ व अ. ६ ओ. ३७७ यात वारी शब्द येरझारा याच अर्थाने उपयोगिलेला आहे. ज्ञानदेवांचे अभंगात 'वारिकर' असाच शब्द आहे. एका अभंगात त्यांनी वारकऱ्याचे आंतरलक्षण सांगितले आहे. ते म्हणतात :

*कायावाचा मनें जीवें सर्वस्वें उदार ।*
*बापरखुमादेविवरा विठ्ठलाचा वारिकर ॥*

तात्पर्य वारकरी यात मूळ शब्द 'वारीकर' व त्याचा अर्थ येरझारा करणारा असा आहे. व याच अर्थाने वारकरी हा शब्द उपयोगिलेला दिसतो. उदाहरणार्थ खंडोबाचा वारकरी, भवानीचा वारकरी वगैरे. परंतु जसा वेदांत या शब्दाचा मूळार्थ पाहिला तर तो शब्द शांकर, रामानुज, माध्व वगैरे सर्व दर्शनांना लावता येतो; परंतु रूढार्थाने वेदांत म्हटला म्हणजे शंकराचार्यांचेच शुद्धाद्वैतदर्शन असाच अर्थ समजला जातो. तद्वतच वारकरी या शब्दाचे झाले आहे. जरी योगिक अर्थाने तो शब्द कोणच्याही मुक्कामाकडे हेलपाटे घालणाऱ्यास लावता येतो तरी रूढार्थाने तो शब्द पंढरपूरनिवासी श्रीपांडुरंगाची वारी करणाऱ्यासच लावतात. व या व्याख्यानात ज्या वारकरी पंथाचा मी विचार करणार आहे तो पंढरपूरच्या वारकरी पंथाचाच होय.

जाता जाता येथे एका गोष्टीचा उल्लेख करणे अवश्य वाटते. काही वर्षांपूर्वी वारकरी विरुद्ध धारकरी असा वाद काढण्यात आला होता. परंतु हल्ली तो वाद पुनश्च उकरून काढण्याचे कारण नाही, कारण वारकरी असो

वा धारकरी असो सध्याच्या राज्यात सगळ्यांच्याच धारा बोथट झाल्या आहेत. मग निष्कारण या प्रश्नाची चर्चा करून वाणीस शीण तरी का द्या!

वारकरी याचा रूढार्थ पंढरपूरची नियमाने प्रतिवर्षी वारी करणारा असा आहे. पण अशा वारकऱ्याची काही बाह्य व काही आंतरलक्षणे या पंथांतील धुरीणांनी ठरवलेली आहेत. गळ्यात तुळशीची माळ धारण करणे, गोपीचंदनाचे गंध लावून त्याच्या मुद्रा लावणे, वारीस जाताना हातात पताका धारण करणे, इत्यादी ही बाह्य चिन्हे आहेत. पण त्यात गळ्यात तुळशीची माळ घालणे हे अत्यंत अवश्य समजले जाते. किंबहुना गळ्यात तुळशीची माळ नसेल तर तो वारकरी समजला जाणार नाही, इतके या चिन्हास या पंथांत महत्त्व आहे.

वारकऱ्याची आंतरलक्षणेही आहेत. खऱ्या धार्मिक पंथाप्रमाणे हा पंथही नुसत्या बाह्य लक्षणाला महत्त्व देत नाही. 'गोपीचंदन मुद्रा धरणें । आम्हां लेणें वैष्णवां' असे म्हणणारेच तुकोबा खालीलप्रमाणे म्हणतात :

*मुद्रा लाविती कोरोनी । मान व्हावयासी जनी ।।*
*अवघा वरपंग सारा । पोटीं विषयांचा थारा ।।*

वारकऱ्याचे आंतरलक्षण, वरती ज्ञानदेवांच्या अभंगांतील जो तुकडा उद्‌धृत केला आहे त्यात दिले आहे. जो पुरुष शरीर, वाणी, मन व सरतेशेवटी स्वत:चा जीव या सर्वांवर उदार होऊन त्या सर्वांचा श्रीभगवच्चरणारविंदी त्याग करावयास तयार होतो तोच पंढरपूरच्या श्रीरुक्मिणीवराचा खरा भक्त अथवा वारकरी होय.

आता रामदासी या शब्दाचा अर्थ व त्या पंथीयांची बाह्य व आंतरलक्षणे पाहू. समर्थ रामदासस्वामी यांच्यापूर्वीही रामोपासना होतीच. जो रामाची उपासना करतो तो रामदास. तुलसीदासांच्यासारखे अथवा मध्वाचार्यांच्या सारखे कट्टे रामोपासक समर्थांच्या पूर्वीच होऊन गेलेले आहेत. तेव्हा 'रामदासी' याचा महाराष्ट्रातील समर्थ सांप्रदायापुरता अर्थ करावयाचा म्हणजे समर्थांना गुरू अथवा संप्रदाय गुरू मानून त्यांनी घालून दिलेल्या रीतीने श्रीरामाची उपासना करणारा तो रामदासी असा करावा लागेल. अशा रामदासी पंथाची बाह्य व आंतरलक्षणे तंजावर मठाधिपती भीमस्वामी यांच्या मठातील बाडात खालीलप्रमाणे दिलेली आढळतात :

*व्रत ज्याचें ब्रह्मचारी । वस्त्रें ज्याचीं हुर्मुजी बरीं ।*
*विवेक वैराग्यानें भारी । तारी जड जीवातें ।।*
*नित्य वाची दासबोध । साधी सारासार शोध ।*
*सांगे भाविकासी बोध । करी रोध इंद्रियां ।।*
*सदा वृत्ति नित्यनेम । रामीं ज्याचें अखंड प्रेम ।*
*ऐसा देखोनि योगक्षेम । कांपे यम चळचळा ।।*
*झोळी निरापराकर । भिक्षां मागे घरोघर ।*
*देखोनियां चमत्कार । नारी नर धांवती ।।*
*ऐसी नि:स्पृहाची रीत । सांगितली यथास्थित ।*
*हरिरंगीं अति प्रीत । कीर्ति विस्तारे ।।*

वारकरी पथांत दीक्षा देताना नाममंत्र व तुळशीची माळा देतात. समर्थ संप्रदायात नाममंत्र व माळेबरोबर विशिष्ट प्रकारच्या वस्त्रांचाही अंतर्भाव करण्यात आलेला दिसतो. दीक्षेस मेखळा, शिरोवस्त्र, झोळी, कमरेस बांधावयाचे रामनामांकित वस्त्र व भगवे निशाण अशी पंचवस्त्रे असतात. या सांप्रदायात भिक्षेस बरेच महत्त्व आहे. तंजावरच्या मठातील जो उतारा वर दिला आहे त्यात 'व्रत ज्याचे ब्रह्मचारी' असे जरी म्हटलेले असले, तरी रामदासी पंथांत गृहस्थाश्रमीयांना मज्जाव आहे असे नाही. उलट कितीतरी थोर गृहस्थाश्रमीयांनी आपल्या वृत्तीने रामदासीपंथास शोभा आणलेली आहे. श्रीशिवाजी महाराज हे गृहस्थाश्रमीच रामदासी होते. पण समर्थांच्या वेळेला पुष्कळ ब्रह्मचारी अनुयायी होते व त्यांच्याकडून आश्रमांच्या द्वारा होणारी थोर-लहान कामे केली जात होती. तात्पर्य, रामदासी पंथांतही अनुयायाचा आश्रम अथवा अशीच बाह्यचिन्हे वा बाह्यगोष्टीवर इतका भर दिला जात नव्हता. वारकरी पंथाप्रमाणेच किंबहुना शिस्त या दृष्टीने पाहिल्यास वारकरी पंथापेक्षाही काकणभर

अधिकच रामदासी शिष्यवर्गात उपासनेचा नेम, आचार, इत्यादी गोष्टींवर अधिक जोर दिला जात होता. समर्थांच्याकडे कोणी शिष्य आला असता ते दासबोधाची पाने मुद्दाम विखरून ठेवीत व त्यास लावावयास सांगत अशी कथा प्रसिद्धच आहे. समर्थसंप्रदायाची अंतरलक्षणे खालील ओव्यांतून आढळून येतात.

*नीति न्याय भजन मर्यादा । समर्थ संप्रदायी चालिली सर्वदा ।*
*कर्मउपासना ज्ञानविज्ञान प्रसिद्धा । दासबोधग्रंथ निर्धारि ॥*

आणखी एक प्रसिद्ध ओवी आहे की, त्यात समर्थसंप्रदायाची आंतरबाह्य लक्षणे दिलेली आहेत.

*मुख्य हरिकथानिरूपण । दुसरे ते राजकारण ।*
*तिसरे ते सावधपण । सर्वविषयीं ॥*
*चवथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप ।*

यात आंतरलक्षणे सांगताना समर्थांनी संशयसुद्धा राहाणार नाही इतक्या स्पष्टतेने 'मुख्य हरिकथा निरूपण' असे म्हटले आहे. पण या ओवीचा अर्थ करीत असताना श्रीयुत आप्पासाहेब आळतेकर यांनी माझ्या दृष्टीने Hysteron Proteron म्हणजे 'घोड्यापुढे गाडी' ठेवण्यासारखी चूक केली आहे. त्यांच्या म्हणण्याचा मतितार्थ असा आहे की, समर्थांना राजकारण करण्याकरता नि:स्वार्थी, धर्मपरायण लोक पाहिजे होते म्हणून त्यांनी 'मुख्य हरिकथा निरूपण' असे म्हटले. आधुनिक समर्थसंप्रदायी आपणास हवे असतील तर कै. दादाभाई नौरोजी, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक वगैरे देशभक्तांची उदाहरणे देता येतील असे श्री. आळतेकरांचे म्हणणे आहे. 'राजकारण' या शब्दाचा काय अर्थ आहे या चर्चेच्या भानगडीत न पडतासुद्धा ज्या प्रकरणात ही ओवी आहे व समर्थांनी स्वत: ठिकठिकाणी जे सांगितले आहे त्याचा विचार केला असता आपणास असे म्हणावे लागेल की, श्री. आळतेकर हे या ओवीच्या अर्थाची निष्कारण ओढाताण करीत आहेत. समर्थांनी ग्रंथराज दासबोधाचा विषय सांगताना 'येथे बोलिला विशद भक्तिमार्ग' असे स्पष्ट सांगितले आहे. समर्थांना आळशी, प्रपंच टाकणारा, परमार्थी म्हणून फुकट खाणारा नको होता. अन्नान्न झालेल्या लोकांना अन्न देणारा, त्रस्त झालेल्यांना त्यांच्या यातनांतून सोडवणारा असा प्रपंची पाहिजे होता. पण याचा अर्थ या ओवीतून नि:स्वार्थी ईश्वरपरायण पण मुख्यत: राजकारण करणारे लोक समर्थांना संप्रदायात हवे होते असे सिद्ध होत नाही. समर्थ 'परमार्था'ला केवढी किंमत देत होते हे दासबोध दशक पहिला स. ९ यावरून कळून येणारे आहे; असो. समर्थसांप्रदायाच्या आंतरलक्षणात नित्यनेम, उपासना, कर्म, ज्ञानविज्ञान यांचा आंतरभाव मुख्यत: होता व त्याजबरोबर जगाचा प्रपंच करणारा साधक असावा असेही त्यांना वाटत होते.

येथवर या पंथांच्या बाह्य व आंतरलक्षणांचा विचार झाला. आता यांच्या इतिहासाकडे वळू.

## २ पंथांचा इतिहास

या दोन पंथांपैकी वारकरी पंथ हा फार जुना आहे. 'मालू तारण' नावाच्या ग्रंथात श्रीपांडुरंगमूर्तीचा इतिहास शालिवाहन शकाच्या आरंभापर्यंत नेऊन पोहोचवलेला आहे. पण इतक्या पूर्वी हे दैवत प्रचलित होते किंवा नाही याला सर्वांना मान्य होईल असा पुरावा उपलब्ध नाही. 'मालू तारण' हा ग्रंथ अजून अप्रसिद्ध आहे व ऐतिहासिकांच्या भट्टींतून अजून ताऊन सुलाखून निघावयाचा आहे.

पण एवढी गोष्ट खरी की, ह्या 'पुण्डलीकवरदा' श्री पांडुरंगाची कीर्ती श्रीमत् आद्य शंकराचार्यांच्या काली म्हणजे आठव्या शतकात ही चांगलीच पसरली होती. आचार्यांचे प्रसिद्ध असे पांडुरंगस्तोत्र आहे. त्यात ते म्हणतात :

*महायोगपीठे तटे भीमरथ्यां वरं पुण्डरीकाय दातुं मुनीन्द्रैः ।*
*समागत्य तिष्ठन्तमानंदकंदं परब्रह्म लिंगं भजेत् पांडुरंगम् ॥*

श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या पूर्वी ही श्री पांडुरंगाची उपासना महाराष्ट्र व दक्षिण हिंदुस्थानात पसरलेली होती, याला निर्विवाद पुरावा श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीच्या गावी म्हणजे आळंदी येथे श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी पूर्वीच्या काळातील दोन समाध्या आहेत. त्यावर श्रीविठ्ठल रुक्मिणीच्या मूर्ती आहेत. अर्थात् श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या पूर्वीही ही उपासना प्रचलित होती ही निर्विवाद गोष्ट आहे.

श्रीज्ञानेश्वरांचे चरित्रलेखक, त्यांचे प्रशिष्य नामनिष्ठ नामदेवराय यांनी 'श्रीज्ञानेश्वरमहाराजां'च्या 'आदीत' श्रीज्ञानेश्वरांचे चरित्र लिहिताना ज्ञानेश्वरांचे वडील व आई त्यांच्या लग्नानंतर पंढरपूरच्या वारीस गेल्याचे वर्णन केले आहे. त्यात पंढरपूरला मोठा सोहळा जमत असे असे वर्णन केले आहे. बहिणाबाईंचा एक भागवतधर्म मंदिराची कल्पना धरून महाराष्ट्रीय भागवतधर्मीय संतांचे वर्णन करणारा अभंग आहे. त्याच्या पहिल्या कडव्यात त्या म्हणतात :

*ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिलें देवालया ॥*

याचा अर्थ इतकाच घ्यावयाचा की, ज्ञानेश्वरमहाराजांनी या पंथीयांत प्रथम मोठी संघटना केली. तुकाराम महाराज असेच वर्णन करतात.

*जयाने घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥*

तात्पर्य, या पंथाचा उपलब्ध इतिहास असा कमीतकमी आठशे-नऊशे वर्षांचा सापडतो.

या पंथातील जे महात्मे होऊन गेले त्यांचे कालानुक्रमे खालील खंड करता येतील.

(१) ज्ञानदेव-नामदेव, (२) भानुदास-एकनाथ, (३) तुकोबा-निळोबा, (४) तदनंतरचे संत.

यांचा इतिहास माझ्या 'वारकरी पंथाचा इतिहास' या पुस्तकात सविस्तर सांगितलेला आहे. प्रस्तुत महत्त्वाच्या तेवढ्या एक-दोन गोष्टी सांगतो. पैठणकर श्री एकनाथ हे समर्थ व तुकोबा यांच्या अगदी लगतपूर्वीच्या काळात होऊन गेले. अशी एक दंतकथाही प्रचलित आहे की, समर्थांचा जन्म झाल्यावर त्यांच्या मातुश्रींनी समर्थांना श्रीनाथांच्या पायावर नेऊन घातले. कथा खरी असो वा खोटी असो, इतकी गोष्ट खरी की, समर्थांचे मातुलगृह हे नाथांचे अनुगृहीत होते व समर्थांच्या ग्रंथावर नाथांच्या ग्रंथाचा फारच मोठा परिणाम झालेला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे तुकोबा व समर्थ समकालीन होते. पण तुकोबांनी समर्थ यात्रा करून परत आल्यावर चाफळास श्रीरामाची स्थापना केल्याच्या दुसऱ्या वर्षीच म्हणजे शके १५७२ फा. व. २ स इहलोकची यात्रा संपवली. तुकोबांच्या काही अभंगांत समर्थ रामदासांचा उल्लेख आहे. वारकरी लोक त्यांना क्षेपक समजतात. इतर लोक त्यांना तुकोबांचेच समजतात. प्रस्तुत विषयाच्या दृष्टीने ते अभंग क्षेपक का तुकोबांचेच हा मुद्दा इतका महत्त्वाचा नाही. एवढी गोष्ट निर्विवाद आहे की, तुकोबा व समर्थ यांची गाठ झाली असलीच पाहिजे. महिपतिबोवांनी तसे वर्णनही केलेले आहे.

वारकरी पंथासंबंधाने एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. या गोष्टीचा विस्तृत विचार व महत्त्व पुढे सांगण्यात येणार आहे. ती गोष्ट म्हणजे या पंथातील सर्व लहान-मोठ्या साधुसंतांनी सर्व लोकांना 'पंढरीचा रस्ता' दाखवला. या सर्व संतांनी श्रीपंढरीच्या अध्यक्षत्वाखाली चंद्रभागेच्या वाळवंटात महाराष्ट्रातील लहान-थोर सर्व जातींच्या लोकांची संघटना केली. हा पंथ एका दैवताभोवती गोळा झालेला आहे. कोणचीही एकच मानवी व्यक्ती– मग ती कितीही थोर असेना– घेऊन तिच्याभोवती परिनिष्ठित झालेला हा समाज नाही. ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे.

आता समर्थसंप्रदायाच्या इतिहासाकडे पाहिल्यास आपणास असे दिसून येते की, श्रीरामोपासना फारच जुनाट आहे. पण तदंगभूत समर्थसंप्रदाय हा अलीकडचा म्हणजे श्रीसमर्थांनी चाफळ मुक्कामी शके १५७१ (श्री. शंकरराव देव कृत श्रीसंप्रदायाची कागदपत्रे) श्रीरामाच्या मूर्ती स्थापन केल्यापासूनचा म्हणजे सुमारे सव्वातीनशे

वर्षांतला आहे. समर्थांना साक्षात् श्रीरामप्रभूंचाच उपदेश होता. समर्थ म्हणतात :

*आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ ।*
*जो समर्थाचाहि समर्थ । देवां सोडविता ॥*
*त्याचे आम्ही सेवक जन । सेवेकरितां जालें ज्ञान ।...*
*रघुनाथभजनें ज्ञान जालें । रघुनाथभजनें महत्त्व वाढलें ।...*

गिरिधरानी समर्थप्रताप ग्रंथांत खालीलप्रमाणे श्लोक व ओवी देऊन समर्थांच्या पूर्वीची संप्रदायपरंपरा दिली आहे.

*आदिनारायणं विष्णुं ब्रह्माणं च वशिष्ठकम् ।*
*श्रीरामं मारुतिं वंदे रामदासं जगद्गुरुम् ॥*
*आदिपुरुष आत्माराम । ब्रह्मा वशिष्ठ श्रीराम ।*
*हनुमान अवतार समर्थ नाम । श्रीरामदास स्वामी जगद्गुरु ॥*

या संप्रदायातील संप्रदायगुरू श्रीसमर्थ हे सोडून दिल्यास ही समर्थांचे बंधू श्रेष्ठ व त्यांचे वंशज, डोमगावचे प्रसिद्ध कल्याणस्वामी, समर्थप्रतापकर्ते गिरिधर, स्वानुभवदिनकरकर्ते दिनकरपंत वगैरे महान् अनुभवी संत होऊन गेले. श्रीशिवाजी महाराज हेही समर्थसांप्रदायिकच हेही विसरता कामा नये. समर्थप्रतापात गिरिधरांनी जे ठाऊक होते त्यांची यादी दिली आहे व पुढे म्हटले आहे समर्थे कित्येक जे गुप्तशिष्य केले, ते त्यांचे त्यांनाच ठाऊक!

समर्थांच्या सांप्रदायाचें एक वैशिष्ट्य लक्षात ठेवण्यासारखे आहे. समर्थांनी आरंभापासूनच समुदाय, संघटना या गोष्टीकडे विशेष जोर दिला. पण त्यांनी संघटना वारकरी साधूंप्रमाणे पंढरपूरसारख्या क्षेत्रात भगवंताच्या अखंड अधिष्ठानाखाली मेळा भरवून केली नाही. आरंभी काही दिवस चाफळास पालख्या येत असत असा उल्लेख सापडतो. पण पुढे तंटेबखेडे माजले व ते प्रकरण तेथेच थांबले. अलीकडे पुनश्च पालख्यांचा सोहळा गेल्या काही वर्षांपासून सुरू झालेला आहे. समर्थांनी विशेष भर मठस्थापनेवर दिला. त्यांनी अनेक ठिकाणी कोणी म्हणतात एकशेअकरा, तर कोणी म्हणतात अकराशे मारुतींची स्थापना केली. गावोगावी मठ स्थापिले व मठाधिपतीशी आपले दळणवळण कायम ठेवले. एकेकाळी समर्थसंप्रदायाच्या अकराशे शाखा होत्या. तात्पर्य, समर्थसंप्रदाय हा मठाधिपतिद्वारा वा प्रत्यक्षपणे श्रीसमर्थ या थोर विभूती भोवती गोळा झालेला होता अथवा आहे.

### ३ दोहोंतील साम्य

या पंथांचा इतिहास थोडक्यात पाहिल्यावर आता यात साम्य काही आहे का, याचा विचार करू. साम्य शोधू लागल्यास आपणास असे आढळून येईल की, यात भेदापेक्षा साम्यच पुष्कळसे आहे.

(१) दोन्ही पंथांना साधारण असणारी पहिली गोष्ट म्हणजे दोन्हीही वैदिक म्हणजे वेदप्रामाण्य मानणारे पंथ आहेत. ज्ञानेश्वर महाराजांनी नास्तिकाविषयी बोलताना

*नास्तिका द्यावया तोंड । वेदांचें गाढें बंड*
*ते देखोनि पाखांड । आनचि वाजे ॥...*
*पाखांडाचे कडे । नागवीं लुंचिती मुंडे ।*
*नियोजिळी वितंडें । ताळासि येती ॥*

असे म्हटले आहे. ज्ञानेश्वर महाराजांच्या ठिकाणी वेदांसंबंधी अतिशय आदर वसत होता. त्यांनी वेदास कोठे 'बाप' तर कोठे 'आई' म्हटले आहे व ज्यास आपले कल्याण करून घेणे असेल त्याने वैदिक मार्गावरील निष्ठेपासून ढळू नये असे स्वच्छ सांगितले आहे. तुकारामबोवा नास्तिकाची व्याख्या खालीलप्रमाणे करतात.

*वेदबाह्य लंड बोले तो पाषांड । त्याचें काळें तोंड संतामध्यें ॥*

आणखी ते म्हणतात :

*मातेचीं जो थानें फाडी । तया जोडी कोण ते ।*
*वेदां निंदी तो चांडाळ । भ्रष्ट सुतकिया खळ ॥*
*वेदशास्त्र नाहीं पुराण प्रमाण । तयाचें वदन नावलोका ॥*

समर्थांचेही वेदावर व वैदिक मार्गावर फार प्रेम. श्रीशारदेचे वर्णन करताना समर्थांनी तिला 'वेदमाता'

असे म्हणून तिचे वंदन केले आहे. यावरून समर्थांना वेदाविषयी केवढा आदर वाटत होता हे स्पष्ट होणार आहे. समर्थ हे वेद अथवा श्रुती यांचे प्रामाण्य गृहीत धरूनच वर्णन करतात. त्यांचे प्रथम दशक स. ६ व ७ पाहा. समर्थांनी वेदप्रणीत चातुर्वर्ण्यव्यवस्थेवर जितका जोर दिला आहे इतका इतर संतकवींच्या ग्रंथांतून क्वचितच सापडेल. तात्पर्य, दोन्ही पंथांच्या संतांच्या ग्रंथांचा विचार करता दोन्ही पंथ पूर्णवैदिक आहेत हे सहजच दिसून येईल.

(२) या पंथातील दुसरे साम्य म्हणजे दोघेही वैष्णवपंथ आहेत. श्रीराम हा विष्णूचा सातवा अवतार म्हणून प्रसिद्धच आहे. पण वारकऱ्यांचे उपास्यदैवत श्री पांडुरंग हेही विष्णूचेच स्वरूप आहे. कारण विष्णूचा आठवा अवतार श्रीकृष्ण होत व त्यांचेच हे बालस्वरूप आहे. तुकारामबोवा म्हणतात :

*गीता जेणें उपदेशिली । ते हे विटेवरी माउली ॥*
*द्वारकेचें केणें आले याचि ठाया । पुढे भक्तराया चोजवीत ॥*

पंढरपूरचें वर्णन करतां तुकाराम महाराज

*ऐसी विष्णूची नगरी । ... ... ... ॥*

असे वर्णन करतात. तात्पर्य दोन्ही पंथ ही वैष्णवच आहेत.

(३) वारकरी व समर्थ हे दोन्ही संप्रदाय 'परमार्थी' संप्रदायच होत. वारकरी संप्रदाय हा परमार्थी आहे हे प्रमाणे देऊन सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. त्याच्यावर याच कारणाकरता शेकडो वेळा वेगवेगळ्या दिशेने टीकास्त्र चालवले गेले आहे. तुकाराममहाराजांनी एका अभंगात मनुष्याने कोणचे धन साठविण्याचा व कसा प्रयत्न करावा हे सांगितले आहे. त्यात ते म्हणतात ॥

*परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण । ... ...*

पण समर्थ सुद्धा दासबोधात या परमार्थाचीच महती गातात.

*आतां स्तऊं हा परमार्थ । जो साधकांचा निजस्वार्थ ।*
*ना तरी समर्थांमध्ये समर्थ । योग हा ॥*

असा आरंभ करून समर्थांनी सबंधच्या संबंध समास (द. १ स. ९) या परमार्थाच्या वर्णनपर खर्चिलेला आहे. पण राष्ट्राच्या दुर्दैवाने किती तरी समर्थभक्त म्हणविणाऱ्यांना हा समास दिसतच नाही. त्यांना समर्थांची महती 'राजयोगी' म्हणजे राज्य कसे मिळवावे असे सांगणारे म्हणूनच वाटते. पण समर्थ स्वत: परमार्थास किती किंमत देतात हे याच समासात त्यांनी याचे वर्णन केले आहे त्यावरून दिसून येईल. समर्थ म्हणतात :

*परमार्थ जन्माचे सार्थक । परमार्थ संसारीं तारक ।*
*परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी ।*
*या परमार्थाची सरी । कोणास द्यावी ॥*
*भल्याने परमार्थी भरावें । शरीरसार्थक करावें ।*

समर्थांनी अंगाखांद्यावर खेळवलेले समर्थचरित्र लिहिणारे गिरिधर समर्थांचे अवताररहस्य सांगताना खालीलप्रमाणे उद्‌गार काढतात :

*मुख्य जगदोद्धार करणें समर्था । शुद्ध विस्तारणें परमार्था ।*
*दासबोध ग्रंथराज विवरणें निजस्वार्था । त्रिकांड वेदप्रमाणें जगद्‌गुरु ॥*
*सद्‌गुरुचरणीं परंपरावेणी । तत्त्वमसि हें वाक्य त्रिवेणी ।*
*नाना पुरुष अध्यात्मश्रवणीं । परमार्थपंथें चालविलें ॥*

गिरिधर समर्थांच्या जवळ वर्षानुवर्षे राहून त्यांना न कळलेली गोष्ट या एकोणिसाव्याविसाव्या शतकात झालेल्या समर्थोपासकांना दिसते हा काळाचा महिमा म्हणावे दुसरे काय?

तात्पर्य, वारकरी व रामदासी हे दोन्ही पंथ मुख्यत: परमार्थीच होत. मनुष्यजन्माची सफलता परम अर्थ जो आत्मा अथवा भगवंत त्यास आत्मत्वे करून जाणण्यात आहे, अशी दोन्ही पंथीयांच्या संस्थापकांची दृढ मती आहे हे अगदी उघड आहे.

(४) यानंतरच चौथे साम्य व जे तिसऱ्या साम्याच्या मुळाशी आहे ते साम्य म्हणजे या दोन्ही पंथीयांच्या श्रेष्ठपुरुषांच्या तत्त्वज्ञानावर झालेला औपनिषदीय

तत्त्वज्ञानाचा परिणाम हे होय. इंग्रजीत ज्याला He who runs may read असे म्हणतात, अथवा आपल्या भाषेत बोलायचे म्हणजे जो कोणी या पंथातील आद्यग्रंथराज ज्ञानेश्वरी व दासबोध यांकडे नुसती ओझरती नजर टाकील त्याला सुद्धा कळून येईल की, या ग्रंथराजांचे जे निर्मिते त्यांना आध्यात्मिक जीवनाचा ओलावा एकाच औपनिषदिक झऱ्यांतून मिळालेला आहे. प्रस्तुत, स्थळसंकोचाभावी एकच कल्पना घेऊन ती उपनिषदात कशी व्यक्त केली आहे, ज्ञानेश्वरमहाराजांनी तिला कसे स्वरूप दिले, समर्थ व तुकोबा यांनी ती कल्पना कशी उचलून धरली, इतकेच दाखवणे शक्य आहे.

छांदोग्य उपनिषदात आत्मा प्रत्येक मनुष्याच्या कसा जवळ आहे, जवळ असून तो का त्याला अनुभवास येत नाही, याचे शेतकऱ्याने शेतात पुरून ठेवलेले द्रव्य त्याच्या अज्ञानी मुलांना ते शेत वरतून नांगरीत वखरीत असले तरी कसे कळत नाही हा दृष्टान्त देऊन स्पष्ट केले आहे.

'...यथापि हिरण्यनिधि निहितं अक्षेत्रज्ञाः उपर्युपरि संचरन्तो न विंदेयुरेवमेवेमाः प्रजा अहरहर्गच्छन्त्य एतं ब्रह्मलोकं न विन्दन्त्यनृतेन हि प्रत्यूढाः ॥' (छांदोग्य उपनिषद् अ. ८ खं. ३-२.)

ज्ञानेश्वर महाराजांनी हीच गोष्ट व अशाच जातीचा दृष्टांत देऊन पण मागील दृष्टांतातले एक प्रकारचे वैगुण्य आपला दृष्टांत मांडीत असता एक शब्द घालून काढून टाकून व्यक्त केली आहे.

*ना तरी निदैवाच्या परिवरीं । लोह्मा रुतलिया सहस्त्रवरी ।*
*परि तेथ बैसोनि उपवासु करी । कां दरिद्रें जिये ॥*

हीच कल्पना तुकाराममहाराज व समर्थ यांच्या ग्रंथांतून याच रुपकाने व्यक्त केलेली आढळतात.

तुकाराममहाराज म्हणतात :-

*जुनाट जुगादिचें नाणें । बहुता काळाचें ठेवणें ।*
*लोपलें होतें पारिखेपणें । ठाव चळणें चुकविला ॥*

समर्थ म्हणतात :-

*जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ।*

औपनिषदीय तत्त्वज्ञानाचा श्रीज्ञानेश्वर महाराज व समर्थ या पंथसंस्थापकांवर परिणाम झालेला असल्याने या दोन्ही पंथांतील साधूंच्या तत्त्वज्ञानात अत्यंत साम्य आढळून येते.

हे दोन्ही पंथ अद्वैती आहेत. आत्मस्वरूपाची कल्पना, जगन्मिथ्यत्व, देवाचे यथार्थ स्वरूप, साधनमार्ग हे या दोन्ही पंथीयांत एकच सांगितलेले आहेत. देव एकच आहे व तो सर्व विश्वास व्यापून उरलेला आहे, तो सगुणही आहे, निर्गुणही आहे असेच या पंथीयांतील सर्व साधूंचे मत आहे.

देव एकच परंतु भक्तांनी आपआपल्या आवडीखातर त्यास वेगवेगळी नावे दिली आहेत, ही जी वैदिक कल्पना तीच दोन्ही पंथीयांच्या पुढाऱ्यांच्या ग्रंथांत आढळून येते. आत्मस्वरूपाविषयी थोडक्यात वर दिग्दर्शन केलेच आहे. जगन्मिथ्यत्वासंबंधी पुढे 'भेदाचा' विचार करताना विचार येणार आहे. तूर्त काही कल्पनांच्या बाबत थोडे प्रत्यक्ष साम्य दाखवितो. कारण काही बाबतींत अज्ञानामुळे भ्रामक कल्पना अजूनही शिल्लक राहिलेल्या दिसतात.

(अ) समर्थ व वारकरी संत दोघे सगुणनिर्गुण एकच मानतात. एवढेच नव्हे तर निर्गुणाची प्राप्ती सगुण द्वारा होते. एतदर्थ सगुण मोडू नये असेच दोघे सांगतात. समर्थ श्रीराघवाचे वर्णन करताना खालील उद्‌गार काढतात :

*नसे पीत ना श्वेत ना श्याम कांहीं ।*
*नसे व्यक्त अव्यक्त ना नीळ नाहीं ।*
*म्हणे दास विश्वासतां मुक्ति लाहे ।*
*मना संत आनंत शोधूनि पाहे ॥*

समर्थ म्हणतात :

*जगीं थोरला देव तो चोरलासे*

ज्ञानेश्वर महाराज हरिपाठात म्हणतात :

*अव्यक्त निराकार नाहीं त्या आकार ।*
*जेथोनि चराचर हरिसी भजे ।।*

तुकाराम महाराजही पांडुरंगाचे वर्णन करताना म्हणतात :

*विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तही पाताळें भरोनि ।*
*विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनि मानसीं ।।*
*रूप नाहीं रेखा नाम ही जयासी । आपुल्या मानसीं शिव ध्याये ।*
*अंत नाहीं पार वर्णा नाहीं थार । कुळ्याति शिर हस्तपाद ।।*
*केला मातीचा पशुपती । परी मातीसी काय महती ।*
*शिवपूजा शिवासी पावे । माती मातीमाजी सामावें ।।*
*दोन्ही टिपरी एकचि नाद । सगुण निर्गुण नाहीं भेद रे ।।*

समर्थ निर्गुणाची प्राप्ती सगुणानेच होते एवढ्याकरता सगुण मोडू नये असे ठिकठिकाणी बजावतात.

*....सगुण भक्ती सोडूं नये । विभक्ति खोटीं ।।*
*करुणा कीर्तन सोडूं नये । अंतर ध्यान मोडूं नये ।*
*प्रेम तंतु तोडूं नये । सगुण मूर्तीचा ।।*

दासबोधांतच असा प्रसंग आहे की, श्रोत्यांनी शंका विचारली की निर्गुणाची प्राप्ती आत्मज्ञानाने होते मग हे रामभजन मध्येच कसे आले?

*'मुख्य सार तें निर्गुण । तेथें दिसेचि ना सगुण ।*
*भजन केलियाचा गुण । मज निरूपावा ।।*

समर्थ हा प्रश्न ऐकिल्यावर म्हणाले की, गुरूचे वचन प्रतिपाळले पाहिजे म्हणून सगुण भजन सोडू नये. याने चिकित्सक श्रोत्याचे समाधान होईना. तो म्हणाला, देवाने काय केले म्हणून त्याचा उपकार मानावा? होणार ते टळतच नाही असे जर आहे, मग रिकामे भजन का करा? हा प्रश्न ऐकून मात्र समर्थ रागावले व म्हणाले की, बाकीच्या व्यवहारात काही फरक पडला तर चालत नाही. मग भजनमात्र मोडावे हे अद्वैत ज्ञान कोठले? साहेबासमोर नीचासारखे लोटांगण घालण्यास तुला काही वाटत नाही, मात्र ब्रह्मादिक देवही ज्याचे वंदन करतात अशा श्रीरामास भजत नाहीस, तुला काय म्हणावे? माझा अनुभव असा आहे.

*४आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमचा परमार्थ ।*
*जो समर्थाचाहि समर्थ । देवां सोडविता ।।*
*त्याचे आम्ही सेवकजन । सेवेकरितां जालें ज्ञान ।*
*तेथें अभाव धरितां पतन । पाविजेल कीं ।।*
*रघुनाथ स्मरोन कार्य करावें । तें तात्काळचि सिद्धि पावे ।।*
*सगुणाची भक्ति केल्या होते मुक्ति । ऐसें वेदश्रुति बोलतसे ।।*
*भक्तीविण ज्ञान कदा पाविजेना । हें वाक्य सज्जना अंतरीचें ।।*

नाथमहाराज असेंच म्हणतात :-

*निर्गुणीं पावलें सगुणीं भजतां । विकल्प धरितां जिव्हा झडे ।।*

(आ) समर्थांच्या आधुनिक अनुयायांनीं श्रीराम व श्रीविठ्ठल यांत भेद करून एक श्रेष्ठ, एक गौण असें मानून भाविकांचा बुद्धिभेद करण्याचा नकळत प्रयत्न चालवला आहे. पण आपण समर्थ, श्रीराम व श्रीविठ्ठलासंबंधी काय म्हणतात ते पाहू.

*राम कृपाकर विठ्ठल साकार । दोन्ही निराकार एकरूप ।।*
*आमुचिये घरीं वस्ति निरंतरीं । हृदयीं एकाकारीं राहियेले ।।*
*रामदास म्हणे धरा भक्तिभाव । कृपाळु राघव पांडुरंग ।।*

समर्थांनी श्रीरामाची व श्रीमारुतिरायाची उपासना प्रसृत केली याला मुख्य कारण त्यांना त्याच उपासनेनें इष्ट प्राप्ती झाली व ही उपासना त्यांच्या घराण्यातच पूर्वीपासून होती हे विसरता कामा नये. समर्थांचे घराणे मध्वाचार्यांचे संप्रदायी होय व मध्वसंप्रदायांत श्रीराम व मारुती यांच्या उपासनेत फारच महत्त्व आहे ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. तुकोबा जसे म्हणतात की :

*सहज वडिलां होती सेवा । म्हणोनि पूजितों या देवा ।*

अगदी तसेच समर्थ म्हणतात,

*आमुचें कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ ।*

खरोखर श्रीराम व श्रीविठ्ठल यांत काहीच फरक करण्याची जरुरी नाही. कारण मुळातच तसा फरक नाही.

(५) यानंतरचे महत्त्वाचे साम्य म्हणजे दोन्ही संप्रदायांत भक्ती व नामस्मरण यांना असलेले महत्त्व. वारकरी पंथ हा भक्तिप्रधान म्हणून प्रसिद्धच आहे. एवढ्याकरता त्या पंथातील साधूंची वचने देऊन जागा अडवीत नाही. समर्थ काय म्हणतात तेवढेच सांगतो. समर्थ हे भक्तिपंथास 'राजपंथ' म्हणतात.

*एक नवविधा भक्तिराजपंथे । गेले तरले परलोकींच्या निजखार्थे ।*
*एक योगी गुप्तपंथें । ब्रह्मभुवना पावले ।।*

श्रीएकनाथमहाराजांच्या तत्त्वज्ञानाचा व ग्रंथांचा समर्थांच्या तत्त्वज्ञानावर मोठा परिणाम झालेला होता. त्यांच्या भाषेत व कल्पनेत पुष्कळच साम्य आहे. प्रस्तुत तुलनेकरता श्रीएकनाथ भक्तीस काय म्हणतात ते देतो.

*यापरी हरिकीर्तन । देत परम समाधान ।।*
*हा भक्तिराजमार्ग पूर्ण । ये मार्गी संरक्षण चक्रपाणी कर्ता ।।*

समर्थांचा कीर्तन भक्तीवर फार जोर होता. त्यांनी एक समासच

कीर्तन भक्तीच्या वर्णनाकरता खर्ची घातलेला आहे. इतरत्र ते म्हणतात :

*कोणास कांहींच न मागावें । भगवद्भजन वाढवावें ।*
*विवेकबळें जन लावावें । भजनाकडे ।।*
*कथेचे घमंड भरून द्यावे ।*
*मना सज्जना भक्ति पंथें चि जावें ।।*

या बाबतीत जास्त लिहावयासच नको. समर्थ दासबोधाच्या आरंभी ग्रंथाचा विषय सांगताना म्हणतात :

*ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ।*
*येथें बोलिला विशद । भक्तिमार्ग ।।*

जसे कीर्तनभक्तीचे महत्त्व समर्थांनीं गाईलेले आहे, तसेच नामस्मरणाचेही गाईलेले आहे. मनाच्या श्लोकांत, अभंगांत सर्व ठिकाणीच त्यांनी नामस्मरणाचे महत्त्व गाईले आहे. वारकरी साधु तर 'करा विठ्ठल स्मरण' म्हणतच आहेत.

(६) आणखी एक साम्य पाहाण्यासारखे आहे. दोन्ही पंथांत संतांचे लक्षण वर्णन करताना खऱ्या वस्तूवरच जोर देऊन वर्णन केलेले आढळून येते.

तुकाराम महाराजांचा 'नव्हती ते संग' असा आरंभ असलेला एक प्रसिद्ध अभंग आहे. त्यांत प्रथम संत नुसत्या बाह्यलक्षणाने होऊ शकत नाही हे दाखवून शेवटच्या कडव्यात ते म्हणतात :

*तुका म्हणे नाहीं निरसला देह । तोंवरी हे अवघे संसारिक ।।*

समर्थ म्हणतात :

*करी वृत्ति जो संत तो संत जाणा ।*
*जो जाणेल भगवंत । तया नाव बोलिजे संत ।*
*जो शाश्वत अशाश्वत । निवाडा करी ।।*

ज्ञानेश्वरमहाराज आपल्या काव्यमय भाषेंत सांगतात :

*आत्मज्ञानें चोखडीं । संत जें माझीं रूपडीं ।।*

(७) दोन्ही पंथांत आचार धर्मावर जोर दिला आहे. कर्माचा त्याग करूं नये. असेच दोन्ही पंथांतील साधूंचे मत आहे. मात्र याचा अर्थ कर्मानेच मोक्ष होतो असे ते म्हणतात असे नव्हे. यांचे म्हणणे असे की कर्म टाकू नये. अपरोक्षानुभवात ते आपोआपच गळते.

*समर्थ – सदाचार हा थोर सांडूं नये तो ।।*
*जगीं भेद कामा नये । (पण) वर्णसंकर करूं नये ।*
*आपुला धर्म उडवूं नये । अभिमान खोटा ।।*

अशा अर्थाची 'ब्राह्मण्य रक्षावें अति आदरें' वगैरे सारखी वाक्ये दासबोधात कितीतरी सापडतील.

तुकाराममहाराज म्हणतात :-

*वेदविहित तुम्ही आइका हो कर्मे । बोलतो तीं वर्मे संतापुढें ।*
*तुका म्हणे मन उन्मन जों होय ।*
*तोंवरि हे सोय विधि पाळी ।।*
*बोले वर्म जो चाले या विरहित ।*
*तो जाणा पतित श्रुति बोले ।।*
*द्रव्य आणि कन्या । येथें कुळकर्म सोधण्या ।।*
*न बाणतां स्थिति अंगीं । कर्मत्यागी लंड तो ।।*

ज्ञानेश्वर महाराजांविषयी बोलावयासच नको. कारण आपण 'नित्योपलब्धि स्वरूप असल्यामुळें' आपणास शुद्धिपत्र मुंज वगैरे काही नको असे निवृत्तिनाथ म्हणत असता ज्ञानेश्वर महाराजांनीं त्यांना बळे बळे पैठणास नेले. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात :

*विधि वेद विरुद्ध संपर्क संबंध । नाहीं भेदाभेद स्वस्वरूपीं ॥*
*अविधि आचरण परम दूषण । वेदो नारायण बोलियेला ॥*
*स्वधर्म अधिकार जातीपरत्व भेद ।*
*उचित तें शुद्ध ज्याचें तया ॥*
*म्हणोनियां संतीं अवश्य आचरावें । जना दाखवावें वर्तोनियां ॥*
*कुळींचा कुळधर्म अवश्य पाळावा । सर्वथा न करावा अनाचार ॥*
*प्रत्यवाय आहे अशास्त्रीं चाळतां । पावन अवस्था जरी झाली ॥*
*ज्ञानदेव म्हणे ऐका जी निवृत्ति । बोलिली पद्धती धर्मशास्त्रीं ॥*

(८) आणखीही या पंथांत साम्य आहे. दोन्हीही पंथ संग्राहक, समुदाय करणारे आहेत. समर्थांना त्यांच्या मातोश्रीने काय करतोस म्हणून विचारले असता 'आई, चिंता करितों विश्वाची' हे दिलेले उत्तर प्रसिद्धच आहे. याच कळवळ्याने समर्थांनी सर्व आयुष्य समुदाय करण्यात खर्ची घातले. श्री. शंकरराव देव रामदास रामदासीत म्हणतात, ''समुदाय करण्यावर श्रीसमर्थांचा फार कटाक्ष असे. समुदाय करणे हे या संप्रदायाचे प्रमुख लक्षण होय.'' समुदाय करणे हे समर्थ संप्रदायाचे जसे लक्षण आहे तसेच वारकरी पंथाचेही आहे. वारकरी भजनें, कीर्तनें, वारकऱ्यांच्या पंढरपूर येथे भरणाऱ्या वाऱ्या यांचा ज्ञानमार्ग व योगमार्ग यांच्याशी तुलना केली असता वारकरी हा 'समुदाय' करणाराच पंथ आहे हे चटकन लक्षात येते. ज्ञानेश्वर महाराजांचे वर्णन करताना तुकाराम महाराज म्हणतात–

*जेणें हे घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥*

वारकऱ्यांतील 'फड' व 'दिंड्या' ह्या समुदायाकडे या समाजाचे लक्ष आहे याचेच प्रतीक आहेत. तुकाराम महाराज एके ठिकाणी देवाजवळ दान मागतात :

*तुका पाया लागे । दान समुदाय मागे ॥*

याबाबत ज्ञानेश्वरमहाराजांनी साधकदशेचे वर्णन करताना जो मार्ग सांगितला तो लक्षात ठेवण्यासारखा आहे. ते असा मार्ग सांगतात की ज्यात साधक दशेतच साधक परांचे हित पाहण्यास झडतो.

*का फेडित पाप ताप । पोखीत तिरींचें पादप ।*
*समुद्रा जाय आप । गंगेचें जैसें ॥*
*कां जगाचें आंध्य फेडितु । श्रियेचीं राउळें उघडितु ।*
*निघे जैसा भास्वतु । प्रदक्षिणें ॥*
*तैसीं बांधलीं सोडित । बुडाली काढित ।*
*सांकडीं फेडित । आर्तांचिया ॥*
*किंबहुना दिवस राती । पुढिलांचे सुख उन्नति ।*
*आणित आणित स्वार्थी । प्रवेशिजे ॥*

असा साधक सिद्ध झाल्यावर

*जे पुरुषार्थसिद्धि चौथी । घेऊनि आपुलिया हातीं ।*
*रिगाला भक्तिपंथीं । जगा देतु ॥*

असा झाला नाही तरच नवल!

(९) हे दोन्ही पंथ 'समुदाय' करण्यावर जोर अधिक देतात याचे मुख्य कारण दोन्ही पंथांतील साधु अथवा महात्मे हे आपल्या सभोवतलाची परिस्थिती विसरले नव्हते. तिकडे लक्ष देऊन ते साधन सांगत होते.

निवृत्तिप्रधान समजले गेलेले ज्ञानेश्वर महाराज हेही परिस्थिती पाहात होते हे पाहाणे असल्यास त्यांची ज्ञा. अ. ३ श्लोक ११ व अ. १८ श्लो. ४१ यावरील टीका पाहावी.

त्यातील महत्त्वाच्या तेवढ्या ओव्या खाली देत आहे.

*.... .... संतोषने दील ज्ञानि आपुलिये ॥*
*जैसा फुलाचेनि सांगातें । तांतु तुरंबिजे श्रीमंतें ।*
*तैसें द्विजसंगें शूद्रातें । स्वीकारी श्रुति ॥*

यांचे महत्त्व कळण्यास या ओव्यांची श्रीमच्छंकराचार्य यांच्या या श्लोकांवरील भाष्याशी तुलना करावी. म्हणजे ज्ञानेश्वरमहाराज परिस्थितिनिरपेक्ष व्याख्यान कसे करीत

नाहीत व संग्राहक स्वरूपाचे त्यांचे व्याख्यान कसे हे चटकन् लक्षात येईल.

तुकारामबोवा हेही परिस्थिती विसरले नव्हते, हे त्यांच्या खालील उद्‌गारावरून लक्षात येईल.

*टिळे लपविती पातडीं । लेती विजार कातडीं ॥*
*बैसोनियां तक्तां । अन्योविण पिडिती लोकां ॥*
*राजा प्रजा पीडी । क्षेत्री दुश्चितासी तोडी ॥*
*काय करूं देवा ऐसी नाहीं शक्ति ।*
*दंडोनि पुढती वाटे लावूं ॥*
*न घडे यावरी न धरवे धीर । पीडतां हें राष्ट्र देखोनि जग ॥*

समर्थांच्यासंबंधी बोलण्याचे कारणच नाही. तत्कालीन परिस्थितीचा उल्लेख समर्थांच्या ग्रंथांत जितका आला आहे तितका इतरत्र संतकवींच्या ग्रंथांत क्वचितच आढळेल. नाही म्हटले तरीही हरकत नाही. परचक्रवर्णनातील 'बुडाला औरंग्या पापी' वगैरे त्यांचे उद्‌गार प्रसिद्धच आहेत.

(१०) शेवटचे दाखविता येण्याजोगे साम्य म्हणजे त्यांच्या उपदेशात प्रवृत्तिनिवृत्तीची लावलेली योग्य व्यवस्था. दोन्हीही पंथांतील साधु बुद्धधर्माप्रमाणे प्रत्येकाने घरादाराचा त्याग करावा व भिक्षु व्हावे असे सांगत नाहीत. त्यांच्या उपदेशात फार तारतम्य आहे. त्यांनी मानवी स्वभावाचा चांगला अभ्यास केलेला आहे व म्हणूनच ते सर्वांना सारखी निवृत्ति सांगत नाहीत.

तुकाराम महाराज म्हणतात :

*अधिकार तैसा करूं उपदेश । साहे ओझे त्यास तें चि द्यावें ॥*
*मुंगीवरी भार गजाचें पालाण । घालितां तें कोण कार्यसिद्धि ॥*
*आशा हे समूळ खाणोनि काढावी । तेव्हां चि गोसावी व्हावें तेणें ॥*
*नाहीं तरि सुखें असावें संसारीं । फजिती दुसरी करूं नये ॥*

समर्थांनीही प्रपंच टाकू नये असाच उपदेश केला आहे.

*आधीं प्रपंच करावा नेटका ।.... .... ॥*

समर्थ सुद्धा नुसताच प्रपंच करावा असे सांगत नाहींत. ते म्हणतात

*प्रपंच सुखें करावा । परी कांहीं परमार्थ वाढवावा ।*
*परमार्थ अवघाचि बुडवावा । हें विहित नव्हे ॥*

समर्थ व तुकोबा यांनी एकमेकांस नदीच्या तीरावरून पाहिले. दोघांची दृष्टादृष्ट झाल्यावर खुणेने एकमेकांस प्रश्न विचारले व दोघांनी 'शंखान् दध्मौ' अशी दंतकथा प्रचलित आहे. त्याचाही अर्थ हाच आहे. लोकांना त्याग करण्याचा किती सांगावा याचे मर्म दोघेही जाणत होते.

तुकारामबोवा म्हणतात :

*सुखें करावा संसार । न संडावें दोन्ही बार ।*
*दया क्षमा घर । चोजवीत येतील ॥*
*पोटा पुरतें काम । अगत्य तो राम ॥*
*भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें ।*
*ऐसियासी नारायणें । उपक्षिजे सर्वथा ॥*
*भिक्षा आणि व्यवसाय । काला करी तो गाढव ॥*

समर्थ व तुकोबा वगैरे वारकरी संत प्रवृत्तीचा उपदेश करतात. पण त्यांची प्रवृत्ती निवृत्तीच्या पायावर उभारलेली आहे. महंमदासंबंधाने लिहिताना एका गृहस्थाने लिहिले आहे की त्याचे लक्ष वैकुंठीचे राज्य अथवा Kingdom of God यापेक्षा पृथ्वीवरील राज्याकडेच होते आमचे महात्मे हे अभ्युदयाकरता तळमळत होते, पण यांचे लक्ष्य 'स्वानंदसाम्राज्याचे' धनी होण्याकडे व जगताच्या आवाक्यात ते आणून देण्याकडे होते हे निर्विवाद आहे.

## ४ पंथांतील भेद

या पंथांत ज्याप्रमाणे साम्य आहे त्याप्रमाणे भेदही आहेत, हे नाकारून चालणार नाही. मात्र दाखविल्या जाणाऱ्या भेदांपैकी काही भेद खरे आहेत व काही कृत्रिम अथवा भ्रामक आहेत.

### (अ) यथार्थ भेद

हे दोन्ही पंथ कालदृष्ट्या प्राचीन व अर्वाचीन अशा संबंधांचे आहेत. वारकरीपंथ हा जुना आहे. रामदासीपंथ

अर्वाचीन आहे.

वारकरीपंथ निवृत्तिप्रधान पण श्रीज्ञानेश्वरादी चार भावंडे जर सोडून दिली तर वारकरीपंथातील बहुतेक सर्व साधु गृहस्थाश्रमी होते. समर्थ स्वत: नैष्ठिक ब्रह्मचारी होतेच. पण त्यांच्या शिष्यांतही ब्रह्मचाऱ्यांचा मोठा भरणा होता. परवा परवापर्यंत समर्थसंप्रदायातील टाकळी येथील गादीवर ब्रह्मचारीच विराजमान होत असे.

खरे विचारणीय असे फरक याहून वेगळे आहेत. त्यातील पहिला म्हणजे दोघांची भक्तीच्या स्वरूपाकडे पाहाण्याची दृष्टी. वारकरीपंथांत विशेषत: तुकोबांच्या संप्रदायात प्रेमस्वरूपिणी भक्तीकडे ओढा अधिक. वारकऱ्यांतच पण ज्ञानेश्वर महाराजांच्या ग्रंथांत या प्रेमस्वरूपिणी भक्तीची महती इतकी गायिलेली दिसत नाही. ज्ञानेश्वरमहाराजांचा ओढा स्वभावत:च ज्ञानी भक्तीकडे अधिक. समर्थांच्या ग्रंथाकडे पाहिले तर त्यांचा ओढासुद्धा ज्ञानी आत्मनिवेदनरूप भक्तीकडे फार. हा थोडा तात्त्विक स्वरूपाचा म्हणण्यापेक्षा महात्मांच्या मनोवृत्तींतील अथवा मनाच्या ठेवणीतील फरक होय असे म्हटल्यास हरकत नाही.

यानंतरचा दुसरा फरक म्हणजे रामदासीसंप्रदाय व वारकरी संप्रदाय यातील संघटनापद्धतीतील फरक हा होय. वारकरीपंथांतील सर्व साधूंनी महाराष्ट्राची संघटना करण्याकरता व तिला चिरस्थायित्व येण्याकरता सर्व महाराष्ट्रास हाक मारून पंढरपुरी चंद्रभागेच्या वाळवंटात श्रीपांडुरंगाच्या अध्यक्षतेखाली जमण्याची आज्ञा केली. ज्ञानेश्वरमहाराज, नामदेवराय, एकनाथमहाराज, तुकाराममहाराज या सर्वांनी 'होय होय वारकरी । पाहे पाहे रे पंढरी ।।' अशीच घोषणा केली.

समर्थांनीं अशा प्रकारची घोषणा केली नाही. ज्या क्षेत्री आपण तपश्चर्या केली त्या गोदातीरनिवासी श्रीरामचंद्रांकडे सर्वांनीं यावे असा हांकारा त्यांनी केला नाही. चाफळास पालख्या येत. पण समर्थांच्या हयातीतच तंटे होऊन त्या तेव्हाच बंद पडल्या. समर्थांचा जोर संघटनेकरता मठावर होता. त्यांनी अनेक मठ स्थापिले. प्रमुख वारकरी साधूंनीं मठ स्थापलेच नाहीत. ते सर्व मठ, फड याच्या विरुद्धच होते. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :

*हृदयीं नाहीं जालेंपण क्रोधें भवंडिसी लोचन ।*
*अंगीं भस्म उधळण राख राखेल काई ।।*
*खरा लोळे उकिरडा काय परत्राचिया चाडा ।*
*तैसा मठीं बांधोनि मूढा वर्म चुकलासी ।।*

नाथ महाराज म्हणतात–

*न मांडी स्वतंत्र फड । अंगीं अहंता येईल वाड ।।*

समर्थांनी पंढरपूरसारख्या क्षेत्राकडे अथवा पांडुरंगासारख्या दैवताकडे समाजास वळविले नाही पण मठ स्थापून मठाधिपतीशी आपले अनुसंधान ठेविले. याचे काही चांगले व काही वाईट परिणाम झाले.

याचा मोठा दृग्गोचर होणारा परिणाम असा की, रामदासी पंथ हा श्रीसमर्थांच्या भोवतीच चिकटून राहाणारा असा पंथ झाला. त्याला महंमदीय अथवा बौद्धधर्माप्रमाणे 'व्यक्तिप्रधान' (Personalistic) धर्माचे स्वरूप आले. वारकरीपंथ हा वैदिक धर्माप्रमाणे (Nonpersonalistic) व्यक्तिनिष्ठ असा झालाच नाही. यामुळे वारकरीपंथांत चैतन्य, स्वरूप, आनंद व प्रकाश अशा चारही मार्गांचे लोक येऊ शकतात. चोखोबांनी एके ठिकाणी म्हटले आहे–

*पंढरीचा हाट कउळांची पेठ । मिळाले चतुष्ट वारकरी ।।*

तात्पर्य, वैदिक धर्माप्रमाणे वारकरीपंथ हा संग्राहक स्वरूपाचा आहे. त्यात नाथपंथी, चैतन्यसांप्रदायी दत्तसंप्रदायी, वगैरे सर्वच येऊ शकतात. पण समर्थ संप्रदायात मात्र यांचा प्रवेश होणार नाही, अथवा आजपर्यंत तरी झालेला दिसत नाही.

दुसरा मोठा परिणाम म्हणजे समर्थसंप्रदायाची तत्कालीन शिस्त काही काळ जरी उत्तम राहिली तरी मठपती मठपतींत समर्थांच्या हयातीतच तंटे सुरू झाल्याच्या गोष्टी प्रसिद्धच आहेत. वारकरी साधूंनी सत्तेचा आश्रय

केला नाही. तुकोबांच्याकडे शिवाजीमहाराज आले असता 'दिवट्या छत्री घोडे । हें तों बऱ्यांत न पडे' म्हणून आलेल्या ऐश्वर्याचा त्याग केला व प्रसंग विशेषी

*तरि कां बोळगणें । राजद्वारीं होती सुने*

असले कडक उद्‌गार काढले. याचा एक मोठा फायदा असा झाला की, तुकोबादिकांच्या परमार्थात व्यवहार शिरला नाही. शिव हे हलाहल पचवू शकतात. तसे समर्थ हे ऐश्वर्य भोगूनही 'अभोक्ता' या बोधाने राहू शकतात. पण इतर कच्चे ज्याचे वैराग्य कोमळ कंटकासारखे होते त्यांची काय कथा?

मठाने शिस्त वाढते. पण मठाची जमीन, उत्पन्न ही लोभ उत्पन्न करतात व मग अत्यंत विरक्त असा महात्मा असला तरच तो तरला जातो. एरवी साधक लोभास बळी पडतोच पडतो. ख्रिश्चन चर्चचा इतिहास देताना एक ग्रंथकार म्हणतो–

"We can readily understand the per-occupation of bishops in dogmatic quarrels, the constant journeying to councils to the neglect of pastoral duties, the underhand intrigues, the frequent banishments and restorations, the unseemly fightings of rival bishops for same see, the growing number of unworthy occupants of that high office and the worldly life so many of them lived all this had a blasting effect upon christian life."

वरती दिलेला उतारा अनेक कटुसत्याने भरला आहे. पण यातील बहुतेक गोष्टी समर्थ ह्यात असतानाच घडू लागल्या होत्या हे प्रसिद्ध आहे. राजकारणदृष्ट्या मठांचा काय उपयोग असेल तो असो पण परमार्थदृष्ट्या बोलावयाचे तर शेतरक्षण करण्याकरता घातलेले कुंपणच जसे शेत खाऊं लागावे तसे धर्म टिकविण्याकरता उभारलेल्या भिंतीचा धार्मिक तत्त्वावर अंधार पाडून पुष्कळ वेळेला त्या तत्त्वांचा कोंडमारा करताना दिसतात. Nearer the church father from God ही म्हण बरीचशी खरी आहे.

वारकरी संप्रदायात फार वर्षेपर्यंत हे फडाचे व मठाचे खूळ नव्हते. हल्ली अस्तित्वात असलेले सर्व फड तुकोबारायांच्या नंतर त्यांच्या प्रशिष्याचे शिष्य कै. मल्लाप्पा वासकर यांच्यापासून अथवा नंतरचे आहेत व तेथेही जो त्यांचा परिणाम इतरत्र दिसतो तो दिसू लागलाच आहे. तात्पर्य, वारकरी पंथांत व्यवहार शिरण्यास बरेच दिवस लागले. समर्थांच्या मठपद्धतीने थोडक्यात अवकाशात त्यात व्यवहार शिरला.

समर्थांनी सत्तेच्या साहाय्याचा अंगीकार केल्याचे आणखी एक फळ आपल्या दृष्टीस पडते. शिवाजीमहाराजांनी समर्थसंप्रदायाचा अंगीकार केल्याने अनेक बाजारबुणगे महाराजांना खूष करण्याकरता संप्रदायात शिरले असले पाहिजेत. असे सांगतात की बडोद्याचे गादीवर ज्या वेळी कै. खंडेरावमहाराज होते त्यावेळी प्रत्येक सरदार त्याचे दर्शनास येताना मुंडीछाट सदरा व गळ्याला वरती तालमीतील माती लावून येत असे. हेतू हा की महाराजांची तब्येत खूष व्हावी. कारण कै. खंडेरावमहाराजांना तालमीचा अत्यंत शौक होता. तसेच शिवाजीमहाराजांच्या वेळेला समर्थसंप्रदायातही झाले असले पाहिजे. नालायक लोकांचा भरणा होऊ लागला म्हणजे पंथ फार दिवस सुस्थितीत राहू शकत नाही. ख्रिश्चनधर्मात कांस्टंटाइनने त्या धर्माचा अंगीकार केल्याचा परिणाम दाखवताना एक इतिहासकार लिहितो–

And history has nowhere more bitterly taught the lesson that to make christianity popular as Constantine did, is to sweep into it vast numbers, nominal christians, and to cause the salt so to lose its savour that it is neither fit for the land nor yet for the dunghill, but men cast it out.

How little imperial favour can help toward the spiritual life of the church is demonstrated by the history that follows.

समर्थांच्या संप्रदायात व्यवहार आणखीही एका अंगाने शिरलेला दिसतो. समर्थ म्हणतात की गुरू करावयाचा असेल तर तो स्वयातीचाच असावा.

नीच यातीचा गुरु । तोहि कानकोंडा विचारु । ब्रह्मसभेसी जैसा चोरु । तैसा दडे ।। ब्रह्मसभा देखतां । त्याचें तीर्थ नये घेतां । अथवा प्रसाद सेवितां । प्रायश्चित्त पडे ।। तीर्थप्रसादाची सांडी केली । तेथें नीचता दिसोन आली । गुरुभक्ति ते सटवली । एकाएकी ।। ऐसी साकडी दोहीकडे । तेथें पस्तावा घडे । नीच यातीस गुरुत्व न घडे । या कारणें ।। तथापि आवडी घेतली जीवें । तरी आपणचि भ्रष्टावें । बहुत जनास भ्रष्टवावें । हें तों दूषणचि कीं ।। आतां असो हा विचारु । स्वयातीचा पाहिजे गुरु । नाहीं तरी भ्रष्टाकारु । नेमस्त घडे ।।

समर्थांच्या या वचनांच्या आधारावर गिरिधरस्वामींनी समर्थप्रतापांत खालीलप्रमाणे उद्‌गार काढले आहेत–

*नीच प्राणी गुरुत्व पावला । तेथें आचार चि बुडाला ।*
*वेदशास्त्र ब्राह्मणाला । कोण पुसें ।।*
*शूद्रवर्णे ब्राह्मण बोधिलें । ब्राह्मण शूद्रासी शरण गेले ।*
*गुरुशिष्य रविनंदनें पुरीसी नेले । ईश्वर आज्ञेप्रमाणें ।।*

वारकरी साधूंत हे तत्त्व प्रतिपादितांना आपणांस कोणी आढळून येणार नाही. जेथे आत्मज्ञान आहे व ते देण्याची पात्रता आहे तो गुरू. मग तो कोणच्या का जातीचा असेना! स्वयातीचा गुरु असला तर बरा कारण त्याने व्यवहार सांभाळला जातो. पण गुरुत्वाची लक्षणे अन्य जातींच्या मनुष्यांत प्रगट झाली व आपल्या यातीतला योग्य गुरू मिळाला नाही तर त्याला शरणागती करू नये काय? स्वयातीचा गुरू असावा ही व्यावहारिक सोय आहे. पारमार्थिक तत्त्व नव्हे. बहिणाबाई, रामेश्वरभट्ट यांचे गुरू तुकोबा होते. विसोबा खेचर यांचे गुरू ज्ञानेश्वर महाराज व मुक्ताबाई होत्या म्हणून काय बहिणाबाई, रामेश्वरभट्ट, विसोबा खेचर, सच्चिदानंदबाबा, चांगदेव यांना 'रविनंदनें पुरीसी नेलें' म्हणावें काय? तुकाराम महाराज तर म्हणतात–

सोनियाचा कळस । माजी भरिला सुरारस ।। काय करावें प्रमाण । तुम्ही सांगा संतजन ।। मृत्तिकेचा घट । माजी अमृताचा सांठ ।। तुका म्हणे हित । तें मज सांगावें त्वरित ।।

वारकरीपंथ हा या दृष्टीने अधिक उदार व शुद्ध परमार्थाला धरून आहे. समर्थांनी आचारधर्म टिकवण्याकरता परमार्थालाही थोडी मुरड घातली आहे असे म्हटल्याशिवाय गत्यंतर नाही.

आणखीही एक भेद सांगणे अवश्य आहे. ज्ञानेश्वरमहाराज हे जयाचें ऐहिक धड नाहीं । तयाचें परत्र पुससी काई । असे जरी शिकवतात, नाथमहाराज ज्याचा देह पराधीन । तो जीवें जितां सदा हीन ।' असे उपदेशितात व तुकाराममहाराज 'बैसोनिया तक्तीं । अन्नेवीण पीडिति लोकां' असे जरी कळवळ्याने म्हटत असले तरी यांपैकी कोणीही प्रत्यक्ष राजकारणाच्या उलाढालीत भाग घेतला नाही. समर्थांनी तो बराच घेतला.

पण हीही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की समर्थांनी राजकारणात भाग घेतला म्हणजे काय केले. दासबोधांत काही स्थळे सोडून बहुतेक ठिकाणी राजकारण म्हणजे उत्तम व्यवहारच सांगितला आहे. शीख गुरु ज्याप्रमाणे स्वत: किर्पान घेऊन लढले असे समर्थ लढायावर गेले नाहीत. ज्ञानेश्वरमहाराजांच्या काळी स्वराज्यच होते. तुकाराममहाराज पारमार्थिकदृष्ट्या जरी भाग्यवान तरी व्यावहारिकदृष्ट्या थोडे कमनशिबीच. कारण काय करूं देवा ऐसी नाहीं शक्ति । दंडोनि पुढती वाटे लावूं' 'मला येथून यापेक्षा घेऊन चल' असे म्हणत त्यांना इहलोक सोडावा लागला. समर्थ मात्र भाग्यवान. शिवाजी महाराजांनी स्वराज्यस्थापना केलेली पाहाण्यास ते जिवंत होते.

येथपर्यंत खरे भेद व त्याचे काही परिणाम सांगितल्यावर आता कृत्रिम भेदाकडे वळू. आमच्या मते खालील भेद जे वारकरीसंत व रामदास यांच्या तत्त्वज्ञानात

करण्यात येतात ते वारकरी व रामदास या दोघांचे तत्त्वज्ञान न कळल्यामुळे होय.

असले काही भेद करणाऱ्यांपैकी प्रसिद्ध असे कै. इतिहासाचार्य राजवाडे हे होत. प्रस्तुत लेखकांस कै. राजवाडे यांच्या इतिहासविषयक कामासंबंधाने अत्यंत आदर आहे. पण आरिस्टॉटलने प्लेटोच्या नीतिविषयक कल्पनांची टीका करताना म्हटले आहे की मला प्लेटोसंबंधी आदर कमी आहे असे नाही, पण सत्याविषयी अधिक आहे. तसेच कै. राजवाडे यांचेविषयी प्रस्तुत लेखकास आदर आहे पण सत्याविषयी अधिक आदर आहे. तेव्हा सत्यकथन करण्याकरता कै. राजवाडे यांच्या काही विधानांची छाननी करणे अवश्य आहे.

श्रीसांप्रदायिक विविधविषय खंड १ यात कै. राजवाडे म्हणतात– ''समर्थ शंकरसंप्रदायी नव्हते. ज्ञानदेव तुकाराम होते'' व ह्यास कारण काय तर शंकरसांप्रदायांत गुरू शरीरधारी लागतोच. समर्थांनी शरीरधारी गुरू केलाच नाही. ते म्हणतात स्वरूपसंप्रदाय अयोध्यामठ । जानकी देवी श्रीरघुनाथदैवत । मारुति उपासक नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासी ।। समर्थांचे गुरू प्रत्यक्ष श्रीराम–आत्माराम हेच होत. आता त्यांच्या म्हणण्याचा विचार करू.

प्रथमत: कै. राजवाडे ह्यांनी जे कारण दिलेले आहे तेच मुळात सोडून आहे. समर्थ स्वत: श्रेष्ठांच्याकडे अनुग्रह घेण्यास गेले होते. त्यांनी काही कारणाकरता नाकारल्यावर समर्थ मारुतीच्या देवळात गेले व तेथे त्यांना प्रथमचा साक्षात्कार झाला. जर शरीरधारी गुरू समर्थसंप्रदायाला वावडा मग समर्थ–अर्थात हे शरीरधारीच होते– हे आपल्या शिष्यांचे गुरू कसे झाले? कै. राजवाडे यांनी या गोष्टीचा विचारच केल्यासारखे दिसत नाही. उलट तुकारामबोवांच्या सांप्रदायात ज्या प्रचलित कथा आहेत त्यावर विश्वास ठेवणे झाल्यास खुद्द तुकारामबोवांना, बहिणाबाईंना, निळोबांना अनुक्रमे स्वप्नांत, स्वप्नासारख्या स्थितीत, व तुकारामबोवा इहलोक सोडून गेल्यावर पुन्हा शरीरधारी भासांत अनुग्रह झाले.

ज्ञानेश्वरमहाराज तर श्रीमच्छंकराचार्य यांच्या संप्रदायाचे नव्हतेच. त्यांनी ज्ञानेश्वरीच्या सरतेशेवटी 'भाष्यकारातें वाट पुसत' असे म्हटल्याने ते आचार्य संप्रदायाचे होत नाहीत. संन्याशांचे गिरी, पुरी, आनंद, सरस्वती वगैरे जे प्रकार दिले आहेत त्यात 'नाथ' येत नाहीत. ज्ञानेश्वरमहाराज हे नाथसंप्रदायी होत. आचार्यसंप्रदायी नव्हेत.

वस्तुस्थिती अशी आहे की, शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाचा विशेष परिणाम कोणावर असेल तर समर्थांवर होय, ज्ञानेश्वरमहाराजांवर नव्हे. ज्ञानेश्वरमहाराज अद्वैती, जगन्मिथ्यत्व मानणारे, पण अज्ञानाचा धांडोळा घेऊन अज्ञान म्हणून काही नाही असे सिद्ध करणारे. उलट समर्थ हे माया अथवा अज्ञान घेऊनच सर्व ठिकाणी जगाची स्थिती वर्णन करतात.

ज्ञानेश्वरमहाराज अमृतानुभवाच्या सातव्या प्रकरणात अज्ञानाचा धांडोळा घेताना म्हणतात–

*ये-हवीं तरी अज्ञाना । जैं ज्ञानाची वसे क्षोभणा ।*
*तैं तरी काना । खालीच दडे ।।*
*या लागीं एकें चिद्रूपें । आपण पया आपण पें ।।*
*देखिजे कां आरोपें । काय काज ।।*
*आम्ही येऊनि जाऊनि पुढती । अज्ञान आणावे निरुति ।।*
*तें नाहीं तरी किती । वतवतु पा ।।*

समर्थ म्हणतात–

*''याचे ऐसें प्रतिवचन । ब्रह्म जें का सनातन ।।*
*तेथें माया मिथ्याभान । विवर्तरूप भासतसे ।।*

तात्पर्य, समर्थ हेच आचार्यांच्या सांप्रदायाचे अद्वैती होते.

दुसरा एक काल्पनिक फरक सांगण्यात येत असतो. समर्थ हे राजकारणी म्हणून त्यांनी महाराष्ट्रांत उत्साह उत्पन्न करण्याकरता राम व मारुती यांची उपासना सुरू केली. उलट हे वारकरी साधु यांनी विठोबाची उपासना

सुरू केली. याचे निराकरण मागे येऊन गेले आहे म्हणून पुन्हा देत नाही. आमच्या मते समर्थ रामोपासक झाले व रामाची उपासना त्यांनी सर्वांना शिकवली याचे मुख्य कारण ही उपासना त्यांच्या कुळातच होती.

### ५ शेवट

आतापर्यंत जी चर्चा केली त्यावरून वाचकांच्या हे लक्षात आले असेल की वारकरीपंथ व रामदासीपंथ यांत भेदापेक्षा साम्यच अधिक आहे. दोन्ही पंथ अद्वैती, परमार्थप्रवण आहेत. प्रपंच करून परमार्थ करावा अशीच दोघांची सामान्यत: शिकवण आहे. दोघांचे कार्य वेगवेगळ्या क्षेत्रांत पडल्याने त्यात फरक फारसा दिसतो. मुळात थोडा फरक आहे. पण असे फरक असणे हे जिवंतपणाचे चिन्ह आहे. धार्मिक मनुष्यांनी फरकावर जोर न देता साम्यावरच जोर द्यावा. याच्यांतच खऱ्या धर्माची वाढ आहे.

पेकनह्याम् आणि वाल्स यांच्या Lights and shades of christendom या पुस्तकात एक पंथीयातील भेदाभेदावर जोर देण्याबाबत दोन मते देऊन निर्णय दिला आहे. तो सर्व पंथीयांनी मनन करण्याजोगा आहे म्हणून खाली देत आहो.

“There are sure to be differences in practice and in doctrine between different churches. Some of them ar non – essential differences. What is to be done? There will be two points of view, that of Vieter which says “All must agree, therfore the majority must force its rule on minority; if the minority will not consent, let them be outside the brotherhood”, and that of Irenaeus, which says; “Non-essential differences are a proof of richness and vigour of life; let each side tolerate the difference.” There is no doubt about the verdict of church history. The ultimate peace and well-being of the church lies along the line of the second of these policies.”

तात्पर्य, हल्लीच्या युगात महाराष्ट्रातील सर्व पंथांच्या सर्व लोकांनी भेदभाव विसरून पूर्वीच्या महात्म्याप्रमाणे लोकांस आत्मकल्याणाचा खरा मार्ग दाखवावा. इतर अज्ञ जनापेक्षां धार्मिक म्हणवून घेणाऱ्यावर मोठी जबाबदारी आहे. प्रत्येकाने आपण पूर्ण होऊन इतरांस पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा हेच या दोन्ही पंथांतील साधूंचे सांगणे आहे. मार्कस ऑरेलियस या पाश्चात्त्य थोर पुरुषाच्या भाषेत सांगावयाचे तर सर्वांनी खालील कारणाकरता खालील कामास झटावे.

Save men, life is short. This only is the harvest of earthly existence, a righteous disposition and social acts.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे–

*किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊन तिहीं लोकीं ।*
*भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।*

व याकरता

*जे पुरुषार्थसिद्धि चौथी । घेऊनि आपुलिया हातीं ।*
*रिगाला भक्तिपंथीं । जगा देत ।।*



# चाणक्य ते समर्थ राष्ट्रधर्माचा सेतू

**_राष्ट्रसेवक शंतनू सू. रिठे_**
_सद्‌गुरू निजानंद महाराज वेदविद्यालय, आळंदी_
९८८१९६८६७७

_सदा देशकार्यी झिजे देह ज्यांचा ।_
_सदा 'संघ' नामे वदे नित्य वाचा ।।_
_सदा ध्यास हा मातृभूचा जयांना ।_
_सदा वंदितो त्या मनस्वी जनांना ।।_

वरील ओळींचा साक्षात मूर्तिमंत देह जर डोळ्यांसमोर आणायचा तर भारतात या प्रकारे माणसांची वानवा कधीच नव्हती. भारतमातेची कुस अशा देश व धर्मप्रेमींनी भरलेली होती. रामायण-महाभारत इत्यादी ग्रंथांपासून सुरू झालेली ही गंगोत्री मध्ययुगीन काळात कुठे तरी आपल्याला जडलेल्या विस्मरणाच्या शापाने स्मृतीतून पुसली गेली. विजिगिषु वृत्ती ही शिथिल पडत जात होती. अत्यंत तेजस्वी संस्कृती व भारतीय समाज यात ही विस्मरण नावाची दरी फार खोलवर जात होती. त्यामुळे अशा पराभूत व गुलामीत असणाऱ्या समाजाला व त्याच्या विस्मरण नावाच्या दुर्धर रोगाला नाहीसा करण्यासाठी प्रखर वैद्यांची गरज होती. भारतीय समाजास ती गरज भारताच्या आर्य-चाणक्य व समर्थ रामदास या दोन सूपुत्रांनी भरून काढली. नुसती काढलीच नाही, तर सहिष्णु भारताचे जयिष्णु भारतात रूपांतरण करण्याचे स्वप्न व कार्य केले.

पण गेल्या १९-२०व्या शतकाच्या प्रारंभी मेकॉले पुत्रांची पिलावळ वाढल्याने आपण आपली खरी वृत्ती पुन्हा विस्मरून गेलो. आपला खराखुरा व देदीप्यमान राष्ट्रधर्माचा इतिहास विसरून भारतीय राष्ट्रधर्म हा ब्रिटिशांच्या काळी उद्‌गम पावून विकसित झाला हा एक फार मोठा गैरसमज करून बसलो, म्हणून आपल्या ग्रंथामार्फत पुन्हा एकदा चाणक्य व समर्थ यांची आठवण करून देणे आवश्यक वाटते.

_मुनींनी ऋषींनी जिथे वास केला ।_
_जिथे धूर तो कांचनाचा निघाला ।।_
_जिथे हिंदु साम्राज्य मोठे उदेले ।_
_तिथे आज का मात्र हे दैन्य आले ।।_

या प्रश्नाचे खरोखर उत्तर मला वाटते हे दोन महापुरुषच आपणाला देऊ शकतील. कारण या दोनही महापुरुषांचे जीवन म्हणजे भारतीय इतिहासातील राष्ट्रविचारांचे मूर्तिमंत उदाहरण आहे. भारतीय राष्ट्रधर्म खरा जगून दाखवला या दोन महापुरुषांनी. ज्या वेळेस या राष्ट्रात स्वार्थामुळे देश आणि धर्म यांची पायमल्ली होत होती; त्या वेळेस महान सामर्थ्यशाली राष्ट्र निर्माण करण्याची मनीषा बाळगून कार्य करणारे हे दोन्ही महापुरुष आपल्या राष्ट्राला मार्गदर्शन करत होते. ज्या वेळेस या देशातील क्षत्रिय मनगटे आपल्याच लोकांना मारण्यासाठी व डोळे पाण्यात पाहाण्यासाठी वापरत होते आणि राष्ट्रद्रोही, धर्मद्रोही दुर्जनांपुढे लवत होते, अशा वेळी भारतातील

जुलमी स्वधर्मी आणि विधर्मी राजवटींच्या नाशाची स्वप्ने बघून त्याप्रमाणे जोरकस कार्य करणारे व भविष्यासाठीही राष्ट्रधर्माची संहिता तयार करणारे हे दोन महापुरुष म्हणजे खऱ्या अर्थाने भारताचे नेतृत्व करणारे राष्ट्रगुरू ठरले.

पण दुर्दैवाने आपण चाणक्यांना प्राचीन म्हणून व समर्थांना जातीयवादी ठरवून मोकळे झालो. त्यामुळे खरोखरच आज भारतात जी नेतृत्वाची सुयोग्य अशी वानवा दिसते, ती दिसली नसती. नेतृत्वाचे सर्वोत्कृष्ट प्रशिक्षण देणारी पाठशाळा म्हणजे यांचे वाङ्मय होय.

या दोघांच्या जीवनामध्ये तब्बल १८५० वर्षांचा कालखंड आहे. तरी पण यांचे जीवन हे एकमेकांशी इतके सुसंगत आहे, की बघताना आश्चर्य वाटते. कारण दोघांची दृष्टी एक होती. स्वराज्यावाचून स्वधर्म व स्वराष्ट्र यांचे संरक्षण व विकसन केवळ अशक्य आहे, हे दोघे जाणून होते.

*'शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्र चिन्ता प्रवर्तते'*

हे सूत्र दोघेही पुरेपूर जाणून होते. सामर्थ्यशाली राष्ट्राची निर्मिती हे दोघांचे प्रधानसूत्र होते. ते डोळ्यांसमोर ठेवून आपले काम या दोघांनी मोठ्या गुप्तपणाने केले. दोघांनीही जुलमी राजवटींच्या नाशाची स्वप्ने पाहिली. दोघांनाही संपूर्ण राष्ट्र एक आहे, याचा साक्षात्कार झाला होता. दोघांनाही राष्ट्रनेतृत्व आदर्श हवे होते. दोघेही निस्पृह होते आणि दोघेही राष्ट्रगुरू होते.

चाणक्यांनी राष्ट्रधर्म सांगितला, तर समर्थांनी महाराष्ट्रधर्म गायला. चाणक्यांनी देशातील सज्जन एकत्रित करून राष्ट्रस्थापन केले, तर समर्थांनी देव, देश आणि धर्मासाठी प्राण देणाऱ्या महंतांना तयार करून स्वराज्यासाठी मावळे दिले. चाणक्यांनी चंद्रगुप्ताकरवी सुराज्य स्थापन केले, तर समर्थांनी शिवाजी महाराजांकरवी रामराज्य स्थापन केले. तेजस्वी ब्राह्मण्याचा खरा आदर्श म्हणजे हे दोन महापुरुष. कार्य झाल्यानंतर निसंग होणारे हे दोन महापुरुष अशी कितीतरी साम्यस्थळे दाखवता येतील. पण यातले प्रधानसूत्र म्हणजे धर्म व देश यांच्या संरक्षणाचा आत्यंतिक कळवळा होय.

आणि याच कळवळ्यापोटी त्यांनी जे लेखन केले ते पाश्चात्त्य नेतृत्वविकासाच्या लिखाणापेक्षा नक्कीच खूप चांगले आहे. नेतृत्व निर्माणाचे काम या दोघांच्या लेखनाने केले आहे.

विशेष म्हणजे हे लिखाण सार्वकालीन आहे. राष्ट्राचे नेतृत्व, व्यवस्थापन, अडचणी इत्यादींवर भारतीय किती प्रगतिपथावर होते हे आपल्याला जाणवत राहाते. या महापुरुषांच्या कार्याप्रमाणे त्यांची वृत्ती व तळमळ त्यांच्या लेखनातही जाणवत राहाते.

राज्य हे नुसते राज्य नको ते धर्मराज्य हवे हा दोघांचा आग्रह होता. चाणक्य आपल्या ग्रंथात राज्य हे वेदांच्या संरक्षणाखाली असावे, वेदप्रणीत नीतींनी, धर्माने राज्य करावे असा स्पष्ट उल्लेख करतात. कारण धर्माची मूळ गंगोत्री वेद आहे आणि समर्थांचा हाच दृष्टिकोन ठायी ठायी दिसून येतो. संभाजीच्या पत्रात स्पष्ट उल्लेख करताना समर्थ म्हणतात, धर्मवृद्धीने राज्यवृद्धी आहे. कारण राजसत्तेला अनियंत्रित होण्यापासून धर्मसत्ता रोखते आणि व्यक्ती आणि राज्य यांच्यात सद्‌गुणांचा विकास व्हावा म्हणून बंधन व स्वातंत्र्य देते, त्यामुळे पुर्वसूरींप्रमाणे दोघांनी धर्मसत्ता सर्वोच्च मानली.

यानंतर राष्ट्रहिताचा विचार करताना त्याची पायवाट शिक्षणातून जाते. चाणक्यांना शिक्षणातून विद्यार्थ्यांची विवेकजागृती अपेक्षित होती. त्याचप्रमाणे समर्थसुद्धा त्याच अपेक्षेने लिहितात,

*विद्या उदंडची शिकला । प्रसंगमान चुकतची गेला ।*
*तरी मग तयेविद्येला । कोण पुसे ।*

हे सांगताना विद्याग्रंथ म्हणून दोघांनीही वेदांना प्राधान्य दिले आहे. समर्थ स्पष्ट लिहितात, कर्म उपासना आणि ज्ञान । त्रिकांड वेद हे प्रमाण, हे सांगण्यामागची त्यांची भूमिका म्हणजे राष्ट्राचे सांस्कृतिक नेतृत्व हे वैदिक अध्ययनाने विकसित होत असते.

यानंतर फार महत्त्वाची गोष्ट दोघेही सांगतात. ती

म्हणजे वृद्धोपसेवा. याचा अर्थ आपल्या प्रगल्भतेसाठी समाजातील ज्ञानवृद्धांचा संग करणे. चाणक्य याचा स्पष्ट निर्देश आपल्या ग्रंथात करतात. समर्थांचा उपदेश इथे फार सुंदर आहे. ते म्हणतात, **इहलोक साधाया कारणे । जाणत्याची संगती धरणे ।** व नंतर त्याही पुढे काय काय शिकावे याची लंबी यादीच देतात. कारण राष्ट्राची दोरी युवकांच्या हाती व लगाम वृद्धांच्या हाती असेल तर राष्ट्राचा विकास अधिक जोमाने होतो आणि अशा प्रकारे परिपूर्ण राजाला चाणक्यांनी संयमी राहाण्यास सांगितले आहे. त्याच प्रकारे सांगताना समर्थ म्हणतात,

*कान्ता दृष्टी राखो नये । मनास गोडी चाखऊ नये ।*
*धारिष्ट चळता दाखवू नये । मुख आपले ॥*
*जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडू नये ।*
*पुण्यमार्ग सोडू नये । कदाकाळी ॥*

हे सांगण्याचे कारण या दोघांनीही जुलमी राजवटी अनुभवल्या होत्या. त्यामुळे जनतेत प्रिय होण्याची पायवाट ही संयमातूनच जाते हे त्यांना माहीत होते.

चाणक्यांनी राज्यकारभारासाठी सुयोग्य मंत्र्यांची आवश्यकता सांगितली आहे. समर्थांनीही चाणक्यांप्रमाणे देश, काल, कार्य यांचा विचार करून मंत्री नेमण्यास सांगितले. ते म्हणतात,

*आधी मनुष्य ओळखावे । योग्य पाहूनि काम सांगावे ।*
*निकामी तरी ठेवावे । येकिकडे ॥*
*लोक बहुत शोधावे । त्याचे अधिकार जाणावे ।*
*जाण जाणोन धरावे । जवळी दुरी ॥*

सुयोग्य मंत्री नेमताना ही परीक्षा घेऊन त्यांची नेमणूक करावी असे दोघांचे मत आहे.

*आचार विचारे विण । जे जे करणे तो तो सीण ।*
*धूर्त आणि विचक्षण । तेचि शोधावे*

अशा प्रकारचा सुंदर उपदेश केला आहे.

यापुढे समर्थांना राज्याच्या अंतर्गत बाबीही किती चांगल्या माहीत आहेत, हे पुढील उपदेशावरून लक्षात येईल. फितुरांचा काटा कसा काढावा, कोणाला जवळ करावे या बाबतीत समर्थांचा उपदेश चाणक्यांप्रमाणेच आहे. त्यात समर्थ म्हणतात,

*लोक पारखून सांडावे । राजकारणे अभिमान झाडावे ।*
*पुन्हा मेळवून घ्यावे । दूरील दोरे ॥*
*राज्यामध्ये सकळ लोक । सलगी देऊन करावे सेवक।*
*लोकांच्या मनामध्ये धाक । उपजो नये ॥*
*दुर्जन प्राणी समजावे । परी प्रगट न करावे ।*
*सज्जना परीस आळवावे । महत्त्व देऊनी ॥*

इत्यादी फार सुंदर चाणक्यांप्रमाणे उपदेश केला आहे. त्याहीपुढे समर्थांची गुप्तहेराची कल्पना चाणक्यांसारखीच होती. चाणक्यांनी गुप्तहेराची साखळी बनवण्यास सांगितली. तर समर्थ म्हणतात,

*उदंड करी गुप्त रूपे । भिकाऱ्या सारिखे स्वरूपे ।*
*तेथे यश किर्ती प्रतापे । सीमा सांडिली ॥*

दोघांनीही आपले काम गुप्तपणे केले असल्याने गुप्ततेचे धागेदोरे त्यांना चांगलेच माहीत होते.

यानंतरची समर्थांच्या उपदेशाची दिशा बघितल्यावर हे संत की राजनीतिज्ञ असा प्रश्न पडावा असा उपदेश समर्थांचा आहे. राजनीतीमध्ये गुप्त मसलतींना असणारे महत्त्व जाणून समर्थ चाणक्यांनी ज्या ज्या गोष्टी सांगितल्या त्या सर्व नमूद करतात. समर्थ म्हणतात,

*येकान्ती चाळणा करावी । धारणा उदंड धरावी ।*
*नाना विचारणा करावी । अरिमित्रांची ॥*
*अखंड सावधान असावे । दुश्चित्त कदापि नसावे ।*
*तजविजा करीत बसावे । एकांत स्थळी ।*

असा सूक्ष्म उपदेश कित्येक ओव्यांमध्ये केला आहे.

राज्याच्या कायदेसंदर्भात चाणक्य व समर्थ हे एकमताने सर्वहितकारी, न्यायी व तारतम्याने न्याय देणारे असावे असे मत व्यक्त करतात.

*न्याय सीमा उल्लंघू नये । उल्लंघिता होतो अपाये ।*
*न्याय नसता उपाय । होईल कैचा ॥*

*तुरंग शस्त्र आणि स्वार । पहिला पहावा विचार ।*

अशा प्रकारे कायद्याचे मार्गदर्शन करूनही समाजमनाशी नाळ जोडलेले हे महापुरुष असल्याने समाजकंटकांविरुद्ध दोघांनीही आपली लेखणी चालवली आहे. चाणक्य समाजपीडकांना साम, दाम, दंड, भेद इत्यादींनी संपवावे अशा मताचे आहेत, तर समर्थ म्हणतात,

*ग्रामण्य वर्मी सापडावे । रगडून पीठचि करावे । करूनि मागुती सावरावे । बुडऊ नये ।। जनामध्ये दुर्जन प्रगट । तरी मग अखंड कटकट । या करणे ते वाट । बुझूनि टाकावी ।।*

इत्यादी अनेक ओव्यांमध्ये कळकळीचा उपदेश करतात.

यानंतर राज्यव्यवहारात परराष्ट्रीय धोरणास काय महत्त्व आहे, हे सांगण्याची गरज नाही. राष्ट्राच्या कित्येक गोष्टी या परराष्ट्रावर अवलंबून असतात. त्यामुळे त्याचा विचार चाणक्यांनी करावा हे ठीक आहे; पण समर्थांच्या राष्ट्रसंरक्षणाच्या कल्पनेची सीमा कुठपर्यंत होती हे दोघांचे वाङ्मय वाचल्यानंतरच कळेल. चाणक्यांनी ज्या ज्या म्हणून गोष्टी सांगितल्या त्या सर्वच्या सर्व गोष्टी समर्थांनी तंतोतंत सांगितल्या आहेत. ते म्हणतात,

*ही धूर्तपणाची कामें । राजकारण करावे नेमें । ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊ नये ।। राजकारण बहुत करावे । परंतु कळोंच नेदावे । परपीडेवरी नसावे। अंत:करण ।।*

इत्यादी फार सूक्ष्म उपदेश केला आहे आणि अचंबित करणारी गोष्ट अशी, की हा तर फक्त समर्थांचा काहीच उपदेश आहे; पण त्याहूनही चाणक्यांनी जसा ग्रंथ लिहिला व ज्या विषयांचा ऊहापोह केला त्या सर्व विषयांना समर्थांनी स्पर्श केला आहे. ते विषय म्हणजे पुढीलप्रमाणे-

चातुर्वर्ण्य व्यवस्था, आदर्श कुटुंब, राजनैतिक मुत्सद्दी, राजाचा दैनंदिन व्यवहार, राजाचे संरक्षण, राज्य व्यवस्थापन, राज्यसंघटन, समाजस्वास्थ्य, उत्तम राजा, युद्धाची तयारी, युद्धाची पद्धत तसेच परराज्य जिंकल्यानंतरची त्याची व्यवस्था, किल्ले इत्यादी. ज्यात समर्थ सहभागी नसूनसुद्धा फक्त राष्ट्रप्रेमापोटी त्यांनी उपदेश केला आहे आणि किती बारकाईने व आत्मीयतेने केला आहे याचे शेवटचे उदाहरण देतो. ते म्हणजे,

चाणक्यांनी भविष्यातही राज्य सुदृढ राहावे म्हणून राजपुत्र संरक्षणाचा एक विशेष अध्याय लिहिला आहे. त्यात ते राजपुत्राचे संरक्षणाचे उपाय सांगताना त्याच्या मानसिक विद्रोही विचार, बंडप्रवृत्ती इत्यादींचे वर्णन करतात. अगदी हाच कित्ता आपल्याला समर्थांच्या व संभाजींच्या प्रकरणात दिसतो. समर्थांनी पाठविलेले पत्र व चाणक्यांचे ते प्रकरण हे इतके सुंदर जुळते की त्या एका प्रकरणाने या दोघांना देशाचे राष्ट्रगुरू म्हणून मान्यता देण्यास भाग पाडावे.

तरीही एका मुद्द्याचा परामर्श घेणे आवश्यक ठरेल, तो म्हणजे दोघांचीही समांतर दृष्टी, समांतर भविष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन. मागे सांगितल्याप्रमाणे चाणक्यांनी आपल्या राष्ट्रधर्माचा मार्ग राजसत्तेला हादरवून राजनीतीमध्ये पडून तयार केला व समाजाला राष्ट्रधर्माची दिक्षा दिली. तर समर्थांनी लोकमानस तयार करून शिवाजी महाराजांना स्वराज्यासाठी तत्त्वनिष्ठ मावळे देऊन आपल्या लेखणीतून महाराष्ट्रधर्माची शिक्षा दिली.

चाणक्यांचा राष्ट्रधर्म व समर्थांचा महाराष्ट्रधर्म यात आपण फरक केला तर हा त्यांच्या विचारांचा अपमान ठरेल. कारण महाराष्ट्रधर्माचा अर्थ संकुचित घेणे बरोबर नाही. कारण समर्थांची दृष्टी कधीच एकदेशीय नव्हती. उलट आपल्या महंतांना उपदेश करताना ते म्हणतात,

*अखंड भिक्षेचा अभ्यास । तयास वाटेना परदेश । जिकडे तिकडे स्वदेश । भुवनत्रयी ।।*

असा उपदेश देताना समर्थांना सगळा देश हा स्वदेश वाटत होता. चाणक्यांनी सिंधूपासून ब्रह्मपुत्रेपर्यंत व समर्थांनी आसेतू हिमाचल अशा दृष्टीत संपूर्ण हिंदुस्थान एकवटला होता. चाणक्यांनी चंद्रगुप्ताकरवी राष्ट्रधर्माचे

सुराज्य स्थापन केले, तर समर्थांनी महाराष्ट्र राज्य करावे । जिकडे तिकडे ।। असे सांगून रामराज्य स्थापनेचा प्रयत्न केला. चाणक्यांनी तक्षशिलेच्या विद्यार्थी तेजातून सिंकदराला मात दिली, तर समर्थ मराठा तितुका मेळवावा। आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा ।। असे म्हणून मराठ्यांच्या तेजाला आवाहन करत आहे. समर्थांचा 'मराठा' हा शब्द व्यापक व सर्वसमावेशक शब्दप्रयोग आहे.

'सावरकर' नेहमी म्हणत की महाराष्ट्र हा भारताचा खड्ंगहस्त आहे आणि समर्थांनाही हेच अभिप्रेत होते. महाराष्ट्राच्या पराक्रमी तेजाला आवाहन करून महाराष्ट्र राज्य करा असा मार्मिक सल्ला समर्थ आपल्याला देतात. समर्थांच्या महाराष्ट्रधर्मामधून 'महा' काढला तर उरतो तो चाणाक्यांचा राष्ट्रधर्म आणि महान सामर्थ्यशाली राष्ट्रधर्म सांगताना व जगून दाखवताना दोघांनीही उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहिली.

चाणक्यांनी उपदेश करून जे राष्ट्र निर्माण करण्याचे स्वप्न पाहिले ते त्यांनी लिहून जरी नाही ठेवले तरी समर्थांच्या भाषेत त्याचे प्रतिबिंब आपणाला दिसेल. चाणक्य व समर्थांनी ज्या रामराज्याची कल्पना केली असेल ते राज्य म्हणजे समर्थांचे 'आनंदवनभुवन' यात आहे. त्यातल्या ओव्या म्हणजे आदर्श राज्याची मूर्तिमंत संहिताच होय.

या दोन्ही महापुरुषांनी परोपकार, लोकसेवा, समाज प्रबोधन, लोकसंग्रह, त्याग यांच्या पुरस्कारामधून दोघांनीही आपल्या राष्ट्रधर्माला स्वार्थ निवृत्त बनवले होते. 'बले प्रतिष्ठितो धर्म: धरण्यामिव जंगमम' या महाभारतातील सिद्धांताप्रमाणे शक्तीची आराधना दोघांनी समाजात रुजवली. दोघांच्याही राष्ट्रधर्मामागे व्यक्ती, समाज आणि राष्ट्र तेजस्वी कसे बनेल हे सूत्र आहे. दोघांनीही ज्या राजांना घेऊन राष्ट्र घडवले होते, त्यांच्यामुळे राज्यशक्ती विकसित झाली व या राष्ट्रगुरूंच्या कार्यातून लोकशक्ती संघटित झाली आणि राज्यशक्तीला लोकशक्तीची जोड मिळाली.

याप्रमाणे संपूर्ण राष्ट्राची जडणघडण हे पाश्चात्त्य राष्ट्रवादातही न आढळणारे सत्य समर्थ व चाणक्यांच्या राष्ट्रधर्मात आढळते. या दोन्ही महापुरुषांचे आयुष्य हे राष्ट्रधर्माच्या विशदीकरणातच गेले. म्हणून लिहावेसे वाटते, की या दोघांचे कार्य म्हणजे भारतीय इतिहासाला पडलेले सुंदर स्वप्न होय. अशा प्रकारचे महापुरुष ज्या भूमीत जन्माला आले, ती भूमी धन्य धन्य होय आणि त्या भारतमातेचे पुत्र आपणही यांच्या पुण्याईने धन्य धन्य आहोत.

अशाप्रकारे या दोन महापुरुषांच्या राष्ट्रधर्माची थोडक्यात मीमांसा करता येते. विषयाचा आवाका मोठा आहे. त्याला संक्षिप्तात बसवणे माझ्यासारख्या विद्यार्थ्यास कठीण आहे. पण शेवटी एकच वाटते. आज भारताला पुन्हा एकदा सामर्थ्यशाली राष्ट्र बनायचे असेल, तर या दोघांच्या रस्त्याने जाण्याशिवाय गत्यंतर नाही. दहशतवाद, प्रांतवाद, भाषावाद, भ्रष्टाचार इत्यादी घृणास्पद कंटकांना मारण्यासाठी या दोघांच्या विचारांचा मागोवा घेणे हेच औषध ठरू शकेल. एकंदरीत काय तर भारताला पुन्हा विश्वगुरू पदावर बसवण्यासाठी त्यांनी जो मार्ग दाखवला आहे, त्यावर जाणे हेच आपले कर्तव्य आहे. ते जर आपण पाळले नाही, तर आपण राष्ट्रधर्माचे द्रोही ठरू. त्यांनी तर राष्ट्रधर्म जगवला, सांगितला, गायला आणि तो वारसाहक्काने आपल्याला दिला. तो वारसा समर्थपणे पेलणे हीच त्यांना आदरांजली व त्यांचा सन्मान केल्याची मुख्य खूण आहे.

राष्ट्रदेवो भव । भारत माता की जय ।

# श्रीमदाद्यशंकराचार्य व समर्थ रामदास स्वामी

**डॉ. श्री. द. देशमुख.**



इ.स.पूर्व ५०९ वर्षी जन्माला आलेले श्रीमत् आद्य शंकराचार्य व सोळाव्या शतकात (इ.स.) जन्मलेले समर्थ रामदास स्वामी यांच्यात कालाच्या दृष्टीने मोठेच अंतर असले तरी कार्याच्या दृष्टीने बरेच साम्य आहे. हे दोन्ही महापुरुष भव्यदिव्य जीवनामुळे अवतारकोटीत गणले गेले आहेत. 'धर्मसंस्थापनार्थाय संभवामि' हा धागा दोघांच्यात कालमानानुसार सारखाच आहे. 'जन्म कर्मच मे दिव्यं' हे दोन्हीमध्ये साम्य आहे. 'अवजानन्ति माम् मूढाः' हेही स्वाभाविकपणे तसेच आहे. श्री. विद्यारण्यस्वामींचा 'श्री. शङ्कर दिग्विजय' व श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांनी लिहिलेले 'समर्थ चरित्र' ही त्या दोघांच्या चरित्रांची साधने आहेत. यांच्या आधाराने अन्य चरित्रकारांनी चरित्रे लिहिली आहेत. श्री. समर्थ हे मारुतीचे, तर आचार्य भ.शंकरांचे अवतार मानले जातात. दोघांचा जन्म व बालपण आपापल्या पद्धतीने वैशिष्ट्यपूर्ण होते. आचार्यांना शिशु अवस्थेतच विलक्षण बुद्धिमत्ता होती, तर समर्थ बालपणापासूनच चिंतनशील व विरक्त होते.

श्री. आचार्यांच्या बालपणातील दिनचर्येचे वर्णन शङ्कर दिग्विजय ग्रंथात दिले आहे -

*इतिसप्तमहायनेऽ खिलश्रुतिपारङ्तां गतो बटुः ।*
*परिवृत्य गुरोः कुलाद् गृहे जननीं पर्यचरन्महाशयाः ।।५-१।।*

अशाप्रकारे तो बालआचार्य सातव्या वर्षीच सर्व वेदांमध्ये पारंगत झाला. गुरुकुलातून घरी येऊन तो आपल्या मातेची सेवा करू लागला. त्या दिनचर्येत पुढील गोष्टींचा समावेश होता.

*परिचरजननीं निगमं पठन्नपि हुताशखी सवनद्वयम् ।*
*मनुवरैर्नियतं परिपूजयन् शिशुरवर्तत संस्तरणिर्यथा ।।५-२।।*

शंकर आईची सेवा, वेदपठण, सकाळ-संध्याकाळी संध्यावंदन करून अग्नी व सूर्य यांची समंत्रक उपासना करीत असे. सूर्योपासना हा धागा समर्थ व आचार्य ह्यांच्यात सारखाच आहे. त्यांचे घराणेच सूर्योपासकांचे होते. समर्थांनी बाराव्या वर्षापासून चोविसाव्या वर्षापर्यंत गायत्री पुरश्चरणे केली. माधुकरीवर चरितार्थ चालवून, लोकांच्या टिंगलटवाळ्या सोसून, नदीच्या पाण्यात उभे राहून, तपश्चर्या केली. नाशिकला विद्वानांच्या मुखातून रामायणादी व वेदान्तशास्त्राचे श्रवण केले. सर्व महापुरुषांनी महत्कार्य हाती घेण्यापूर्वी उपासना व शास्त्राध्यायन केले आहे. चरितार्थाच्या साधनांची त्यांनी दखलसुद्धा घेतली नाही. अशांचा चरितार्थ जनताजनार्दन मोठ्या श्रद्धेने चालवितो हे चालू कलियुगातसुद्धा दिसते. आचार्यांचे आयुष्य केवळ बत्तीस वर्षांचे होते. तेवढ्यामध्ये बौद्ध, सांख्य व पूर्वमीमांसकांनी बसविलेली भक्कम घडी मोडून काढण्याचे कार्य त्यांना करावयाचे होते. हे सर्व वेदविरोधक तरी होते किंवा वेदांचा सोयीस्कर अर्थ लावून दिशाभूल

करणारे तरी होते. डोंगराच्या कड्यावरून उडी मारूनही जखमसुद्धा न होणाऱ्याचे तत्त्वज्ञान बरोबर असल्याचा दाखला देणाऱ्या मूढ सम्राटांचे ते युग होते. असल्या परीक्षा घेणारे व त्या देणारे किती मूर्ख होते, हे सांगण्याची गरज नाही. समर्थ यांचेविषयी म्हणतात,

*आपुलाल्या साभिमाने । लोक चालिले अनुमाने ।*
*परंतु हे विवेकाने । पाहिले पाहिजे ॥ दा.बो. १५-१-१९॥*

स्वत:च्या मोठेपणाच्या भ्रमामध्ये काहीही रेटून नेले जाते.

'परीक्ष्य लोकान् कर्मचितान् ब्राह्मणो निर्वेदमायात' (मुं १-२-१२) असा कार्यकारणभाव, दृश्य जग व वैराग्य ह्यांचे बाबतीत श्रुती सांगते. म्हणजे दिसणारे (जाणवणारे) जग अनित्य असल्याच्या कारणाने त्याचे वैराग्य हे कार्य निर्माण व्हावे, परंतु आचार्य व समर्थ यांचे बाबतीत ह्या कार्यकारणावाचूनच वैराग्य सहजसिद्ध होते. दृश्य जगताच्या विनाशीत्वाचा कोणताही फटका त्यांना बसला नव्हता. त्यांच्या अवतारित्वाचे हे एक स्पष्ट लक्षण आहे. आचार्यांनी अत्यल्प मुदतीच्या ब्रह्मचर्याश्रमातून थेट संन्यासाश्रम स्वीकारला. समर्थांनी प्रत्यक्ष संन्यास न घेता गृहस्थाश्रमाच्या उंबरठ्यावरून मागे फिरून तपश्चर्येसाठी पलायन केले. दोघांनीही आपापल्या प्रेमळ मातेला युक्ती लढवून प्रपंचातून सुटकेला मान्यता देणे भाग पाडले. थोडी बनवाबनवीही त्यासाठी केली. त्यावेळेपासूनच त्या दोघांची चातुर्यलक्षणे व्यक्त झाली. आचार्यांनी मातेची सेवा केल्याने व केवळ सातव्या वर्षीच आलंकारिक काव्यरचनेने नदीची स्तुती केल्याने ती नदी आचार्यांच्या घराजवळून वाहू लागली. नदीने आचार्यांना त्यांच्या संन्यासाश्रमाची इच्छा पूर्ण होईल असा वर दिला. त्याप्रमाणे आचार्यांनी नदीत सुसरीने पाय धरल्याचे नाट्य करून आईकडून संन्यासाची अनुमती मिळवली. 'देव जोडे तरी करावा अधर्म' ह्या संत तुकोबांच्या सांगण्यात थोडा फेरफार करून 'लोक तरे तरी' असा चरण घालता येईल. कारण 'देव जोडणे' ही समस्याच अवताररूपांकडे नसते. समर्थांनी 'बोहल्यावर चढणे' या वाक्प्रचाराचा चातुर्याने उपयोग करून घेऊन आईला गुंगारा दिला. संन्यास सदृश जीवन जगून लोकांना तारण्याचा प्रचंड व्याप त्यांना करावयाचा होता. धर्म व अध्यात्म ह्यांच्या जोडीला समर्थांना तर आपल्या समाजाला धीर देऊन सर्व बाजूंनी तो प्रगत करण्याची जबाबदारी पार पाडावयाची होती.

आचार्य व समर्थ या दोघांच्या जीवनामध्ये काही अद्भुत प्रसंगांची नोंद आहे. समाजात अशा व्यक्तींसंबंधी उडणाऱ्या वावड्या विचारात न घेताही त्यांच्या योगसामर्थ्याच्या व तपोबलाच्या जोरावर काही अद्भुत गोष्टी नक्कीच घडल्या. कारण समाज, काहीतरी त्यांच्या आकलनापलीकडील घडल्याशिवाय कोणालाच सहसा मोठा म्हणत नाही. आचार्य जेव्हा मंडनमिश्र या विख्यात कर्मकांडाभिमानी पंडिताच्या घरी गेले, तेव्हा यज्ञात विघ्न येऊ नये म्हणून कडक बंदोबस्त केला होता. तरी आचार्य आकाशमार्गातून त्यांच्या घरात उतरले असे शंकर दिग्विजय ग्रंथात म्हटले आहे -

*'दुर्वेशमालोच्च स योगशक्त्या व्योमाध्वनाऽवतरदङ्गणान्त'*
*॥५-९॥*

तसेच सरस्वती या मंडनमिश्रांच्या पत्नीने वादांमध्ये कामसूत्रांविषयी प्रश्न विचारल्यावर त्याचे उत्तर देण्यासाठी मुदत मागून ते आकाशमार्गानेच वर गेले.

*'उरवीकृते यति यथेति तयाऽऽक्रमते योगिमृगराङ् गमनम्'*
*॥९-७३॥*

समर्थांनी मिरजेच्या मुसलमान राजाला किल्ल्यावरील चिऱ्याच्या छिद्रातून पलीकडे जाऊन दाखवून त्याचे मन जिंकले. स्वत:च्याच गलोलीने दगड मारून मेलेली घार उठवून समाजाचा विश्वास संपादन केला. असे चमत्कार करून या दोघांना सत्ता, संपत्ती, कीर्ती, प्रतिष्ठा यांपैकी काहीच मिळवायचे नव्हते. सामान्य माणसाला योग्य विचार व आचाराचा उपदेश करून त्याचा उद्धार करण्यासाठी अशा दिव्य प्रकारांचा उपयोग करावा लागतो.

आजही ब्रह्मलीन सत्यसाईबाबांच्या रूपाने हेच वास्तव समोर आले आहे. त्यांचेही टीकाकार असले, तरी मोठ्या श्रद्धावंत समाजात त्यांचा विरोध खूपच नगण्य ठरतो. श्री ज्ञानदेव, तुकाराम व नामदेवांच्या बाबतीतही अनेक चमत्कार घडल्याची नोंद आहे. त्यांनीही समाजासाठी फार मोठे कार्य केले आहे.

महान विभूतींना महान पुरातन महात्म्यांनी व अवतारांनी दर्शन देण्याचे प्रसंग त्यांच्या चरित्रात आढळतात. आचार्यांना प्रत्यक्ष भ.व्यासांनी दर्शन दिले होते. आचार्यांनी व्यासांचे स्मरण करून त्यांचे स्तवन केल्यावर ते प्रकट झाले. 'एवं वदन्नयमभैक्षत कृष्णमारात्। चामीरकरव्रततिचारू जटाकलापम् ॥' (७-१५). अशा प्रकारचे मोठे तपशीलवार वर्णन पुढे केले आहे. सोन्याच्या वेलीसारख्या जटा, विजेने वेढलेल्या मेघाप्रमाणे शोभायमान, सत्तावीस रुद्राक्षांची माळ गळ्यात घातलेले, इत्यादी प्रकारे भव्यदिव्य वर्णन केले आहे. समर्थांना हिमालयाच्या यात्रेत प्रत्यक्ष श्री दत्तात्रेय स्वामींनी दर्शन देऊन त्यांना संथा दिल्याचा प्रसंग आहे. शिवाय जांब ह्या त्यांच्या जन्मगावी प्रत्यक्ष श्रीरामाने त्यांना दर्शन दिले. ती जागा आजही दाखविली जाते. ह्या घटनांचा ह्या महात्म्यांना स्वत:साठी फारसा लाभ नसला, तरी जनसामान्यांची श्रद्धा त्यांनी बहरून येते व ते त्यांच्या उपदेशानुसार वागण्या/जगण्याचा प्रयत्न करतात. ह्यात जराही शंका नाही. आजही जनमानसावर त्यांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.

आचार्य व समर्थांचे कार्य एखाद्या मर्यादित भागातच राहू नये म्हणून त्यांनी अथक परिश्रम केले. एवढे मोठे कार्य एकच व्यक्ती करू शकत नाही. त्यामुळे त्यांनी अनेक अधिकारी शिष्य हेरून त्यांना कार्यासाठी उद्युक्त केले. आचार्यांच्याचरित्रात तर प्रत्यक्ष देवदेवतांनी आचार्यांच्या बरोबरच जन्म घेतल्याचे म्हटले आहे. भ.विष्णू पद्मपादाचार्य, वायुदेवता हस्तामलक, नंदी उदङ्ग, ब्रह्मदेव सुरेश्वराचार्य, बृहस्पती हे मंडनमिश्र अशा रूपाने अवतीर्ण झाले. अर्थात मंडनमिश्र हे शिष्य नसले, तरी आचार्यांच्या कार्यातील सहकारी असून पुढे ते शिष्य झाले. त्यांचेही नाव सुरेश्वराचार्य हेच होते. पश्चिमेला द्वारका येथे पद्मपादांना पाठवून 'तत्त्वमसि' हे महावाक्य दिले. उत्तरेला तोटकाचार्यांची रवानगी करून त्यांना 'अयमात्मा ब्रह्म' ह्या महावाक्याचे चिंतन सांगितले. पूर्वेला हस्तामलकांची जगन्नाथपुरीला स्थापना करून त्यांना 'प्रज्ञानं ब्रह्म' ह्या महावाक्याचा संप्रदाय दिला आणि दक्षिणेला शृंगेरी मठावर सुरेश्वराचार्यांची नेमणूक करून त्यांना 'अहंब्रह्मास्मि' ह्या महावाक्याचा संप्रदाय चालविण्यास सांगितले. ह्या चारही संप्रदायांच्या मठाचे नाव, देवता, जवळची नदी, त्यांच्या अरण्य, पुरी इ. पदव्या ह्यांची माहिती उपलब्ध आहे. इसवी सनापूर्वी पाचशे वर्षे प्रवासाची साधने नसताना मांडलेला हा व्याप आश्चर्यकारक आहे. आजही हे सर्व मठ परंपरेने चालू असून ती जपण्याएवढे कार्य त्यांचेकडून चालू आहे.

समर्थांनी श्री कल्याण, उद्धव, दिनकर, दत्तात्रय, - अक्का, वेणा इत्यादीकांना शिष्यत्व देऊन त्यांचेमार्फत धर्म व अध्यात्मकार्याला मोठीच प्रेरणा दिली. योग्यता पाहून बालवयातसुद्धा अनुग्रह देऊन अनेक महंतांची मठावर स्थापना केली. ह्या मठातून कोणते कार्य चालत असे त्याचीही नोंद आहे. श्री. शिवछत्रपतींच्या आग्र्याहून सुटकेच्या प्रसंगात ह्या मठांचा चांगलाच उपयोग झाल्याचे इतिहासकार सांगतात. अर्थात हे सर्व गुप्तपणे करणे आवश्यक असल्याने यासंदर्भात फारशी माहिती उपलब्ध नाही. श्री. समर्थांचे उत्तर व दक्षिणेत मिळून हजाराहून अधिक मठ आहेत. त्यातील सज्जनगड, चाफळ, शिवथरघळ, जांब, ग्वाल्हेर, मिरज इत्यादी मठ चांगले चालू असून, बहुतांश मठ कार्याचे दृष्टीने मोडकळीस आले आहेत.

आचार्यांचे काळी वेद व वैदिक धर्मविरोधी बौद्धादिकांनी त्यांच्या प्रचाराचा धडाका लावला होता. आचार्यांच्या

आजेगुरूंना (गौडपादाचार्य) छुपे बौद्ध ठरवेपर्यंत त्यांची मजल गेली होती. बौद्धांनी स्थूलमानाने वेदांना दिलेली दूषणे व त्यांचे मीमांसकांनी परस्पर केलेले खंडन पुढीलप्रमाणे-

१) ऋग्वेदातील १०/१०६/६ मंत्रातील 'सृप्येव जर्भरी, तुर्फरी तु' हे शब्द पूर्णपणे निरर्थक आहेत. उत्तर - व्याकरण व निरुक्ताच्या मदतीने ह्यांचे अर्थ करता येतात. त्या विषयातील तज्ज्ञ ते जाणतात. २) काही मंत्र संदिग्ध आहेत. उदा. 'स्विदासीत् उपरिस्विदासीत्' एकच वस्तू वर व खाली असल्याचे सांगितल्याने वाचक गोंधळात पडतो. उत्तर - ब्रह्म वर व खाली सर्वत्र आहे. ३) काही मंत्र भलतेच सांगतात. उदा. 'श्रुणोत ग्रावाण:' दगडांनी ऐकावे. दगड कसे ऐकतील? उत्तर - अचेतनातही चेतन देवता असतात. त्यांना उद्देशून अचेतनाशी संवाद साधला जातो. ४) काही मंत्र परस्परविरोधी गोष्टी सांगतात. उदा. एक मंत्र, रुद्र एकच आहे असे सांगतो. दुसरा रुद्र हजारो आहेत असे सांगतो. उत्तर - एकच रुद्र स्वत:च्या महिम्याने हजारो रूपे घेतो. ५) काही मंत्र सर्वांना ठाऊक असलेलेच सांगतात. त्यांचा काय उपयोग? उत्तर - या मंत्रांच्या देवता प्रसन्न होण्यासाठी त्या मंत्रांचा उपयोग आहे. ह्या सर्व तपशीलासाठी पुढील ग्रंथभाग पाहावेत - जैमिनी सूत्र (१-२-३१ ते ५२) त्यावरील शाबरभाष्य व तन्त्रवार्तिक. श्लोकवार्तिकातील वृ. ७२८-८४५. ऋग्वेदावरील सायणभाष्याची भूमिका. समर्थांच्या काळी बौद्धादिकांचा विरोध नव्हता, पण हिन्दू धर्मान्तर्गत बजबजपुरी झाली होती. मोगली झोटिंगशाहीमुळे हिंदुधर्माला अवकळा आली होती. हिंदूंना धैर्य देऊन मतमतांतरात एकवाक्यता निर्माण करण्याची निकड होती. यासाठी धक्कातंत्राचा अवलंब करण्याची आवश्यकता होती. पुढील तीन ओव्या ह्या स्वरूपात आहेत.

*समयो नेणे प्रसंग नेणे । प्रेत्न नेणे अभ्यास नेणें ।*
*आर्जव नेणे मैत्री नेणें । काहीच नेणें अभागी ॥ २-३-३८*
*व्याप आटोप करिती । धके चपाटे सोसिती ।*
*तेणें प्राणी सदैव होती । देखता देखता ॥ १५-३-७ ॥*
*कष्टेंविण फळ नाही । कष्टेंविण राज्य नाही ।*
*केल्याविण होत नाही । साध्य जनी ॥ १८-७-३॥*

मतमतांतराच्या गलबल्याविषयी समर्थ म्हणतात

*येक्या ग्रंथे निश्चय केला । तो हुजयाने उडविला ।*
*तेणें संशयोचि वाढला । जन्मवरी । ७-९-४ ॥*

असे होऊ नये म्हणून

*जेथे संशय तुटती । होये आशंका निवृत्ती ।*
*अद्वैत ग्रंथ परमार्थी । श्रवण करावे ॥ ७-९-५ ॥*

कोणाला काय आवडते त्याचे सूक्ष्मनिरीक्षण करून समर्थांनी ७-९-४१ ते ५५ हा ओव्यांचा गट लिहिला आहे. तो मुळातच पाहावा.

आचार्यांनी उपनिषदे, गीता व ब्रह्मसूत्रे या तीन प्रस्थानांवर व्यापक टीका लिहून भारतीय परमार्थशास्त्राला फार मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. ह्या कार्याचे एवढे मोठेपण आहे की पुढे रामानुजाचार्य, निंबार्क, मध्वाचार्य या वेगळ्या वेगळ्या संप्रदाय प्रवर्तकांना त्यांच्या मताच्या समर्थनासाठी या प्रस्थानत्रयींवर भाष्य लिहिणे भाग पडले. या प्रस्थानांवर भाष्य केल्याशिवाय आचार्य ही पदवी मिळत नाही, एवढे त्याचे महत्त्व आहे. त्यातल्या त्यात भ.व्यासांच्या ब्रह्मसूत्रांवर भाष्य करण्याचे आव्हान फारच मोठे आहे. श्री. ज्ञानदेवांसारख्या महान संतांनीसुद्धा 'भाष्यकारातें वाट पुसतु' असे म्हणून त्यांच्या ज्ञानेश्वरीला गीतेच्या शांकरभाष्याचा आधार असल्याचे नम्रपणें म्हटले आहे. ब्रह्मसूत्र भाष्यात बौद्ध, जैन, सांख्य, न्याय, वैशेषिक इत्यादी मतांचे आवेशपूर्ण खंडन केले आहे. या महत्कार्याबरोबरच आचार्यांनी बरेच प्रकरणग्रंथ लिहून अद्वैत वेदान्त, उपासना, योग इत्यादी विषयांना पुरेपूर न्याय दिला आहे. अनुक्रमे तत्त्वोपदेश, स्तोत्ररचना व योग तारावली असे ते ग्रंथ आहेत. प्रपंचसारासारख्या ग्रंथात तंत्रशास्त्राची बरीचशी दुर्बोध मांडणी आहे. मंडनमिश्रासारख्या प्रकांडपंडित द्वैतमतवादी

कर्मकांडाभिमान्याबरोबर निकराचा वाद करून, त्यांत त्यांना जिंकून स्वत:चे शिष्यत्व दिले. त्यांना शृंगेरी मठाचे अधिपत्य दिले. हा अद्वैत वेदान्ताचा (केवलाद्वैत) फार मोठा विजय मानला जातो. कर्माचे योग्य ते महत्त्व सांभाळून यज्ञयागप्रधान द्वैतमताचा पराभव करण्याचे श्रेय आचार्यांचे आहे. ह्या मुद्द्यावर बौद्धमताने बरीच बाजी मारली होती. यज्ञयागाने मोक्षसिद्धी होत नाही हे आचार्यांनी प्रभावीपणे सिद्ध केले. सर्व मराठी संतांच्या शिकवणुकीवर आचार्यांचा परिपूर्ण प्रभाव आहे. आचार्य मायावादी नव्हते तर ते मायानिरासवादी होते हे प.द.वा. जोगांचे म्हणणे यथार्थ आहे. मायेचे माहात्म्य तिच्या निवृत्तीसाठी सांगावयाचे असून, तिच्या पगड्याखाली राहाण्यासाठी नव्हे!

समर्थांचीही ग्रंथरचना अफाट आहे. दासबोध, आत्माराम, मनाचे श्लोक, एकवीस, सात व पाच समासी, पूर्वारंभ, स्फुट रचना, सवाया, आरत्या, अभंग इत्यादी नाना प्रकारचे लोकसाहित्य व पारमार्थिक साहित्य रचना त्यांनी केली. त्यांत बरीच पुनरुक्ती अपरिहार्यपणाने झाली असली तरी त्या प्रत्येकीचा बाज काही वेगळाच आहे. रामायणावरील त्यांचे सुंदरकाण्ड अति स्फूर्तिप्रद असून, त्यातील हनुमंताचे पराक्रम भिऊन दबून गेलेल्यांना खडबडून जाग आणणारे आहेत. आचार्यांच्या मतिविलापन प्रकरणात आत्मा व मन ह्यांचा कल्पित संवाद रंगवला आहे, ते म्हणतात, चिति: स्वरूपं स्वत एव मे मते । रसादियोगस्तव मोहकारित: । अतो न किंचित्तव चेष्टितेन मे फलं भवेत्सर्वविशेषहानत: ।।१।। हे मना, माझे चैतन्य हेच स्वरूप आहे. माझा रसादी पंचविषयांशी भोक्ता म्हणून संबंध आहे असे तुला अज्ञानामुळे वाटते. मी सर्व गुणांनी अलिप्त असल्याने तुझ्या कोणत्याही कृतीचा मला जराही स्पर्श होत नाही. अशा सहा श्लोकांप्रमाणेच समर्थांनी दोनशेहून अधिक श्लोकांनी मनाशी व्यापक संवाद साधला आहे.

समर्थ व आचार्य यांच्या अवतारकालातील एक हजारवर्षांहून अधिक कालाचे अंतर असल्याने त्यांच्या कार्याचे सामाजिक व राजकीयदृष्ट्या वेगळेपणे असणे स्वाभाविक आहे. कलीचा प्रभावही पुढे पुढे सरकत गेल्याने त्यांची कार्यक्षेत्रेही बदलत गेली. हजारो राजकीय सत्ताकेंद्रे तयार होऊन परधर्मांची आक्रमणे वाढल्याने धार्मिक व राजकीय परिस्थिती पूर्ण बिघडली. केवळ परमार्थशास्त्राच्या प्रकाराने ती बदलणारी नव्हती. त्यामुळे दोघांच्या कार्यातील तपशिलात फरक दिसतो. परंतु हिंदुधर्माचे व्युत्थान व पारमार्थिक एकवाक्यता समाजासाठी साधून देण्याचे तत्त्व एकच होते. या दोघांसारखे संत व शिवछत्रपतींसारखे राजे झाल्याने आज आम्ही हिंदू आहोत.

# कबीरदास और रामदास



**प्रा. स. म. परळीकर**
*एम्. ए., बी. टी., साहित्यरत्न*

महाराष्ट्र के सन्त तथा भक्त कवियों में रामदास का स्थान बड़ा ही महत्त्वपूर्ण माना जाता है । इसका प्रमुख कारण यह हैं की महाराष्ट्र में प्रचलित भक्ति-सम्प्रदायों से भिन्न और इसी दृष्टी से नवीन सम्प्रदाय के जो रामदासी-सम्प्रदाय नाम से प्रसिद्ध है, वे प्रवर्तक माने जाते हैं । मेरे मतानुसार हिन्दी के सन्त तथा भक्त कवियों में कबीर ही एक ऐसे कवि हैं जिनकी सन्त रामदास के साथ तुलना की जा सकती हैं । इस बात पर शायद आश्चर्य प्रकट किया जाएगा कि रामभक्तों की माला में मेरुमणि के समान महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त करनेवाले गोस्वामी तुलसीदास और रामदास की तुलना को अधिक स्वाभाविक तथा उचित न मानते हुए सन्त कबीरदास के साथ ही उनकी तुलना क्यों की जा रही हैं । इसका उत्तर अत्यन्त सरल हैं । यद्यपि तुलसीदास और रामदास दोनों भी रामभक्त थे फिर भी तुलसी के राम दाशरथी राम हैं और उनको प्रसन्न करने का तुलसी प्रणीत मार्ग हैं भक्ति-मार्ग । किन्तु रामदास के आत्माराम हैं और उनको प्राप्त करने का रामदास के मतानुसार सबसे अच्छा मार्ग हैं ज्ञानमार्ग । इस दृष्टि से कबीरदास की ईश्वर याने राम के बारे में होनेवाली मूलभूत कल्पना तथा उसको प्राप्त करने के सर्वोत्तम मार्ग के साथ रामदास के विचार अधिक मेल खाते हैं । यही कारण हैं कि कबीर तथा रामदास के काव्य का तुलनात्मक अध्ययन ही अधिक समीचीन प्रतीत होता हैं । अब इन मूलभूत कल्पनाओं की समानता के होते हुए भी इन दोनों महानुभवों के प्रखर व्यक्तित्व के कारण उन कल्पनाओं की व्याख्या में थोड़ा-सा अन्तर आ जाना बिलकुल स्वाभाविक हैं, किन्तु उसे हम ब्यौरे की बात समझ सकते हैं । अब हमें यही देखना हैं कि दोनों के व्यक्तित्व में, दोनों के दार्शनिक विचारों तथा भक्ति-प्रणाली में क्या समानता और क्या विभिन्नता हैं । उसी प्रकार यह भी देखना हैं कि दोनों के काव्य के उद्देश्यों की छानबीन करके उनमें भी कहाँतक एकरूपता तथा अन्तर मिलता हैं ।

अब हम पहले पहल यह देखें कि दोनों का व्यक्तित्व किस प्रकार निर्माण हुआ था । कबीर का जन्म चाहे जिस स्त्री की गोद में हुआ हो, किन्तु उनका पालन तथा पोषण एक जुलाहे के घर में हुआ था । अध्यात्म की ओर उनका झुकाव बचपन से ही था । जिस जुलाहा जाति में वे पले वह नाथ-पंथ की शिष्य थी । अत: नाथपंथ के कुछ विश्वास खास कर हठयोग, गुरुभक्ती, आदि कबीर में अपने आप आ गए । एक गरीब जुलाहा सामाजिक तथा आर्थिक परिस्थिति के कारण शिक्षा प्राप्त नहीं कर सकता था । अत: कबीर अशिक्षित रहे ।

जो कुछ उन्होंने काव्य के रूप में व्यक्त किया वह मौखिक रूप में ही व्यक्त किया । फिर इतनी मार्मिक बातें कबीर ने कैसे व्यक्त कीं? इसका कारण हैं उनकी अपूर्व प्रतिभा तथा सारग्राहिणी-शक्ती । 'साधु ऐसा चाहिए जैसा सूप सुभाय । सार सार को गहि रहै थोथा देई उड़ाय ।।' कबीर की ही यह उक्ति हम उनके काव्य को लागू कर सकते हैं । जहाँ कहीं उनको अपनाने योग्य बात मिली उसे उन्होंने तुरन्त अपनाया । फिर नाथपंथियों का हठयोग, रामानंद का वैष्णवी दयाभाव तथा भक्तिभावना, सूफ़ी फकीरों की प्रेम-साधना तथा रहस्योन्मुखी भावना मुसलमानों का एकेश्वरवाद, शांकरमत के समर्थकों से अद्वैत तथा मायावाद आदि भिन्न भिन्न तत्त्वों के सार को उन्होंने अपनाया और उनको अपनी अपूर्व प्रतिभा के बल पर व्यक्त किया । इस लिए उनके काव्य में उनका अपूर्व व्यक्तित्व चमकता हुआ दिखाई देता हैं । कबीर को ये सारी बातें अनुभवों से प्राप्त होती गई । इस लिए उनके काव्य में अनुभवों की सचाई मिलती हैं । कबीर ने अपने मत-प्रचार के लिए पर्यटन किया और इस पर्यटन के कारण उन्हें विविध प्रकार के अनुभव प्राप्त हुए जिनके कारण उनके काव्य में सजीवता तथा प्रभावोत्पादकता आ गई और उनके दार्शनिक सिद्धान्तों ने भी धीरे धीरे व्यापक रूप धारण किया । कबीर का सांसरिक जीवन एक वीत-राग महात्मा का जीवन था । यद्यपि जनश्रुति के अनुसार कबीर का विवाहित होना स्वीकार किया जाय तो भी घर-गिरस्ती के मामलों में उनमें ज़रा-सी भी अनुरक्ति दिखाई नहीं देती । उसी प्रकार यदि उनके इस दोहे को सच माना जाय कि 'नारी तो हम भी करी, जाना नहिं विचार । जब जाना तब परिहारि, नारी बड़ा विकार ।' तो कबीर का जीवन एक जीवन-मुक्त का जीवन समझना चाहिए । अपने दार्शनिक सिद्धान्तों का सही अर्थो में पालन करनेवाले महात्मा के रूप में ही हम कबीर की ओर देखते हैं । कबीर के व्यक्तित्व में इनके अतिरिक्त अनन्य ईश्वरभक्ति, अपूर्व आत्म-विश्वास, सत्यप्रियता, सरलता, स्पष्टता, निस्पृहता, समाज को चेतावनी देकर जागृत करने की लगन अर्थात् दूसरे शब्दों में समाजहित की लगन आदि बातें भी मिलती हैं ।

जब हम सन्त रामदास के व्यक्तित्व का अवलोकन करते हैं तो हमें ये ही बातें कम अधिक मात्रा में मिलती हैं । रामदास भी एक वीत-राग महात्मा थे । कबीर को जिस प्रकार नाथ-पंथ के विश्वास परंपरा से प्राप्त हुए थे उसी प्रकार रामदास को रामोपासना पैतृक सम्पति के रूप में प्राप्त हुई थी । कबीर को विवाह करने के बाद मालूम हुआ कि नारी बड़ा विकार हैं किन्तु रामदास को सावधान शब्द सुनते ही वैवाहिक जीवन अप्रिय हुआ और इस बंधन को वहीं तोड़कर वे घर से भागे । किन्तु ब्राह्मण-कुल में पैदा हो जाने से विद्याध्ययन की जो नींव डाली गई थी उससे उन्होनें उचित लाभ उठाया । उन्होंने नासिक के पास टाकली में रहकर १२ वर्षों तक राम की एकान्त उपासना की, नासिक के विद्वान ब्राह्मणों के साथ चर्चा की और आध्यात्मिक ज्ञान के विविध अंगों का विस्तृत ज्ञान प्राप्त करा लिया । इसके बाद बारह वर्ष संपूर्ण देश का पर्यटन किया जिससे कबीर के समान आप को भी विविध प्रकार के अनुभव प्राप्त हुए। इस पूर्व तैयारी के बाद उन्होंने अपने पंथ का स्वरूप निश्चित किया और उसके अनुसार साहित्य का निर्माण किया । फिर इस पंथ के तत्त्वों के प्रचार के लिए बराबर भ्रमण करते रहे । रामदास के व्यक्तित्व में भी कबीर के व्यक्तित्व से मिलती जुलती अनेक बातें मिलती हैं । अनन्य ईश्वर-भक्ति, अपूर्व आत्मविश्वास, सत्य-प्रियता, सरलता, स्पष्टता, निस्पृहता आदि गुण रामदास में मिलते हैं किन्तु कबीर की भी अपेक्षा रामदास में समाजहित की भावना अधिक प्रकर्ष के साथ मिलती हैं । कहावत हैं कि, 'होनहार बिरवाने के होत चिकने पात ।' रामदास की समाजहित की भावना बचपन से ही उनमें विद्यमान दिखाई देती हैं जब कि चिन्ता में डूबे

हुए नारायण (रामदास का पहला नाम) से उसकी माँ पूछती हैं, 'बेटा नारायण, किस बात की चिन्ता कर रहे हो?' तो यह छह साल का लड़का माँ को उत्तर देता हैं, 'माँ, मैं विश्व की चिन्ता करता हूँ ।'

जब दोनों के व्यक्तित्व में हमें इतनी समानता दिखाई देती हैं तो क्या आश्चर्य कि उनके दार्शनिक विचारों तथा भक्ती भावना में भी समानता हो । अब हम उन्हीं समान बातों पर पहले विचार करेंगे ।

साधक की दृष्टि से सबसे महत्त्वपूर्ण बात यदि कोई हो तो वह है उसका आराध्य । अब इस आराध्य के बारे में अर्थात् परमात्मा तथा उसके स्वरूप के बारे में कबीरदास तथा रामदास के क्या विचार हैं यह हम देखेंगे । कबीर ने अपने परमात्मा को अनेक नामों से पुकारा हैं किन्तु प्रमुखतया उन्होंने उसे राम ही कहा हैं । यह राम भी ब्रह्म या निर्गुण निराकार परमात्मा का पर्यायवाची शब्द हैं । जैसे 'दशरथ सुत तिहु लोक बखाना राम नाम का मर्म हैं आना ।' यह परमात्मा एक हैं यद्यपि उसके नाम अनेक हैं । जैसे 'अल्लह, राम, करीम, केसव, हरि, हज़रत नाम धराया ।' यह परमात्मा सारी चराचर सृष्टी में व्याप्त हैं । अत: प्रत्येक मनुष्य के पास भी वह हैं । कबीर के शब्दों में 'घट घट में वह साई रमता, कटुक वचन मत बोल रे ।' मनुष्य अज्ञान के कारण उसको नहीं जानता । कस्तूरी के मृग का उदाहरण देकर कबीर ने कहा हैं, 'कस्तूरी कुंडल बसै, मृग ढूंढ़ै बनमाहि, ऐसे घट में पीव हैं दुनिया जानै नहिं ।' ऐसे परमात्मा को ज्ञान से जान लेने पर वह तुरन्त प्राप्त हो जाता हैं । जैसे 'समझै तो पल में मिलै परदा पलक लगाय, तेरा साई तुज्झ में अनत कहूँ मत जाय ।' ऐसे परमात्मा तथा उसकी शक्ति में कबीर का अनन्य विश्वास हैं । इसी लिए उन्होंने कहा हैं - 'जाको राखै साइया, मारी न सक्कै कोय । बाल न बाँका कर सकै । जो जग बैरी होय ।'

परमात्मा के स्वरूप के बारे में रामदास के विचार भी करीब करीब इसी प्रकार के हैं । रामदास ने अपने राम को आत्माराम माना हैं । यद्यपि उन्होंने उसे निर्गुण निराकार ब्रह्म का ही प्रतीक माना हैं फिर भी कबीर के समान वे सगुण रूप या मूर्तिपूजा के नितान्त विरोधी नहीं जान पड़ते । फिर भी रामदास की मूलभूत प्रवृत्ति राम को निर्गुण निराकार ब्रह्म मानने की ही हैं । परमात्मा के स्वरूप पर रामदास ने स्थान स्थान पर अपना मत प्रकट किया हैं । दासबोध के दशक ११ समास १० में परमात्मा के स्वरूप को स्पष्ट करते हुए रामदास ने लिखा हैं— 'तरी तो हरि आहे कैसा । विचार पाहावा ऐसा ।। संध्येपूर्वी जगदीशा । चोवीस नांवें स्मरावें ।। चोवीस नामीं सहस्त्र नामीं । अनंत नामीं तो अनामी ।। तो कैसा अन्तर्यामीं । विवेकें ओळखावा ।।' अर्थात् हरि के अनेक नामों के होते हुए भी वह अनामी और अन्तर्यामी हैं जिसे ज्ञान (विवेक) से जान लेना चाहिए। यह परमात्मा रामदास के मतानुसार चराचर सृष्टि में व्याप्त हैं अत: प्रत्येक व्यक्ति में भी वह हैं । जैसे - 'देहपुरामध्यें ईश । म्हणून तया नांव पुरुष । जगामध्यें जगदीश । तैसा ओळखावा ।।.... तो विष्णु आहे जगदान्तरीं । तोचि आपुलें अन्तरीं । कर्ता भोक्ता चतुरीं । अन्तरात्मा ओळखावा ।।' याने विश्व में व्याप्त वही परमात्मा प्रत्येक व्यक्ति के अन्त:करण में भी हैं । वही सारे मनुष्यों में रहता हैं और सारी सृष्टि का भी संचालन करता हैं । जैसे - 'तो एकचि सकळां घटीं । करी भिन्न भिन्न राहाटी ।। सकळ सृष्टीची गोष्टी । किती म्हणोनी सांगावें ।' ऐसे परमात्मा को अज्ञान के कारण मनुष्य जान नहीं सकता । इस लिए रामदास ने विवेक याने ज्ञान से उसे जानने का उपदेश दिया हैं । कबीर की तरह रामदास का भी परमात्मा तथा उसकी शक्ती में पूरा विश्वास हैं । उन्होंने बड़े विश्वास के साथ कहा हैं -

*'समर्थांचिया सेवका वक्र पाहे, असा सर्व भूमंडळी कोण आहे?*
*जयाचि लिला वर्णिती लोक तीन्हीं, नुपेक्षी कदा राम*

*दासाभिमानी ॥'*

अर्थात् समर्थ ऐसे राम के भक्त की ओर आँख उठाने की भी कोई हिम्मत रख सकता हैं? राम अपने भक्तों की उपेक्षा कभी नहीं करते ।

ऐसे परमात्मा के नामस्मरण में कबीर तथा रामदास दोनों का विश्वास हैं । कबीरदास ने कहा हैं -

*'सभी रसायन हम करि नहीं नामसम कोय ।*
*रंचक घट में संचरै सब तन कंचन होय ॥'*

और रामदास भी अपने मनको उपदेश करते हुए कहते हैं -

*'जयाचेनि नामें महादोष जाती । जयाचेनि नामें गति पावजेती । जयाचेनि नामें घडे पुण्य ठेवा । प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥'*

इस तरह रामदास भी नामस्मरण से महादोषों को दूर करना तथा पुण्य प्राप्त करना चाहतें हैं ।

अब ऐसे परमात्मा को प्राप्त कैसे किया जा सकता हैं? उसकी प्राप्ति के दो मुख्य मार्ग हैं - (१) सगुण मार्ग या भक्ति-मार्ग, (२) निर्गुण मार्ग या ज्ञान-मार्ग । वैसे योग, कर्म तथा प्रेम जैसे अन्य मार्ग भी हैं । इन में से कबीर तथा रामदास ने जिस मार्ग का अवलंब किया हैं उसमें इतनी समानता हैं कि जिसे जान लेने पर बड़ा ही आश्चर्य होता हैं । कबीर प्रणीत ईश्वरप्राप्ति का मार्ग समन्वय का मार्ग ही माना जा सकता हैं । समन्वय से मेरा मतलब यहाँ पर यह हैं कि ज्ञान और भक्ति के समन्वय से बना हुआ मार्ग । इसमें तो तनिक भी संदेह नहीं कि कबीर मत में ज्ञान को ही महत्त्व दे दिया गया हैं किन्तु यह ज्ञान भी भक्ति से अनुमोदित हैं । जैसे -

*'सगुण की सेवा करो, निर्गुण का करू ज्ञान ।*
*निर्गुण सगुण के परै, तहैं हमारा ध्यान ॥'*

फिर भी उनकी मूल प्रकृति ज्ञान-मार्ग की ओर ही झुकी हुई हैं । जैसे -

*'पंडित पढ़ि गुनि पचि मुए, गुरु बिन मिलै न ज्ञान ।*
*ज्ञान बिना नहिं मुक्ति हैं, सत्त शब्द प्रमान ॥'*

इस प्रकार कबीर में हम भक्ति से अनुमोदित ज्ञान तथा ज्ञान से अनुमोदित भक्ति के दर्शन करते हैं । उनकी साधना-पद्धती का क्रम-पूर्वक विकास हो गया हैं । हठयोग से वे सहजयोग तक आ पहुँचे थे । ज्ञान के कारण वे परमात्मा के साथ इतने एकरूप हो गए से प्रतीत होते हैं कि अपनी प्रत्येक क्रिया को परमात्मा की उपासना का ही एक अंग उन्होंने माना हैं । जैसे -

*'साधो, सहज समाधि भली ।*
*गुरु प्रताप जा दिन तैं उपजी, दिन दिन अधिक चली ॥*
*जहँ जहँ जाऊँ सोई परिकम्मा, जो कछू करौं सो सेवा ।*
*जब सोंवौ तब करौं दण्डवत, पूजौं और न देवा ॥'*

रामदास का ईश्वर-प्राप्ति का मार्ग भी भक्ति से अनुमोदित ज्ञान-मार्ग हैं । कबीर ही के समान रामदास की भी मूल प्रकृति ज्ञान-मार्ग की ओर झुकी हुई दिखाई देती हैं । जैसे - 'आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यास नाहीं मर्यादा ॥ दुष्ट पातकांची बाधा । निरसोन गेली ॥' अर्थात् आत्म-ज्ञान ही पुण्य-प्राप्ति का वह मार्ग हैं जिससे सारे दु:ख तथा पाप नष्ट होते हैं । रामदास की दृष्टि में ज्ञानमार्ग एक अपूर्व अनुभूति का मार्ग हैं । जैसे - 'वेदशास्त्रीं सत्य स्वरूप । तेंचि ज्ञानियांचें रूप ॥ पुण्य झालें अनूप । सुकृतें सीमा सांडिली । ह्या प्रचीतीच्या गोष्टी । प्रचीत पहावी आत्मदृष्टि।'

आत्म-ज्ञान की अनुभूति तथा आनंद अनिर्वचनीय हैं । कबीर और रामदास दोनों ने उसकी अनिर्वचनीयता का सुंदर वर्णन किया हैं । कबीर के शब्दों में -

*'आतम अनुभव ज्ञान की जो काई पूछै बात ।*
*सो गूंगा गुड़ खाइकै कहैं कौन मुख स्वाद ॥'*

अथवा 'सैना-बैना कहि समुझावैं, गूँगेका गुड़ भाई ।'

रामदास के शब्दों में भी आत्मज्ञान के स्वरूप तथा अनुभूति का वर्णन देखिए - 'ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान

म्हणजे आत्मज्ञान ।। पहावें आपणांस आपण । या नांव ज्ञान ।।... ... मन बुद्धि अगोचर । न चले तर्काचा विचार ।। उल्लेख (जानकारी) परेहून (वाचा) पर । या नांव ज्ञान ।।' अर्थात् आत्म-ज्ञान का अनुभव मन, वाणी या तर्क से व्यक्त नहीं किया जाता ।

इस आत्म-ज्ञान की प्राप्ति होती हैं सद्‌गुरु से तथा वह बढ़ जाता हैं सत्संग से । अत: इन दोनों की महिमा का वर्णन कबीर तथा रामदास ने मुक्त कण्ठ से किया हैं । कबीर गुरु को परमात्मा से भी श्रेष्ठ समझते थे । कबीर ने गुरु की महिमा किन शब्दों में व्यक्त की हैं देखिए -

*'गुरु गोविंद दोऊ खड़े, काकै लागौं पाँय ।*
*बलिहारि गुरु आपने गोविंद दियो बताय ।।'*

रामदास ने अपने 'दासबोध' में सद्‌गुरु की महिमा का वर्णन स्थान २ पर किया हैं । 'दासबोध' के पहले दशक तीसरे समास (अध्याय) में सद्‌गुरु की महिमा का ही वर्णन मिलता हैं । वानगी के तौर पर देखिए -

*'हरिहर ब्रह्मादिक । नाश पावती सकळीक ।।*
*सर्वदा अविनाशी एक । सदगुरुपद ।।'*

और

*'इहलोक साधावया कारणें । जाणत्याचि संगति धरणें ।।*
*परलोक साधावया कारणें । सद्‌गुरु पाहिजे ।।'*

अर्थात् सद्‌गुरु के बिना मुक्ति नहीं मिल सकती ।

आत्मज्ञान की जो भावना सद्‌गुरु के कारण मन में पैदा हो जाती हैं उसका विकास साधुजनों की संगति के कारण ही होता हैं । अत: उस संगति का भी महत्त्व दोनों को स्वीकार हैं । कबीर ने कहा हैं -

*'हरि से जनि तू हेत कर, कर हरिजन से तू हेत ।*
*माल मुलक हरि देत हैं, हरिजन हरि ही देत ।।'*

रामदास ने भी दासबोध के प्रथम दशक के चौथे समास में सन्त-सज्जनों की महिमा का वर्णन किया हैं । जैसे -

*'आतां वंदीन संत सज्जन । जे परमार्थाचें अधिष्ठान ।।*
*जयाचेनि गुह्य ज्ञान । प्रगटे जनीं ।।*
*जे वस्तु परम दुर्लभ । जयाचा अलभ्य् लाभ ।*
*तेंचि होय परम सुलभ । सत्संगे करूनी ।।'*

ईश्वर के स्वरूप की निश्चिति जब साधक के मन में हो जाती हैं तब वह सत्य तथा मिथ्या के स्वरूप को जानने लगता हैं । उसका सत्य-प्रेम फिर मिथ्या पर प्रहार करने के लिए उसे बाध्य करता हैं । कबीर और रामदास दोनों की ठीक यहीं अवस्था हुई । कबीर ने सत्य को ही ईश्वर स्वरूप माना । उनके शब्दों में -

*'साँच बराबर तप नहिं, झूठ बराबर नहीं पाप ।*
*जाके हिरदे साँच हैं, ताकै हिरदै आप ।।'*

रामदास ने भी सत्य का ही सर्वत्र समर्थन किया हैं। जैसे -

*'मना सर्वथा सत्य सांडूं नको रे । मना सर्वथा मिथ्य मांडूं नको रे ।।*
*मन सत्य ते सत्य वाचें वदावें । मना मिथ्य तें मिथ्य सोडून द्यावें ।।'*

अर्थात् हे मन, तू हमेशा सत्य को ही अपनाता चल और मिथ्य का त्याग कर ।

सत्य के इस आग्रह से दोनों ने ही रुढ़ियों की कटु आलोचना की हैं । किन्तु जहाँ कबीर में रूढ़ी-विरोध की यह आवाज़ अधिक मुखर हुई हैं, वहाँ रामदास ने उसे तर्क तथा ज्ञान के अंकुश से नियंत्रित किया हैं । कबीर ने रुढ़ियों की कैसे आलोचना की हैं यह देखिए ।

*'लोगा तुमहि मति के भोरा,*
*जो कासी तन तजै कबीरा रामै कौन निहोरा ।*
*क्या कासी क्या ऊसर मगहर राम हृदय बस मोरा ।'*

अर्थात् काशी में मृत्यु की इच्छा करनेवाले पाखंडियों को इन पंक्तियों में कबीर ने चुनौती ही दे दी हैं। उनका यह पूरा विश्वास हैं की जिसके हृदय में राम हैं उसे काशी में मरकर मुक्ति पाने की आवश्यकता नहीं। रामदास ने भी बाह्याडंबरों की हँसी उड़ाते हुए कहा हैं -

*'वेष वरि वरि केला । अभ्यंतरीं दोष भरिला ॥*
*या दोषाच्या दहनाला । आत्म-ज्ञान पाहिजे ॥*
*नाना व्रतें नाना दानें । नाना योग तीर्थाटणें ॥*
*सर्वांहुनि कोटि गुणें । महिमा आत्मज्ञानाचा ॥'*

अर्थात् बाह्याडंबर की अपेक्षा आत्म-ज्ञान कोटि गुना अच्छा हैं।

इस आत्म-ज्ञान की प्राप्ति का वही अधिकारी बन सकता हैं जिस में सच्ची लगन हो। जैसे -

*'हँस हँस कंत न पाइया, जिन पाया तिन रोय ॥*
*हाँसि खेले पिय मिलैं, कौन दुहागिन होय ॥'*

रामदास ने भी इसीसे मिलते जुलते भाव व्यक्त किये हैं -

*'जो संसारदुःखें दुखावला । त्रिविध तापें पोळला ॥*
*तोचि अधिकारी झाला । परमार्थाचा ॥'*

रामदास और कबीरदास दोनों एक नवीन मार्ग के प्रवर्तक थे। किसी भी पंथ के प्रवर्तक को अपने पंथ के अनुयायियों के सदाचार की ओर ध्यान देना पड़ता हैं। इस दृष्टि से दोनों ने अपने पंथों के लिए सदाचार को कुछ महत्त्वपूर्ण बातें बताई हैं, जिनको व्यापक जीवन मूल्यों के तौर पर कोई भी अपना सकता हैं। प्रेम, त्याग, दया, परोपकार, मधुरभाषण, सहनशक्ति, उदारता, आदि जीवनविषयक महान् आदर्शोंकी व्याख्या दोनों ने भी कीं हैं। परोपकार भारतीय संस्कृति की ही मूलभूत विशेषता हैं। कहा भी जाता हैं कि भारतीय संस्कृति का सार हैं, 'परोपकाराय पुण्याय पापाय परपीडनम्'। अतः हमारे यहाँ के प्रत्येक सन्त ने परोपकार के आदर्श को अपनाया हैं। कबीरदास ने कहा हैं, 'वृक्ष कबहुँ नहिं फल भरवै, नदी न संचै नीर। परमारथ के कारने साधुन धरा सरीर ॥' और रामदास मन को उपदेश देते हुए कहते हैं, 'देहे त्यागिता कीर्ती मागें उरावी। मना सज्जना हेंचि क्रिया धरावी ॥ मना चंदनाचे परि त्वां झिजावें। परि अंतरीं सज्जना नीववावें ॥' अर्थात् हे मन, तू हमेशा चंदन कि तरह घुल कर दूसरों की सेवा कर और अमर बन जा। पंथ के अनुयायियों को चाहिए कि वे अपनी कृति द्वारा लोगों को अपने सिद्धान्तों का महत्त्व समझा दें। यदि कथनी और करनी में अंतर हो तो उससे क्या फायदा? अतः कबीरदास ने अपने अनुयायियों को करनी का महत्त्व समझाते हुए कहा हैं, कि 'कहता तो बहुता मिला, गहता मिला न कोय', अथवा 'कथनी तजै करनी करै विष से अमृत होय।' रामदास ने भी ठीक इसी प्रकार कहा हैं की, 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे।' अर्थात् बिना कर्म के कोरी तोतारटन व्यर्थ हैं। नवीन मार्ग आक्रमण करनेवाले युगप्रवर्तक नेता को प्रयत्नवादी बनना पड़ता हैं। कबीर और रामदास में यह प्रयत्नवाद समान रूप में पाया जाता हैं। उनकी यह सबसे महान् विशेषता हैं जो अन्य सन्तों के दैववाद की तुलना में उनकी श्रेष्ठता, बुद्धिमत्ता और आत्मविश्वास की परिचायक हैं। कबीर ने प्रयत्नवाद के समर्थन में कहा हैं - 'मार्ग चलते जो गिरे वाको नाहिं दोस।' अथवा 'जिन ढूंढा तिन पाइया गहरै पानी पैठ।' रामदास ने भी सच्चे प्रयत्नवादी के रूप में कहा हैं, 'केल्यानें होत आहे रे, आधीं केलेंचि पाहिजे।'

अतः हम इस निर्णय पर आ पहुँचते हैं कि परमात्मा, उसका स्वरूप, उसकी प्राप्ति का मार्ग, उसका नामस्मरण, सद्गुरु, आत्म-ज्ञान, सदाचार आदि बहुत सी बातों में कबीर तथा रामदास के काव्य में बहुत कुछ समानता मिलती हैं। यदि काव्यत्व की दृष्टि से विचार किया

जाय तो भी कुछ बातें समान अवश्य मिलती हैं, यद्यपि कबीर में भावुकता अधिक हैं और रामदास में विचारों की प्रधानता अधिक हैं । दोनों की दृष्टि में कविता साधन थीं साध्य नहीं । कविता के द्वारा वे दोनों ही मनुष्य को सुधारना चाहते थे । और तो और हम उनको प्रमुखतया दार्शनिक के रूप में देखते हैं न कि कवि के रूप मैं । भाषा की दृष्टि से हम अन्य विभिन्नताओं को भले ही छोड़ें किन्तु एक प्रमुख समानता यह मिलती हैं कि दोनों ने ही लोक-प्रचलित भाषा को ही अपनाया क्योंकी वे अपनीं बातें व्यापक जनसमूह तक पहुँचाना चाहते थें । कबीर ने जिस प्रकार संस्कृत के क्‌पजल से साधारण समाज को बाहर निकालकर उसे भाषा के बहते नीर में स्नान कराया उसी प्रकार रामदास ने भी लोकप्रचलित सरल भाषा में ही बड़ी मार्मिक बातें व्यक्त की हैं । इस दृष्टि से मराठी के अन्य प्राचीन कवियों की अपेक्षा भी रामदास की भाषा अपेक्षाकृत अधिक सरल तथा सुस्पष्ट हैं ।

अब अन्त में जब हम दोनों की योग्यता पर विचार करते हैं तब यही कहना पड़ता हैं कि योग्यता की दृष्टि से दोनों महानुभाव अपने अपने प्रदेश में श्रेष्ठ माने जाते हैं । अंधविश्वासों कें दलदल में फँसे हुए समाज को सत्य के दर्शन करा के जहाँ कबीर ने समाज-सुधार की भावना से मानवता-धर्म की उन्नति के लिए अपने काव्य की निर्मिति की हैं वहाँ रामदास ने आध्यात्मिक ज्ञान यथार्थ महत्त्व समझाते हुए सांसारिक जीवन के कर्तव्यों की याद दिलाई है । तत्कालीन राजनीतिक परिस्थितीमें रामदास ने लोक जागृतीका काम किया । किन्तु परिस्थिती ही ऐसी थी कि व्यापक मानवता के सिद्धान्तों याने मनुष्यमात्र की समानता को वे प्रत्यक्ष व्यवहार के क्षेत्र में नहीं अपना सके । इस दृष्टि से कबीर मानवता के पुजारी माने जा सकते हैं । किन्तु लोकप्रियता की दृष्टि से यही कहना पड़ेगा की कबीर की अपेक्षा रामदास अधिक लोकप्रिय बने इसमें तनिक भी संदेह नहीं । इसका प्रमुख कारण यह हैं कि रुढ़ियों की आलोचना में कबीर रामदास की अपेक्षा बहुत ही उग्र रहे क्यों कि समाजसुधार की प्रखर भावना उनके मन में थी । इसी लिए कबीर को कहना पड़ा -

*'सन्तो, देखत जग बौराना ।*
*साँच कहौं तो मारन धावैं, झूठे जग पतियाना ।'*

रामदास के लिए परिस्थिति अधिक अनुकूल थी और उन्हों ने परम्पराओं की आलोचना करते हुए विवेक से काम लिया है तथा कुछ अच्छी परम्पराओं का पारमार्थिक जीवन के साथ मेल प्रस्थापित किया हैं । अत: उन्होंने कहा हैं -

*'आधीं प्रपंच करावा नेटका । मग ध्यावें परमार्थ विवेका ।'*

परमार्थ तथा व्यवहार के इस समन्वय की भावना के कारण वे सदैव एकांगिता से बचे और उनकी लोकप्रियता अबाधित रही । वैसे दोनों की महता इसी बात में दिखाई देती हैं की दोनों ने ही सत्य का अन्वेषण किया और आग्रह के साथ उसीका प्रतिपादन किया । यह सत्यप्रियता तथा समाजसुधार की भावना दोनों को अन्य सारे प्राचीन कवियों की अपेक्षा श्रेष्ठ प्रमाणित कर सकती हैं इसमें तनिक भी संदेह नहीं ।

# दासबोध आणि संकेतकुबडी

**_कल्याण काळे_**
*ए ५ प्रज्ञानगड, नवशा मारुती गल्ली,*
*वीटभट्टी, सिंहगड रोड, पुणे ३०*

हंसराजस्वामी हे मराठवाड्यातील एक मोठे आणि महत्त्वाचे संत होते. त्यांचा जन्म परभणी येथे इ.स.१८०५ मध्ये झाला. त्यांचे मूळचे नाव नारायण असे होते. त्यांनी वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी पंढरपूर येथे संन्यास घेतला होता. तेव्हा त्यांचे नाव नारायणतीर्थ असे झाले. पुढे शिष्यांना उपदेश देऊ लागल्यानंतर त्यांचे शिष्य त्यांना हंसराजस्वामी म्हणून संबोधू लागले. संन्यास ग्रहणानंतर त्यांचे वास्तव्य डोमगाव येथे झाले. तेथील सखारामबाबा डोमगावकर यांच्याशी त्यांचा स्नेह होता. त्यांच्याच विनंतीवरून ते डोमगाव येथे राहायला गेले होते. सखारामबाबांचे इ.स.१८४०च्या सुमारास हैदराबाद येथे अचानक निधन झाल्यामुळे त्यांना डोमगाव सोडून परंड्यास यावे लागले. त्यानंतर आयुष्याच्या अखेरीपर्यंत ते परंडा येथेच राहिले. इ.स.१८५५ मध्ये ते समाधिस्थ झाले.

हंसराजस्वामी हे समर्थांच्या परंपरेतले समर्थांपासूनचे सातवे पुरुष होत. त्यांची गुरुपरंपरा पुढील श्लोकात वर्णन केली आहे.

*आदिनारायणं विष्णुं हंसं ब्रह्माणमद्वयम्*
*वसिष्ठं श्रीरामचन्द्रं च रामदासं तथैव च*
*उद्धवं माधवं रुद्रं नागनाथं च लक्ष्मणम्*
*श्री मन्नारायण गुरूं, इमां वन्दे परंपराम् ॥*

*(हंसपद्धती १०.५.११)*

श्रीसमर्थ - उद्धव - माधव - रुद्रराम - नागनाथ - लक्ष्मण - नारायणतीर्थ ऊर्फ हंसराजस्वामी. अशी ही परंपरा आहे. हंसपद्धती या ग्रंथामध्ये या सर्व गुरूंची चरित्रे दिली आहेत.

समर्थांशी असे परंपरेनेच जोडलेले असल्यामुळे हंसराजस्वामींना त्यांच्याबद्दल अतिशय आदर होता. त्यांना समर्थांचा साक्षात्कार झाला होता. समर्थांनीच त्यांना हंससंप्रदाय स्वतंत्रपणे सुरू करण्याचा आदेश दिला होता, असे त्यांचे चरित्रकार सांगतात. या संप्रदायात श्री.दत्तात्रेय, श्री शंकराचार्य आणि श्रीसमर्थ असे तीन आचार्य मानले जातात. या तिघांचा हंसराजस्वामींवरचा प्रभाव वर्णन करताना हंसपद्धतीकार म्हणतात,

*ज्ञानपरंपरा समर्थांची आली ।*
*श्री दत्तांची प्रसन्नता वरी झाली*
*निरूपणपद्धती आचार्यांची उमटली ।*
*एवं तीन ओघ येथे आले ॥ (हं.प.१०.७.१०८)*

प्राचीन मराठी संतांमध्ये वेदान्तावर ज्यांनी ग्रंथ लिहिले आहेत, त्यांमध्ये ज्ञानदेव, एकनाथ हे संत विवेचक ग्रंथकार आहेत आणि मुकुंदराज, रामदासस्वामी आणि हंसराजस्वामी हे प्रबोधनकार संत आहेत. या तिघांनी अज्ञानी लोकांना वेदान्ताचे शिक्षण देण्यासाठी ग्रंथलेखन केलेले आहे. हंसराजस्वामींनी याबाबतीत समर्थांचाच

आदर्श समोर ठेवला आहे.

समर्थांबद्‌लचा हंसराजस्वामींचा आदर आणखी एका प्रकाराने व्यक्त झाला आहे. त्यांनी समर्थांच्या दासबोध आणि पूर्वारंभ या दोन ग्रंथांवर टीकात्मक ग्रंथ लिहिले आहेत. दासबोधावरच्या टीकेचे नाव 'संकेत कुबडी' असे असून, पूर्वारंभावरील टीकेचे नाव 'पूर्वारंभगाथा' असे आहे. याखेरीज आपल्या काही ग्रंथांमध्ये हंसराजस्वामींनी समर्थांबद्दल गौरवोद्‌गार काढले आहेत. संकेत कुबडीच्या प्रस्तावनेत ते म्हणतात,

*श्री सज्जनगडनिवासी । जो का सच्चित्सुखाची रासी ।*
*वर्णावे तयाचे स्वरूपासी । तरी अनिर्वाच्य ॥१॥*
*मुमुक्षु साधक चातकजन । तयांचे व्हावे समाधान ।*
*वोळूनि कृपेचा घन । दासबोध जीवन वर्णला ॥२॥*
*(संकेत कुबडी १.१.२)*

आगमसारात ते म्हणतात,

*उपाधियोगे सात नामें । समाधानाची संकेत वर्मे ।*
*बोलिली असती श्रीरामें । दासरूपें अवतारू ॥*
*(आगमसार, ११.१.११)*

समर्थांना 'श्रीरामाचा दासरूप अवतार' असे त्यांनी म्हटले आहे.

याशिवाय त्यांच्या सर्वच ग्रंथांमध्ये समर्थवाणीचा प्रभाव जाणवतो. नमुन्यादाखल काही वचने उद्‌धृत करतो.

### १. म्हणून सद्‌गुरू वर्णवेना

**दासबोध**

*होती स्तवनाची दुराशा । तुटला मायेचा भर्वसा ।*
*आता असाल तैसे असा । सद्‌गुरूस्वामी ॥ दा. १.४.४*
*म्हणून सद्‌गुरू वर्णवेना । हे गे हेचि माझी वर्णना ।*
*दास. १.४.३१*

**हंसराजस्वामी**

*म्हणून सद्‌गुरू वर्णवेना । लाजून सांडिले मीपणा ।*
*आता जैसे असाल तैसे असाना । सद्‌गुरूराया ॥*
*आगमसार १.१.५१.*

### २. दांभिक नवस

**दासबोध**

*आक्षत भरिली भाणा । दुजा ब्राह्मण मेहुणा ।*
*आला होता पाहुणा । स्त्रियेस मूळ ॥ दास. ३.३.१०*

**हंसराजस्वामी**

*व्याही जावई पाहुणे आले । त्यासवें ग्रामस्थ बोलाविले ।*
*त्यामध्ये पारणे फेडिले । व्यंकटेशाचे ॥*
*काही देवाचा होता नवस । त्यात पोराचे केले बारसे ।*
*ऐसे असोन बोल सायासें । म्हणे म्यां संतर्पण केलें ॥*
*वेदेश्वरी १.३२९.३३०.*

### ३. परमार्थाचा अधिकारी

**दासबोध**

*तैसा संसारें दुःखवला । त्रिविधतापें पोळला ।*
*तोचि एक अधिकारी जाला । परमार्थासी ॥ दा. ३.६.७.*

**हंसराजस्वामी**

*१. जो त्रिविधतापें चित्तीं पोळला । अनुतापें अवघाचि त्याग केला ।*
*तोचि मुमुक्षु अधिकारी झाला । मोक्षश्रियेचा ॥ (वेदे ८.२८०)*

*२. जो प्रपंची पोळला । त्रिविधतापें तापला ।*
*अनुतापें अवघा त्याग केला । तोचि अधिकारी ॥*
*सदाचार १५२.*

### ४. समाधानाची संकेत वचने

**दासबोध**

*संगत्याग आणि निवेदन । विदेहस्थिति अलिप्तपण ।*
*सहजस्थिती उन्मनी विज्ञान । हे सप्तही येकरूप ॥*
*याहिवेगळी नामाभिधाने । समाधानाची संकेतवचने ॥*
*(दास. ४.४.८-९)*

**हंसराजस्वामी**

*उपाधियोगे सात नामें । समाधानाची संकेत वर्मे ।*
*बोलिली असती श्रीरामें । दासरूपें अवतारू ॥*
*(आगमसार ११.१.११)*

## ५. सिद्धी, सामर्थ्य यांची अपेक्षा करू नये.

### दासबोध

*पूर्वी ज्ञाते विरक्त भक्त । तयांसि सादृश्य भगवंत ।*
*आणी सामर्थ्यहि अद्‌भुत । सिद्धीचेन योगें ॥३४॥*
*ऐसें तयांचे सामर्थ्य । आमुचे ज्ञानचि नुसते वेर्थ ।*
*ऐसा सामर्थ्याचा स्वार्थ । अंतरी वसे ॥३५॥*
*सिद्धि आणी सामर्थ्य जाले । सामर्थ्यें देहास महत्त्व आलें ।*
*तेणें बेंचाड बळकावलें । देहबुद्धीचें ॥४०॥*
*सांडूनि अक्षै सुख । सामर्थ्य इच्छिती ते मूर्ख ।*
*कामनेसारिखें दुःख । आणीक काहीच नाहीं ॥४१॥*
*होता शरीरासी अंत । सामर्थ्य हि निघोन जात ।*
*सेखीं अंतरला भगवंत । कामनागुणें ॥४३॥ दासबोध ५.२*

### हंसराजस्वामी

*सामर्थ्यवंत तेचि ज्ञाते । आमुचे ज्ञानचि नुसतें ।*
*म्हणोनियां सामर्थ्यातें । इच्छी जो ज्ञाता ॥१४॥*
*तरी हे सामर्थ्य तपाचें । बोलूं नये ज्ञानाचें ।*
*सामर्थ्य तरी देहाचें । येणें आत्म्यासी काय ॥१५॥*
*लोकरीतीं सामर्थ्य आलें । जगीं मोठे मान्य जाले ।*
*परी आपुलें घर बुडविलें । देहबुद्धीनें ॥१६॥*
*म्हणोनि देहबुद्धी सांडावी । माइकाची उठाठेवी ।*
*आत्मलाभेंचि तृप्ति व्हावी । सामर्थ्य कैंचें ॥१७॥*
*(आगमसार ९.३.१४-१७)*

## ६. शब्दसाम्य

### दासबोध

*देह मी वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ।*
*दास. ५.६.५५*

### हंसराजस्वामी

*दासबोध स्वल्प वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ।*
*(संकेत कुबडी ५.२१)*

अशी आणखी कितीतरी साम्यस्थळे उद्‌धृत करता येतील. पण तो एका स्वतंत्र लेखाचाच विषय होईल. समर्थ आणि हंसराजस्वामी यांचे नाते स्पष्ट होण्यासाठी इथे दिलेली ही उदाहरणे वानगीदाखल पुरेशी आहेत.

हंसराजस्वामींनी दासबोधाचे सार सांगण्यासाठी संकेतकुबडी हा ग्रंथ लिहिला आहे. त्यांचा परिचय येथे प्रस्तुत आहे. दासबोधाचे सार सांगणारा हाच एकमेव ग्रंथ आहे, असे नाही. दासबोध हा ग्रंथ अतिशय प्रासादिक ग्रंथ आहे. त्यात समर्थांनी केलेला मार्गदर्शनरूपी प्रसाद तर आहेच आहे, पण तो प्रसाद या गुणानेही संपन्न आहे. तो समजायला अतिशय सोपा आहे. त्यात पांडित्यप्रदर्शन नाही, वाद-प्रतिवाद नाहीत, अलंकारांची आतषबाजी नाही की परिभाषेचा गोंधळ नाही. समर्थांचे प्रतिपादन अगदी रोखठोक असते. ते सहजसुलभ, मोकळे प्रतिपादन पाहाताच एखादा माणूस 'हे फारच बाळबोध झाले' असे म्हणून नाकही मुरडेल. पण या संदर्भात हंसराजस्वामींनी एक सावधगिरीचा इशारा दिला आहे, तो फार महत्त्वाचा आहे.

*दासबोध स्वल्प वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ।*
*जेथे अतिसूक्ष्म विचारा । फडके होती ॥ (सं.कु.-५.२१)*

आपल्याला दासबोध समजला म्हणून सहज बाजूला सारण्यासारखा तो ग्रंथ नाही. त्यातील अनेक गहन विषय समजून घेताना चांगल्या अधिकारी व्यक्तींचीसुद्धा दमछाक होते, असे स्वामींना सांगायचे आहे. तो गहन आहे म्हणून तर संकेत कुबडीसारख्या ग्रंथांची गरज भासते.

दासबोधाचे सार सांगणारा संकेत कुबडी हाच एकमेव ग्रंथ नाही. समर्थांनंतरच्या जवळच्या पिढ्यांना तो कठीण वाटत असावा. समर्थसुद्धा दासबोधात 'एखादा विषय कुठे आला आहे?' असे विचारून शिष्यांची परीक्षा पाहात असत. त्यावेळी दासबोध बांधीव स्वरूपात नसल्यामुळे सगळी पाने सुटी सुटी असत. त्यातून नेमका तो समास शोधून काढताना शिष्यांची तारांबळ उडत असे. या समासांची विषयानुसार मांडणी करून त्यांची वीस दशकांत विभागणी करण्याचे काम समर्थांच्या प्रयाणापूर्वी काही दिवस अगोदरच झालेले आहे. त्यानंतर

दासबोधाच्या विषयानुक्रमणिका सांगणारे 'मुखवस्त्रे' नावाचे ग्रंथ अस्तित्वात आले. त्यांना मुखवस्त्रे, संकेतसूचना, भावार्थ अशी नावे असत. त्यातील एका मुखवस्त्रात त्या मुखवस्त्र लेखकाने आपण ते का लिहीत आहोत ते पुढील शब्दांत सांगितले आहे.

*"कोठे काय बोलिले ते कळेना । वेळेस पाहता सापडेना ।*
*ग्रंथ पाने शोधिता नाना । सूक्ष्मरा होतो ॥२॥*
*म्हणून काही एक स्मरण । वेळेसि व्हावया आठवण ।*
*संकेत सूचना मिस्रण (?) । बोलिले असे ॥३॥*
*वीस दशक दोनशे समास । वेगळे लिहिले सावकाश ।*
*परि पाहावे त्या वेळेस । सापडत नाहीं ॥४॥*
*म्हणून संकेत वचने । वेळेस वाचून पाहणें ।*
*सावधपणें श्रवणें । सूचो लागती ॥५॥"*

(श्रीसमर्थ रामदासकृत मुसलमानी अष्टके आणि दासबोधाची मुखवस्त्रे संपादन - डॉ. इंदू लिमये, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९८५)

याच प्रकारच्या उद्देशाने गिरिधरांनी (समर्थ प्रतापकार) ग्रंथ भावार्थ, ग्रंथान्वय, ग्रंथराज भावार्थ असे तीन ग्रंथ लिहिले आहेत. हे तीन ग्रंथ आणि त्यांचाच आत्मानुभव हा स्वतंत्र ग्रंथ मिळून चार ग्रंथ श्री. शंकर श्रीकृष्ण देवांनी 'दासबोधाची किल्ली' या एका शीर्षकाखाली प्रसिद्ध केले आहेत. (सन १९२०) हे सर्व ग्रंथ दासबोधाची अवतरणिका या स्वरूपाचे आहेत. याच ग्रंथांच्या मालिकेत हंसराजस्वामींचा 'संकेत कुबडी' हा ग्रंथ असून, तो त्या सर्वांत वेगळेपणाने उठून दिसतो. तो केवळ अवतरणिका स्वरूपाचा नाही. तो हंसराजस्वामींच्या स्वतंत्र दृष्टीची साक्ष देणारा आहे.

एकेकाळी संकेत कुबडी हा ग्रंथ समर्थकृत आहे अशा समजुतीने त्यांच्या नावावर प्रसिद्ध करण्यात आला होता. तशा स्वरूपात त्याच्या दोन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. पण पुढे नंतर अभ्यासकांच्या लक्षात ही गोष्ट आली. हंसमंडळाने प्रकाशित केलेल्या, प. पू. अनंतदास रामदासी यांनी अत्यंत साक्षेपाने संपादिलेल्या या ग्रंथाच्या तृतीय आवृत्तीत ही चूक दुरुस्त करण्यात आली आहे.

हंसराजस्वामी हे वेदान्ताचे गाढे अभ्यासक आणि प्रवक्ते होते. वेदान्ताशिवाय दुसरे काहीही लिहिणार नाही, अशी त्यांची प्रतिज्ञा होती. ते म्हणतात,

*समुच्चयही जरी असता । मी बोलेन वेदान्त संमता ।*
*जेथे परोक्षत्वाची वार्ता । लागोचि नेदी ॥ (वेदेश्वरी - १.४३)*

जवळजवळ चाळीस हजार ओव्यांइतकी ग्रंथनिर्मिती त्यांनी केली, पण कोठेही या प्रतिज्ञेला ढळ पोहोचेल असे त्यांनी काही लिहिले नाही. एखाद्या पतिव्रतेच्या निष्ठेने त्यांनी आपली वेदान्तनिष्ठा जपलेली आहे.

समर्थांच्या दासबोधात अनेक विषय आलेले आहेत. त्यामध्ये समाजकारण, देवकारण, राजकारण आणि व्यवहारज्ञान, तत्त्वज्ञान इ. अनेक विषय आलेले आहेत. त्यांनीच दासबोधाच्या पहिल्या समासात दासबोधात आलेल्या निरनिराळ्या विषयांची माहिती दिली आहे.

*ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ।*
*येथे बोलिला विशद । भक्तिमार्ग ॥२॥*
*नवविधा भक्ती आणि ज्ञान । बोलिले वैराग्याचे लक्षण ।*
*बहुधा अध्यात्म निरोपण । निरोपिले ॥ (दास. १.१.२-३)*

पहिल्या दशकाच्या पहिल्या समासात पहिल्या तेरा ओव्यांत या सर्व विषयांची यादीच त्यांनी दिली आहे. त्यांना अनेक विषयांमध्ये रस होता. त्यांची चतु:सूत्री प्रसिद्धच आहे.

*मुख्य हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण ।*
*तिसरे ते सावधपण । सर्व विषईं ॥*
*चौथा अत्यंत साक्षेप ।.... (दास. ११.५.४-५)*

त्यामुळे दासबोधाचे स्वरूप बरेचसे व्यामिश्र झाले आहे. हंसराजस्वामींना मात्र वेदान्तनिरूपण हेच दासबोधाचे तात्पर्य वाटते. म्हणून संकेत कुबडीत त्यांनी दासबोधाचे वेदान्तपर तात्पर्यच सांगितले आहे.

*प्रथम दासबोधाचा संकेत । काढिला भावार्थ वेदान्तसंमत ।*
*रामदासांच्या हाती विराजत । यास्तव नाम संकेत कुबडी ॥*
*(हंसपद्धती ७.८.२७)*

असे हंसपद्धतीकारांनी म्हटले आहे. स्वत: हंसराजस्वामी म्हणतात,

*पाहाता दासबोधीच्या अर्था । विचार नसे वेदान्तापरता ।*
*निषेधिले योग सांख्यादि मतां । मा तर्कव्याकरण कायसे ॥*
*(संकेत कुबडी १.३)*

संकेत कुबडी हा ग्रंथ स्वामींनी डोमगाव येथे शके १७६१ मध्ये लिहिला, असा हंसपद्धतीत उल्लेख आहे. या ग्रंथाला दिलेले संकेत कुबडी हे नाव अगदी समर्पक आहे. कुबडी म्हणजे रामदासी सांप्रदायिकाजवळ असणारा व योगाभ्यासात विश्रांतीसाठी उपयोगी पडणारा विशिष्ट आकाराचा लाकडी दंड. या अर्थाने हा ग्रंथ म्हणजे दासबोध वाचकाला अडणाऱ्या ठिकाणी उपयोगी पडणारा आधारदंडच होय. संकेत म्हणजे भाषेची अर्थबोधक शक्ती. या ग्रंथाद्वारे वाचक समर्थांना अभिप्रेत असलेल्या अर्थाचे ग्रहण करू शकतील, असे हंसराजस्वामींना सुचवायचे आहे. त्यांनीच म्हटलेले आहे, की

*उतारवया चंचळ सागर । दासबोध जहाज थोर ।*
*साधक पावती पैलपार । कुबडी तेथे होडगे ॥ (सं.कु. २०.४३)*

*दासबोधींचे शब्दांपासी । अर्थ भिक्षा मागणे ज्यासी ।*
*तरी हाती घेऊन कुबडीसी । बुद्धिझोळीसी साठवा ॥*
*(सं.कु. ९.१)*

रामदासी लोक भिक्षेला जाताना कुबडी आणि झोळी घेऊन जातात. या प्रथेला अनुलक्षून त्यांनी हे रूपक केले आहे.

ही संकेत कुबडी थोडक्यात दासबोधाचे सार सांगण्यासाठी लिहिली असल्याने ती फक्त मुद्द्यालाच हात घालते. काव्यात्मक अलंकारणाला तिच्यात वाव नाही. त्यामुळे कदाचित ती नीरसही वाटेल. पण दासबोधाच्या प्रत्येक समासाचे सार सांगत असल्यामुळे तिचे महत्त्व दासबोधाच्या अभ्यासकाला नाकारता येणार नाही. हंसराजस्वामींना तिच्या या नीरसतेची कल्पना आहे. म्हणून प्रत्येक दशकाच्या पुष्पिकेत ते म्हणतात,

*"इति श्री संकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी ।*
*वाकुडी परी आवडी । श्रीरामदासा ॥"*

संकेत कुबडीत दासबोधाच्या प्रत्येक दशकाचा सारांश एकेका समासात स्वामींनी सांगितला आहे. त्या समासालाच त्यांनी दशक असे नाव दिले आहे. तिच्यात एकूण ६४७ ओव्या आहेत.

हंसराजस्वामींना दासबोधाच्या तात्पर्यासंबधी व्यक्त झालेल्या निरनिराळ्या मतांची कल्पना होती. ते म्हणतात,

*"ग्रंथीचे तात्पर्य न जाणती । कोण्ही समुच्चयवाद म्हणती ।*
*अथवा त्रिकांड ही कल्पिती । कोण्ही व्यवहारज्ञान ॥"*
*(सं.कु.१.६)*

अशा मतामतांच्या गलबल्यामध्ये हंसराजस्वामी मात्र आपल्या वेदान्तपक्षाच्या बाबतीत अगदी ठामपणे स्थिर आहेत. ते म्हणतात,

*"पाहतां दासबोधींच्या अर्था । विचार नसे वेदान्तापरता ।"*
*(सं.कु.१.३)*

दासबोधातील हा वेदान्त इतर कथांसारखा अदृष्ट फल देणारा नसून, त्याची 'प्रतीत भोजनासारखी केवळ' आहे असे ते सांगतात.

या वेदान्ताची त्यांनी आपल्या सर्व ग्रंथात शास्त्रीय पद्धतीने मांडणी केली आहे. संकेत कुबडीतदेखील दासबोधातील वेदान्ताची मांडणी शास्त्रीय पायावरच केली आहे. त्यांच्या मते पहिल्या पाच दशकांत समर्थांनी दासबोधाचे अनुबंध चतुष्टय सांगितले आहे. दासबोधाचा विषय ब्रह्म असून, 'जीवेशऐक्य' हा त्यातील संबंध आहे. मोक्ष हे त्याचे प्रयोजन आहे. या तीन अनुबंधांचे वर्णन पहिल्या दशकाच्या पहिल्या समासात केले असून, दुसऱ्या समासापासून ते पाचव्या दशकाच्या अखेरपर्यंत चौथा अनुबंध जो अधिकारी त्याचे वर्णन आहे. साधन

चतुष्टय संपन्नता हे अधिकाऱ्याचे मुख्य लक्षण आहे. ती साधने म्हणजे (१) नित्यानित्य वस्तुविवेक, (२) इहामुत्र फलभोग विरक्ती, (३) शमादिषट्क संपत्ती, (४) मुमुक्षुत्व यांपैकी नित्य तत्त्वाची पहिल्या दशकात, अनित्य तत्त्वाची, दुसऱ्या दशकात चर्चा करून ऐहिक आणि आमुष्मिक फलभोगाच्या विरक्तीचे स्वरूप, तिसऱ्या दशकात स्पष्ट केले आहे. चौथ्या दशकात नवविधा भक्तीचे वर्णन वरवर पाहाता जाणवते. पण स्वामींना, 'त्यातून शमादिषट्काचेच' वर्णन अभिप्रेत आहे, असे वाटते. पाचव्या दशकात मुमुक्षुत्वाचे वर्णन आहे, असे स्वामी मानतात. अशा तऱ्हेने दासबोधाकडे पाहाण्याची स्वतंत्र दृष्टी स्वामींनी प्रकट केली आहे. विशेषत: नवविधा-भक्तीचे आध्यात्मिक स्वरूप स्पष्ट करून त्यापैकी प्रत्येक भक्ती ही उत्तरोत्तर श्रेष्ठत्वाचा प्रकार नसून शमादी सहा साधनांच्या पुष्ट्यर्थ उपयोगी पडणारी साधने आहेत, हे त्यांचे विवेचन लक्षणीय वाटते.

सहाव्या दशकात साधकास ब्रह्मात्मैक्याची प्रचीती येऊन पूर्ण ज्ञान व्हावे म्हणून निरूपण केले आहे. सातवा दशक नि:संदेह ज्ञानाचा दशक आहे. त्यात प्रथम ब्रह्माचे विधिनिषेधमुखाचे वर्णन करून त्याच्या प्राप्तीसाठी प्रथम ममत्वबुद्धीचा नाश हा उपाय सुचविला आहे. ब्रह्माच्या अनुभवानंतर अशुद्ध कल्पनांचे निरसन होत असले तरी शुद्ध कल्पनांचे अस्तित्व हे राहातेच, हे स्पष्ट करून नित्यमुक्त, जीवन्मुक्त, विदेहमुक्त यांचे स्वरूप स्पष्ट केले आहे. 'ब्रह्माचा अनुभव घ्यावा, पण अनुभविता होऊ नये' असा शेवटी सिद्धान्त सांगून त्यांनी जीवन्मुक्तीचे सविस्तर वर्णन केले आहे. या सातव्या दशकातच चौदा ब्रह्मांचे निरूपण आहे. स्वामी त्या संदर्भात म्हणतात, ''स्वरूप बोलिलें नव जाय । आणि अनुभवासीही न ये । म्हणौनि बहु प्रकारे नाना उपायें । कळावया साधका ॥१२॥ पूर्वपक्षें आघवें नामरूप लागे बोलावें । निर्विकल्पीं कल्पिता स्वभावें । मोडे कल्पना ॥१३॥'' (सं.कु.७.१२.१३)

आठवा दशक हा ज्ञानदशक म्हणून ओळखला जातो. त्यात सृष्टीचा कर्ता कोण, ईश्वर आणि त्याची माया, ईश्वरजगत् संबंध इत्यादींचे निरूपण आले आहे. त्यानंतर पंचीकरणाची माहिती देऊन सृष्ट्युत्पत्तीचे स्पष्टीकरण केले आहे. शेवटी मूळ मायेचा निरास कसा करावा हे सांगून ज्ञात्याच्या अनुभवाचे निरूपण केले आहे.

अशा तऱ्हेने या आठ दशकांत दासबोधाचा पूर्वार्ध संपतो. त्यातून व्यतिरेक पद्धतीने ज्ञानाचे निरूपण आले आहे. असे हंसराजस्वामींचे मत आहे. यापुढील नऊ ते वीस दशक उत्तरार्धाचे आहेत. या दशकांतच अनेक विषयांची खिचडी जाणवत असली तरी, हंसराजस्वामींनी त्यातून केवळ वेदान्ताचेच दर्शन घडविले आहे.

समर्थांनी चौथ्या दशकाच्या चौथ्या समासात ''संगत्याग आणि निवेदन । विदेहस्थिती आणि अलिप्तपण । सहज स्थिती उन्मनी विज्ञान (दासबोध ४.४.८)'' हे समाधानाचे सप्त संकेत सांगितले आहेत. हंसराजस्वामींच्या मते ९ ते १५ हे दासबोधाचे सात दशक या सप्त संकेतांच्या विवरणासाठी लिहिले आहेत. नवव्या दशकाच्या पठनाने सहजस्थिती अंगी बाणते, तर दहाव्या दशकाच्या पठनाने उन्मनी स्थिती प्राप्त होते. अकराव्याने निवेदनाची सिद्धी होते, बाराव्याने अलिप्तता येते, तेराव्याच्या पठणाने विदेहस्थिती प्राप्त होते, तर चौदाव्या व पंधराव्या दशकांमुळे विज्ञान आणि संगत्याग साध्य होतात. अशा प्रकारे ९ ते १५ या दशकांचे एक वेगळेच सार सांगण्याचा हंसराजस्वामींनी प्रयत्न केला आहे; पण त्या दशकांचा समासवार जो सारांश त्यांनी सांगितला आहे, त्यातून वरील सप्त संकेत कसे निष्पन्न होतात हे कळत नाही. हे खरे असले, तरी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, हंसराजस्वामींनी हे सात संकेत त्या दशकांचे सार म्हणून सांगितले नसून, त्या त्या दशकाची फलश्रुती म्हणून सांगितले आहेत. हे लक्षात घेता फलश्रुती आणि आशय यांचा संबंध जुळत नाही म्हणून तक्रार करता

येत नाही. उलट पहिल्या आठ दशकांत ज्ञानाचे स्वरूप स्पष्ट केल्यानंतर त्याच्या पुढच्या सात दशकांतून ज्ञानोत्तर अवस्थांचे निरूपण असावयास काहीच हरकत नाही.

समर्थांच्या दासबोधाची एक सुसूत्र मांडणी स्वामी करू पाहत असले तरी पुढच्या १६ ते २० या दशकात त्यांचा हा प्रयत्न यशस्वी झाल्याचे जाणवत नाही. सोळाव्या दशकात 'परिचर्या' या गुणाचे निरूपण आहे, असे स्वामी मानतात. तर सतराव्या दशकात वासनाजय आणि मनोजय यांचे निरूपण आहे, असे त्यांचे मत आहे. अठराव्यात असंभावना व विपरीत भावना नष्ट करण्याचे उपाय सांगितले असून, एकोणिसाव्या शतकात शोकमोक्ष ही अवस्था सांगितली आहे. शेवटी विसाव्यात निरतिशयानंद प्राप्तीचे वर्णन केले आहे, असे स्वामींचे मत आहे. आता प्रश्न असा येतो की, १५व्या दशकापर्यंत ज्ञानोत्तर समाधानाच्या सप्त भूमिकांची अवस्था प्राप्त झाल्यानंतर परिचर्या, असंभावना, विपरीत भावना इ.चे वर्णन करण्याची आवश्यकता आहे का? असंभावनादी अज्ञान प्रकारांचे ज्ञानोत्तर काळी अस्तित्व तरी उरेल का?

या उत्तरार्धातील विवेचन अन्वयपद्धतीचे आहे, असे स्वामी म्हणतात, पण ते त्यांना स्पष्ट करता आलेले नाही. ग्रंथातील आशय आणि स्वामींना अभिप्रेत असलेला आशय याची गल्लत झाल्यासारखी वाटते. स्वामींनी परिचर्यादी गुणांचे निरूपण ज्या दशकांच्या संदर्भात केले आहे ते दशकच दासबोधाच्या पाचव्या दशकानंतर टाकून तेथे संकेत कुबडीतील हे विवेचनही त्या त्या जागी केले असते तर सर्व गोष्टी सुसंगत झाल्या असत्या.

एवढे मात्र खरे की, जरी हंसराजस्वामींनी त्या त्या दशकाच्या संदर्भात परिचर्यादी गुणांचे निरूपण केलेले असले तरी दशकातील समासांचे सार सांगताना त्यांनी त्या समासांना योग्य न्याय दिला आहे. दासबोधाच्या जवळजवळ सगळ्याच दशकांतील सर्व समासांचे सार प्रत्येकी २-३ ओव्यांत त्यांनी सांगितले आहे.

या ग्रंथाचा सर्व भर दासबोधाचा सारांश देण्याकडे असल्याने मागे म्हटल्याप्रमाणे स्वामींचे दुर्लक्ष झाले आहे. तथापि स्वामींनी शक्यतो दासबोधाच्या शब्दातच दासबोधाचे सार सांगण्याचे धोरण ठेवल्याने समर्थांच्या आर्श वाणीचा अंगभूत गोडवा या ग्रंथात आपोआप उतरला आहे. कित्येकदा मूळ ग्रंथातील ओव्या स्वामींनी जशाच्या तशा उद्धृत केल्या आहेत. समर्थांच्या शैलीशी स्वामी अगदी एकरूप झालेले दिसतात. त्यामुळे आपण समर्थांचीच कृती वाचतो आहोत, असे वाटते. 'सुख असावें सर्वांसी वाटते । तरी शब्दें निववावी समस्त भूतें । मग जगदांतर वोळते । ...।' (१२.३) 'विषय त्यागेंवीण परमार्थ । म्हणे तयाचे जिणें व्यर्थ । अरे जो समर्थाचा समर्थ । तोही वैराग्य संरक्षी ।' (१२.१५) 'संग जडला चंचळाचा । निश्चळ व्हावया अवकाश कैंचा । परी सविकल्पद्वारा निर्विकल्पाचा । अनुभव घ्यावा ॥' (२.१६) 'सागरामध्ये खसखस । तैसे परब्रह्मी दृश्य । मतिसारखा मतिप्रकाश । अंतरीं वाटे ॥' (९.४५) यांसारख्या कितीतरी ओव्या समर्थांच्या नावावर सहज खपून जातील. दासबोधावरच टीका लिहीत असल्याने समर्थ आणि दासबोध यांबद्दलचे आदराचे उद्गार स्वामींनी या ग्रंथात जागोजागी काढले आहेत.

असे हे संकेतकुबडीचे स्वरूप आहे. एका वेदान्तनिष्ठाच्या नजरेतून तयार झालेली दासबोधाची ही सविस्तर अवतरणिकाच आहे, असे समजावयास हरकत नाही. दासबोध वाचताना तपशिलात अडकून मुख्यार्थाकडे दुर्लक्ष होऊ नये, पौर्वापर्यसंबंध लक्षात राहून सर्व अर्थ मनात ठसावा अशी इच्छा असणाऱ्या अभ्यासकास ती उपयुक्त ठरेल. दासबोधातील तपशिलाचेही महत्त्व आहेच. पण त्याचे सौंदर्य स्वतंत्रपणे पाहावे.

# "साधू दिसती वेगळाले । परीं तें स्वरूपी मिळाले ।"

**डॉ. जगदीश मा. करमळकर**
*अद्वैत, तपोधन सोसायटी, सहकारनगर, पुणे ९*



महाराष्ट्र ही संतांची भूमी, महंतांची भूमी. याच भूमीत संतांचे राजे ज्ञानेश्वर महाराज; तर राजांमधील संत छत्रपती शिवाजी महाराज जन्माला आले. या महाराष्ट्रात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, नामदेवराय, चोखोबा, गोरोबा काका, नरहरी सोनार, सावता माळी, जनाबाई, कान्होपात्रा, एकनाथ, तुकोबाराय हे वारकरी संप्रदायातील संत होते; तर श्री समर्थ रामदास, कल्याण स्वामी, अक्काबाई, वेणाबाई हे रामदासी संप्रदायातील संत होऊन गेले. या संतांनी महाराष्ट्रात भक्तीचे मळे फुलविले. भक्तीच्या माध्यमातून नराचा नारायण केला. भक्तीच्या मळ्यात आलेले अंधश्रद्धेचे तण काढून टाकले. समाजातील पंथभेद, जातिभेद नष्ट करून समाज एकरस, एकसंध केला. या संतांच्या उपास्य दैवतात, संप्रदायात भेद असतील, वरपांगी भिन्नता असली तरी या संतांनी चराचर सृष्टीत नटलेल्या परमेश्वराची अनुभूती घेतल्याने त्यांनी प्रकट केलेल्या विचारांत विलक्षण साधर्म्य होते. श्री समर्थ रामदास स्वामी व वारकरी संप्रदायातील श्री ज्ञानेश्वर महाराज, एकनाथ महाराज व जगद्गुरू श्री तुकाराम महाराज यांच्या ग्रंथांचे परिशीलन केले तर आपल्या ध्यानात येईल की,

*''साधू दिसती वेगळाले । परीं तें स्वरूपी मिळाले ।''*

समर्थांनी आपल्या दासबोधातील पहिल्या ग्रंथारंभ लक्षण समासात अनुबंध चतुष्ट्य सांगितला आहे. तसेच कोणकोणत्या ग्रंथांच्या अभ्यासातून, चिंतनातून या ग्रंथांची निर्मिती झाली, त्या ग्रंथांची यादी त्यांनी दिली आहे. त्यात त्यांनी भगवद्गीतेचा उल्लेख केलेला आहे. आपण दासबोध वाचू लागलो की आपल्या ध्यानात येते की, समर्थांनी काही ठिकाणी गीतेतील श्लोकांचा उल्लेख केला आहे. तर काही ठिकाणी एखादा श्लोक त्यांच्या मनात असावा व त्यातूनच ती ओवी त्यांना स्फुरली असावी असे जाणवते. भगवद्गीतेतील नवव्या अध्यायातील 'पत्र पुष्पं...' या गीतावचनाचा भाव दशक २, समास ४, ओ. ११ मध्ये प्रकट झालेला दिसतो. गीतेतील श्लोक असा आहे.

*पत्रं पुष्पम् फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।*
*तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मना ।। (गीता ९, २६)*

तर समर्थ म्हणतात,

*काया वाचा आणि मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें ।*
*काहीतरी एका भजने । सार्थक करावे ।। (दासबोध २.४.११)*

तसेच गीतेमध्ये ज्ञानाचे महत्त्व सांगत असताना भगवंत म्हणतात,

*नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।*
*तत्स्वयं योग संसिद्धः कालेनात्मनि विद्यते ।। (गीता ४.३८)*

तर समर्थ म्हणतात–

*या कारणें ज्ञानासमान । पवित्र उत्तम न दिसे आन ।*
*म्हणौनि आधी आत्मज्ञान । साधिलें पाहिजे ।।*
*(दासबोध ५.४.३२)*

या भगवद्‌गीतेवर चढविलेला देशी अलंकार म्हणजे भावार्थदीपिका. सोने मूल्यवान असते, पण हेच सोने दागिन्यांच्या मोहक रूपात आले की, ते आपल्याला भावते. त्याप्रमाणे उपनिषदाचे सार असलेली भगवद्‌गीता श्रेष्ठ आहेच, पण उपमा, उत्प्रेक्षा आदी अलंकारांनी नटलेली, सिद्धांत सुगंधाने सुगंधित झालेली ज्ञानेश्वरी सामान्यांना श्रेष्ठ वाटते. श्री समर्थांच्या व्यक्तिमत्त्वावर व वाङ्मयावर श्री ज्ञानेश्वर महाराज व एकनाथ महाराजांचा प्रभाव होता. तसे पाहिले तर श्री ज्ञानेश्वर महाराज व श्री समर्थ रामदासांच्या साधकावस्थेतील दु:खांमध्ये साम्य होते. श्री ज्ञानेश्वरांच्या आईवडिलांनी देहत्याग केला, तर श्री समर्थांचे वडील लहानपणी निवर्तले, साधनेसाठी आई व घरादाराचा त्याग समर्थांनी केला. दोघांनाही समाजात अवहेलना व अपमान सहन करावे लागले. दोघांनाही परमेश्वरप्राप्तीची ओढ होती. यातूनच माउलींच्या विराण्या व समर्थांची करुणाष्टके निर्माण झाली. ग्रंथरचनेचे बाबत माउलींचा आदर्श समर्थांसमोर होता. माउलींनी मुमुक्षु, साधक व सिद्ध यांचेसाठी ज्ञानेश्वरी सांगितली, तर समर्थांनी दासबोध सांगितला. माउलींनी मुमुक्षूंसाठी हरिपाठ, तर समर्थांनी मनाचे श्लोक सांगितले. साधकांसाठी माउलींनी अमृतानुभव, तर समर्थांनी आत्माराम सांगितला. समर्थांच्या मनात श्री ज्ञानेश्वर महाराजांचे विषयी अतीव भक्तिभाव होता. हा त्यांचा भाव त्यांनी केलेल्या ज्ञानेश्वर महाराजांच्या आरतीतून स्पष्टपणे आपल्याला जाणवतो. या आरतीचे शेवटी समर्थ म्हणतात–

*'दासांचा सारथी म्हणवुनी मी तुजला ।*
*बाहता दीन दयाळा न पावसी का मजला ।।*
*नल्लुंघिसी या मातें अज्ञविपिनीं मजला ।*
*दास म्हणे मज मम जीव तद्‌वियोगी बुजला ।।४।।*
*जयदेव जयदेव जय ज्ञानदेवा*
*मंगल आरती करितो दे तव पदीं ठेवा ।।ध्रुम।।*

श्री समर्थांची अतीव श्रद्धा माउलींवर असल्याने दोघांच्या विचारांतील साधर्म्य आपल्याला त्यांच्या साहित्यातून स्पष्ट जाणवते. सद्‌गुरूंचे वर्णन करीत असताना समर्थ सागर, मेरू, दिनकर यांच्या उपमा देतात. पण यातील एकही उपमा योग्य नाही असे पाहून 'म्हणौनि सद्‌गुरू वर्णवेना । हे गे हेचि माझे वर्णना ।।' असे भाव ते व्यक्त करतात. तर श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'उगेयाचि माथा ठेविजे चरणी । हेचि भले ।।' माउलींचा 'मार्गाधारे वर्तावे । विश्व मोहरे लावावे ।' हाच भाव

*'प्रकृतिसारखें चालावे । परीं अंतरीं शाश्वत ओळखावें ।*
*सत्य होऊनि वर्तावें । लोकां एसे ।।' (दासबोध ११।२।४०)*

समर्थ व्यक्त करतात. दोघेही निर्गुणाद्वैती आहेत. निर्गुण, निराकार, एकजिनसी, चित्स्वरूपी परब्रह्मच सर्वत्र संचरले आहे. हा दोघांचा सिद्धांत आहे. त्यामुळे श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात–

*'तैसे सर्वादि जें एक । तेथें कें व्याप व्यापक ।*
*परि बोलावया नांव एक । करावे लागे ।। (ज्ञानेश्वरी १३।८८२)*

तर समर्थ म्हणतात–

*'जिकडें पहावें तिकडे अपार । कोणीकडे नाहीं पार ।*
*एक जिनसी स्वतंत्र । दुसरें नाही ।। (दासबोध २०।२।३)*

दोघेही अद्वैती असल्याने परब्रह्माहून भिन्न असे काही निर्माण झाले नाही असे दोघांचे मत आहे. त्यामुळे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात–

*'ऐसे आदिचि जें नाहीं । तयालागीं रुदसी काई ।*
*तू अवीट हें पाहीं । चैतन्य एक ।। ज्ञानेश्वरी २।१६९।*

याविषयी समर्थांची ओवीं प्रसिद्ध आहे.

*'अरे जे जालेंचि नाही । त्याची वार्ता पुससी काई ।।'*
*दासबोध ८।३।१*

या जगात जन्माला येऊन जो ईश्वरभक्ती करीत नाही त्याचे जिणे व्यर्थ आहे असे दोघांनी स्पष्टपणे प्रतिपादित केले आहे.

*'तैसी माझिया भक्तिविण । जळो ते जियाले पण ।*
*अगा पृथ्वीवरती पाषाण । नसती काही ।। ज्ञानेश्वरी ९।४३६*
*'असो भगवत् प्राप्तीवीण । करी संसाराचा शिण ।*
*त्या मूर्खाचे मुखावलोकन । करूंच नये ।। दासबोध १।९।२६*

अशी वैचारिक साम्याची कितीतरी उदाहरणे देता येतील.

श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रमाणे समर्थावर एकनाथ महाराजांचा प्रभाव होता. दोघेही मराठवाड्यातील. समर्थांचे गाव जांब व एकनाथांचे गाव पैठण. या गावात तसे फार अंतर नाही. तसेच या दोन्ही संतांच्या काळात फारसे अंतर नाही. एकनाथ महाराजांनी इ.स. १५९९ साली पैठणमध्ये देह ठेवला. तर समर्थांचा जन्म १६०८ साली जांब येथे झाला. या दोघांमध्ये नातेसंबंध होते. या नात्याविषयी समर्थभक्त सुनीलजी चिंचोलकर आपल्या 'चिंता करितो विश्वाची' या ग्रंथात म्हणतात, 'भानजी गोसावी मूळचे बुधलापूरचे. राणूबाईचे ते सख्खे थोरले भाऊ. भानजी गोसावी उत्तम कीर्तन करीत. ते संत एकनाथ महाराजांचे अनुग्रहित होते. एकनाथ महाराजांची पत्नी गिरिजाबाई व समर्थांची आई राणूबाई या दोघी सख्ख्या मावसबहिणी होत्या.' याचा अर्थ असा की समर्थांच्या वाट्याला आजोळकडून संत परंपरा लाभली होती. त्यांचे नातेसंबंधापेक्षा त्यांचे भावसंबंध पाहाणे आवश्यक आहे. कारण त्यातूनच त्यांचे विचारसाधर्म्य लक्षात येणार आहे. एकनाथ व रामदास या दोघांचे वाङ्मय पाहिले तर अनेक ठिकाणी शब्दांमध्येसुद्धा साम्य आढळते. एकनाथ एका अभंगात म्हणतात–

*'दत्त घ्यावा दत्त गावा । दत्त आमुचा विसावा ।*
*दत्त जनीं दत्त वनीं । दत्तरूप ही अवनी ।*

तर समर्थ म्हणतात –

*"राम ध्यावा राम गावा । राम आमुचा विसावा ।।*
*राम जनीं राम वनीं । रामरूप ही अवनी ।।*

प्रभु रामचंद्रांचे वर्णन करताना नाथ महाराज म्हणतात–

*"देखे ठकाराचे निजठाण । दों हातीं धनुष्य बाण ।।"*

तर समर्थ रामरायांचे वर्णन करतात–

*"ठकाराचे ठाण । करीं चापबाण ।*
*माझे ब्रह्मज्ञान । ऐसे आहे ।।"*

श्री एकनाथ आपल्या भावार्थ रामायणात देवद्रोही लोकांशी कसे वर्तन करावे याबाबत वायुदेवाच्या मुखातून सांगतात–

*"देवद्रोही देव कंटक । भूतद्रोही जीव घातक ।*
*धर्मद्रोही दुःखदायक । यांसी आवश्यक मारावें ।।*
*(भावार्थ रामायण युद्धकांड अ. ३१.)*

तर क्षात्रधर्माचे वर्णन करीत असताना समर्थ हाच विचार मांडतात.

*"देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनी घालावें परतें ।*
*देवदास पावती फत्ते । यदर्थी संशये नाही ।।*

दोघांच्या काळातील राजकीय, सामाजिक परिस्थिती एकच होती. सर्व लोक स्वाभिमानशून्य जीवन जगत होते. अन्याय, अत्याचार निमूटपणे सहन करीत होते. लोकांनी अन्यायाचा प्रतिकार करावा यासाठी त्यांनी रामकथा सांगितली. दोघांच्याही मते सीतेची बंदिवासातून सुटका करण्याबरोबरच, बंदिवासात अडकलेल्या देवांची मुक्तता करण्यासाठी रामावतार झाला. म्हणून रावणाच्या बंदिवासात अडकलेल्या देवांच्या दु:स्थितीचे वर्णन दोघेही प्रभावी शब्दांत करतात. या मागे दोघांचा सुप्त हेतू एकच होता. सद्यस्थितीत भक्तजनांनी एकवटून अन्यायाचे परिमार्जन करावे. रावणाने देवांना कसे बंदिवासात ठेवले होते व आपल्या सेवेस कसे जुंपले होते याचे वर्णन दोघांनी बव्हंशी सारखेच केले आहे.

*इंद्रबारी चंद्र छत्रधारी । यम पाणी वाहे घरी ।*
*वायू सदा पूजे वोसरी । विधी तेथे करी दळण कांडण ।।*
*नवग्रहांची पीडा गाढी । तें रावण घातले बांधवडी ।*
*पायीं घालूनि बेडी । पायरी बुडीं अडकविले ।।*
*विघ्न राहू न शके जयापुढे । तो गणेश होऊनि बापुडे ।*
*गाढवांचे कळप गाढे । चहूंकडे वळवितसे ।।*
*उदकक्रिया वरुणाहाती । व्यंजनसेवा नित्य वसंती ।*
*निरोप सांगावया बृहस्पती । प्रजापती शांति पाठक ।।*
*भावार्थ रामायण युद्धकांड अ. ८. ओवी ५५ ते ६४*

श्री समर्थ रामदासही आपल्या लघु रामायणात असेच वर्णन करतात.

*''समीर लोटतो खडे । वरुण घालितो सडे ।*
*मयंक साऊलीं धरीं । मळीण पावकु हरी ।।*
*.... सटी आरंधळी दळी । गणेश गाढवे वळी ।*
*परोपरी विटंबना । वदेल कोण रावणा ।।*
*उदंड देव पीडिलें । पदें पदासि खंडिले ।*
*बहु कठीण काळ हो । समस्त पावले मोहो ।।*

या दोन्ही संतांनी प्रयत्नवादाचा पुरस्कार केला. सागरावर सेतू बांधण्यापूर्वी रामाने तीन दिवस अनुष्ठान केले. पण सागरास रामाचे हे अनुष्ठान दुर्बलत्वाचे वाटले. त्यामुळे सात्त्विक संतापाने युक्त असलेला राम आपल्या लक्ष्मणास म्हणतो–

*'मृदुपणे नाही यश कीर्ती । मृदुपणे नाही लाभ प्राप्ती ।*
*मृदुपणे नाही विजयवृत्ती । जाण निश्चिती सौमित्रा ।।*
*सुंदरकांड अ. ३९ ओवी ५९.*

या ओवीतून नाथ महाराजांनी प्रयत्नवाद सांगितला आहे. समर्थांची प्रयत्नवादाची असंख्य वचने उद्धृत करता येतील.

*'वन्हि तो चेतवावा रे । चेतविताचि चेततो ।*
*''उत्कट भव्य ते घ्यावें । मिळमिळीत अवघे त्यागावे ।।*

वारकरी संप्रदायातील संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व वारकरी संप्रदायाचे प्रज्ञावंत भाष्यकार व संवर्धक एकनाथ महाराजांचे नंतर भागवत धर्माचे कळस असलेले तुकाराम महाराज व समर्थ रामदासांच्या विचारांतही विलक्षण साम्य आहे. संत तुकाराममहाराज व श्री समर्थ रामदास या दोघांचा जन्म १६०८ मध्ये झाला. दोघांचे जन्मस्थळ, कार्यक्षेत्र भिन्न आहे. समर्थांचा जन्म जांबेचा, साधना स्थळ टाकळी (नासिक), कार्यक्षेत्र कृष्णा खोरे तर जगद्गुरू तुकारामांचा जन्म, साधना स्थळ व कार्यक्षेत्र देहू. या दोन्ही संतांचा एकमेकांशी परिचय होता. दोघांनी एकमेकांच्या गुणांचे वर्णन करणारे अभंग लिहिले आहेत. समर्थ रामदास तुकोबारायांचे वर्णन करताना म्हणतात–

*''धन्य तुकावाणी धन्य तुझी वाणी ।*
*ऐकतां उन्मनी दीप लागे ।।१।।*
*धन्य निस्पृहता एकविध निष्ठा ।*
*श्रुती भाव स्पष्ट दाखविती ।।२।।*
*संतोषले चित्त होतांचि दर्शन ।*
*कळो आली खूण अवताराची ।।३।।*
*घातलासे धडा नामाचा पै गाढा ।*
*प्रेमें केला वेडा पांडुरंग ।।४।।*
*नवविधा भक्ती रूढविली जगीं ।*
*तारु कलियुगी दास म्हणे ।।५।।*

जेव्हा छत्रपती शिवाजी महाराज जगद्गुरू तुकाराम महाराजांकडे आले व विनवू लागले की, 'महाराज, मला अनुग्रहित करा.' त्यावेळी तुकोबारायांनी त्यांना समर्थांकडे पाठविले. त्यावेळी केलेल्या अभंगात श्री तुकाराम महाराज श्री समर्थांचे वर्णन करतात,

*राया छत्रपती ऐकावे वचन ।*
*रामदासीं ध्यान लावा वेगीं ।।१।।*
*रामदास स्वामी सोयरा सज्जन ।*
*यासी तू नमन अर्पी बापा ।।२।।*
*मारुती अवतार स्वामी प्रगटला ।*
*उपदेश केला तुजलागी ।।३।।*
*धरूं नको आस आमुची भूपाळा ।*
*रामदासीं डोळां लावा वेगीं ।।४।।*

*तुका म्हणे राया मुला असो कल्याण ।*
*सद्‌गुरू शरण असे बापा ॥५॥*

या दोन्ही संतांच्या काळात यावनी सत्तेने हैदोस घातला होता. केव्हाही यवनांचे सैन्य टोळधाडीसारखे तुटून पडत असे. उभे पीक कापून नेत. देवालये उद्ध्वस्त करीत. स्त्रियांची विटंबना करीत. अशी राजकीय परिस्थिती होती, तर सामाजिक परिस्थिती याहूनही बिकट होती. संपूर्ण समाज जातिभेदाने पूर्ण पोखरला होता. ज्या ब्राह्मण समाजाने सर्वांना मार्गदर्शन करायचे तोच समाज स्वार्थी, भ्रष्ट झालेला होता. पददलित समाजावर अन्याय, अत्याचार होत होते. समाजात अंधश्रद्धा बोकाळली होती. एकूणच अधर्माने शीग गाठलेली होती. या अंध:कारमय परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. छत्रपतींनी महाराष्ट्रातील मावळे एकत्रित केले व हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहिले व ते साकार केले. या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अवतारकार्यास पूरक असे कार्य श्री समर्थ रामदास व जगद्‌गुरू तुकाराम महाराजांनी केले. समर्थ रामदासांनी गावोगावी वीरमारुतीची स्थापना करून तरुणांच्यात क्षात्रवृत्ती जागृत केली. 'जय जय रघुवीर समर्थ ।' हा तरुणांचा प्रेरक, संजीवक मंत्र ठरला, तर तुकाराम महाराजांनी रंजल्या-गांजल्यांचे अश्रू पुसले. पाखंड खंडन केले व धर्माची स्थापना केली. त्यांनी लोकांच्या मनातील भक्तिभाव जागृत केला. 'जय जय रामकृष्ण हरी' हा भाववर्धक मंत्र लोकांच्या मनात ठसविला. या दोन्ही संतांचे कार्य व विचार परस्परपूरक असल्याने ते तसेच व्यक्त झाले आहेत.

या पृथ्वीवर अनेक सजीव आहेत. पण देवाने माणसाला आगळावेगळा देह देऊन विचार करण्याचे व ते प्रकट करण्याचे सामर्थ्य दिले आहे. नरदेहाच्या आधारेच तो ठरवू शकतो– देव व्हायचे की दानव.

देवत्वाच्या दिशेने प्रवास करण्याचे साधन म्हणजे हा नरदेह. म्हणून हे संतद्वय नरदेहाचे स्तवन करतात.

श्री समर्थ रामदास–

*धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो ।*
*जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीते ॥१।१०।१*
*देह परमार्थी लाविले । तरीचे याचे सार्थक जाले ।*
*नाही तरीं हे वेर्थच गेले । नाना आघात मृत्युपंथे ॥१।१०।६१*
*बहुता जन्मांचा शेवट । नरदेह सापडे अवचट ।*
*येथे वर्तावें चोखट । नीति न्याये ॥ ११।३।१*

जगद्‌गुरू तुकाराम महाराज –

*मोलाचे आयुष्य वेचोनियां जाय ।*
*पूर्वपुण्ये होय लाभ याचा ॥१॥*
*अनंत जन्मीचा शेवट पहातां ।*
*नरदेह हातां आला तुझ्या ॥२॥*
*करील तें जोडीं येईल कार्यासी ।*
*ध्यावे विठ्ठलासी सुखालागी ॥३॥*
*सांचलिया धन होईल ठेवणे ।*
*तैसीं नारायणे जोडीं करा ॥४॥*
*करा हरी भक्ती परलोकीं कामा ।*
*सोडवील यमा पांसूनियां ॥५॥*
*तुका म्हणे करा आयुष्याचे मोल ।*
*नका वेचूं बोल नामाविण ॥६॥ सार्थ तुकाराम गाथा ४११३*

आपल्याकडे चार आश्रम सांगितले आहेत. ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासाश्रम. अन्य तीन आश्रमांना गृहस्थाश्रम आधार आहे. विवाहोत्तर गृहस्थाश्रम सुरू होतो. यामध्ये पत्नी, मुले, आईवडील यांच्या भरणपोषणाची जबाबदारी गृहस्थावर येते. प्रपंच चालविण्यासाठी अर्थार्जन आवश्यक आहे. पण हा पैसा कसा मिळवावा? व त्याचा विनियोग कसा करावा याचे मार्गदर्शन पुढील चरणातून आपणास होईल.

श्रीसमर्थ –

*"नाना वेष नाना आश्रम । सर्वांचे मूळ गृहस्थाश्रम ।*
*जेथे पावतीं विश्राम । त्रैलोक्यवासी ॥१४।१।१*
*आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।*
*येथे आळस करूं नका । विवेकी हो ॥ १२।१।१*

जगद्‌गुरू श्री तुकाराम महाराज–

*जोडोनिया धन उत्तम व्यवहारें ।*
*उदास विचारें वेच करी ॥१॥*
*उत्तमचि गती तो एक पावेल ।*
*उत्तम भोगील जीव खाणी ॥२॥*
*परउपकारी नेणे परनिंदा ।*
*परस्त्रिया सदा बहिणी माया ॥३॥*
*भूतदया गाई पशूंचे पाळण ।*
*तान्हेल्या जीवन वनांमाजी ॥४॥*
*शांतिरूपे नव्हे कोणाचा वाईट ।*
*वाढवी महत्त्व वडिलांचे ॥५॥*
*तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ ।*
*परम पद् बळ वैराग्याचे ॥६॥ सा. तु. गा. २०८५*

आपल्याकडे अन्नसेवन हा विधी सांगितला आहे. सध्या ज्या पोटाकरिता ही सारी धडपड चाललेली असते त्या जेवणाकडे आमचे लक्ष नसते. एखाद्या पोत्यात सामान भरावे तसे आम्ही जेवतो. त्यामुळे पचनक्रिया नीट होत नाही. त्याऐवजी नीट पाटावर बसून ताट उच्चासनावर ठेवून ज्याच्यामुळे हे अन्न मिळाले, त्याचे स्मरण करीत जेवणे आवश्यक आहे. यासंबंधी दोन्ही संतांनी अतिशय चांगले विचार मांडले आहेत.

श्री समर्थ रामदास–

*जनीं भोजनीं नाम वाचे वदावे ।*
*अती आदरें गद्यघोषें म्हणावे ॥*
*हरीचिंतनी अन्न सेवीत जावे ।*
*तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ॥ मनाचे श्लोक ८९*

श्री जगद्गुरू तुकाराम महाराज –

*पवित्र ते अन्न । हरीचिंतनी भोजन ॥१॥*
*येर वेठ्या पोटभरी । चाम मसकांचे परीं ॥२॥*
*जेऊनियां तोचि धाला । हरिचिंतनी काला केला ॥३॥*
*तुका म्हणे चवीं आले । जे कां मिश्रित विठ्ठले ॥४॥*
*सा.तु.गा. २०४३*

आपले सर्वच संत प्रयत्नवादी आहेत. एकही संत दैववादी नाही. सर्वच संतांनी प्रयत्नवादाचा पुरस्कार केला आहे. या दोन्ही संतांचे काळात धर्माला ग्लानी आली होती. समाजात निष्क्रियता बोकाळली होती. म्हणून या दोन्ही संतांनी प्रयत्नवादाचा पुरस्कार केलेला आहे.

श्री समर्थ रामदास –

*कष्टेंविण फळ नाही । कष्टेंविण राज्य नाही ।*
*केल्याविण होत नाहीं । काहीं जनीं ॥१८।७।३*
*प्रत्नेविण राहू नये । आळस दृष्टी आणूं नये ॥*
*देह अस्तां पाहू नये । वियोग उपासनेचा ॥१४।१।६०*
*आळसे कार्यभाग नासतो । साक्षेप होत होत होतो ।*
*दिसतें गोष्टीं कळेना तो । शाहणा कैसा ॥१४।५।२७*

जगद्गुरू श्री तुकाराम महाराज –

*ओलें मूळ भेदी खडकांचे अंग ।*
*अभ्यासासी सांग कार्यसिद्ध ॥१॥*
*नव्हे ऐसे काहीं नाही अवघड ।*
*नाहीं कईवाड तोचि वरि ॥२॥*
*दोरें चिरां कायेपेणे पडिला कांचणी ।*
*अभ्यासे सेवनी विष पडे ॥३॥*
*तुका म्हणे कैचा बैसण्यास ठाव ।*
*जठरी बालां वाव एकांएकी ॥४॥ सा.तु.गा. ८४८*
*"साधुनी बचानाग खाती तोळा तोळा ।*
*आणिकांते डोळां न पहावे ॥१॥*
*साधुनी भुजंग धरतील हातीं ।*
*आणिक कांपती देखोनियां ॥२॥*
*असाध्य ते साध्य करिता सायास ।*
*कारण अभ्यास तुका म्हणे ॥३॥ सा.तु.गा. १५९*

श्री समर्थ रामदास व जगद्गुरू तुकारामांची विशेषता कोणती? या दोन्ही संतांनी समाजात भगवद्भक्ती निर्माण करीत असताना, समाजातील दोषांवर, अपप्रवृत्तींवर अंधश्रद्धेवर कठोर हल्ला केला. समाजातील अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य या दोन्ही संतांनी केले. त्यांनी मातेच्या ममतेने समाजातील दोष दूर केले. समाजरूपी मळ्यातील अंधश्रद्धारूपी तण काढून टाकले. श्रद्धारूपी पिकाची भरघोस वाढ केली.

श्री समर्थ रामदास –

*ब्रह्मा लिहितो कपाळी । आणी वाचून जाते सटी ।*
*ऐशा प्रकारीच्या गोष्टी । या नांव भ्रम ॥१०।६।३४*
*मेले मनुष्य स्वप्नां आलें । तेणें कांही मागितले ।*
*मनीं अखंड बैसले । या नांव भ्रम ॥१०।६।२६*
*दुश्चिन्हे अथवा अपशकुन । मिथ्या वार्तेनें भंगे मन ।*
*वचके पदार्थ देखोन । या नांव भ्रम ॥१०।६।२०*

जगद्‌गुरू श्री तुकाराम महाराज –

*वैद्य वाचविती जीवां । तरी कोण ध्यातें देवा ॥१॥*
*काया जाणों कैसी परी । प्रारब्ध ते ठेवी उरीं ॥२॥*
*अंगी दैवत संचरे । मग तेथे काय उरे ॥३॥*
*नवसें कन्या पुत्र होती । तरी कां करणे लागे पती ॥४॥*
*जाणे हा विचार । स्वामी तुकयाचा दातार ॥५॥*

*सा.तु.गा. १८७*

सध्या पाण्याच्या नियोजनावर विचार मांडले जातात. या नियोजनाची अंमलबजावणी व्हावी म्हणून शासकीय स्तरावर प्रयत्न केले जातात. या दोन्ही संतांनी पाण्याच्या नियोजनाचे विचार चारशे वर्षांपूर्वी मांडले.

श्री समर्थ रामदास –

*नदीचे उदक वहात गेले । तो ते निरर्थक चालले ।*
*जरीं बांधोनि काढिले । नाना तीरी कालवे ॥*
*उदक निगिने वर्तविले । नाना जिनसी पीक काढिले ।*
*पुढे उदकचि जाहले । पीक सुवर्ण ॥ सप्तसमासी*

जगद्‌गुरू श्री तुकाराम महाराज –

*बळबुद्धी वेचुनिया शक्ती । उदक चालवावे मुक्ती ॥१॥*
*नाही चळण तया अंगीं । धावें लवणामागें वेगीं ॥२॥*
*पोट मोट कळा । भरित परवाला सगळा ॥३॥*
*बीजा ज्यासी द्यावे । तुका म्हणे तैसे व्हावे ॥४॥*

जिथे प्रारंभ आहे तिथे अंत आहे. निर्मितीबरोबर नाश अटळ आहे. जन्माला आलेल्या माणसाला मृत्यू येणारच. या मृत्यूचे स्मरण आपल्याला नसते. आपले वर्तन असे असते की, जणूकाही आपणास अमरत्वाचे वरदान लाभलेले आहे. सर्वच संत आपणास सांगतात, "मृत्यू केव्हाही येईल. स्वत:चे मस्तीत जगू नकोस. परमेश्वराचे सतत स्मरण कर." मृत्यूसंबंधी दोन्ही संतांनी आपले विचार मांडले आहेत. दोघांचे विचार एकच आहेत. अनेक संतांनी हिंदीत रचना केल्या आहेत. संत तुकाराम महाराजांचीही हिंदीतील रचना आहे–

श्रीसमर्थ रामदास–

*मरें एक त्याचा दुजाशोक वाहे ।*
*अकस्मात तोही पुढे जात आहे ॥*
*पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्याते ।*
*म्हणौनि जनीं मागुता जन्म घेते ॥*
*मरणाचे स्मरण असावे । हरिभक्तीस सादर व्हावे ।*
*मरोनि कीर्तीस उरवावे । येणें प्रकारे ॥१०।१४।१३*

जगद्‌गुरू श्री तुकाराम महाराज –

*काहे रोवे आगले मरना । गव्हार तू भला अपना ॥१॥*
*केते मालूम नहीं पडें । नन्हे बडे गये सो ॥२॥*
*बाप भाई लेखा नही । पाछे तूही चलनार ॥३॥*
*काले बाल सोपत भये । खबर पकरो तुका कहे ॥४॥*

जर आपण शोध घेतला तर आपल्या लक्षात येईल. सर्वच संतांनी प्रकट केलेले विचार एकच आहेत. आपणच अल्पबुद्धी, मंदबुद्धीचे लोक संतांना, जाती, संप्रदायाच्या भिंतीत बंदिस्त करू पाहात आहोत. आज आपला देश अनीती, भ्रष्टाचार, जातीयता यांनी पोखरला गेला आहे. येथे भ्रष्टाचार शिष्टाचार होऊ पाहात आहे. चारित्र्यहीन राजकीय नेते देशाला चारित्र्याचे धडे भाषणबाजीतून देत आहेत. अशा वेळी संतांचे विचार दीपस्तंभाचे कार्य करू शकतात. आज त्यांचे विचार समाजात रुजण्याची गरज आहे. हे विचार समाजात रुजल्यास या देशात चांगले परिवर्तन घडेल व हा देश खरोखरच या जगाच्या गुरुस्थानी विराजमान होईल.

# प.पू. श्रीधरस्वामी आणि समर्थ संप्रदाय

**डॉ. अजित कुलकर्णी**

*३४६ शनिवार पेठ, नवीन मराठी शाळेसमोर,*
*पुणे ३०. मोबा. ९४०३५८०३७२*

विसाव्या शतकात भगवान श्रीधरस्वामी ही एक थोर विभूती होऊन गेली आहे. भगवान दत्तात्रेयांनी स्वत: होऊन नारायणराव (श्रीधरस्वामींचे पिताश्री) यांचे घरी अवतार घेतला. हा काळ पारतंत्र्याचा होता. एका बाजूला समाज अत्यंत म्लान होता. परकीयांच्या गुलामगिरीत जीवन विकास समजत होते, तर दुसऱ्या बाजूला स्वातंत्र्याचा संग्राम सुरू होता. अशावेळी भगवंताला श्रीधरस्वामींच्या रूपाने अवतार घेऊन समाजाला उपासना, साधक, मुमुक्षू, सिद्धावस्था, हा मार्ग प्रस्थापित करावयाचा होता. असे उद्देश वा अवतार प्रयोजन असावे, हे दिसते. हे सर्व प्रस्थापित करताना 'सेवा धर्म परमो धर्म: ।' याचा वेध श्रीधरस्वामींनी घेतला आणि या योगदानातून समर्थ संप्रदायाची घडी सुदृढ, निकोप अशी निर्माण केली. हेच त्यांच्या जीवनकार्याचे ध्येय बनले असे दिसत आहे.

समर्थ संप्रदाय याकडे पाहिले की समजते,

*'आदिनारायणं विष्णु ब्रह्माणांच वसिष्ठकम्*
*श्रीरामं मारुतीं वंदे, रामदास सद्‌गुरूम्*
*स्वरूप संप्रदाय अयोध्या मठ जानकीदेवी*
*रघुनाथ दैवत, मारुती उपासना नेमस्त*
*वाढविला परमार्थ जगी ।।''*

यानुसार पाहिले तर, हा संप्रदाय मूलत: स्वरूप संप्रदाय आहे. समर्थ रामदासांचे कार्य, सर्व प्रकारच्या शक्ती, बुद्धी व वृत्ती, यामुळे हा स्वरूप संप्रदायच समर्थ संप्रदाय ठरला. असे हे समर्थांचे योगदान व समाज व राष्ट्रकार्यात फार मोलाचे ठरले आहे.

समर्थांचा काल पारतंत्र्याचा, मुसलमानी सत्तेचा होता. श्रीधरस्वामींचा काळही पारतंत्र्याचा, ब्रिटिश सत्तेचा होता. स्वधर्माची चाड नव्हती. लोक स्वार्थाने सत्त्व विसरले होते. अशावेळी समर्थांनी जे सबंध जीवनाचे योगदान दिले त्याला तोड नव्हती. तथापि समर्थ समाधिस्थ झाल्यावर काही वर्षांतच ब्रिटिश राजवटीत समाजाची समर्थकालीन समाजाची स्थिती झाली होती. समर्थ विचार हे समाजात लुप्त झाले की काय? अशी थोडीफार स्थिती होती. परंतु विसाव्या शतकाच्या प्रारंभी समर्थहृदय शंकरराव देव, ल. रा. पांगारकर, चौंडेमहाराज इत्यादींनी समर्थ विचार जागविले होते.

या पार्श्वभूमीवर सन १९२७ ते सन १९३० या कालावधीत श्रीधरस्वामींनी अश्वलायन ऋषींच्या तपोभूमीत, समर्थ रामदासांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या सज्जनगडावर तपसाधना केली होती. समर्थांच्या समाधीची दुरवस्था, समर्थ विचारांची लुप्तता पाहिली. तन-मनाने आपला देह पोतेऱ्याप्रमाणे झिजवून समर्थ संप्रदायास पुनर्चैतन्य प्राप्त करून देण्याचे कार्य श्रीधरस्वामींनी

केले असेच म्हणावे लागेल. समर्थांनी श्रीधरस्वामींना १९३० साली प्रत्यक्ष दर्शन दिल्यावर त्यांनी समर्थ संप्रदायाचा प्रचार, लोकजागृती, समाजजागृती तसेच राष्ट्रकार्य यांच्या अनेकविध मार्गाने कार्य करून समर्थ संप्रदाय हा नव्या अंगाने प्रकाशित केला. या कार्याची धुरा वाहताना व त्याचा आढावा घेताना जे पाहाता येईल ते असे :

(१) श्री समर्थ सेवा मंडळाची स्थापना करून 'सेवा धर्म परमो धर्मा: ।' या वचनानुसार कार्य केले. त्याला अनेकांनी साहाय्य केले आहे. एकूण समर्थकालीन वास्तूंची देखभाल, दुरुस्ती केली. गडावर बारा महिन्यांची दैनंदिन उपासना, काकड आरती, रुद्राभिषेक, समर्थ समाधीची यथासांग पूजा, सायंकाळी करुणाष्टके, सवाया इ. उपासना, रात्रीची पूजा आरती, दासबोध वाचन या सर्वांची सुसूत्रता आखून दिली. आजची सांप्रदायिक उपासनापद्धती श्रीधरस्वामींनी सांगितल्याप्रमाणे आहे. दासनवमी उत्सवात अध्यात्मरामायण वाचन, १३ प्रदक्षिणांचा क्रम यांचाही यात समावेश आहे.

(२) समर्थांचा भिक्षा दौरा काढून समर्थांचे कार्य, प्रचार करून समर्थ विचारांना झळाळी प्राप्त झाली आहे. या काळात जे धान्य वा अर्थार्जन होईल त्यांनी सज्जनगडावर सुविधा केल्या. भक्तांच्या सुविधा करून, रोज अन्नदानाची सेवा सुरू केली.

(३) समर्थांचा दासबोध, आत्माराम, मनाचे श्लोक व इतर साहित्याचे त्यांनी पुनर्मुद्रण करून सवलतीच्या दरात उपासक, साधकांना त्याची उपलब्धी करून दिली आहे.

(४) प्रचार दौरा माध्यमातून समर्थांचा जागर आसेतु हिमालय केला. समर्थांचे कार्य घडावे व जनजागृती व्हावी म्हणून समर्थांप्रमाणेच आध्यात्मिक उपासनेची केंद्रे उभारून समाज संघटन करून समर्थ संप्रदायास बळकट केले.

(५) श्रीधरस्वामींनी लोक संघटनेसाठी आपल्या योगसाधनेने लोकांची दु:खे, समस्या दूर करून त्यांना ईश्वरनिष्ठ करून, समर्थ सांप्रदायिक केले.

(६) श्रीधरस्वामींनी आपल्या तपाने निरनिराळ्या देवस्थानांचे पुनर्चैतन्य प्राप्त करून तेथे आध्यात्मिक साधनेची केंद्रे केली. त्यामुळे घराघरांतून मनाच्या श्लोकांनी लोकांच्या मनात प्रवेश केला. ही लोकजागृती, भगवद्-भक्तांचा आरव निर्माण केला.

(७) समर्थ संप्रदायात गेल्या पन्नास-साठ वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन राष्ट्राच्या कार्यात फार मोठे योगदान ठरले.

(८) श्रीधरस्वामी स्थापित समर्थ सेवा मंडळांनी सज्जनगड मासिक पत्रिका, पत्रद्वारा दासबोध अभ्यासक्रम, समर्थ विद्यापीठ, ज्ञानविकास वर्ग, प्रकाशन विभाग, संत व्यासपीठ इ. उपक्रमांद्वारे समर्थ संप्रदायाचा मोगऱ्याचा वेल हा गेला गगनांतरी । म्हटले तर वावगे होणार नाही.

(९) अशा माध्यमातून समर्थ संप्रदाय व समर्थविचार यांचा प्रचार व प्रसार ही काळाची महत्त्वाची गरज आहे. संतविचारांतून होणारी जागृती ही कायद्यापेक्षा श्रेष्ठ आहे.

देव, देश व धर्म यांची सांगड घालणारा व समाजाचे उद्‌बोधन करणारा विचार हा समाजाचे उन्नयन करणारा आहे.

(१०) समाजातील संप्रदायात भेद संपावेत म्हणून श्रीधरस्वामींनी एका प्रवचनात असा विचार व्यक्त केला की,

समर्थांच्या ३५० व्या जयंती निमित्ताने सर्व संप्रदायाला एकत्र करून कीर्तनसंमेलन करून, प्रवचन, यज्ञयागादी गोष्टी करून सर्वांना एकत्र करून कार्य संपन्न केले होते.

समर्थ संप्रदाय भागवत धर्माखाली कसा आहे हे सांगून स्वत: श्रीधरस्वामी, सर्व संप्रदायांना आपले वाटू लागले. इतकेच नव्हे तर ते सर्व समाजाचे अग्रगण्य पूजेस पात्र ठरले होते.

*"राघवाचा दास । मी झालो पावन ।*
*पतित तो कोण । उरो शके ॥*
*पतित पावनाचे दास ।*

*तेहि पावन करिती जनास ॥*
*होईल ते आपण करावे ।*
*न होतां जना करवी करवावे ॥*
*काळ सार्थक करावा । जनासहित ।*
*बहुतांस करावे परोपकार ॥*
*भलेपणाच जिर्णोद्धार ।*
*पुण्यमार्गाचा विस्तार बळेचि करावा ॥''*

या ध्येयधोरणाने श्रीधरस्वामींनी संप्रदायाचे कार्य केले आहे.

त्यामुळेच श्रीधरस्वामींविषयी म्हटले जाते–

*समर्थांची मूर्ती पुनरपि जगी ही प्रगटली ।*
*जनोद्धारासाठी सतत फिरली मेदनीतली ॥*
*जयाच्या वास्तव्ये वरदनगरी होत वरदा ।*
*मनी त्या चिंतावे सतत भगवान श्रीधरपदा ॥*

असे पू. श्रीधरस्वामी समर्थ सांप्रदायिक योगदान म्हणजे दीपज्योतीप्रमाणे या आसमंतात तेवताना दिसते. हे सर्व पाहाण्याचे भाग्य आम्हांस लाभले ही त्या सद्गुरूंचीच कृपा! या कृपा सावलीत समर्थचरणी मस्तक ठेवून एवढेच म्हणतो–

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

# ब्रह्मक्षत्रयोगी श्रीसमर्थ रामदास आणि महायोगी श्रीअरविंद

***प्रा. प्रभाकर पुजारी***
*गल्ली नं. १, डहाणूकर कॉलनी, पुणे २९*

श्रीसमर्थ रामदास – इ.स. १६०८ ते १६८२
महायोगी अरविंद – इ.स. १८७२ ते १९५०

श्रीसमर्थ रामदास आणि महायोगी अरविंद हे भारतीय इतिहासातील वेदांपासून आधुनिक भारतीय परंपरेतील, ब्रह्मक्षत्रयोगी राष्ट्रपुरुष होते. 'यत्र ब्रह्म च क्षत्रं च समुंच चरत: सह । तं लोकं पुण्यं प्रज्ञेषं ।' (यजु. २० : २५) ज्या राष्ट्रात ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचा सहयोग आहे, ब्रह्मतेज आणि क्षात्रतेज यांमध्ये एकात्मता आहे. तो दिव्य पुण्यलोक आम्हाला प्राप्त होवो. 'तपोमंत्रबलं नित्यं ब्राह्मणेषु प्रतिष्ठितं अस्त्रबाहुबलं नित्यं क्षत्रियेषु प्रतिष्ठितम् । ताभ्यां संभूय कर्तव्यं प्रजानां परिपालनम् ।।'–महाभारत, ज्ञान आणि तत्त्वबल ब्राह्मणांमध्ये स्थिर असते. बाहुबल आणि शस्त्रबल क्षत्रियांमध्ये स्थिर असते. त्या समाजांनी एकत्र येऊन प्रजेचे रक्षण करावे.

साठ सहस्र वर्षांच्या भारत राष्ट्रपरंपरेतील श्रीसमर्थ हे सतराव्या शतकातील आणि महायोगी श्रीअरविंद हे एकोणिसाव्या-विसाव्या शतकातील महापुरुष होते.

श्रीसमर्थांनी आठव्या वर्षीच, 'चिंता करितो विश्वाचि' अशी आपल्या पुढील सर्व जीवनकार्याची, आत्मिक प्रेरणा मातेसमोर प्रकट केली. अकराव्या वर्षी, दार्जिलिंगमध्ये शिकत असतानाच, भारताच्या भविष्यकालात आपल्याला एक मोठी भूमिका पार पाडावयाची आहे अशी आंतरिक जाणीव श्रीअरविंदांना झाली. तेराव्या-चौदाव्या वर्षीच आपल्या आणि भारताच्या सबंध जीवनविश्वाला व्यापणाऱ्या प्रतिज्ञा सतराव्या शतकात शिवाजी महाराजांनी आणि एकोणिसाव्या शतकाच्या अखेरी सावरकरांनी केल्या होत्या. बालवयातच उत्तुंग राष्ट्रव्यापी आत्मिक प्रेरणा हे या साऱ्यांचे जीवनकार्यवैशिष्ट्य होते,

पंचवटी येथील बारा वर्षांच्या वास्तव्यात, समर्थांच्या जीवनात जो राष्ट्रकार्यापासून आत्मिक सामर्थ्यापर्यंतचा घोर अंध:कार होता त्याचे दर्शन त्यांच्या करुणाष्टकात घडते. 'नव्हे कार्यकर्ता भुमिभार जालो । तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलो ।।... तुजविण रामा मज कंठवेना । ... जळत हृदय माझे जन्म कोट्यानुकोटी ।... बहु पाहता अंतरीं कोंड होतो ।' समर्थांची तळमळ जेवढी श्रीरामदर्शनाची होती तेवढीच 'सकळ जन सुखावे तो कसा काळ फावे ।' अशी राष्ट्रोद्धारासाठीही होती. वयाच्या सातव्या वर्षापासून एकविसाव्या वर्षापर्यंत इंग्लंडमध्ये वास्तव्य असताना चौदा वर्षे अत्यंत घनदाट असा काळोख श्रीअरविंदांच्या जीवनाला अंतर्बाह्य व्यापून होता आणि बाविसाव्या वर्षी भारतात प्रवेश करताना तो कायमचा नष्ट झाला. गुरुदेव रानडे यांच्या मताप्रमाणे समर्थांच्या अंत:करणात आत्म्याची काळोखी रात्र होती आणि समर्थांच्या करुणाष्टकांप्रमाणे सबंध राष्ट्रजीवनातील

काळोख, त्यांच्या अंतर्मनाला नाशिकच्या वास्तव्यात आणि बुद्धीला बारा वर्षांच्या तीर्थाटनातील अस्मानीसुलतानी दर्शनातून व्यापून राहिला होता. 'न्याय बुडाला बुडाला जाहली शिर्जोरी । ... किती सुंदरा हाल होऊनि मेल्या ।... दासचि म्हणे होय । सर्व पराधीन ।।... बौद्ध नारायण होऊन बैसला । देव सर्व जाले बौद्धरूप ।।' असे राष्ट्रीय काळोखाचे वर्णन समर्थांनी केले.

इंग्लंडमधल्या वास्तव्यात श्री अरविंदांचे वडील डॉ. कृष्णघन घोष यांच्या पत्रांमधून, ब्रिटिशांच्या उन्मत्त आणि प्रजाविरोधी राज्यकारभाराचे स्वरूप श्री अरविंदांना जाणवले. भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्याची प्रतिज्ञा तेथेच त्यांनी केली. 'कमल आणि कट्यार' या इंग्लंडमधील गुप्त संघटनेचे ते सभासदही बनले. महाराष्ट्रात प्रथम स्थापन झालेल्या गुप्त संघटनेतही त्यांचा प्रमुख सहभाग होता.

बारा वर्षांच्या पंचवटीतील वास्तव्यात, समर्थांनी 'श्रीराम जयराम जयराम राम' या मंत्राचा अखंड जप केला. असे पारंपरिक चरित्रकारांनी लिहिले आहे. पाणिनीच्या व्याकरणाप्रमाणे 'तप' म्हणजे दीर्घकालीन चिंतन, भारतीय परंपरेप्रमाणे त्यांनी नाममंत्रजप केला हे जेवढे सत्य आहे, तेवढेच प्राचीन भारतीय ग्रंथातील राष्ट्रजीवन धर्मासंबंधीच्या चिरंतन तत्त्वाचे त्यांनी चिंतनमनन केले हे प्रत्ययनिष्ठ सत्य दासबोधाच्या पहिल्याच समासात त्यांनी स्पष्ट केले. 'नाना ग्रंथांच्या संमती । उपनिषदे वेदांत श्रुती । आणि मुख्य आत्मप्रचीती । शास्त्रेसहित ।।' दासबोधात काही निवडक ग्रंथांचाच उल्लेख असला, तरी नाशिकच्या श्रीराम मंदिरातील ओवऱ्यांमध्ये जे अनेक प्राचीन ग्रंथांचे, प्रवचनांच्या माध्यमातून जे श्रवण त्यांनी केले, जी प्रत्यक्ष पारायणे त्यांनी केली, त्यातील चिरंतन जीवनधर्म तत्त्वांवर त्यांनी जे चिंतन-मनन केले त्यांचे, 'हे सकलही निरूपिले । संकलित मार्गे ।।' असे वर्णन त्यांनी सुरुवातीलाच केले. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, गीता, मनुस्मृती, शुक्रनीती, योगवासिष्ठ, श्रीमद्‌भागवत, निरनिराळे स्मृतिग्रंथ (शास्त्रेसहित) यांचे श्रवण-चिंतन-मनन करून त्यातून सतराव्या शतकातील महाराष्ट्रीय आणि भारतीयही समाजजीवनाचे, एकात्म जीवनधर्माच्या अधिष्ठानावर पुनरुज्जीवन समर्थांनी घडविले. बृहत = ब्रह्म. ब्रह्मयोग = सर्वांगीण ज्ञानयोग, भारतीय ज्ञान-विज्ञानयोगाचे अत्यंत व्यापक असलेले ब्रह्मांडव्यापी स्वरूप त्यांनी, 'जाबालि : करतलामलकवत् पृथ्वीं ददर्श' या प्राचीन ऋषींच्या प्रज्ञासामर्थ्याप्रमाणे, दासबोधात आणि इतरही त्यांच्या वाङ्मयात प्रकट केले.

इंग्लंडमधील वास्तव्यात श्री अरविंदांनी प्राचीन ग्रीक-लॅटिन ग्रंथ, जगाचा इतिहास, इंग्लिश-फ्रेंच ग्रंथ यांचा अभ्यास केला होता. 'Aurobindo was the most richly endowed in intellectual capacity असे उद्‌गार, शेकडो वर्षांची शिक्षणपरंपरा असलेल्या इंग्लिश विद्यार्थ्यांच्या तुलनेत त्यांच्या विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी काढले. आय.सी.एस.च्या परीक्षेचे चौदा वर्षे परीक्षक असलेल्या एका अध्यापकानेदेखील श्रीअरविंदांसारखी उत्तरपत्रिका त्यांना कधीच आढळली नाही, असे म्हटले.

इंग्लंडमधल्या ज्या राष्ट्रभक्तांनी, परकीय इंग्लिश राज्यकर्त्यांची सेवाचाकरी करायची नाही, अशी प्रतिज्ञा केली होती, शपथ घेतली होती, त्यात श्रीअरविंदांनीच ती शेवटपर्यंत पाळली. बडोदा नरेशांनी स्वत:हून त्यांना प्राध्यापक म्हणून नेमले. बडोद्यात असताना त्यांना तोपर्यंत अपरिचित असलेली मातृभाषा बंगाली, संस्कृत, हिंदी, गुजराथी, मराठी या भाषा त्यांनी आत्मसात केल्या. संस्कृतमधील उपनिषदे, रामायण, महाभारत, गीता यांचा त्यांनी अभ्यास केला. महर्षी वाल्मिकी आणि महर्षी व्यास यांच्यावर त्यांनी लेख लिहिले. जगातील सर्वश्रेष्ठ महाकवी असा त्यांचा गौरव केला. रामायण-महाभारतातील काही भागांचा अनुवादही केला. बडोद्याच्या तेरा वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी अनेक विषयांवरचे ग्रंथ मुंबईहून मागवले. कलकत्त्याला जातानादेखील कपड्यांची पिशवी आणि पुस्तकांचा मात्र पेटारा अशी त्यांची प्रवासयात्रा असे.

समर्थांनी आयुष्यभर ज्या ग्रंथाभ्यास साधनेचा पुरस्कार

केला, त्याचे आचरण प्रथम त्यांनी पंचवटीच्या वास्तव्यात केले. 'स्वयें करूनि बोलणे ।' हे त्यांचे पुढील काळातील राष्ट्रनेतासूत्र, पंचवटीत त्यांनीच प्रकट केले. 'समर्थांच्या मठामध्ये जे शेकडो हस्तलिखित ग्रंथ समर्थभक्त श्री. नानासाहेब देव यांना मिळाले त्यांची केवळ सूची ११०० छापील पृष्ठांमधून त्यांनी प्रसिद्ध केली आहे. स्वतंत्र करुणाष्टकांच्या निर्मितीपासून रामायणाच्या निर्मितीपर्यंतच्या समर्थांच्या लेखनाचे स्वरूप पंचवटीच्या काळातच घडले. बीड येथील गिरिधरांच्या मठात श्रीसमर्थलिखित रामायणाची पोथी समर्थभक्त श्री. नानासाहेब देव यांना मिळाली. ती सध्या श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरात आहे. लेखनकाल नंतरचा असला तरी चिंतन-मनन काल हा पंचवटीतील वास्तव्यातलाच आहे. (इ.स. १६२० ते १६३२) 'काही वाची चर्चा करी । एकांती जाऊन विवरी । नाना ग्रंथ ।।' ही ग्रंथाभ्याससाधना पंचवटीतच घडली.

श्रीसमर्थांची ब्रह्मयोग-ज्ञानयोग साधना वयाच्या चोविसाव्या वर्षापर्यंत अखंडपणे चालली होती. श्रीअरविंदांची ब्रह्मयोग-ज्ञानयोग साधना तीस वर्षे अखंडपणे चालली होती. (इ.स. १८७९ ते इ.स. १९०९ = अलीपूर कारावासातून निर्दोष सुटका होईपर्यंत = ३० वर्षे)

मध्ययुगीन कालखंडात श्रीशंकराचार्यांची भारत तीर्थयात्रा ही वैदिक संस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठी होती. स्वामी श्रीविवेकानंदांची तीर्थयात्रा भारताच्या पुनर्निर्माणासाठी होती. श्रीसमर्थांच्या बारा वर्षांच्या तीर्थयात्रेतून त्यांच्या समग्र जीवनकार्यांचे-राष्ट्रकार्याचे स्वरूप व्यक्त झाले. जवळजवळ १०० तीर्थक्षेत्रांचा आणि त्या ठिकाणी मठ-विद्याप्राप्ती आणि राष्ट्रसेवा केंद्रे स्थापन करून ज्यांची मठपती नेमणूक केली, त्यांची नावे, समर्थांच्या प्राचीन चरित्र ग्रंथांमध्ये आढळतात. स्वत: समर्थांनी अनेक भारतीय दैवते आणि त्यांची तीर्थस्थाने यांची वर्णने केली आहेत. चाफळच्या मठात, १०३६ गावांचा उल्लेख असलेला एक कागद आढळला. त्यावरून त्यांनी ११०० मठ स्थापन केल्याची आख्यायिका निर्माण झाली असावी. तामिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजराथ, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, काश्मीर या प्रदेशांमध्ये समर्थ संप्रदायाचा झालेला विस्तार आणि हिंदी-उर्दूमध्येही झालेले समर्थ वाङ्मयाचे अनुवाद ही वस्तुस्थिती समर्थांच्या भारतव्यापी राष्ट्रधर्म योगाची निदर्शक आहे. 'महंते महंत करावे । युक्तिबुद्धीने भरावे । जाणते करोनि विखरावे । नाना देशी ।। .... बहुत जनांसी चालवी । नाना मंडळे हालवी । ऐसी हे समर्थपदवी । विवेके होते ।।... समर्थे कितेक शिष्य केले । ते ते तयासीच विदित भले ।।... लोकी लोक वाढविले । तेणे अमर्याद जाले । भूमंडळी सत्ता चाले । गुप्तरूपे ।।... ग्रामी प्रवेश करावा । प्राणिमात्र बोलवावा । आप्तपणे ।।... कुग्रामे अथवा नगरे । पहावी घरांची घरे ।... मठ करूनि ताठा । धरू नये ।।' ही समर्थांची आणि त्यांच्यासंबंधीची अनेक वचने त्यांच्या ज्ञानयोगाची आणि समाजप्रबोधनाची निदर्शक आहेत. श्रीसमर्थांनी जी विद्याकेंद्रे सबंध भारतात निर्माण केली ती तेथील महंतांच्या द्वारे, समाजात ज्ञाननिष्ठा आणि सर्वांगीण क्षत्रियनिष्ठा (अज्ञान, दैवाधीनता, दुर्बलता, निष्क्रियता, फुटीरता, परक्यांपुढे लाचारी, पराधीनता, दुर्गुण-अवगुण, अंधश्रद्धा, अनेक भयगंड, प्रतिकाराचा अभाव या सर्वांविरुद्ध गीता-महाभारतप्रणित संघर्ष) निर्माण करून भारतीय समाजाला सामर्थ्यशाली, विवेकी आणि कृतिशील बनविण्यासाठी होती. समर्थांचे शरयूकाठचे एक शिष्य राघवदास यांनी ३० सहस्र संन्यासी योद्ध्यांचे एक दल निर्माण करून तीन युद्धांत औरंगजेबाच्या सैन्याला पराभूत केले होते. औरंगजेबाच्या कारावासात बंदिस्त झालेल्या शिवाजी राजांच्या सुटकेसाठी मध्य प्रदेशातील रतनगड जवळील एका गुहेत राहून त्यांनी युद्धदेवतेची (तुळजाभवानीची) स्थापना केली आणि भौतिक-यौगिक साधनांनी मुक्ततेसाठी प्रयत्न केले. मिर्झा राजे यांच्या अनुमतीने एक रामदासी शिष्य शिवाजी महाराजांनी आपल्याबरोबर नेला होता असा उल्लेख,

कास्म द गार्डा या पोर्तुगीज लेखकाने, शिवाजी महाराजांच्या चरित्रात केला आहे. उत्तर भारतातील महंतांच्या साहाय्याने शिवाजी महाराज महाराष्ट्रात पोहोचले असे विधान 'श्यामसुंदर कवी श्याम' या हिंदी गौरव ग्रंथात एका लेखकाने केले आहे. 'उदंड करावे परी । गुप्तरूपे ।।' हा समर्थांचा शिष्यांना आदेश होता.

गलोरीच्या (काही चरित्रात बाणाच्या) साहाय्याने एका पक्ष्याला, अचूक वेध घेऊन त्यांनी खाली पाडले आणि औषधोपचार करून पुन्हा सोडून दिले. स्वामी विवेकानंदांनी प्रथमच बंदूक हातात घेऊन एका अंड्याच्या टरफलाचा अचूक वेध घेतला. मिदनापूर येथे पिस्तूल चालवण्याचे शिक्षण घेण्यासाठी गेलेल्या श्रीअरविंदांनी प्रत्येक गोळीने अचूक लक्ष्यवेध केले. हे सगळे राष्ट्रपुरुष जेवढे ज्ञानयोगी होते तेवढेच क्षत्रिययोगी होते आणि सर्वांनी प्राचीन भारतीय संस्कृतीतील ब्रह्म-क्षात्रयोगाचा जीवनभर पुरस्कार केला.

श्री अरविंदांच्या साहाय्याने यतींद्र बानर्जी याने बडोद्याच्या सैन्यात प्रवेश केला होता. माणिकराव जाधव यांना उच्च युद्धशास्त्र शिक्षणासाठी श्री अरविंदांनी युरोपमध्ये पाठवले, त्याचा सर्व खर्च केला. उदयपूरच्या राजघराण्यातील एका व्यक्तीने स्थापन केलेल्या गुप्त सशस्त्र क्रांतिसंघटनेचे श्री अरविंद हे महाराष्ट्र प्रमुख होते. के. व्ही. देशपांडे यांनी बडोद्याजवळ, विद्यालयाच्या नावाने एक शस्त्रास्त्रांचा कारखाना उभारण्याचा प्रयत्न केला होता. इंग्लंडपासून ते श्रीअरविंदांचे मित्र-सहकारी होते. क्रांतिकारकांच्या गुप्त संघटना त्यांनी बंगालमध्ये निर्माण केल्या. त्यांच्या प्रबोधनासाठी 'भवानी मंदिर' नावाची संहिता, कनिष्ठ बंधू बारींद्रकुमार घोष यांच्या विनंतीवरून तयार केली. बंगालमधल्या सशस्त्र क्रांतिकारकांची ती गीता होती. भवानी हे त्या संघटनेचे दैवत होते. त्या संहितेच्याद्वारे ज्ञानयोग आणि क्षत्रिययोग यांचा समन्वय करणारे १००० ज्ञानी-युद्धयोगी निर्माण करणे हे श्री अरविंदांचे राष्ट्रीय शक्तिध्येय होते. स्वातंत्र्ययोगासाठी भौतिक-मानसिक-नैतिक सामर्थ्याची जोपासना हे श्रीसमर्थांच्या महंत संघटनेप्रमाणे श्री अरविंदांचे सामर्थ्ययोगी राष्ट्रीय ध्येय होते.

श्रीसमर्थांनी राष्ट्रोन्नतीसाठी श्रीराम, श्रीहनुमंत, श्रीकृष्ण, भवानीमाता यांची सामर्थ्यसूत्रे-क्षत्रियधर्मसूत्रे रचली. 'रामायणा'च्या १४६३ ओव्यांमध्ये सुंदरकांड आणि युद्धकांड यांमध्ये श्रीरामांच्या, श्रीहनुमंतांच्या आणि कपिवीरांच्या शौर्याचे प्रत्ययकारी वर्णन श्रीरामदासांनी केले. 'सोडविल्या देवकोडी । सर्वही शक्तिच्या बळे ।। समस्तांमध्ये (इतर देवतासंबंधीच्या क्षत्रियधर्मी कथांमध्ये) श्रेष्ठ त्या राघवाची ।।... शक्ति पाहता वितंड । दैत्य मारिले उदंड । ... धर्मस्थापनेसाठी दास (श्रीहनुमंत) तो उठिला बळे ।... (श्रीकृष्णांनी) तृणासुरासी मारीले । (तुळजाभवानी) दुष्ट संहारिले मागे । ऐसे उदंड ऐकतो । परंतु रोकडे काही । मूळसामर्थ्य दाखवी ।।... रामवरदायिनी माता (तुळजाभवानी) । गर्द घेऊनि उठिली । मर्दिले पूर्विचे पापी । आनंदवनभुवनी ।।' ही समर्थवचने श्रीराम, श्रीहनुमंत, श्रीकृष्ण, तुळजाभवानी यांच्या क्षात्रतेज वर्णनातून क्षात्रधर्माचा पुरस्कार करणारी आहेत.

श्रीकृष्ण आणि कालीमाता ही श्री अरविंदांची दोन्ही दैवते क्षात्रतेजसंपन्न आहेत. बडोद्याच्या वास्तव्यात इ.स. १९०५ साली त्यांनी स्वयंस्फूर्तपणे शक्तिदेवीवर 'भवानी भारती' हे ९९ कडव्यांचे संस्कृत काव्य रचले.

'मातास्मि भो: पुत्रक भारतानां... शक्ती न यान पुत्र विधिर्विपक्ष:... कालोऽपि नो नाशयितुं यमो वा ।।' = भवानी मातेच्या आम्हां पुत्रांचा नाश ब्रह्मदेव, यम किंवा शत्रूही करू शकले नाहीत.

'रौद्रं कृतांतं मम दूतरूपं ।' = शक्ती आणि मृत्यू ही देवीचीच रूपे आहेत

'भज शक्तिमाद्याम् ।' = आद्य शक्तीची उपासना करा.

'श्रृणु मातृवाक्यम् ।' = मातेचे आवाहन श्रवण करा.

'कालीं करालीं भज चंडीं भारतमातरम्' = भारतमाता ही उग्र चंडीदेवी आहे, तिची उपासना करा.

'भो जागृतास्मि ।' = देवी जागृत आहे.

'सुप्तानि सनातनानि व्हातुं जगौ जागरणाय भीमा ।' रौद्ररूपा कालीने सुप्त भारतीयांना जागृत करण्यासाठी घोर गर्जना केली.

'द्विकोटिभास्वत् वरसूर्यभासं ज्योति: अरातिनाशि नारीशरीरम् ।।' = दोन कोटी सूर्यप्रकाशी, ज्योतिस्वरूपी शत्रुनाशी देवी.

'दयार्द्रचित्ता रुदितेन पुंसां । हंसि प्रजापीडकमस्तकेषु ।' दु:खी प्रजेच्या आक्रंदाने, अत्याचाऱ्यांची मस्तके छेदते.

'युगे युगे युद्धसे आर्यमात: ।' = आर्यमाता प्रत्येक युगात युद्ध करते.

'सद्योऽपि पश्यामि देदीप्यमानं धवलं वपुस्ते ।' आजही तुझ्या शुभ्र तेजस्वी रूपाचे दर्शन मी घेतो.

'शैला इवोत्तुंग शिखा: समूला: पतन्ति संघा: परितोसुराणाम् ।'= असुरांची उत्तुंगशिखरी सेना, देवी नष्ट करते.

'सिंधोस्तरेषु उपसकर्कशेषु देवीं अपश्य ।' = सागराच्या खडकाळ तटावर मी देवीला पाहिले.

'त्वं भारती राजसि भारतानाम् ।' = तू भारतीयांची भारतीदेवी म्हणून विराजमान होतेस.

'पश्यामि देवीं नगरेषु सौम्यां द्वारस्थितां

आर्यभुव: सखड्गाम् ।' = आर्यभूमीतील नगरद्वारी खड्गधारिणी देवी उपस्थित आहे.

'लक्ष्मी: पुन: समुज्ज्वला राजति भारतेषु ।' = उज्ज्वला लक्ष्मी पुन: भारतभूमीत प्रकटली आहे.

'चिरं वसार्ये हृदि भारतानाम् । = भारतीयांच्या हृदयामध्ये तू चिरकाल निवास कर.

(सौजन्य – 'भवानीभारती'– न्या. अरुण मराठे– वडोदरा)

नर्मदा तीरावरच्या एका कालीमंदिरात 'a Presence a Power' असे देवीच्या आणि शक्तिरूपाचे दर्शन श्रीअरविंदांना घडले.

अलीपूरच्या कारावासात 'I saw Vasudeva, it was Narayan' असे श्रीकृष्णदर्शनाचे वर्णन श्रीअरविंदांनी केले. 'I am in all men and I overrule their actions and their words. My protection is still with you and you shall not fear... I am in the nation and its uprising.' असे श्री अरविंदांनी ईश्वर दृष्टान्ताचे स्वातंत्र्यसूक्त आपल्या शब्दांत वर्णन केले.

'प्रतापगिरिचे ठायी आदिशक्ति विराजते ।... तुळजावराचेनि गुणे रामे रावण मारिला ।... बरे ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभवानी ।... तुझेनि सर्व बोलणे । तुझेनि सर्व चालणे । तुझेनि योगधारणे । तुझेनि राजकारणे ।।... सर्वांची शक्ती ही । आदिशक्ती म्हणोनिया ।। सर्वांची माता ही । मूळमाया म्हणोनिया ।।... आघात संकटे वारी । निवारी दुष्ट दुर्जना ।।... मुक्त केल्या देवकोडी । सर्वही शक्तिच्या बळे ।।... रामवरदायिनी माता गर्द घेऊनि उठिली । मर्दिले पूर्विचे पापी । आनंदवन भुवनी ।।... प्रत्येक्ष चालली राया । मूळमाया (भवानीमाता) समागमे ।' असे भवानीमातेच्या प्रेरणेने भविष्यकालात घडणाऱ्या, महाराष्ट्राच्या पुनरुत्थानाचे वर्णन समर्थांनी केले आहे.

श्रीसमर्थांच्या शक्तिपीठातून सबंध भारताचे मुक्तिपीठ सतराव्या शतकात निर्माण झाले. श्रीअरविंदांच्या योगपीठातून भारताचे स्वातंत्र्यपीठ विसाव्या शतकात निर्माण झाले. श्रीअरविंदांनी भारताचे स्वातंत्र्य म्हणजे त्यांच्या योगसाधनेवर ईश्वराने केलेले शिक्कामोर्तब (Divine seal) होते असे म्हटले आहे.

श्रीसमर्थांचा सर्वांगीण सामर्थ्ययोगी संग्राम होता.

श्रीअरविंदांचा सामर्थ्ययोगी योगसंग्राम होता.

लौकिक आणि आत्मिक उन्नतीच्या विवेकाला श्रीसमर्थांनी 'देहात्मयोग' हा संपूर्णपणे नवीन आणि सर्वांगपरिपूर्ण शब्द योजला. 'देहासंगे आत्मा करी । सर्वकाही ।।... हे येकावेगळे येक । करू जाता निरर्थक । उभययोगे कोणी येक । कार्य चाले ।।... येक अस्ता उदंड घडे । वेगळे पाहता काहीच न घडे । विवेक

त्रिलोकी पवाडे । देहात्मयोगे ।।... देहावाचुनि आत्मा अडे । आत्म्यावाचुनि देह पडे ।'

श्रीसमर्थांच्या या जीवनधर्मतत्त्वात, यजुर्वेदातील चिरंतन राष्ट्रजीवन धर्माचे स्वरूप प्रकट झाले आहे. यजुर्वेदातील चाळिसावा अध्याय हाच ईशावास्योपनिषद या नावाने प्रसिद्ध आहे.

जे केवळ जड पदार्थांच्या विद्यांची उपासना करतात आणि जे केवळ आत्मविद्येची उपासना करतात हे दोन्ही प्रकारचे लोक 'अंधं तम: प्र विशन्ति ।' घोर अंध:कारात प्रवेश करतात. त्यांचा सर्वविनाश होतो. दोन्ही विद्यांची जे एकाच वेळी उपासना करतात ते 'अमृतं अश्नुते ।' अमृतत्व प्राप्त करून घेतात, चिरंतन ठरतात. श्रीसमर्थांचा प्रपंच परमार्थविवेक, भौतिक चौदा विद्या–अध्यात्मविद्या विवेक, ज्ञानयोग, कर्मयोग, विवेक, व्यक्तिधर्म-राष्ट्रधर्म विवेक, सामर्थ्यसंपादन–लोकप्रबोधन विवेक, राजधर्म–महंतधर्म विवेक, बुद्धिबल–क्षत्रियबल विवेक, ग्रंथाभ्यास–समाजसेवा विवेक, शत्रुसंहार–प्रजारक्षण विवेक, शरीरसामर्थ्य–आत्मसामर्थ्य विवेक, राजधर्म–सेवकधर्म विवेक, महंतधर्म–समाजधर्म विवेक, प्रयत्न–प्रबोध विवेक, बोलिल्यासारिखे चालणे–स्वये करूनि बोलणे विवेक, वेत्रधारी–जगमित्र विवेक, महाराष्ट्र राज्य–भारतीय हिंदुराष्ट्र विवेक, देवदास–लोकदास विवेक या सर्वांचे स्वरूप त्यांच्या 'देहात्मयोग' या सिद्धांतात एकवटले आहे.

श्रीअरविंदांनी लिहिले आहे–

The task we now set before ourselves is not mechanical but moral and spiritual. We aim not at the alteration of a form of government but at building up of a nation, of that task politics is a part but only apart. We shall devote ourselves not to politics, nor to social questions alone, nor to theology or philosophy or literature or science by themselves, but we include all these in one entity which, we believe to be all important, the Dharma, the national religion which we also believe to be universal... In fact, the true aim of the nation/movement is to restore the spiritual greatness of the nation by the essential preliminary of its political regeneration.'

सर्वांगीण आणि सर्वस्पर्शी सामर्थ्ययोग महाभारतानंतर श्रीसमर्थांनीच पुरस्कारला आणि आचरला. शरीर सामर्थ्यापासून आत्मसामर्थ्यापर्यंत सगळ्या प्रकारच्या सामर्थ्यांचा उद्घोष समर्थ वाङ्मयात आढळतो. 'नाना सामर्थ्ये वाढवावी । वैराग्यबळे ।।... जितुके काही उत्तम गुण । ते समर्थाचे लक्षण ।... नाना बुद्धी शक्ताला । शिकवाव्या ।... समर्थे समर्थ करावे ।... समर्थेचि व्हावे । मुख्य पद ।।... हीनासारखे देव ते दीन जाले । जसे शक्ति ना युक्ति पोटी गळाले ।... महासंकटी सोडिले देव जेणे । प्रतापे बळे आगळा कोटिगुणे ।।... अतुल तुळणा नसे । अतुल शक्ति वीलसे ।... अगणित गणवेना शक्ति काळासी हारी । मारुतीचे बळ वर्णिता सबळ । वाचा हे विबळ होत आहे ।।'

श्रीअरविंदांनी लिहिले –

The one thing wanting, which we must strive to acquire before all others is strength–strength physical, strength mental, strength moral, but above all strength spiritual/which is the one inexhaustible and imperishable source of all the others.

*अतिधर्मात् बलं मन्ये बलाद्धर्मो प्रवर्तित: ।*
*बले प्रतिष्ठितो धर्म: धरण्यामिव जंगमम् ।। – महाभारत*

श्रीसमर्थांचे प्रमुख ग्रंथ, स्फुट प्रकरणे

१) श्रीदासबोध, २) श्रीरामायण, ३) श्रीहनुमंत स्तोत्रे, ४) राजधर्म, ५) क्षात्रधर्म, ६) सेवकधर्म, ७) अफझलभेटीपूर्वीचे सावधानता पत्र (दास. १८-६), ८) तुळजाभवानी स्तोत्रे, ९) आनंदवनभुवनी, १०) सावधता, ११) शिवछत्रपतींना पत्र,

१२) संभाजीराजांना पत्र, १३) करुणाष्टके, १४) ओवीशते, १५) जनस्वभाव गोसावी.

श्रीअरविंदांचे प्रमुख ग्रंथ–

1) On the Veda, 2) Essays on the Gita, 3) Foundations of Indian Culture, 4) Sri Aurobindo on Himself, 5) Karmayogin, 6) Bande Mataram, 7) Rebirth of India.

‘शिवसमर्थ योगामधून जसा तेजस्वी इतिहास मध्ययुगीन भारतात घडला तसा भारताच्या दुसऱ्या कोणत्याही प्रांतातील लोकांनी घडविला नाही. श्रीसमर्थ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची व्यक्तित्वे जेव्हा एकाच राष्ट्रपुरुषात एकवटतील तेव्हा भारताची पूर्ण उन्नती होईल.

–महायोगी श्रीअरविंद

"आचारशील विचारशील । दानशील धर्मशील ।
सर्वज्ञपणे सुशील । सर्वांठायी ॥"

# समर्थ रामदास आणि स्वामी विवेकानंद

***डॉ. शिरीष लिमये, पुणे ३०***

*रामकृष्ण मठ, दांडेकर पुलाजवळ,*

---

**साधू दिसती वेगळाले । परि ते स्वरूपी मिळाले ।**

समर्थ रामदास आणि स्वामी विवेकानंद यांची तुलना करणे हा या लेखाचा उद्देश नसून या दोघांचे जीवन, कार्यपद्धती आणि विचारसरणी यांमध्ये असलेले आश्चर्यकारक साम्य आपल्यासमोर मांडणे हा या लेखाचा उद्देश आहे. हे साम्य लक्षात आल्याने आपण त्यावर अधिक चिंतन करून, आपल्या आध्यात्मिक व लौकिक जीवनाला जास्त चांगला आकार देऊ शकू. या उद्देशाने हा लेख लिहिलेला आहे. समर्थ रामदास स्वामी म्हणतात–

*साधू दिसती वेगळाले । परि ते स्वरूपी मिळाले ।*
*अवघे मिळोनि येकचि जाले । देहातीत वस्तू ॥ (७.३.३१)*

या ठिकाणी समर्थांनी साधू दिसती वेगळाले असे म्हटलेले आहे. साधू असती वेगळाले असे म्हटलेले नाही. साधू हे देहाने जरी वेगवेगळे दिसत असले, त्यांनी केलेले कार्य जरी भिन्न भिन्न असले तरी त्यांनी मनाच्या ज्या अवस्थेत हे कार्य केलेले असते, ती त्यांची मनाची अवस्था मात्र एकच असते. त्यांच्या बाह्य कर्मावरून त्यांचा दर्जा ठरविणे बरोबर नाही. त्यांची अंतरस्थिती महत्त्वाची आहे. भगवंताचे अनुसंधान हे साधूचे महत्त्वाचे लक्षण असते. याच अर्थाने संत ज्ञानदेव महाराज म्हणतात–

*आत्मज्ञाने चोखडी । संत ही माझी रूपडी ॥*

आपण देहबुद्धीच्या पातळीवर जगत असल्याने आपण संतांनाही देहाच्याच पातळीवर आणून त्यांची तुलना करण्याची चूक करतो आणि आत्मानुभूतीच्या स्तरावर यातील काहीही उरत नाही हे विसरून जातो. या ठिकाणी एका गोष्टीची आठवण होते. एकदा काय झाले, राजा जनकांच्या दरबारात एक वादसभा भरलेली होती. त्या सभेत आत्मवादाचा निर्णय होणार होता. खूप ज्ञानी पंडित नानाविध शास्त्रग्रंथ घेऊन उपस्थित झाले होते. जेव्हा अष्टावक्रांनी त्या सभेत प्रवेश केला, तेव्हा आठ ठिकाणी वाकडे झालेले त्यांचे ते विद्रूप रूप पाहून सर्व पंडित हसले. अष्टावक्रांनी जनकांना शांतपणे प्रश्न केला, ''आश्चर्य आहे. आत्मतत्त्वाचा निर्णय चांभारांच्या सभेत चालला आहे.'' जनकांना त्या प्रश्नाचा रोख कळेना. ब्रह्मवृंद संतापला. पण ते सर्व शास्त्री, पंडित शब्दज्ञानी होते. त्यांची ती पोपटपंची चालू होती. अष्टावक्र म्हणाले, ''मी देहाने आठ ठिकाणी वाकडा आहे. तो माझ्या चामड्याचा गुण आहे. या पंडितांना फक्त चामडेच दिसले, आत्मतत्त्व दिसलेच नाही.'' संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात–

*या उपाधीमाजी गुप्त । चैतन्य असे सर्वमत ।*
*ते तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती ॥*

केवळ अभिव्यक्ती बदलली म्हणून संतत्व, आत्मतत्त्व

बदलत नाही. फ्रिज, हिटर, पंखा, लाऊडस्पीकर किंवा कारखान्यातील नानानिवध यंत्रसामग्री ही सर्व अभिव्यक्ती वर वर भिन्न भिन्न भासत असली तरी त्या पाठीमागील वीज हे तत्त्व शाश्वत आहे व अपरिवर्तनशील आहे. व्यक्त रूपात अतर्क्य व अचिंत्य विविधता असली तरी त्यामागील अव्यक्त तत्त्वात काहीही फरक पडत नाही. याच अर्थाने समर्थ रामदास स्वामी दासबोधात म्हणतात, साधू दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले । अवघे मिळोनि येकचि जाले । देहातीत वस्तू । (७.३.३१) तात्पर्य असे की, समर्थ आणि स्वामीजी यांच्या कार्यातील समन्वय आपणास या लेखात साधायचा आहे.

## मूळ पिंड हा निवृत्तिवादीच

संतांचा मूळ पिंड हा निवृत्तिवादीच असतो. म्हणून समर्थ रामदास आणि स्वामी विवेकानंद यांच्या कार्यात जरी खूप रजोगुण दिसत असला तरी त्यांचा मूळ पिंड हा निवृत्तिवादीच होता. समर्थांनी आपल्या जीवनात हजारो मठ स्थापन केले किंवा स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण मठ मिशनची स्थापना केली. हे त्यांचे जीवनकार्य जरी रजोगुणात्मक असले, तरी त्या दोघांचा मूळ पिंड हा निवृत्तिवादीच होता. या संदर्भात दोन महत्त्वाच्या घटना पाहू.

स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील एक प्रसंग आहे. स्वामीजींचे एक व्याख्यान अमेरिकेत लेडीज क्लबमध्ये ठेवलेले होते. स्वामीजी ठरल्याप्रमाणे सभास्थानी पोहोचले. पण त्यांना सांगण्यात आले की, सभेला अजून अवकाश आहे. तेव्हा कार्यक्रमाच्या आयोजकांनी स्वामीजींना व्यासपीठाला जोडून असलेल्या एका खोलीत बसायला सांगितले. त्यानुसार स्वामीजी अर्धातास त्या खोलीमध्ये एकटेच बसले. सभेची वेळ झाली तेव्हा जोसेफाईन मॅंक्लिऑंड व अन्य भगिनींनी स्वामीजींना व्यासपीठावर येण्याची विनंती केली. त्या खोलीत एक आरसा होता. स्वामीजी व्यासपीठाकडे निघाले. जाताना त्यांनी तो आरसा पाहिला. दोन-तीन वेळा ते माघारी फिरले आणि त्यांनी आपल्या चेहऱ्यावरून हात फिरविला. डोक्यावरील फेटा आणि स्वत:चा पोशाख नीट तपासून पाहिला. त्या भगिनींना स्वामीजींच्या या कृतीचे आश्चर्य वाटले. एखाद्या संन्याश्याने स्वत:च्या पोशाखाबाबत इतके चोखंदळ कशासाठी राहावे असे त्यांना वाटले. त्यांनी स्वामीजींना या कृतीचे कारण विचारले. स्वामीजी म्हणाले, ''अर्धा तास मी एकटा होतो. या काळात माझे देहभान हरपले होते. मी पूर्ण ब्रह्मभावात बुडून गेलो होतो. आता आरशातील माझ्या प्रतिमेला मी वारंवार बजावत होतो की, तू ब्रह्म नाहीस. तू नरेंद्रनाथ आहेस. तू देह आहेस, तू मन आहेस, स्वत:ला पुन्हा शब्दांच्या जगात जाणण्याचा मी प्रयत्न करीत होतो.''

या कथेवरून सारे संत लौकिक कर्मे कोणत्या मन:स्थितीत करीत असतील याची कल्पना येते. म्हणून समर्थांच्या अंत:स्थितीचे वर्णन करताना स्वामी विवेकानंद म्हणतात, ''समर्थ रामदास जेव्हा लोकांमध्ये वावरत तेव्हा प्रपंचातील सामान्य गोष्टी कशा नीट कराव्यात याची चर्चा करीत. पण नंतर ते गुहेत किंवा घळीत जात. त्यावेळी त्यांचे मन पुनश्च त्या रामरायांच्या अनुसंधानात बुडून जाई. व्यावहारिक जगतातल्या कर्मांचे ठसे त्यांच्यावर उमटत नसत.''

याचा अर्थ असा की, प्रवृत्ती किंवा निवृत्ती ही बाह्य कर्मावरून ठरत नसते तर अंत:स्थितीवरून ठरत असते. त्या दृष्टीने समर्थ रामदास आणि स्वामीजी या दोघांचा मूळ पिंड निवृत्तिवादीच होता हे आपण लक्षात घ्यायला हवे. या बाबतीत दोघांच्या चरित्रातील एक समान मुद्दा आपण विचारात घेतला पाहिजे आणि तो म्हणजे, या दोन्हीही महापुरुषांनी आपापल्या सद्‌गुरूंच्या आज्ञेवरून लौकिक कार्य केलेले आहे. त्यांची ती मुळात इच्छा नव्हती. समर्थांनी बाराव्या वर्षी लग्नमंडपातून पलायन केल्यावर नाशिकजवळ टाकळीला बारा वर्षे (इ.स. १६२० ते १६३२) तपश्चर्या केली आहे. या बारा

वर्षांच्या काळात त्यांनी स्वत:ला समाजापासून पूर्ण अलिप्त ठेवलेले होते. नंतर भारत भ्रमणासाठी बाहेर पडल्यावर सर्वप्रथम ते हिमालयात आले. तेथील परिसर पाहून ते मुग्ध झाले. तपश्चर्या केली. त्यांचे मन आत्मबोधावर इतके आरूढ झाले की त्यांना शरीर ही उपाधी वाटू लागली. या उपाधीचा त्याग करून आपण आपले मन आता आत्मबोधात विलीन करावे असे वाटून त्यांनी देहत्यागाचा विचार केला. भगवंताचे दर्शन झाले. आत्मसाक्षात्कार झाला. आता जीवन कशासाठी आणि कोणासाठी जगायचे हा प्रश्न त्यांच्या मनात उपस्थित झाला. याचा अर्थ सामाजिक कामाची स्पृहा त्यांच्या मनात नव्हती. देहविसर्जन करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कड्यावरून उडी मारताच श्री रामचंद्रांनी त्यांना झेलले व सांगितले–

*तुम्हासी जगदोद्धार करणे आहे । तुमची तनु ते आमची तनु पाहे ।*
*दोन तपे रक्षिली काया हे । धर्मसंस्थापनेसाठी ।।*
*केवळ वैराग्य तीव्रतर केले । अन्नवस्त्र विसर्जित भले ।*
*आता लोक पीडा पावतील दुष्काळे । का जे तुम्ही ईश्वरतनु म्हणोनिया ।।*
*समस्त देवांसी उपवास पडिले । समस्त भूदेव वस्त्रहीन जाले ।।*
*समस्त जीव दारिद्रे पीडिले । तुम्ही अन्न-वस्त्र-भूषणे धरावी ।।*
*(समर्थ प्रताप)*

याचा अर्थ रामरायांच्या आज्ञेवरून समर्थांनी पुढे भारत भ्रमण, मठांचे संघटन, धर्मसंस्थापना, राजकारण, समाजकारण आदी कार्यभाग केलेला आहे. ती त्यांची व्यक्तिगत ऊर्मी नव्हती, तर सद्‌गुरूंची आज्ञा होती. अगदी हाच मनोभाव स्वामी विवेकानंदांचाही होता. स्वामीजींनी १८८० ते १८९६ या काळात भगवान श्री रामकृष्णांच्या सहवासात कठोर साधना केली. नानाविध ग्रंथांचा अभ्यास केला. पण या काळात समाजसेवा किंवा राष्ट्रभक्ती यांचा विचार त्यांच्या मनाला शिवला नाही. पुढे रामकृष्णांच्याजवळ निर्विकल्प समाधी मागावयास गेले तेव्हा रामकृष्ण म्हणाले, ''नरेंद्रा, तू किती रे स्वार्थी, कसा वटवृक्षासारखा मोठा होशील, सर्वत्र पसरशील व अनेकांना तुझ्या मार्गदर्शनाचा लाभ देशील.'' तेव्हा स्वामीजी म्हणाले, ''नाही. मला निर्विकल्प समाधीचा लाभ हवा आहे. यातले मला काही नको. मला ते जमणार नाही.'' तेव्हा श्री रामकृष्ण म्हणाले, ''तू नाही, तुझी हाडे करतील. जगन्माता तुझ्याकडून करून घेईल आणि हे बघ, लोकांवर उपकार म्हणून नव्हे तर, शिवभावे जीवसेवा दरिद्रीनारायणाची पूजा म्हणून.'' त्या दिवशी स्वामीजी आपल्या गुरुबंधूंना म्हणाले, ''आज रामकृष्णांच्याकडून नवा प्रकाश मिळाला. शिवभावे जीवसेवा, दरिद्रीनारायणाची पूजा.'' याचा अर्थ संघटन, धर्मप्रचार, धर्मसंस्थापना हे कार्यसुद्धा स्वामीजींनी केले ते त्यांची व्यक्तिगत ऊर्मी म्हणून नव्हे, तर त्यांच्या सद्‌गुरूंची आज्ञा म्हणून त्यांनी कार्य केले. तात्पर्य, आपले सद्‌गुरू प्रभू रामचंद्र यांच्या आज्ञेने समर्थांनी, तर रामकृष्णांच्या आज्ञेने स्वामीजींनी रजोगुणाचा स्वीकार केला व धर्मसंस्थापनेचे कार्य केले. प्रवृत्ती हे दोघांचे सासर होते तर निवृत्ती हे दोघांचे माहेर होते. आध्यात्मिक साधना म्हणजे सासरकडून माहेरकडचा प्रवास होय.

## रजोगुणावर भर

या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की, दोघेही कमालीचे निवृत्तिवादी असूनदेखील दोघांच्या शिकवणुकीत रजोगुणावर विलक्षण भर आढळतो. अधिकार तैसा करू उपदेश । साहे ओझे त्यासी तेची देऊ ।। या तुकोबांच्या उक्तीनुसार दोघांनी उपदेश करताना सामान्य माणसाचे भान ठेवले आहे. आपली निवृत्ती त्यांनी कधीही जनसामान्यांवर लादली नाही. जनसामान्यांना उपदेश करताना माणसांनी त्याच्या इच्छा निश्चितच तृप्त कराव्या असे म्हटले. मानवी मनाचा कल लक्षात घेऊनच आमच्या धर्मशास्त्रामध्ये धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांचा समावेश केला गेला आणि ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास या चार आश्रमांची रचना मांडली

गेली. यामध्ये क्रमविकास होता. प्रवृत्तीचा आधी अनुभव घ्यायचा व त्याचे व्यर्थत्व जाणून घेऊन निवृत्तीमध्ये पदार्पण करायचे अशी ही व्यवस्था होती.

समर्थ रामदास आणि स्वामी विवेकानंद यांनी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत भारतप्रवास केला व देशाची शोचनीय परिस्थिती पाहिली. भारत हा तमोगुणाने ग्रस्त झाला आहे, सत्त्वगुणाच्या नावाखाली देशात चक्क तमोगुणाची जोपासना होते आहे हे दोघांनी अचूक हेरले. भारत वेदान्ताचा वा निवृत्तिवादाचा अधिकारी नसून कर्म-मार्गाचा, रजोगुणाचा अधिकारी आहे हे या दोघांनी लक्षात घेतले. समर्थांनी प्रश्नच विचारला,

*अन्न पाहिजे आपणाला । अन्न पाहिजे स्त्रियेला ।*
*अन्न पाहिजे लेकुराला ।*
*मग कष्ट करोनि मेळवावे । का जोगी होउन जावे ॥*
*द्रव्य पाहिजे लग्नाला । द्रव्य पाहिजे घराला ॥*
*द्रव्य पाहिजे प्रपंचाला ।*
*मग कष्ट करोनि मेळवावे । का जोगी होउन जावे ॥*
*उदंड लागते लेकुरासी । उदंड लागते स्त्रियेसी ॥*
*मग कष्ट करोनि मेळवावे । का जोगी होउन जावे ॥ (स्फुट कविता)*

अगदी हाच प्रश्न स्वामीजी विचारतात :

''...ब्रह्म सत्य आहे आणि जग मिथ्या आहे अशी या देशातील दहा लाख लोकांची श्रद्धा आहे. त्याची शिक्षा बाकीच्या एकोणतीस कोटी नव्वद लाख लोकांना काय म्हणून द्यायची. त्यांना भोगवादी जीवन जगू द्या. त्यांना त्यांच्या इच्छा तृप्त करून घेऊ द्या आणि पददलित व गोरगरीब लोकांच्या बाबतीत तर मी असे म्हणेन की, त्यांनी प्रयत्नपूर्वक विलासाच्या वस्तू प्राप्त करून घ्याव्यात व सर्व सुखांचा आस्वाद घ्यावा. त्याशिवाय त्यांना निवृत्ती सांगणे म्हणजे मूर्खपणा ठरेल. सारा भारत तमोगुणाने ग्रस्त झाला आहे. आपल्याला आज रजोगुणाची गरज आहे. रजोगुणातून गेल्याशिवाय आपल्याला सत्त्व-गुणात प्रवेश नाही.'' समर्थ व स्वामीजी यांनी लोकांच्या या दांभिक प्रवृत्तीवर आसूड मारले व त्यांना धर्माची यथार्थ शिकवण सांगितली. तमोगुणी माणसाच्या दृष्टीने रजोगुण हाच धर्म ठरतो व त्या दृष्टीने दोघांनी भारताला राजसिक उपदेश प्रदान केला.

आज दुर्दैवाने संतांची ही शिकवण नीट लक्षात घेतली नाही व वैराग्याच्या नावाखाली विपन्नतेची, अहिंसेच्या नावाखाली भीतीची, त्यागाच्या नावाखाली दुबळेपणाची, सहिष्णुतेच्या नावाखाली लाचारीची, प्रेमाच्या नावाखाली मायेची जोपासना करीत राहिलो. आम्हाला तुकोबांची विरक्ती प्राप्त झाली नाही. मात्र त्यांच्या नावाखाली आमची सांसारिक हेळसांड करून घेतली.

स्वामी विवेकानंद म्हणतात– ''...अहिंसा परमो धर्म: असल्या गोंडस सबबींवर अर्जुन युद्धपराङ्मुख होताच श्रीकृष्णांनी 'क्लैब', 'दांभिक' असे संबोधून त्याची निर्भत्सना केल्याचे वर्णन आहे. आम्ही सर्वांनीच शिकावा असा हा एक प्रमुख व महत्त्वाचा धडा आहे की, प्रत्येक बाबतीतील दोन्ही विरुद्ध टोके दिसावयास अगदी सारखी असतात. आत्यंतिक 'आस्ति' व आत्यंतिक 'नास्ति' या दोन्ही गोष्टी नेहमीच सारख्याच भासत असतात. प्रकाशकंपने अत्यंत मंद अवस्थेत आपल्या दृष्टीस गोचर होत नसतात, अति द्रुत कंपनांचीही तीच गत. ध्वनीचेही असेच. अति क्षीण वा मृदू असल्यास तो ऐकू येत नाही. प्रतिकार व अप्रतिकार यामध्येही अशाच स्वरूपाचा फरक आहे. एकजण अन्यायाचा कसलाच प्रतिकार करीत नाही–तो दुर्बल असतो. दुसऱ्या एखाद्याला पक्की खात्री असते. मनात आणल्यास तो जबरदस्त तडाखा लगावू शकेल आणि तरीही तो तसे करीत नाही. इतकेच नव्हेतर आपल्या शत्रूला आशीर्वाद देतो. जी व्यक्ती दुबळेपणामुळे प्रतिकार करीत नाही तिला पाप लागते... याउलट जर त्या दुसऱ्या व्यक्तीने प्रतिकार केला तर तिनेदेखील पाप केल्यासारखे होईल...

एकदा स्वदेशात माझी एका परिचित इसमाशी गाठ पडली. स्वारी पराकाष्ठेची निर्बुद्ध नि आळशांचा राजा असल्याचे मला आधीपासूनच ठाऊक होते. माझ्याशी

भेट होताच राजेश्रींनी पृच्छा केली, ''ब्रह्मज्ञानाच्या लाभासाठी मी काय करू? कशाने मला मुक्ती लाभेल?'' मी त्याला विचारले, ''तू खोटे बोलू शकतोस काय?'' तो ''नाही'' म्हणाला. त्यावर मी म्हणालो, ''तर मग तुला खोटे बोलणे शिकावे लागेल. एखाद्या पशूसारखे किंवा लाकडाच्या ठोकळ्यासारखे असण्यापेक्षा खोटे बोलणे चांगले. तू निष्क्रिय आहेस. पण अर्थातच सर्वकर्मातीत, शांत, गंभीर अशी जी सर्वश्रेष्ठ अवस्था असते ती तुला लाभलेली नाही, हे तर नक्कीच. एखादे दुष्कर्मही तू करू शकणार नाहीस, इतका तू जड प्रवृत्तीचा आहेस.'' अर्थात मी हे ज्या माणसाविषयी बोलत आहे त्याच्या इतके तामसिक प्रवृत्तीचे लोक साधारणत: आढळत नाहीत आणि मी थट्टा करीत होतो. त्याचा उपहास करीत होतो हे तितकेच खरे. पण माझ्या म्हणण्याचा अभिप्राय मात्र हाच होता की, संपूर्ण निष्क्रिय अवस्था वा शांत भाव प्राप्त करून घ्यावयाचा असल्यास माणसाला कर्मशीलतेमधूनच जावे लागेल.''

आजही आपण पाहातो की, कर्माची उपेक्षा आपल्या देशात फार घडते आहे. अनेक सरकारी कचेऱ्यांमध्ये कामे होत नाहीत. लाल फितीत अनेक कामे अडकून पडत आहेत. आज उच्च राहणीमानाच्या चुकीच्या कल्पना जनमानसात खोलवर रुजल्या आहेत. कमीत कमी काम व जास्तीत जास्त पगार ही कल्पना जनमानसात विशेषत: तरुणांत रूढ झाली आहे. कर्म करायला नको, ही भारतीयांची तमोगुणी वृत्ती औद्योगिक क्षेत्रात संपांच्या रूपाने पाहायला मिळते. सर्वच संप अन्याय्य असतात असे नाही. अनेकदा सरकारी धोरणांचेही विपरीत परिणाम दिसून येतात. पण एकंदरीतच कर्तव्याची उपेक्षा, स्वार्थ, कर्मावरील निष्ठेचा अभाव हा आमच्या सर्व क्षेत्रांत दिसून येतो. कर्तव्य हाच परमेश्वर आहे. जो माणूस कर्तव्यकर्मांची उपेक्षा करतो त्याची धार्मिकता केवळ दांभिक होय. त्यापेक्षा नास्तिकता बरी.

अगदी याच अर्थाने समर्थ रामदास स्वामींनी दासबोधात म्हटले आहे–

*आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।*
*येथे आळस करू नका । विवेकी हो ।। (१२.१.१)*
*प्रपंच सोडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला ।*
*तरी मग तया करंट्याला । परमार्थ कैचा ।। (१२.१.३)*
*साहेब कामास नाही गेला । गृहीच सुरवाडोनी बैसला ।*
*तरी साहेब कुटील तयाला । पाहाती लोक ।। (१२.१.५)*
*आळसाचे फळ रोकडे । जांभया देऊनि निद्रा पडे ।*
*सुख म्हणौन आवडे । आळसी लोका ।। (११.३.१०)*
*आळस उदास नागवणा । आळस प्रेत्न बुडवणा ।*
*आळसे करंटपणाच्या खुणा । प्रगट होती ।। (११.३.१२)*
*करंटा पडोनी उताणा । करी नानापरी कल्पना ।*
*परी ते काहीच घडेना । तैसी माया ।। (१४.१०.२)*

## विचार वीणेच्या जुळलेल्या इतर तारा

समर्थ आणि स्वामीजी यांच्या आचार व विचारांमध्ये केवळ वर दिलेल्या मुद्द्यातच सामर्थ्य आढळत नाही, तर इतरही अनेक बाबतींत कमालीचे सामर्थ्य आढळते. उदाहरणार्थ, त्या दोघांनी सांगितलेले गृहस्थाश्रमाविषयीचे विचार मिळतेजुळते होते. भारत प्रवासात त्या दोघांचे झालेले मतपरिवर्तनही खूपसे सारखेच होते. धर्म हा माणूस घडविणारा असावा, हा धर्माकडे पाहण्याचा त्या दोघांचाही दृष्टिकोन होता. यत्न तो देव जाणावा, हाच उपदेश दोघांनीही समाजाला दिला. श्रद्धा ही एक महान शक्ती आहे, परमेश्वराला आपण आपल्या कर्माद्वारे पूजले पाहिजे. समर्थांचा कार्यकर्ता व स्वामीजींचा कार्यकर्ता म्हणजे समाजापुढे ठेवलेले अध्यात्माचे चालते बोलते उदाहरण असावे, असे दोघांचेही म्हणणे होते. कार्यकर्त्यांने भाव हाच आपल्या कार्याचा आत्मा ठेवावा, हे दोघांचेही सांगणे होते. दोघांनीही क्रियाशील वेदान्त सांगितला. भारताच्या पुनरुत्थानासाठी आज आपल्याला अनेक युवकांनी समाजकार्याला वाहून दिलेले स्वार्थाचे बलिदान हवे आहे, हा विचार दोघांनीही प्रामुख्याने मांडला. जाति-

जातींमधील भेदाभेदातून निर्माण होणारे संघर्ष टाळा, हेच दोघांचे सांगणे होते. शिक्षणाने शिक्षण घेणाराचे चरित्र सुधारले पाहिजे, ह्यावर दोघांचाही भर होता. भारताच्या पुनरुत्थानाच्या कार्यात स्त्रियांना समाविष्ट करून घेणे, हे समर्थ आणि स्वामीजी यांच्या कार्यातील मौलिक साम्य म्हणावे लागेल.

समर्थ रामदास म्हणजे सतराव्या शतकातील स्वामी विवेकानंद होत आणि स्वामी विवेकानंद हे एकोणिसाव्या शतकातील समर्थ रामदास होत, हे लगेचच लक्षात येते. स्वामीजींच्या वाङ्मयातील अनेक उतारे व समर्थांच्या अनेक ओव्या यांच्यात प्रचंड साम्य आहे. संतांच्या विचारवीणेच्या तारा एकमेकांशी किती जुळलेल्या असतात याची कल्पना यावरून येते. उदाहरणासाठी काही वाक्येच पाहू –

| स्वामीजी | समर्थ |
|---|---|
| १) "समाजाला कोणी सर्व दृष्टींनी संतुष्ट ठेवील असे आजवर कधी झाले नाही." | १) सकळ लोक राजी राखे । कठीण आहे । |
| २) "नेहमी सावध राहा. थोडासुद्धा भोंगळपणा नको." | २) अखंड सावधान असावे । दुश्चित्त कदापि नसावे । |
| ३) "असत्य असेल ते कटाक्षाने टाळा. सत्याची कास मात्र कोणत्याही परिस्थितीत सोडू नका." | ३) बोलिला बोल विसरो नये । प्रसंगी सामर्थ्य चुको नये । |
| ४) "काम करण्याची काटेकोर पद्धत शिका. येथे मैत्री किंवा भीड उपयोगाची नाही." | ४) भिडेने वेव्हार निवडेना । भिडेने सिद्धान्त कळेना । भिडेने देव आकळेना । अंतर्यामी ।। |
| ५) "संघटनेत तुम्ही एकापेक्षा दुसऱ्यावर अधिक प्रेम दाखवले की, निश्चित समजून चला की तुम्ही भविष्यकालीन कटकटीचे बीजारोपण करीत आहात." | ५) येकांची पाठी राखणे । येकांस देखो न सकणे । ऐसी नव्हेत की लक्षणे । चातुर्याची ।। |
| ६) "प्रत्येकाचे दोष सहन करा. कुणाबद्दल वाईट-साईट बोलू नका व ऐकूही नका." | ६) दोष देखोनी झाकावे । अवगुण अखंड न बोलावे । |
| ७) "कोणतेही कार्य सुरू करण्यापूर्वी श्री रामकृष्णांची प्रार्थना करा. ते तुम्हाल योग्य तो मार्ग निश्चित दाखवतील." | ७) देवाच्या इच्छेने वर्तावे । देव करील ते मानावे । तरीच मग स्वभावे, कृपाळू देव ।। |
| ८) "शरीर नष्ट होणारच यात संशय नाही, मग ते आळसात गंजवण्यापेक्षा झिजवून नष्ट होऊ द्या." | ८) मरणहाक तो चुकेना । देह वाचविता वाचेना । विवेकी होऊन समाजाना । काय करावे ।। |
| ९) "मला अशी एक यंत्रणा उभी करायची आहे, तिच्या द्वारे धर्मप्रचाराचे कार्य माझ्या पश्चातही चालू राहील." | ९) आपण अवचित मरोन जावे । मग हरीभजन कोण करावे । या कारणे हरिभजनास लावावे । बहुत लोक ।। |

समर्थ आणि स्वामीजी दोघेही ब्रह्मचारी होते. दोघांनी भारतभ्रमण केले. दोघांनी समाजाभिमुख अध्यात्म सांगितले. दोघांनी युवकांना संघटित केले. दोघांनीही मठस्थापना केली. दोघांनी देहदेखील सारखाच ठेवला.

समर्थांनी आपण माघ वद्य नवमीस जाणार याची पूर्वसूचना शिष्यांना दिली होती. स्वामीजींनीदेखील देहत्यागापूर्वी पंचांग मागून घेतले होते व ४ जुलै या तारखेवर खूण केली होती. गडावरील मठाजवळची खोलगट जागा समर्थांनी आपल्या अग्निसंस्कारासाठी सूचित केली होती. स्वामीजींनीदेखील बेलुड मठातील खोलगट जागा आपला अग्निसंस्कार करताना वापरावी असे सूचित केले होते. दोघेही जाताना जीवन कृतार्थ झाले याच्या आनंदात होते. समर्थांनी गडावरील शेजघरातल्या पलंगावर तर स्वामीजींनी त्यांच्या शेजघरातील पलंगावर देह ठेवला. दोघांनी नामस्मरण करीत असताना देह ठेवला. अंतसमयी दोघांच्याही हाती जपमाळ होती.

दोघेही गेले... पण अजूनही आहेत...

जाताना समर्थांनी सांगितले –

*माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंत:करणी ।*
*परि मी आहे जगज्जीवनी । निरंतर ।।*
*आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वत:सिद्ध ।*
*असता न करावा खेद । भक्तजनी ।।*

जाताना स्वामीजी म्हणाले –
''विवेकानंद ही व्यक्ती गेली
तरी विवेकानंद हा विचार शिल्लक राहील.

*पुढे अनेक विवेकानंद निर्माण होतील.''*
*जय रामकृष्ण*
*जय विवेकानंद*
*जयजय रघुवीर समर्थ*

**संदर्भ :**

''समर्थ रामदास आणि स्वामी विवेकानंद,'' सुनील चिंचोळकर, विवेकानंद केंद्राचे प्रकाशन, (१९ एप्रिल २००७) ७ वी आवृत्ती.

# १७ व्या शतकातील "समर्थ रामदास, जॉन मिल्टन आणि लॉक"

**प्रा. डॉ. वामन वासुदेव गोगटे**

*'समर्थकृपा', वारणाली रस्ता, विश्रामबाग सांगली -४१६ ४१५,*

'सतरावे शतक' हा मानवी इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे, असे समजले जाते. युरोपीय-पाश्चिमात्य देशांचा इतिहास पाहाता प्रबोधन युगातील एका चैतन्यमय, गतिमान, सळसळत्या अन् उत्साहपूर्ण अशा वातावरणाचा अनुभव अनेक देश घेत होते. धर्मसुधारणेबरोबरच मानवतावादाची ध्वजा फडकण्याची लक्षणे दिसत होती. बौद्धिक चळवळीमुळे धर्मसंस्था आणि विद्यापीठे यातून ज्ञान-मुक्त होत होते. ऐहिकता, आदिभौतिकता आदी बाबींना जीवनात महत्त्वाचे स्थान मिळू लागले होते. 'अनुभव' हे ज्ञानाचे उगमस्थान आहे व त्या आधारे ज्ञानप्राप्ती होऊ शकते, हा नियम हळूहळू समाजमान्य होत होता. विज्ञानाच्या माध्यमातून निसर्गातील विविध कोडी उलगडण्याच्या खटाटोपाला प्रारंभ झालाच होता. त्याचबरोबर या सर्व निसर्ग-कोड्यांचे, निसर्ग-चमत्काराचे बुद्धीच्या पातळीवरून स्पष्टीकरण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही तेवढ्याच गतीने पुढे सरकत होते. या सर्व भौतिक सुधारणांचा, बौद्धिक चळवळींचा परिणाम प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे तत्कालीन शिक्षण व्यवस्थेवरही होऊ लागला होता. कॉमेनियस (इ.१५९२-१६७१), जॉन मिल्टन (१६०८-१६७४), रॅटिक (इ.१५७१-१६३५), ऑगस्ट फ्रँके (१६६३-१७२७), लॉक (इ.स.१६३२-१७०४) आदी अनेक शिक्षणतज्ज्ञ याच काळात होऊन गेले. मिल्टनचे ट्रॅक्टेट ऑफ एज्युकेशन (इ.१६४४), लॉकचे थॉट्स ऑन एज्युकेशन (इ.१६९३) इ. शैक्षणिक ग्रंथनिर्मिती याच शतकातील होती. शिक्षणाचे तत्त्वज्ञान आणि शिक्षणाची भूमिका या ग्रंथांतून संबंधित तज्ज्ञांनी मांडली. आणखी एक वैशिष्ट्य या शतकातील म्हणून जाणवते. अनेक शैक्षणिक संस्थांना औपचारिकरीत्या प्रारंभ याच काळात झाला. हार्वर्ड विद्यापीठाची स्थापना इ.१६३६ मधील तर नॅचरल सायन्स असोसिएशनची स्थापना इ.१६१९ मधील होती. या बौद्धिक-ऐहिक-आदिभौतिक चळवळीतही 'धर्म' स्थान हे अढळ, अचल आहे. हे पुन:पुन्हा स्पष्ट व्हावे म्हणून इ.स.१६०९ मध्ये सोसायटी फॉर प्रमोशन ऑफ ख्रिश्चन नॉलेज या संस्थेची स्थापना झाली. त्याचबरोबर शिक्षक-शिक्षणासाठी टीचर्स सेमिनार्स इ.१६०७ मध्ये स्थापन झाली. अशाप्रकारे ईश्वरविज्ञान आणि निसर्गविज्ञान या दोन्ही शास्त्र अध्ययनाला वेगवेगळ्या माध्यमांतून गती मिळाली. ग्रीक-लॅटिन या अभिजात भाषांच्या वर्चस्वाला थोडे थोडे हादरे बसण्यास प्रारंभ झाला होता. फ्रेंच भाषेला सर्व प्रकारची मान्यता होती, पण जर्मन, इंग्रजी भाषांचेही स्थान बळकट होण्याची चिन्हे दिसत होती.

हे जसे पाश्चिमात्य देशात घडत होते तसेच भारतासारख्या विशाल खंडप्राय देशात थोड्या वेगळ्या

प्रकारे घडत होते. भक्तिमार्गाच्या व्यापक चळवळीतून अनौपचारिक शिक्षणव्यवस्थेला एक विलक्षण गती प्राप्त झाली होती. सुप्रसिद्ध विचारवंत गं. बा. सरदार लिहितात, ''ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्राला तत्त्वज्ञान दिले. नामदेवांनी भक्तीची पताका फडकवली. एकनाथांनी तत्त्व आणि तपशील, विचार आणि आचार यांचा मिलाफ घडवून आणला. ज्ञानाशिवाय भक्तीला डोळसपणा नाही. आचाराशिवाय तिच्यातील जडता कमी होत नाही. परंतु या तिन्ही प्रवृत्ती एकवटून त्यांची सामाजिक नीतिमत्तेत परिणती झाल्याशिवाय मानवी जीवनाला पूर्णता नाही. म्हणून तुकारामांनी आपल्या अभंगातून समाजकंटकांची यथोचित संभावना करून चिरंतन नीतिमूल्यांची जोपासना केली आणि ज्ञानेश्वरप्रणित भागवत धर्माच्या देवालयावर कळस चढविला.''

संत तुलसीदासांनी उत्तरेकडे, संत बसवेश्वरांनी दक्षिणेकडे आणि पूर्वेकडे वैष्णव चळवळीने जे धार्मिक-सामाजिक-सांस्कृतिक उद्बोधन केले त्यामुळे भारतवासींचे 'भारतीयत्व' टिकले. समर्थ रामदासांनी सतराव्या शतकातच सामाजिक-सांस्कृतिक चळवळीला एक वेगळे परिमाण दिले. स्वत: वेगळी वाट शोधलीच; पण जीवनाचा सर्वांगीण साधकबाधक विचार करून ऐहिकतेलाही प्राधान्य देऊन पुरुषार्थ जागविला-वाढविला.

१७व्या शतकात पाश्चिमात्य जगात जॉन मार्टिन लॉक या शिक्षणतज्ज्ञांनी जी कामगिरी केली त्या पार्श्वभूमीवर रामदासांसारख्या शैक्षणिक विचारवंताने जो मार्ग घालून दिला त्या सर्वांचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरेल.

पाश्चिमात्य देशात प्रबोधन (Renaissance), सुधारणा (Reformation) आणि समाजक्रांती (Revolution) अशा तीन टप्प्यांतून बदल घडून आले. प्रबोधन हा मानवतावादाचा आरंभबिंदू होता. नवी मूल्ये प्रस्थापित होण्याचा हा काळ होता असे एम. एन. रॉय यांनी म्हटले आहे. परिणामत: प्रबोधनाचा परिणाम म्हणूनच विविध वाद, विचारप्रवाह आणि विद्या-शाखा यांचा विकास होऊ लागला. हे प्रबोधन केवळ तात्त्विक पातळीवर सैद्धांतिक स्वरूपाचे न राहाता त्याला कृतिशीलतेची जोड लाभली. चर्च-धर्म परंपरेविरुद्ध बोलण्याला एक अवकाश प्राप्त झाला व या सर्व बाबींतून समाजक्रांतीसाठी पोषक वातावरण तयार होत गेले. या वातावरणात जॉन मिल्टन आणि लॉक हे शिक्षणतज्ज्ञ प्रकाशात आले.

जॉन मिल्टन हा ''पॅराडाईज लॉस्ट''- या श्रेष्ठ महाकाव्याचा लेखक म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. जॉन मिल्टन अत्यंत कडवा धर्मनिष्ठ (Puritan) म्हणून ओळखला जातो. तरीसुद्धा लेखनस्वातंत्र्य मानणारा हा विचारवंत आहे. तत्कालीन समाजात असलेली धर्मप्रचार यंत्रणा यावरही त्याने अत्यंत कठोर टीका केली आहे. ऐन तारुण्यात एक निवासी शाळा चालू केली अन् आपल्या शैक्षणिक प्रयोगांना प्रारंभ केला. शिक्षण आणि जीवन व्यवहार यात एक सुसंगती असावी. तसेच भावी आयुष्यात चांगली कर्तव्ये पार पाडता यावीत यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये विद्यार्थी जीवनात संपादन करावीत, याबाबत मिल्टन आग्रही होता. आपल्या मार्गदर्शकासमवेत विविध ठिकाणी प्रवास करणे किंवा परगावच्या निवासी शाळेत प्रवेश घेणे या गोष्टी महत्त्वाच्या समजतो. 'सामाजिक वास्तवता' यावर अधिक भर दिला पाहिजे, असे मिल्टन म्हणतो. त्याकाळी जी शिक्षणव्यवस्था अमलात आली होती त्याबाबत कठोर टीका मिल्टनने केली आहे. भाषा शिकताना व्याकरणावर दिला गेलेला भर कंटाळवाणा, निरर्थक, हेतुशून्य आहे. एवढेच नव्हे तर अशा पद्धतीमुळे शिकण्याचा, शाळेचा द्वेष, निंदा हे विद्यार्थी करतील अशी भीती त्याला वाटते. निरुपयोगी अशा ग्रीक, लॅटिन भाषेसाठी आयुष्यातील ७-८ वर्षे वाया घालवणे हे फार दुर्दैवी आहे. विद्यार्थ्यांची बुद्धी निरर्थक पाठांतर, रटाळ-कंटाळवाणे वाचन, निबंधलेखन यासाठी का वापरली जाते, असे विचारून शिक्षणव्यवस्थेला हा कंलक आहे, असे प्रतिपादन केले आहे. कल्पनाशक्तीवर भर दिला गेला पाहिजे, असेही त्याने

म्हटले आहे.

अध्ययनाचा अंतिम हेतू काय असला पाहिजे याबाबत मिल्टन म्हणतो, "To repair the ruins of our first parents by regaining to know God aright."

(देवाला जाणून घेण्यासंबंधी आमच्या पूर्वसुरींनी ज्या उणिवा, चुका केल्या आहेत... त्या दुरुस्त करणे हाच आमच्या अध्ययनाचा हेतू असला पाहिजे.)

तसेच शिक्षणाची व्याख्याही पुढील शब्दांत केली आहे.

I call therefore a complete and generous education that which fits a man to perform justly, skillfuly and magna nimausly all the offices both private and public of peace and war.

युद्धात आणि शांततेच्याही काळात ज्यायोगे सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनात आम्हाला आमची जबाबदारी सहजपणाने, कौशल्याने आणि व्यापक, उदार विचाराने पार पाडता येईल... त्यालाच परिपूर्ण निर्दोष शिक्षण म्हटले पाहिजे.

मिल्टनने आपल्या शैक्षणिक विचाराच्या प्रसारासाठी 'ॲकॅडमी' ही संकल्पना मांडली. साधारणत: दीडशे विद्यार्थ्यांची (वय १२ ते २१) वसतिगृहयुक्त शाळा, त्यासाठी मोठे मैदान आणि भव्य बिल्डिंग याचे रेखाटनही त्याने मांडले. मिल्टनने ज्या अभ्यासकाची रचना केली होती, ती मात्र अधिक व्यापक अशा प्रकारची होती.

मानवतावादी शिक्षण देताना लॅटिन आणि ग्रीक या भाषांचे शिक्षण द्यावे, असा त्याचा आग्रह होता. निसर्गाचे ज्ञान मिळाले पाहिजे, तसेच 'शेती' सारखे विषय लॅटिन भाषेतून, तर भूगोल, इतिहास, वैद्यक आदी विषय ग्रीक भाषेतून शिकविले पाहिजेत; त्याशिवाय गणित, विज्ञान हे विषयही टाळून चालणार नाहीत. अशा प्रकारे अतिविस्तृत, अतिव्यापक अशा अभ्यासक्रमाची मांडणी त्याने केली होती.

मिल्टनच्या शैक्षणिक अभ्यासक्रमांचे स्वरूप अतिव्यापक असले, तरी त्याने ॲकॅडमीचा जो विचार मांडला त्याचा स्वीकार इंग्लंड व अमेरिकेतही केला गेला. धर्मप्रचारासाठी अशा ॲकॅडमीज्‌ची स्थापना केली गेली. संकुचित, पोथीनिष्ठ मानवतावाद-तत्कालीन युरोपमध्ये प्रचलित होता. त्याला धक्का देण्याचे काम मिल्टनने केले. संपूर्ण युरोपमध्ये फ्रेंच भाषेला मोठे स्थान प्राप्त झाले होते. जगातील अन्य देशांशी संपर्क साधण्यासाठी फ्रेंच भाषाच महत्त्वपूर्ण मानली जात असे. फ्रान्समधील चालीरीती, रुढी-परंपरा या सर्वांना एक झळाळी प्राप्त झालेली होती. फ्रेंच भाषा आणि फ्रान्समधील संस्कृती हे सर्व एका मोठ्या अपवादात्मक अशा सन्मानार्थक उच्च स्थानावर विराजमान झाले होते, पण त्यासाठी त्यांनी मानवतावादी तत्त्वज्ञानाला, विचारसरणीला हद्दपार केले होते. लोकांच्या गुलामीद्वारे फ्रान्स अधिक श्रीमंत व मुजोर होत होता. धर्मसंस्थेला आणि राजसंस्थेला विशेष अधिकार प्राप्त झाल्यामुळे फ्रान्स श्रेष्ठ ठरत होता. इंग्लंडमध्येही ऑर्थोडॉक्स चर्चचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी वैयक्तिक स्वातंत्र्यावर फार मोठी बंधने आणली होती. ढोंगी धर्मनिष्ठतेसाठी एकशे चौसष्ट गुन्ह्यांची सूची बनविली होती, की त्या सर्व गुन्ह्यांना केवळ देहदंड हीच एकमेव शिक्षा होती. फ्रान्सच्या राजप्रतिनिधीच्या कन्येचे लग्न स्पेनमध्ये इ.१७२३ मध्ये झाले. लग्न समारंभात रोषणाई मोठ्या प्रमाणात होत असे. पण या समारंभासाठी जी आतिषबाजी व रोषणाई यांचे आयोजन केले होते ते विलक्षण अमानवी, दानवी स्वरूपाचे होते. या निमित्ताने नऊ धर्मभ्रष्ट, पाखंडी लोकांना जिवंत जाळले आणि रोषणाईचे प्रदर्शन घडविले. अशाप्रकारे धर्म आणि राजकारणात जी एकाधिकारशाही रुजलेली होती, त्याला धक्का देण्याच्या कामाला प्रबोधनामुळे आणि शैक्षणिक चळवळीमुळे प्रारंभ झाला होता.

जॉन मिल्टनचा समकालीन म्हणून लॉकचे (१६३२-१७०४) नाव घेतले पाहिजे. तत्त्वज्ञ आणि विचारवंत तसेच मानवतावादी आणि वास्तववादी विचारसरणीचा

पुरस्कर्ता म्हणून लॉकचा परिचय आहे. आपले शिक्षणाबद्दलचे चिंतन Some thoughts concerning Education या ग्रंथाद्वारे व्यक्त केले आहे. जे मुळात हुशार, बुद्धिवान आहेत अशा विद्यार्थ्यांपेक्षा सामान्य विद्यार्थी, त्याचा भविष्यकाळ, त्या विद्यार्थ्याची शिक्षणाकडून अपेक्षा या बाबींना लॉकने आपल्या ग्रंथातून अधिक प्राधान्य दिले. पुस्तकी आणि बौद्धिक शिक्षणापेक्षा सद्‌गुणी चारित्र्यवान अशी पिढी निर्माण करणारे शिक्षणच अधिक महत्त्वाचे आहे, औपचारिक शालेय शिक्षणापेक्षा विद्यार्थ्यांच्या लहान-छोट्या गटांतून मार्गदर्शकाने (Tutor) दिलेले शिक्षण अधिक प्रभावी असते, अशा विचारांवर तो ठाम होता. भाषा आणि विविध सामाजिकशास्त्रे, भौतिकशास्त्रे या सर्व विषयांचा अभ्यास एकमेकांना साहाय्यभूत ठरतो, याबाबत लॉक लिहितो,

At the same time that he is learning French and Latin, a child as has been said, may also entered in Arithmatick, Geography, Chronology, History and Geometry too, for if these be taught him in French or Latin, when he begins once to understand either of these tongues, he will get a knowledge in these sciences & the languages to boot."

ज्ञान संपादनाविषयी आपल्या ग्रंथात लॉक लिहितो, All knowledge comes rather from experience and the mind is like" White paper or wax, to be moulded and fashioned as one pleases. On it ideas are painted by sensation and reflection. Knowledge is real only so far as there is conformity between our ideas and the realities of things. The conformity of anything with our knowledge, observation and the testinmony of others."

आपल्या अनुभवांद्वारे जे ज्ञान मिळते, त्याचा स्वीकार मेणाप्रमाणे मन करते. त्या अनुभवाला विशिष्ट आकार दिला जातो. आपल्या संकल्पना आणि वास्तवता हे जसे एकमेकांशी एकरूप होते, तेव्हा मन त्या ज्ञानाचा स्वीकार करते. (मनात पक्के ठसू शकते). शिक्षणप्रक्रिया ही आनंददायी झाली पाहिजे, असे लॉक वारंवार व्यक्त करतो. लॉकचा tabula-rasa हा मानसशास्त्रीय सिद्धांत प्रसिद्धच आहे. विद्यार्थ्यांचे मन हे एखाद्या मेणाच्या गोळीप्रमाणे असते. ज्याप्रकारे त्याला आकार द्याल, त्याप्रमाणे त्याच्यामध्ये शैक्षणिक बदलाची क्रिया घडू शकते.

शरीराप्रमाणे मनाचेही सामर्थ्य, शक्ती यात वाढ, प्रगती होऊ शकते. Mind, like the body grows through exercise and that the best gymnastics for reasoning is found in mathematies. Locke also advises a range of science to dispose the mind so as to be capable of any science.

शैक्षणिक प्रश्नांच्या मुळापर्यंत जाणारा, त्यावर तर्कशुद्ध पद्धतीने उत्तरे शोधणारा-मानवतावादी आणि वास्तववादी विचारसरणीशी प्रामाणिक राहाणारा लॉक याच्या शिक्षणविचारांचा परिणाम पाश्चिमात्य जगात वेगवेगळ्या प्रकारे पुढील काही दशकांत घडून आला. विविध ज्ञानशाखांचे शास्त्रीयदृष्ट्या वर्गीकरण, विश्लेषण करण्याचा प्रयत्न चालू असताना शिक्षणशास्त्र ही एक स्वतंत्र ज्ञानशाखा आहे, शिक्षणाशी संबंधित अनेक ज्ञानशाखांचे अध्ययन हे महत्त्वाचे ठरते हे लक्षात घेऊन शिक्षणशास्त्रासंबंधीच्या ग्रंथलेखनाला अधिक गती मिळाली.

सतराव्या शतकात भारतातील विविध भागांतील सामाजिक-राजकीय परिस्थिती पाश्चिमात्य देशांपेक्षा फारच वेगळ्या स्वरूपाची होती. प्रत्येक समाजाची एक सांस्कृतिक, सामाजिक मनोभूमिका असते. त्याचे सादरीकरण त्यांच्या नित्य-दैनंदिन व्यवहारातून प्रकट होत असते. मुख्यत: राजा कालस्य कारणम् या नियमाने सामाजिक आणि आर्थिक स्थिती ही राजकीय परिस्थितीवर अवलंबून असते. त्याशिवाय भारतासारख्या देशात धार्मिक परिस्थितीचेही

योगदान वेगळ्या प्रकारचे असू शकते. पाश्चिमात्य देशातून धार्मिक आणि राजकीय वर्चस्वाला हा प्रबोधनाच्या (रिनेसान्स)च्या माध्यमातून मोठा धक्का मिळाला. चर्च आणि राजसत्ता यांनी एकत्र येऊन ज्यांना पाखंडी म्हटले गेले त्यांच्या छळाचे पद्धतशीर प्रयत्न केले, व्यक्तीची प्रतिष्ठा, मानवाची सर्जनशीलता आणि इच्छा, स्वातंत्र्याची उत्कटता या सर्वांना एक प्रबोधनाच्या रूपाने फार मोठे बळ मिळाले आणि ही प्रबोधनाची चळवळ चौदाव्या शतकापासून अधिक धारदार बनली.

भारतासारख्या देशाला तत्त्वज्ञानाची, विविधतेची, सहिष्णुतेची शेकडो वर्षांची परंपरा लाभली आहे. आर्यभट्टाने पृथ्वी सूर्याभोवती विशिष्ट गतीने फिरते आहे, हे वैज्ञानिक सत्य सांगितले. आमच्या येथे प्रत्यक्ष ज्ञानसूर्य अवतरला आहे, अशा शब्दांत त्याचा गौरव केला. तर युरोपमध्ये हे सांगणाऱ्या शास्त्रज्ञाला कठोर शिक्षा भोगावी लागली... हा या दोन समाजातील, संस्कृतींतील फरक आहे. हा फरक लक्षात घेतला की विविध चळवळींचे आकलन योग्य प्रकारे करून घेता येते. युरोपमध्ये मानवतावाद, अस्तित्ववाद, वास्तववाद आदी अनेक वाद या काळात जन्माला आले. भारतातील राजकीय, सामाजिक परिस्थिती वेगळी असल्यामुळे सामाजिक चळवळी झाल्या; पण त्याचे स्वरूप पूर्णत: भिन्न होते हे समजावून घेऊन विविध संतांच्या सामाजसुधारकांच्या कामगिरीचे/योगदानाचे अध्ययन करता येऊ शकते.

समर्थ रामदास, जॉन मिल्टन आणि लॉक हे तिन्ही विचारवंत-शिक्षणतज्ज्ञ एकाच शतकातील असले तरी त्यांचा परिसर, सामाजिक वातावरण, सांस्कृतिक वातावरण, समाजरचना हे पूर्णत: भिन्न आहे. मिल्टन आणि लॉक एकाच सांस्कृतिक परंपरेतील आहेत. शिक्षणाचे स्थान, शिक्षकाची भूमिका, शैक्षणिक उद्दिष्टे या विविध बाबींमध्ये अनेक प्रकारे फरक नोंदविता येतील.

समर्थांच्या मते, ''देव निर्गुणा प्रत्यय आला । आता आपणची आपला शोध घ्यावा ।'' हे फार महत्त्वाचे आहे.

स्वत:ला शोधणे... आत्मशोध घेणे हे भारतीय परंपरेचेच वेगळेपण आहे. स्वत:ला शोधायचा हा जो खटाटोप आहे, त्यालाही एक दिशा समर्थांनी दिली आहे. 'देह-बुद्धी ते आत्म-बुद्धी करावी!'

विज्ञान, कला यांची उपासना, जोपासना आणि विकास हे देहबुद्धीमार्गे होते. जीवन समृद्ध होण्यासाठी विविध विद्या, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र यांचा अभ्यास केलाच पाहिजे. पण जीवन अधिक सुंदरतेने, कलात्मकतेने जगण्यासाठी रागज्ञान, तालज्ञान, नृत्यज्ञान, वाद्यज्ञान, साहित्य-संगीत-रागज्ञान यांचीही आवश्यकता अधोरेखित केली आहे. दासबोधात त्यांनी विविध ज्ञानशाखा आणि कला यांचा सविस्तर उल्लेख केला आहे. व्यवहारात चांगल्या प्रकारे सन्मानाने राहायचे असेल तर 'प्रपंची पाहिजे सुवर्ण'' असे आग्रहाने प्रतिपादन करणारा हा जगावेगळा संत-शिक्षणतज्ज्ञ आहे. देहबुद्धीचे अज्ञान नको असे वारंवार सुचविले आहे. पण एकूण जीवन प्रवासातील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे; अंतिम टप्पा नव्हे, असेही समर्थांनी सुचविले आहे.

*''त्यागिताची भोग, भोगिताची त्याग ।*
*ऐसा ज्ञान योग जाण बापा ।''*

शारीरिक आणि मानवी आयुष्याची मर्यादा लक्षात घेतलीच पाहिजे. योग्य वेळेला निवृत्त होणे अवघड आहे. महत्त्वाचेही आहे. शारीरिक, आर्थिक सुखोपभोग त्यांच्या मर्यादा लक्षात घेऊन अशा सुखांचा, उपभोगांचा सहजपणे त्याग करता आला पाहिजे. त्या सुखापासून सहजपणे आनंदाने दूर होता आले पाहिजे. अशा ज्या विविध बाबींचा त्याग करावा लागतो, ज्या सोडून देणे आवश्यक असते, त्यापासूनही आनंद-समाधान घेणे महत्त्वाचे आहे. समर्थांच्या मते तो एक ज्ञानयोग आहे. कुटुंबातील अधिकारापासून राजसत्तेच्या सिंहासनापर्यंत हा नियम लागू आहे. साधकाची-व्यक्तीची आत्मबुद्धी सजग, सावधान असेल, तर हा ज्ञानयोग साधू शकतो, असे समर्थांचे म्हणणे आहे. भारतीय परंपरेचे हे शहाणपण

समर्थांनी नव्याने सांगितले नाही. पण ते काळानुरूप पुन:पुन्हा सांगितले पाहिजे, ते समर्थांनी सांगितले हे महत्त्वाचे.

आत्मशोध महत्त्वाचा आहे, हे सांगताना समर्थ लिहितात,

*'शाश्वताचा शोध अंतरी असता । सर्वही पाहता निरर्थक ।*
*निरर्थक तीर्थे निरर्थक व्रते । दास म्हणे ज्ञान नाही ॥'*

समर्थांच्या बुद्धिवादाचे प्रखर तेजस्वी दर्शन या ओळींतून घडते. कर्मकांडात अडकलेला धर्म आणि परंपरा यांना धक्का द्यावाच लागतो. हा धक्का अन्य धर्मीयांना पचणारा, सहन होणारा नाही. युरोपमध्ये प्रबोधनाच्या काळात धर्मसत्तेला आव्हान मिळाले. पण धर्मसत्ता संघटितच राहिली. त्यांनी आपले कार्यक्षेत्र धर्मप्रसारासाठी निश्चित केले. प्रचारकी-यंत्रणा विकसित केली. संघटित धर्माचे स्वरूप, त्याची चौकट अधिकच पोलादी बनली. भारतीय धर्मपरंपरेत हे घडू शकले नाही. कारण धर्म आणि उपासना पद्धत याला संघटित स्वरूपच प्राप्त होऊ शकले नाही. भारतीयांची ती मानसिकता नाही.

समर्थांचे वेगळेपण, गुरुलक्षण विवेचनातून स्पष्ट होते. गुरूच्या/मार्गदर्शकाच्या सान्निध्यात विद्यार्थ्याने राहावे असे मिल्टन, लॉक म्हणतात. पण मार्गदर्शक कसा पाहिजे, त्याच्यासंबंधी काही कठोर निकष समर्थांनी तपशीलवारपणे दिले आहेत.

१) विमल शुद्ध ज्ञानोपासक, प्रबळ वैराग्ययुक्त, निर्मळ आचार अशा विविध गुणांनी युक्त व्यक्ती म्हणजे गुरू.

२) आपल्या शिष्याला ज्ञानोपासक, नित्य अध्ययन करायला लावणारा गुरू असावाच! संयम न शिकविणारा गुरू कितीही मोठा असला तरी त्याला टाकून द्यावे. त्याच्याकडे ढुंकूनसुद्धा बघू नये!

३) गुरुपण श्रेय देणारे नाही! गुरुपणामुळे बरेच काही सोसावे लागते... ती सहनशीलता गुरूच्या अंगी असावी.

पाश्चिमात्य आणि भारतीय परंपरेत ''भाषा'' विषयाबाबत एक साम्य आढळते. पाश्चिमात्य परंपरेत लॅटिन-ग्रीक या अभिजात Classical भाषांचा आग्रह या प्रबोधनाच्या काळातही काही प्रमाणात धरलेला दिसतो. तसेच भारतामध्येही संस्कृतचा आग्रह अभिजनानी धरलेला आहे. मात्र भाषेबाबत जी तीव्र प्रतिक्रिया या दोन्ही समाजांत आढळते, त्या प्रतिक्रियेचा स्वीकार दोन्ही समाजांनी वेगवेगळ्या प्रकारे केला आहे, हे लक्षात येते.

१५व्या शतकात विल्यम सांचे या धर्मोपदेशकाने बायबल इंग्रजी भाषेत रूपांतरीत केले. कारण सामान्यजनांना इंग्रजी भाषा ही ग्रीक, लॅटिन या भाषेपेक्षा अधिक चांगली समजते. या बंडखोरीबद्दल त्याला जिवंत जाळण्याची शिक्षा मिळाली. इ.१६८७ मध्ये जर्मनमधील लिपझिंग शहरात एका जर्मन-ख्रिश्चन धर्मोपदेशकाने जर्मन भाषेतून धार्मिक प्रवचन केले. त्याबद्दल त्याची अवहेलना केलीच; पण गाढवावरून त्याची धिंड काढली. मराठी भाषेसह विविध भाषांचा भारतात विकास होत असताना संतांनी प्रबोधन केले, तेच विलक्षण होते. समाजाच्या मानसिकतेचा फरक अशाही लहान-मोठ्या उदाहरणांतून दिसतो.

समर्थांनी आपल्या समाजाचे स्वरूप, स्थिती लक्षात घेऊन धर्म-मूलक विवेक वैराग्य प्रधान-प्रयत्नवादाचे जे बीजारोपण केले, त्याची नोंद इतिहासाच्या अभ्यासकांनी घेतलीच पाहिजे. शक्ती उपासनेपासून स्त्रीशक्तीपर्यंत, मानसशास्त्रापासून व्यवस्थापन शास्त्रापर्यंत एक समग्र जीवनाचे जे दर्शन घडविण्याचा प्रचंड मोठा खटाटोप समर्थांनी केला, तो पाश्चिमात्य जगाच्या पार्श्वभूमीवर समजावून घेण्याचा प्रयत्न केला, तर समर्थांचे अलौकिकत्व अधिक नजरेत भरते, हे निश्चित!

# अभ्यास मोडी कागदपत्रांचा

***अरुण मा. उमराणी***

*११०५ शनिवार पेठ, सातारा*

*भ्र. ९४२०४६३५९७*

*"कांही येक उत्कटेविण ।*
*कीर्ति कदापि नव्हे जाण ।"* (दासबोध १९-६-२४)

कै. शंकर श्रीकृष्ण देव यांनी देशभर वणवण हिंडून कागदपत्रांच्या संग्रहाचा उत्कट व्याप केला; तो धुळे येथे समर्थ-वाग्देवता मंदिरात साकारला आहे. मंदिरातील कागदपत्रांच्या संग्रहात जी बाळबोध (देवनागरी) कागदपत्रे आहेत; त्यांची अनेकविध बाडे करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून ठेवलेली आहेत. परंतु अशाप्रकारचे संकलन मोडी लिपीतील कागदपत्रांचे झालेले नाही. यापैकी काही मोडी कागदपत्रांवर शाईने क्रमांक घातलेले दिसतात, पण ते कशाचे याचा बोध होत नाही. कदाचित यातील काही कागदपत्रे पूर्वी 'रामदास-रामदासी' मासिकातून प्रसिद्ध झाली असावीत. तो अभ्यासाचा स्वतंत्र विषय आहे.

स. वा. मंदिरातील सुट्या सुट्या अशा मोडी लिपीतील कागदांची संख्या ५०००हून अधिक आहे. व्यवस्थापनाने हे कागद व्यवस्थित लावले असून, त्यांचा सारांश देवनागरीमध्ये करणेचे काम माझ्याकडे सोपविले आहे. त्याबद्दल आभारी आहे. या ५००० कागदपत्रांव्यतिरिक्त गुंडाळ्या व घड्या यामध्ये बंदिस्त मोडी कागदपत्रेही अगणित आहेत. ही सर्व कागदपत्रे सारांश करून दिल्यास अभ्यासकांना एक मोठा खजिनाच खुला होणार आहे. तूर्त या ५००० कागदपत्रांचे काम सुरू करण्यात आले असून, सुमारे २५०-३०० कागद सारांशित करण्यात आले आहेत. या कागदांतून अनेकविध विषय आले आहेत. काही वैशिष्ट्यपूर्ण कागदपत्रांची माहिती खाली देत आहे.

१) वेरुळ येथील क्षेत्रोपाध्याय वेदमूर्ती कोंडभट, विश्वनाथभट, दामोदरभट वगैरे उपनाम शेंडगे यांच्याकडील मोडी लिपीतील सुमारे १४-१५ वह्या आहेत. अत्यंत जीर्ण. कै. देवांनी यांच्याच आधारे भोसल्यांची वंशावळ उलगडून दाखविली आहे. या वह्यांमध्ये वेगवेगळ्या काळात ज्या ज्या प्रतिष्ठितांनी देवालयास भेटी दिल्या, त्यांचे लेख आहेत. त्यात "आम्ही तुम्हास तीर्थोपाध्याय म्हणून मान्यता दिली आहे व आमचे वंशीचे पुढे जे कोणी येतील तेही तुम्हास मानतील," अशा अर्थाचे मान्यता लेख आहेत. यापैकी एका वहीत सुप्रसिद्ध सेनापती संताजी घोरपडे यांचाही मान्यता लेख आहे व 'हे विनंती' ही त्यांचे स्वत:चे अक्षरातील मोडी अक्षरे आहेत.

२) छत्रपती शाहूमहाराजांनी आठवणपूर्वक चाफळकर स्वामींना इरसाल आंबे पाठविलेचा उल्लेख चाफळकरांचे पत्रात आढळतो आणि उभयतांतील जिव्हाळ्याचे संबंधावर प्रकाश पाडतो.

३) साकुर्डी येथील दीक्षित इनामदार यांचे दप्तराचा समावेश मोठ्या प्रमाणात आहे. त्यामध्ये साकुर्डी येथील कुंभार पाटील यांनी आपली पाटीलकी विकली, त्या कागदपत्रावरून पाटीलकीचे मानाचा तपशील समजतो.

चि. सावळाराम दीक्षित याचे विवाहप्रसंगी वरपक्षाने वधूचे अंगावर घालणेच्या दागिन्यांची यादीही उपलब्ध आहे. यात सोन्याचे दागिने, रुप्याचे दागिने, मोत्याचे दागिने यांची यादी वजनासह दिली आहे. यांतील कितीतरी दागिन्यांची नावेही आज आपणास माहीत नाहीत.

४) समर्थ रामदासांच्या बखरीवर व बखरकारावर टीका करणारा एक लेखही उपलब्ध झाला आहे. त्यांत लेखकाने आपले नाव नमूद केले नाही. पण तो बखरकारांचा व छ. प्रतापसिंह यांचा समकालीन दिसतो. या लेखात रंगोपंत व रेणावीकर या व्यक्तींवर टीका आहे.

५) एक पत्र सन १८६०-६१ मधील मिळून आले. हे पत्र दक्षिणेकडील एका वतनदाराने दुसऱ्या वतनदारास लिहिले आहे. अतिशय आडवळणाने, आढेवेढे घेऊन लिहिले आहे. मतितार्थ असा की, इंग्रजांना या देशातून हाकून लावणेसाठी तुमची मान्यता असेल तर, जरूर पडल्यास सैन्य उभारणेस त्यांची तयार आहे. या इसमाने पुढे काय कार्य केले हा संशोधनाचा विषय ठरतो. दक्षिणेतील उठावासंबंधाने कै. सेतुमाधवराव पगडी यांनी '१८५७ चे काही पैलू' या शीर्षकाचे पुस्तक लिहिले आहे; पण त्यात या व्यक्तीचा उल्लेख नाही.

६) समर्थ रामदासांचे उपाध्याय वेदमूर्ती रघुनाथभट यांनी काशीस जातेवेळी आपले इनाम व उपाध्येपणाची वृत्ती वेदमूर्ती बहिरवभट महाबळेश्वरकर यांना सुपूर्द केल्याचे आपणास शिवशक २९,४३ मधील आज्ञापत्रावरून समजते.

७) नागेशभट उपाध्ये हे गृहस्थ कर्जबाजारी दिसतात. यांचे नावचे कर्जरोखे आहेत. कर्जाचे परतफेडीसाठी यांनी आपली जमीन चाफळकर संस्थानिकांकडे लावली होती. त्यांच्या मुलीचे लग्न असलेने चालू सालचा वसूल त्यांना मिळावा अशी त्यांची विनंती दिसते. पुढे याच कर्जाची परतफेड पूर्ण झालेची त्यांना शंका आलेने त्यांनी खुद्द छत्रपतींकडे दाद मागितलेली दिसते आणि छत्रपती यांनी दिलेला निर्णय चाफळकरांना मान्य करावा लागला. याबाबतचा पत्रव्यवहार शके १७९९ मधील आहे.

८) चाफळ गाव श्रीराम देवस्थानास इनाम दिल्याबाबतचे रामचंद्रपंत अमात्य यांचे शिवशक २३मधील पत्रही अभ्यसनीय आहे.

९) समर्थांचे पश्चात् सज्जनगड येथील पारपत्याधिकारी दिवाकर गोसावी असता, उद्धव गोसावी त्यावर अधिकार सांगू लागले. तसेच दिवाकर यांनी नेमलेले भानजी गोसावी हेही आपला अधिकार सांगू लागले. हा वाद किल्ले सातारचे दरबारी गेला असता दिवाकर गोसावी यांचा अधिकार मान्य करणेत आला. ही माहिती शिवशक १२, १३ मधील पत्रांवरून निदर्शनास येते.

१०) डोमगाव मठाचे सखाराम गोसावी यांचे काहीतरी महत्त्वाचे काम नागेशभटमामा उपाध्ये यांच्याकडे होते. त्यासाठी त्यांनी नागेशभटांना उंब्रज येथे मुक्कामास बोलावले आहे. येण्यासाठी शपथ घातली आहे. अभ्यासाचा विषय.

११) छत्रपती शिवाजी महाराजांनी चाफळ येथील देवस्थानास दिलेल्या सनदेची नक्कल या ठिकाणी पाहावयास सापडते. या सनदेच्या मायन्यावरून शिवरायांचा समर्थाविषयीचा आदरभाव, कृतार्थता व नम्रपणा दिसून येतो.

१२) शके १७८३ मधील एक टिपण उपलब्ध झाले आहे. त्यात शास्त्रीय संगीतातील एकूण ६३ रागांची नावे, चीजा व सरगम यांची माहिती आहे.

१३) दिनांक २७-३-१९०९ चे पोस्टकार्ड, किंमत १ पैसा. बापूराव डाकतर, चाफळ यांना लिहिलेले, रामनवमीस येता येत नाही वगैरेबाबत.

१४) इंदोली येथील जोशी-कुलकर्णी यांना परसूसाठी दिलेले जागेचे दानपत्र.

अशाप्रकारे आतापर्यंत तपासलेल्या कागदपत्रांत अनेकविध विषयांवरील कागदपत्रे आढळून आली आहेत. काही नमुने वर दिलेले आहेत. ही कागदपत्रे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त आहेत. जसजशी आणखी कागदपत्रे अभ्यासली जातील, तसतसा आणखी वेगवेगळ्या विषयांचा खजिना अभ्यासकांसाठी खुला होईल.

# श्रीसमर्थ रामदास स्वामींची माता : राणुबाई यांचे मनोगत



***सौ. शुभदा देशपांडे***
*मालेगाव (नाशिक)*

पूर्वपीठिका : ''न मातुः परम्‌दैवतम'' खरंच जगात आईसारखे दैवत नाही हे त्रिवार सत्य. मंडळी, स्त्री ही वात्सल्याची मूर्ती आहे. सारे वात्सल्य प्रेम हे जणू आईमध्ये त्या परमेश्वराने भरलेले आहे. स्त्री वैभवाने मोठी झाली, राज्यपदाला का पोहोचेना तिचे चित्त आपल्या मुलांमध्येच असते. वात्सल्य कधीही कमी होत नाही. या गोष्टीची प्रचीती आपणास नेहमी येते. याच वात्सल्याने, ममतेने भारलेली श्री समर्थांची माता राणुबाई पुत्रपेमाने अशीच भारलेली होती. तिच्या पुत्रप्रेमाचे, वात्सल्याचे दर्शन आता आपल्याला होणार आहे. सावधान' शब्द ऐकून श्री समर्थ बोहोल्यावरून पळाले त्या क्षणी मातेची काय अवस्था झाली? कशी? किती विव्हळ झाली ती माता? सतत आपल्या पुत्राच्या विचारात त्या मातेला कसलेही भान कसे नसे तेच आता पाहू. चला जाऊया राणुबाईकडे (राणुबाई ध्यानमग्न आहेत, त्यांचे थोरले पुत्र गंगाधर म्हणजेच श्रेष्ठ त्यांना हाका मारतात पण त्यांचे लक्ष नाही... थोड्या वेळाने त्या भानावर येतात. मुलाच्या विरहाने रडून रडून त्यांचे डोळेही गेलेले आहेत.)

राणुबाई : कोण? कोण आहे ते? श्रेष्ठ! तुम्ही केव्हा आलात? मला कळलेही नाही, काय म्हणता? हल्ली माझे असे का होते? काय सांगू तुम्हाला श्रेष्ठ, अहो नारायण बोहोल्यावरून नजर चुकवून केव्हा कसा पळाला हे कळलेच नाही पाहा आणि त्याचा तो मुंडावळी बांधलेला सुरेख चेहरा माझ्या डोळ्यांपुढून अजूनही हालत नाही. रात्रंदिवस तुम्हां सर्वांसोबत मी वावरते खरी, पण माझे मन? मन मात्र नारायणाभोवतीच घोटाळत असते. काय करीत असेल? कुठे राहात असेल? काय खात असेल? काही काही कळत नाही पाहा आणि नुसत्या आठवणींचा सारा कल्लोळ उठतो, त्यातच मन भरकटत राहते.

राणुबाई : नाही, नाही, श्रेष्ठ मी सावधच आहे. पण तुम्हाला सांगते श्रेष्ठ, २१ पिढ्यांपासून आपल्या घरात श्रीराम व श्री सूर्यनारायणाची उपासना चालू आहे. तुमच्या पिताश्रींनी सतत दोन तपे श्री सूर्यनारायणाची उपासना केली. पोटी संतान नाही याची थोडी हुरहूर वाटायची; पण क्षणभरच आणि 'ठेविले अनंते! तैसेची रहावे!' अशा वृत्तीने, समाधानाने वैराग्यवृत्तीने हे सूर्योपासना करीत होते. मनात सुप्त इच्छा होती की देवाने आपल्याला जगविख्यात सुपुत्र द्यावा म्हणून, पण कधी त्यामुळे खंत नाही वाटली आम्हांला. बरं का श्रेष्ठ, दोन तपे सूर्योपासनेला झाली म्हणून त्यांनी माघी सप्तमीला त्याची पूर्तता करायचे ठरविले. मला अजूनही तो रथसप्तमीचा दिवस आठवतो. हे पूर्ततेच्या कार्यात मग्न होते अन् मध्यान्हाकाळी एक अत्यंत तेजस्वी ब्राह्मण अतिथी

आपल्याकडे आले. ते पाहून यांना धन्यता वाटली, कारण अतिथीसेवा हा तर गृहस्थाश्रमाचा आत्मा आहे ना! अतिथीपूजन यथासांग झाले, यांनी हात जोडून म्हटले की, ''महाराज, 'अतिथी देवो भव' '' या नात्याने आपण मला परमेश्वरच आहात; पण आपण सामान्य अतिथीप्रमाणे दिसत नाही. तेव्हा आपले मूळ स्वरूप जाणण्याची माझी इच्छा आहे.' अतिथी महाराज हसले, त्याबरोबरच अत्यंत दिव्य तेजोवलयांत त्यांच्या जागी श्री सूर्यनारायण प्रकट झाले. ह्यांनी साष्टांग दंडवत घातला. खरंच आपल्या तपाची पूर्तता झाली, संकल्प सिद्धीस गेला. ना भक्ती ना ज्ञान अशी अवस्था होऊन हे दिङ्मूढ झाले. क्षणभर काय करावे सुचेना. मग सारे पाहून सूर्यनारायण म्हणाले, ''तू खडतर तपश्चर्या करून माझी प्राप्ती करून घेतलीस. तुला तपाचे फळ द्यावे म्हणून मी आलोय तेव्हा काय हवे ते माग.'' पण वारंवार देव भक्ताच्या अंगावर काहीतरी सिद्धी टाकून भक्ताला आपल्यापासून दूर ठेवतो हे यांना चांगले ठाऊक होते म्हणून हे म्हणाले, ''भगवन, काही मिळावे म्हणून मी तपश्चर्या केली नाही. आपले दर्शन झाले यातच मला सर्व काही मिळाले. आता आपली कृपा आणि अक्षयपदाखेरीज कोणतीही इच्छा नाही.'' हे ऐकून सूर्यनारायण म्हणाले, ''तुझ्या वैराग्यवृत्तिनुरूप तू काही न मागणे अगदी योग्यच आहे. पण पत्नीला काही हवे का विचार.'' बरं का श्रेष्ठ, तुम्हाला सांगते त्यावेळी माझ्या मनात पोटी संतान नाही ते मागावे असे आले, पण क्षणभरच. दुसऱ्या क्षणी मी म्हणाले, ''माझ्या पतींनी जे मागितले त्यातच मला सर्व मिळाले आहे.'' ''पण काहीतरी मागून घ्या, मी वर दिल्याखेरीज जाणार नाही.'' असे सूर्यनारायणांनी म्हटले आणि स्त्रीस्वभावानुसार मी म्हणाले, ''महाराज मला पुत्रेच्छा आहे तरी एक परमभागवत सुपुत्र द्यावा.''

'तुम्ही मागितलेला वर तुम्हाला दिला आहे आणि ईश्वर संकल्पही तसाच आहे. तुम्हाला मज अंशेकरून एक व मारुती अंशेकरून एक असे दोन जगद्विख्यात महान भगवद्भक्त पुत्र होतील. ज्येष्ठ पुत्र प्रपंची राहून वंशधर होईल, तर कनिष्ठ पुत्र ब्रह्मचर्याचे पालन करून कृष्णाकाठी राहून जगदोद्धार करील आणि येत्या रामनवमीला तुम्हास रामाचे प्रत्यक्ष दर्शन घडेल.' असे सांगून सूर्यनारायण अंतर्धान पावले. आम्हां उभयतांच्या आनंदास पारावार उरला नाही. श्रेष्ठ, आणि त्यानंतर श्रीराम दर्शनाचा निदिध्यासच लागून राहिला होता. रामनवमीचा उत्सव सुरू झाला आणि मोठ्या अभूतपूर्व योगाने यांना श्रीरामदर्शन झाले. श्रीराम, लक्ष्मण आणि मारुतीरायाचे दर्शन झाले. श्रीरामांनी यांना परम वैराग्य, निस्सीम भक्ती व श्रीरामपदाची प्राप्ती होईल असा वर 'तथास्तु' म्हणून दिला. शिवाय श्रीराम पंचायतनाची पट्टाधीश मूर्ती देऊन म्हणाले, ''या मूर्तीची यथाविधी पूजा केलीस तर माझ्या सान्निध्याचा आनंद होईल.''

राणुबाई : हो ना श्रेष्ठ, खरंच अत्यंत आनंदाचाच काळ होता तो. त्या आनंदातच भर पडली. म्हणजे तुमचा जन्म झाला, बरं का श्रेष्ठ मी गंगामातेला नवस बोलले होते, की पुत्र झाल्यास तुझे नाव ठेवीन म्हणून तुमचे नाव गंगाधर ठेवले. मग पुढे तुम्हाला एकनाथ महाराजांच्या पायावर घातले. नाथांनी उचलून तुम्हाला पोटाशी धरले व म्हणाले, हा तुमचा मुलगा श्रीरामभक्त परायण होणार तेव्हा त्याला श्रेष्ठ म्हणावे. स्वत:स भाग्यवान समजून आम्ही तुमच्या बाललीलांमध्ये रंगून गेलो.

राणुबाई : बरं का श्रेष्ठ, असा आनंदीआनंद चालू असतानाच मला मात्र वाटू लागले की, मी सर्व जगापासून दूर नदीच्या काही रम्यशा रानावनांत राहावे. दऱ्याखोऱ्यांचे सौंदर्य डोळ्यांत भरून ठेवावे. घोड्यावर बसावे, नदीच्या पाण्यात डुंबावे, नदीच्या पाण्यात उभे राहून तपाचरण करावे, अखंड एकांतवासात नामजप करावा. हे सारे माझे जगावेगळे डोहाळे कुणास सांगावे? कसे सांगावे? काहीच कळेना आणि- आणि रामनवमीच्या दिवशी

सारा गाव श्रीरामजन्माच्या सोहळ्यात रंगला, त्याचवेळी, अगदी त्याचवेळी माझ्या नारायणाचा जन्म झाला. तुम्हाला सांगते श्रेष्ठ, नारायणाचे सारे बालपण माझ्या डोळ्यांसमोर आजही तरळते. त्याच्या एक ना अनेक खोड्या आजही आठवतात. तुम्हाला आठवतेय का श्रेष्ठ! नारायणाला सदोदित बाहेरच खेळायला आवडत असे. कुठे मुलांबरोबर गोट्या खेळ, तर कधी रानावनांत भटकायला जायचा, झाडावरून उड्या मारायच्या, पाण्यात तासन्‌तास डुंबायचे, घोड्यावर बसायचे, भरधाव रपेट मारायची आणि हे सारे करत असतानाच मध्येच कुठे तरी एकीकडे जाऊन बसायलाही त्याला फार आवडायचे. पण श्रेष्ठ, त्याबरोबरच त्याची बुद्धी अत्यंत तीव्र असल्याची ही प्रचीती येई. अहो, पंतोजी जे काय शिकवित ते त्याचे तत्काळ तयार होई आणि....

राणुबाई : आणि बरं का श्रेष्ठ नारायणालाही एकनाथ महाराजांच्या पायावर घालायला घेऊन गेलो आणि पायावर घालण्यापूर्वीच नाथांनी त्याला उचलून घेतले व त्याचे चुंबन घेऊन आनंदाने म्हणाले, धन्य आहात तुम्ही उभयता! धन्य तुमचा वंश! तुमची उपासना धन्य, तुमची भक्ती धन्य! तुम्हाला किती वानावे? कसे वानावे? अहो, साक्षात मारुती अंशाने हा पुत्र लाभलाय तुम्हाला! तो जगद्‌विख्यात होऊन जगदोद्धार करील. तुम्हाला सांगते श्रेष्ठ, खूप खूप धन्यता वाटली आम्हाला आणि बरं का श्रेष्ठ, त्याच्या साऱ्या बाललीला जशाच्या तशा आठवतात. तुम्हाला आठवते का श्रेष्ठ, पण तुम्हीही कदाचित लहान असाल, पण पाहा - पाहा त्यावेळी आपल्या घरी प्रयोजन होते आणि त्यासाठी मला ताक पाहिजे होते. मी विचारात होते काय करावे म्हणून. नारायणाला उद्या आपल्याला ताक हवे हे कळले. मग माझ्या नकळत त्याने गावातील सर्व ब्राह्मणांकडे गाडगी नेऊन ठेवली नी सर्वांना सांगितले, 'आम्हाला सूर्योदयापूर्वी उद्या ताक पाहिजे.' काय सांगू श्रेष्ठ, दुसरे दिवशी सूर्योदयापूर्वी त्याने मागील दाराने सारी ताकाची गाडगी स्वयंपाकघरात आणून ठेवली. जिकडे तिकडे ताकच ताक! एकदा तर दुधासाठी नारायण असा हटून बसला, की काही केल्या त्याची समजूतच पटेना. मला म्हणाला, "काढ दूध आत्ताच्या आत्ता आपल्या गायींचे आणि मला दे." "अरे, नारायणा आपली गाय गाभण आहे. दूध आटलंय तिचं!" "ते काही नाही मला आत्ता दूध दे!" "अरे, गाय व्यायली की खूप दूध देईल ती. मग खूप दूध पी हं!" असे सांगूनही नारायण आपला हट्ट सोडेना. म्हणाला, "आण चरवी आणि धार काढ." मग मीही त्याची समजूत पटावी म्हणून चरवी घेऊन आले आणि गायीच्या कांसेला हात लावला, तो काय आपल्या त्या गायीला पान्हा फुटला आणि चरवी दुधाने भरली.

राणुबाई : आणि श्रेष्ठ, जोंधळ्याच्या पोत्याची गोष्ट आठवते का तुम्हाला? अहो, त्या बुवाच्या शेतात मळणी चालली होती. पोती भरणे चालू होते. तेथून जाताना नारायणाने भरलेली पोती पाहिली अन् म्हणाला, "बुवा पोत्यातून काय भरलंय?"

"आरं जोंधळा."

"मग यातलं एक पोतं मी घेऊन जाऊ?"

"आरं पोरा, उचलत असलं तर घेऊन जा! बामनाचं शेळपट पोर तू. तू काय नेशील पोतं!" तुम्हाला सांगते श्रेष्ठ, नारायणाने सहज लीलया पोतं उचलून पाठीवर घेतलं नि पळतच घरात आणून टाकलं की! ए, राणुबाई, ए राणुबाई अशा हाका ऐकून मी बाहेर येऊन पाहिलं तर बुवा उभा. म्हटलं, का रे बाबा?"

"काय सांगू आई, तुझ्या ल्योकानं हां हां म्हणता जोंधळ्याचं पोतं पळवून आणलं!" लगेच नारायण म्हणाला, "बुवा पोतं काही पळवून आणलं नाही मी! घेऊन जा तुमचं पोतं तुम्ही." त्या बुवानं पोतं उचलून पाठीवर टाकलं तो काय खाली दुसरं पोतं निघालं. म्हणून त्यानं पहिलं पोतं खाली टाकून दुसरं पोतं उचललं, खाली तिसरं पोतं तयार. असं खूप वेळा झालं. बुवा चकित होऊन म्हणाला, "राणुबाई, तुझा ल्योक देवमाणूस

हाये देवमाणूस!'' आणि पोतं उचलून घेऊन गेला. मग दुसरी सारी पोती अदृश्य झाली. नारायणाच्या दैवी कृपेच्या शक्ती व बुद्धीच्या बाललीलांनी परम संतोष होत असे सगळ्यांना!

राणुबाई : हो ना श्रेष्ठ, अहो मी कशी विसरणार ती गोष्ट. तो दुष्काळ, तो रामनवमीचा उत्सव? त्यावर्षी कोठारांत अगदी जेमतेम टोपलीभरच गहू होता. तेवढ्यावर उत्सव पार कसा पडणार? या चिंतेत आम्ही होतो. तेवढ्यात नारायण आला आणि म्हणाला, ''काय झालं आई?''

''अरे, कोठारात काही फार गहू नाही मी परवाच पाहिलंय. जेमतेम टोपलीभर गहू असेल.''

''आई, मी पाहातो किती गहू आहे ते,'' असे बोलतच तो अंबरात उतरलासुद्धा! आणि एक टोपली भरून दिली, दुसरी भरून दिली. पाहाता पाहाता अंगणभर गहूच गहू. सगळीकडे धान्यच धान्य. सारे आश्चर्यचकित झाले. आता दुष्काळ पडला होता म्हणून जेवायला उत्सवाला जास्तच लोक आले होते. हे चिंतातुर झाले होते. पंगतीला तूप कमी पडणार हीच चिंता त्यांना होती. हे नारायणाला कळले आणि त्याने एक घडा तुपाचा उचलला, त्यात पाहिलं, यात तर तूप आहे, वाढा सर्वांना लागेल तितके. सर्वांना भरपूर तूप वाढूनसुद्धा घड्यात जेवढेच्या तेवढेच तूप शिल्लक होते. रामनवमीचा उत्सव अगदी आनंदात व थाटात पार पडला. आम्हाला दोघांनाही आकाशच ठेंगणे झाले. नंतर सातवे वर्ष नारायणाला लागले म्हणून त्याची मुंजही पार पाडली. पण त्याच्या खोड्या काही कमी नाही झाल्या, त्याच्या अवखळपणाचा कधी कधी राग येई. त्याच्याशी काय बोलावे, कसे बोलावे हेच कळेनासे होई. दिवस चालले होते आणि श्रेष्ठ, तुम्हाला सांगते त्या दिवशी अशीच काहीशी तक्रार आली, तेव्हा मी म्हणाले, ''नारायणा आता असा अवखळपणा चांगला नाही रे! अरे, गंगाधर तुझा भाऊच आहे ना! तो बघ किती शांत आहे. त्याच्याकडून शीक काही तरी, अरे नारायणा, आता तूही मोठा झाला आहेस. घरातली काही व्यवस्था तूही पाहायला हवी. आता, गंगाधर कुलकर्णीपणाचे काम पाहतोय ना, मग तू प्रपंचाची चिंता नको का रे करायला? सर्वांची काळजी तूच करायला हवी.'' हे असे बोलत असतानाच नारायण तेथून सरळ निघून गेला आणि संध्याकाळ झाली तरी नारायण घरात आला नाही, म्हणून श्रेष्ठ, तुम्ही त्याची शोधाशोध सुरू केली. मीही घरात शोध घेतला, पण छे. घरात काही तो दिसला नाही. कुठेच नाही म्हटल्यावर मी परत एकदा घरातच शोधायला सुरुवात केली. आता अडगळीची खोलीच पाहायची म्हणून खोलीत आले. मीठाच्या रांजणाजवळ आले तर तिथे नारायण बसलेला होता. त्याला माझा पाय लागला तर मी विचारले, ''कोण आहे ते?''

''मी नारायण आहे.''

''अरे, मग इथे अंधारात बसून काय करतोस?''

''आई, चिंता करितो विश्वाची!''

''छान इथे बसून चिंता करणे म्हणजे उंटावरून शेळ्या हाकण्यासारखेच नाही का?''

''आई, तसे काही नाही अगं. मी खरोखरच या विश्वाची चिंता करतोय.''

''श्रेष्ठ! त्यावेळी त्याचा चेहरा पाहिला. मात्र मला जरा वाईट वाटले! कारण त्याचा चेहरा खरोखरच चिंतेने काळवंडला आणि डोळ्यांतूनही पाण्याच्या धारा वाहत होत्या. पण मला वेडीला नाही हो कळले त्याचे म्हणणे! हं!''

राणुबाई : आठवतंय ना श्रेष्ठ! कसा तो तुमच्या मागे लागला होता, मला अनुग्रह द्या! अनुग्रह द्या! म्हणून - हो आणि म्हणायचा ''एवढ्या कृपासागरात राहूनही मी कोरडाच! अगदी साऱ्या जगाला अनुग्रह देतात पण.'' श्रेष्ठ त्या दिवशी तुम्ही म्हणालात, ''अरे नारायणा आतापासून घाई नको, तू अजून लहान आहेस. पुढे करायच्याच आहेत या गोष्टी!''

तर म्हणाला, ''जेव्हा पाहावं तेव्हा हेच उत्तर, तू अजून लहान आहेस, तू अजून लहान आहेस. मी आता जातो असा इथून.'' आणि मग असे म्हणत पुटपुटत नारायण बाहेर गेला, वाटले येईल थोड्या वेळाने. पण अंधार पडला तरी नारायण घरी आला नाही. झालं, पुन्हा शोधाशोध! माझी काळजी वाढत होती. जीव कासावीस झाला होता. अनुग्रह मिळत नाही म्हणून रुसूनच नारायण गेला अशीच भावना होती सर्वांची! कुठे सापडत नाही म्हणून श्रेष्ठ तुम्ही मारुतीला साकडे घालायला म्हणून मारुतीच्या देवळात गेलात आणि ....''

राणुबाई : आणि हो ना प्रदक्षिणा घालताना तुमचा पाय कुणाच्या तरी हातावर पडला. कोण निपचित पडलाय म्हणून तुम्ही उचलून बाहेर आणलात आणि पाहता तो काय, आपला नारायणच! हुर्मुजी वस्त्रे त्याच्या अंगावर, हातात जपाची माळ, तो बाण आणि श्रीरामांचे मुद्रांकित पत्र! श्रेष्ठ, तुम्ही वर्णन करून सांगितलेले सारे सारे चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभे राहिले! मी खरंच किती भाग्यवान! माझ्या घरावर, माझ्या मुलांवर प्रत्यक्ष प्रभुरामचंद्रांची कृपा! नारायणावर प्रभुकृपा! मी धन्य झाले! माझा जन्म धन्य झाला. फार फार आनंदून गेले. मात्र तेव्हापासून नारायण जणू काही रामरूपातच दंग होता. त्याचे कुठेच लक्ष नसायचे. माझे आईचे मन चिंतेने ग्रासत होते. मी त्यावेळी त्याची दृष्ट काढली. लिंब-लोण उतरून टाकले. पण, पण काही उपयोग नव्हता. दिवस चालले होते. श्रेष्ठ, तुमच्यासारखेच आता जर नारायणाचे लग्न केले तर? असा विचार माझ्या मनात आला आणि अहो गायीचा ओढाळपणा कमी व्हावा म्हणून जसे गायीच्या गळ्यात नाही का लोढणे घालत, तसेच प्रपंचाचे लोढणे आपण नारायणाच्या गळ्यात बांधावे हा माझा विचार मी मनाशी पक्का केला. त्याशिवाय नारायणाचे चित्त काही ताळ्यावर येणार नाही असे मला वाटले.

राणुबाई : हो! हो श्रेष्ठ तुम्ही म्हणालात की, ''आई, नारायण काही सामान्य मुलगा नाही. त्याला लग्नाच्या बंधनात अडकवू नये.'' आणि नारायण? त्यालाही लग्नाचा विषय काढला की फार फार राग येई. श्रेष्ठ, तुमचे म्हणणे मला पटले. पण... पण त्याच्या वागण्याने माझी चिंता वाढतच होती. मी तुम्हाला त्याच्यासाठी मुली पाहा म्हटले. तुम्ही नाही नाही म्हणत होतात तरी मी, मीच तुम्हाला अगदी भरीस पाडले. आणि हो ना श्रेष्ठ, त्या दिवशी त्याला कुणीतरी चिडविले. म्हणाले, हं, मग काय नारोबा तुम्ही आता चतुर्भूज होणार. म्हणजे आहे बाबा खरी मज्जा.'' असा रागावला नारायण आणि तेथून निघाला नी पोहोचला डोहाजवळ. तेथेच एका उंच झाडावर अशा जागी चढून बसला, की सहज कुणालाही दिसणार नाही. रुसून गेला म्हणून सगळीकडे शोधाशोध सुरू झाली. गावातील काही मंडळींनी नारायणाला झाडावर चढताना पाहिले होते. त्यांनी तसे सांगताच डोहाजवळ जाऊन हाका मारायला सुरुवात केली. आता खाली उतरलो तर परत सारे कुचेष्टा करणार म्हणून नारायणाने सरळ डोहात उडी मारली. तसा सगळीकडे हाहाकार माजला. नारायण काही वर येईना. शेवटी तुम्हाला बोलवायला काहीजण आले. कारण माझ्या-तुमच्याशिवाय नारायण कुणाचे ऐकत नाही, हे त्यांनाही ठाऊक होते. श्रेष्ठ, तुमची प्रेमभराने मारलेली हाक ऐकून नारायण वर आला आणि हात धरून तुम्ही त्याला घरी घेऊन आलात. त्यावेळी मी काहीच बोलले नाही. मात्र रात्री झोपण्याचे वेळी मी नारायणास जवळ घेतले आणि त्याची समजूत घातली, 'अरे नारायणा, हे असं वागणं बरोबर नाही रे बाळा!''

''मग तू तरी कां माझ्या लग्नाचा हट्ट धरतेस?''

''हे बघ नारायणा, तुम्ही दहा-बारा भावंडं असतात ना, तर मी असा हट्ट मुळीच धरला नसता रे. आपला वंश थोडा म्हणून तर तुला लग्न कर असे म्हणते हो. नारायणा, हे बघ अरे अंतरपाट धरलेला मला पाहू दे.'' आणि तुम्हाला सांगते श्रेष्ठ, आईलाच दैवत मानणाऱ्या

नारायणाने मला त्या रात्री वचन दिले की, ‘आई अंतरपाट धरलेला तुला नक्की पाहू देईन.’ या वचनाने मी अगदी हरखून गेले श्रेष्ठ. मोठ्या उत्साहाने लग्नाच्या तयारीला लागले. आसनगावच्या बोधनकरांशी लग्नाची बोलणी केली आणि नारायणाचे लग्न ठरले. घरात माझी आणि सुनबाईची धावपळ सुरू झाली. कामाची नुसती घाई उडाली आणि आपण सारेजण वऱ्हाडासह आसनगावी आलो. अगदी आनंदीआनंद होता सगळीकडे. लगीनघाई सुरू होती. गुरुजींनी सर्व तयारी केली. सनई-वाजंत्रीचे सूर आसमंतात घुमू लागले. मांडवात अक्षता वाटल्या. जो तो आपल्या घाईत होता. कोणी हार-तुरे आणले. तेवढ्यात गुरुजी म्हणाले, ‘चला चला घटिका जवळ आली.’ आणि नारायणाला नवरदेव म्हणून मुंडावळी बांधून बोहोल्यावर उभे केले. मुंडावळी बांधून सजून नवरदेव उभा राहिला. अंतरपाट धरला गेला. भटजींनी ‘शुभमंगल सावधान’ असे म्हटले आणि दुसऱ्याच क्षणी ‘नवरदेव पळाला, नवरदेव पळाला’ असा ओरडा ऐकू आला. मांडवातला गोंधळ कानावर आला. अरे देवा, हे काय झाले? नारायणा-नारायणा, कुठे गेलास रे तू? नारायणा नारायणा....

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

# ॥ तंजावर प्रांतातील रामदासी पंथांचे वाङ्‌मयीन साहित्य ॥

**रामचंद्र भीमराज गोस्वामी**

*१७८५, दक्षिणराज रस्ता, तंजावर - ६१३००१, मो. ०८०१५३०४८४९*

श्री समर्थ रामदासस्वामी संप्रदाय तंजावर येथील रामदासी महंत परंपरांमधील, श्री भीमस्वामी, राघवस्वामी, अनंतमौनी, गोविंद बाळस्वामी, मुकुंद स्वामी, कोनेरी नंदन, माधवस्वामी, राम पंडित, कृष्ण पंडित, वासुदेव पंडित, अंबाजी पंडित, मेरुस्वामी, सेतुबाबा स्वामी, घनश्याम पंडित, श्यामराज प्रतापसिंह महाराजा अशी श्रींचे सांप्रदायिक रामदासी मंडळींनी सर्वही अतिउत्तम काव्य, साहित्य रचना, महाराष्ट्र भाषेत निर्मिती केली आहेत. आज हे सर्व ग्रंथ उत्तम परिस्थितीत तंजावर येथील सुप्रसिद्ध सरस्वती महाल ग्रंथालयात जपून ठेविले आहेत.

श्रीसमर्थभक्त शंकर श्रीकृष्ण देव यांनी, पूर्ण भारतभर भ्रमण करून श्रींचे सांप्रदायिक साहित्य सर्वही संग्रह करून धुळे येथील श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरात जपून ठेविले आहेत. श्री शंकर, श्रीकृष्ण देव तंजावर प्रांतात आल्यावर, समर्थ मठांचे दर्शन घेऊन, त्या मठातील हस्तलिखित ग्रंथांची संग्रह केलेली पोथी, श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरात ३०० बाडांच्या स्वरूपात विराजमान झालेली आहे. त्या बाडक्रमांकामधील श्री रामदासी मंडळींची काव्यरचनेची माहिती या लेखामध्ये सविस्तर लिहिलेली आहे.

### तंजावर श्री भीमस्वामी (शहापूरकर)

श्री भीमस्वामी मूळचे शहापूरचे (जि.सातारा). श्री समर्थ कृष्णातीरावर आल्यानंतर त्यांच्या सहवासात जी घराणी आली त्यापैकी शहापूरचे कुलकर्णी घराणे आहे. या घराण्यातील भीमस्वामी होते. तंजावर प्रांतात धर्म-प्रसारार्थ शके १५९८ मध्ये आले व त्यांनी आयुष्यभर रामदासी संप्रदायाचे कार्य केले. त्यांना अनेक शिष्यवर्ग मिळाले. त्यापैकी तीन शिष्यांचे (१) राम गोस्वामी - झोळी, (२) गोविंदबाळ - पादुका, (३) अण्णाजीबाबा - कुबडी, मठ परंपरा आजही अति उत्तमरीतीने श्रींचे संप्रदाय कार्य करीत आहेत.

श्री भीमस्वामी ग्रंथरचनेपेक्षा सांप्रदायिक कार्यपद्धतीवर त्यांचा भर असे. त्यांची काही स्फुट काव्यरचना प्रकार उपलब्ध आहे. त्यांनी श्री समर्थांचे निर्याणचरित्र ५० ओवींमध्ये लिहून श्रींचे पहिले चरित्रकार होऊन गेले.

*माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंत:कर्णी ।*
*परि मी आहे जगजीवनी । निरंतर ॥४५॥*
*आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वत:सिद्ध ।*
*असता न करावा हो खेद । भक्तजनी ॥४६॥*
*तीन वेळा स्मरण केले । अंबर अवघे गर्जिनले ।*
*रामनाम कोंदाटिले । जिकडे तिकडे ॥४७॥*
*मुहूर्त एक हो गर्जना । गगनी कोंदाटिली हो जाणा ।*
*विस्मय पावलो निजजना । प्रेम आले ॥४८॥*
*ध्वनि जालीं संपूर्ण । जाहला अवतार हो पूर्ण ।*

*देशोदेशी भक्तजन । जाते जाले ॥४९॥*
*स्थळ महिमा अपार । उदंड जाले साक्षात्कार ।*
*भीम ध्यातो निरंतर । चरणरज ॥५०॥*

(श्रीसमर्थ निर्याणचरित्र - श्री भीमस्वामीकृत)

**बाड क्रमांक : १२०५** - श्री हरिपर पद.

*तारक नौका नाम हरीचे ॥ धृ ॥*
*भेद भवांबुधी उतरूनि नेते । वाजत गाजत परलोका ॥१॥*
*नामप्रताप निरखुनि रूपे । अनहत दुंदुभी ठोका ॥२॥*
*वदे भीमराज एक्या भावें । अंतरि संतत धोका ॥३॥*

**बाड क्रमांक : १२५०** - श्रीरामपर पद.

*घ्या रे वाचे नाम । माझ्या रामाचे ॥ धृ ॥*
*वेचत नाहीं पैका काही । श्रमहि नाहीं या वाचे ॥ १ ॥*
*करितां निशिदिनीं नाम हे कीर्तन । पापविमोचन जन्माचे ॥२॥*
*भवभयछेदक कैवल्यदायक । अंतरी व्यापक भीमाचे ॥३॥*

**बाड क्रमांक : १४४१** - स्वामीदर्शन.

*मन माझे निवाले । स्वामीचें रूप देखिलें*
*चित्त हे रतले स्वामी पाई ॥धृ॥*
*धन्य धन्य जिणे जालें । पूर्व पुण्य फळा आले ।*
*आत्मनिवेदन भले । मीपण विराले ॥१॥*
*प्रालब्धी टाकिला देहो । बोधें गेला संदेहो ।*
*सद्‌गुरूकृपेनें भीमहो । असूनि नाहीं ॥२॥*

**बाड क्रमांक : १२१८** - भीमकृत पाळणा - कडवी ५

*जो जो जो जो रे गोपाळा । निद्रा लागो डोळा ...*

**बाड क्रमांक : १२५४** - भीमराज कृत 'अवधूत साधुसंवाद'

**बाड क्रमांक : १२९८** - भीमस्वामींच्या चरित्राचा काही भाग महत्त्वाचा आहे.

**रामचंद्रविभु :**

श्रीसमर्थ रामदास - श्री भीमस्वामी - श्रीरामनाथ - श्री शिनप्पा - श्री भीमस्वामी - श्रीरामचंद्र

**बाड क्रमांक : १२३७**

श्लोक, आर्या, पदें, सवाया, दिंडी इ. १३६ ग्रंथ संख्येने गुंफलेली 'पांडवांची कथा', रामचंद्रविभु किंवा रामचंद्रनुत किंवा रामचंद्रवरद या नावाने पदे चिन्हित आहेत.

शेवटचा श्लोक :

*श्री रामदास पद वारिज षट्‌पदातें ।*
*भीमाख्य देशिकवरा निजसौख्यदातें ।*
*वंदोनियां विरचिली वरसाकथातें ।*
*जे ऐकत्याशि झणि दावित सत्पथातें ॥१३६॥*

**बाड क्रमांक : १४४५**

हनुमंत जन्माची आख्यानें श्लोकबद्ध आहेत. ती पूर्ण आहेत. त्याचा शेवटचा श्लोक -

*जो रामदास रघुनाथ पदाब्ज पूजी ।*
*जो भीमरूप धरूनी वधि षड्रिपूजी ।*
*हे रामचंद्र मति तद्भजनी स्थिरावी ।*
*ऐसी तुम्ही मजवरी करुणा करावी ॥५३॥*

**श्रीरामचंद्र गोस्वामी**

तंजावर येथील श्रीसमर्थ संप्रदाय झोळीराम मठ परंपरेतील श्रीरामचंद्र गोस्वामी यांनी गुरुगीता ग्रंथ शके १७६१ मध्ये तंजावर येथे लिहिला. (श्रीसमर्थ रामदास - श्री भीमस्वामी - राम गोस्वामी - नागोबा गोस्वामी - रामचंद्र गोस्वामी)

**धुळे येथील बाड क्रमांक : १३५८** - झोळीराम शिष्यकृत 'गुरुगीता' २२५ ओव्या आहेत.

*जे गुरुगीता कैलासी । शिव उपदेशी पार्वतीसी ।*
*तोचि अर्थ प्राकृत भाषेसी । बोलवी श्रीसमर्थ ॥७॥*
*श्री समर्थ शिष्य परंपरा । श्रीराम भक्ती तत्परा ।*
*तियेचि आदि अवधारा । चित्त करा अचंचळ ॥८॥*
*आदि गुरू श्री नारायणें । तयाचा शिष्य कमलासन ।*
*तयाचा शिष्य सज्ञान । वशिष्ट ज्याते बोलिजे ॥९॥*

*तयाचा शिष्य श्रीराम । जो निजानंद कैवल्य धाम ।*
*तयांचे शिष्य निष्काम । तयांचा उपरमंत्र प्रख्यात ॥१०॥*
*तेचि श्रीसमर्थ रामदास । जे विषयसुखी उदास ।*
*जयांच्या वंदिता पदास । लाभती निजपदास साधक ॥११॥*
*तयांचे शिष्य श्री भीमराव । जे सम भाविती रंकराव ।*
*जयाचे उच्चारिता नाव । वाटे वाव दृश्य सारे ॥१२॥*
*तयांचे शिष्य अनेक । त्या माजी रामदेशिक ।*
*तेणेचि आम्हां तारक । मंत्र सम्यक उपदेशिला ॥१३॥*
*जो विवेकपदे चोळी काम । जो टाळ घोळे घोळीराम ।*
*लोकी प्रसिद्ध जयाचे नाम । हो झोळी राम निजगुरू ॥१४॥*
*जेणे गुरू दिक्षा जागविली । निस्पृहत्वें झोळी जागविली ।*
*शिष्या हाती त्यागविली । निज उपदे अविद्या ॥१५॥*
*ऐशीया श्री गुरूचि पाऊले । चित्ती स्थापुनिया निर्मळे ।*
*गुरूगीता कथावया वाटिले । चित्त उतावेळ होतसे ॥१६॥*

**बाड क्रमांक : १२१६**

'अभिमन्यु विवाह'- ग्रंथ संख्या ९१, व 'चंद्रहास चरित्र' ग्रंथ संख्या १३८ अशी दोन प्रकरणे श्लोकबद्ध पूर्ण आहेत. त्यांत मधून मधून आर्या, पदें, दिंडी, ओवी आहेत.

चंद्रहास चरित्राच्या शेवटी रचनाकाल आणि लेखकाचे नाव अशी आहेत.

*शक सत्राशें साठी वरि सहा क्रोधिसंवत्सरीं पूर्ण ।*
*अधिक श्रावण बहुलीं हरिदिवसीं वदविलें रमारमणे ॥१३८॥*

इति श्री चंद्रहासचरितं रामशेष गोस्वामिना स्वहस्तेन लिखितं.

**बालसुत :**

तंजावर श्री भीमस्वामींचे शिष्य गोविंद बाळाचा मुलगा बालसुत. (श्री समर्थ रामदास - श्री भीमस्वामी - श्री गोविंदबाल - बालसुत).

**बाड क्रमांक : १२३८ -** बालसुतकृत भीमस्वामीवर पद.

*भीमराव चुतराक्षर म्हणतां सुख वारंवार ।*
*पावे म्हणउनि पाय त्याचे वंदा सत्वर ॥धृ॥*

*भीमरूप विशाल भाळीं टिळा मृगनाभी ।*
*भीता भय वारूनि दासातें म्हणे नाभि ना भि ।*
*भीम पराक्रम भक्तां कैसा देतो सुलभी ।*
*भीमतीर ते वासी येती वाजती दुंदुभी ॥१॥*

*मंदहास वाचेन बोले अगणित श्रीराम ।*
*मंदवासर प्रियकर सकळां तारी सप्रेम ।*
*मनोभावें भजती त्याचे पुरताती काम ।*
*मननशील महाजनासि होतो मोठा संभ्रम ॥२॥*

*राहणें ज्याचें पहिलें त्याचें नांव शहापुरा ।*
*रामदास स्वामींचे वर लाधले पूरा ।*
*राक्षसवर्षी निघोनि आले तंजपुरा नगरा ।*
*रामनामें शोभत संत महंत परंपरा ॥३॥*

*वरद महारुद्र मारुती हनुमंतराव ।*
*वडिल श्रेष्ठ अमुचा सकळा स्वामी भीमराव ।*
*वर्णिति वेद विधी ही भक्ती पाहुनि अपूर्व ।*
*वंदिति बालसुताचा प्रभु तो प्रेमें जन सर्व ॥४॥*

**कोनेरीनंदन :**

कोनेरी गंगाधर यांचे पुत्र - कोनेरीनंदन (शेष कवि). तंजावरकडील विपुल साहित्य रचना करणारा एक कवी होय. तंजावरच्या रामदासी संप्रदाय (श्री समर्थ - भीमस्वामी - गोविंदबाळ - शिष्य शेष कवी) शिष्य होते. तंजावरचे राजे प्रतापसिंह यांचा पुत्र अमरसिंह यांच्या कारकीर्दीत म्हणजे १७८६ ते १७९८ या काळात शेषकवींनी आपली ग्रंथनिर्मिती केली.

उपमन्युचरित्र, गजेंद्रमोक्ष, गोपाल काल, दामाजी पंतांचे चरित्र, तुलसी माहात्म्य, श्री पांडुरंग माहात्म्य, तंजपुरी माहात्म्य, हालास्य माहात्म्य, डोलोत्सव गीत, भावार्थ रामायण (उत्तरकांड) इ.

**बाड क्रमांक : १४४८ -** कोनेरनंदन कृत 'हालास्यमाहात्म्य' या ग्रंथामध्ये श्लोक, चूर्णिका, पदे,

दिंडी, आर्या इत्यादी मिळून ग्रंथ संख्या २९ आहे.

पहिला श्लोक :-

*श्री हालास्य पुराण पावन कथा लीला शिवाची भली ।*
*पन्नासावरि आठवी सरस ते मी सांगतो भूतलीं ।*
*ऐका भूपति आदि मर्दन महा पांडयाख्य पूर्वी गुणी ।*
*होता वात पुरेश्वरा सचिवता देवोनि वीराग्रणी ॥१॥*

शेवटचा श्लोक :-

*श्री सांब यावरि कृपें वसुधेश्वराते ।*
*लीला दुजी करूनि वात पुरेश्वराते ।*
*संतोषवी तुरंग देउनि तन्मनातें ।*
*कोनेरनंदन कवी विनवी जनातें ॥२९॥*

**मेरुस्वामी :**

१७व्या शतकाच्या अखेरीस तंजावरास होऊन गेलेले रामदासी-सांप्रदायिक कवी. समर्थशिष्य अनंत मौनी यांचे शिष्य होय. मन्नारगुडी येथील मठाचे अधिपती होते. इ.स. १७३३ मध्ये ते समाधिस्थ झाले. (आषाढ शु. १२) यांची परंपरा - श्रीसमर्थ - अनंत मौनी - शिष्य मेरु. यांची ग्रंथरचना अशी - भीमोपदेश, आत्मसाक्षात्कार, भगवद्‌गीता, स्वानंदलहरी, मानसपूजा, अनुभवसार, मेरुबोध, तत्त्वपट, पूर्णामृतकर षोडशकला, रामसोहळा, अनंत वाल्मिकी रामायण ऊर्फ हरिहर नाटक, समर्थाष्टक, श्रीराम पंचरत्न, संतमाळा इ.

**बाड क्रमांक : १३१० -** मेरुकृत 'रामसोहळा'

रामसोहळा या ग्रंथात समर्थचरित्राबरोबरच वेदान्त, तीर्थयात्रा वर्णन, षड्दर्शन सार, देवतास्तवन, गुरुवर्णन, गुरुभक्ती, माया इ. अनेक विषयांचे विवेचन करण्यात आले आहे. या ग्रंथात ते म्हणतात -

*सायुज्यतेचा जिव्हाळा । ग्रंथ अनुभवाचा आगळा ।*
*संभविसी रामसोहळा । रसाळ प्रमेय ॥१.१.६३॥*
*समुद्रावगाहनी तीर्थे । आतुडती फळे सकृतार्थे ।*
*तैसा येकची ग्रंथ सर्वार्थे । संपन्न होय ॥१.१.२४॥*
*आणि हा अखंडैक रस । ग्रंथ द्राक्षापाक सौरस ।*
*दाशरथी राम हृदयास । होय उद्धारिता ॥१.१.१००॥*
*गुरू राम तो आमुचा आदिजाणा । प्रबोधी समर्थासि पै योगिराणा ।*
*समर्थे अनंतासि जो बोध केला । अनंते सुमेरु सुखें बोधविला ॥१॥*

**बाड क्रमांक : १२०५ -** मेरुस्वामीचे पद.

*काय वानूं मी उपकारा । सद्‌गुरू माहेरा ।*
*मोहमय निद्रा लागता । भवस्वप्नी वोसणतां ॥धृ॥*
*मजला थापटुनी उठवीले । जागृत स्वरूपीं केले ॥१॥*
*लक्ष चौऱ्यांसी भव फेरे । चुकवीलें दातारें ॥२॥*
*नाम संजीवनी मम श्रवणीं । पाजुनिया निजवदनी ॥३॥*
*अनंतमणि माळे वोवीले । अभंग मेरुसी केले ॥४॥*

**बाड क्रमांक : १२१५.**

*गुरूनामस्मरण मोक्ष । गुरू ब्रह्मचि प्रत्यक्ष ॥१॥*
*ऐसा भाव सिद्ध जया । मोक्ष लागे त्याच्या पाया ॥२॥*
*गुरू सेवा ब्रह्मप्राप्ती । नयनीं सद्‌गुरूची मूर्ती ॥३॥*
*गुरुभजनीं जो वीकिला । जीनन्मुक्त तोचि जाला ॥४॥*
*मेरु मौनी अनंत पाई । समर्पिला उरला नाहीं ॥५॥*

**बाड क्रमांक : १३११.**

*स्वामी रामदास । त्याचा परमार्थवंश ।*
*वर्णितां न पुरे हव्यास । सीमा चि नाहीं ॥१॥*
*वैराग्याचे कडके । ज्ञानबोधाचे धडके ।*
*जीर्ण मायेचें फडके । फाटोनि गेलें ॥२॥*
*नवमीचें साधन । आत्मनिवेदन ।*
*तेणेंचि जालें निमग्न । आठऊ गेला ॥३॥*
*राम आर्जविला । देव सकळांसी झाला ।*
*पाळिताहे भक्ताला । भक्तीच्या योगें ॥४॥*
*स्वामी पासुनी संत । झाले असंख्यात ।*
*त्याही मध्यें अनंत । प्रसिद्ध माझा ॥५॥*
*स्वामी अनंत मौनी । मेरु लागतो चरणी ।*
*केली जन्माची खंडणी । निजरूपीं ठेला ॥६॥*

*समर्थ स्वामी सद्‌गुरू रामदास ।।धृ।।*
*परब्रह्म निर्विकार । प्रत्यक्ष रामाचा अवतार ।*
*रुद्रस्वरूप साक्षात्कार । योगें वेधिलें सकलांस ।।१।।*
*रामनामेंचि साचार । केला विश्वाचा उत्धार ।*
*भक्ति नवविधा विस्तार । स्वानंदाचा चिद्विलास ।।२।।*
*समर्थ स्वामीचे अंकित । मौनी अनंत सर्वगत ।*
*शिष्य अनुभवी शाश्वत । अनन्य सन्मेरु विश्वास ।।३।।*

**प्रतापसिंह :**

प्रतापसिंह हे तंजावरचे अमरसिंह राजांचे पुत्र होते. त्यांना रामदास संप्रदायी मेरुस्वामी मठाचे अधिपती श्री सेतुस्वामी यांचा गुरुपदेश होता. स्वत: रामभक्त होते. त्यांना साहित्य, संगीत, धर्मशास्त्र आणि वेदान्त या विषयांचा, त्याचप्रमाणे अनेकविध भाषांचा व्यासंग होता. यांनी सुमारे २० नाटके रचली आहेत. शिवाय -

१) रामदिनचर्या, २) इंद्रविजय, ३) उमासंहिता, ४) तुलसी महात्म्य, ५) अनंत चतुर्थीव्रत कथा, ६) चंद्रहास कथा, ७) रासक्रीडा, ८) गोपीवस्त्रहरण, पौराणिक आख्याने आणि श्रीकृष्णमंजरी व पंचभाषामणी अशी दोन अन्य काव्येही लिहिलेली आहेत.

**बाड क्रमांक : १३०३ -** प्रतापसिंह कृत ‘पंचभाषामणी’.

“श्रीमान् अमरसिंह भूपालकात्मज श्री प्रतापसिंह महाराजाख्य कवीश्वर चिकिर्षित ग्रंथास निर्विघ्न परिसमाप्तिकाणे । शिष्टाचारें कडून अनुमित श्रुतीने अवश्य कर्तव्यते तें पावल्या ऐशा । श्रीगणेशार्दष्टदेवता प्रार्थनादिरूप मंगलातें करून त्यासि शिष्यशिक्षार्थ स्वग्रंथमुखभागे निबंधन करी ।।”

**माधवस्वामी :**

श्री माधवस्वामी श्रीसमर्थ संप्रदायातील कोनूर मठाचे अधिपती. श्रीराघवस्वामींचे शिष्य म्हणजे श्रीसमर्थ रामदास - श्रीराघवस्वामी - श्रीमाधवस्वामी अशी परंपरा आहे. यांचे वास्तव्य तंजावरजवळील कावेरी तीरावरील तिरुवेळुंदर येथे होते. येथील राममंदिरात त्यांनी आपले सर्व लेखन केले. यांनी विविध विषयांवरील विपुल ग्रंथरचना केली आहे. त्यात, ओवीबद्ध रामायण, श्लोकबद्ध रामायण, लघुरामायण, हरिवंशपुराण, विष्णुपुराण, गणेशपुराण, योगवासिष्ट, महाभारत, अनुगीता, मल्लारी महात्म्य, सुंदरकांड इ. रचनाप्रकार आहेत.

**बाड क्रमांक : १३२०, १३९३.**

माधवकृत ‘अनुशासन पर्व’ - ओवीबद्ध.

**बाड क्रमांक : १३३८.**

माधवकृत - “सनत्सुजातीय”- ओवीसंख्या - १०३१.

सुंदर प्रत, स्वतंत्रपणे प्रकाशनाला योग्य, सनत्सुजाताने धृतराष्ट्रास केलेला धर्मोपदेश.

**बाड क्रमांक : १३६१**

माधव कृत - द्रोणपर्वोतंर्गत मृत्युदेवीची कथा.

अध्याय - ३३ वा.

**माधवसुत (रामपंडित)**

माधवस्वामींचा पुत्र रामपंडित होय. तो तर्क, व्याकरण, मीमांसा, सांख्य, काव्य, नाटकालंकार, संगीत इ. शास्त्रांत प्रवीण होता. त्यास लोक ‘अद्वैतकेसरी’ म्हणत. रामपंडित - वेदान्त, पुराण, भारत, भागवत इ. विषयांवर सुमारे २५ ग्रंथांची रचना केली आहे. रामपंडितांचा कालखंड इ.स.१७४१ ते १७६४ पर्यंत.

**बाड क्रमांक : १३४१ -** माधवनंदन कृत श्रीमत् भागवत दशकस्कंध पूर्वार्ध - ओवीबद्ध - एकंदर ४२ अध्याय आहेत.

वडिलांना नमन करताना माधवांनी केलेल्या ग्रंथांचा उल्लेख आला आहे. त्या नमनाच्या ओव्या -

*कैवल्य फलदानीं कल्पतरु । जो उपशांतीचा केवळ मेरु ।*
*श्रीमाधवनामा जनक गुरू । प्रणाम करूं त्यासी भावें ।।२६।।*
*सर्वलोक विलक्षण । ज्याची चर्या सुलक्षण ।*
*तेंचि कांहीं सांगतों लक्षण । सावध विचक्षण परिसोत ।।२७।।*

*परमार्थलुब्ध असोनि अती । जो निर्लोभ म्हणवी आपणाप्रती ।*
*सत्याभिमान धरोनि मागुती । वागवी निगुती अमानित्व ॥२८॥*
*श्रीरामचंद्र भक्तिविषईं । कामयुक्त असोनि हृदईं ।*
*निष्काम म्हणवी आपुल्या ठाईं । काय नवलाईं सांगावी म्या ॥२९॥*
*उद्धरावया प्राकृत जन । कलियुगामाजी पावन ।*
*वाल्मिकी आणि द्वैपायन । ज्या रूपें कृपायन अवतले ॥३०॥*
*महाभारत श्रीरामायण । योगवासिष्ट विष्णुपुराण ।*
*मल्हारि महात्म्य गणेश पुराण । महात्म्य जाण विनायकाचें ॥३१॥*
*दिव्य प्रबंध इत्यादिक । जेणें रचिले रसाधिक ।*
*तैसे चि निर्मिले असंख्य श्लोक । पुण्य श्लोक स्तविती जया ॥३२॥*
*उपास्य दैवत श्रीराम । अद्वैती ऐसें उपनाम ।*
*ज्याचिया योगें निभ्रम । यथार्थ परम ते जाले ॥३३॥*

**बाड क्रमांक : १३५०** - माधवसुत कृत "नीतिशतकाचे समश्लोक"

*हे श्लोक एक शत नीतिसुधारसाचे ।*
*नाना सुशब्द नव मौक्तिक हार साचे ।*
*ठेवा मनी सुपथ आदरुनी श्रुतीचा ।*
*बोले कवी गुरूकृपें सुत माधवाचा ।*

**बाड क्रमांक : १३९४** - माधवकृत 'हरिवंश' ग्रंथ.

**बाड क्रमांक : १२२२, १२३१.**

सबंध बाड श्रीसमर्थकृत 'रामायणाचे' आहे, सुंदरकांड आणि युद्धकांड.

भीमस्वामींचे शिष्य आण्णाजीबाबा यांच्या हातचें ते आहे. रामायणाच्या शेवटी लेखनाचा काल व लेखकाचे नावही दिले आहे, ती :-

राक्षसे संवछर चैत्र शुध प्रतिपदा भृगुवार समाप्त ॥ निस्पृह आणाजी गोसावी भीमांकीत शाहापुरकर स्वहस्तेन लीखीत्वा ॥ श्रीराम जयराम".

म्हणजे शके १६५७ चैत्र शु. १ होय. रामायणानंतर श्रीसमर्थकृत मानसपूजा आहे.

**बाड क्रमांक : १२४०** - महत्त्वाचे बाड आहे.

श्रीसमर्थांचे - सप्तसमासी, जुनाट पुरुष, बहुत गोसावी, पंचीकरण विवरण, पूर्वारंभ, मानपंचक, बुद्धिवाद, चतु:समासी, मीपण, आत्माराम, पंचसमासी, सगुणध्यान, अंतर्भाव, निर्गुणध्यान, पंचीकर्णयोग, मानसपूजा, राजधर्म, क्षात्रधर्म, षड्रिपु, फुटयोग, रामायण, सर्वब्रह्मविमलब्रह्म, प्रेत्नप्रारब्धाच्या वोव्या - असे हे प्रचंड उपयुक्त श्रीसमर्थांच्या कवितेचें तत्कालीन बाड आहे.

**बाड क्रमांक : १३०७, १३०८** - 'वाल्मिकीरामायण - सुंदरकांड'

**बाड क्रमांक : १३०९** - 'वाल्मिकीरामायण - युद्धकांड'

**बाड क्रमांक : १३१६, १३१७** - 'वाल्मिकीरामायण - बालकांड' प्रतीच्या लेखकाचें नाव शामजी रामजी,

लेखनकाल १७४२ निजज्येष्ठ शु.७ अशी शेवटी दिलेली आहेत.

**बाड क्रमांक : १३१८** - 'वाल्मिकीरामायण - आरण्यकांड'

**बाड क्रमांक : १३१९** - 'वाल्मिकीरामायण - किष्किंधाकांड'

सुंदर प्रत, श्रीराम-लक्ष्मण आणि मारुती यांचे सुंदर रंगीत चित्र काढलेले आहे.

**बाड क्रमांक : १२९३** - 'तंजावरकडील श्रीसमर्थ सांप्रदायिक दैनंदिन उपासनापद्धती'.

**बाड क्रमांक : १३८३** - 'श्रीसंप्रदायिक जपानुष्ठान पद्धती' - श्रीसमर्थ - भीमस्वामी - झोळीराम - नागेंद्र. अशी परंपरा. नागेंद्र यांनी लिहिलेली आहे.

**माधवस्वामी : बाड क्रमांक : १४९७**

माधवस्वामींनी केलेली श्रीसमर्थांची आरती.

*निर्मळ निश्चल ज्ञान काळाचे थडके ।*
*चुकले शमले देहे ममतेचे भडके ।*
*जड मुढ तरले आंगी वैराग्य कडके ।*

*मीपण निरसुनि गेले मायेचे फडके ॥१॥*
*जय देव जय देव जी समर्था ।*
*खंडण भवतमपाशा मंडण परमार्था ॥धृ॥*
*निजशांती आरुढले हारवला क्रोधु ।*
*भवलक्षण लवणाब्धी तरुनियां सिंधु ।*
*सुखरूप तेणें सरला ममतेचा वेधु ।*
*सद्गुरूकृपें फळला माधव निजबोधु ॥२॥*

**बाड क्रमांक : १४९३**

माधवकृत 'हरिश्चंद्र आख्यान' ओवी संख्या १५९ आहे.

**अन्य तंजावर कवींची साहित्यरचना.**

**१) गोविंद कवी : (उटके गोविंदाचार्य)**

तंजावरच्या शरभेंद्र (शरफोजी) राजांचा हा आश्रित अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला. रामजन्म निरूपण - ओव्या, उमारमासंवाद निरूपण, श्रीपार्वती परिणय निरूपण, श्रीहरिलीला निरूपण, शिवचरित्र, स्फुट पदे व नाट्यशास्त्र संग्रहाचे दोन खंड एवढीच वाङ्मय संपदा मराठी कोशात गोविंदकवीच्या नावावर नोंदविलेली असून, 'उटके गोविंदाचार्य' असाही त्याचा नामनिर्देश केलेला आहे. त्यांनी 'तुला कावेरी महात्म्य', 'धनुर्मास महात्म्य' व 'वैशाख महात्म्य' अशी ग्रंथनिर्मिती केली आहे.

**बाड क्रमांक : १२०६** (१) गोविंद कविकृत - 'शरभमहीपतिस्तुति', (२) गोविंदकविकृत - उमारमासंवाद.

*श्रीमत्तंजानगरी न्यायें जो शरभभूप राज्य करी ।*
*त्याचा आश्रित उटके गोविंदाभिध करी असे चुटके ॥२९॥*

**बाड क्रमांक : १४०२** गोविंदकविकृत - 'शिवचरित्र'.

*ज्याचा तात दिगंतविश्रुत यश श्रीरंगवर्याख्य तों ।*
*ज्याची माय सरस्वती तदितरां जो दैवता नेणतो ।*
*तो गोविंदकवी तुम्हा बिनवितो आतां त्यजोनी दरा ।*
*श्रोते हो रचिली यथामति कथा ईतें तुम्हीं आदरा ॥१३॥*

**२) श्रीनिवास :**

**बाड क्रमांक : १२१०.**

श्रीनिवास विरचित, १) रामकीर्तन, २) कृष्णलीला, ३) श्रीवेंकटेशनाम वर्णनं, ४) सुदामचरित्रं, ५) गीर्वाण पदे.

**बाड क्रमांक : १३२६, १४१७.**

श्रीनिवास कृत गोपीगीत तारकावळी', २९ गीते आहेत. श्रीनिवासकृत सुमनोरंजने १ व २ सर्ग, चंद्रोदय वर्णन, कीर्तिवर्णन, प्रश्नोत्तरमालिका, शरभेंद्र प्रशंसा, मनीषापंचक इ.

**३) आनंदतनय :** तामिळनाडू येथील आरणी या गावाचे मूळ रहिवासी. त्यांचे मूळ नाव गोपाळ. आनंदराव हे त्यांचे वडील आणि गुरू होते. आनंदतनय अनेक नावांनी कवित्व करतात. आनंदतनय, आनंदनंदन, आनंदसुत ही त्यांतील प्रमुख नावे. गोसावीनंदन, रघुनाथ पंडित यांचे समकालीन कवी होय. त्यांनी भारत, भागवत, रामायण यांतील कथांच्या आधारे प्रामुख्याने आख्यानपर कविता लिहिली.

त्यांची यमकप्रियता काही वेळा एका टोकाची आणि क्लिष्टता निर्माण करते. त्यांचा एक श्लोक याचे उदाहरण म्हणून दिला जातो तो असा -

*पाया न मी देईन वंश सारा ।*
*पा यां नमी दे इनवंश सारा ।*
*न या वया माजिं भला जनांदे ।*
*न यावया मा जिभ लाज नांदे ॥*

**बाड क्रमांक : १३१२, १२०२** आनंदतनय कृत पुढील प्रकरणे.

१) सुदामचारित्र, २) वंदुक चारित्र, ३) राधाकृष्णविलास, ४) एणींचे चरित्र, ५) गणिका चरित्र, ६) ताटिकावध, ७) यज्ञ संरक्षण, ८) शिबिचरित्र, ९) सासू-सुनेचे नाटक, १०) मार्कंडेय चरित्र, ११) सेतुबंधन, १२) सत्यभामाविलास, १३) सीतास्वयंवर.

**बाड क्रमांक : १२०५ -** आनंदतनयकृत प्रकरणे.

१) चेंडूफळी, २) श्रीकृष्ण चरित्र, ३) नौका चरित्र, ४) पुतनामोक्ष, ५) राम शबरी, ६) शिवरात्री कथा.

**४) महादेव भट्ट :**

**बाड क्रमांक : १४१९** महादेव भट्ट लिखित - ''कार्तिक महात्म्यं''

शके १७२७ क्रोधन संवछरे उत्तरायणे आषाढ शुद्ध दशम्यां स्छिरवासरे तंजनगर्या श्रीराजपुरोहित राजेश्री प्रभाकर भट्ट गोस्वामिपुत्र महादेव भट्ट भट्टगोस्वामिना स्वार्थ परार्थंच लिखितम्.

**५) दादा व्यास :**

**बाड क्रमांक : १२१२ -** ''सीतास्वयंवर''

शरफोजी राजे यांचे आश्रित कवि दादाव्यासकृत सीतास्वयंवर श्लोक १४ ते ३१ पर्यंत.

**६) चींदड बाळ शंकरनाथ :**

**बाड क्रमांक : १२२८ -** चींदड बाळ शंकर कृत - प्रती मनाचे श्लोक. हे श्लोक १२८ आहेत, त्यांच्या शेवटीं रचनाकाल दिला आहे. तो असा : इति श्री प्रती मनाचे श्लोक चींदड बाळ शंकरनाथ विरचिते संपूर्णमस्तु. युव नाम संवत्सर मागमास षष्टीचे दिवसी समाप्त. शके १६७७ (इ.स. १७५५) होय. यांनी 'स्वानंदसिंधु' - ओवी संख्या १४१. या प्रकरणांत कवीनें शेवटी आपली परंपरा दिली आहे. तो असा : आदिनाथ - उमानाथ - ब्रह्मनाथ - विष्णुनाथ - चौरंगी - गणपती - नागनाथ - मच्छेंद्रनाथ - गोरखनाथ - अवघड - जालिंदर - गुलाबनाथ - गरीबनाथ - चिद्रूपनाथ - चींदडनाथ - चिदांबरी नाथ - विश्वनाथ - बाळनाथ - शंकरानंद अशी परंपरा देऊन परंपरा देण्याच्या पद्धतीचे दोन ओव्यांत समर्थन केले आहे.

त्या ओव्या -

*जयाचे ग्रंथान्वई । परंपरेची वार्ता नाहीं ।*
*तो पाषांडमती पाही । भेद ग्राही ग्राहीकु ॥१३३॥*
*आम्हा तयासी काय कारण । आम्ही परंपराची रक्षण ।*
*परंपरेवाचुनीया जीण । आम्हासी जाण असेना ॥१३४॥*

याही प्रकरणाच्या शेवटीं रचनाकाल दिला आहे.

*इति श्री चींदडबाळनाथ कृत । स्वानंदसिंधु तो अगत्य ।*
*पाहे जो का शिष्य सत्य । सद्‌गुरूरूप ।*
*ईश्वर नाम संवत्सर । माघमास कृष्ण पक्ष ।*
*येकादसी सोमवार ॥*

**७) श्रीमत् भगवद्‌गीता व्याख्यान**

**बाड क्रमांक : १३२५**

मूळ मराठी शब्दार्थासह.

लेखक : ''श्रीनिवास भगवंत चंदावरकर लेखनकाल : विक्रमनाम संवत्सरे चैत्रमासे शुक्लपक्षे प्रतिपदा गुरुवासरे कास्यां सर्वेश्वर संनिधौ''

म्हणजे बहुधा शक १७४२ (इ.स.१८२०). प्रत्येक अध्यायाच्या प्रथम पृष्ठावर ''रामचेंद्र गोसांवियांचे पुस्तक'' असे म्हटले आहे.

**८) गायनी कला - बाड क्रमांक : १२२०**

हे सबंध बाड गायनीकलेचे आहे. त्यात आरंभी तेरा पृष्टांत आदिताल, आनंद भैरवी, जुंझोटी, मोहन, शंकराभरणी, दरबार, कल्याणी, परज इ. रागांतील तत्प्रांतीय भाषेंतील पदें दिली आहेत. मग सरली असा मथळा असून त्याची दहा-पाच पृष्ठे आहेत.

**९) शरभेंद्र भूपाळ : बाड क्रमांक : १४७६**

शरभेंद्र भूपाळ कृत - किरातार्जुनीय आख्यान काव्य रचिले आहे. त्यात - पदें-५, श्लोक-११, वोवी-१, आर्या-२६, दोहरे-२, लावणी-१, सवाई-३, छंद-२, दिंडी-२ येकून-४३ ग्रंथरचना प्रकार आहे.

**बाड क्रमांक : १४८८**

शरभेंद्र भूपाल विरचित - १) उमा महेश्वरव्रत, २) कृष्णचरित्र आहेत.

**१०) तुलसीमाहात्म : बाड क्रमांक : १४७३**

*श्रीरामदास पंकजषटपद भीमाख्य देशिकेंद्राच्या ।*
*स्मृतिनें यापरि वदविलि कथा वदनिहुनि हि रामचंद्राच्या ॥*

# समर्थ वाग्देवता मंदिरातील हस्तलिखिते आणि नानासाहेब देव

*मधुकर रामदास जोशी, नागपूर.*

नानासाहेब ऊर्फ शंकर श्रीकृष्ण देव हे वि. का. राजवाडे, द. वा. पोतदार, ग. ह. खरे, ह. ना. नेने, वा. ना. देशपांडे प्रमाणे अग्रगण्य श्रेष्ठ संशोधक व संपादक होते. त्यांनी मराठी संशोधन क्षेत्र व पाठसंहिता संपादनाचे कार्य आपल्या कर्तृत्वाने उजळून टाकले. त्यासाठी त्यांनी स्वत:ला मराठ्यांच्या इतिहास संशोधनाला वाहून घेतले होते. परंतु, त्यांचे खरेखुरे कार्य रामदासी संप्रदायाच्या संशोधन क्षेत्रात आहे. १९१८ सालच्या हनुमान जयंतीला नानासाहेब चाफळला गेले होते. तेथे त्यांनी श्री समर्थ संप्रदाय जीर्णोद्धारादी कार्याचा संकल्प सोडला. (दि.२६-४-१९१८). त्या दिवसापासून समर्थ संप्रदाय व नानासाहेब एकजीव झाले. त्यांनी धुळे येथे सत्कार्योत्तेजक सभा स्थापन केली व कालांतराने समर्थ वाग्देवता मंदिर उभे केले. या मंदिरात त्यांनी जमविलेल्या सर्व प्रकारच्या ग्रंथप्रती व त्यांच्या नकला जशा आहेत तशीच हस्तलिखिते आहेत. यामध्ये मराठी, संस्कृत व हिंदी भाषेतील हस्तलिखिते आहेत. तसेच रामदासीच नव्हे, तर इतर संतांच्या व त्यांच्या परंपरेतील ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती आहेत. अशा या श्रीमंत व समृद्ध हस्तलिखितांच्या संग्रहांचा परिचय रामदासी संशोधन खंड १, २, ३, ४ नानासाहेबांनी सूचिरूपाने प्रसिद्ध केला. यापैकी चौथ्या खंडाचे संपादन त्यांचे नसले तरी त्यांतील सर्व हस्तलिखिते नानासाहेबांनी आपल्या संशोधनयात्रेतून मिळवलेली आहेत. तिसरा खंड केवळ संस्कृत हस्तलिखित सूचीचा आहे. याशिवाय खंड १, २, ४ मध्ये जागोजागी संस्कृत हस्तलिखितांची नोंद केलेली आहे. ती जमेस धरता सुमारे १५००-१८०० संस्कृत हस्तलिखिते त्यांनी जमवली. त्याकडे अद्यापही संशोधक, अभ्यासकांनी दुर्लक्ष केले आहे.

रामदासी संशोधन खंड ४ मधून देवांनी समग्र हस्तलिखितांची पद्धतशीर सूची सादर केली आहे व चारही खंड मिळून सलग क्रमांक दिले आहेत. रामदासी संशोधन खंड १ शके १८५५ कार्तिक शु.१५

या सूचीतील ६ हस्तलिखितांची माहिती परिपूर्ण देण्याची त्यांची पद्धत आहे. ती अशी -

१) बाड किंवा पोथीची पृष्ठसंख्या

२) त्याचा काल

३) बाड वा पोथीची सद्यस्थिती, उदा. उसवलेले महत्त्वाचे बाड, दुर्दशा पावलेले बाड, काही पृष्ठे नष्ट झालेले बाड, आरंभ व शेवट आहे की नाही, जीर्ण असलेली पोथी, केवळ फुटकळ उपलब्ध झालेली पाने. बाड किंवा पोथीतील गहाळ किंवा नष्ट झालेले पान व त्यांची संख्या, त्रुटित पत्र संख्या, एकापेक्षा अनेक रचना एकाच पोथीत आहे काय, उदा. क्र. ११९१ चे बाड,

बाडाची अवशिष्ट पृष्ठे, उदा. क्र. १२०३, काही पाने कोरी आहेत काय, बाड १२१६, किरकोळ बाड, मोडी लिपीतील मजकुराची नोंद, बाड किंवा पोथीचे उपलब्ध स्थळ, (बाड १८७२, गळांठा पोथा, बाड १५८, बाडावरील अभिप्राय, बाड, ६० व ६४ अशा पद्धतीने सर्व बाडांचा व पोथ्यांचा परिचय करून दिल्यामुळे मूळ पोथीचे स्वरूप स्पष्ट होते. एवढा तपशील देणारे दुसरे सूचीचे संपादक मला आढळले नाहीत.

रामदासी संशोधनाचे चारही खंड मिळून २२८७ + ८६३ एकूण ३१५० हस्तलिखिते होतात. यापैकी चौथ्या खंडाचे संपादक शिवाजी नरहर भावे आहेत. परंतु ही सर्व हस्तलिखिते नानासाहेब देवांनीच शोधयात्रा करून संकलित केलेली आहेत. म्हणून भावे यांचे संपादन कार्य जमेस धरूनही चौथ्या खंडासह हस्तलिखितांचे स्वरूप व विवेचन करताना डोळ्यांसमोर उभे राहातात ते नानासाहेब देव. तसे पाहिले तर हस्तलिखितांचे हे सूची कार्य हे एक संशोधन प्रकल्पाचे Research project कार्य असते. याचा अनुभव मी घेतला आहे. नागपूर विद्यापीठातर्फे हस्तलिखितांचा दुसरा सूचीखंड मी संपादित केला. त्यावेळी हस्तलिखितांची सूची व सूची कार्याच्या मूलभूत संशोधनाचे स्वरूप मला अनुभवाला आले. ग. ह. खरे यांनीही भारत इतिहास संशोधक मंडळातर्फे हस्तलिखित सूची (Catalogue) प्रसिद्ध केली आहे. या सूचीला सविस्तर प्रस्तावना असून क्रमांक, ग्रंथनाम, कर्तृनाम, रचनाकाळ, लेखक नाम, लेखनकाल, विषय व भाषादी वैशिष्ट्यांसह हस्तलिखित सूचीची सिद्धता केलेली आहे. कोणत्याही हस्तलिखित सूचीत क्रमांक (No) व अनुक्रमांक (Serial No) याचबरोबर ग्रंथनाम (Title) व लेखक नाम व नंतर नकलकार (copist) व टीकाकार (Commentator) याची नोंद असतेच असते. बहुसंख्य हस्तलिखितांच्या सूची पाहिल्या तर हस्तलिखितांची कशी नोंद केलेली आहे हे दिसून येते. परंतु देव संपादित चारही रामदासी खंड जरा वेगळ्या प्रकारचे आहेत, येथे ग्रंथनाम (Title) हा घटक सूचीसाठी निवड केलेला नाही. त्याऐवजी नानासाहेब देवांनी पोथी किंवा बाड याची निवड केली व त्यांना क्रमांक देऊन समग्र सूची सिद्ध केली. या सूची पद्धतीचा उगम नानासाहेबांच्या संशोधन अनुभवात आहे. बहुधा असे दिसते, की एका पोथीत वा बाडात काही वेळा एकापेक्षा जास्त बाडें आहेत. त्याप्रमाणे तशी नोंदही त्यांनी केलेली आहे. तथापि पोथी किंवा बाड निवडण्याचे माझ्या मते, कारण असे की, एकाच पोथीत किंवा बाडांत एकापेक्षा जास्त रचना व प्रकरणे आढळतात. याची हवी तेवढी उदाहरणें रामदासी संशोधन खंडातून दाखवून देता येतील. या प्रकारच्या सर्व रचनांत प्रकरणे एकाच बाडात असल्याने त्यांचे उपलब्धी स्थळ व हस्तलिखित संग्रहस्थान एकच आहे, हे ओघाओघाने स्पष्ट होते. मात्र केवळ पोथी व बाड व त्यांना क्रमांक देऊन हस्तलिखितांची सूची अन्यत्र कोठेही दिसून येत नाही. रामदासी संशोधन खंड हे एकमेव उदाहरण आहे.

या सूचीत पृष्ठमात्रा असलेले एकनाथी भागवत आहे. बाड ३९४, पृष्ठमात्रा असलेला गोरक्ष अमरनाथ संवादरचना माझ्या पाहाण्यात आहे. मराठी लेखांत पृष्ठमात्रांचा उपयोग केलेला आढळतो. ही पद्धत एकनाथांपर्यंत होती व ती प्राचीन अनेक ग्रंथ पृष्ठमात्रेत लिहिल्या जात असत. उपलब्ध पुराव्यावरून ही प्रत शके १५६८ मधील दिसते. पृष्ठमात्रेंत लिहिलेले भागवत हा दुर्मीळ प्रतीचा उत्कृष्ट नमुना आहे.

कोणत्याही हस्तलिखित संग्रह व सूचीची श्रीमंती व वैभव तेथील दुर्मिळ हस्तलिखिते (Rare Maanuscripts) व मूळ प्रती (Original copies) वर अवलंबून असते. समर्थ वाग्देवता मंदिरात अनेक दुर्मिळ हस्तलिखिते आहेत. बाड ६३३ निवृत्तिराम, बाड ६४८, ६४९, ६५०, ६५१, ६५२ ही हस्तलिखिते दुर्मिळ आहेत. तसेच क्र. ८६३ चे हस्तलिखित हनुमंत नाटकाच्या संदर्भात दुर्मिळ स्वरूपाची माहिती देणारे आहे. दुर्मिळ

हस्तलिखितांचा दुसरा त्याची लिपी अथवा पृष्ठमात्रा लेखनपद्धतीचा आहे. क्र. ३९४ एकनाथी भागवत अशा स्वरूपाचे दुर्मिळ हस्तलिखित आहे. ग्रंथ दुर्मिळ आहे की नाही हे ठरविण्याचा तिसरा निकष त्याच्या लेखन-काळाचा असतो. उदा. क्र. ६५५ ची महार्णव अभिधान ग्रंथांची प्रत शके १४८३ दुर्मति संवत्सर फाल्गुन शु. १५ बुधवारची आहे. आज मराठीत महानुभाव कवि दामोदराच्या वच्छहरणाच्या पोथीची शके १४५५ मधील प्रत उपलब्ध आहे. तत्पूर्वीचा वैद्यकीय ग्रंथ आहे. क्र. ६५५ची प्रत संस्कृत आहे. माझ्या संग्रही भागवताची शके १४५५ पूर्वीची ही प्रत आहे. स्थूलमानाने शके १५०० पूर्वीचे ग्रंथ व त्यांच्या प्रती दुर्मिळ समजल्या जातात. दुर्मिळ प्रतीचा चौथा प्रकार एखाद्या ग्रंथांची एकच व एकमेव प्रत असेल तर ती महत्त्वाची असते. क्र. ३२६ प्रतापसिंहाची बखर अशा पद्धतीचा ग्रंथ आहे. हस्तलिखितांची दुर्मिळ प्रत उपलब्ध होत असल्यास त्या ग्रंथांचा विस्तार, प्रसार व त्यांतील परिवर्तने समजून घेण्यास फार साहाय्य होते. असे कितीतरी ग्रंथ व त्यांच्या प्रती वेगवेगळ्या हस्तलिखित सूचीतून उपलब्ध होत असतात.

नानासाहेबांनी जी लाखमोलाची ग्रंथसंपदा संशोधन करून गोळा केली त्यापैकी लेखकाच्या ग्रंथांच्या मूळ व अस्सल प्रतींची उपलब्धी ही फार मोठी बाब आहे. उदा. बाड ७९०, १५८, ६३१, ६३३, ६१८, ६५३, ६५४ ही बाडे अस्सल व मूळ आहेत. नानासाहेब देवांनी समर्थांचे अस्सल मोडी पत्र मिळविले व ते छापले. तसेच समर्थलिखित वाल्मिकी रामायणाची प्रत मिळविली. ही प्रत फारच महत्त्वाची आहे. ही प्रत त्यांना बीड येथे गिरीधर यांच्या रामदासी मठात मिळाली. यावर लेखनकाल आहे. रामायणाची एक पाठ संशोधित आवृत्ती बडोदा येथून प्रसिद्ध झाली. पण त्यांना समर्थलिखित रामायण प्रतीची काहीच माहिती नव्हती असे दिसते.

समर्थलिखित रामायण प्रत अशी :

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथमकांड | सर्ग ६४ | श्लोक | २८५० |
| द्वितीयकांड | ८० | श्लोक | ४१७० |
| तृतीय कांड | ११४ | श्लोक | ४१५० |
| चतुर्थकांड | ६४ | श्लोक | २९२५ |
| पंचम कांड | ४३ | श्लोक | २०४५ |
| षष्ठकांड | ११२ | श्लोक | ४५०० |
| सप्तमकांड | ९० | श्लोक | ३९६० |
| सर्ग | ५६७ | श्लोक | २४,६०० |

१) शके सवंत १५४४ दुंदुभि नाम संवत्सर माघ शु. १३ शके आस्मिन् शुभदिने रामेण रामदासेण लिखितम् इदम् पुस्तकम्

२) अयोध्या शके १५७१ विरोधि फाल्गुन कृ. ७ राघवाणे ग्रंथ लिहिला.

३) सुंदरकांड शके १५४५ रुधिरोद्वारी संवत्सरे मार्गशीर्ष शु १ गुरूवासरे रामेण रामदासेन लिखितम् इदम् रामायणम् सुंदरकांड.

४) अरण्यकांड शके १५४४ दुंदुभि संवत्सरे माघ व १२ शके आस्मिन् शुभदिने रामेण रामदासेन सह गोपिनाथेन लिखितम् इदम् पुस्तकम्

५) किष्किंधाकांड शके १५४५ रुधिरोद्वारी संवत्सरे अश्विन व १० रामेण लिखितं इदम् पुस्तकम्

६) युद्धकांड श्रीमत् शके १५४६ रक्तांक्षी संवत्सरे वैशाख शु. ३ रामेण अलेखि

७) उत्तरकांड रामेण रामचरितम् प्राप्तं यदुकुलोद्भवम्। अनेन जगदिशोयम् रामचंद्र प्रसीदतु । शके १५६७ पार्थिव संवत्सर कार्तिक शु. १० शुभदिने कांड उत्तरम् समाप्तम्.

| | |
|---|---|
| (१) आदिकांड | शके १५४४ माघ मास |
| अरण्य | |
| किष्किंधा | शके १५४५ |
| सुंदरकांड | |
| सुंदरकांड | |
| युद्धकांड | शके १५४६ |

अशी ही ५ कांडे १५४४ माघ ते १५४६ वैशाख दरम्यान लिहिण्यात आली.

पुढे २१ वर्षांनी उत्तरकांड व १५७१ मध्ये अयोध्याकांड लिहिण्यात आले. रामेण, रामदासेन, रामेण, राघव व गोपीनाथ अशी चार नावे येतात. यापैकी राघव व राम ही समर्थांची नावे होत. गोपीनाथ त्यांचे साह्यकारी होते. माझ्या मते, रामेण रामदासेन नाममुद्रेने लिहिले गेलेले रामायण समर्थांनी लिहिले. राघव व राममुद्रेने झालेले लेखनकार्य समर्थांचे आहे काय हा संशोधन क्षेत्रातील प्रश्न आहे. तथापि बाड ६५३ व ६५४ वेगळेच प्रश्न उपस्थित करतात. रामेण रामदासेन ही नाममुद्रा समर्थांची आहे व रामी रामदास अशी नाममुद्रा त्यांच्या मराठी रचनेतही येते. रामेण रामदासेन, 'रामी' रामदास यामधील रामी हे रूप तृतीयेच्या 'ई' प्रत्ययाने सिद्ध होते. ह्या नाममुद्रेने सुगमोपाय नावाचा ग्रंथ श्रेष्ठांनी लिहिला आहे. (बाड ८७३) याशिवाय तिसगाव महंत दिनकराने स्वत:चा परिचय दिनकर रामी रामदास गोसावी या नावाने शके १५६४ मध्ये केला आहे. बाड ७८९ मात्र शके १५६४ पूर्वी शके १५४४ मध्ये रामी रामदास या नावाने समर्थ स्वत:ला म्हणवून घेत व त्याप्रमाणे त्यांनी रामायणाचे लेखनही केले आहे. येथे नमूद करणे आवश्यक आहे की, रामायणावर तिलक नावाची टीका लिहिणारा नागोजी भट्ट देखील 'रामी राम' असा उल्लेख करतो. रामायणाच्या या प्रतीमुळे समर्थ चरित्राचे काही पैलू स्पष्ट होतात. रामायण प्रतीचा उल्लेख करताना नानासाहेब देव म्हणतात की समर्थांनी वयाच्या १४ व्या वर्षी जनस्थान गोदावरीला रामायण लेखनाला प्रारंभ केला व त्याची समाप्ती मसूर शहापूर परिसरांत शके १५७१ मध्ये केली. पारंपरिक समजुतीप्रमाणे जनस्थान पंचवटीचे वास्तव नंतर तीर्थाटन आटोपून समर्थ चाफळ मसूर शहापूर परिसरांत शके १५६६ ला आले व शके १५७१ चाफळ येथे श्रीरामस्थान उभारले. यावेळी त्यांच्याजवळ त्यांनी लिहिलेली प्रत होती. अर्थात शके १५४४-७१ या काळात त्यांनी आपल्याजवळ रामायण प्रत मोठ्या श्रद्धेने सांभाळली होती. यावरून कृष्णा तीरावर येण्यापूर्वी जी काही मराठी ग्रंथनिर्मिती केली असेल त्या रचनेच्याही अस्सल व मूळ प्रती समर्थांच्या संग्रही असण्याची संभवनीयता नाकारता येत नाही.

रामायणाची प्रत बीड मठांत नानासाहेब देवांना उपलब्ध झाली. हा मठ गिरीधरांचा आहे. समर्थ-वेणाबाई-गिरीधर अशी त्यांची परंपरा आहे. माझ्या मते, रामायणाची प्रत समर्थांनी वेणाबाईंना दिली व त्यांच्याकडून शके १६०० मध्ये गिरीधरांना प्राप्त झाली.

रामदासी संशोधन खंडांतून हस्तलिखितांची नोंद करताना प्रतीचा लेखनकाळ व प्रतलेखक यांची संपूर्ण माहिती नानासाहेब देव देतात. कारण कोणत्याही हस्तलिखित सूचीचे ते अपरिहार्य अंग असते. प्रतलेखनिक हा हस्तलिखितांच्या प्रसरण कार्यातील एक महत्त्वपूर्ण घटक असून, काही वेळा तो मूळ संहितेविषयक महत्त्वाची माहिती देत असतो. काही हस्तलिखितावरील कालनिर्देश, कालगणना पद्धतीशी संबंधित असतात. सुहुर हे मुस्लीम कालगणना किंवा उत्तरेकडील विक्रम संवत्सरांचा उल्लेख नीट तपासून घेतल्याशिवाय निश्चित कालनिश्चिती करता येत नाही. काही वेळा समान नाममुद्रांमुळे ग्रंथ कर्तृत्व कोणाचे हा प्रश्न उपस्थित होतो, तर अनाम उल्लेखाने रचनाकार कोण असाही प्रश्न उपस्थित होतो. नानासाहेब देवांना अशा प्रकारच्या अडचणींची व समस्यांची पूर्ण जाणीव असल्याने त्यांनी सूचीत ठिकठिकाणी मार्गदर्शनपर टीपा दिलेल्या आहेत. काही वेळा असे दिसून येते की, एकच रचना किंवा ग्रंथ वेगवेगळ्या नावाने प्रचलित असतो. समर्थांच्या काही रचना वेगवेगळ्या नावाने प्रचलित होत्या. शं. श्री. देवांनी या प्रश्नाची योग्य दखल घेतलेली आहे.

इ.स. १९०५ साली शं. श्री. देवांनी डोमगाव मठातील दासबोधाची प्रत प्रसिद्ध केली. ही प्रत कल्याणलिखित आहे, अशी धारणा शं. श्री. देवांची होती. पुढे कालांतराने ती प्रत केवळ कल्याणलिखित

नसून, त्यात दोन-तीन व्यक्ती व प्रतलेखक सामील आहेत असे देवांनी प्रसिद्ध केले. त्यांचा लेख त्यांचे चिरंजीव गणेश शंकर देव यांनी प्रसिद्ध केला आहे. त्यामुळे आज प्रसिद्ध असलेली डोमगाव प्रत कल्याणलिखित नाही हे स्पष्ट झाले. मात्र कल्याणलिखित प्रत जर खरोखर असेल, तर ते एक संशोधनातील आश्चर्य मानावे लागेल. ही प्रत प्रसिद्ध करण्यामागे शं. श्री. देवांचे एक सैद्धान्तिक प्रमेय आहे. वि. का. राजवाडेंप्रमाणेच शं. श्री. देवांचे असे मत आहे की, ग्रंथकाराच्या समकालीन व परिवारांतील व्यक्तींकडून लिहिली गेलेली ग्रंथसंहिता (text) हीच प्रमाण व अधिकृत संहिता (Authentic text) असते. या सिद्धान्तानुसार त्यांनी दासबोध छापला. अधिकृत व प्रमाणसंहिता हीच स्वीकार्य असून, संपादकांनी या धोरणानुसार ग्रंथांचे संपादन करावे असे देव वारंवार सांगतात. रामदासी संशोधन खंडात ठिकठिकाणी सूचना किंवा अभिप्रायद्वारा हेच नमूद केले की, कोणत्याही ग्रंथांची शुद्ध, प्रमाण व अधिकृत संहिता छापलेली नाही. त्यांनी प्रसिद्ध केलेले रामदासी संशोधनाचे खंड व समर्थ वाग्देवता मंदिरांतील हस्तलिखिते मराठी हस्तलिखित शास्त्रांचा Manuscriptology अमूल्य ठेवा असून समर्थ संप्रदायाची माहिती देणारे आहे.



# रामदासी कीर्तन

**डॉ. यशवंत पाठक**
*संत ज्ञानदेव अध्यासन प्रमुख, पुणे विद्यापीठ, पुणे.*



या कीर्तनाचे आद्य जनक समर्थ रामदास होत. समर्थ फेटा बांधून कीर्तन करीत असल्याचा उल्लेख 'समर्थप्रताप' या ग्रंथात आढळतो. काही रामदासी कीर्तनकार फेटा बांधतात. तर काही शुभ्र वस्त्र नेसून रामदासी पद्धतीचे मानेला गाठ देणारे वस्त्र घालतात. बहुतेक चिपळ्या वापरतात. तर काही छोट्या झांजा बोटात घालून वाजवितात. समर्थांनी दासबोधात 'हरिकथालक्षणनिश्चयनाम' या नावाचा स्वतंत्र समास लिहिला आहे. यात कीर्तन प्रयोगाचा बारकाईने विचार केला आहे. 'सगुण रक्षून निर्गुण बोलावे' असा समर्थांचा आदेश आहे. कीर्तनातून लोकप्रबोधन होते. संस्कार घडतात. समाज सदाचारी होतो. म्हणून कीर्तन हे आवश्यक आहे. असे समर्थांचे मत आहे. लोकांना शहाणे करून सोडावे आणि लोकहितासाठी हरिदासांनी घडघडून हरिकथा करावी असे रामदास आग्रहाने दासबोधात सांगतात.

रामदासी कीर्तनात पूर्वरंग आणि उत्तररंग असे दोन भाग असतात. समर्थांनी कीर्तनाची सांप्रदायिक परंपरा पुढीलप्रमाणे सांगितलेली आहे.

*आदिनारायण सदगुरु आमुचा।*
*शिष्य ज्याला त्याचा महाविष्णु ।।१।।*
*तयाचा तो शिष्य तो जाणावा हंस ।*
*तेणें ब्रह्मयास उपदेशिलें ।।२।।*
*उपदेश केला त्यावरी वसिष्ठा । तेथे धरा निष्ठा शुद्ध भावी ।।३।।*
*वसिष्ठे उपदेशिलें श्रीरामयासी । रामें रामदासीं उपदेशिलें ।।४।।*
*उपदेश देउनि दीधला मारूती । स्वयें रघुपती निरवीला ।।५।।*
*निरविला तेणे जालो रामदास । संसारी उदास जीवेभावें ।।६।।*
*म्हणोनि आमुचे कुळी कुळदैवत । राम हनुमंत आत्मरूपी ।।७।।*
*आत्मरूपीं जाला रामीरामदास । केला उपदेश दीनोद्धारा ।।८।।*

रामदासी कीर्तनात ही परंपरा बुवा म्हणतात आणि मग पुढीलप्रमाणे नमन गातात.

*रामदास कल्याण । रामा हो जयरामा ।*
*पतितपावना । पूर्ण कामा हो ।।१।।*
*नाथा हो दीनानाथा । तुमचे चरणी राहो माथा ।।२।।*
*बंधु हो दीनबंधु हो । रामकृपा, रामदास, दयासिंधु होऽऽ।।३।।*

यानंतर 'जय जय रघुवीर समर्थ' असा बुवा जयघोष करतात. रामाचा, मारुतीचा जयजयकार होतो. मग 'रामदास माउली दया करि। रामदास माऊली ।।' असे सामुदायिक भजन करतात. रामदासी बुवा आपल्या आडनावापुढे रामदासी असे पद लावतात. उदा. नारायणबुवा रामदासी, अण्णाबुवा रामदासी, कानिटकरबुवा रामदासी, दिनकरबुवा रामदासी इ.इ. काही बुवा पूर्वरंगनिरूपणात दासबोधातील निवडक ओव्या गातात. तर काही रामदासी निरूपणासाठी मनाचे श्लोक घेतात. काही समर्थ गाथेतील अभंग म्हणतात. त्यांच्या निरूपणात समर्थ साहित्याचा मुबलक आढळ

होतो. 'रामचंद्र-गंगाधर-समर्थ' या तीन नावांचा कीर्तनात सतत जयघोष होतो. पूर्वरंगनिरूपणात रामगीता, योगवासिष्ठ, रामायण, भागवत, गीता, श्रीधरस्वामींचा रामपाठ यांचा उपयोग बुवा करतात. वेदान्त, भक्ती, प्रयत्न, अभ्यास आणि प्रचीती ही समर्थांनी सांगितलेली 'पंचपदी' निरूपणात असते. समर्थांचे कर्मयोगाचे तत्त्वज्ञान, समर्थांचा भक्तिविचार, रामोपासना हेही यात येते. 'ज्ञान-बल-शील' ही त्रिवेणी समाजात कायम असावी या हेतूने निरूपण असते. निरूपण संपते. पुन्हा एकदा समर्थांचा गजर होतो. बुवांना पुजारी बुक्का लावतात. त्यांच्या गळ्यात हार घालतात. सगळ्या श्रोत्यांना पुजारी बुक्का लावतात. पुढील भजने बुवा श्रोत्यांना म्हणायला सांगतात. काही भजने विशिष्ट वारी म्हणण्याची प्रथा आहे.

*'गुरू महाराज गुरू । जय जय परब्रह्म सदगुरू ॥'*
*'राम राम राम जय सीताभिराम । जय सीताभिराम ॥'*
*'नारायणविधि वसिष्ठ राम । रामदास कल्याणधाम ॥'*
*'राम लक्ष्मण जानकी । जय बोलो हनुमानकी ॥'*
*'पावना रामा । पतितपावना रामाऽऽ ॥'*
*'राम राघव राम राघव राम राघव पाहि माम् ॥'*
*'कृष्ण केशव कृष्ण केशव कृष्ण केशव त्राहि माम् ॥'*
*'सीतारमणा रावणारी । तारी मज दुस्तर संसारी ॥'*
*'सदगुरुनाथ श्रीगुरुनाथ । मी अपराधी घ्या पदरात ॥'*

पूर्वरंगनिरूपणानंतर बुवांना विश्रांती मिळावी म्हणून पेटीमास्तर एखादे पद वा अभंग म्हणतात. त्याला बुवा बारीक टाळ वाजवितात. बुवांना तेवढी विश्रांती मिळते. मनात आख्यानाची रचना सुरू होते. पेटीमास्तरांचे पद संपते. तेव्हा बुवा रामनामाचा गजर करतात. कधी 'समर्थ सद्‌गुरू माझे आई । मजला ठाव द्यावा पायी ॥' हे भजन म्हणतात. भजनाची लय वाढत जाते. बुवा श्रोत्यांसमोर भजनात तल्लीन होतात. तबला घुमू लागतो. पखवाज डोलू लागतो. संवादिनी भजनात नाचू लागते. भजनाने आख्यानाची पार्श्वभूमी तयार होते. पूर्वरंग ऐकून काही श्रोत्यांची डुलकी निघून जाते. कथा श्रवणाला श्रोते आपले मन तयार करतात. भजनाने पुन्हा एकदा ताजेपणा येतो आणि मग रामदासी कीर्तनाचा उत्तररंग सुरू होतो.

उत्तररंगात रामदासीबुवा रामायण, समर्थ चरित्र, समर्थ भक्तांची आख्याने सांगतात. यात ज्ञान, भक्ती, कर्म हे केंद्रबिंदू मानून बुवा आख्यान सांगतात. आख्यानात प्रामुख्याने भक्तिरस, करुणरस, वीररस, हास्यरस हे रस विशेष करून येतात. आख्यानातील संवाद प्रभावी असतात. वर्णन प्रसंगानुसार बुवा करतात. आख्यानातून श्रोत्यांना विशेष प्रकारचा बोध मिळतो. पूर्वरंगाचे मूळसूत्र आख्यानाला बुवा जोडतात. आख्यानात आर्या, पदे, सांकी, दिंडी आदी विविध वृत्ते असतात. काही पदे विविध रागदारीतली असतात. विशेषत: समर्थ रामदासांचे संगीतातील राग बुवा गातात. यात राग काफी, आसावरी, बागेश्री, भूप, दुर्गा, मालकंस यांसारख्या मुख्य रागांचा समावेश असतो. समर्थ परंपरेतल्या पारंपरिक चाली बुवा गातात. समर्थांनी 'धन्य ते गायनी कळा' असे म्हटले आहे. गायनाने श्रोत्यांना अद्‌भुत शक्ती येते. मन सकारात्मक होते. विचाराला योग्य लय सापडते आणि प्रपंचाला ताल मिळतो. त्यामुळे बेताल होत नाही. काही रामदासी बुवा पायात चाळ बांधून भक्तिनृत्य करतात. विशेषत: कानिटकरबुवा संत वेणाईचे आख्यान सांगताना किंवा संत मीरेचे आख्यान सांगताना भक्तिनृत्य करीत असत. आख्यान उत्सुकतेच्या वळणावर संपवायचे. बुवांचे कथन कौशल्य प्रभावी असते. आख्यानातील उत्कट प्रसंग एका उच्च बिंदूवर बुवा आणून ठेवतात. तेव्हा बुवांची कथा मूळ पदावर येते. पूर्वरंगाचे सूत्र इथे बुवा आख्यानात गुंफतात. यानंतर समर्थांच्या चरित्रातील छोटी, नेमकी उद्‌बोधक कथा सांगतात. ही कथा लोकमनावर सुपरिणाम करणारी असते. यानंतर बुवा निरूपणाचा मूळ अभंग भैरवी रागात म्हणतात. या सुरात संप्रदायातले पुढील श्लोक हात जोडून श्रोत्यांसह बुवा म्हणतात.

*भव्यरूप अतिसुंदर दीक्षा । रामनामस्मरणे करि भिक्षा ।*
*वृत्ति होइल उदासिन जेव्हा । रामदास म्हणणे मग तेव्हा ।।*

किंवा

*शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें । वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें ।*
*कवी वाल्मिकीसारिखा मान्य ऐसा ।*
*नमस्कार माझा सद्‌गुरू रामदासा ।।*

हे श्लोक संपतात. बुवांसह श्रोते श्रीरामांचा, श्रीमारुतीरायांचा, श्रीसमर्थांचा उद्‌घोष करतात. यानंतर काही रामदासी कीर्तनकार पुढील पदातून प्रार्थना करतात.

*झाले कीर्तन शेवट गोड करा ।*
*मनीं धरा श्रीजानकीच्या वरा ।।*
*कीर्तनरंगी वाजवा कर टाळी ।*
*नामघोषें पातका होय होळी ।*
*येथुन कल्याणसाम्राज्य सुखराशी ।*
*अवघे उठा ओवाळा राघवासी ।।*

या पदानंतर बुवा श्रीगणपतीची, श्रीरामांची, मारुतीची, समर्थांची आरती म्हणतात. यानंतर ‘शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें....’ हा श्लोक म्हणतात. आरती श्रोत्यांमध्ये फिरवितात. बुवा देवाला साष्टांग घालतात. काही बुवा भगव्या रंगाची कफनी घालतात. बाकीचा पोशाख पांढरा शुभ्र असतो. काही बुवा नमनात समर्थांबद्दलचे पद गातात. ते असे -

*रामदास माऊली । दया करि ।।धृ.।।*
*जगदुद्धरास्तव अवतरली । सज्जनगडी राहिली ।*
*माय माझी, रामदास माउली ।।१।।*
*पायि खडावा वाजति चट्‌चट । भक्तांस्तव धांवली ।*
*माय माझी, रामदास माऊली ।।२।।*
*भ्रुकुटी अवाळूं सुहास्य मूर्ति । रामनामीं रंगली ।*
*माय माझी, रामदास माऊली ।।३।।*
*अंगीं मेखळा दिव्य विसर्जित । कुबडी करिं शोभली ।*
*माय माझी, रामदासी माऊली ।।४।।*

काही रामदासी कीर्तनकार ऐतिहासिक आख्याने लावतात. हा राष्ट्रीय कीर्तनकारांचा एक वेगळा प्रवाह आहे. राष्ट्रोद्धार आणि देशभक्ती ही लोकमनावर बिंबविली पाहिजे. या हेतूतून ऐतिहासिक आख्यान परंपरा निर्माण झाली. राष्ट्रीय कीर्तनाचे आद्यजनक वाईचे प्रख्यात डॉ. दत्तोपंत पटवर्धनबुवा यांनी ऐतिहासिक कीर्तनपरंपरा निर्माण केली. त्यांनी ऐतिहासिक चरित्रे लोकमान्य टिळकांच्या सांगण्यावरून कीर्तनात आणली. यातून श्रोत्यांना देशभक्तीची प्रेरणा मिळाली. ‘धर्म स्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार । झाले आहेत पुढे होणार । देणे ईश्वराचे ।।’ या समर्थांच्या वचनाचा प्रत्यय ऐतिहासिक आख्यानातून बुवा प्रभावीपणे सांगत. डॉ. दत्तोपंत पटवर्धनबुवा, गौतमबुवा पाठक, गोविंदस्वामी आफळे, वासुदेवबुवा देशपांडे, गोविंदबुवा देव, सदाशिवबुवा शिरवळकर, चिंतामणीबुवा शिरवळकर आदी मान्यवरांनी ही परंपरा समृद्ध केली. समर्थ रामदासांनी श्रीरामांना केलेली निर्वाणीची प्रार्थना यांनी महाराष्ट्रभर पोहोचविली. उत्तर भारतात या प्रार्थनेचा प्रसार केला. ही प्रार्थना आजही रामदासीबुवा कीर्तन प्रयोगाच्या समारोपात म्हणतात. ती अशी -

*कल्याण करी देवराया । जनहित विवरी ।।ध्रु.।।*
*तळमळ तळमळ होतचि आहे । हे जन हातीं धरी ।।१।।*
*अपराधी जन चुकतचि गेले। तुझा तूचि सावरी ।।२।।*
*कठिण त्यावरी कठिण आले । आता न दिसे उरी ।।३।।*
*कोठें जावें काय करावें । आरंभिली बोहरी ।।४।।*
*दास म्हणे आम्ही केले पावलो । दयेसि नाहीं सरी ।।५।।*

काही कीर्तनकार दर गुरुवारी कोरडी भिक्षा मागतात. ही भिक्षा धान्य किंवा पीठ या स्वरूपात असते. भिक्षेआधी मनाचा एखादा श्लोक बुवा म्हणतात, ‘जय जय रघुवीर समर्थ’ असा जयजयकार करतात. बुवा झोळीत धान्य, पीठ घेतात. या भिक्षेचा विनियोग गरिबांना अन्नदानासाठी होतो. सुंदरबुवा मराठे, कमलाकरबुवा औरंगाबादकर, शिरवळकरबुवा अशा प्रकारची भिक्षा घेत. त्यांच्यापाशी असलेल्या झोळीला समर्थ झोळी म्हणत. भिक्षेच्या निमित्ताने

समाज एकत्र करणे. समाजात बंधुभाव निर्माण करणे. आपण सारे एक आहोत, ही जाणीव निर्माण करणे. या महत्त्वाच्या बाबी होत्या. काही रामदासी कीर्तनकार, ज्या गावात जात, त्या गावात प्रभातफेऱ्या काढीत. प्रभातफेरीत समर्थांच्या भूपाळ्या आणि 'श्रीराम जय राम जय जय राम' असा गजर होई. काही समर्थरचित पदे म्हटली जात. युवकांमध्ये जागृती निर्माण व्हावी. गाव सुसंस्कार-संपन्न व्हावा. हा यामागचा उद्देश होता. कीर्तनकार हा समाजातील लोकशिक्षक आहे. भक्तीबरोबर शक्तीची उपासना रामदासी परंपरेने महत्त्वाची मानली. काही रामदासी कीर्तनकारांनी स्वकृत पदरचना केली. ती रामदासी कीर्तनात म्हटली. रामदासी कीर्तनाने पूर्वरंग आणि उत्तररंग यांची सांगड घातली. तेजस्वी पिढी कीर्तनातून निर्माण व्हावी. हा या कीर्तनपरंपरेचा ध्यास होता. अनेक रामदासी कीर्तनकार महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात तयार झाले. काही रामदासीबुवांनी पुढील पिढींना कीर्तनाची संथा दिली. गावांनी कीर्तनकारांना उचित सन्मान दिला. गावोगावी कीर्तनकारांनी मारुतीची उपासना तरुणांपुढे मांडली. शक्ती आणि युक्ती ही श्रेष्ठ आहे. पण या दोन्हींचा मिलाफ राष्ट्राला बलिष्ट करतो. यातून सदाचारी समाज निर्माण होतो. प्रयत्न, प्रबोध, प्रचीती, परंपरा, परिवर्तन हे रामदासी कीर्तनाचे पंचप्राण आहेत. या कीर्तनपरंपरेने अनेक नामवंत कीर्तनकार दिले. ही कीर्तने ऐकून स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याची प्रेरणा अनेक राष्ट्रीय नेत्यांना मिळाली. हा इतिहास आहे.

रामदासी कीर्तन हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. समाजाला योग्य ती दिशा मिळण्यासाठी समर्थांनी कीर्तन महत्त्वाचे मानले. समर्थ कीतर्नाचे उत्कृष्ट दिग्दर्शन करतात. कीर्तनाने अनेक लाभ घडतात. ते लाभ समर्थांनी नि:शंक मनाने सांगितले आहेत. उदा. कीर्तनाने महापातके नाहीशी होतात. उत्तम गती मिळते. मोक्ष प्राप्त होतो. वाणी पवित्र होते. माणूस सत्यशील होतो. प्राणिमात्र सुशीतल होतात. मन एकाग्र होते. आत्मबुद्धी प्रयत्नशील राहाते. यत्न श्रीराम होतो. कर्तव्य पूजा होते. स्वभाव सामाजिक होतो. म्हणून कीर्तनाचा महिमा अगाध आहे. सर्व तीर्थे कीर्तनात राहातात. समाजाला शुद्ध करण्याचे कीर्तन हे चांगले संपर्क साधन आहे. भक्तिप्रेमाचे दर्शन कीर्तनातून दिसते. म्हणून प्रभू श्रीरामांना कीर्तन अत्यंत प्रिय आहे. कीर्तन ही भगवंताची मानसपूजा आहे. कलियुगात कीर्तनाने माणूस तरतो. यश, कीर्ती मिळवितो. परमात्म्याचे वर्तन आवडीने करतो. नाना कथा ऐकतो. मनाला चांगल्या गोष्टींची सवय लावतो. भक्ती, ज्ञान, वैराग्य अंगी बाणतो. हे कीर्तनाचे सामर्थ्य आहे. समर्थ आपल्याला समोर ठेवून सांगतात -

*भगवंतास कीर्तन प्रिय । कीर्तनें समाधान होय ।*
*बहुत जनांसी उपाय । हरिकीर्तनें कलियुगी ॥ दास.७-४-२॥*
*यशकीर्तिप्रतापमहिमा । आवडीं वर्णावा परमात्मा ।*
*जेणें भगवद्‌भक्ताचा आत्मा । संतुष्ट होय ॥ दास.४-२-९॥*
*ताळ मृदंग हरिकीर्तन । संगीत नृत्य तानमान ।*
*नाना कथानुसंधान । तुटोंचि नेदावें ॥११॥*
*करुणाकीर्तनाच्या लोटें । कथा करावी घडघडाटें ।*
*श्रोतयांची श्रवणपुटें । आनंदे भरावीं ॥१२॥*
*कंप रोमांच स्फुरणे । प्रेमाश्रुसहित गाणें ।*
*देवद्वारीं लोटांगणे । नमस्कार घालावें ॥१३॥*
*पदें दोहडे श्लोकप्रबंध । धाटी मुद्रा अनेक छंद ।*
*वीरभाटीव विनोद । प्रसंगें करावें ॥१४॥*
*नाना नवरसिक शृंगारिक । गद्यपद्याचे कौतुक ।*
*नाना वचने प्रास्ताविक । शास्त्राधारें बोलावी ॥१५॥*
*भक्तिज्ञानवैराग्यलक्षण । नीतिन्यायस्वधर्मरक्षण ।*
*साधनमार्ग आध्यात्मनिरूपण । प्रांजळ बोलावें ॥१६॥*
*पूर्वपक्ष त्यागून सिद्धान्त । निरूपण करावें नेमस्त ।*
*बहुधा बोलणें अव्यक्त । बोलोचि नये ॥१८॥*
*करावें वेदपारायण । सांगावें जनासी पुराण ।*
*मायाब्रह्मीचे विवरण । साकल्प वदावें ॥१९॥*

(श्री. दासबोध. सरकारी प्रत, पृ. १३१)

# दासबोध : परिवर्तनाचे प्रभावी साधन

***श्रीनिवास रायरीकर, पुणे.***

*भ्रमणध्वनी : ९८२२२०४५१६ ई-मेल : spiritualmanagement@eth.net.*

अनेक वर्षांपासून 'दासबोध' व इतर आध्यात्मिक ग्रंथांचा परिचय होताच; परंतु १०-१५ वर्षांपूर्वीपासून योगायोग व समर्थांच्या इच्छेने जीवन दासबोधमय झाले. नोव्हेंबर १९९८ च्या 'समर्थ संदेश' मध्ये लेख लिहिण्याच्या निमित्ताने व पुढे समर्थ व्यासपीठ संस्थेतर्फे प्रवचने व व्याख्याने काही प्रमाणात दिली. या सगळ्यांचा गाभा 'दासबोधातील व्यावहारिक शिकवण' असा होता. नंतर योगायोग असा आला की, सुदर्शन केमिकल्स लि. येथील मॅनेजर्ससाठी व्याख्याने द्यायचे निमंत्रण मिळाले. त्यांनी 'जपानी मॅनेजमेंट' इ. विषय बाजूला ठेवून समर्थांनी बुद्धी दिल्याने पाठवलेला माझा 'Leadership & Dasbodh' हा विषय इतर विषयाची पाठवलेली यादी दुर्लक्षित करून अपेक्षित नसताना निवडला. हे व्याख्यान २० मार्च १९९९ रोजी झाले व सर्व अधिकारीवर्गाला ते फारच आवडले व प्रभावी वाटले. यात दासबोधातील अनेक व्यवस्थापन तत्त्वे उलगडून सांगायची असल्याने दासबोधाचा 'मॅनेजमेंट शास्त्र' या अंगाने तपशिलात अभ्यास करण्याचा योग आला. व्यवस्थापन शास्त्राचा अभ्यास व अनुभव असल्याने व दासबोधाच्या सखोल अभ्यासाने समर्थ कृपेने तो अभ्यास जास्त तपशिलात व कारखान्यांमध्ये, सर्व्हिस इंडस्ट्रीत, कॉलेजेस व इतर सर्व कामाच्या व व्यवस्थापनाच्या ठिकाणी प्रत्यक्षात कसा उपयोगी ठरेल या अंगाने केला गेला. पुढे मी वरिष्ठ संचालक म्हणून काम करीत असलेल्या मराठा चेंबर ऑफ कॉमर्स या उद्योजकांच्या सुप्रसिद्ध संस्थेत तसेच रोटेरियन असल्याचे निमित्त होऊन अनेक रोटरी क्लबमध्ये व त्यानंतर आपोआपच अनेक कारखान्यांमध्ये व कॉलेजेस इ. अनेक संस्थांतर्फे शेकडो निमंत्रणे येत गेली. समर्थांची खरोखरीच कृपा की, त्यांच्या इच्छेने व आशीर्वादाने तसेच मॅनेजमेंट व अध्यात्म दोन्हीच्या अनेक वर्षांच्या अनुभव व अभ्यासाच्या संयोगाने आजपर्यंत ७०० (सातशे) पेक्षा जास्त कार्यक्रम 'दासबोधातील व्यवस्थापन शास्त्र/नेतृत्व विकास/व्यक्तिमत्त्व विकास' अशा नावाने व मुख्यत: 'परिवर्तनातून विकासाकडे' या अंगाने केले गेले. यात ५०० (पाचशे) पेक्षा जास्त पूर्ण दिवसाच्या कार्यशाळा टाटा मोटर्स. फोर्स मोटर्स, फिनोलेक्स, किर्लोस्कर न्युमॅटिक, जी. के. मान, सिंटर्स, जनरल मोटर्स, जे.सी.बी., थरमॅक्स, महिन्द्र अशा अनेक मोठ्या तसेच इंडो-शॉटले, लॉकिम इ. अनेक मध्यम व लघु उद्योगात माझ्याकडून केल्या गेल्या व त्या खूप गाजल्या. त्याचा 'फिडबॅक' खूपच चांगला/उत्कृष्ट आला. सीनिअर मॅनेजमेंट सुपरवायझर्स व कामगार इ. साऱ्यांसाठीच्या शेकडो कार्यशाळाद्वारे दासबोध आता अनेक उद्योग/कारखान्यात शॉप फ्लोअरपासून

उच्चाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचलाय. यासंबंधी दूरदर्शन, आकाशवाणी, नॅशनल एज्युकेशन, टी.व्ही., वसंत व्याख्यानमाला या नाशिक व पुण्याच्या प्रसिद्ध व्याख्यानमाला, सज्जनगड संस्थान, धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिर, अनेक नामवंत संस्था, न्यायालये, कॉलेजेस, असोसिएशन्स इ. अनेक माध्यमांद्वारे समाजातील विविध स्तरांत 'दासबोधातला व्यवस्थापनविषयक व परिवर्तनातून विकासाची दिशा' हा विचार पोहोचवता आला व हे कार्य अव्याहत चालू आहे. यासाठी 'दासबोध पुरस्कार, सज्जनगड संस्थानचा 'समर्थ रामदासस्वामी पुरस्कार' इ. देखील प्राप्त झाले व उत्साह वाढला. या कार्यक्रमामुळे मनामनात व कामाच्या जागी व त्या व्यक्तींच्या घराघरात प्रत्यक्ष सकारात्मक बदल झालेत व होत आहेत. ते किती प्रमाणात झाले हा अभ्यासाचा विषय असला, तरीही त्याचा प्रभाव व प्रत्यक्ष (काही प्रमाणात असतील) असे झालेले बदल ही सिद्ध झालेली गोष्ट आहे. याचे बरेच पुरावे पण माझ्याकडे आहेत. यात ट्रेनिंगच्या दिवशी ट्रेनिंग फिडबॅक फॉर्म सहभागी कर्मचारी भरून देतात त्यात ते दिसतातच. अशा काही हजार फिडबॅकच्या फोटोकॉपी माझ्याकडे आहेत. अनेक-जण प्रत्यक्ष वा फोनवर दासबोध कार्यक्रमाचा कामाच्या ठिकाणी, वैयक्तिक व घरात कसा उपयोग झाला हे सांगतातच, पण काही जणांनी पाठवलेल्या प्रतिक्रिया व पत्रे बोलकी आहेत ज्यात त्यांना झालेल्या उपयोगाचे व परिवर्तनाचे तपशील आहेत. एका कंपनीने तर पूर्ण ५२० लोकांचे (व्यवस्थापक व कामगार) जवळपास २४ कार्यक्रम घेतले व त्याचा अभ्यास सहा महिन्यांनंतर 'प्रत्यक्ष बदल' झाले का, किंवा फक्त कार्यक्रमाच्या दिवसापुरताच प्रभाव राहिला हे तपासण्यासाठी मुद्दाम एजन्सी नेमून करून घेतला आणि त्याचा एक अहवाल तयार केला. (माझ्याकडेही त्याची एक प्रत पाठवली.) आश्चर्य म्हणजे मध्यंतरात कोणताही फॉलो अप प्रोग्राम न करताही प्रशिक्षण घेतलेल्यांमध्ये व्यसन जाण्यापासून कामाच्या पद्धती, टाईम मॅनेजमेंट, हाऊसकीपिंग, स्वच्छता, नवीन कौशल्ये व शिक्षण घेणे, कामाच्या जागी व घरात रिलेशन्स सुधारणे इ. अनेक बाबतींत प्रत्यक्ष सुधारणा झाल्या असे लक्षात आले. मला वाटते यावरून आधुनिक जगात कारखान्यांसारख्या ठिकाणी सुद्धा 'दासबोध' केवढे 'परिवर्तन व विकास' घडवून आणतो हे सिद्ध होते. समर्थांच्या विचारधनाचे हे महत्त्व व प्रभाव लक्षात येऊन मन आपोआपच नतमस्तक होते!

काही प्रत्यक्ष प्रतिक्रिया व पत्रे यातील काही मुद्दे मी मुद्दाम उद्धृत करतो. (कारखाने व व्यक्तींची नावे देण्याचे मी मुद्दाम टाळत आहे. ज्यांना प्रत्यक्ष पुरावा हवा आहे त्यांनी माझ्याशी संपर्क साधावा.) अनेक कारखाने/कंपन्यांची माझ्याकडे पत्रे आहेत ज्यात त्यांनी मी विविध कारखान्यांत घेत असलेल्या 'सुपर हॅबिटस् ऑफ दासबोध' या पूर्ण दिवसाच्या प्रशिक्षण वर्गाविषयीच्या (ज्या ५०० हून अधिक झाल्यात) अनेक सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या आहेत. त्यातील काही कमीत कमी शब्दांत खाली देत आहे.

१) 'कर्मचाऱ्यांना कार्यक्रम खूप आवडला व त्यांच्या जीवनातील वैयक्तिक, सामाजिक व कौटुंबिक बाबतीत अतिशय उपयुक्त वाटला.'

२) 'सर्व अधिकारीवर्गाला दासबोधातील ओव्या कामाच्या ठिकाणी खूप चपखल/अचूक वाटल्या.'

३) 'सहभागी युनियन लीडर्सकडून कार्यक्रमाच्या विषयी अत्यंत चांगल्या व कौतुकाच्या प्रतिक्रिया मिळाल्या. नेतृत्व व व्यक्तिमत्त्व विकास, सकारात्मक दृष्टिकोन, संघभावना, चांगले परस्परसंबंध व संवाद, चांगल्या सवयी अशा अनेक विषयांवरील अत्यंत प्रभावी प्रशिक्षण मिळाले. समर्थ रामदास स्वामींचे विचार प्रशिक्षणार्थींच्या थेट हृदयात जाऊन पोहोचले. त्यांनी बदल व विकासाच्या अनेक कृतियोजना स्वेच्छेने व कमिटमेंटने बनविल्या आहेत.

४) 'या कार्यक्रमाचे व त्यातील ज्ञानाचे फार मोठे योगदान आमच्या कारखान्यातील परिवर्तनाच्या कार्यक्रमासाठी होत आहे. यामुळे कारखान्याच्या दैनंदिन कामात व वैयक्तिक जीवनावर फार मोठा सकारात्मक परिणाम घडल्याचे कामगार सांगत आहेत.'

५) 'स्वत:शी निगडित दैनंदिन काम सुधारण्यासाठी अंतर्मुख करणाऱ्या विषयावर एक चांगले प्रशिक्षण मिळाल्याची सर्वांची प्रामाणिक भावना आहे.'

६) 'डिसेंबर २००४ ते फेब्रुवारी २००५ या दरम्यान ४०० कर्मचाऱ्यांचा समावेश असलेल्या २० प्रशिक्षण वर्गात घेतलेल्या 'सुपर हॅबिट्स ऑफ दासबोध फॉर पॉझिटिव्ह वर्क कल्चर व सेल्फ डेव्हलपमेंट' या कार्यक्रमामुळे 'परिवर्तन व विकास' या गोष्टीला चांगलीच चालना मिळाली, जी बदलत्या स्पर्धेच्या युगात आम्हाला आवश्यक वाटते.

७) 'आम्हाला आमच्या कंपनीत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे व टिकवणे ही गरज वाटते व तुमचा 'दासबोधावरील कार्यक्रम' हे त्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे.'

८) 'तुमच्या दासबोधाचे सार व विचार सांगण्याच्या पद्धतीमुळे प्रशिक्षणार्थींना त्या समजण्यास सोप्या व अत्यंत स्फूर्तिदायी वाटल्या.'

९) 'आमच्या व्यवस्थापकांना अंतर्मुख होऊन व्यवस्थापनाची स्वत:ची पद्धत विकसित करायला नक्की मदत होईल असा उपयुक्त कार्यक्रम वाटला.'

१०) 'आम्ही आपणास कळवू इच्छितो की आपल्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित झालेल्या पहिल्या बॅचचा फिडबॅक आम्हाला सकारात्मक मिळाल्याने पुढील आणखी कार्यक्रम करण्यासाठी आम्ही आपणास निमंत्रित करत आहोत.'

११) 'व्यवस्थापनाला सर्व स्तरांवरील व्यवस्थापकांच्या कौतुकाच्या प्रतिक्रिया (आपल्या दासबोध कार्यक्रमाविषयीच्या) आल्या आहेत आणि आपण कार्यक्रमात सुचविलेल्या अनेक पद्धती त्यांनी अमलात आणणे सुरू केले आहे.'

१२) 'पाश्चात्त्य वाटणारे अनेक व्यवस्थापन शास्त्रातले सिद्धांत हे त्यापूर्वीच आपल्या परंपरेत व ग्रंथात चांगलेच रुजलेले होते असे लक्षात आले.'

१३) 'अनेक कर्मचाऱ्यांशी बोलल्यानंतर असे लक्षात आले की, श्री समर्थ रामदास स्वामींची शिकवण त्यांच्या मनात यशस्वीपणे रुजवण्यात आली त्यामुळे त्यांचे कामावरील व वैयक्तिक जीवन यशस्वी होण्यास मदत होईल.'

१४) 'प्रशिक्षणार्थींकडून मिळालेल्या प्रतिक्रिया अतिशय उत्साहवर्धक होत्या व असे कार्यक्रम नियमित घेण्याची इच्छा आहे.'

१५) 'पीटर ड्रकर व इतर आधुनिक व्यवस्थापन तज्ज्ञांचे व्यवस्थापनविषयक विचार समर्थ रामदासस्वामींनी अनेक ओव्यांत आधीच सांगून ठेवलेले पाहून आम्ही थक्क झालो.'

१६) 'कार्यक्रम अत्यंत विचारप्रवर्तक होता आणि आमच्या व्यवसायाच्या व व्यवस्थापनाच्या दिशा ठरवताना याचा खूप उपयोग होईल.'

१७) 'आपल्या अभ्यासपूर्ण भाषणाने आपण आमच्या सभासदांना व कुटुंबीयांना खिळवून ठेवले व प्रत्येकाला दासबोध वाचण्यासाठी एक वेगळी दिशा व प्रेरणा मिळवून दिलीत.'

१८) एका प्रसिद्ध विद्यालयाच्या मुख्याध्यापकांची प्रतिक्रिया - 'शिक्षक हा नेता असतो व तो आपल्या शिष्यांना घडवीत असतो. समाजविकास व विद्यार्थी घडविणारा हा शिक्षक नेता कसा असावा याचे विवेचन आपण समर्थांच्या ओव्यांमधून सप्रमाण दाखवून दिलेत.'

१९) 'आमच्या एम.बी.ए. कार्यक्रमाच्या सुमारे शंभर विद्यार्थ्यांना आपल्या विचारांनी खिळवून ठेवले व चांगले मॅनेजर्स होण्यासाठी आपल्या देशाच्या आध्यात्मिक विचारधनाचे परिशीलन करून IQ व EQ (भावनिक

बुद्ध्यांक) यांचा समतोल वापर केला पाहिजे याची जाणीव त्यांना झाली.

२०) एक प्रशिक्षणार्थी लिहितो – 'मला स्वत:विषयी आत्मचिंतन करावयास व दुसऱ्यांच्या सुख-दु:खाचा विचार करायला या कार्यक्रमाने प्रवृत्त केले.

२१) 'कार्यक्रम अतिशय चांगला वाटला व यामुळे मी माझ्यामध्ये बदल घडवू शकतो याचा आत्मविश्वास वाटला.'

२२) 'कंपनीतले आपले कर्तव्य व आपली घरगुती कर्तव्ये याची सखोल जाणीव झाली.'

२३) 'महिन्यातून एकदा तरी असा कार्यक्रम प्रत्येकाला मिळावा.'

२४) 'कंपनीसंबंधी योग्य दृष्टिकोन व जीवनाविषयीची सत्यता हा कार्यक्रम पटवून देतो.'

२५) 'कार्यक्षमता वाढविण्यासाठी व व्यक्तिमत्त्व विकासासाठी कार्यक्रम खूप उपयोगी वाटला.'

२६) 'स्वभावात नक्की बदल होऊ शकतो अशी खात्री वाटली.'

२७) पुण्यातील एका प्रसिद्ध कंपनीत गेली ५ वर्षे मी सुमारे ८० च्या वर प्रशिक्षणातून ४००० जणांचे प्रशिक्षण केले. त्यांच्या मला आलेल्या २००८ सालच्या पत्राचा काही गोषवारा पुढीलप्रमाणे : 'आमच्या ११०० कर्मचाऱ्यांनी एप्रिल २००६ ते जून २००८ या कालावधीत झालेल्या ४६ प्रशिक्षण वर्गांद्वारे पूर्ण दिवसाचे 'सुपर हॅबिटस् ऑफ दासबोध' हे प्रशिक्षण घेतले. हा कार्यक्रम खूपच इंटरॲक्टिव्ह झाला व प्रशिक्षणार्थींनी त्यांच्या जीवनातील कामाच्या बाबतीत, कुटुंब व समाजाच्या बाबतीत खोलवर आत्मपरीक्षण याद्वारे केले. हा कार्यक्रम आम्हाला खूपच उपयुक्त ठरल्याने आम्ही याचे वारंवार अनेक कर्मचाऱ्यांसाठी कार्यक्रम घेत गेलो व ते प्रभावी ठरले.'

२८) एका कंपनीत पुन्हा वर्षानंतर कार्यक्रम घेतले व मला माझ्या मागील कार्यक्रमाचे त्यांनी जे सहा महिन्यांनंतर प्रत्यक्ष परिणाम काय झाले याची शास्त्रीय पद्धतीने केलेली तपासणी दाखविली, ज्यात कर्मचाऱ्यांनी जे बदल कामाच्या जागी त्यांच्या कामात व त्यांच्या प्रवृत्तीमध्ये झाले ते जाहीर केले व त्यांच्या बॉसेसनी ते बदल खरे असल्याचे लेखी शिक्कामोर्तब केले होते.

पण याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे अनेक व्यक्तिगत प्रतिक्रिया आल्यात, ज्यात दासबोधामधील विचारांमुळे प्रभावित होऊन त्यांच्या कामाच्या ठिकाणी व व्यक्तिगत जीवनात केवढा प्रभाव पडून परिवर्तन झाले आहे. असे बघितले की मन समर्थांच्या चरणी वारंवार नतमस्तक होते.

लेखाचा शेवट करताना एकच प्रतिक्रिया तपशिलात देतो, जी सारे काही सांगून जाईल. एंड्युरन्स टेक्नॉलॉजी प्रा. लि. चाकण, पुणे येथील 'शॉकर' (असेम्ब्ली लाईन) या पदावर काम करणाऱ्या एका प्रशिक्षणार्थीने मला कार्यक्रमानंतर काही महिन्यांतच फोन करून भरभरून चांगल्या प्रतिक्रिया दिल्या व नंतर एक तपशिलात पत्र पाठवले, ज्यात त्यांनी खालील काही बाबी ठामपणे मांडल्या आहेत, ज्यात त्यांच्या जीवनात दासबोधाने झालेले परिवर्तन स्पष्ट दिसते. यातील थोडा भाग पुढीलप्रमाणे (त्या कर्मचाऱ्याच्या शब्दांत : लेखी पत्राप्रमाणे)

१) पूर्वी जवळपास १० ते ११ तास झोप काढायचो. आता फक्त ६ ते ६.३० तास झोपतो व उरलेला वेळ सतत कामात व अभ्यासात व्यस्त राहातो.

२) पूर्वी पुस्तके असून सतत वाचत नव्हतो. आता जी आहेत ती पुस्तके कमी पडायला लागली आहेत.

३) आधी खाण्यासाठी जगत होतो, आता जगण्यासाठी खातो.

४) आधी मी कंपनीत काम व्यवस्थित लक्ष देऊन करत नव्हतो. आता पूर्ण मन लावून व आठ तास काम करतो. यात मला फार आनंद व ज्ञान मिळत आहे.

५) पूर्वी नवीन काही शिकत नव्हतो. आता A.M.I.E. ला ॲडमिशन घेऊन सतत अभ्यासात पूर्ण लक्ष देत आहे.

६) या कार्यक्रमाने माझ्या आयुष्याला एक वेगळे वळण दिले आहे.

या लेखाचा उद्देश शेवटी सांगतो व थांबतो. अत्याधुनिक जगात कारखान्यांच्या जागी व्यवस्थापन, गुणवत्ता, प्रॉडक्टिव्हिटी इ. विषयांतले आपल्या लोकांना काही फारसे गम्य नव्हते अशी साधारण समजूत असते. त्याला पूर्ण छेद देणारे असे आपल्या समर्थ रामदास स्वामींसारख्या संतांचे वाङ्मय/विचार आहेत. आधुनिक व्यवस्थापन शास्त्रात विशेषत: 'माणूस' या विषयासंबंधी जे चिंतन आहे त्यापेक्षा अनेकपट खोलवर व व्यापक चिंतनच नव्हे, तर त्याचा उपयोग प्रत्यक्ष जीवनात आपल्या संस्कृतीत केला आहे. आधुनिक माणसाच्या भाषेत व त्याचे प्रश्नांशी निगडित करून उपयुक्त व प्रभावी पद्धतीने हा विचार पद्धतशीरपणे मांडल्यास त्याला कोणत्याही जातिधर्माचा अडथळा न येता मतभेदांच्या सर्व भिंती पाडल्या जाऊन तो अतिशय मोकळेपणाने व खुल्या दिलाने नुसता स्वीकारलाच जात नाही, तर तो डोक्यावर घेतला जातो व मोठ्या उत्साहाने व हिरिरीने जीवनात उतरवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जातो. विशेष म्हणजे ह्या साऱ्याचे प्रत्यक्ष बदलात व विकासात रूपांतर होते. हाच माझ्या गेल्या १० वर्षांच्या या संबंधातील कामाचा निष्कर्ष आहे. उच्चाधिकाऱ्यांपासून ते कामगार वर्गापर्यंत अत्याधुनिक मोठ्या (शिवाय परदेशी मालकीच्या सुद्धा) तसेच लघुउद्योगातही दासबोध त्यांच्या भाषेत व उपयुक्त पद्धतीने पोहोचवण्याचे महतभाग्य समर्थांच्या कृपाप्रसादानेच मला मिळाले. ते हे कार्य करवून घेतात व त्यांची इच्छा असेल तेवढे व त्या प्रमाणात ते केले जाईल, याची मला जाणीव आहे.

# दक्षिणेतील समर्थ संप्रदाय

***दत्तात्रेय व्यंकटराव रत्नाळीकर***

*श्री प्रल्हादकृपा अपार्टमेंट, गड्डम प्लॉट, अकोला - ४४४००५*
*मो. ९९२३६०३०४५*

धर्मकारण आणि राजकारण ही दोन्ही क्षेत्रे सांभाळताना श्रीरामदासस्वामींनी त्या काळच्या समाजापुढे प्रभुरामचंद्रांचा आदर्श निर्माण केला. श्रीरामभक्तीचा प्रचार तर केलाच, पण त्याच्या जोडीलाच शक्तिसंपन्न अशा रामभक्त हनुमंताच्या उपासनेची आवश्यकताही त्यांनी लोकांपुढे आग्रहाने मांडली. मूर्तीची विटंबना, मंदिरांचा विध्वंस एकीकडे होत असतानाच जागोजागी श्री हनुमंताची मंदिरे निर्माण केली, श्रीरामभक्तीच्या प्रचारासाठी व उपासना वाढीस लागावी यासाठी मी समर्थ रामदासस्वामींनी महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात अनेक रामदासी मठांची स्थापना केली. त्या मठांसाठी नि:स्पृह, वैराग्यशील, आचारविचार संपन्न अशा जाणत्या मठपतींना त्या त्या मठांसाठी नेमून दिले. 'मुख्य हरिकथा निरूपण' हे सांगत असताना 'दुसरे ते राजकारण' असे म्हणण्यास ते विसरले नाहीत. एवढेच नव्हे तर 'तिसरे ते सावधपण । सर्वविषयी' यावर देखील श्रीसमर्थांनी भर दिला. हे श्रीसमर्थांच्या कार्याचे वैशिष्ट्य होय. म्हणून आजही त्यांची शिकवण राष्ट्रनिर्मितीच्या आणि मनामनात राष्ट्रप्रेम जागवण्यास अत्यंत मोलाची ठरते.

'श्रीसमर्थप्रताप' या मूल्यवान ग्रंथात स्वत: समर्थभक्त श्री. गिरीधर स्वामींनी समर्थांनी स्थापन केलेल्या अनेक मठांचा व तेथील त्याकाळच्या असणाऱ्या मठपतींचा उल्लेख केला आहे.

*करनाटकी अनंतमौनी । अरुणाचल प्रांत अवनी ।*
*मन्यारगुढेसी मेरुशिष्य तरणी । अनंतबोधकीर्णी फाकला ॥*

(श्रीसमर्थप्रताप, समास १०, ओवी २६)

हल्लीच्या तामिळनाडू प्रांतातील महत्त्वाचे व ऐतिहासिक, सांस्कृतिक, साहित्यिक वारसा लाभलेले जिल्ह्याचे ठिकाण म्हणजे तंजावर क्षेत्र व तंजावरच्या जवळच ४० कि.मी. अंतरावर असणाऱ्या मन्नारगुढी येथे आजही श्रीसमर्थ मठ अत्यंत उत्साहात श्रीरामभक्तीचा प्रचार त्या भागातील जनतेवर अत्यंत भक्तिभावाने करीत आहेत हे पाहून प्रत्येक समर्थभक्ताचा ऊर आनंदाने भरून येईल. दूरवरच्या प्रांतात राहून श्रीसमर्थांची शिकवण लोकांपुढे मांडण्याचे अत्यंत मोलाचे कार्य तेथील समर्थभक्त व सर्वच मठपती प्रभावीपणे करीत आहेत. मराठी भाषेचा त्या भागात होत असलेला लोप पाहून आजच्या मराठी भाषिक समर्थभक्तांनी त्या भागात वारंवार भेटी देणे आवश्यक आहे.

आजच्या तंजावर क्षेत्राचा उल्लेख जुन्या ऐतिहासिक ग्रंथात, पुस्तकातून तंजापुरी, तंजपुरी, जंजाऊर, तंजाऊर, चंजावर, चंदावर अशा अनेक नावांनी झालेला आढळतो. दक्षिणेतील कावेरी ही एक प्रसिद्ध नदी व तिला येऊन मिळणारी कोलेरून नदी होय. तेथील निसर्ग, जमिनीची

सुपीकता, सामाजिक संपन्नता पाहून त्या क्षेत्राला दक्षिणेतील नंदनवनाचा किताब होता व आजही आढळतो, असे अनेक ग्रंथांतील उल्लेखावरून लक्षात येते. कावेरीपुराण भविष्यपुराण, ब्रह्मांडपुराण, शमीवनमाहात्म्य आणि चोळचंपू अशा अनेक ग्रंथांतून या परिसराची माहिती व वर्णन केलेले आहे.

श्री शेषकवी यांनी लिहिलेल्या चोळ माहात्म्य अथवा तंजपुरी माहात्म्य या ग्रंथात या क्षेत्राला तंजपुरी हे नाव कसे प्राप्त झाले याचा इतिहास वर्णन केलेला आहे. पुराणकाळातील तंजासुर या महाभयंकर व क्रूर राक्षसाच्या अत्याचारामुळे या भागातील जनता अत्यंत दुःखी झाली होती. या परिस्थितीतून आपली सोडवणूक व्हावी म्हणून सर्वांनी दुर्गादेवीची आराधना-भक्ती केली. शरणांगतांना नेहमीच अभयदान देणाऱ्या दुर्गादेवीने या तंजासूर राक्षसाबरोबर युद्ध केले व आपल्या हातातील शूलाने तंजासुराचा वध केला. मरताना तंजासुराने देवीला नम्रतेने प्रार्थना केली की मी दुष्ट राक्षस असलो तरी दुर्गामाते आपण मला दर्शन दिले, माझ्यासाठी प्रकट झाला. मी ज्या क्षेत्रात राहिलो त्या भागाला यापुढे माझ्या नावाने ओळखले जावे. देवीने त्याला वर दिला व तेव्हापासून तंजपुरी हे नाव दृढ झाले व तेच आजचे तंजावर शहर व जवळपासचा प्रांत होय.

शमीवनक्षेत्र म्हणजेच तंजावर या भागावर तीन प्रमुख राजघराण्यांनी अत्यंत प्रभावीपणे राज्य करून नावलौकिक प्राप्त केला व या भागाची सर्वप्रकारे भरभराट केली. ती राजघराणी म्हणजे चोलवंश, त्यानंतरचे विजयनगरचे नायक वंश आणि महाराष्ट्रातील भोसले वंश ही होत.

भोसले वंशातील राजांनी सन १६७६ ते १८५५ पर्यंत या प्रांतावर राज्य केले. सन १६७६ मध्ये श्री छत्रपती शिवाजी राजे यांचे बंधू छत्रपती व्यंकोजीराजे भोसले हे येथील प्रथम मराठी राजे म्हणून गादीवर बसले. त्यानंतर त्यांचे पुत्र शहाजी राजे, सरफोजी राजे, तुकोजी राजे, त्यांचे पुत्र बाबासाहेब ऊर्फ एकोजी राजे, त्यानंतर प्रतापसिंह राजे, तुळजेंद्र राजे अशी ही मराठी राजांची परंपरा, प्रत्येकाने आपापल्या कार्यकाळात 'मराठा तितुका मेळवावा!' या श्रीसमर्थ शिकवणीप्रमाणे महाराष्ट्र धर्म वाढवण्याचा यशस्वी असा इतिहास रचला. मराठी भाषेचा प्रचार तर केलाच पण या सर्व राजांचा संपर्क त्याकाळापासून समर्थ संप्रदायाशी होता. त्यामुळे रामभक्तीचा प्रचार व हनुमंताची उपासना देखील त्यावेळी साधता आली आहे. भोसले कुळाच्या अधिपत्याखाली तंजावर प्रांतात महाराष्ट्रात अनेक संत, पंडित, कवी, शिपाई, सरदार कुटुंब या प्रांतात आले व स्थायिक झाले. आजही तंजावर शहरात ३००-४०० मुळातील मराठी भाषिक असणारी घराणी राहात आहेत. त्या प्रत्येकाच्या घरात छत्रपती शिवाजी महाराज व श्रीसमर्थ रामदास स्वामी यांच्या तसबिरी आजही अत्यंत आदर व भक्तीने जपून ठेवलेल्या आढळतात. आजच्या मराठी माणसाने, महाराष्ट्रातील समर्थ भक्तांनी त्या प्रांताशी सतत संपर्क ठेवून तेथे लोप होत चाललेली मराठी भाषा जपण्यासाठी कठोर व सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. आहे तितुके जतन करावे । पुढे अधिक मेळवावे । असा प्रयत्न आपण सर्वांनी एकत्रितपणे करण्याची आज आवश्यकता आहे.

वरील संदर्भात त्या भागात समर्थ संप्रदाय कसा वाढीस लागला याचा इतिहाससुद्धा लक्षात घेतला पाहिजे. श्रीसमर्थ रामदास स्वामींचे आगमन तंजावर प्रांतात तीन वेळा झाले, असा उल्लेख आढळतो. छत्रपती श्री शिवाजी राजांनी आपले सद्गुरू श्रीसमर्थ रामदासस्वामींकडे विनंती केली की, तंजावर प्रांती राज्यकारभार करीत असलेले आपले बंधू छत्रपती व्यंकोजी राजे यांस आपण अनुग्रहित करावे. त्याप्रमाणे श्रीसमर्थ रामदासस्वामी रामेश्वर यात्रेच्या निमित्ते इ.स. १६७७ मध्ये दक्षिणद्वारकाक्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मन्नारगुढी येथे आले.

'श्रीराजगोपालविलास' या ग्रंथात मन्नारगुढीक्षेत्र माहात्म्य वर्णन केलेले आहे. दक्षिणद्वारका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या क्षेत्रात जवळच्याच अरुणाचल

प्रांतातील श्री अनंतमौनी हे श्रीसमर्थांच्या संपर्कात आले. समर्थांनी श्री अनंतमौनी यांना अनुग्रह दिला व मन्नारगुढी येथे श्रीरामभक्ती प्रचार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर दिली. श्री अनंतमौनी यांची समाधी आजही तेथील हरिद्राकुंडाच्या जवळच असणाऱ्या भामिनी नदीच्या काठावर आहे. ती जागा आजही त्याठिकाणी दाखवली जाते. समाधिस्थान अत्यंत दुरावस्थेत आहे. त्याचे दर्शन घेतल्यास खऱ्या समर्थभक्ताच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू आल्याशिवाय राहाणार नाहीत. त्या समाधीचा जीर्णोद्धार करणे ही आजच्या सर्वच समर्थभक्तांनी सामुदायिकपणे व प्राधान्याने करण्याची गरज आहे.

श्री अनंतमौनी यांच्या समाधीजवळच त्यांचे शिष्य श्री मेरुस्वामी यांची समाधी मोकळ्या प्रशस्त जागेत आहे. आषाढ शुद्ध १२ रोजी दरवर्षी श्री मेरुस्वामींची पुण्यतिथी अत्यंत भक्तिभावाने साजरी केली जाते. स्थानिक भक्तांनी अत्यंत प्रेमाने व भक्तीने जोपासलेल्या या समाधिस्थानाला पूर्ववैभव प्राप्त करून देण्याचे काम आज आपल्याला करणे आवश्यक आहे. नावातच थोड्या अंतरावर असलेला श्री मेरुस्वामींचा मठ मात्र आज सुस्थित आहे. तेथील पूजाअर्चा वयोवृद्ध असे श्रीरामस्वामी आजही करीत आहेत. एकीकडे मेरुस्वामींचा मठ सुस्थित आहे तर दुसरीकडे श्री मेरुस्वामींची समाधी व त्यांचे गुरू श्री अनंतमौनी यांचे समाधिस्थान दुरवस्थेत आहे. या एकाच गावातील विरोधाभास मात्र कशामुळे हे लक्षात येत नाही. अवघ्या महाराष्ट्राने याकडे लक्ष द्यायला हवे. मन्नारगुढी येथील श्रीसमर्थ संप्रदायाच्या दृष्टीने महत्त्वाचा वारसा कोणता हे आपण पाहिले. आता थोडे तंजावर क्षेत्राकडे लक्ष देऊ या.

तंजावरचे राजे छत्रपती व्यंकोजी राजे यांस श्रीसमर्थांनी अनुग्रह देऊन कृतार्थ केले. हल्लीच्या सातारा जिल्ह्यातील प्रसिद्ध समर्थ स्थापित ११ मारुतीपैकी शहापूरच्या कुलकर्णी वंशातील श्री भीमस्वामी शहापूरकर यांना समर्थांनी तंजावर येथे मठ स्थापना करून मठपती पदाची जबाबदारी दिली. तेव्हापासून मुळातील शहापूरकर असणारे श्री भीमस्वामी. श्री भीमस्वामी तंजावरकर या नावाने प्रसिद्ध झाले. भोसले कुळातील व्यंकोजीराजांच्या अनुग्रहानंतर गादीवर आलेले श्री प्रतापसिंह राजे यांना श्री भीमस्वामींनी अनुग्रहासाठी मन्नारगुढी येथील समर्थशिष्य श्री. अनंतमौनी यांचे शिष्य श्री. सेतुस्वामी यांच्याकडे पाठवले. श्री प्रतापसिंह राजे भोसले यांना श्री सेतुस्वामी यांनी अनुग्रह दिला व सांप्रदायिक रामदासी दीक्षा दिली. श्री प्रतापसिंहराजे यांनी तंजावरच्या आपल्या राजवाड्यासमोरच्या भागात आपले गुरू श्री सेतुस्वामी यांच्यासाठी मठ बांधून दिला व श्री प्रतापवीर मारुतीचे भव्य मंदिर उभारून दिले. आजही श्रीप्रतापवीर मारुतीचे मंदिर पूर्ववैभवात व मोठ्या दिमाखात त्या ठिकाणी सुस्थितीत आहे. सेतुस्वामींचा मठ तंजावरात आज अस्तित्वात नाही पण प्रतापवीर मारुती मात्र या मठाची साक्ष म्हणून त्याठिकाणी पाहाता येते. मठासाठी भूमिदान म्हणून दिलेली जागा सेतुरामबाबापूर या नावाने आज ओळखली जाते. सेतुस्वामींची समाधी तंजावरजवळच्या कुन्नाल या ठिकाणी आहे. तेथे जाण्याचा प्रत्यक्षात योग अद्याप आला नाही.

श्रीसमर्थ रामदास स्वामी यांनी आपले तीन शिष्य तंजावर प्रांती असलेल्या रामदासी मठाचे मठपती म्हणून ठेवले. मन्नारगुढीचे श्री अनंत मौनी, तंजावरचे श्री भीमस्वामी तंजावरकर (शाहापूरकर) आणि तिसरे शिष्य श्री राघवस्वामी. श्री राघवस्वामी यांना कोन्नूर या गावी मठपती म्हणून समर्थांनी जबाबदारी दिली. श्री राघवस्वामी यांची विशेष माहिती आज उपलब्ध नाही पण त्यांचे शिष्य-प्रशिष्य यांनी या भागात श्री रामभक्ती प्रचार करून अनेक ग्रंथांची निर्मिती केलेली आढळते. श्रीराघवस्वामींचे शिष्य श्री माधवस्वामी (शके १५५०-१६४०) हे कावेरी तीरावरील तिरुवेंदूरचे राहाणारे. त्यांनी श्लोकबद्ध रामायण, ओवीबद्ध रामायण, एक लक्ष तीस हजार ओव्यांचे महाभारत, योगवसिष्ठ, यावर ग्रंथरचना केली. रामायणाची रचना करण्यासाठी त्यांना दृष्टांत झाला. श्री राम पंडित (शके १६५० ते १६८६) हे माधवस्वामींचे पुत्र व राजा प्रतापसिंह यांचे मंत्री होते. राम पंडितांनी सीतादेवीचे कलशोभन, पंचरत्नमालिका, रामामृत तरंग, नामकल्पतरू ही रचना केली. रामामृततरंग हा १५ प्रकरणांचा ग्रंथ

श्री रामनामाचे महत्त्व सांगणारा आहे.

श्री समर्थशिष्य श्री अनंतमौनी आणि कोनूरचे श्रीराघवस्वामी यांची व त्यांच्या शिष्यांनी केलेल्या ग्रंथानिर्मितीची ओळख झाली. आता तंजावर येथील श्री भीमस्वामी तंजावरकर यांच्या समर्थ कार्याची, भीमकार्याची ओळख करून घेऊ या. श्री भीमस्वामींचा काळ म्हणजे शके १५७० ते १६६३ असा होय. शके १६९८ मध्ये श्रीसमर्थांच्या सहवासात श्री भीमस्वामी तंजावर येथे आले व मूळचे शहापूरकर आता तंजावरकर झाले. त्यांनी प्रदीर्घकाळपर्यंत रामदासी संप्रदायाचे कार्य त्या भागात केले. स्वत: श्री भीमस्वामींचा भर ग्रंथरचनेपेक्षा सांप्रदायिक कार्यपद्धतीवर जास्त होता. आजही तंजावर येथे असलेल्या सर्वच रामदासी मठांमध्ये असणारे सर्वच विद्यमान मठपती सांप्रदायिक पद्धतीने सर्व उत्सव करीत आहेत. श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या प्रत्यक्ष सहवासात न राहाता आपण फार दूरदेशी आलो आहोत अशी खंत श्री भीमस्वामींनी स्वत: श्रीसमर्थांना लिहिलेल्या पत्रातून व्यक्त केली आहे.

*दयासागरे हो मला थोर केले । बहु सेवकामाजी ते मेळविले ।*
*कृपेने दिले हे सौख्य ते अंतरीचे ।*
*परी भोगणे लागले या देह्याचे ।।२।।*
*कसे दुर्भरे आणिले या स्थळाला ।*
*पदी स्वामींचा थोर वियोग जाला ।*
*जगी धन्य ते लाभली पाद सेवा ।*
*नसे तो मला पूर्व माझाचि ठेवा ।।३।।*
*मनोभावना स्वामींच्या पादपद्मी ।*
*असे लागली वृत्ती हे पूर्ण स्वप्नी ।*
*परी देह प्रारब्ध माझे झडेना ।*
*समर्था प्रभू योग तुझा घडे ना ।।४।।*

श्री भीमस्वामींकडील झोळी, कुबडी, पादुका, प्रसाद म्हणून घेऊन स्वतंत्रपणे झोळीमठ, कुबडीमठ, पादुकामठ आज तंजावरात श्रीसमर्थ सांप्रदायाचे ऐतिहासिक वैभव अत्यंत भक्तिभावाने, सक्षमपणे आजही सांभाळत आहेत. त्यांच्या कार्याची प्रत्यक्ष ओळख व्हावी म्हणून प्रत्येक समर्थ भक्तानी त्या भागात आवश्यक भेटी द्याव्यात, तेथील समर्थभक्तांचा उत्साह वाढेल अशा दृष्टीने आपले कायिक, आर्थिक योगदान दिले तर आपले सर्वच रामदासी मठ सुस्थितीत भक्कमपणे उभे राहून श्रीरामभक्तिप्रचार करू शकतील. श्री भीमस्वामी मठाचे विद्यमान तरुण मठपती श्री. रामचंद्र गोस्वामी, मठपती श्री मुरलीधर गोस्वामी व इतर मठपती आजही त्या ठिकाणी उत्कृष्ट असे समर्थ कार्य करीत आहेत. श्री झोळीराम बाबा गोस्वामी मठाचे आत्ताच दिवंगत झालेले श्री नागराज गोस्वामी यांनी केलेले योगदान व श्रीसमर्थ सेवा विसरून चालणार नाही. श्री आण्णाजी बाबांचा मठ, श्री गोविंदबाळ स्वामी मठ हे सर्व भीमस्वामींच्या परंपरेतील मठ आजच्या युगात देखील पारंपरिक पद्धतीने त्या भागात कार्य करीत आहेत. तरुण रामदासी श्री राघवेंद्र त्यांचे आई-वडील हे अत्यंत निष्ठेने मुन्नारगुढी येथील श्री मेरुस्वामी समाधीची पूजा, देखभाल आपल्या शक्तीनुसार करीत आहेत.

*श्रेष्ठी जे जे मेळविले । त्यासाठी भांडत बैसले ।*
*तरी मग जाणावे फावले । गलिमासी ।।*
*ऐसे सहसा करू नये । दोघे भांडता तिसऱ्यासी जये ।*

या छत्रपती संभाजीमहाराजांना केलेल्या उपदेशाचे स्मरण सदैव ठेवून श्रीसमर्थ संप्रदायाच्या बळकटीसाठी आजच्या समर्थ भक्तांनी एकत्र येण्याची गरज आहे. त्यामुळेच हे आपले वैभव टिकून राहाणार आहे.

पृष्ठमर्यादा लक्षात ठेवून येथे आपल्या लिहिण्याला विराम देतो. लिहिण्या-बोलण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीची आज जास्त आवश्यकता आहे. श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या कृपेने हे कार्य निश्चितच होईल याची मला खात्री आहे. त्यांच्या चरणी विनम्र अभिवादन करून थांबतो.

*जो मूर्तिमंत दिसतो रघुवीर जैसा ।*
*किर्तिसही तुळीत साम्य यथार्थ जैसा ।*
*तारीतसे जडमढासी करोनी कानी ।*
*तो सद्गुरू भीमराज यथार्थ मानी ।।*

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

# समर्थांचे स्वतःसिद्ध स्वरूप : आत्माराम



***प्रा. डॉ. शं. रा. तळघट्टी, पुणे.***

*(०२०) २५३८०००२*

'आत्मा वा अरे द्रष्टव्य: श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्य:।' असे बृहदारण्यक उपनिषदात याज्ञवल्क्य सांगतात. उपनिषदात म्हणजे वेदान्त दर्शनात उपदेशिलेल्या अध्यात्मविद्येच्या कल्पवृक्षाचे हेच बीज आहे. उपनिषदे, ब्रह्मसूत्रे आणि भगवद्‌गीता या प्रस्थानत्रयींमधून सविस्तर व्यक्त झालेल्या अध्यात्मविद्येचाच वारसा सर्व संतांना, विशेषत: महाराष्ट्रीय संतांना लाभला आणि त्यांनी सामान्यजन सुलभ अशा स्वरूपात 'अधिकार तैसा करू उपदेश' या तत्त्वानुसार, याच विद्येची शिकवण आपल्या ग्रंथांमधून मानवमात्रासाठी उपलब्ध करून दिली. अध्यात्मविद्येलाच ब्रह्मविद्या असेही नाव आहे आणि ती सर्वश्रेष्ठ - पराविद्या - असल्याचे उपनिषदच सांगते कारण या विद्येने-ज्ञानाने-परम पुरुषार्थ असलेल्या आत्मानंदस्वरूप मोक्षाची प्राप्ती होते. त्यालाच 'ईश्वर-साक्षात्कार' असेही म्हणतात. समर्थ रामदासांनी आपल्या सर्वच वाङ्मयातून 'बहुधा अध्यात्मनिरूपण' करून 'ब्रह्मविद्येचा सुकाळ' केला आहे हे खरे. तथापि, या आध्यात्मिक वाङ्मयातील आत्मारामांचे स्थान काही आगळेच आहे असे म्हणता येते. ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयामध्ये 'अमृतानुभवा'चे जे स्थान तसेच, किंवा तेच स्थान समर्थ वाङ्मयामध्ये 'आत्मारामा'चे असल्याचे दिसून येते. कारण 'अमृतानुभवा'प्रमाणेच 'आत्मारामा'त 'निकराचा आत्मभाव' प्रकट झाला आहे. तोच आत्माराम, आणि त्याची अपरोक्ष अनुभूती म्हणजे 'अमृतानुभव'!

'आत्मारामा'चे आगळेपण स्वत: समर्थांनीच स्पष्ट केले आहे असे भीमस्वामी निवेदित समर्थांच्या आत्माराम विषयक वचनावरून दिसून येते. ते प्रसिद्ध वचन म्हणजे 'आत्माराम दासबोध! माझे स्वरूप स्वत: सिद्ध ।।' येथे 'आत्माराम' हे आपले स्वत:सिद्ध स्वरूप असल्याचे समर्थ सांगत आहेत. 'आत्मारामाचे' हे आगळेपण आहे. त्याबरोबर 'दासबोधा'चाही उल्लेख आहे. याचा अर्थ सामान्यपणे असा होतो की, 'आत्माराम' आणि 'दासबोध' हे ग्रंथ समर्थांचे स्वरूपभूत ग्रंथ आहेत. ज्ञानेश्वरांनी भगवद्‌गीतेविषयी म्हटले आहे की, 'गीता जाणा हे वाङ्मयी । मूर्ति श्री प्रभूची ।।' त्याप्रमाणे 'दासबोध-आत्माराम' ही समर्थांची वाङ्मयी मूर्ती होय. हे सत्यच आहे. परंतु 'आत्माराम' ग्रंथाच्या संदर्भात मेरुस्वामींच्या ओवीचे चिंतन करताना मला या रूढ अर्थाबरोबरच दुसरा एक अर्थ जाणवला, त्याचीही मी येथे नोंद करू इच्छितो. 'आत्माराम दासबोध... न करावाहो खेद । भक्त जनीं ।। या मेरुस्वामींच्या ओवीच्या आधीची ओवी अशी आहे - ''माझी काया आणि वाणी भीम गेली म्हणाल अंत:करणीं । परि मी आहे जगज्जीवनीं । निरंतर ।।'' (४५) येथे 'काया' आणि 'वाणी' यांचा

उल्लेख आहे आणि 'मी जगज्जीवनी आहे' हे विधान 'काया' संबंधी आहे हे उघड आहे. राहिली 'वाणी' ती 'आत्माराम' आणि 'दासबोध' या ग्रंथांच्या रूपात भक्तजनांना सदैव उपलब्ध आहे असा सहज सरळ संबंध पुढील ओवीशी जुळतो. परंतु 'मी आहे जगज्जीवनीं निरंतर।' आणि 'माझे स्वरूप स्वत: सिद्ध' यांच्यातील आंतरिक तात्त्विक संबंधाचा विचार केल्यास 'आत्मारामांच्या' स्वरूपावर सहज सुंदर प्रकाश पडतो. येथे 'आत्माराम' हा आता ग्रंथ राहात नाही, तर, तो त्या ग्रंथाचे प्रतिपाद्य असलेला 'सर्वांतरात्मा असा ब्रह्मस्वरूप श्रीराम म्हणून आपल्या पुढे उभा राहातो. हा आत्मारामाच जीवमात्राचे स्वत: सिद्ध स्वरूप आहे आणि त्याचाच 'बोध' दासांनी-रामदासांनी-आपल्या सर्व ग्रंथांमधून केलेला असल्याने 'आत्माराम' हाच 'दासबोध' होय. शतकोटी रामायणाचे 'सार' जसे 'राम' तसे रामदासांच्या सर्व बोधाचे 'सार' 'आत्माराम'!! तोच, अर्थात, रामदासांचे 'स्वत:सिद्ध स्वरूप' होय. तो सर्वांतरात्मा असल्याने संपूर्ण जगताला अंतर्बाह्य व्यापून राहिला आहे. अर्थात रामदासांचेही 'आत्माराम' हे स्वत:सिद्ध स्वरूप अंतर्यामित्वाने 'जगज्जीवन' आहे ते शाश्वत आहे. म्हणून ते सांगतात की, 'मी आहे जगज्जीवनी' । निरंतर ।।' असे असल्यामुळे ते, गीतेप्रमाणे आपल्या भक्तजनांना सांगतात 'न त्वं शोचितुमर्हसि।' या आपल्या आत्माराम-स्वरूपाचा साक्षात्कार कसा करून घ्यावा? 'आत्मदर्शनी आडळ' असलेल्या मायेचे स्वरूप काय? कोणत्या साधनांनी तिचा निरास होतो? इत्यादी निखळ आणि विमळ आत्मज्ञानविषयक प्रश्नांची सुबोध उत्तरे शिष्यांवरील प्रेमाने समर्थ आत्माराम ग्रंथात देतात, हे त्याचे आगळेपण आणि माहात्म्यही.

२) 'आत्मा' हे अध्यात्मशास्त्राचे प्रमुख प्रतिपाद्य असल्याचे आपण पाहिले. राम हा समर्थांचा उपास्य देवही आहे आणि सदगुरूही. उपनिषदात रामाला तारक ब्रह्म म्हटले आहे. 'राम एवं परं तत्त्वं । श्रीरामो ब्रह्म तारकम् ।।' (रामरहस्योपनिषत् - १-६). आत्मा, ब्रह्म आणि राम ही एकमेव सच्चिदानंदस्वरूप परतत्त्ववाचक पदे आहेत. 'राम' या पदाचे निर्वचन करताना रामपूर्व तापिनी उपनिषदात म्हटले आहे. 'रमन्ते योगिनोऽनन्ते नित्यानन्दे चिदात्मनि । इति राम पदेनासौ परं ब्रह्माभिधीयते।। (१-६) विष्णुसहस्रनामातील 'राम' नामावरील भाष्यात शंकराचार्यही म्हणतात 'नित्यानन्दलक्षणेऽस्मिन् योगिनो रमन्त इति राम:।' असे असले तरी 'राम' हा शब्द उच्चारल्याबरोबर आपल्यासमोर 'घनश्याम हा राम लावण्यरूपी । महाधीर गंभीर पूर्ण प्रतापी।।' अशा सगुणरामाची साकार मूर्ती उभी राहून सारी रामकथा स्मरते. उपासनेच्या दृष्टीने रामाचे हे सगुण रूप नितांत रमणीय व महत्त्वाचे आहे यात शंका नाही. समर्थांनी स्वत: अनेक मंदिरांतून 'श्रीराम-सीता-लक्ष्मण-हनुमान' या राम परिवाराच्या मूर्तींची स्थापना करून रामोपासना प्रसरित केली. तथापि ती सगुणात गुंतून राहावी अशी त्यांची कल्पना नव्हती. परब्रह्म राम हे मुमुक्षू भक्तांचे परम प्राप्तव्य आहे. समर्थ सांगतात - 'सगुणाचेनि आधारे । निर्गुण पाविजे निर्धारे । सारासार विचारे । संतसंगे ।।' (६-६-५५). साकाररामगिरी-उद्भूत उपासनेची गंगा ही निर्गुण ब्रह्माच्या महासागराशी एकरूप होण्यातच जीवनाची सार्थकता व संसाराची सुफलता आहे. दासबोधाच्या अखेरीस उपासनेच्या महाफलाविषयी समर्थ सांगतात - 'जाले साधनाचे फळ । संसार जाला सफळ । निर्गुण ब्रह्म ते निश्चळ अंतरी बिंबले ।।' (२०-१०-२६). हाच 'परमार्थ' म्हणजे 'परम पुरुषार्थ : तात्पर्य, समर्थांची रामोपासना ही त्रिस्तरीय असल्याचे दिसते- आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक. त्यापैकी पहिले दोन स्तर हे सगुणोपासनेचे तर अंतिम सर्वोच्च उपासना ही आध्यात्मिक स्वरूपाची अर्थात सर्वांतर्यामी असलेल्या आत्मारामाची या विषयाची सविस्तर चर्चा 'समर्थांची रामोपासना' या माझ्या लेखात केली आहे. पाहा - 'रामदास आणि रामदासी' जुलै २०१० आणि ऑक्टोबर २०१०. 'आत्माराम' हा अत्यंत मार्मिक असा तत्त्वार्थबोधक संयुक्त शब्द आहे. 'आत्मा' आणि

'राम' या पदांनी निर्गुण आणि सगुण यांचे तर त्यात सूचन होतेच, पण त्याबरोबर 'राम' पदाचा 'आनंद'सूचक अर्थही ध्वनित होतो. आत्मा आनंदस्वरूप आहे. म्हणूनच तो 'प्रियतम' आहे. 'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति।' असे उपनिषद सांगते. त्याची 'आनंदमयता' ही त्याच्या 'अनंतत्वा'त सर्वव्यापित्वात निहित आहे. सारांश 'आत्मा' हा नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, आनंद, स्वरूप ब्रह्मच होय. 'आत्माच ब्रह्म।' म्हणून योगिजन त्या आनंदात रममाण होतात. 'रमन्ते योगिनो यस्मिन् नित्यानंदे चिदात्मनी।' (पद्मपुराण). असे असल्याने समर्थ सांगतात - 'कर्म उपासना ज्ञान । सारासार करी मंथन । आत्मारामी अनुसंधान । विवेके लावी ।।' (जु.दा.परिशिष्ट स.१-२७). संत एकनाथही आध्यात्मिक 'संध्ये'ची फलश्रुती सांगताना म्हणतात - झाली संध्या संदेह माझा गेला । आत्माराम हृदयी प्रगटला ।।' गिरिधरानी तर 'समर्थ प्रतापा'च्या मंगलाचरणात 'आत्माराम'लाच सर्वभावे नमन केले आहे. ते सांगतात - 'आत्मलिंग आत्माराम। हनुमान स्वामी आपण श्रीराम । यावत् ब्रह्मांड तावत नाम। तारक ब्रह्म चराचरी ।।' (८) ज्ञानेश्वरीचा प्रारंभही 'जय जय - स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।' असा आत्म्याच्या जयजयकाराने झाला आहे. या परम आत्मतत्त्वाचा सर्वांगीण निर्देश करणाऱ्या श्वेताश्वतर उपनिषदातील एका सुंदर श्लोकाचा (मंत्राचा) उल्लेख करून मी 'आत्माराम' ग्रंथातील विषय विवेचनाकडे वळतो. तो प्रसिद्ध मंत्र असा 'एको देव: सर्वभूतेषु गूढ; । सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा ।।

कर्माध्यक्ष: सर्वभूताधिवास: । साक्षी चेता केवलो निर्गुणश्च।।' (६-११)

३) 'आत्माराम' हा समर्थांचा ब्रह्मविद्या प्रतिपादक सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे. पाच समासांमध्ये विभागलेल्या केवळ १८३ ओव्यांमधून समर्थांनी सर्व प्रमुख आध्यात्मिक प्रमेयांची सुव्यवस्थित मांडणी केली असल्याचे दिसून येते. ती सूत्ररूप असल्याने हा समर्थांचा 'ब्रह्मसूत्र' ग्रंथ आहे असे म्हणता येईल. त्याच्या पाच समासाला दिलेली प्रचलित नावे स्वत: समर्थांनी दिलेली नसावीत. कारण तसा समासाच्या अंती दासबोधाप्रमाणे नामोल्लेख आढळत नाही. तथापि ती नावे त्याग निरूपण, माया निरूपण, ब्रह्मनिरूपण, साधन निरूपण आणि स्वानुभव निरूपण - त्या-त्या समासातील विषयाचा निर्देश करणारी असल्याने अभ्यासकास उपयुक्त अशीच आहेत. 'समन्वय' 'अविरोध', 'साधन' आणि 'फल' अशी ब्रह्मसूत्राच्या चार अध्यायांची नावे आहेत. 'आत्मारामा'च्या शेवटच्या दोन समासांची 'साधन' व 'स्वानुभव' निरूपण ही नावे 'साधन' आणि 'फला'ध्याय सदृशच आहेत. 'त्याग निरूपण' या प्रथम समासात ज्ञानाच्या अधिकाऱ्याचे स्थूलमानाने स्वरूप सांगितले आहे, असे दिसते. वेदान्तशास्त्रात ज्ञानप्राप्तीची योग्यता प्राप्त होण्यासाठी शिष्य हा 'अधिकारी' म्हणजे साधन चतुष्टयसंपन्न असला पाहिजे, असे सांगितले आहे. विवेक, वैराग्य, शमदमादीसाधन संपत्ती आणि मुमुक्षुत्व हे ते चतुष्टय होय. या सर्वांचा समावेश 'नाशिवंताचा त्याग' या एका महावृत्तीत होत असल्याने समर्थांनी प्राधान्याने त्याचा उपदेश शिष्याला केला आहे. वैराग्य हे त्याचे साक्षात स्वरूप आहे. ''नाशिवंत तितुके देशी । तरी पद प्राप्त निश्चयेंसी ।।' (१-३५) असे ते आश्वासन देतात. परंतु 'नाशिवंता'चा त्याग करायचा म्हणजे 'शाश्वत-अशाश्वताचा निवाडा' अर्थात 'विवेक' करणे आलेच. समर्थांनी आपल्या सर्वच वाङ्मयात 'विवेक' आणि 'वैराग्य' यावर विशेष जोर दिला आहे, हे आपण जाणतो. 'जनामध्ये सार्थकता विचारेचि होय' हे त्यांचे विवेचन सूत्र आहे. यालाच 'सारासार विचार, हरिपाठ' असे ज्ञानेश्वर म्हणतात, तर 'आत्मानात्मविवेक' असे शंकराचार्य म्हणतात. येथे समर्थ म्हणतात - 'तू समर्थाचे लेकरू । अभिमाने घेतला संसारू । तो टाकिता पैलपारू । पावसी बापा ।'' (१-२८) आणि सांगतात - 'ऐसे तुवा विचारले पाहिजे आता ।।' (१-२६) नश्वर संसाराविषयीची आसक्ती समूळ नाहीशी झाल्याशिवाय 'स्वरूपी आसक्ति (या नाव भक्ति)' निर्माण होणार नाही. त्यासाठी ज्ञानेश्वर

सांगतात त्याप्रमाणे -संसार दु:खमूल चोहीकडे इंगळ।'' हे जाणवले पाहिजे. मुंडक उपनिषदही सांगते की, 'परीक्ष्य लोकान् कर्मचितान् ब्राह्मणो निर्वेदमायात् ।'' (१-२-१२). 'निर्वेद' म्हणजे वैराग्य. स्वत: समर्थच दासबोधात - स्पष्टपणे सांगतात की, 'देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगांसी तुटी । सर्व अर्पावे, सेवटी। प्राण तो हि वेचावा ॥' (४-८-८). समर्थांना विवेकयुक्त वैराग्याचे अपार महत्त्व वाटत होते याचे कारण, त्यांच्याच शब्दांत ''विवेकें अंतरी सुटला । वैराग्ये प्रपंच तुटला । अंतर्बाह्य मोकळा जाला । नि:संग योगी ॥'' (१२-४-१२). समर्थांना नि:संगता फार प्रिय आहे. कारण संग म्हणजेच बंध आणि त्याचे कारण आत्मस्वरूपाचे अज्ञान । देह, इंद्रिये, मन, बुद्धी आणि अहंकार यांच्या 'गाठोड्या'ला 'मी' मानणारा जीव स्वत:चे शिवत्व विसरून देहबुद्धीने सारा व्यवहार करतो आणि सुख-दु:खाच्या भोवऱ्यात स्वत:ला 'बद्ध' करतो. जो विवेक वैराग्य बळे या भोवऱ्याच्या मुळाशी जाऊन आत्मसाक्षात्कार करून घेतो, म्हणजे स्वरूपावस्थित होतो, तो मात्र जन्म-मरणाच्या म्हणजेच सुखदु:खाच्या भोवऱ्यातून मुक्त होतो. एवढ्याच-साठी समर्थ 'देहबुद्धि ते आत्मबुद्धि करावी।' असे सांगतात आणि त्यासाठीच अशाश्वताचा अनित्याचा, त्याग करण्यास ते सांगतात.

यावर संभ्रमित शिष्य विनंती करतो की - ''नाशिवंत काय टाकावे । ते मज स्वामींनी सांगावे ॥' (२-४). त्यानुसार समर्थ सदगुरूंनी 'माया'शक्तीचे अपूर्व असे सविस्तर निरूपण केले आहे. दुसऱ्या समासात तर हे निरूपण आहेच, पण तिसऱ्या 'ब्रह्मनिरूपण' समासातही अधिकतर मायेचेच रूपवर्णन आढळते. येथे एक गोष्ट मला आवर्जून सांगावीशी वाटते ती ही की, 'आत्माराम' ग्रंथाचा उद्देश पूर्णपणे मायेचे ज्ञानपूर्वक निरसन हा आहे असे तो वाचल्यावर, अभ्यासल्यावर मला तीव्रतेने जाणवले. दुसरी गोष्ट म्हणजे 'मायाशक्तिविलासा'चे सर्वांगीण व्यापक स्वरूप जसे समर्थांनी येथे चित्रित केले आहे तसे ते वेदान्त वाङ्मयात अन्यत्र क्वचितच आढळते. अर्थात शंकराचार्य हे मायावदी म्हणूनच प्रसिद्ध असल्याने त्यांच्या वाङ्मयातून माया-अविद्या-अज्ञान इत्यादी स्वरूपसाम्य असलेल्या संकल्पनांचे मूलभूत सविस्तर विवेचन असणे स्वाभाविकच होय. त्यातही समर्थांचे निरूपण वाचताना शंकराचार्यांच्या ब्रह्मसूत्रभाष्यारंभीच्या 'अध्यासभाष्या'चे स्मरण झाल्याशिवाय राहात नाही. तिसरी गोष्ट अशी की, माया आणि मायिक संसाराच्या निरसनावर समर्थांनी दिलेला भर पाहाता समर्थांनी वेदान्ताच्या भाषेत, 'व्यतिरेक' प्रक्रियेचा प्राधान्याने अवलंब केल्याचे दिसून येते. समर्थ सांगतात - 'नाशिवंत तितका मळ । तुवां त्यजावा अमंगळ । तो गेलिया तूचि सकळ । आहेसि बापा ॥' (२-९) आणि जे जे नश्वर, अनित्य, अशाश्वत आहे ते ते सर्व मायिक आहे 'नाशिवंत तू जाण माया । माईक जाईल विलया ॥' (२-१०) 'माया विलया जाईल' याचा अर्थ ती कितीही प्रबळ असली तरी तिचा लय होऊ शकतो, आपण करू शकतो. मात्र ती सहजासहजी पिच्छा सोडत नाही. तिचे, अर्थात संसाराचे, प्रपंचाचे व एकूणच व्यावहारिक जीवनाचे, बंधन एवढे 'मोहक' आहे की माणूस आपण होऊन त्या पाशात स्वत:ला प्रयत्नपूर्वक बांधून घेतो! अशी ही माया आपल्या 'आवरण' आणि 'विक्षेप' या दोन शक्तींनी मनुष्यमात्राला स्वात्मदर्शनापासून वंचित ठेवून दु:खमूळ असलेल्या संसारात गुंगवून, गुंतवून ठेवते. आचार्यांच्या 'माया पंचकात' म्हटल्याप्रमाणे - 'भ्रमयति भवसागरे नितान्तम् । अघटित घटना पटीयसी माया॥'' (३)

(४) मायेवर विजय मिळवायचा तर मायेची शक्ती व तिचे मायावी स्वरूप जाणणे आवश्यक आहे. कायिक, वाचिक (शब्दाश्रित), मानसिक, बौद्धिक (ज्ञानाज्ञानात्मक), लौकिक, धार्मिक, शास्त्रीय व पारमार्थिक, व्यक्तिगत व सामाजिक - या सर्वप्रकाराचा व्यवहार हा मायिक स्वरूपाचा आहे, हे समर्थांच्या मायानिरूपणाचे सार आहे असे मला वाटते. याला शंकराचार्यांच्या भाषेत 'मायाशक्तिविलास' असे यथार्थपणे म्हणता येते. या

विलासाच्या व्यामोहातून मुक्त होऊन आपल्या स्वानंदघन सर्वात्मत्वाच्या साक्षात्कारासाठी समर्थ सद्‌गुरूंना - दक्षिणामूर्तींना - सर्वभावे नव्हे एकात्मभावे, नमन करणे, अर्थात आत्मज्ञान प्राप्त करणे हाच एकमेव मार्ग आहे. शंकराचार्यांच्या शब्दात 'मायाशक्तिविलास-कल्पितमहाव्यामोहसंहारिणे । तस्मै श्रीगुरूमूर्तये नम इदं श्री दक्षिणामूर्तये ॥' या विलासाचे समर्थांनी जे वर्णन केले आहे त्याचा थोडा तपशील पाहू.

"अहं ऐसे जे स्फुरण । ते चि मायेचे लक्षण ॥' (२-११) या अहंकारापासून (एकोऽहं बहुस्याम।) पुरुष-प्रकृति, त्रिगुण, पंचमहाभूते, दृश्य-अदृश्य सृष्टी-निर्माण झाली. या सृष्टीतील सर्व ज्ञानाचा व्यवहार हा माया निर्मितच होय. कारण तो शब्दरूप शब्दाश्रित असतो. ज्ञानेश्वरांच्या शब्दांत 'एवं शब्दैकजीवनें। बापुडी ज्ञाने अज्ञाने। साचपणे वने । चित्रीची जैशी ॥' (अमृ.६-१०२) 'अज्ञान' हे आवरणात्मक माया कार्य उघडच आहे. परंतु केवळ शाब्दिक स्वरूपाचे ज्ञान अगदी अध्यात्मज्ञानही - मायिकच असल्याचे समर्थ स्पष्ट करतात. 'ऐशी माया सच्चिदानंद । माया आनंदाचा कंद । माया हेचि निजबोध । शब्दरूपे ॥ आत्मा ब्रह्मस्वरूप। हे मायेचे निजरूप । रूप आणि अरूप । सकळ माया ॥ जीव, शिव आणि ईश्वर । हाही मायेचा विस्तार । शिवरूप विश्वंभर । अवघी माया॥" (२-१५ ते १७). पारमार्थिकदृष्ट्या 'माया' ही सुद्धा मायिकच आहे. नसूनही जी भासते ती माया. समर्थ सांगतात - "मायेकरिता माया दिसे । मायेकरिता माया भासे॥' (२-३०) याचा अर्थ प्रपंचाचा सारा व्यवहार मायिक आहे असे म्हणणे किंवा मानणे हेही मायिकच होय.

आता माया ही बंधनाला कारणीभूत आहे हे शास्त्रपूत विधान आपण समजू शकतो. परंतु समर्थ या समासात नेमके याच्या उलट माया ही परमार्थाला, मोक्षालाही कारणीभूत आहे असे परोपरीने सांगतात हे कसे? त्यांची काही वचने आपण पाहू. "माया भवसिंधूचे तारू । माया पाववी पैलपारू । मायेवीण उद्धारू । प्राणियासि नाही ॥' (२-३१). "मायेवीण साधकांचे । कार्य न चले ॥' (३६) "मायेवीण परमार्थ जोडे । ऐसे हे कधीच न घडे ॥' (३७) इत्यादी. याचा अर्थ असा की, माया ही बंधालाही कारणीभूत आहे आणि मोक्षालाही । हे कसे शक्य आहे? कारण 'बंध' आणि 'मोक्ष' परस्परविरोधी असल्याने, जर मायेने मनुष्य 'बद्ध' होत असेल तर 'मोक्षा'साठी मायेचा संपूर्ण निरास करणेच आवश्यक ठरते; आणि अध्यात्मशास्त्रात त्याचसाठी कर्म, उपासना, ज्ञान यांचा उपदेश केला जातो. या समस्येचे शास्त्रीय उत्तर तसे साधे-सरळ आहे, मात्र ते देणारा सदगुरू हा स्वत: मायानदी पार करून गेलेला ज्ञानी मुक्त सत्पुरुष अर्थात 'ब्रह्मनिष्ठ' असावा लागतो, नाहीतर ती पोपटपंची ठरते. पहिली गोष्ट म्हणजे 'माया' ही झालीच नाही; अर्थात तिला 'परमार्थत: स्वरूप सत्ता नाही. 'या मा सा माया।' आता, मायाच जर नाही तर सर्वकाही माया आहे असे कसे म्हणता? या जिज्ञासू शिष्याच्या प्रश्नाला समर्थच उत्तर देतात की, 'अरे जे जे मनास अनुभवले । ते ते माईक नाथिले ॥' (२७) याचा अर्थ मुळात मायाच जर सत्य नाही तर मायिक जग व जगातील सर्व व्यवहार कसा सत्य असेल? हे सारे 'अगा जे जालेचि नाही' त्याची वार्ता करण्यासारखे आहे. तिसऱ्या 'ब्रह्मनिरूपण' समासातही समर्थांनी 'माये'चे निरूपण केले आहे. 'मायेचे बळे ब्रह्मज्ञान । मायेकरिता समाधान । मायाचि गोवी बंधन । तोडी तेही माया ॥ (३-२१) एवढेच काय पण "देहबुद्धी हे टाकावी । हेही मायेची उठाठेवी ॥' (३-२०) एक 'आत्मा' सोडला तर 'अनात्मा' असलेले सारे व्यावहारिक विश्व आणि त्याचे अनुभव - सर्वकाही 'माया' आहे, म्हणजे 'परमार्थसत्' नाही, खरे तर 'जालेचि नाही। या तात्त्विक भूमिकेस 'अजातवाद' म्हणतात. आणि ती अद्वैताची अंतिम भूमिका मानली जाते. शंकराचार्यांचे परात्पर गुरू श्री गौडपादाचार्य यांच्या मांडूक्य उपनिषदावरील भाष्यरूप कारिकांमधून या तात्त्विक भूमिकेचे स्वरूप विस्ताराने मांडले आहे. जीव-जगताचा सारा विस्तार 'माया' आहे,

ही समर्थांची भूमिका अजातवादीच असल्याचे त्यांच्या विवेचनावरून दिसून येते. शंकराचार्यांची 'मिथ्या' ही संकल्पना या भूमिकेचाच 'व्यावहारिक' आविष्कार आहे. ज्ञानेश्वरांचीही अंततो गत्वा हीच भूमिका असल्याचे जाणवते. त्यांचे एक विधान असे की ''म्हणोनि बंधचि तंव वावो । मा मोक्षा के प्रसवो । परी मरोनि केला ठावो । अविद्या तया ।।'' (अमृ. ३-१५) खरे तर 'आत्माराम' अभ्यासत असता मला सतत त्याचे 'अमृतानुभवा'शी असलेले साम्य जाणवत होते. 'माया'च्या ऐवजी त्यांनी 'अविद्या' हा शब्दप्रयोग प्राधान्याने केला आहे. मायेचे वर्म सांगताना समर्थ म्हणतात - ''वर्म हेंचि माया मायिक । इचा करावा विवेक । विवेक केलिया अनेक । येकीं मुरे ।।' (३-३३) 'एक' म्हणजे ब्रह्म आणि अनेक म्हणजे जिवासह जगताचे 'नानात्व' दुसऱ्या शब्दांत 'एक' म्हणजे 'आत्मा' आणि 'अनेक' म्हणजे 'अनात्मा' आणि आत्मानात्मविवेक केला म्हणजे नानात्वाचे मिथ्यात्व मायिकत्व ज्ञात होते आणि ते एकमेवाद्वितीय आत्मतत्त्वात - आत्मारामात - मुरून जाते. हा अद्वैताचा सिद्धान्त मुळात उपनिषदानेच मांडला आहे. 'सदेव सोम्य इदमग्र आसीत् एकमेवाद्वितीयम् ।' (छां. ६-२-१). जगताच्या संबंधात याच्या दोन बाजू आहेत अन्वय आणि व्यतिरेक. 'सर्वं खल्विदं ब्रह्म।' (छां. ३-१४-१). हा अन्वय, तर 'नेह नानास्ति किंचन।' (कठ २-१-११) हा व्यतिरेक. हे सर्व माया आहे म्हणजे 'जालेंचि नाही. एका आत्मारामाशिवाय दुसरे काहीही नाही, हा त्याचा अन्वयात्मक अर्थ. देहातादात्म्य आणि त्याद्वारा सकल नश्वर जगताशी 'मी-माझे' पणाने तादात्म्य याला समर्थ 'संग' म्हणतात. तोच 'बंध' किंवा 'ग्रंथी'. म्हणून ते सांगतात - 'संग तितुका नाशिवंत । सोडून राहावें निवांत।।' (३-१). खरे तर 'अनुभव तितुका नाशिवंत' असे समर्थांना सांगायचे आहे आणि हा सर्व 'मना'चा प्रांत आहे. म्हणून ते सांगतात - 'उन्मनी अवस्थेचा प्रांतु । ते स्वरूप तुझे ।। किंवा 'अनुभवावेगळा राहिला । तो तू आत्मा ।।' (३-३,४) 'स्वरूप' कसे आहे तर 'स्वरूप निर्मळ निघोट। स्वरूप शेवटा शेवट। जिकडे तिकडे नीट । सन्मुख आहे।।'' (३-७). अर्थात 'अवघें आपण संचले । येकटें चि तें ।।' (३-११) समर्थांच्या 'स्वरूप संप्रदाय अयोध्या मठ।' याचे स्वरूप काय आहे याचा उलगडा 'आत्मारामात' होतो. सर्व-संग-परित्याग केल्यानंतरच 'आत्माराम' हृदयी प्रगटतो! 'व्यतिरेका'नंतरच 'अन्वय' शेष उरतो. अशाश्वताचा, मायेचा त्याग, म्हणजे 'आत्मनिवेदन' पूर्णपणे झाल्यावरच स्वरूपभूत 'आत्माराम' आत्मतेजाने तळपतो. तो कसा आहे तर 'ऐसा सर्वात्मा श्रीराम । सगुण निर्गुण पूर्ण काम ।।' (१-१५) तसेच 'विश्रांतीचा निजविश्राम' (१-११) आहे. म्हणून समर्थ मनाला बोध करतात की, 'मना सज्जना राघवी' वस्ति कीजे' (मनोबोध ४०). अर्थात त्यासाठी जगताचा (संसाराचा, प्रपंचाचा) 'संग' मोह सोडून 'नि:संग' व्हावयास हवे. यालाच 'संन्यास' म्हणतात. संकुचित अहंभावाचा - देहबुद्धीचा - त्याग हे त्याचे स्वरूप. यालाच समर्थ 'आत्मनिवेदन' म्हणतात. त्याचे सर्वांगसुंदर विवेचन त्यांनी दासबोधात चतुर्थ दशकातील नवम समासात केले आहे. 'आपण मिथ्या साच देव । देवभक्त अनन्यभाव ।।' (२२) ही ती 'स्थिती' आहे. 'आत्मरामा'तही ते सांगतात 'प्राप्त जाले अद्वैत ज्ञान । अभिन्नपणे जे विज्ञान। तेचि जाण आत्मनिवेदन । जेथे मी नाही (४-३२) ज्ञान आणि भक्ती किंवा 'उपासना' येथे एकरूप होतात.

५) 'आत्मनिवेदन' हे 'आत्मज्ञानाचे' साधनवर्म आहे. पण ती साधन सोपानाची शेवटची पायरी आहे. दासबोधात नवविधा भक्तीची चर्चा आहे. परंतु 'आत्माराम हा ज्ञानप्रधान असल्याने त्यात औपनिषदिक साधनमार्गाचा विशेषत्वे उल्लेख आहे. सकळ साधनांचे सार म्हणून समर्थ सांगतात - ''ते हे जाण रे श्रवण । करावे अध्यात्म निरूपण । मनन करिता समाधान । निजध्यासे पाविजे ।।' (४-२). येथे श्रवण, मनन, निदिध्यासन या उपनिषदप्रणित साधनांचा विचार आहे. प्रस्तुत लेखाचा प्रारंभ 'आत्मा वा अरे, द्रष्टव्य: श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्य:।'

या वचनानेच झाला आहे. 'नित्यनेम श्रवण मनन । त्या ऐसे नाही साधन । म्हणोनि हे नित्यनूतन। केले पाहिजे ॥' (४-५) साधन हे नित्यनेमाने केले पाहिजे, त्यात सातत्य व नियमितपणा पाहिजे यावर समर्थांचा कटाक्ष आहे. योगदर्शनात त्यास 'अभ्यास' म्हणतात. मन हे अतिचंचल असल्याने ते दुर्निग्रह आहे. 'अभ्यास' आणि 'वैराग्य' यांनीच त्यावर ताबा मिळविता येतो. ''अभ्यासवैराग्याभ्याम् तन्निरोध:' (यो.सू.१-१२) असे पतंजली ऋषी सांगतात आणि भगवान श्रीकृष्णही -''अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येणच गृह्यते ।'' (गीता ६-३५) असेच सांगतात. थोडक्यात साधकाबरोबरच सिद्धानेही 'साधना'च्या बाबतीत 'अखंड सावधानते'चे तत्त्व स्वीकारणे इष्ट होय. कारण त्यामुळे स्वरूपस्थितीचे-आत्मारामाचे अखंड अनुसंधान शक्य होते. श्रवण-मननाद्वारे झालेले परोक्षज्ञान हे विज्ञानात अपरोक्ष आत्मानुभूतीत रूपांतरीत होण्यासाठी 'निदिध्यासना'चा अभ्यास पाहिजे. आता, हा सर्व विषय परमार्थाचा 'आत्मारामा'चा असल्याने निरूपण-श्रवण-मनन यांचा विषयही त्यास पोषक असाच असला पाहिजे. 'म्हणोनि निरूपण सार। भक्ती ज्ञान वैराग्य ॥' (४-७). त्यामागील मानसशास्त्रीय तत्त्व असे की, 'जे ग्रंथीं जो विचार । वृत्ती होये तदाकार ॥' अशी वृत्ती तदाकार झाल्याशिवाय 'परमार्थ' प्रत्यक्ष कृतीत जीवनात उतरत नाही आणि तसे झाले नाही तर 'ज्ञान' हे केवळ शब्दज्ञान राहील, 'आत्मप्रतीती' प्राप्त होणार नाही. म्हणून समर्थ सांगतात - 'जैसें ग्रंथीं बोलिलें । तैसेंचि स्वयें पाहिजे केलें ॥' (४-६)

साधन-विषयक एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न शिष्य विचारतो तो असा की, एकदा नाशिवंत असलेल्या सर्व गोष्टींचा, अर्थात् अनात्मरूप 'माये'चा त्याग केल्यानंतर पुन्हा 'साधन' करण्याची आवश्यकता आहे काय? त्याचे उत्तर असे की, 'नाशिवंत तुवां वोळखावे । साधन न लगे करावे ॥' (४-९). येथील 'वोळखावे' हे पद ज्ञानवाचक आहे. नाशिवंत मायेची व्याप्ती कर्तृत्व, भोक्तृत्व आणि ज्ञातृत्व या तीनही अंगांनी घडणाऱ्या साऱ्या व्यवहारविश्वाला ग्रासणारी आहे, हे या आधी समर्थांनी स्पष्ट केलेच आहे. तिचे 'ज्ञान' झाले म्हणजे ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान, ध्याता-ध्येय-ध्यान, त्यागी-त्याज्य-त्याग इत्यादी सर्व त्रिपुटी त्यांच्या 'देहबुद्धी' या मूळ कारणासह मिथ्यात्वे नाहीशा होऊन केवळ सच्चिदानंद आत्मारामच आत्मत्वे प्रकाशित होतो म्हणजे 'अनावृत्त' होतो. ज्ञानेश्वरांच्या समर्थ शब्दात तैसा आत्मदर्शनी आडळ । असे अविद्येचा जो मळ । तो शास्त्र नाशी येर निर्मळ । प्रकाशे स्वयें।।'' (ज्ञा. १८-१२३२). या आत्मविज्ञानात साधक-साध्य-साधन ही त्रिपुटी विलयास जाते, अर्थात साधनांची आटाआटी उरत नाही. समर्थ सांगतात 'येथे शून्याचा निरास जाला। आत्मा सदोदित संचला । पाहो जाता साधकाला । ठावचि नाही ॥'' (४-१५). 'मना'चा कारभार 'उन्मनी' अवस्थेत कसा असणार? हा झाला 'ज्ञानान्मोक्ष:' चा विचार. पण येथे समर्थ आत्मसाक्षात्काराचे हेच फळ भक्तीने प्राप्त होते असे सांगतात - 'हे चि जाण भक्तीचे फळ । जेणे तुटे संसार मूळ । नि:संग आणि निर्मळ । आत्मा होइजे स्वयें ॥' (४-२९) याचे कारण येथे समर्थांना अभिप्रेत असलेली 'भक्ती' म्हणजे 'आत्मनिवेदन' होय. त्याचे स्वरूप - 'प्राप्त जाले आत्मज्ञान। अभिन्नपणे जे विज्ञान । तेचि जाण आत्मनिवेदन। जेथे मी तू पण नाही ॥'' (४-३२). विभक्त नव्हे तो भक्त!

''ज्ञान आणि उपासना। दोनी एकचि पाहाना ।'' असे समर्थ का म्हणतात. ते यावरून समजून येते.

६) आत्माराम हा चराचर विश्वात भरून राहिलेला असल्याने ज्ञानोपासनेने त्याच्याशी एकरूप झाल्यावर ज्ञानी भक्ताचे 'संदेह बंधन' नि:शेष तुटून जाते व 'जो वेदशास्त्रांचा भावगर्भ । निर्गुण परमात्मा स्वयंभ । तयाचा एकसरा लाभ।'' (५-१२) होतो. ही 'स्वानुभूती' म्हणजे 'अनंत सुखाचे भांडार' च! हाच अमृतानुभव! कारण ही विश्वात्मैक्याची आनंदभूमी असते. मी संसारीहून सुटलो । मी पैलपार पावलो । मीच सकळ विस्तारलो । सर्वांभूती ॥' (५-४) ज्ञानेश्वरांच्या शब्दात 'किंबहुना चराचर । आपणचि

जाहला ।।' (ज्ञा. १२-२१३). ईशावास्य उपनिषदातही हाच सर्वात्मैक्याचा विचार फलासह सुरेखपणे व्यक्त झाला आहे. 'यस्मिन् सर्वाणि भूतानि आत्मैवाभूत विजानत: । तत्र को मोह: क: शोक: एकत्वमनुपश्यत:।।'' (७). परमार्थत: आत्मारामशिवाय 'दुसरे' काहीच नसल्याने 'सर्व' हा शब्दही निरर्थक म्हटला पाहिजे. कारण 'सर्वं खल्विदं ब्रह्म।' याचा परम अर्थ 'सर्वं नास्ति, ब्रह्मैव अस्ति।' असा आहे. तीच गोष्ट 'अहं ब्रह्मास्मि' या महावाक्याची. समर्थ सांगतात - 'मजमध्ये वार्ता । मी पणाची नाही ।।' (५-५) कारण 'आत्मनिवेदन' झाल्यावर 'अहं' कसा उरेल? म्हणून 'अहं ब्रह्मास्मि'चा अर्थही 'अहं नास्मि, ब्रह्मैव अस्ति' असाच होतो. हाच 'गाळीव मीपणाचा फुंज' किंवा ज्ञानेश्वरांचा 'निकराचा आत्मभाव' होय. केवळ समर्थांचेच नव्हे तर जीवमात्राचे 'स्वत:सिद्ध स्वरूप' असलेला 'आत्माराम' त्यालाच म्हणतात. जेव्हा शिष्य सदगुरूंना अहंभाव विसर्जनपूर्वक लोटांगण घालतो तेव्हा तो गुरुरूपी आत्मारामात विलीन होऊन राहातो. कारण ज्ञानेश्वर म्हणतात त्याप्रमाणे 'तैसा गुरूशिष्यमिसे । हाचि एकु उल्हासे। जरी काही दिसे । दोनी पणे ।।' (अमृ.२-६४) समर्थ सांगतात - 'ऐसा कृपाळू - स्वामीराव । आदि पुरुष देवाधिदेव । शिष्यासी निजपदी ठाव । ऐक्यरूपे दिधला ।।' (५-२५). म्हणूनच 'आपणासारिखे करिती तात्काळ । नाही काळ वेळ तयालागी।।' अशी संतांची ख्याती आहे.

शिष्याचा हा 'स्वानुभव' म्हणजे 'आत्मारामा'ची फलश्रुतीच म्हणता येईल. ही स्वरूपावस्थिती प्राप्त होण्यासाठी माणसाने 'आत्मा-अनात्मा', किंवा 'ब्रह्म-माया' यांचा विवेक करून अशाश्वत - नश्वर - अशा मायेचा संपूर्णपणे त्याग केला पाहिजे ही समर्थांची 'आत्मारामा'तील प्रमुख शिकवण आहे, असे दिसते. मीमांसकांनी ग्रंथाच्या तात्पर्यनिर्णयाच्या सहा खुणा किंवा कसोट्या सांगितल्या आहेत. त्या अशा 'उपक्रमोपसंहारौ अभ्यासोऽपूर्वता फलम् । अर्थवादोपपत्तीच लिंगं तात्पर्यनिर्णये ।।' या षड्लिंगांचा उपयोग करून 'आत्माराम' ग्रंथाचे जे तात्पर्य निघते ते वरीलप्रमाणे संपूर्ण मायिक जगताच्या विवेकपूर्वक त्यागाचे, वैराग्याचे आहे, असे दिसून येते. ग्रंथाचा उपक्रम ''नाशिवंत तितुके देशी । तरी पद प्राप्त निश्चयेसी ।।' (१-३५) असा आहे, तर उपसंहार- ''असो हा शब्द पाल्हाळ । तुझें तुटलें जन्ममूळ । कां जे नाशिवंत सकळ । मदर्पण केले ।। जें जें जाणोनि टाकिले । तें नाशिवंत, राहिलें । तुझें तुज प्राप्त जालें । अक्षय पद ।।' (५-२२,२३) असा आहे. खरे तर 'स्वरूप' हे नित्यप्राप्तच असते. परंतु आपल्या आवरण - विक्षेप शक्तींनी माया त्यास पूर्णपणे झाकून टाकते. अर्थात मायेचा पडदा - जवनिका - दूर केल्याशिवाय आत्मारामाचे दर्शन कसे होईल? माया ही स्वत: 'मायिक' मिथ्या आहे आणि तिचाही प्रकाशक प्रज्ञानघन आत्माच आहे हा बोध झाला म्हणजे हे आवरण मायेसह नाहीसे होते आणि आनंदघन आत्माराम 'प्रकाशे स्वये'. एकूण आत्मारामातील विवरणाचे सार ज्या एका संकल्पनेत सामावले आहे ती संकल्पना म्हणजे 'आत्मनिवेदन'! तिच्यात व्यतिरेकाने मायिकाचा त्यागही समाविष्ट आहे आणि अन्वयाने मायातीत, सर्वात्मक आत्मारामाचे दर्शनही!! दासबोधात समर्थ सांगतात, 'आत्मनिवेदनाचे अंती। जे कां घडली अभेदभक्ती । तये नाव सायोज्यमुक्ती । सत्य जाणावी ।।' (८-८-१९). या अभेदभक्तीनेच भक्त, ज्ञानी, योगिजन हे आत्मारामी विश्राम पावतात. ''इति श्री आत्माराम । रामदासी विश्रामधाम । योगी पावती विश्राम । जये ठायीं ।।'' (२-४३)

इतिशम् ।

---

'ज्ञानेश्वरही 'अमृतानुभवा' अखेरीस 'अकृत्रिम भक्ती' हे योग, ज्ञानआदींचे विश्रामस्थान असल्याचे सांगतात -
''कोण्ही एक अकृत्रिम । भक्तीचे हें वर्म । योगज्ञानादि विश्राम । भूमिका हे ।।' (अमृ. ९-६०).

# समर्थ संप्रदाय आणि निंबरगी संप्रदाय नामस्मरणाद्वारे आत्मज्ञानाची प्राप्ती

**प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे**

*'प्रज्ञा' अ-७४ आसरा सोसायटी, होटगी रोड, सोलापूर ४१३००३, दूरभ्रमण - ९४२२६५३६३६*

समर्थ संप्रदाय आणि निंबरगी संप्रदाय यांचा प्रमाणग्रंथ 'दासबोध' असून दोन्ही संप्रदायात मनाचे श्लोक व करुणाष्टके देखील उपासनेच्या वा भजनाच्या रूढ पद्धतीप्रमाणे म्हटली जातात. दासबोधवाचन-दासबोधपारायण दोन्ही संप्रदायात तेथील सप्ताह - पद्धतीनुसार केले जाते. 'सगुणाचेनि आधारे । निर्गुण पाविजे निधरि।।' हीच उपदेश वाणी प्रमाण मानून दोन्ही संप्रदायांत सगुण-निर्गुण अशा दोन्ही स्वरूपाची उपासना केली जाते. तसेच दासबोध-मनाचे श्लोक यावर दोन्ही संप्रदायांतील सत्पुरुषांनी तसेच अभ्यासू, उपासक साधकांनी प्रवचनेही केली असून अजूनही त्यावर सतत चिंतन-मनन केले जात आहे. मारुतीची उपासना ही प्रारंभीची सगुणोपासना म्हणून सुरू करून नंतर 'नामस्मरणात्मक भक्तियोग' अनुसरून 'पहावे आपणासी आपण । या नांव ज्ञान' या ओवीतील 'तत्त्वार्थ' जाणून घेऊन उपासना केली जाते. दोन्ही संप्रदायांत वेगवेगळी भजनपद्धती असली, तरी त्यातील भावभक्ती ही नामसाधनेला पूरकच मानली गेली आहे. उभय-संप्रदायांतील काही माहिती इथे दिली आहे. समर्थ सांप्रदायिकांना त्यांच्या संप्रदायाचा इतिहास व उपासनापद्धती ठाऊक आहेच. पण इथे निंबरगी संप्रदायाचा इतिहास, उपासनापद्धती, साधनेचे स्वरूप इत्यादीविषयी माहिती दिली असून, त्याद्वारे उभय संप्रदायाचे कार्य आध्यात्मिक दृष्टीने 'प्रचीती' ला केंद्रबिंदू मानून आपापल्या पद्धतीने सुरू आहे. उभय संप्रदायांतील साधकांना परस्परांविषयी प्रेम व आदर आहे. व्यक्तिगत साधना असो की सामुदायिक उपासना असो, त्याद्वारे ईश्वरदर्शन घडावे आणि मोक्ष प्राप्त करून घ्यावा, हेच उभयतांचे साध्य आहे.

सगुण वा निर्गुण अशा कोणत्याही देवाचे दर्शन घडून आले, तर जीवनधन्यता प्राप्त होईल, हे नक्की!!

अनेकविध संप्रदायांनी ग्रंथसंपदा आणि गुरुपरंपरा यांच्या माध्यमातून उपासनाधर्म सांगून साधकांना ईश्वरदर्शनाचे अहोभाग्य मिळवून दिले. प्राचीन काळी ऋषिमुनींनी आणि त्यानंतरच्या काळात संतांनी हे कार्य बहुमुखी करून भक्तिमार्गावर मुमुक्षूंना चालते ठेवले आहे. महाराष्ट्रात नाथ, महानुभाव, दत्त, वारकरी आणि समर्थ संप्रदाय अशा पाच भक्तिप्रवाहांच्याद्वारे हे कार्य सातत्याने सुरू आहे. महाराष्ट्र-कर्नाटक यांच्या सीमाप्रांती गेल्या अडीचशे वर्षांपासून 'निंबरगी-संप्रदाया'नेही अनेक संप्रदायांतील तत्त्वज्ञानाचा समन्वय करून साधकांना सद्गुरुपदिष्ट नामाच्या ध्यानाधिष्ठित साधनेचे पाथेय दिले असून, त्या योगे ईश्वरदर्शन घडून येण्यातच मोक्षप्राप्तीचा परमानंद आहे, हे प्रतिपादिले आहे. ''ज्ञानमूलक, नीतिप्रधान, साक्षात्कार पर्यवसायी, नामस्मरणात्मक -

भक्तियोग' ही या संप्रदायाची उपासना दृढ केली आहे. त्याविषयीचा एक विनम्र आढावा इथे घेतला आहे.

**पूर्वपीठिका :**

संप्रदाय कोणताही असो, साधनापद्धती कोणतीही असो, त्यात उद्दिष्ट म्हणा वा ध्येय म्हणा एकच आहे, ते म्हणजे - ईश्वरदर्शन करून घेणे हे होय. दर्शनसुखाचा आनंद सगुण आणि निर्गुण अशा दोन्ही उपासनेत प्राप्त होतो. पण त्यासाठी प्रत्येक संप्रदायाने गुरू, नाम, साधना याविषयी काही रूढी वेगळीपणाने जपली आहे. देहाने असलेल्या गुरूंकडून उपदेश प्राप्ती, साक्षात्कारी संतांच्या समाधिस्थानी जाऊन घेतलेली नाममंत्रकृपा, किंवा वडिलांनाच गुरू करून भक्तिपरंपरा पुढे चालविणे अशा स्वरूपात 'भक्तीचा प्रारंभ' केला जातो. कुणी सद्गुरुकडून कानमंत्र घेतो, कुणी सार्वजनिकरीत्या गुरुपदेश घेतात, तर कुणी स्वप्नदृष्टांताद्वारे मंत्रदीक्षा घेतल्याची उदाहरणे प्राचीन काळापासून पाहावयास मिळतात. अलीकडेही समुदायाला जाहीरपणे गुरुमंत्राची दीक्षा देणारे गुरू आहेत. साधनेच्या अंगाने विचार करायचा तर कुणी पूजाविधी, पारायणसेवा, नामजप अशा स्वरूपात आपापली साधना करणारी सांप्रदायिक मंडळी आहेत. काही संप्रदायात प्रासंगिक उपासना आहे, तर काही संप्रदायांत नित्य उपासना आहे. शिष्याने काहीच करावयाचे नाही, फक्त गुरुसेवा करायची, शिष्याचे कल्याणाची सर्व जबाबदारी गुरूवर असून गुरूच काय करायचे ते करतील, अशीही समजूत करून दिलेली मंडळी 'भक्तजन' असल्याचा वेगळा प्रकारही पाहावयास मिळतो. एक गोष्ट मात्र खरी की, ज्याला जो संप्रदाय मिळाला, जे गुरू भेटले, जी साधना मिळाली, ती स्वीकारून लोक भक्तिमार्गावर वाटचाल करीत आहेत. प्रत्येकाच्या दृष्टीने ज्याचा त्याचा 'परमार्थ' ज्याच्या त्याच्या पुरता 'जीवनोद्धारक' आहे. त्यामुळे संप्रदाय, गुरू, साधना ही विविधांगाने रूढ आहे. इतकेच! सर्व संप्रदाय आपापल्यापरीने श्रेष्ठच आहेत. सर्व संप्रदायांच्या तत्त्वज्ञानालाही वेद, उपनिषदे, गीता ही प्रस्थानत्रयीच 'आधार' म्हणून लाभली असल्याने अध्यात्मबोध कुणी केला, याचे 'पूर्वसूत्र' शंकर-पार्वती संवादाशीच जोडले गेले आहे. पार्वतीने आत्मोद्धाराविषयीचा प्रश्न विचारला आणि भगवान शंकराने नामसाधना हे त्यासाठीचे साधन म्हणून उपदेशले. महाराष्ट्रीय संतांच्या पुरते बोलायचे झाल्यास हा उपदेश मत्स्येंद्रनाथांनी ऐकला, पुढे गोरखनाथ-गहिनीनाथ यांचेकडून तो ज्ञानदेवांचे थोरले बंधू निवृत्तिनाथांना प्राप्त झाला. त्यांनी हा उपदेश ज्ञानदेवांना केला. त्यांनी तो 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाद्वारे सर्वांतर्यामी पोहोचविला. त्यांच्या आधारानेच 'निवृत्ती ते निळोबा' या भागवतधर्मातील संतपरंपरेकडून आणखी विस्तारला गेला. नाथ, महानुभाव, दत्त यांचे उपासनाग्रंथ वेगळे असले, तरी मूळ तत्त्वज्ञान तेच आहे. समर्थ संप्रदायानेही प्रस्थानत्रयीच आधारभूत मानली आहे. फक्त उपासनाग्रंथ म्हणून समर्थ रामदासस्वामींचा 'दासबोध' प्रमाणभूत म्हणून मानला गेला आहे.

**निंबरगी संप्रदाय :**

'निंबरगी संप्रदाय' म्हणून प्रचलित असलेला संप्रदाय हा प्रामुख्याने महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रांती रुजला आणि विस्तारला देखील! मात्र या संप्रदायाचा शिष्यगण महाराष्ट्रात नागपूर-नाशिक इथे, तर कर्नाटकात बेळगाव, हुबळी, धारवाड, कारवार इथेही कार्यरत आहे. देशात पाहायचे तर जोधपूर-अलाहाबाद-बडोदा इथेही कमी-अधिक प्रमाणात कार्यरत आहे. त्याचे मुख्य क्षेत्र म्हणजे उमदी-जत-इंचगेरी-जिगजिणी या पंचक्रोशीत आहे. तो 'इंचगेरी संप्रदाय' म्हणूनही विख्यात आहे. अलीकडे तो 'निंबाळ संप्रदाय' म्हणूनही ओळखला जातो. सद्गुरू आणि भक्ती प्रसारकार्य याद्वारे सांप्रदायिक-केंद्रबिंदू भिन्न-भिन्न होत गेले एवढेच! निंबरगी संप्रदायाकडे ही भक्तिज्ञानाची परंपरा कशी आली म्हणाल? तर ती नवनाथांपैकी रेवणनाथ-मरूळनाथ-काडसिद्ध यांच्याकडून नंतर

विस्तारली गेली आहे. काडसिद्धांनी कोल्हापूरजवळील सिद्धटेक (सिद्धगिरी) येथील गुहेत ध्यान करून आत्मज्ञान प्राप्त करून घेतले, असा पूर्वेतिहास सांगितला जातो.

'रेवणनाथ-मरूळसिद्ध-काडसिद्ध यांचा काळ ११ व्या शतकातला आहे. 'काडसिद्ध' हे गुरुपदावरच्या साक्षात्कारी संत श्रेष्ठाचे पदनाम असावे असे वाटते. कारण कोल्हापूर येथील काडसिद्धांशी या संप्रदायातल्या निंबरगीमहाराज यांचेशी अनुग्रह होऊन जो संबंध आला ते निंबरगी महाराज हे (इ.स. १७९० ते १८६५) कालखंडाच्या दृष्टीने दोनशे-सव्वादोनशे वर्षांच्या आसपासच आहेत. मूळ काडसिद्धांपासून हे काडसिद्ध २२ वे गुरुसिद्ध होते, असे म्हटले जाते. निंबरगी या गावी नारायणराव तथा निंबरगी महाराज हे लिंगायत नीलवाणी जातीत जन्माला आलेले सत्पुरुष होत. ३६ वर्षे साधना करून ते आत्मज्ञानी झाले. साधकाला नाम देऊन आत्मोद्धाराचे 'साधन' त्यांनी देऊ केले व नामाचे स्मरण करण्याची 'साधना' दिली. तीच या संप्रदायाची मुख्य उपासना आहे. त्यांचेकडून चिम्मडचे रघुनाथप्रिय तथा साधुबुवा (इ.स.१८४३ ते १८७९) यांनी अनुग्रह घेतला.

त्यांनी उमदीचे भाऊसाहेब उमदीकर (देशपांडे) यांना निंबरगी महाराजांची भेट घालून देऊन नाम दिले. त्यांनी खडतर साधना करून आत्मज्ञानाचा सर्वत्र प्रसार आणि प्रचार केला. भाऊसाहेब महाराज (इ.स. १८४३ ते १९१४) उमदीकर यांनी दासबोध, मनोबोधावर प्रवचने केली आहेत. तशीच त्यांची पारमार्थिक-पत्रेही मार्गदर्शक आहेत. काडसिद्धांचे काही वाङ्मय उपलब्ध नाही. पण निंबरगी महाराजांनी केलेल्या प्रवचनांवर आधारित 'महाराजरव वचन' हा ग्रंथ (मूळचा कानडीत, नंतर मराठीत भाषांतरीत केलेला) उपलब्ध आहे. नाम आणि नीतीवरचे उत्तम भाष्य त्यांत पाहावयास मिळते. पुढे निंबरगीमहाराजांच्या शिष्यांच्या दोन शाखा निर्माण झाल्या.

एक शाखा - भाऊसाहेब महाराज उमदीकर त्यांचे शिष्यत्रय - अंबुरावमहाराज कुलकर्णी (जन्म जिगजेणी इ.स. १८५७ व समाधी इंचगेरी येथे इ.स. १९३३) डॉ. रा. द. तथा गुरुदेव रानडे (जन्म जमखंडी इ.स. १८८६, समाधी निंबाळ इ.स. १९५७) श्रीमती शिवलिंगप्पा अक्का (जत-इ.स. १९६७ ते इ.स. १९३०) दुसरी शाखा रघुनाथप्रिय तथा साधुबुवा (चिम्मड - इ.स. १८२९ ते १८७९) रामभाऊ यरगट्टीकर (इ.स. १८३३-१८९१) पुढे हनुमंतराव कोटणीस (सांगली) त्यांचेनंतर त्यांचे सुपुत्र - गुरुनाथमहाराज कोटणीस (सांगली) तसेच शिष्य रामराय केळकर महाराज (सांगली) अशाप्रकारे विस्तारली गेली आहे. इंचगेरी येथे भाऊसाहेब महाराजांचे शिष्य गिरिमल्लेश्वरमहाराज (जन्म जमखंडी-समाधी इंचगेरी) त्यांचे शिष्य महादेवप्पा मठदेवरू - त्यांची एक शिष्यपरंपरा वंशरूपाने पुढे चालविली गेली आहे. इंचगेरीला श्री निंबरगी महाराज व श्री. भाऊसाहेब महाराज उमदीकर यांची समाधिमंदिरे आहेत. तेथे विद्यमान मठाधीश म्हणून जगन्नाथ महाराज हे आहेत. भाऊसाहेब महाराजांचे आणखी एक शिष्य गणपतराव कण्णूरमहाराज हे असून त्यांनीही मोठ्या प्रमाणावर भक्तिप्रसार केला. त्यांची समाधी कण्णूर येथे आहे. सोलापूरचे प्रभाकरमहाराज हेही याच परंपरेतले आहेत.

**सांप्रदायिक तत्त्वज्ञान :**

या संप्रदायाचा बहुथोर प्रसार ग्रंथाद्वारे डॉ. रा. द. तथा गुरुदेव रानडे यांनी केला. त्यांनी इंग्रजी-मराठीतून ग्रंथ लिहिले व संप्रदायाची कीर्ती सातासमुद्रापलीकडे पोहोचली. ते स्वत: अलाहाबाद विद्यापीठात कुलगुरू होते. निंबाळला त्यांनी आश्रम स्थापन केला. तत्त्वज्ञानाला शब्दज्ञानाच्या पातळीवरून प्रकट केले, तर आत्मज्ञानाला खडतर साधनेतून प्रकट करून ते गुरुपदाचे अधिकारी झाले. निंबरगी संप्रदायातील गुरुपरंपरा व तिचे पाईक या दोन्ही पातळींवरून जे तत्त्वज्ञान विशद केले गेले त्याचा सारांश/संक्षिप्त आढावा इथे घेतला आहे. सर्वांच्या

ग्रंथसंपदेत तो अधिक विस्ताराने पाहायला मिळतो.

भारतीय अध्यात्मविद्या ही तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने जे काही महत्त्वपूर्ण सिद्धांत मांडते, त्याचा मूलाधार वेद-उपनिषदे-गीता हा आहे. त्यामुळे कोणताही भक्तिसंप्रदाय असला, तरी तो वेगवेगळ्या उपासनापद्धतीने ईश्वरप्राप्ती करून घेण्याविषयीचाच विचार प्रकट करतो. उपासना वगळून कोणताच चमत्कार घडून येत नसतो. उपासनेतूनच अनुभूती प्राप्त होते, हेच भक्तिसूत्र सर्वाधिक महत्त्वाचे आहे. निंबरगीमहाराजांनी 'महाराजरवरवचन' या ग्रंथात 'नामस्मरण नीतिआचरण' यावरच सर्वाधिक भर दिला आहे. या संप्रदायातील मुख्य शिकवण पाहाता ती पाच पायऱ्यांनी विशद करून सांगितली गेली आहे. त्या पाच पायऱ्या म्हणजे (१) माणसाला साधकावस्था प्राप्त व्हावयाची असेल, तर प्रथम त्याला प्रपंच करता करतानाही परमार्थाची ओढ असायला हवी. म्हणजेच ईश्वरप्राप्तीचे ध्येय त्याच्यासमोर असले पाहिजे. त्याच्या परिपूर्तीसाठी साधकाच्या अंत:करणात तळमळ लागून राहिली पाहिजे. (२) त्या तळमळीतूनच साधकाला गुरुशोध घ्यावासा वाटतो. त्यासाठी तो वेगवेगळ्या ठिकाणच्या भक्तिसंप्रदायातील गुरुपदी असलेल्या अधिकारी/श्रेष्ठसाधक/सत्पुरुष यांची चौकशी करू लागतो. त्यातून त्याला एखादी श्रेष्ठ व्यक्ती भेटते. तिच्याकडून तो उपदेश घेतो. त्यालाच गुरुबोध म्हणतात. त्यावेळी गुरूंकडून त्याला उपासनेचा मंत्र प्राप्त होतो. कधी प्रत्यक्ष, तर कधी स्वप्नदृष्टांत, तर कधी समाधिस्थानी जाऊन तो उपासना मंत्र घेतो. गुरुपदिष्ट मंत्रप्राप्तीनेच खऱ्या परमार्थाचा प्रारंभ होतो. (३) मंत्रालाच 'नाममंत्र' म्हटले जाते. त्या नामाचे सदैव/सर्वत्र स्मरण करणे ही पायरी म्हणजे - साधना होय! (४) ही साधना ज्या संप्रदायातील गुरूंकडून घेतलेली असते त्या संप्रदायाची 'नियमावली' अनुसरणे म्हणजे सांप्रदायिक उपासनेची चौकट सांभाळणे होय. तिलाच 'सांप्रदायिक-आचारधर्म' असे म्हटले जाते. तो आचारधर्म सांभाळणे म्हणजे सांप्रदायिक बंधन स्वीकारणे होय. (५) मग साधना जशीजशी सुरू होईल, अधिकाधिक वाढेल, त्यात सातत्य निर्माण होईल, तशीतशी 'अनुभूती' साधकाला येऊ लागते. तिलाच 'प्रचीती' असेही म्हटले जाते. या अनुभवाचे स्वरूप दोन प्रकारचे असते. (१) सगुणसाक्षात्कार, (२) निर्गुण साक्षात्कार - त्यांचे स्वरूप कसे असते म्हणाल? तर, सगुणसाक्षात्कारात दर्शन हे प्रत्यक्ष वा दृष्टांत स्वरूपात घडू शकते. मंदिरातील मूर्तिदर्शन होऊन चित्तवृत्ती आनंदून जाणे हा सगुण साक्षात्काराचाच एक भाग आहे. कधी कधी 'देवासारखे भेटलात' वा 'देवासारखे धावून आलात' असे उद्‌गार काही दु:ख-संकट प्रसंगी साहाय्यकारी झालेल्या व्यक्तिसंदर्भात आपण काढतो, तोही सगुण साक्षात्काराचाच एक प्रकार आहे. थोडे विशेषत्वाने सांगायचे, तर चर्मचक्षूंना घडलेले दर्शन तसेच आलेले अनुभव हे प्रामुख्याने सगुण साक्षात्कारात मोडतात. पूजाविधी, भजन-कीर्तन, पारायण-निरूपण अशा प्रसंगी देखील तल्लीनता प्राप्त होऊन अंगावर रोमांच उभे राहाणे वा चित्तवृत्ती प्रसन्न आणि समाधानी होणे अशाही अनुभवांचा समावेश त्यात करता येतो. आता निर्गुण-साक्षात्काराचा अनुभव कसा असतो म्हणाल? तर, त्याविषयी साक्षात्कारी संत-साधु-सत्पुरुष यांनी आपल्या अभंगातून वा वचनातून त्याविषयीच्या काही खुणा नोंदविल्या आहेत. त्या पाहाता सदगुरूंची स्वप्नदृष्टांताने होणारी आज्ञा, तिचे शब्द कानावर येणे, जागृतीत ते तंतोतंत आठवणे हा एक भाग आहे. दुसरा एक भाग म्हणजे - बिंदू/काळा-पांढरा, नाद, रंग, तेज, आकार अशा प्रकारचे अनुभव हे निर्गुण साक्षात्काराचे होत. ते अनुभव अंत:चक्षूंना म्हणजेच ज्ञानचक्षूंना दिसतात. दिवस असो किंवा रात्र असो, डोळे झाकून किंवा उघडून, कुठेही किंवा सर्वत्र येऊ शकतात. असे संतांच्या अभंगातही पाहायला मिळते. 'नित्यनेमावली' या सांप्रदायिक भजनावलीत असे अनेक अभंग घेतलेले पाहावयास मिळतात. तसेच या संप्रदायातील गुरुपरंपरेतील सर्वांना असे दोन्हीही अनुभव आल्याचे

त्यांच्या ग्रंथात/वचनात/निरूपणात पाहावयास मिळते. श्री गुरुदेव रानडे यांनी तर म्हटले आहे की, माझ्या ग्रंथात समाविष्टित असलेले सर्व अनुभव मी घेतलेले आहेत. बिंदू, नाद, तेज, आकार, रंग यांसह अगदी 'खसखशीएवढ्या सूक्ष्म स्वरूपासून' ते भगवद्गीतेत वर्णन केलेल्या 'दिव्यसहस्रेषु' पर्यंतचे अनुभव त्यांना आले होते. समर्थ रामदासस्वामी यांनी दासबोध ग्रंथात सांगितल्याप्रमाणे 'सगुणाचेनि आधारे । निर्गुण पाविजे निर्धारें' याचा तत्त्वविचार निंबरगी संप्रदायातील गुरुपरंपरेने व श्रेष्ठसाधकांसह अनेकांनी अनुसरला व अनुभवला आहे. नव्याने अनुग्रह घेणाऱ्यांनाही सगुणभक्तीकडून निर्गुण उपासनेकडे वाटचाल करावयाची आहे, असा उपदेश या संप्रदायातील ग्रंथसंपदेकडून आणि श्रेष्ठ साधकांकडून वाचनचिंतन-निरूपणप्रवचन यातून केला जातो. या संप्रदायाचा प्रमाणग्रंथ म्हणून 'दासबोध' हा ग्रंथ शिरोधार्ह मानला गेला आहे. कारण समर्थ रामदासस्वामी यांनी दासबोधात सगुण-निर्गुणाचा संदुर/ व्यवस्थित/अनुभूतीप्रमाणे असा विचार मांडला आहे. आत्मज्ञानाची ओळख, शिकवण, अनुभूती ही त्यात पानोपानी पाहावयास मिळत असल्याने भाऊसाहेब महाराज उमदीकर, अंबुराव महाराज यांनी या ग्रंथावर प्रवचनेही केली आहेत. श्री गुरुदेव रानडे यांनी गीता-उपनिषद-मराठी संतांचा परमार्थमार्ग, हिंदी-कन्नड संतप्रणित भक्तिमार्ग व साक्षात्कार या अनुषंगाने लिहिलेले ग्रंथ प्रामुख्याने सगुणोपासनेसहित निर्गुण उपासनेचा पाठपुरावा करतात.

### 'गुरुविण देव नाही दूजा' :

निंबरगी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा मूलाधार म्हणजे ध्यानाधिष्ठित नामसाधना हा असून उपासनेत 'देव गुरुपाशी आहे' या तुकोबारायांच्या वचनाला केंद्रस्थानी ठेवून आणि गुरुविण देव नाही दूजा या ज्ञानदेवांच्या वचनाशी दृढता राखून आपला परमार्थ चालविण्याचा प्रयत्न करतो. देव दाखविणाऱ्या सद्‌गुरूसच या संप्रदायात विशेष महत्त्व देण्यात आले आहे. कारण काय म्हणाल? तर, ज्याला स्वत:ला पोहता येते तोच दुसऱ्याला पोहायला शिकवून तरजेब करू शकतो. व्यावहारिक जगाचा हा एक साधा नियम असून, त्याचा उपयोग तुकोबाराय आणि रामदासस्वामी यांनी अनुक्रमे अभंगातून व ओवीरचनेतून केला आहे. साहजिकच उपदेश आणि साधना ही सदगुरूस अग्रभागी ठेवूनच घ्यावी आणि करावी, असा संकेत या संप्रदायाने मानला आहे. (१) नामानुग्रह पद्धती कशी? (२) स्मरण-भजन स्वरूपी उपासना कशी? या दोन प्रश्नांची उत्तरे शोधू जाता सांप्रदायिक गुरुपरंपरा आणि भजनावली यांचाच आधार घ्यावा लागतो.

### प्रथम नामानुग्रह पद्धती पाहू :

निर्गुण देवाचे प्रतिनिधी म्हणूनच सद्‌गुरू हे सगुण रूपातील देव आहेत. त्यांनी स्वत: खडतर साधन करून देव पाहिलेला असतो. 'देवाचे गुप्त रूप दाखवितो तो सद्‌गुरू' अशी अनुभूतीप्रमाण व्याख्या गुरुदेवांनी केली असून पुढे ते म्हणतात की, 'सद्‌गुरू हे देवांशी एकरूप झालेले असतात' म्हणून तेच 'गुरुपदाचे-अधिकारी' आहेत. गुरु-शिष्य उपदेश परंपरा फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. त्यानुसार अशा सद्‌गुरुंकडून नामोपदेश घेणे हे फार फार अगत्याचे आहे. गुरुमंत्रप्राप्ती व नामस्मरण साधना, तसेच नीतिआचरण ही परमार्थाची त्रिमिती आहे. म्हणून साक्षात्कारी सद्‌गुरुंकडून नाममंत्र दिला - घेतला जातो. त्यातही या संप्रदायाने सद्‌गुरुपदाचा आणखी एक निकष ठरविला असून तो पूर्वापार चालत आला आहे. खडतर नामसाधनेने घडून येणाऱ्या ईश्वरदर्शनाने 'कृपाशक्ती' प्राप्त होऊन त्या सद्‌गुरूंना डोळ्यांपुढे साधकाला कोणते नाम द्यावयाचे आहे ते दिसते. तशी अनेक नामेही त्यांच्या अनुभवाला येतात. त्याला या संप्रदायात 'नामाला नाम होणे' असे म्हटले गेले आहे. गुरुमंत्र देण्याचा अधिकाराचा हा महत्त्वाचा निकष आहे.

दुसरा एक निकष नसला तरी संकेत असा आहे की, सद्‌गुरूंना 'नामाला नाम झाले' असा अनुभव येऊन नाममंत्र देण्याचा अधिकार प्राप्त झाला तरी 'नाम देऊन भक्तिप्रसार करावा' अशा स्वरूपाची आज्ञा झाल्याशिवाय निंबरगी ते निंबाळ गुरुपरंपरेतील गुरुपदावरचे अधिकारी नाम देत नाहीत. तसेच सद्‌गुरूंचे सद्‌गुरू जर हयात असतील, तर ते असेतोवर सद्‌गुरू नाम देत नाहीत. गुरुदेवांनी तर त्यांचे ज्येष्ठ गुरुबंधू अंबुराव महाराज हयात असेतोवर नाम दिले नाही. नंतर त्यांनी नाममंत्र दिला आहे. आता, किमान निंबाळ येथे तरी गुरुपदावरचा अधिकार असण्याच्या निकषाप्रमाणे कुणीही 'अधिकारी' नसल्याने तेथील ज्येष्ठ साधक (कै.) काकासाहेब तुळपुळे व (कै.) काकासाहेब कारखानीस, (कै.) रामण्णा कुलकर्णी यांनी समाधीवर नाममंत्र घेण्याची प्रथा रूढ केली. त्याप्रमाणे आताही याच पद्धतीने अनुग्रह दिला जातो. विद्यमान ज्येष्ठ साधक असलेले अनुभवी साधक नवीन साधकास त्याच्या उपास्यदैवताचे नाम चिठ्ठीवर लिहून ती गुरुदेवांच्या समाधीवर ठेवून 'गुरुपदिष्ठ-नाम' मानून अनुग्रह घेतात. साधनमार्गाने नव्याही अनेक साधकांना सगुण-निर्गुण स्वरूपाचे काही ना काही अनुभव येत असल्याने सदगुरूंची कृपाशक्ती समाधिस्थानी असून तीच आपल्याला नाम देत आहे, अशा श्रद्धेने 'नामानुग्रह-पद्धती' रूढ केली गेली आहे. सद्‌गुरुंवरचा दृढविश्वास हा या संदर्भात सर्वाधिक महत्त्वाचा आहे. गुरुदेवांच्या नंतर ५० वर्षे होऊन गेली. पण निंबाळला तरी हीच पद्धती अनुसरली गेली आहे. तेही सबीज-नामच आहे.

आता, या संप्रदायातील 'उपासना धर्म' कोणता आहे तो पाहू - निंबरगीमहाराजांपासून ते गुरुदेव रानडे यांच्यापर्यंत साधक नऊ-नऊ तास नामस्मरण करीत होते. गुरुपदावर असलेल्या साक्षात्कारी-सदगुरूंनी तर त्यापेक्षाही अधिक काळ म्हणजे जवळपास सदैव/अहर्निश 'नामस्मरणात्मक भक्तियोग' अनुसरला आहे. दासबोध हा प्रमाणग्रंथ असल्याने 'दासबोधवाचन' केले जाते. त्रिकाळ भजनापूर्वी दासबोधातील समास वा किमान पंचवीस तरी ओव्या वाचल्या जातात. प्रत्येक नामसप्ताहात समाप्तीच्या वेळी दासबोधपूजन केले जाते. वर्षभराचे ग्रंथपारायण इथे केले जाते. सात दिवसांच्या पारायणाऐवजी नित्य वाचन असल्याने सप्ताह वा उत्सवकाळात 'दासबोध-समाप्ती' करून पुन्हा नव्याने दासबोध-वाचन सुरू केले जाते. रोज दासबोध वाचनानंतर दहा मनाचे श्लोक वाचून मगच भजनास प्रारंभ केला जातो.

निंबरगी संप्रदाय, इंचगेरी, निंबाळ, जत, उमदी याठिकाणी प्रामुख्याने कार्यरत असून, विविध मठांत तसेच विविध शहरांतील साधकांकडे होणाऱ्या नामसप्ताहांत, जवळपास याच स्वरूपाचे कार्यक्रम असतात. 'एक देव, एक धर्म, एक विश्व, तरच एक मानवता' या ध्येयाने प्रेरित झालेल्या आश्रमात जातिभेद वा स्पृश्यास्पृश्यभेद याला थारा नाही. ध्यानास प्रामुख्याने महत्त्व देऊन त्याला पूरक असे भजन, कीर्तन, प्रवचन इ. कार्यक्रम सर्वत्र केले जातात. 'नान्य: पंथा विद्यते अयनाय' असे श्रीगुरुदेव बाहू उभारून सांगत असत. 'नामस्मरण हाच परमार्थ' ही या संप्रदायाची प्रधान उपासना आहे.

**भक्ति-उपाधी-साधनमार्ग :**

साधनमार्ग म्हणा वा उपासनामार्ग म्हणा, त्यात भक्ती आणि उपाधी अशी दोन प्रधान अंगे या संप्रदायात रूढ आहेत. श्री भाऊसाहेबमहाराज उमदीकर यांनी लिहिलेल्या पारमार्थिक पत्रात त्याविषयीचे विवरण मोठे मार्मिकपणाने केले गेले आहे. कसे म्हणाल? तर, त्यांनी सांगितले आहे की, नामस्मरण ही मुख्य भक्ती असून, इतर पूरक अशा सर्व गोष्टी - म्हणजे भजन, प्रवचन, कीर्तन, उत्सव, पालखी इ. उपक्रम हे सर्व उपाधीत मोडतात. मात्र ही उपाधी भक्तीला वाढवित असल्याने ती सोडू नये. तसेच ती फार वाढवू नये का? तर, त्यायोगे जर नामस्मरणाकडे दुर्लक्ष होत असेल, तर

उपाधीत फार न अडकता नामस्मरण भक्तीच केली पाहिजे. नामस्मरणात्मक - साधना कशी असावी? तर त्यांनी म्हटले आहे की, 'नाम निरंतर दृष्टी असू द्यावी' म्हणजेच नामाचे स्मरण निरंतर करावे, दृष्टी नासिकाग्री असावी. का? तर डोळ्याला दिसणारे देवाचे स्वरूप/ अनुभवांच्या खुणा/प्रचीती ती पाहात राहावी. याला 'वस्तुदर्शन' असे म्हटले गेले आहे. नामस्मरण करण्याची पद्धतीही विशद केली गेली आहे. तिचे चार प्रकार आहेत. (१) जप-माळ घेऊन, जपाचा दृष्टांक ठरवून, विशिष्ट आसनपद्धतीने गुरुमंत्राचे/नाममंत्राचे स्मरण करावे. स्नान आटोपून पूजाविधीनंतर पुष्कळजण जपसाधना करतात. (२) स्मरण - माळ न घेता सदैव आणि सर्वत्र केले जाणारे नामस्मरण होय. त्यास स्थळ, काळ, वेळ यांचे कोणतेही बंधन नाही. 'अहो येता-जाता, उठता-बसता, खाता-पिता' नामस्मरण करावे, ही गोष्ट त्यात अपेक्षित आहे. (३) नेम - दिवसभरच्या चोवीस तासांतली एक वेळ निश्चित करून त्या वेळेला गुरुमंत्र/नाममंत्र याचे स्मरण करणे इथे अपेक्षित आहे. ही वेळ अगदी मरेपर्यंत/जेवढे शक्य होईल तेवढे पर्यंत/पाळावी असे कटाक्षाने सांगितले गेले आहे. नेम करताना शक्यतो आसनसिद्ध करून/आसनसिद्ध होऊन साधन करावे. त्यास 'कट्टाचा नेम' असे या संप्रदायात म्हटले गेले आहे. (४) ध्यान - नेम करीत असता, स्मरण करीत असता वा जप करीत असता दृष्टीला (डोळे उघडून वा मिटून घेतले असता नाही) जर देवाचे रूप - विशेषत: निर्गुण देवाचे अनुभव येत असतील, तर ते पाहात त्याचेशी एकरूप होऊन जाण्याची अवस्था 'ध्यान' स्वरूपाच्या नामसाधनेत अपेक्षित आहे. विसोबा खेचर यांची ध्यानसाधना तशी होती हा खुद्द नामदेव महाराजांचा अनुभव आहे. त्यायोगेच त्यांना सदगुरुचरणाची महती कळली होती.

## सदगुरुकृपेनेच ईश्वरदर्शन :

निंबरगी संप्रदायाची शिकवण सातासमुद्रापलीकडे पोहोचविणारे गुरुदेव रानडे यांनी या संप्रदायाच्या उपासना-धर्माचा गाभा नित्यनेमावलीच्या प्रस्तावनेत मोठ्या मार्मिकतेने सांगितला आहे. ते लिहितात की, 'आत्मज्ञान म्हणजे काय? तर आपण आपणास पाहाणे होय. आत्मदर्शन झाल्यावर अतिंद्रिय पण बुद्धिग्राह्य सुख होते. ते सुख अनुभवीत असताना आसनापासून हलू नये असे वाटते. आत्मज्ञानाचे स्वरूप सद्‌गुरूस शरण गेल्यानेच अनुभवास येते. अनुभव येण्याची साधने म्हटली म्हणजे प्रथम गुरुकृपा पाहिजे; नंतर श्रवण, विचार, अभ्यास ही पाहिजेत. नंतर विवेक-वैराग्य उत्पन्न होऊन मनुष्य आत्मदर्शनास प्राप्त होतो. आत्मदर्शन झाल्यावर हृदयग्रंथी तुटते, सर्व संशय नष्ट होतात, नैष्कर्मसिद्धी प्राप्त होते, देवात आणि भक्तात भेद उरत नाही. साधक द्वैतापासून अद्वैतास, आकारापासून निराकारास, स्वरूपापासून ब्रह्मस्थितीस सहज प्राप्त होतो.' (पृष्ठ २० व २१) तसेच 'ईश्वराचे नाम घेतले असता रूप सहजीच प्रकट होणार आहे. अहर्निशी नाम घोकले असता देवास भक्तापासून अन्यत्र जाताच येत नाही. (पृ.२२) इथे 'घेतले म्हणजे गुरुकृपांकित नामानुग्रह असा अर्थ अभिप्रेत असून, 'घोकले' म्हणजे अहर्निश नामस्मरण कसे असा अर्थ अभिप्रेत आहे. या दोन्ही शिवाय ईश्वरप्राप्ती होतच नाही. सदगुरुकृपा हीच परमार्थाची गुरुकिल्ली आहे. साधनाशिवाय ईश्वरदर्शन होत नाही. त्यासाठी गुरुकृपाच लागते. गुरुकृपेने ईश्वरदर्शन होते हे खरे, पण त्यासाठी नामस्मरण हे त्याहून खरे!!

## आंतरिक समन्वय :

संप्रदायातील गुरुपरंपरेतील सत्पुरुष श्री निंबरगीमहाराज हेही निंबरगी येथील मारुती मंदिरात (भीमरायाचे मंदिर) उत्सवानिमित्ताने वास्तव्य करीत. निंबरगीला पाचमुखी हनुमान असून तो अर्धा वर आला आहे. तो 'जागृत' आहे. श्री भाऊसाहेब महाराज उमदीकरांना श्रावण सप्ताह

समाप्तीला प्रभूरामचंद्रांच्या पावलांचे दर्शन झाले होते. त्यांचा जन्मही समर्थ रामदास स्वामी यांच्याप्रमाणे रामनवमीलाच झाला होता. त्यांचे पट्टशिष्य श्री अंबुरावमहाराज यांचेही नाव अंबाजीच होते. (समर्थांच्या कल्याणस्वामींचे नाव अंबाजीच होते.) भाऊसाहेब महाराज उमदीकरांनी 'दासबोध' वर तसेच 'मनाचे श्लोक' यांचे वर प्रवचने केली असून, ती आता 'दासबोधसुधा' व 'मनोबोधामृत' या नावाने प्रसिद्ध झाली आहेत. श्री अंबुमहाराजही दासबोधावर प्रवचने करीत. त्यातील भावार्थ त्यांचे शिष्य श्री. रामण्णा कुलकर्णी यांनी पुस्तकरूपाने प्रसिद्ध केला आहे. डॉ. रा. द. तथा श्रीगुरुदेव रानडे यांनी 'रामदासवचनामृत' हे पुस्तक (दासबोधातील ओव्यांचे संकलन व संपादन करून) प्रसिद्ध केले असून, त्यास विवेचक प्रस्तावनाही लिहिली आहे. तसेच ओवीबंधावरील शीर्षके समर्पक व मार्गदर्शक आहेत. लहानपणी त्यांनी जमखंडीला मारुतीची उपासना केली होती. (शालेय जीवनात) तसेच खाऊसाठी मिळालेल्या पैशातून त्यांनी सज्जनगडावरून 'मनाचे श्लोक' हे पुस्तक मागविले होते. राहत्या घरात (जमखंडीला) त्यांनी एक छोटा मारुती स्थापन केला असून, सध्याही तो तेथील परमार्थमंदिर वास्तूत आहे. निंबाळ येथेही त्यांनी स्टेशनच्यापलीकडे मारुतीची स्थापना केली होती. आता तेथे मंदिर बांधण्यात आले आहे. श्रीगुरुदेवांच्या पुण्यतिथीला आदले दिवशी गुरुदेवांची पालखी समाधी मंदिरापासून निघून मारुती मंदिरात नेऊन ठेवली जाते. तिथे रात्रभर गावकरी मंडळींतर्फे भजन केले जाते. पुण्यतिथी दिवशी सकाळी ही पालखी वाजतगाजत पुन्हा समाधिमंदिरात आणून ठेवली जाते. श्रीगुरुदेव हे सज्जनगडावर समर्थांच्या समाधीचे दर्शनासाठी गेले होते. तेथे त्यांना 'प्रचीती' आली. त्यामुळे त्याक्षणी ते म्हणाले - 'जागा ओळखीची वाटत आहे.' सज्जनगडावरील रामदासी मंडळी तसेच तेथील अनेक उपासक निंबाळला श्रीगुरुदेवांच्या समाधिमंदिरात दर्शनार्थ येऊन गेले आहेत. (१) गुरु, (२) नाम, (३) साधना यांच्यावरील बळकट/दृढ अशा श्रद्धेवरच उभय संप्रदाय कार्यरत आहेत. नामसाधना आणि नीतिआचरण या दोन पाऊलबळाने वाटचाल करताना त्यांना सगुण वा निर्गुण असे अनुभवही येत आहेत. प्रभुरामचंद्र हे सगुण स्वरूपात आणि आत्माराम हा निर्गुण स्वरूपात समर्थांना अभिप्रेत आहे. निंबरगी संप्रदायाने सगुणभक्तीच्या आधारे पण आत्मस्वरूपदर्शन हे साध्य मानून सांप्रदायिक उपासनेची बांधणी केली आहे.

श्रीगुरुदेवांचे नाव रामचंद्र दत्तात्रेय रानडे हे आहे. आणि त्यांनी आत्मारामाचे दर्शन प्राप्त करून घेऊन समाधिस्थानी चैतन्यरूपाने निवास केला असून, उपासनेने त्यांचीही कृपा प्राप्त होते. त्यांच्या समाधीवर 'श्रीराम' ही अक्षरे लावलेली आहेत. 'नित्य नेम विवरिता। स्वयं ब्रह्मचि होये ।। अपार पुण्यराशी तरी श्रवण लाहे ।।' या दासबोधाच्या आरतीप्रमाणे या संप्रदायाने आपली वाटचाल चालविली आहे. ''सर्वांचे सर्व कल्याण व्हावे।।' हीच उभय संप्रदायातील सद्‌गुरूंच्या चरणी विनम्र प्रार्थना.

# समर्थांचे सृष्टिविज्ञान

**सौ. वीणा शंकर तळघट्टी**
*'चैतन्य' प्लॉट नं २, गणंजय हौसिंग सोसायटी, युनिट १ आझादनगर, कोथरुड, पुणे - ३८.*

*नभें व्यापिलें सर्व सृष्टीस आहे । रघुनायेका उपमा ते न साहे ।*
*दुजेवीण जो तोचि तो हा स्वभावे । तया व्यापकु व्यर्थ कैसे म्हणावे ॥ म. श्लो. १९८।*

समर्थांच्या वाङ्मयावर विशेषत: दासबोधावर अनेक मान्यवरांनी अभ्यास करून लिखाण केले आहे. दासबोधाच्या व्यवस्थापनेच्या दृष्टिकोनातून, सामाजिक दृष्टिकोनातून, शैक्षणिक दृष्टिकोनातून किंवा आध्यात्मिक दृष्टिकोनातून त्यांनी आपले विचार जरी मांडले असले, तरी दासबोधाचा पाया हा 'अध्यात्म' हाच आहे.

मी व्यवसायाने शिक्षक होते. निवृत्तीनंतर शिवथरघळीत दासबोध जयंतीच्या निमित्ताने पारायण सोहळ्यात भाग घेतला. निवृत्तीनंतर केलेल्या या पारायणाचा एक विलक्षण परिणाम माझ्या मनावर झाला. शाळेत शिकवण्याच्या विषयात 'भूगोल' हाही एक अभ्यासाचा विषय होता. हा विषय माझा आवडता. कारण हा विषयच मुळी जिवंत विषय. त्यात साऱ्या विश्वाचा विचार केला आहे. विश्वाच्या उत्पत्तीपासून त्याच्या उत्क्रांतीपर्यंतचा हा विचार त्यात झालेला आहे. व्यापक दृष्टीने सृष्टीच्या उत्पत्ती, स्थिती, लय यांचा विचार त्यात समाविष्ट आहे. भूगोल शिकवित असताना 'विश्व अनंत अफाट' असा एक घटक विषय होता. त्यात आकाशगंगा, सूर्यमाला, सूर्य-चंद्र, तारे, ग्रह हे अंतराळ विश्वातले वर्णन, तर नद्या, पर्वत, वारे, वृक्ष-वल्ली, पशुपक्षी हे पृथ्वीतलावरील सृष्टीचे वर्णन आणि पाताळ, भूगर्भ हे पृथ्वीतील गाभ्याचे वर्णन. या सर्व विश्वाचा आणि सृष्टीचा म्हणजेच 'विश्व आणि मानव' यांच्या संबंधाचा अभ्यासही भूगोलातून होतो.

समर्थांनी माणसाच्या जीवनाचा आणि निसर्गाचा अभ्यास भौगोलिकदृष्टी ठेवून आणि आध्यात्मिक विचार घेऊन व त्यांचा संदर्भ देऊन केला आहे. आपल्या पुरश्चरण काळानंतरच्या देशाटनाच्या काळात त्यांनी जसा समाज जवळून बघितला तसा निसर्गही खूप जवळून बघितला. 'दास डोंगरी राहतो । चिंता विश्वाची वाहतो' त्यांना विश्वाची चिंता होती. मानव कल्याणाचा विचार ज्या दासबोधामार्फत समाजापर्यंत त्यांनी पोहोचविला त्या ग्रंथाची निर्मितीच मुळी निसर्गरम्य अशा शिवथरघळीत झाली आहे. समर्थ त्याला 'सुंदर मठ' म्हणत. त्या घळीचे सुंदर शब्दचित्र स्वत: समर्थांनी आपल्यापुढे केले आहे.

*'गिरीचे मस्तकी गंगा । तेथूनी चालली बळें ।*
*धबाबा लोटती धारा । धबाबा तोय आदळे ॥'*

जावळीसारखा घनदाट आरण्याचा प्रदेश! सह्याद्रीचे उंचच उंच कडे, खोल दऱ्या, कीर्र घनदाट अरण्ये, डोंगर-दऱ्यांवरून वाहणारे झरे, धबधबे, नद्या, घोंगावणारे

वारे आणि जाण्या-येण्यास अत्यंत बिकट वाट! पण या साऱ्यांची तमा न बाळगता त्यांनी त्या सौंदर्याचा आस्वाद घेतला. गावापासून दूर असणारे शांत व रमणीय वातावरण असणारे हे स्थान त्यांना दासबोध लिहिण्यास योग्य वाटले आणि म्हणून त्यांनी आपला शिष्य कल्याण-स्वामींना इथे बोलावून घेऊन त्यांनी दासबोध सांगितला व कल्याणस्वामींनी तो लिहून घेतला. हे काही नुसते निसर्गप्रेम नव्हते, तर निसर्गाच्या सान्निध्यात राहून अनेक विषयांची उकल शोधली आणि त्याचा अभ्यास करून त्यांचा अध्यात्माशी संबंध लावला. याचा अर्थ असा की, समर्थ आणि निसर्ग यांची आत्यंतिक जवळीक होती.

'विश्व आणि मानव यांचा खूपच जवळचा संबंध दिसून आला आणि पिंड आणि ब्रह्मांड यांच्या ऐक्याची जाणीव त्यावेळी दासबोधाचा अभ्यास करत असताना जाणवली.

*'भूगोळ आहे ब्रह्यामध्ये । ब्रह्म आहे भूगोळामध्ये ।*
*पाहता येकमेकांमध्ये । प्रत्यक्ष दिसे (दा. ९-९-५)*

पारायण काळात दासबोधातील अनेक ओव्या भौगोलिक विषयांशी संबंधित आहेत, असे आढळून आले. समर्थांचा दासबोध हा विश्वकोशात्मक ग्रंथ आहे. त्यात कोणता विषय सापडत नाही? समर्थांनी सर्वच विषय अभ्यासिले व चर्चिले आहेत. अशाच ह्या अनेक भौगोलिक ओव्या मी शोधून काढल्यात. या भूगोलात खगोलही आहे. समर्थांनी या खगोल भूगोलाचा अभ्यास करून अध्यात्माशी संबंध जोडला. विश्वात असणाऱ्या पंचमहाभूतांचे– पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश स्थान आणि आध्यात्मिकदृष्ट्या देहातील स्थान यांचे संतुतल जर माणसाला विवेकाने साधता आले तर तो एक 'समाधानी माणूस' म्हणून या जगात वावरू शकेल. समर्थांनी या एकेका महाभूताचा 'तत्त्व' म्हणून, विश्वाचा घटक म्हणून विचार मांडला आहे. हे दासबोधाचा अभ्यास करताना प्रकर्षाने जाणवले.

दासबोध म्हणजे गुरु-शिष्यांचा हा संवाद आहे. शिष्याला ह्या पाचही महाभूतांचा आपल्या जीवनाशी असणारा संबंध म्हणजे 'पिंडी ते ब्रह्मांडी' हे समजून घेण्यासाठी तो सतत समर्थांशी संवाद साधतो. त्याच्या या उत्सुकतेपोटी प्रथम तो पृथ्वी या तत्त्वाविषयी समर्थांना प्रश्न विचारतो. 'सृष्टीची उत्पत्ती केव्हा झाली?' 'कशी झाली?' तेव्हा समर्थ म्हणतात, ही सृष्टी झालीच नाही. पण आपल्या पंचज्ञानेंद्रियांनी - नाक, कान, डोळे, जीभ, त्वचा ती प्रत्यक्षात अनुभवाला येते, या दृश्य विश्वाचे ज्ञान होते. म्हणून ती आपणांस खरी वाटते.

*'अरे! जे जालेचि नाही! त्याची वार्ता पुससी काई ।*
*तथापि सांगो जेणे काही । संशय तुटे (८-३-१)*

शिष्याच्या मनातील संशय दूर करण्यासाठी पृथ्वीतत्त्वासह चारही महाभूतांचे ते स्पष्टीकरण करतात.

समर्थांनी 'पृथ्वीचे' दोन अर्थ सांगितले आहेत.

१) पृथ्वी म्हणजे सृष्टी, २) पृथ्वी म्हणजे जडतत्त्व - एक महाभूत. भौगोलिकदृष्ट्या वर्णन करताना ते म्हणतात.

''जे जे जड आणि कठिण । तें तें पृथ्वीचें लक्षण । (८-४-१०) पृथ्वीचा-वसुमतीचा महिमा किती थोर आहे हे सांगण्यासाठी समर्थांनी सोळाव्या दशकाचा संपूर्ण तिसरा समास खर्ची घातला आहे.

*''धन्य धन्य हे वसुमती। इचा महिमा सांगो किती ।*
*प्राणीमात्र तितुके राहाती । तिच्या आधारे ॥१॥*
*ऐसा पृथ्वीचा माहिमा । दुसरी काय द्यावी उपमा ।*
*ब्रह्मादिकापासुनी आम्हा । आश्रेयोचि आहे ॥३०॥*

(दशक १६, समास ३)

पृथ्वीचे स्वरूप आणि व्याप्ती सांगताना समर्थ म्हणतात,

*'सप्त दीपावली पृथ्वी । काय म्हणोनी सांगावी ।*
*नवखंडे मिळोनी जाणावी । वसुंधरा (८-५-७)*

थोडक्यात म्हणजे,

*"आता असो हे बहुवस । जडांश आणि कठिणांश ।*
*सकळ पृथ्वी हा विश्वास । मानिला पाहिजे ॥'* (८-५-११)

जे जड-दृश्य-विश्व आहे ते सर्व पृथ्वी तत्त्वापासून बनले आहे. आणि संपूर्ण विश्वाची रचना ही पंचमहाभूतांपासून झाली आहे, असे समर्थ म्हणतात.

*'म्हणोनी दृश्याच्या पोटी । आहे पंचमहाभूतांची दाटी ।*
*येकपणे पहिली मिठी । दृश्य पंचभूतां ॥*
*'एवं पंचभूतांचे चि दृश्य । सृष्टी रचली सावकाश'*
(८-४-५९-६०)

अशा काही ओव्यांच्या अभ्यासावरून संपूर्ण सृष्टी ही जड आणि चेतन मिळून बनली आहे. म्हणजे पृथ्वीमध्ये जे जे पदार्थ निर्माण झाले त्याचे दोन वर्ग पडतात - (१) जड, २) चेतन. चैतन्यरहित ते जड आणि चैतन्ययुक्त ते चेतन. यालाच आपण 'स-जीव-नि-र्जीव' म्हणतो. संपूर्ण सृष्टी ही जड आणि चेतन मिळून बनली आहे. पृथ्वीच्या उत्पत्तीपासून आजतागायत सृष्टीमध्ये उत्क्रांतीच होत गेली आहे. तिच्यातील विविधता वाढत गेली आहे. विविध वृक्ष-वेली, विविध कृमी-किटक, विविध पशुपक्षी, विविध प्राण्यांचे जे वर्ग निर्माण झाले त्यामध्ये मनुष्य हा सर्वश्रेष्ठ प्राणी आहे. कारण मनुष्यप्राण्यामध्ये 'चैतन्य' हे विविध अंगांनी सर्वाधिक प्रमाणात प्रकट झालेले दिसते, असे असले तरी सर्वच प्राणी 'देहधारी' असल्याने चेतनाचा जडाशी अतूट संबंध असल्याचे दिसते. यातील जे जडतत्त्व आहे त्याला तात्त्विक भाषेत किंवा तत्त्वज्ञानात 'महाभूत' अशी संज्ञा आहे. त्यांचेही स्थूलाकडून सूक्ष्माकडे अशा चढत्या क्रमाने आढळणारे पाच प्रकार आहेत. त्यांनाच पंचमहाभूते म्हणतात. १) पृथ्वी, २) आप, ३) तेज, ४) वायू, ५) आकाश. येथील पृथ्वीचे स्वरूप हे व्यापक अर्थाने 'सृष्टी' नव्हे, तर पृथ्वीचा दुसरा अर्थ म्हणजे पृथ्वी हे एक महाभूत म्हणजे जडतत्त्व. ते एक सर्वाधिक स्थूल असे महाभूत आहे. आणि आकाश हे सर्वाधिक सूक्ष्म महाभूत आहे. सूक्ष्ममहाभूताकडून म्हणजे आकाशाकडून स्थूल महाभूताकडे - पृथ्वी या महाभूताकडे येताना तन्मात्रे किंवा गुण यांची संख्या वाढत जाते. म्हणजे एका महाभूतापासून दुसऱ्या महाभूताची उत्पत्ती होत असताना पूर्वीच्या महाभूताचा गुण नंतरच्या महाभूतामध्ये मिसळतो आणि याची उत्पत्ती सूक्ष्म महाभूतापासून झाल्यामुळे आकाशापासून वायू, वायूपासून-तेज, तेजापासून आप, आपापासून पृथ्वी. प्रत्येक महाभूताचा एक विशिष्ट गुण असतो, त्याला तन्मात्रे म्हणतात. ही उत्पत्ती होत असताना गुणसंख्या वाढत जाते. १) आकाश-शब्द, २) वायू-शब्द, स्पर्श, ३) तेज-शब्द, स्पर्श, रूप, ४) आप - शब्द, स्पर्श, रूप, रस, ५) पृथ्वी - शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध अशी ही वाढलेली गुणसंख्या आहे. सृष्टीची उत्पत्ती मात्र पाचही महाभूतांच्या एकत्रीकरणातून होते. त्याला पंचीकरण म्हणतात. सजीवसृष्टी ही पंचकृत महाभूते आणि चैतन्य यांची मिळून झाली. चैतन्य तत्त्वाचेही कार्यदर्शनानुसार असे काही विभाग सांगितले आहेत. सामान्यपणे त्यांना 'मानसिक विश्व' म्हणता येईल. भारतीय तत्त्वज्ञानात त्याचे चार विभाग केले आहेत. १) मन, २) बुद्धी, ३) चित्त, ४) अहंकार. सर्व प्राण्यांमधील मनुष्यप्राण्यामध्ये हे चारही विभाग अत्यंत उत्क्रांत स्वरूपात दिसून येतात. म्हणूनच त्याला 'उत्क्रांतीचे शिखर' म्हटले आहे. मनुष्य हा कर्तृत्व, ज्ञातृत्व आणि भोक्तृत्व या तीनही शक्तींनी युक्त आहे. पाचही महाभूतांचे विवेचन ज्या 'पृथ्वीला' लागू आहे. तिला समर्थांच्या भाषेत 'भू-गोळ' म्हणतात. पृथ्वी ग्रह म्हणून आणि पृथ्वी महाभूत म्हणून समर्थांनी दोन्हीही अंगांनी पृथ्वीचे वर्णन केले आहे. याच पृथ्वीवर परमेश्वराने ज्याला बुद्धी दिली असा मनुष्यप्राणीही आहे. बुद्धी म्हणजे विचारशक्ती. या विचारशक्तीच्या साहाय्याने मनुष्य आपले जीवन सार्थकी लावू शकतो. हेच समर्थांनी त्यांच्या दासबोध ग्रंथातून स्पष्ट केले आहे.

*नर देहाचे उचीत । काही करावे आत्महित ।*
*यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोतमी लावावे (२-४-१३)*

हे आत्महित साधण्यासाठी पंचमहाभूतांनी बनलेला देह म्हणजे 'मी नव्हे' हे जाणणे आवश्यक आहे. पंचमहाभूते ही बाहेरील संपूर्ण विश्वाला आणि जिवामध्ये शरीर, इंद्रिये, मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार या सर्वांनाच स्थूल आणि सूक्ष्म स्वरूपात व्यापून आहेत. हे सर्व विश्व आहे त्याला 'अनात्म' म्हणतात आणि याहून भिन्न असे जे 'सत् चित् आनंद, स्वरूप अधिष्ठानभूत तत्त्व आहेच. तेच 'आत्मतत्त्व' होय. या आत्मतत्त्वाचा साक्षात्कार करून घेणे हे मानवी जीवनाचे ध्येय आहे, हे समर्थ आवर्जून सांगतात.

हे ध्येय साध्य करून घेण्यासाठीच पंचमहाभूतात्मक सृष्टीचे देहासह यथार्थ ज्ञान करून घेऊन त्याचा 'निरास' करणे तत्त्वत: व साधनेच्या दृष्टीने आवश्यक मानले आहे. अज्ञानामुळे आपण देहबुद्धी स्वीकारून जगतही-सृष्टीही शाश्वत सत्य मानून चालतो व दु:ख भोगतो. जड-चेतन, अशाश्वत-शाश्वत यांचा विवेकपूर्वक 'नीर-क्षीर विवेकाने' निवाडा करून माणूस जेव्हा आपल्या आत्मस्वरूपाचे आनंदमयत्व अनुभवतो, तेव्हाच त्याला शांती प्राप्त होते. यादृष्टीने पृथ्वी महाभूत अतिशय महत्त्वाचे आहे.

'आप' म्हणजे पाणी. या महाभूताचा विचार करताना त्या संदर्भातील दासबोधात काही ओव्या आहेत.

*'आता सकळांचे जन्मस्थान। सकळ जीवांचे जीवन ।*
*जयास आपोनारायण । ऐसे बोलीजे ॥ (१६-४-१)*

पाणी हे सर्वांचे जन्मस्थान आहे. सर्व जीवांचे ते जीवन आहे. पाण्यावाचून सर्व चराचर विश्व जगूच शकणार नाही. भौगोलिक भाषेत पृथ्वीवर ७१% भाग पाणी व २९% जमीन आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळे लोकांनी तिच्या कक्षेबाहेर जाऊन पृथ्वीला बघितली. पाण्यामुळे तिला 'निळावर्ण' प्राप्त झाला आहे. पृथ्वीला त्या पाण्याचा आधार आहे.

*'पृथ्वीस आधार आवर्णोदक । सप्तसिंधूचे सिंधोदक ।*
*नाना मेघींचे मेघोदक । भूमंडळी चालिलें ॥ (१६-४-२)*

पाण्याचे लक्षण बघितले तर ते मृदु आहे. पाण्यातील एक गुण निघून गेला म्हणजे 'गंध'. त्याच्यापाशी शब्द, स्पर्श, रूप, रस हे चार गुण आहेत. पाण्याला शब्द आहे, म्हणजे आवाज आहे. पाण्याच्या प्रवाहाला एक प्रकारचा नाद आहे. उदा. झरा झुळ झूळ वाहतो. धबधबा कोसळतो. नदी खळखळून वाहते. समुद्राच्या लाटा रौद्ररूप धारण करून 'सुनामी' सारखी वादळे उठवितात. पाणी 'थंड' 'उष्ण' आहे हे स्पर्शाने कळते. पाण्याला रूप आहे. आपण पाणी नितळ म्हणतो, गढूळ म्हणतो आणि पाण्याचा चौथा गुण म्हणजे रस, रस म्हटले की चव आलीच. कितीतरी पदार्थांतून पाणी आढळते. समर्थ सांगतात.

*'नानावल्लीमध्ये जीवन । नाना फळीं फुलीं जीवन ।*
*नाना कंदी मुळी जीवन । गुणकारे ॥'*
*'क्षारोदकें सिंधोदके । विषोदके पियुषोदके ।*
*नाना स्थळांतरी उदकें । नाना गुणांची । (१६-४-१३-१४)*

उसात, फळांत रस - पाणी आहे. रत्नात पाणी चमकते. नाना शस्त्रामध्ये पाणी आहे. मनुष्यदेहातील लाळ, मूत्र, स्वेद हे म्हणजे पाणीच.

ह्या पाण्याचा 'रस' हा विशिष्ट गुण आहे. तसा त्याचा प्रवाहीपणा हा ही एक गुण आहे. रस हा जिभेचा विषय आणि प्रवाहीपणा म्हणजे गतीचा विषय. त्याच्या ह्या द्रवत्व आणि चव या दोन प्रमुख लक्षणांनाच 'रसत्व' म्हणतात. ज्या पदार्थांमध्ये पाण्याचा अंश आहे. त्या त्या पदार्थाची चव वेगवेगळी आहे. म्हणजेच पाण्याच्या रसामध्ये विविधता हा एक गुण आहे. आंब्याची मधुरता, कारल्याची कडू चव, चिंचेचा आंबटपणा, आवळ्याचा तुरटपणा, समुद्राचा खारटपणा, नदीचे गोडपाणी ह्या प्रत्येक रसाची, पाण्याची चव वेगवेगळी आहे. दासबोधाच्या १६ व्या दशकाच्या चवथ्या 'आप-निरूपण' या समासात समर्थांनी आपाचे वर्णन केले आहे. (ओवी क्र. २० ते २२) आणि (२६ ते ३०) या सर्व ओव्यांमधून अनुभवाला येणारी आपतत्त्वाची विविध रूपे विस्ताराने वर्णिली आहेत.

पण एकटे पाणीच नव्हे, तर सर्वच तत्त्वे शेवटी परमात्मतत्त्वावर अधिष्ठित आहेत. समर्थ म्हणतात -

*'त्याहून थोर परमेश्वर । महाभूतांचा विचार ।*
*त्याहून थोर परात्पर । परब्रह्म ।। (१६-४-३१)*

या पंचमहाभूतांचे एकमेकांवर कसे प्रभुत्व आहे, हे समजण्यासाठी दासबोधातील तेराव्या दशकातील तिसरा समास महत्त्वाचा आहे. (उभारणी निरूपण) या पंचमहाभूतांचा विस्तार होऊनच हे सर्व विश्व घडले आहे.

आता तिसरे महाभूत म्हणजे तेज. तेज म्हणजे प्रकाश. 'तमसो मा ज्योतिर्गमय' अंधाराकडून प्रकाशाकडे आमच्या जीवनाची वाटचाल होऊ दे. अशी आपली प्रार्थना आहे. तेजतत्त्वाचे लक्षण सांगताना समर्थ म्हणतात.

*''जें जें प्रकाश रूप । तें तें तेजाचें स्वरूप ।*
*शोषक उष्णादि आरोप । तेज जाणावे ।। (८-५-२८)*
*''आता तेजाचे लक्षण । भासलेपण ते कठिण ।*
*तेजी ऐसी वोळखण । पृथ्वीयेची (८-४-२८)*

भारतीय तत्त्वज्ञानात समर्थांनी तेजाची दोन लक्षणे स्वीकारून चर्चिली आहेत. ही दोन्हीही रूपे भारतीय विचारांत, भारतीय संस्कृतीत महत्त्व पावली आहेत. ती रूपे म्हणजे सूर्य आणि अग्नी. सूर्यामुळे पृथ्वीची म्हणजे सृष्टीची उत्पत्ती झाली आणि तिच्यावर निर्माण झालेली जीवसृष्टी सूर्य आणि अग्नीमुळे चालते. अग्नी विश्व व्यापून आहे. विश्वव्यापक परमेश्वर राम आणि शक्तिदायी सीता हे दोघेही एकाच तेजतत्त्वाची रूपे (सूर्य आणि अग्नी) आहेत.

तेजोराशी सूर्य हा सर्व जगाला जीवन प्रदान करतो. अग्नी घर्षणाने प्रकट होतो. तो अंधार, थंडी व रोग निवारण करतो. अग्नीमुळे सृष्टी चालते. तो जीवांचे व सर्व जगाचे पोषण करतो. तो पवित्र आहे. पृथ्वीची उत्पत्ती सूर्यापासून झाली हे सर्वांना माहिती आहे. असा हा सूर्य श्रीरामाचा पूर्वज आहे आणि अग्नी त्याचा सोयरा आहे व सीतेचा पिता आहे.

*''धन्य धन्य हा वैश्वानरू । होय रघुनाथाचा श्वशुरु ।*
*विश्वव्यापक विश्वंभरु । पिता जानकीचा (१६-५-१)*

मानवी नाती वैश्विक गोष्टींशी जुळवून समर्थ आपल्याला अधिक समजावून देतात. कारण ती नाती आपल्याला अधिक जवळची वाटतात. या दोघांचेही कार्य प्रकाश आणि उष्णता देणे आहे.

भौगोलिकदृष्ट्या विचार करता सूर्य हा एक तेजस्वी, स्थिर असा तारा आहे आणि पृथ्वी हा एक ग्रह आहे. पृथ्वी स्वत:भोवती २४ तासांत, तर सूर्याभोवती ३६५ दिवसांत एक प्रदक्षिणा पूर्ण करते. तिच्या या परिवलन परिभ्रमणामुळे तिच्यावर दिवस व रात्र निर्माण होतात. तसेच शीत, उष्ण, समशीतोष्ण कटिबंध निर्माण होतात. त्यामुळे त्या त्या कटिबंधात सूर्याच्या ऊर्जेचा परिणाम तेथल्या मानवी जीवनावर होतो. इथे सूर्य व पृथ्वी यांची असणारी स्थिती महत्त्वाची आहे. सूर्याच्या नियमित उगवण्या, मावळण्याने माणूस सर्व कार्ये, कर्मे करीत असतो. अग्नी हा जिवंतपणी जसे मानवाचे रक्षण करतो तसे तो मेल्यावर त्याचे भस्म करतो. म्हणजे अग्नी हा संहार करतो. अग्नीने तिन्हीही लोक व्यापले आहेत. असा विश्वव्यापक अग्नी पवित्र आहे. समर्थ म्हणतात -

*''सूर्य सकळांहून विशेष। सूर्यापरी अग्नी प्रकाश ।*
*रात्रभागीं लोक अग्नीस । साहें करिती ।।'' (१६-५-११)*

सूर्य सर्वांहून विशेष आहे यात वादच नाही. पण सूर्य मावळल्यानंतर अग्नीच प्रकाश देतो. सर्वांच्या घरचा अग्नी सारखा आहे. त्याला जात, पात, धर्म, पंथ नाही. त्याला कोणत्याही देश-परदेशाच्या सीमा नाहीत.

*''ऐसा अग्नीचा महिमा। बोलिजे तितुकी उणी उपमा ।*
*उत्तरोत्तर अगाध महिमा। अग्नी पुरुषाचा (१६-५-२३)*

थोडक्यात समर्थ सांगतात, तेजाचे ज्ञान हे रूपाने होते. तेज हे रूपाच्या ज्ञानाचे महत्त्व आहे. भौतिकदृष्ट्या अग्नी व सूर्य त्याची भौतिक-भौगोलिक रूपे आहेत, तर

'रूप' हे त्याचे ज्ञानात्मक तत्त्व आहे. या महाभूताचा 'रूप' हा विशेष गुण आहे.

वायू या महाभूताचे आपल्या जीवनात फारच महत्त्व आहे. वायू म्हणजे हवा. आपली श्वसनेंद्रिये त्याच्यामुळे चालतात. जिवंतपणाचे श्वासोच्छ्वास हे प्रमुख लक्षण आहे. समर्थ म्हणतात -

*"वायो जाणावा चंचळ। चैतन्य चेतवी केवळ ।*
*बोलणे हासणे केवळ । वायोमुळे ।।" (८-५-२९)*
*सृष्टी चालया कारण । मूळ वायो ।। (८-५-३०)*

दृश्य स्वरूपाच्या हालचाली वाऱ्यामुळेच होतात. विश्वातील सर्व देवता ह्या वायुरूप आहेत. वायू ही शक्तिदेवता आहे. हनुमान हा वायूचा मुलगा आहे. कोणत्याही गोष्टीचा प्रतिकार करायला शक्ती ही लागतेच. म्हणून हनुमान संकटाचा प्रतिकार करणारा देव आहे. ही शक्ती शारीरिक, मानसिक, बौद्धिकही असू शकेल. आपले मानसिक दौर्बल्य घालवून मन सामर्थ्यवान करण्यासाठी समर्थांनी मनाच्या श्लोकाची रचना केली आहे. तर विज्ञानामुळे या शक्तीचा वापर करून 'पवनचक्की' सुरू करून वीजनिर्मिती केली. वाऱ्याच्या चंचल या शब्दाने समर्थ त्याची 'क्रियाशीलता' व्यक्त करतात. या वायूच्या पाठीशी अंतरात्म्याची सत्ता आहे. ही सत्ताच वायूच्या रूपाने शरीरात काम करते. दशक १६, समास ६ यात समर्थांनी या शक्तीचे वर्णन केले आहे. ही शक्ती शरीरामध्ये 'प्राणशक्ती' म्हणून काम करते. रामदासी संप्रदायात 'वायुसुत' हनुमंताची उपासना ही रामोपासनेइतकीच महत्त्वाची मानली आहे. समर्थ सांगतात -

*"आमुचे कुळीं हनुमंत । हनुमंत आमुचे मुख्य दैवत ।*
*तयावीण आमुचा परमार्थ । सिद्धिते न पवे सर्वथा ।।*

'वायू' प्रमाणेच वायुपुत्र 'मन' ही चंचळ आहे. ते 'आत्मा' रामाचे भक्त झाले की साधक विज्ञानमय व आनंदमय कोशाच्याही आत असलेल्या 'आनंदस्वरूप परमात्म्याशी तादाम्य पावतो. म्हणूनच 'वायुरोधनांसाठी' 'योग', तर 'मनोलयांसाठी' भक्ती' सांगितली असावी.

आता शेवटच्या तत्त्वाकडे - आकाशतत्त्वाकडे वळताना समर्थ म्हणतात -

*"आकाश ऐसा सार । आकाश सकळांहून थोर ।*
*पाहता आकाशाचा विस्तार । स्वरूपासारिखा । (८-५-३६)*

भौतिक विश्वात आकाशाइतके सूक्ष्म आणि व्यापक तत्त्व दुसरे नाही. या महाभूताचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य असे की, ते 'महाभूत' असले तरी ब्रह्मस्वरूपाप्रमाणे सूक्ष्म आणि व्यापक आहे. ते अन्य चारभूतांहून वेगळे असल्याचे जाणवते. खरे तर चारही महाभूतांना आकाश हे व्यापून उरते, त्यांची कार्ये आकाशातच घडतात. म्हणून ते त्यांना आधारभूत आहे. समर्थ सांगतात -

*"आकाश जाणावे पोकळ । निर्मळ आणि निश्चळ ।*
*अवकाशरूप सकळ । आकाश जाणावे ।।*
*आकाश सकळांस व्यापक । आकाश अनेकी एक ।*
*आकाशामध्ये कौतुक । चहू भूतांचे ।। (८-५-३४-३५)*

आकाश आणि ब्रह्म यांच्यात विलक्षण साम्य आहे. ब्रह्माप्रमाणे आकाश निश्चळ, अखंड, सूक्ष्म व व्यापक आहे. जरी त्यात साम्य असले तरी भूताकाश हे ब्रह्म असू शकत नाही. कारण ते दृश्य विश्वातील महाभूत आहे व त्याची कल्पना आपण बुद्धीने करू शकतो.

*"निर्गुण ब्रह्मसे भासले । कल्पू जाता अनुमानिले ।*
*म्हणून आकाश बोलिले । कल्पनेसाठी ।।"*
*'कल्पनेसि भासेभास । तितुके जाणावे आकाश ।*
*परब्रह्म निराभास । निर्विकल्प" (९-९-१९,२०)*

सारांश - वेगळेपणें पहावे । तयास आकाश म्हणावे ।
अभिन्न होता स्वभावें । आकाशब्रह्म (९-९-१०)
तसेच ते म्हणतात -

*पंचमहाभूतामध्ये वास । म्हणौनी बोलिजे आकाश ।*
*भूतांवरी जो ब्रह्मांश। तें चि गगन ।। (९-९-२१)*

आकाश हे तमापासून झाले आहे. ते शून्य म्हणजे अज्ञान आहे. ते नश्वर आहे. तर ब्रह्म हे शाश्वत, ज्ञानरूप निर्गुण आहे. ते दृश्य नसून द्रष्टा आहे. आकाशाचे ज्ञान वेगळेपणाने होते, तर ब्रह्मज्ञान हे तन्मय, तद्रूप होऊनच प्राप्त होते. आकाशासह सर्व महाभूते ब्रह्मापासून निर्माण झाली व अंती त्यातच विलीन होतात. अर्थात ब्रह्म ही सत्य वस्तू आहे, तर पांचभौतिकदेह आणि सृष्टी हे केवळ भासमान आहे. हा भेद कळण्यासाठी नित्यानित्य विवेक करावा लागतो.

ब्रह्म निर्गुण तर आकाश सगुण.

*"आकाश अनुभवा येते । स्वरूप अनुभवापरते ।*
*म्हणोनिया आकाशाते । साम्यता न घडे (९-५-६८)*

अशा तऱ्हेने भूताकाश आणि ब्रह्मस्वरूप यातील भेद तत्त्वज्ञ संत नीर-क्षीर विवेकाने जाणतात.

*"दुग्धासारिका जळांश । निवडू जाणती राजहंस।*
*तैसे स्वरूप आणि आकाश । संत जाणती (६९)*

या सर्व विवेचनावरून आकाशाची दोन रूपे आहेत. (१) भौतिक आकाश, (२) आध्यात्मिक आकाश. म्हणजेच स्वत: ब्रह्म.

भौतिकदृष्ट्या अवकाश ही एक पोकळी आहे. विज्ञानात त्याला अवकाश म्हटले आहे. समर्थांनीही आकाश हे अवकाशरूप असल्याचे म्हटले आहे.

*'आकाश म्हणजे अवकाश! पसरला पैस ।। (१३-७-१)*

विश्वाच्या मोठेपणाला, व्यापकतेला अंतच नाही. त्याची मोजदाद करता येत नाही. अशा या विश्वात सूर्यमाला आहेत. त्या सूर्यमालेमध्ये अनेक ग्रह, तारे, धुमकेतू आहेत आणि अशा अनेक सूर्यमाला आहेत. अशा विश्वात आपले स्थान किती नगण्य आहे. परंतु सारखे संत आपणास म्हणतात की, 'तू देह नसून तू आत्मा आहेस. ब्रह्म आहेस - 'तत्त्वमसि' आणि ही आत्मबुद्धी जागृत झाली म्हणजे आपली दृष्टी आध्यात्मिक बनते आणि मग चराचर विश्वात आपले परमात्मस्वरूप व्यापून राहिलेले दिसते. कारण आत्मा हा ब्रह्मस्वरूप - सर्वव्यापी आहे. पांचभौतिक देह - स्थूल, सूक्ष्म व कारण देह धारण करणारा 'मी' हा अनंत विश्वात नगण्य आहे. परंतु त्यामधून प्रकटणारे 'सच्चिदानंद स्वरूप' हे चराचर विश्वाला व्यापून उरणारे आहे. तेव्हा या देहबुद्धीला धरून असणारा 'मी' खऱ्या अर्थाने समजून घेण्यासाठी गुरूला वा संतांना शरण जावे आणि सततच्या अभ्यासाने, चिंतनाने त्यांच्याकडून परमार्थ-बोध प्राप्त करून घ्यावा. म्हणजे देहबुद्धीचा फारसा विचार न करता थोडक्यात सारा प्रपंच करायचा पण त्यात अडकून न राहाता 'मी' पणा सोडून देऊन आत्म-ज्ञानासाठी, आध्यात्मिक बैठक साधायची. म्हणजे आपल्या देहबुद्धीकडून आत्मबुद्धीकडे जायचे. थोडक्यात स्थूलाकडून सूक्ष्माकडे जायचे. तरच त्या परमात्म्याचा समर्थांच्या भाषेत 'अनंत राघवाचा पंथ' सापडेल. ह्या चार महाभूतांपेक्षा आकाश तत्त्वाचे स्वरूप व महत्त्व कळून येते.

या ब्रह्मांडाचे स्वरूप आणखीन चांगले समजण्यासाठी त्यांनी मानवी नात्यांचा संबंध ईश्वराशी जोडला. कारण माणसासारखी नाती त्यांना सृष्टीत-विश्वात सापडली. समर्थांच्या स्फुट वाङ्मयातील 'मानपंचकात' याचे वर्णन खूप मजेशीर असे त्यांनी मांडले आहे. रामाची उपासना ही ब्रह्मांडव्यापिनी कशी आहे ते नातेसंबंध त्यांनी सांगितले आहेत.

*"कुळ या जगदीशाचें। धन्य वंश भूमंडळी ।*
*विरंची सूत विष्णूचा । पुराणे सांगती बहु ।*
*आपली वारती सर्वे। धन्य तू गा रघोत्तमा ।*
*शारदा नाति देवाची । गणेश मित्रकुमरु ।।*
*देव हा सर्वांतरात्मा । वात हा त्याजपासुनी ।*
*शक्ती ते शक्ती शिवाची । शिवशक्ती समागमे ।*
*वातसुत हनुमंत । रामसेवक हा जनी ।।*
*अंश जे चंद्रमौळीचे । ते सर्व प्रभुचे सखे।।*
*वन्ही हा जानकी पिता । सूर्य हा वंश भूषण ।*
*येकचि अंश विष्णुचे । देव मात्र भूमंडळी ।।*
*भूमी ही सीतेची माता । आजा आपोनारायणु।।*

*एकांशे चालती सर्वे ची । यालागी सर्व एकची ॥*
*शिव तो राघवा ध्यातो । राम ध्यातो सदाशिवा ।*
*सख्यत्वे चालती दोघे । प्रसिद्ध ठाऊके जनी ।*
*चंद्र तो लक्ष्मी बंधु । मंगळ मेहुणा नभी ॥*
*शरीरसमधे सर्वे । त्रैलोक्यची उपासना ॥*
*रामउपासना ऐसी । ब्रह्मांड व्यापिनी पहा ।*
*रामकर्ता राम भोक्ता । रामरूप वसुंधरा ॥*

राम सर्वत्र भरून राहिला आहे. त्याचे हे हृदयंगम वर्णन आहे. विश्व हे एक रामाचे कुटुंब आहे. हे सगळे एकमेकांचे सखेसोयरे आहेत. आकाशातील चंद्र, सूर्य, ग्रह, तारे, वायू हे कुटुंबातील नात्याप्रमाणे आहेत. या कुटुंबाचा सर्वांतरात्मा ईश्वर आहे. आकाशापासून वात निर्माण झाला. वायूचा पुत्र हनुमान, हा रामाचा दास झाला. रघुनाथाची पत्नी जानकी. अग्नी हा सीतेचा पिता व रामाचा सासरा. 'आपोनारायण' हा जानकीचा आजा. सूर्यापासून रघुवंशाची उत्पत्ती. राम व शिवाचे सख्यत्व आहे. विष्णूचा मुलगा विरंची. सरस्वती । शारदा ही ब्रह्मदेवाची पुत्री. अर्थात विष्णूची नात. गणेश शंकराचा मुलगा. म्हणजे विष्णूचा पुतण्या.

शिवशक्ती हे पति-पत्नी. हे सगळे रामाचे सखे. सर्व देव विष्णूचे अंश. चंद्र हा लक्ष्मीचा भाऊ आणि मंगळ हा विष्णूचा मेहुणा. समर्थांनी या सर्व भूगोल-खगोल यांचे शारीरिक नातेसंबंध असल्यासारखे वर्णन केले आहे. खगोल-भूगोल-पाताळ ह्या तीन जगांची म्हणजे त्रैलोक्याची उपासना. त्यामुळे ही रामोपासना ही ब्रह्मांडव्यापिनी आहे, असे समर्थ सांगतात. निसर्गातले नाते आणि मानवी नाते सारखे वाटते.

या साऱ्या दासबोधाच्या सृष्टिविज्ञानाचा अभ्यास करताना जी पंचमहाभूते विश्वात तीच माझ्यात आहेत. 'पिंडी ते ब्रह्मांडी' जाणवले. भौगोलिकदृष्ट्या झालेल्या विश्वाच्या अभ्यासाला जर आध्यात्मिक बैठक प्राप्त झाली तर मी विश्वात आहे, किंवा विश्व माझ्यात आहे, ही कल्पना स्वीकारताना खूपच आनंद झाला व त्याचे ज्ञानही झाले. परब्रह्म तत्त्वाला स्पर्श करावयाचा झाल्यास किंवा त्याला बघावयाचे झाल्यास आपणच परब्रह्म झाल्याशिवाय ते दिसणार नाही. संत तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'देव पाहावया गेलो । तेथे देवच घेऊनी ठेलो ।' अशा ह्या सर्वव्यापी ईश्वराचे स्वरूप 'अनंत कोटी ब्रह्मांड-नायक' असेच आहे. अशा सर्वव्यापी ईश्वरामध्ये विश्व राहाते. ते तिथेच भासते आणि तेथेच विलीन होते. ईश्वर जरी 'अनंत रूपे अनंत वेषे' नटला असला तरी त्याचे 'एकपण' हे कधीच नाहीसे होत नाही. एक मात्र खरे की, हे सगळे दृश्यविश्व टाकल्यावरच परमात्मवस्तू प्राप्त होते. हे या संपूर्ण दासबोधाच्या अभ्यासावरून, त्यांच्या चिंतनातून आणि मननातून समजते. हेच या विवेचनाचे सार आहे. समर्थांनी म्हटल्याप्रमाणे

*'महाद्वार वोलांडावे । मग देव दर्शन घ्यावे ।*
*तैसे दृश्य हे सांडावे । जाणोनिया ॥' (८-५-५८)*

मंदिराचे महाद्वार ओलांडून गेले म्हणजेच देवदर्शन घेता येते. हे पांचभौतिक दृश्यविश्व महाद्वारासारखे आहे. ते ओळखून मागे टाकावे किंवा ओलांडून आत जावे मगच देवदर्शन घडते. आपल्या मानवी ज्ञानावर व जीवनावर ह्या सर्व दृश्यांचे एक दाट आवरण आहे. थोडक्यात 'मी आणि माझे' ह्यातच सारे आयुष्य घालवितो. म्हणजेच हे आवरण किंवा अडळ (पडदा) दूर सारणे महत्त्वाचे. हा पडदा विवेकानेच दूर करणे म्हणजेच प्रपंचाची आसक्ती पूर्णपणे नष्ट होणे. हेच वैराग्य । समर्थ म्हणतात -

*म्हणोनी दृश्याच्या पोटी । आहे पंचमहाभूतांची दाटी ।*
*येकपणे पडिली मिठी। दृश्य पंचभूता (८-५-५९)*

या पांचभौतिक नश्वर दृश्य विश्वाचे आवरण दूर सारून वैराग्यवृत्तीने जो राहातो त्याला परब्रह्माचे दर्शन घेता येते. द्रष्टा आणि दृश्य यांच्या विवेकानेच ते शक्य होते. यालाच 'आत्मानात्म' विवेक म्हणतात. मात्र तो सफल होण्यासाठी सद्गुरूंची कृपा आवश्यक आहे.

भौगोलिकदृष्ट्या भासणारे विश्व आणि दासबोधाच्या

अभ्यासातून आध्यात्मिकदृष्ट्या दिसलेले विश्व यांचा अभ्यास करताना विश्वातली पंचमहाभूते आणि पंचमहाभूतांनी निर्माण झालेले माझे शरीर एकच आहे, हे समजले. विश्व माझ्यात आहे किंवा मी विश्वात आहे ही कल्पना स्वीकारताना जड जात नाही. अध्यात्मविचाराने मृत्यूची भीती आपोआप कमी होईल. कारण माझे हे शरीर ज्या पंचमहाभूतांचे बनले आहे ते मृत्यूनंतर त्यांच्यातच विलीन होणार. म्हणूनच आपण एखादी व्यक्ती गेल्यावर अगदी सहजपणे म्हणतो 'ते पंचत्त्वात विलीन झाले.'

तथापि स्थूल शरीर जरी नश्वर असले तरी इंद्रिये, मन, बुद्धीसह शरीराच्या सर्व कार्यशक्तीचे चालक असलेले जीवन-तत्त्व 'आत्मा' हा नित्य 'अमृत' आहे आणि तोच आपले स्वरूप आहे. भूगोलाच्या माध्यमातून समर्थांनी मांडलेल्या अध्यात्माच्या या अभ्यासातून, चिंतनातून, मननांतून पुढे निदिध्यासनातून त्या परब्रह्माला ओळखणे शक्य होते; हे समजले आणि एक मनस्वी आनंद झाला आणि समाधान मिळाले.

'जय जय रघुवीर समर्थ.'

टीप : प्रस्तुत विषयाचे सविस्तर विवेचन करणारे, सचित्र असे माझे–
'समर्थांचे सृष्टिविज्ञान' - या नावाचे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. जिज्ञासूंनी ते अवश्य वाचावे. ते माझेकडे उपलब्ध आहे.

# श्री समर्थ रामदासस्वामींचे शैक्षणिक विचार

**डॉ. सौ. सुनंदा लोहकरे**

*८९, 'साकेत' स्नेहलनगर, वर्धा : ४४२००१*

*मो. : ९४२२९०४४४२.*

*गुरूने दिला ज्ञानरूपी वसा ।*
*आम्ही चालवू हा पुढे वारसा ॥*

समर्थ रामदासस्वामींनी त्यांच्या दासबोध ग्रंथात शिक्षणाविषयी जे विचार प्रकट केले आहेत त्या विचारांचा परामर्श आपण ह्या लेखात घेणार आहोत. ते विचार चारशे वर्षांपूर्वीचे असले तरी आजच्या शिक्षणाला ते तंतोतंत लागू पडतात व याकरिता त्या विचारांचा पुनर्विचार होण्याची नितांत आवश्यकता आहे.

शिक्षणाने व्यक्ती सुधारली पाहिजे. व्यक्ती सुधारली की कुटुंब सुधारते, कुटुंब सुधारले की समाज सुधारतो व समाज सुधारला की राष्ट्र सुधारते. अशाप्रकारे व्यक्तीपासून राष्ट्रापर्यंतचा क्रमविकास साधायचा असेल तर शिक्षण हेच एक प्रभावी माध्यम आहे.

मानवी जीवनात शिक्षणाला असाधारण महत्त्व आहे. शिक्षणामुळे माणूस खऱ्या अर्थाने माणूस बनतो. शिक्षणामुळे बालकावर संस्कार होतात, मूल्ये रुजविली जातात व हळूहळू त्याचे रूपांतर एका विकसित व्यक्तीत होते. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे.

*''जन्मना जायते शूद्रा: संस्कारातद्विज उच्चते''*

**शिक्षण म्हणजे काय?**

शिक्षणातील शिक्ष् धातूचा अर्थ आहे शिकवणे व शिकणे. भारतीय तत्त्वज्ञानानुसार 'सा विद्या या विमुक्तये'' ही शिक्षणाची व्याख्या आहे. शिक्षणाकरिता पर्यायी शब्द विद्या किंवा ज्ञान वापरले गेले आहे. विद्या शब्द विद् धातूपासून तयार झाला आहे त्याचा अर्थ जाणणे. जे जाणल्यानंतर काही जाणण्याचे शिल्लक राहात नाही त्या ज्ञानाला आत्मज्ञान म्हटले आहे. समर्थ दासबोधात म्हणतात,

*ऐक ज्ञानाचे लक्षण । ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ।*
*पहावे आपणासी आपण । या नाव ज्ञान ॥*

शंकराचार्य म्हणतात, 'आत्मसाक्षात्कार म्हणजे ज्ञान' तर स्वामी विवेकानंद म्हणतात, 'माणसाची दैवी अभिव्यक्ती ज्यामुळे होते ते शिक्षण.' महात्मा गांधींच्या मते उत्तम गुणांचे प्रकटीकरण म्हणजे शिक्षण.

समर्थांचा दासबोधाचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा लक्षात येते, समर्थ व्यक्तिविकासाला खूप महत्त्व देतात. त्यांच्या मते प्रत्येक मुलाला स्वतंत्र व्यक्तित्व आहे. त्याच्या उपजत प्रवृत्तींचे उदात्तीकरण झाले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता शिक्षकाने प्रयत्न केला पाहिजे. त्याकरता

*आधी मनोगत हाती घ्यावे । मग हळुहळु उकलावे ।*
*मानत मानत न्यावे । उगमाकडे*

म्हणजे आधी त्याला आपलेसे करावे. त्याच्याशी जवळीक साधावी व मग त्याला त्याच्या स्वरूपाचे ज्ञान करून द्यावे. ज्ञान देत असताना समर्थांचा भर पाठांतरावर होता.

*बहुत करावे पाठांतर । कंठी धरावे ग्रंथांतर*

नुसती पोपटपंची समर्थांना मान्य नव्हती, तर अर्थ समजून पाठांतरावर त्यांचा भर होता. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत: ज्ञान ग्रहण करावे व ते इतरांना सांगावे. शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या विचारांबरोबर आचाराकडे लक्ष दिले पाहिजे.

विद्यार्थ्यांनी केवळ स्वत:च्या उन्नतीचा विचार करून भागणार नाही तर ज्या कुटुंबात, समाजात, राष्ट्रात तो राहातो त्या कुटुंबाच्या, समाजाच्या, राष्ट्राच्या ज्या जबाबदाऱ्या असतात त्या पार पाडण्याची क्षमता त्याच्या अंगी आली पाहिजे.

## शिक्षकाची भूमिका महत्त्वाची

विद्यार्थ्यांना तयार करणारा शिक्षक हा चांगला तयारीचा असायला हवा म्हणून समर्थ म्हणतात.

*अभ्यासे प्रकट व्हावे । नाहीतरी झाकोन असावे*
*प्रकट होऊन नासावे । हे बरे नव्हे*

शिक्षकाने नेमके बोलले पाहिजे व विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना, शंकांना योग्य उत्तर दिले पाहिजे. म्हणून समर्थ म्हणतात,

*नेमकचि बोलावे । तत्काळचि प्रतिवचन द्यावे ।*
*कदापि रागास न यावे । क्षमारूप ॥*

शिकविणे हा शिक्षकांचा 'स्वधर्म' आहे. ते त्याने प्रामाणिकपणे केले पाहिजे. त्याला विद्यार्थ्यांची आयुष्ये घडवायची असतात त्यामुळे त्याचे स्वत:चे आचरण अतिशय शुद्ध हवे.

*दिसामाजी काहीतरी ते लिहावे । प्रसंगी अखंडित वाचीत जावे*

शिक्षकांनी स्वत: भरपूर वाचन करावे व विद्यार्थ्यांना वाचायला प्रवृत्त करावे.

## मूल्यांची जोपासना :

कर्तव्यदक्षता, सत्यवादित्व, करुणाशीलता, दयाशीलता, निसर्गप्रेम ही नैतिक मूल्ये व ईश्वरनिष्ठा, सौंदर्याभिरुची, अलिप्तता, प्रेम, व्यवस्थितपणा, नीटनेटकेपणा ही आध्यात्मिक मूल्ये सामान्यत: शाळेच्या वातावरणातूनच घेतली जातात. म्हणून शालेय अभ्यासक्रमात संतांची चरित्रे, त्यांच्या साहित्यातील वेचक भागाचा समावेश करावा. निरनिराळी स्तोत्रे, श्लोक यांचे पाठांतर मुलांकडून करवून घ्यावे. त्यांच्या भावी जीवनाच्या दृष्टीने आवश्यक असलेली आध्यात्मिक बैठक शालेय जीवनातच निर्माण व्हावयास पाहिजे.

सर्वांशी प्रेमाने व बंधुभावाने वागले पाहिजे म्हणून समर्थ म्हणतात,

*जगामध्ये जगमित्र । जिव्हेपाशी आहे सूत्र ।*
*राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तदनंतरे ।*

विज्ञानामध्ये सत्याला फार महत्त्व असते. तसेच प्रचीतीला. समर्थ प्रचीतीवर भर देणारे होते म्हणून ते म्हणतात,

*सत्याएवढे सुकृत नाही । असत्याएवढे पाप नाही ।*
*प्रचीतीविण कोठेच नाही । समाधान ।*

माणसाने देहरक्षणाकरता पैसा मिळवला पाहिजे. त्याकरता उद्योग केला पाहिजे पण तो अतिशय प्रामाणिकपणे केला पाहिजे. म्हणून ते म्हणतात 'पाप द्रव्य जोडू नये' समर्थांचे हे एक सूत्र जरी आमच्या सगळ्यांनी लक्षात ठेवले तरी भ्रष्टाचारावर खूप मोठा आळा बसेल.

शिक्षणात नैतिक मूल्यांवर खूप भर असला पाहिजे.

स्वत:च्या व समाजाच्या सुखी व सुरक्षित जीवनासाठी नीतिनियम मनुष्यानी पाळले पाहिजेत.

समर्थांना सगळेच सुंदर आवडत होते. व्यक्तीचे अक्षर सुंदर असले पाहिजे. त्याचे वाचणे सुंदर असले पाहिजे. एवढेच नव्हे त्याचे बोलणे, चालणे सुद्धा सुंदर असायला पाहिजे.

डोळसपणे निसर्गाकडे पाहायला समर्थ शिकवतात त्याकरता पानावरच्या अळीचा दृष्टांत ते देतात. ते म्हणतात,

*पर्णाळी पाहोन उचले । जीवसृष्टी विवेके चाले ।*
*आणि पुरुष होऊन भ्रमले । यासि काय म्हणावे ॥*

पानावरची अळी विचारपूर्वक पुढचे पाऊल टाकते आणि तुम्ही माणूस असून पुढचा विचार न करता भ्रमात पडता याला काय म्हणावे?

विज्ञानाचा भर प्रचीतीवर असतो. समर्थ प्रचीतीवर भर देताना म्हणतात,

*जे प्रचितीस आले खरे । तेचि घ्यावे अत्यादरे ।*
*अनुभवेविण जे उत्तरे । ती फळकटे जाणावी ॥*

जी गोष्ट अनुभवाला येईल ती गोष्ट खरी मानावी व त्याचा अति आदरपूर्वक स्वीकार करावा. अनुभवावाचून बोलणे ते निरर्थक समजावे म्हणून शिक्षणात सैद्धांतिक बाजूबरोबर प्रात्यक्षिक बाजूवरही भर द्यावयास पाहिजे. श्री समर्थांनी ज्ञानाबरोबर उद्योगाची कास धरायला सांगितले आहे. केवळ ज्ञानावर विसंबून न राहाता त्याच्या जोडीला उद्योग हा माणसाने केलाच पाहिजे. ह्याशिवाय माणसाला सुख लाभणार नाही.

### यत्न तो देव जाणावा ।

समर्थ रामदासस्वामी यत्नालाच देव मानतात. कोणत्याही गोष्टीच्या आकलनासाठी यत्न लागतात. याच यत्नाचे उत्क्रांत रूप म्हणजे वैज्ञानिक प्रयत्न.

दुसरे म्हणजे यत्नानेच मनुष्य सभोवतीचे नैसर्गिक व सामाजिक जीवन बदलू शकतो. तंत्रविज्ञानाचा सारा पसारा हा बदल घडवून आणण्यासाठीच यत्न आहे. तेव्हा इतक्या मूलभूत गोष्टींना समर्थ देव म्हणत आहेत म्हणजे तिला निरपवाद महत्त्व देत आहेत. हे आधुनिक माणसाला यथार्थ वाटल्यावाचून राहाणार नाही.

कोणतेही काम करताना मन एकाग्र पाहिजे. तसेच सावधानता पाहिजे. जर सावधानता नसेल. अंत:करणात चलबिचल असेल तर प्रयत्न योग्य होत नाही. पुरेसे होत नाही व त्यामुळे काम यशस्वी झाल्याचा आनंद मिळत नाही.

दुसऱ्याच्या साहाय्याची आशा धरून स्वत: काहीही प्रयत्न न करणारा व आळशीपणात आनंद मानणारा तो एक मूर्ख होय असे ते म्हणतात. अशा मूर्खांना शहाणे व्हायचे असेल तर त्यांनी आळसामध्ये सुख मानू नये.

जे लोक उद्योग, साहस करतात, टक्केटोणपे खातात, ते हा हा म्हणता भाग्यास चढतात.

### व्यक्तिविकासातून समाजविकास

समर्थांचा व्यक्तिविकासावर भर होता. व्यक्ती सुधारली तर समाज सुधारेल म्हणून त्यांनी दासबोधात प्रथम मूर्ख लक्षणे सांगितली व नंतर उत्तम लक्षणे सांगितली. उत्तम गुणांनी युक्त माणसेच उत्तम समाज निर्माण करू शकतील. म्हणून समर्थ म्हणतात,

*अवगुण सोडिता जाती । उत्तम गुण अभ्यासिता येती ।*
*कुविद्या सांडुनि शिकती । शहाणे विद्या ॥*

आज ह्याचीच खूप गरज आहे. मानवी जीवनातून तमोगुण आणि रजोगुण यांचा लय व्हावा, याचा अर्थ सत्त्वगुण प्रबळ व्हावा ही समर्थांची अपेक्षा आहे. जगातल्या सर्व महापुरुषांची तशीच अपेक्षा आहे. इतर सत्पुरुष आणि समर्थ यांच्या शिकवणुकीच्या शैलीत थोडे अंतर दिसून येते. ते असे की, समर्थांच्या हितोपदेशात एक प्रकारची सडेतोड, रोखठोक उत्कटता दिसून येते.

श्री समर्थ मन, मनगट आणि मेंदूच्या विकासावर

भर देतात. मनाच्या विकासाकरता उपासना हवी म्हणून ते म्हणतात 'उपासनेला दृढ चालवावे.' मनगटाच्या विकासाकरता ते शारीरिक आरोग्याला महत्त्व देतात. त्यांना माहीत होते की, धकाधकीचे प्रसंग अशक्ताच्या हातून निभणार नाहीत त्याकरता सशक्त व्यक्तीच पाहिजेत. जो सशक्त आहे त्यालाच निरनिराळ्या युक्त्या शिकवाव्या.

*धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ।*
*नानाबुद्धी शक्ताला । म्हणौनी सिकवाव्या ॥*

मेंदूच्या विकासाकरता भरपूर वाचन हवे. म्हणून ते म्हणतात, दिसामाजी काहीतरी ते लिहावे । प्रसंगी अखंडित वाचीत जावे.

आरोग्य चांगले राखण्याकरिता नियमित व्यायाम हवा. समर्थ स्वत: रोज बाराशे सूर्यनमस्कार घालीत. बलोपासना ही उपासने इतकीच ते महत्त्वाची मानतात. सामर्थ्याविना समाजजीवनात अपेक्षित फरक पडणार नाही. यासाठी समर्थांनी ठिकठिकाणी तालमीचे आखाडे स्थापन केले. तरुणांत मल्लविद्येची, कुस्तीची आवड निर्माण केली. व्यायामाबरोबर बळनिर्मिती केली.

भौतिक ज्ञानाच्या वाढीमुळे शास्त्रीय प्रगती होईल, संपत्ती वाढेल, संहारक शस्त्रे निर्माण होतील, पण मानवाच्या कल्याणासाठी त्याचा उपयोग कसा करायचा हे समजून घेण्यास आध्यात्मिक ज्ञानाची जरुरी आहे.

शिक्षणाचा विचार करताना दासबोधातील समर्थांच्या शैक्षणिक विचाराचा विचार झाला तर एक विचारशील पिढी आपण शिक्षणातून निर्माण करू, हा समर्थविचार शिक्षणाचे सामर्थ्य नक्कीच वाढवेल.

# चोरेगावचे आत्मारामबुवा

**प्रमोद संत**

*नागपूर मो. ९८६०५५९९८९.*

श्री आत्मारामबुवा चोरेगावकर ह्यांनी शके १७८९ इ.स. १८६७ मध्ये एक समर्थ चरित्र लिहिले. कै. नानासाहेब देवांना कार्यबाहुल्यामुळे चोरेगावी शोध घेता आला नाही त्यामुळे हे आत्मारामबुवा चोरेगावकर कोण हा प्रश्न अनुत्तरितच होता. मध्यंतरी 'समर्थ स्थापित दैवते' ह्या पुस्तकाच्या लिखाणानिमित्त सातारा जिल्हा पिंजून काढला होता. त्यात असे लक्षात आले की, चोरे हे गाव दत्तात्रय स्वामींच्या शिरगावापासून अगदी जवळ आहे. पुण्याहून कोल्हापूर (पुणे-बंगलोर महामार्गाने) महामार्गाने निघाले की काशीळ नावाचे गाव लागते. काशीळ फाट्यावरून उजवीकडे वळले की आपण खंडोबाची पाल, (पालीच्या जत्रेस समर्थ गेले होते) तारळे (महाडिकांचे गाव) येथील घळीकडे तो रस्ता जातो. पाल, शमनामीर पीराचा डोंगर उजव्या हाताला राहातो व एक रस्ता डावीकडे जातो तो शिरगावला जातो. शिरगावहून थोडे पुढे गेले की मरळी व चोरे ही गावे व सडा वाघापूर (वाघापूर सडा जिथे धामधुमीच्या काळात रामरायांची मूर्ती अक्कांनी हलविली होती.

किंवा बंगलोर महामार्गावर इंदोलीपर्यंत जावयाचे तेथून उजवीकडे चोरे ७ कि.मी. वर आहे. चोरे येथे श्री. नारायणराव कुळकर्णी राहातात. निवृत्तीनंतर गावातील स्वत:च्या शेतीवाडीची कामे पाहातात. त्यांनी प्रत्यक्ष भेटीत जी माहिती दिली ती खालीलप्रमाणे :

कुळकर्णी घराणे हे मूळचे तेलंगणातील तेलंगी ब्राह्मण. बहुश्रुत हे आडनाव. तिरुपतीचा बालाजी हे त्यांचे कुलदैवत. तेलंगणातून निघून व्यंकटेश कुळकर्णी हे सातारा जिल्ह्यातील काशीळ या गावी येऊन स्थायिक झाले. काशीळला कुलकर्णीपणाचे वेतन त्यांना मिळाले. व्यंकटेशपंतांना चार मुले. त्यातील आत्मारामबुवा हे एक. चोरे येथील कुळकर्णी घराण्याची वंशावळ खालीलप्रमाणे -

व्यंकटेश कुळकर्णी यांना दोन बंधू होते. हे दोघेजण १) साळुंखे (पाटणकर) चोरे येथील, (२) शिंदे कण्हेर खेर कोरेगाव येथील (ग्वाल्हेरचे प्रसिद्ध शिंदे घराणे) आणि तिसरे खटाव तालुक्यातील साप या गावचे कदम ह्यांचे सोबत ग्वाल्हेरला गेले. ह्या दोन बंधुंमधील गोविंद ह्यांनी 'दिन गोविंद' ह्या नावाने दासबोध लिहिला आहे आणि हे कल्याणाचे शिष्य आहेत असे कै. नानासाहेब देव 'ऐतिहासिक टिपणे' मधील 'दासबोधाच्या अकरा प्रती' ह्यातील दहाव्या प्रती संबंधी माहिती नोंदविताना म्हणतात. दहावी प्रत कै. देवांनी 'चोरेगावची प्रत' म्हणून नोंदविली आहे व ती डोमगावी शके १६३६ इ.स. १७१४ मध्ये लिहिलेली आहे. त्यातील दोन ओव्या खालीलप्रमाणे आहेत.




**ऐतिहासिक टिपणे मधील उतारा**

*जय नाम संवच्छरे । डोंबग्रामी श्रमहरणीतीरें ।*
*लेखन केले दीनकिंकरे । येथामतीने ॥१॥*
*श्रीकल्याण स्वामी चरणप्रसादे । लेखन केले दीन गोविंदे ।*
*श्रोती श्रवण करिता स्वानंदे । भवसिंधू आटेल ॥२॥*

"ही प्रत डोमगावी लिहिली गेली असून, ती मूळची सातारा जिल्ह्यातील चोरेगावची होय. कोतवड्याच्या कुलकर्ण्यांचे चुलते (कोतवडे चाळीसगाव तालुक्यात येते.) सुमारे २५-३० वर्षांमागे (कै. देवांच्या काळी) १०४ वर्षांचे होऊन वारले. ते चोरेगावी असत. प्रतीच्या या इतिहासावरून तिचे लेखक श्री. कल्याणांचे शिष्य गोविंद हे चोरेगावचे असावेत, असे अनुमान होते. मी अजून चोरेगावी गेलो नाही. चोरेगावी जाऊन केव्हातरी तपास केला पाहिजे."

कै. देवांच्या ह्या नोंदीनुसार मी चोरेगावी गेलो व तेथे स्थायिक असलेले श्री. नारायणराव राजाराम कुळकर्णी ह्यांचेकडून माहिती घेतली. व्यंकटेश कुळकर्णी ह्यांचे चिरंजीव रघुनाथराव हे क्रांतिकारक विचारांचे व देशभक्तीने भारलेले होते. १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध जेव्हा भडकले तेव्हा मांग रामोशीचा जमाव एकत्र करून स्वातंत्र्यप्राती करून घेण्यासाठी सातारा येथील गोऱ्या कलेक्टरच्या कचेरीवर धाड घालण्याचा त्यांचा बेत होता. पण तो फसला व सातारा कलेक्टरने त्यांना फाशी दिली. स्वातंत्र्य-युद्धात रघुनाथरावांनी आपली आहुती दिली. पुढे सातारच्या छत्रपतींनी प्रतापसिंह राजे ह्यांनी रघुनाथरावांच्या ह्या हौतात्म्याबद्दल चोरे येथे ५० एकर जमीन दिली.

दिनकर व्यंकटेश कुळकर्णी व आत्मारामबुवा हे समर्थभक्त होते. आत्मारामबुवांनी चोरेगावी मठ व मारुती मंदिर स्थापून रामदासी पंथाचा स्वीकार करून मठात ते राहात असत. सध्या तिथे मठाचे काहीच अवशेष शिल्लक नाहीत. मारुती मंदिर देखील नव्याने बांधलेले आहे. जुन्या मारुती मंदिराची दगडी चौकट तेवढी नवीन मारुती मंदिराला लावलेली आहे. आत्मारामबुवा गावातच घर असताना रामदासी बनून जमिनीच्या तुकड्यावर मठ बांधून राहत होते. हाच तो चोरे मठ ज्याचा उल्लेख

त्यांच्या वाङ्मयात येतो. आता जमिनीचा तुकडा तेवढा पडिक अवस्थेत पडलेला आहे.

गावच्या पाटलांनी त्यांचा अवमान केला असता बुवा गाव सोडून गावाजवळील डोंगरात राहावयास गेले आणि गावचा पाटील गावात असेपर्यंत आम्ही गावात प्रवेश करणार नाही अशी प्रतिज्ञा केली. योगायोगाने ६ महिन्यांतच गावचा पाटील वारला व मग आत्मारामबुवांनी गावात प्रवेश केला.

आत्मारामबुवांच्या काव्याचे धुळे येथे बाड आहे. त्याचा बाड क्र. ६२५ आहे. ह्या काव्यात आत्माराम बुवांनी आपली गुरुपरंपरा अनेकदा नमूद केलेली आहे. ती कल्याण परंपरा आहे. परंपरा खालीलप्रमाणे :

श्रीसमर्थ - कल्याण - जगन्नाथबुवा तडवळेकर - यादव (कोयाळ, बीड जिल्हा) - दत्तात्रय - रामचंद्र कोयाळचे - आत्मारामबुवा चोरेगावकर - ह्याशिवाय आत्मारामबुवांनी जे समर्थ चरित्र लिहिले त्यातील ओव्या खालीलप्रमाणे -

*लेखकाची परंपरा । वर्णिली जी चतुरा ।*
*कल्याण स्वामींशी खरा । उपदेश श्री समर्थाचा ।।७८-३५।।*
*तेणे श्री जगज्जीवनासी । स्वये केली प्रसादराशी ।*
*तेणे यादवासी । मंत्र दिधला ।।७८-३६।।*
*यादवांनी कृपा करोनी । मंत्र दिधला दत्तात्रेया लागुनी ।*
*तेणे रामचंद्री कृपा करोनी । मंत्र दिधला ।।७८-३७।।*
*तयांसी म्हणती नाना महाराज । तेणे कृपा केली सहज ।*
*आत्मारामाशी निजगुज । सांगते जाहले ।।७८-३८।।*

कोयाळ येथील यादव (मठ संस्थापक) ह्यांचे चरित्र अंबडचे ॲड. मधुकरराव गोसावी ह्यांनी लिहिले आहे.

## आत्मारामबुवांची वाङ्मयरचना

आत्मारामबुवांनी विपुल ग्रंथरचना केलेली आहे. त्यांनी श्रीसमर्थ चरित्र शके १७८९ मध्ये लिहिलेले आहे. वाई येथे हा ग्रंथ आपण पूर्ण केला आहे असे त्या ग्रंथात आत्मारामबुवा म्हणतात.

*समर्थी मज सांगितले । ते चि या ग्रंथी लिहिले ।*
*वाई क्षेत्री समाप्त केले । चरित्रास ।।७८-५०।।*
*शके सतराशे एकूण नव्वद । ग्रंथी संपविला संवाद ।*
*समर्थाचा अनुवाद । श्रोते यांशी ।।७८-५४।।*
*फाल्गुन मास शुद्ध पक्ष । विभव संवत्सरास ।*
*उत्तम कृष्णातीरास । उत्तरतीरि ।।७८-५५।।*
*शिवरात्रीचा दिवस । ग्रंथ आला समाप्तीस ।*
*पूर्ण जाहला कळस । निरूपणाचा ।।७८-५७।।*

ह्या समर्थचरित्र ग्रंथाचे एकूण ७८ अध्याय ओवी संख्या नमनाच्या इत्यादी धरून ६११४ इतकी भरते. हनुमंत स्वामींची बखर आधारभूत मानून आत्मारामबुवांनी हे चरित्र रचलेले आहे.

*येथे श्रोती म्हणितले । हे तुज कैसे कळले ।*
*किंवा कोणी सांगितले । ते आता कथी ।।५-५१।।*
*तरी ऐका सावधान । हनुमंतस्वामी दयाघन ।*
*तेणे कृपा केली पूर्ण । तेव्हा मज कळले ।।५-५२।।*

अशी ओवी ५ व्या अध्यायात आहे. आपल्या ह्या समर्थ चरित्राला त्यांनी भविष्योत्तर पुराण असे म्हटलेले आहे. प्रत्येक अध्यायाच्या शेवटी "इति भविष्योत्तर पुराणे । श्रीसमर्थांची स्तवने । परिसोत चतुरजने असा ते उल्लेख करतात.

७८ अध्यायी हा ग्रंथ असल्यामुळे त्यात दंतकथा, आख्यायिका, चमत्कार यांचा भरपूर वापर आत्मारामबुवांनी केलेला असला तरी समर्थांच्या चरित्रांतील घटना व प्रसंग ह्याचे वास्तव चित्रण देखील ह्या ग्रंथातून त्यांनी केलेले आहे. समर्थांचा जन्म, बालपणीचे संस्कार, विवाहातून पलायन, गोदावरी काठी टाकळीस केलेले पुरश्चरण, सिद्ध साधूंच्या भेटी, अध्ययन, तीर्थयात्रा अनेक ठिकाणी मारुतीची स्थापना, मसूरचा रामनवमी उत्सव, चाफळला राममंदिर व रामाची स्थापना करणे. अनेक शिष्य मेळवून त्यांना कार्याला लावणे, डोंगरावर घळीत राहाणे, संप्रदायाचा व्याप महाराष्ट्र व इतरही प्रांतांत पसरविणे, सज्जनगड येथील वास्तव्य, शिवाजी राजांशी स्नेहबंध व अखेर सज्जनगडावरील समाधी ह्या

समर्थांच्या जीवनातील वास्तव घटनाच आहेत.

ह्या समर्थ चरित्राव्यतिरिक्त रामदासी संशोधन खंड २ मध्ये धुळे येथील बाड क्रमांक ६२५ चे विवरण आहे. हे बाड कै. नानासाहेब देवांना मिरज मठांतून प्राप्त झाले. ह्या बाडांत आत्मारामबुवांची इतर काव्यरचना नोंदविलेली आहे ती येणेप्रमाणे -

१) माहुरच्या रेणुकेची आरती, २) आत्मबोध प्रकरण, ३) वेगवेगळ्या संत नामावल्या, ४) गर्भगीतेवरील टीका, ५) भागवतातील काही श्लोकांवर अभंग, ६) निर्गुणरूप ह्या नावाने ५४ ओव्यांचे समर्थ चरित्र, ७) गीताभाव म्हणून भगवद्गीतेवरील अध्यायवार एकूण ७६७ ओव्या, ८) समर्थांचे स्वरूप नावाचे ८१ ओव्यांचे काव्य, ९) चौपाई प्रकारामध्ये अध्यात्मरामायण सार, १०) योगवशिष्ठांतील काही श्लोकांवर टीका, ११) गीतातत्त्व ओवी संख्या १५०, १२) आदिपुरुष ओवी संख्या ९०, १३) बाराखडी ओवी संख्या ३१३, १४) नमन ओवी संख्या ९००, १५) रामकथा, १६) विराट पुरुष, १७) ब्रह्म निरूपण, १८) ह्याशिवाय ह्या बाडांत आत्मारामबुवांचे ४०० ते ५०० अभंग असतील. आत्मारामाचे अभंग भक्तिरसपूर्ण आहेत. एका अभंगात ते म्हणतात -

*बहु बोलीलो वाचाळ । तुम्ही हरा तळमळ ।*
*माझे जीणे करा खरे । मी तो बोलिले लेकरे ।*
*भीष्मप्रतिज्ञा खरी केली । आता ब्रिदे सोडियेली ।*
*तुम्ही दिनाचे दयाळ । दीनालागी कनवाळू ।*
*येऊनिया मजलागी । उचलोनी घेई वो वोसंगी ।*
*भेटी अंती सविस्तर । सकळ कळे तो मजकूर*
*रामदासा भेटी न होता । आत्माराम दुःखभरिता ।*

आत्मारामबुवांनी 'गीताभाव' या ग्रंथसमाप्तीच्या ओव्या दिल्या आहेत त्या येणेप्रमाणे -

*इति श्री भगवद्गीता । संपविली ओव्या गाता ।*
*भीष्मपर्वणी म्हणता । जेथे तेथे ।*
*बहुता पंडितांनी । व्याख्या केली इयालागुनी ।*
*तो चि मार्ग धरूनी । गाईल्या ओव्या ।*
*शके सतराशे अठ्ठाण्णव । ते संवस्तरी गीताभाव ।*
*बोलियली लाघव । आत्माराम मुखे ।*
*चौरेमठी जाण । समाप्त करविले लेखन ।*
*श्रीमारूतीचे चरण । स्मरोनिया ।*
*श्रावण शुद्ध त्रयोदसी । पूर्ण केले गीतेसी ।*
*अध्याये जाण अष्टादशी । भावार्थबळे ॥*

श्री नारायणराव कुळकर्णी ह्यांच्या माहितीनुसार चोरे येथील कुलकर्णी घराण्यात अजून तीन ग्रंथ आत्मारामबुवा लिखित (बहुतेक स्वरचित नसावे) होते. १) राम विजय, २) हरी विजय, ३) पांडव प्रताप. त्यातील पांडवप्रताप घरात असला की महाभारत घडते म्हणून १५-२० वर्षांपूर्वी पाण्यात बुडविला. इतर दोन ग्रंथांचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला पण शोध लागू शकला नाही. आत्मारामबुवा चोरेगावकर ह्यांचे संबंधी अजून माहिती काढणे आवश्यक आहे. धुळे येथील संग्रहातून ६२५ बाड क्रमांकातून अजून माहिती मिळू शकेल. तसेच 'दिनगोविंद' आत्मारामबुवांचे नाते काय? ह्या प्रश्नाची देखील उकल करावी लागेल. गोविंद हे नाव वंशावळीत नाही पण ते व्यंकटेशाचे बंधू म्हणजे आत्मारामबुवांचे काका ठरतात. पण त्यांनी दासबोध इ.स. १७१४ मध्ये पूर्ण केला, तर आत्मारामबुवांचे ग्रंथ इ.स. १८६७, १८७६ मधील आहेत. त्यामुळे काका-पुतण्यात १५० वर्षांचे अंतर पडते. त्यामुळे व्यंकटेशापासून काही पिढ्या वर किंवा काही पिढ्या खाली असाव्यात तरच ही वयाची दरी भरून निघेल. चौरे येथील कुळकर्णी एव्हढीच वंशावळीची माहिती देऊ शकले.

येणेप्रमाणे धुळे येथील आत्माराबुवांचा ग्रंथसंभार व श्री नारायण कुळकर्णी ह्यांनी ज्ञात केलेले आत्माराबुवांचे चरित्र समर्थ भक्तांपुढे सादर केले आहे. ह्यात काही भर पडू शकली तर हवीच आहे.

"जय जय रघुवीर समर्थ"

# प्रपंच - परमार्थातील गतिमान संतुलन

*दिलीप कुलकर्णी*

*कुडावळे ४१५७१२ ता. दापोली, जि. रत्नागिरी.*

ईशस्मरण, संतस्मरण ह्या खरंतर रोजच करण्याच्या गोष्टी आहेत. पण ऐहिकातच बद्ध असलेल्या तुम्हां-आम्हां सामान्यजनांच्या रोजच्या आयुष्यात त्या गोष्टीलाच नेमका वेळ उरत नसतो. दिवसभर आपण खातो, पितो, वेगवेगळी कामं करतो, हिंडतो, पाहातो, ऐकतो, झोपतो खूप काही करतो; पण, ज्या आयुष्यात आपण हे सगळं करतो त्याचं 'अंतिम लक्ष्य' काय, 'कशासाठी' जगायचं ह्याचं स्मरण स्वत:ला करून देण्यासाठी मात्र दिवसाकाठी काही मिनिटंही आपल्यापाशी नसतात.

अन् त्याचवेळी दुसरीकडे असेही बरेच जण असतात, जे सतत तथाकथित 'भक्ती'त गढलेले असतात. ऐहिक कर्तव्यांकडे दुर्लक्ष करून त्यांची ही भक्ती चालू असते.

समाजातल्या व्यक्तींचा एक समूह म्हणून विचार केला, तर विशिष्ट काळात ह्यांपैकी एक विचार प्रबळ झालेला दिसतो. कधी इहवाद्यांचा जोर असतो, तर कधी परलोकवाद्यांचा. ह्यापैकी कोणतीही एक बाब 'चांगली' किंवा 'वाईट' अशी नाही. घातक असतो तो ह्यापैकी कोणत्यातरी एकाचा अतिरेक. नि म्हणून आवश्यक असतं ते दोन्हीतलं संतुलन. जो समाजाची चिंता वाहणारा आहे, त्यानं समाजाचा झुकाव कोणत्या बाजूला आहे हे बघून संतुलन पुन्हा स्थापित करण्यासाठी उपदेश, प्रयत्न, कार्य करायचं असतं.

समर्थ रामदासांनी चार शतकांपूर्वी नेमकं ह्या तऱ्हेचं कार्य केलं. 'रामदास हे प्रवृत्तिपर संत होते; त्यांनी लोकांच्यातला - तरुणांच्यातला - पुरुषार्थ जागा केला नि राष्ट्रनिर्माण घडवून आणलं' असं त्यांच्या कार्याचं वर्णन केलं जातं. ते चुकीचं नसलं, तरी पूर्णांशानं योग्य आहे असं मला वाटत नाही. तमोगुणी समाजाला आधी रजोगुणी बनवलं पाहिजे हे त्यांनी ओळखलं नि त्या दृष्टीनं 'वन्ही चेतवण्या'चं कार्य केलं. पण अति-रजोगुणी समाज हा ऐहिकातच अडकून पडतो - ते योग्य नाही ह्याची जाणीव असल्यानं ऐहिक प्रगती हे जीवनाचं अंतिम लक्ष्य नाही हेही त्यांनी समाजाला सांगितलं. त्यांनी लोकांना 'प्रपंच नेटका करावा' ही शिकवण अवश्य दिली. 'प्रपंची अप्रमाण' राहू नये हेही सांगितलं; पण म्हणून तेच जीवनाचं ईप्सित असं ते कधीही म्हटले नाहीत. 'आधी प्रपंच करावा नेटका' ह्याच्या पुढच्याच चरणात ते 'मग घ्यावे परमार्थ विवेका' असं सांगतात. (दासबोध १२.१.१) 'प्रपंच सांडून परमार्थ केला' हे उचित नाही, हे त्यांचं सांगणं निश्चितच आहे; पण ह्याचा अर्थ परमार्थ सांडून प्रपंचातच गुंतून राहावं, ऐहिकाचीच उपासना करावी असं त्यांचं म्हणणं होतं

असा होत नाही. त्यांचा सांगावा होता प्रपंच परमार्थात 'गतिमान संतुलन' राखण्याचा.

चारशे वर्षांपूर्वीच्या सामजस्थितीचा विचार केला, तर 'आधी प्रपंच करावा नेटका' ह्या समर्थोक्तीची यथार्थता विशेषत्वानं प्रतीत होते. ह्यातला 'आधी' शब्द मला फार महत्त्वाचा वाटतो. समाजाची प्रापंचिक, ऐहिक सुस्थिती ही कोणत्याही परिस्थितीत प्राथमिक महत्त्वाची असते. जाचक रूढी, परंपरा, व्यवस्था, परचक्र ह्यांनी हतोत्साह झालेला समाज ते पाहात होते. अन् ही स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी वाळूत डोकं खुपसून शत्रूला नाकारणाऱ्या शहामृगासारखा - समाज परमार्थात बुडू पाहात होता. असला पळपुटेपणा कामाचा नाही, ती आत्मवंचना आहे असं रामदासांना स्पष्टपणे जाणवलं. अशा परमार्थामुळे त्याचं जे लक्ष्य आहे तेही साध्य होणार नाही नि प्रपंचापासून पळ काढल्यामुळे ऐहिक सुखसमाधानही प्राप्त होणार नाही, अशी सर्वांगीण मानव-विनाशाची स्थिती त्यांनी अनुमानली. 'प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला । मग तया करंट्याला । परमार्थ कैसा ।।' (१२.१.३) असा दोन्हीकडचा पराभव त्यांना दिसत होता. म्हणूनच त्यांनी 'आधी' प्रपंच नेटका करण्याची शिकवण दिली. मला वाटतं हीच त्यांची कार्याची समयोचितता आहे.

***

आता चार शतकांनंतर लंबक दुसऱ्या टोकाला गेला आहे. आपण ऐहिकात इतके गुंतून गेलो आहोत की, मानव-जीवनाचं अंतिम लक्ष्य ते नाही, ह्याचाच आपल्याला विसर पडला आहे. ह्याच चारशे वर्षांत विज्ञानांची वाढ झाली आहे आणि त्यांचा पाया 'जडवाद' हा असल्यानं आपणही जडवादी बनलो आहोत. आजच्या विज्ञानांना हवे तसे पुरावे देता येऊ शकत नसल्यानं, पारलौकिकता, आध्यात्मिकता वगैरे गोष्टी 'अवैज्ञानिक' ठरवल्या जात आहेत. जडवादात नैतिकता, उच्च मानवी मूल्यं ह्यांना स्थान नसल्यानं समाजाच्या वागण्यातूनही त्यांची हकालपट्टी होते आहे. 'उपभोग' हेच जीवनाचं साध्य बनलं आहे नि 'जितका अधिक उपभोग तितका अधिक विकास' अशी संकल्पना उराशी कवटाळून सारा मानव-समाज पुढे जात आहे. लोक खूप मोठ्या प्रमाणावर रजोगुणी बनले आहेत खरे; पण त्याचाही अतिरेक होतो आहे, नि तोच सर्वनाशाचं कारण ठरेल की काय अशी भीती वाटू लागली आहे.

त्यामुळे, मला वाटतं, आता रामदासांच्या 'मग'कडे लक्ष देण्याची वेळ येऊन ठेपली आहे. आपण तमोगुण सोडून रजोगुणी बनलो; आता त्यालाही आवर घालून सत्त्वगुणी बनण्याची गरज तीव्रतेनं भासते आहे. 'प्रपंच खूप झाला; उपभोग खूप झाले - आता पुरे' असं म्हणण्याची वेळ आली आहे. अतिरेकी उपभोग आणि त्यासाठी अतिरेकी उत्पादन ह्यामुळे एकीकडे माणूस नि दुसरीकडे निसर्ग मोडून पडत आहे. 'दीर्घसूचनेने वर्तण्या'चा सल्ला समर्थांनी आपल्याला दिलेला आहे. सध्याचं जे चित्र आहे त्याचं दीर्घसूचन आपल्याला हेच सांगतं की, ऐहिकाचा हा अतिरेक आपला सर्वनाश घडवून आणणार आहे. नि म्हणूनच सर्वांनी 'मग घ्यावे परमार्थ विवेका' ह्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आता निर्माण झालेली आहे. 'आधी' प्रपंच नेटका करावाच, पण त्याचाही अतिरेक होऊ देऊ नये; समृद्धीची एक पातळी गाठल्यावर प्रवृत्तीकडून निवृत्तीकडे गेलंच पाहिजे हा 'विवेक'ही रामदास तेवढ्याच रोखठोकपणाने सांगतात हे आपण विसरता कामा नये. 'उपभोग घ्यावेत-उत्पादन करावं' हे ते अवश्य सांगतात, पण नंतर 'उपभोगवादी' बनण्यातला धोकाही दाखवतात. त्यातच अडकून पडलेल्यांना ते 'बद्ध' म्हणतात. अशांना 'गळ गिळता सुख वाटे। ओढून घेता घसा फाटे ।' (३.१०.६६) असा त्यातला धोका दाखवून ते सावध करतात. 'उपभोग' हे मानवी जीवनाचं अंतिम लक्ष्य नाही, तर 'ज्ञान' हे आहे असं स्पष्टपणे

सांगतात. अन् 'ज्ञान' म्हणजे व्यवहारात जगण्यासाठी जे शिकावं लागतं ते नव्हे. ती 'माहिती' असते. 'देव वोळखावा येक । तेचि ज्ञान ते सार्थक । येर अवघेचि निरर्थक । पोटविद्या।।' (६.१.२१) अशी ह्या 'माहिती'ची संभावना त्यांनी केली आहे. जीवनाचं उद्दिष्ट अशा 'पोटविद्या' शिकणं हे नाही, तर 'देव वोळखणं' हे आहे, हे त्यांचं स्पष्ट सांगणं आहे. तो 'देव' सर्वांभूती आहे, माझ्यातही त्याचाच अंश आहे हे जाणायचं आहे. ते जाणणं म्हणजे 'ज्ञान'. 'ऐक ज्ञानाचे लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान' (५.६.१) असं ते सांगतात, 'आधी' प्रपंच करून 'मग' प्रत्येकानं ह्या ज्ञानासाठी प्रयत्न केलेच पाहिजेत. ते ज्याला करावेसे वाटतात तो मुमुक्षू. तसे प्रयत्न करणारा तो साधक नि ज्याला आत्मज्ञान झालं तो सिद्ध. 'बद्धा'चा 'सिद्ध' होणं ह्यालाच आधुनिक परिभाषेत मानवाचा 'विकास' म्हणता येईल. रामदासांचा उद्देश तो आहे.

***

'प्रपंच-परमार्थातल्या संतुलना'चा समकालीन गतिमान अर्थ हा असा आहे. 'तमोगुणातून रजोगुणाकडे' ही ४०० वर्षांपूर्वीची गरज होती. आता 'रजोगुणातून सत्त्वगुणाकडे' ही गरज बनली आहे. 'पळपुट्या परमार्थाकडून रसरशीत प्रपंचाकडे' ही तत्कालीन गरज होती. आता 'अति-प्रापंचिकतेकडून सशक्त परमार्थाकडे' ही गरज आहे. रामदासांच्या संदेशातून ह्या दोन्हींचं मार्गदर्शन मिळतं, हे त्याचं कालातीत मोठेपण!

***

माणूस 'बद्धा' चा 'सिद्ध' व्हावा ही रामदासांची केवळ गुहेत, मठात बसून व्यक्त केलेली सदिच्छा नव्हती. तो कार्यकर्ता-संत होता. आपल्या इच्छेच्या पूर्ततेसाठी त्यांनी संघटना उभी केली. ह्या संघटनेची उभारणी आणि कार्यशैली ह्यांतून त्यांनी प्रपंच-परमार्थातल्या संतुलनाचा एक आदर्शच उभा केल्याचं आपल्याला दिसतं.

ह्या संघटनेचं अंतिम लक्ष्य होतं 'राम'. त्यांच्या डोळ्यांपुढचा 'राम' हा व्यक्तिविशिष्ट तर होताच; पण, त्याहूनही अधिक गुणविशिष्ट होता. एकाच वेळी तो सगुणही होता आणि निर्गुणही. आपण ज्याला 'मोक्ष' म्हणतो, ती स्थिती म्हणजे राम. मानव-जीवनाचं अंतिम ध्येय तेच. जनसामान्यांना असं निर्गुण-निराकार ध्येय आकळणं कठीण; म्हणून त्यांनी 'येकपत्नी' 'येकवचनी' 'येकवाणी' 'धार्मिकू' असा सगुण-साकार 'राम' सर्वांपुढे ठेवला. स्वत:कडे भूमिका घेतली हनुमंताची : 'राम-दास' होऊन. त्या हनुमंतांचं शरीरबल आणि आत्मबल हा आदर्श त्यांनी तरुणांपुढे ठेवला. ह्यातलं शरीरबल हवं होतं प्रपंचासाठी. तर आत्मबल हवं होतं परमार्थासाठी. स्वत:च्या जगण्यातून हा विचार जनसामान्यांपर्यंत नेण्यासाठी त्यांनी शिष्य मिळवले अन् घडवले. त्यात पुरुष होते आणि स्त्रियाही. प्रपंच आणि परमार्थ - दोन्ही ठिकाणी स्त्रियांना मिळणारं दुय्यम स्थान ते बघत होते. ह्यात बदल घडावा म्हणून एकीकडे 'लेकुरे उदंड जाहल्या' मुळे प्रपंचात स्त्रियांची कशी वाईट स्थिती होते हे त्यांनी लोकांना समजावून सांगितलं; नि योग्य तो पारमार्थिक अधिकार असणाऱ्या स्त्रियांना त्यांनी मठपतीही नेमलं.

अशा प्रकारच्या संघटनात्मक व्यवस्थेतून त्यांनी सर्व समाजासाठी कार्य केलं. जे 'बद्ध' असणारे प्रापंचिक जन होते, त्यांना आधी प्रपंच नेटका करायला त्यांनी सांगितलं. ज्यांचा प्रपंच नेटका होता, त्यांच्या अंतरात मुमुक्षा जागी केली. जे मुमुक्षू होते, त्यांना साधनेला लावलं. जे चांगले साधक होते, त्यांना सिद्ध बनवलं. अन् जे सिद्ध होते त्यांनाही बद्धांच्या मुक्तीसाठी कार्य करणारे 'महंत' बनवलं. ह्यातून साकार झाली मानवाच्या विकासासाठी नित्य कार्यरत असणारी एक प्रणाली. ती चालू राहाण्यासाठीचा ऐहिक पसाराही त्यांनी निर्माण केला. मारुतीची मंदिरं, आखाडे, मठ इत्यादी. साधक

आणि महंतांच्या नित्य चरितार्थासाठी परिपाठ घालून दिला 'भिक्षे'चा. किती ह्या भिक्षेचे उपयोग! साधक असो की सिद्ध : त्यांनाही पोट असतंच. भिक्षेनं त्याची सोय होते. 'भिक्षामिसे' फिरताना समाज-निरीक्षण होतं. कुठे-काय-कोण चांगलं-वाईट आहे हे कळतं. भिक्षा मागितल्यानं अहंकाराचा फणा उभा राहात नाही - नम्रता येते. परिग्रह टळल्यानं मोकळेपणे फिरता येतं. 'अखंड भिक्षेचा अभ्यास । तयास वाटेना परदेस ।' (१४.२.९), 'भिक्षेने वोळखी होती' (१४.२.१३), 'भिक्षा म्हणिजे निर्भय स्थिती । भिक्षेने प्रकटे महंती । स्वतंत्रता ईश्वरप्राप्ती । भिक्षागुणे ।।' (१४.२.१४) असे तिचे असंख्य उपयोग. एका बाजूला साधक आणि सिद्धांचा जनतेशी नित्य संपर्क राहिला पाहिजे हा भिक्षेचा एक हेतू नि दुसऱ्या बाजूनं, त्यांना बघून लोकांनाही आपल्या जीवनाच्या ध्येयाचं नित्य दर्शन-स्मरण झालं पाहिजे हा दुसरा हेतू.

***

रामदासांनी सर्वांपुढे जो हनुमंताचा आदर्श ठेवला त्यातूनही ऐहिक आणि पारलौकिक जीवनातलं संतुलनच त्यांच्या डोळ्यांपुढे होतं असं जाणवतं. व्यक्तीला जीवनात ह्या दोन्ही स्तरांवरची उद्दिष्टं प्राप्त करून घ्यायची असतात. त्यासाठी आवश्यक असतं शरीरबल, मनोबल, बुद्धिबल आणि आत्मबल. ह्या चारही बलांचं मूर्तरूप म्हणजे मारुती तो 'महाबली' आहे आणि 'बुद्धिमतां वरिष्ठम्' देखील. अन् महत्त्वाचं म्हणजे आपली ही शक्ती आणि बुद्धी तो टगेगिरी-गुंडगिरीसाठी वापरत नाही. अत्याचार-बलात्कार-शोषणासाठी वापरत नाही, तर 'रामाच्या कामासाठी' वापरतो. तो शक्तिमान आहे. पण 'जितेंद्रिय' ही. जेव्हा प्रत्येक तरुण असा बनतो, तेव्हा त्यात त्याचाही विकास असतो, नि समाजाचाही. व्यावहारिक पातळीवर अन्याय-अत्याचार-शोषण-परचक्र ह्याविरुद्ध खंबीरपणे उभे राहाणारे नि आध्यात्मिक पातळीवर 'रामा'च्या प्राप्तीची आस असणारे तरुणच हवेत. ह्या दोन्ही गोष्टी एकाचवेळी चालायला हव्यात. त्यासाठीचा तरुणांपुढचा आदर्श म्हणजे हनुमान.

***

'प्रपंचा'ची मोठी गंमत असते : तो 'नेटका' जमला नाही तरी पंचाईत, नि जमला तरी पंचाईत. तो जमला नाही, तर ना धड ऐहिक सुखं उपभोगता येतात, ना पारमार्थिक. अन् तो जमला, तर माणूस ऐहिकातच इतका गुंतून जातो की, परमार्थाचा त्याला विसरच पडतो. म्हणजे कसंही झालं, तरी जीवनाच्या अंतिम लक्ष्यापासून माणूस दूरच राहातो. असं व्हायला कारण असतं माणसाचं मन. अतिचंचलता, नित्य-असमाधान हे त्याचे स्थायीभाव. त्याला एखाद्या गोष्टीचा - ती चांगली असली तरी - लगेच कंटाळा येतो, नि दुसरं काहीतरी हवंसं वाटतं. ती गोष्ट मिळाली की, थोड्याशा उपभोगानंतर तिचाही कंटाळा - मग तिसरी गोष्ट. ह्या कामात त्याला जोड मिळते पंचेंद्रियांची. ती सारी बहिर्मुख आहेत, नि सतत 'विषयां'च्या शोधात असतात. अशा इंद्रियांची आणि मनाची जोडी जमली की, मग काही विचारायलाच नको! परस्परांना पूरक होत ते व्यक्तीला पुरते 'भोगी' बनवून टाकतात. 'इंद्रिये वर्तता स्वैर त्यामागे मन जाय जे । त्याने प्रज्ञा जशी नौका वाऱ्याने खेचली जळी ।।' (गीता २.६७) अशी त्या व्यक्तीची स्थिती होते. अशी व्यक्ती उपभोगातच लिप्त राहाते. जीवनाचं अंतिम लक्ष्य 'मोक्ष' हे आहे. ते गाठण्यासाठी आपल्याला काहीतरी 'साधना' करायची आहे. हेच ती विसरते. सारांश, प्रपंच जमत नसेल, तर तो चालवण्यातच शक्ती खर्ची झाल्यानं पारमार्थिक ध्येयाची प्राप्ती होत नाही. अन् तो जमला, तर त्यात गुंतून राहिल्यानंही ते ध्येय अप्राप्य राहातं. ह्या पेचात माणूस पडण्याचं एकमेव कारण म्हणजे त्याचं मन. रामदासांनी हे नेमकेपणानं जाणून त्याला सुंदर उपदेश केला : मनाचे श्लोक.

ह्या श्लोकांच्या निर्मितीची कथा मोठी मौजेची आहे.

सज्जनगडावरच्या राम-जन्माच्या वार्षिक उत्सवासाठी शिवाजीकडून आर्थिक साहाय्य मिळे. पण एका वर्षी हे 'शासकीय अनुदान' वेळेवर हाती आलं नाही. उत्सव कसा पार पाडायचा ह्याची चिंता सर्वांना पडली. महाराजांकडे कोणाला पाठवून रक्कम मागवून घ्यावी की काय असा एक विचार पुढे आला पण समर्थांनी तो तत्काळ झिडकारला आणि एक वेगळाच मार्ग चोखाळला. एका रात्रीत त्यांनी मनाचे श्लोक रचले नि सकाळी सर्व शिष्यांना झोळ्या घेऊन गावोगाव रवाना केलं. एकेक श्लोक खणखणीत आवाजात म्हणायचा आणि मग 'जय जय रघुवीर समर्थ' अशी गर्जना करून भिक्षा मागायची. अगदी थोड्याच काळात उत्सवासाठीचा शिधा अशा प्रकारे जमा होऊन उत्सव नेहमीप्रमाणे पार पडला. म्हणजेच परमार्थ-विचारानं ठासून भरलेल्या ह्या श्लोकाची निर्मिती झाली प्रपंचासाठी! एक योगायोगच.

किती प्रकारांनी रामदासांनी मनाला समजावलंय ह्या श्लोकांतून! त्याला ते गोंजारतात, समजावतात, दरडावतात, भीती दाखवतात, दाखले देतात. ह्यापैकी एकतरी उपाय लागू पडेल नि ते शांत-स्वस्थ होईल अशी त्यांना आशा आहे. मन जितकं अशांत, तितकं ते इंद्रियांच्या अधीन जातं - बहिर्मुख होतं. रामदास ह्याला 'देहबुद्धी' म्हणतात आणि मन शांत झालं-केलं -की, ही देहबुद्धी कमी होत जाऊन 'आत्मबुद्धी' स्थिरावत जाते. ह्या प्रक्रियेचं नाव 'साधना'. चंचल राहून, सतत उपभोगांमागे धावून, नित्य विषय-सेवन करून मन कधीही शांत होत नाही. किंबहुना आगीत इंधन घातल्यावर तो शांत न होता ज्याप्रमाणे अधिकच भडकतो, तशीच उपभोगांमुळे हाव-वखवखच वाढते. मन जास्त-जास्तच विषयलेलुप होतं. षड्रिपूंचा प्रभाव वाढता राहातो. व्यक्तीचं स्खलन होतं. ते टळून व्यक्तीची मोक्षाकडची वाटचाल सुरू व्हावी, गतिमान व्हावी म्हणून मनाला नियंत्रणात ठेवायचं. 'देहेबुद्धि हे ज्ञानबोधे त्यजावी' (१७०), किंवा 'देहेबुद्धि ते आत्मबुद्धी करावी' (१६३) ही त्यासाठीच्या 'साधने'ची दिशा. आपणच आपल्या मनाला सतत समजावत राहून त्याला ह्या दिशेकडे वळवायचं. 'नको रे मना क्रोध हा खेदकारी । ... काम नाना विकारी।.. लोभ हा अंगिकारू । ... मत्सरू दंभ भारू' (६) असं सांगून त्याला षड्रिपूंच्या कह्यात जाण्यापासून वाचवायचं. 'मना कल्पना ते नको विषयांची' (५) असं सांगून त्याला विषयांपासून दूर न्यायचं. 'सदासर्वदा प्रीति रामी' धरायची (१०). 'रघुनायका दृढ चित्ती धरा'यचं (२२). 'राघवी वस्ती' करायची (३८-४२). 'नसे राम ते धाम सोडूनि' द्यायचं (४४). साधना करायची म्हणजे एकांत हवा, म्हणून 'सुखालागि आरण्य सेवीत' जायचं (४४). ती करताना देहाला कष्ट पडतात -ते नकोसे वाटतात, म्हणून 'देहेदुःख हे सुख मानीत जावे' (१०) अशी सवय त्याला लावायची. मृत्यूचं स्मरण त्याला सतत करून देऊन विषयोपभोगांतली अशाश्वता जाणवून देत राहायची. सत्य काय नि असत्य काय, शाश्वत काय नि अशाश्वत काय ह्यातला 'विवेक' सदैव जागृत ठेवायचा. त्याच विवेकानं 'क्रिया आपुली पालटा'यची (१०५) : 'देहेबुद्धि सोडून' द्यायची (१२), 'सदा सस्वरूपी' राहायचं (१०). ती अवस्था म्हणजेच 'राम' : तोच मोक्ष, तीच समाधी, तेच कैवल्य, तेच निर्वाण.

***

रामदास सातत्यानं मानव-जीवनाच्या ह्या अंतिम लक्षाची आठवण आपल्याला करून देत राहातात. अन् त्याचबरोबर प्रपंचही 'नेटका' करायला सांगतात. ही विसंगती नाही : एक विलक्षण सुसंगती आहे ह्यात. प्रपंच नेटका नसेल, तर इंद्रिय-मन अतृप्त राहून ते शांत होण्याची शक्यता कमी होते. म्हणून 'आधी' ते करायचं. पण, सतत भोगातच लिप्त राहिलं तरीही मन शांत होत नाही म्हणून उपभोगाच्या एका विशिष्ट पातळीनंतर स्वेच्छेनं निवृत्ती स्वीकारायची. इच्छांचं दमनही

करायचं नाही आणि शमनही करायचं नाही : 'उदात्तीकरण' करायचं. इच्छा निर्माणच होणार नाहीत अशा स्थितीत जायचं. 'देहबुद्धी' ही 'आत्मबुद्धी' करायची. अन् ह्या स्थितीतही प्रत्येकाला अन्न-वस्त्र-निवाऱ्याची गरज असतेच, म्हणूनही पुन्हा प्रपंच नेटका करायचाच! देहबुद्धी आणि आत्मबुद्धीतलं हेही एक गतिमान संतुलनच. एका अर्थानं तेही प्रपंच परमार्थातलंच.

***

भारतीय परंपरेनं दोन शब्दांत ह्या साऱ्याचं सार सांगितलं आहे : अभ्युदय आणि नि:श्रेयस. ऐहिक समृद्धी आणि पारलौकिक कल्याण. माणसाच्या आयुष्यात हे दोन्हीही हवं. ते ज्या व्यवस्थेतून साध्य होतं तिला म्हणायचं धर्म : 'यतो अभ्युदय-नि:श्रेयस-सिद्धि: स: धर्म:' काळ बदलतो तशी परिस्थिती बदलते नि त्या परिस्थितीत ही दोन्ही ध्येयं कशी साध्य करायची हे मानवाला सांगणारा कुणीतरी लागतो. रामदासांनी त्यांना 'धर्मस्थापनेचे नर' म्हटलं आहे. ते स्वत:ही असे एक नर होते. त्यांचं वैशिष्ट्य हे की, त्यांचा सांगावा इतका अचूक आहे की, चारशे वर्षं झाली तरी तो जसाच्या तसा लागू पडतो. सार्वस्थलिक आणि सार्वकालिक असा तो आहे. म्हणून तर त्याचं अशा काही निमित्तानं पुन्हा स्मरण करायचं, त्याचा पुनरभ्यास करायचा. निमित्तावाचूनही तो होत राहिला, तर अधिकच चांगलं!

('गतिमान संतुलन' मासिकाच्या जानेवारी व फेब्रुवारी २००८ च्या अंकामधून पुनर्मुद्रित)

# समर्थ रामदासांचे संगीत चिंतन


**सूरमणी डॉ. पं. कमलाकर परळीकर**

'सरगम' विद्यानगर, परभणी - ४३१४०१.

मो. ९४२३१४३८७१.




संगीत देवाला आवडणारी कला आहे. देवाला प्रसन्न करून घ्यावयाचे असल्यास संगीतासारखे दुसरे माध्यम नाही. त्यामुळे आपल्या सर्वच संतांनी या माध्यमाचा उपयोग करून घेतला आहे. समाजजागृतीसाठी, समाजाला एकत्र आणण्यासाठी सर्वच संतांनी संगीताचा उपयोग जाणीवपूर्वक केल्याचे दिसून येते. समर्थ रामदासस्वामी या सर्व संतमंडळींचे 'मुकुटमणी' शोभतात. श्री समर्थ रामदासांचे एकूण वाङ्मय बघता गायनकलेत, संगीतकलेत त्यांनी मोठे प्रावीण्य प्राप्त केले होते, हे आपल्याला सहजपणे दिसून येते. संगीतकलेची व्याख्या करताना असे सांगण्यात आले आहे की, 'गीतं वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतमुच्छते.' अर्थात गीत, वाद्य व नृत्य या तीन कलांचा समावेश या संगीतकलेत होतो. श्री समर्थांचा संगीतकलेशी संबंध जोडताना, त्यांचे संगीतविषयक विचार जाणून घेताना, संगीतकलेची धन्यता त्यांनी काव्यातून कशी सांगितली आहे ते पाहू या. 'धन्य ते गायनी कळा' ही समर्थांची उक्ती बहुतेक सर्वच जाणकारांना माहीत आहे. ते संपूर्ण काव्य मी आपल्यासाठी या ठिकाणी देत आहे. समर्थ रामदासांचे संगीतविषयक विचार त्यातून सहजपणे कळून येतील.

*संगीत गायनी विदया । सर्व सद्या मनोरथा ।*
*विदेश पाहता नाही । धन्य ते गायनी कळा ।।१।।*
*आवडी सकळै लोकां । प्रीतीने भजती जनी ।*
*इच्छिले पुर्वीती सर्वे । धन्य ते गायनी कळा ।।२।।*
*वेधिली सर्व ही चित्ते । बोधिले लोक भाविके ।*
*अद्‌भूते गुण देवाचे । धन्य ते गायनी कळा ।।३।।*
*येकाकी महंती येते । उदंड किर्ती वाढते ।*
*विख्यात सकळे लोकी । धन्य ते गायनी कळा ।।४।।*
*राहती लोक ते राजी । आवडी उपजे मनी ।*
*वर्णिता किर्ती देवाची । धन्य ते गायनी कळा ।।५।।*
*दुसरी भक्ती देवाची । जगदोद्धारची होईजे ।*
*घमंड गाजते किळा । धन्य ते गायनी कळा ।।६।।*
*बारीक उठती किळा । नाना तंत परोपरी ।*
*ऐकता गुदगुल्या होती । धन्य ते गायनी कळा ।।७।।*
*वाळके स्वापदे पक्षी । लोपती वेधनी मनी ।*
*चित्त निश्चीत होता हे । धन्य ते गायनी कळा ।।८।।*
*संगीत मुर्च्छना ताळे । मुर्कुंडी होतसे बळे ।*
*वीताल पाहता नाही । धन्य ते गायनी कळा ।।९।।*
*प्रबंधे किर्ती देवाची । जाड दृष्टांत नेटके ।*
*रसाळ गौल्यता मोठी। धन्य ते गायनी कळा ।।१०।।*
*नाना प्रकारची माने । किर्ती प्रताप होतसे ।*
*आतुळ तुळणा नाही । धन्य ते गायनी कळा ।।११।।*
*भक्तीची आवडी मोठी । करुणा किर्तने बरी ।*
*भक्तांची आवडी भक्ता । धन्य ते गायनी कळा ।।१२।।*

संगीतकला प्राप्त झाल्यानंतर माणसाला काय काय

मिळते हे वरील काव्य वाचल्यानंतर आपल्याला समजते. गायन ही सर्वश्रेष्ठ कला आहे. सर्वांना आवडणारी ही कला आहे. श्रोत्यांचे मन वेधून घेणारी ही कला आहे. लोक मोठ्या भक्तीने ईश्वराचे भजन करतात. देवांच्या अद्भुत गुणांचे दर्शन, ज्ञान, बोध, भाविक लोकांना सहजच प्राप्त होते. ही संगीतकला ज्याच्याकडे आहे त्या व्यक्तीला श्रेष्ठपण प्राप्त होते. त्याची कीर्ती, नावलौकिक सगळीकडे वाढत जातो. समाजात त्याला मानसन्मान, प्रतिष्ठा आदर मिळतो. अशी ही संगीतकला, जिला जगात तुलनाच नाही. संगीतकलेतील अनेक पारिभाषिक शब्दांचा समर्थ रामदासांनी या काव्यात वापर केला आहे. श्री समर्थ रामदास संगीतकलेचे मर्मज्ञ, जाणकार, उच्च कोटीचे गायक होते. म्हणूनच त्यांनी संगीतकलेची धन्यता सांगितली आहे. संगीतकलेविषयी त्यांनी केलेले चिंतन व अभ्यास त्यांच्या अनेक पदांतून, काव्यांतून आणि दासबोध ग्रंथातून आपल्याला दिसून येतो. श्री समर्थ रामदासांनी संगीतापासून मिळणारी धन्यता, कीर्ती, लौकिक, मानसन्मान याची प्रचीती, आपण सर्व भारतीयांनी याची देहि, याची डोळा पाहिली आहे, अनुभवली आहे.

संगीतकलेमुळेच भारतातील श्रेष्ठ कलाकारांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब मिळाला हे आपण पाहिले आहे. ज्यांना दैवी सूरांचे वरदान प्राप्त झाले आहे, अशा 'भारतरत्न' लतादीदी मंगेशकर ज्या साक्षात सरस्वती देवीच आहेत. आपल्या शांत, पवित्र व भक्तियुक्त आवाजाची मोहिनी घालणाऱ्या कर्नाटक शैलीच्या गायिका एम.एस. सुब्बालक्ष्मी याही 'भारतरत्न'. शहनाईसारख्या सुशीर वाद्याला शास्त्रीय संगीताच्या मैफिलीत मानाचे स्थान मिळवून देणारे उस्ताद बिस्मिल्ला खाँ साहेब हेही 'भारतरत्न'. शास्त्रीय संगीताचे बादशहा स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी हेही 'भारतरत्न'. रसिकांच्या हृदयात आपल्या घुमारदार, वजनदार आवाजाने स्वर्गीय आनंदाची अनुभूती देणारे पं. भीमसेन जोशी हे गायकांचे व रसिकांचे 'मुकुटमणीच.' सर्व आकाशतत्त्वात, आसमंतात या कलावंताचे स्वर भरून राहिले आहेत. संगीतामुळे हे कलावंत धन्य झाले आहेतच शिवाय आपल्यासारखे श्रोतेही धन्य झाले आहेत. परमेश्वराची कृपा कलावंतांना जशी लाभली आहे तशी ती तुम्हां-आम्हां सर्व रसिकांना देखील लाभली आहे, यात शंकाच नाही. संगीतकलेमुळे मिळणाऱ्या धन्यतेचे आपण साक्षीदार आहोत कारण या भारतरत्नांना पाहाण्याचे व ऐकण्याचे भाग्य आपणास लाभले. या शिवाय कितीतरी अन्य कलाकारांना वेगवेगळे पुरस्कार शासकीय, निमशासकीय आणि खासगी पातळीवर मिळालेले ऐकिवात असतात, तेही संगीतामुळेच!

साडेतीनशे वर्षांपूर्वी गायिलेली संगीताची धन्यता आपण प्रत्यक्ष अनुभवत आहोत. याची जाणीव फक्त जाणकारालाच होऊ शकते. समर्थ रामदासस्वामी किती दूरवरचे पाहात होते याची खात्री पटते. समर्थ रामदासस्वामी ज्या काळात जगले तो काळ आठवल्यास इतक्या अस्थिरतेचा असतानाही संगीतकलेविषयी विचार करण्यास त्यांना केव्हा वेळ मिळाला असेल? शांततेच्या काळातच कला बहरते. चिंतन, मनन तेव्हाच होऊ शकते असे असताना संगीताचे इतके शाश्वत विचारधन त्यांनी संगीतकलेच्या अभ्यासकांना दिले. हे मोठे आश्चर्यच म्हणावे लागेल.

'दासबोध' हा ग्रंथ म्हणजे आत्मप्रचीतीचा, अनुभवाचा, चिंतनाचा, अवलोकनाचा, शास्त्राचा दाखला देणारा ग्रंथ आहे. निरनिराळ्या विषयांसंबंधी समर्थांना जे ज्ञान प्राप्त झाले ते सत्याच्या कसोटीवर पडताळून, पारखून इतर लोकांसाठी त्यांनी उपलब्ध करून दिले. दासबोध ग्रंथवाचनाची फलश्रुती त्यांनी सांगितली आहे.

*नासे अज्ञान दुःख भ्रांती । शीघ्रची येथे ज्ञान प्राप्ती ।*
*ऐसी आहे फलश्रुती । इये ग्रंथी ।। १-१-३०*

दासबोध ग्रंथ वाचल्यानंतर त्याचे मनन चिंतन केल्यानंतर अनेक विषयांसंबंधीचे अज्ञान दूर होते. तसेच संगीत विषयासंबंधीचे अपसमज, भ्रम व अज्ञान यांचा

नाश होतो व त्या विषयाचे आकलन लवकर होते व ज्ञान प्राप्त होते. संगीतकला सामान्यत: मनोरंजनाचे साधन आहे. करमणुकीचे साधन आहे, असाच समज जनमानसात असतो. परंतु संगीताचा उपयोग मोक्षप्राप्तीसाठी व ईश्वरप्राप्तीसाठी होत असल्यामुळे समर्थांचे संगीतविषयक विचार त्याच दृष्टिकोनातून प्रगट झालेले आहेत. भारतीय रागदारी संगीत मुळात मंदिरातील संगीत आहे. त्याचा हेतू परमेश्वराची पूजा करून भक्तिभावाने त्याची आळवणी करणे हा आहे.

*नाही वैकुंठीचा ठाई । नाही योगियांचे हृदयी ।*
*माझे भक्त गाती ठाई ठाई । तेथ मी तिष्ठुती नारदा ।।१-८-२*

भगवंतांनी देवर्षी नारदाला आश्वासन देऊन ठेवले आहे की, तो वैकुंठात राहात नाही किंवा योगियाच्या हृदयात राहात नाही. ज्या ठिकाणी त्याचे भक्त गात असतात तेथे तो तिष्ठत राहातो. 'माझे भक्त' या शब्दाला या ठिकाणी विशेष महत्त्व आहे. कारण गायनात भक्तीची जोड असावी लागते. भक्ती असेल तरच परमेश्वर त्याच्या निकट येतो. भक्ताचे गाणे देवाला खूप आवडते. गायक जर ईश्वरभक्त असेल तर परमेश्वर त्याठिकाणी तिष्ठत राहील. त्यामुळे कलावंत ईश्वरभक्त असला पाहिजे, असे समर्थांचे मत आहे.

**प्रेमळ भक्तांची गायने - भगवत् कथा हरिकिर्तने**

*वेद व्याख्यान पुराण श्रवणे जेथे निरंतर ।।१-८-४*
*रम्य रसाळ गायक । निष्ठावंत । १-८-७*

समर्थ म्हणतात की, गायक सद्‌भक्त असावा, प्रेमळ असावा. त्याच्याठिकाणी भगवद्‌कथा, हरिकीर्तन, वेद, पुराण यासंबंधी प्रेम असावे व त्याचे तो नेहमी श्रवण करणारा असावा. त्याचे गायन मधुर, रसाळ व सुंदर असावे. गायकाची परमेश्वरावर नितांत श्रद्धा असावी. तसेच गायकाची आपल्या कलेवर निष्ठा असेल तरच त्याचे गायन मधुर व रसाळ होत जाईल. प्रत्येक स्वराची आराधना करून त्याला ते स्वर आत्मसात करावे लागतात. स्वरात 'गाणेपण' येण्यासाठी निष्ठा असणे महत्त्वाचे आहे. श्रद्धा नसेल, निष्ठा नसेल तर गाणे परिणामकारक होणार नाही. त्यातून भाव प्रगट होणार नाही.

*भक्त प्रेमळ भाविक । सभ्य सखोल सात्त्विक ।।१-८-७*

गायक सज्जन व सभ्य असावा अशी समर्थांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्याचे संगीताविषयीचे ज्ञान सखोल व परिपूर्ण असायला हवे. संगीतकलेच्या संदर्भातील सर्वच बारकावे त्याला माहीत असावेत. तो सात्त्विक वृत्तीचा असला पाहिजे, असे त्यांचे मत आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचा संगीतकलेचा काळ पाहिल्यास संगीतकलेकडे पाहाण्याचा समाजाचा दृष्टिकोन चांगला नव्हता. ज्या संगीतकलेचे गोडवे, महती, धन्यता समर्थांनी गायिली आहे ती संगीतकला अतिशय हीन पातळीवर गेलेली होती. संगीतकला दुर्व्यसनी, दुराचारी व कुठल्याही प्रकारचे सामाजिक बंधन न पाळणाऱ्या कलावंतांकडे गेली होती. सज्जनता, सात्त्विकता, नीतिमत्ता, वैचारिक उंची इत्यादी गुणांपासून ही गायक-वादक मंडळी दूर गेली होती. त्यामुळे संगीत कला बदनाम झाली. यात संगीतकलेचा काहीच दोष नव्हता. ती सर्व पूर्वीइतकीच पवित्र आणि सात्त्विक होती. परंतु कला सादर करणारे, प्रस्तुत करणारे कलाकारच व्यसनी होते. त्यामुळे कलाकारांपेक्षा संगीतकलाच बदनाम झाली होती. ही सर्व परिस्थिती स्व. पं. विष्णू दिगंबर पलुस्करांनी परिश्रमपूर्वक बदलली व संगीतकलेला समाजात सन्मानाचे स्थान प्राप्त करून दिले, हा इतिहास सर्वांना ज्ञात आहे. गायक सखोलज्ञानी, निष्ठावंत, सात्त्विक, प्रेमळ, भक्त असावा असे समर्थ का म्हणतात, हे यावरून आपल्या सहज लक्षात येते. समर्थांनी अपेक्षा केल्याप्रमाणे सर्व गुणांनी युक्त असलेला गायक असेल तर परमेश्वर त्या गायकात सामावून जाईल. समर्थांच्या कसोटीत उतरणारे गायक भक्त, निष्ठावान, सद्‌गुणी हे परमेश्वरी अवतारच म्हणावयास हवेत. अशा गायकाचे गायन माणसाला स्वत:चे देहभान विसरायला लावते.

*पुण्य परायण सुंदर गायन । विसरवी देहभान ।। किंवा*
*या कारणे सभा श्रेष्ठ । भक्त गाती ते वैकुंठ ।।१-८-३*

म्हणूनच अशी संगीतसभा, मैफील श्रेष्ठ आहे कारण भक्तगायक गातो ते ठिकाणच वैकुंठ होऊन जाते. या ठिकाणांपेक्षा वैकुंठ वेगळे असत नाही. कुठल्याही दर्जेदार व कसलेल्या गायकाची मैफील ऐकल्यावर श्रोत्यांना या गोष्टीचा अनुभव आल्याशिवाय राहात नाही. अलौकिक संगीत ऐकल्याचे समाधान मिळते. स्वरांच्या नादब्रह्मात श्रोता पूर्णपणे स्वत:ला हरवून बसतो. त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नता, आनंद स्पष्ट दिसू लागतो. असे भक्तगायक समर्थांना अपेक्षित आहेत. भक्ताच्या मैफिलीत परमेश्वर उपस्थित राहातो. ती मैफील किती श्रेष्ठ आहे याची कल्पनाच केलेली बरी!

समर्थांना प्रत्येक गोष्टीचा शास्त्रशुद्ध विचार आवडतो असे दिसते. त्यामुळे 'दासबोध' ग्रंथात ठिकठिकाणी संगीताचा जो उल्लेख आलेला आहे तो शास्त्रशुद्ध संगीताचा म्हणजेच रागदारी संगीताचा आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

*सर्व प्रकारे नेमक । शास्त्रोक्त करणे काही येक ।*
*त्याहिमध्ये अलौकिक । तो हा भक्तिमार्ग ।।१४-७-६*

प्रत्येक गोष्टीचे शास्त्रीयीकरण समर्थांना आवडते. त्यामध्ये अलौकिक असणारा हा भक्तिमार्ग असून, या भक्तिमार्गात जे संगीत अभिप्रेत आहे ते संगीत शास्त्रीय संगीतच आहे यात वाद नाही. जे शास्त्रीय संगीत आहे, शास्त्रशुद्ध आहे, अलौकिक आहे, उदात्त, उन्नत आहे ते आपण स्वीकारावे अशी समर्थांची भूमिका आहे.

*राग ज्ञान ताल ज्ञान। नृत्य ज्ञान वाद्य ज्ञान*
*अमृत वेळ प्रसंग ज्ञान । कैसे ते ऐकावे ।। ४-१-२०*

राग म्हणजे ध्वनीची अशी विशिष्ट रचना ज्यात स्वर व वर्ण यांच्यामुळे सौंदर्य उत्पन्न होते व जे मानवाच्या चित्ताचे रंजन करते, ऐकणाऱ्या श्रोत्यांच्या मनाला आनंद देते. त्या रचनेस संगीततज्ञ आणि विद्वान लोक 'राग' म्हणतात. संगीतात वापरल्या जाणाऱ्या ध्वनीस 'नाद' असे म्हणतात. यातून निर्माण होणाऱ्या निरनिराळ्या नादास 'स्वर' म्हणतात, जे ऐकणाऱ्याच्या कानाला आनंद देतात. 'ताल' हा संगीताचा प्राण आहे. ज्याला तालात गाता येत नाही किंवा वाजवता येत नाही तो गायक किंवा वादकच नव्हे. इतके तालाला संगीतात महत्त्व आहे. कोणतेही गीत गावयाचे असेल, मग ते पद असो, भजन असो, चीज असो, धृपद असो, धमार असो त्यासाठी काही अवधी म्हणजे वेळ लागणारच. त्या वेळेचे मोजमाप करण्यासाठी ताल निर्माण झाला. तालामुळे संगीताला एक प्रकारचे बंधन प्राप्त होते व त्या बंधनात गायकाला गावे लागते. तालामुळे संगीतात आटोपशीरपणा व व्यवस्थितपणा येतो. त्यामुळे गाण्यात मजा येते. मैफिलीत रंग भरतो. श्रोत्यांना एकाच वेळी स्वरांचा व तालाचा आनंद घेता येतो. तालाच्या ठेक्यावर श्रोते डोलू लागतात. गायकाच्या कौशल्यावर ते 'दाद' देतात. गायकाच्या दृष्टीने गायनातील रागसहजता आणि तालसहजता अतिशय महत्त्वाची आहे.

गायकाला वेगवेगळ्या रागांचे यथोचित ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्याला रागविस्तार करता येणार नाही. रागात लागणारे शुद्ध स्वर, कोमल स्वर, तीव्र स्वर आणि रागात न लागणारे स्वर याची त्याला माहिती तर असलीच पाहिजे. शिवाय रागातील वादी, संवादी व रागवाचक स्वरसमुदाय, रागातील विश्रांतिस्थाने, आरोह-अवरोह यांचे ज्ञानही हवे. या सर्व गोष्टींचा रागविस्तार करताना समजून उमजून वापर करावा लागतो. तालाच्या मात्रा, खंड, टाळ्या व काल ठेक्याचे बोल इत्यादींचे ज्ञान त्याला असावे लागते. त्याशिवाय तो तालात कसे गाऊ शकणार? चीजेत कोणत्या अक्षरांवर सम आहे, काल कोठे आहे, चीज कोणत्या मात्रेपासून सुरू होते हे सर्व त्याला माहीत असणे गरजेचे आहे. त्याशिवाय तो तालात अचूक गाऊ शकणार नाही. गायकाचे तालज्ञान पक्के नसेल तर गाताना त्याची खूप

तारांबळ उडेल व फजिती होईल. अशी फजिती टाळण्यासाठी गायकाचे रागज्ञान आणि तालज्ञान पक्के हवे. त्याची संगीतसाधना (रियाज) चांगली, तयारीची व अभ्यासपूर्ण हवी. संगीतकलेत गायन, वादन आणि नृत्य यांचा समावेश होत असल्याने वाद्यांची माहिती, वादनातील खाचाखोचा, त्यांचे कौशल्य, वैशिष्ट्य कलाकारास माहीत हवे. नृत्यात पदन्यास, हावभाव, मुद्राभिनय, हस्तलालित्य इत्यादींवर प्रभुत्व हवे. 'अमृतवेल', 'प्रसंगज्ञान' असे शब्द येथे समर्थांनी वापरले आहेत. त्याअर्थी ते रागांच्या वेळेकडे संकेत करताना दिसतात. रागवेळेनुसार व प्रसंगानुसार त्या त्या रागाचे गायन करावे असे समर्थ म्हणतात.

संगीतात वापरल्या जाणाऱ्या तीन सप्तकांविषयी समर्थ काय म्हणतात ते पाहा -

*तार मंद्र ते घोर बध स्वर बध । ते घोर बध ताळ बध*
*ते काळ वेळ बध ।*
*ऐसे गावे गावे जगावे । न भागावे पंथी लागावे*
*सर्व सांग देवा मागावे ।*

संगीतात तीन सप्तक आहेत. सात स्वरांच्या समूहाला 'सप्तक' असे म्हणतात. या सप्तकाचे क्षेत्र 'सा' ते 'नि' या स्वरांपर्यंत असते. मंद्र, मध्य आणि तार अशी या तीन सप्तकांची नावे आहेत. सर्वांत खालचे म्हणजे 'मंद्र सप्तक' त्यानंतरचे 'मध्य सप्तक' व त्यापेक्षा उंच सप्तक म्हणजे 'तार सप्तक'. मंद्र सप्तकाच्या दुप्पट उंचीवर मध्य आणि मध्य सप्तकाच्या दुप्पट उंचीवर तार सप्तक अशी या सप्तकांची रचना असते. आपण ज्याला मंद्र सप्तक म्हणतो त्याला समर्थ 'घोर' म्हणतात. आपण ज्याला मध्य सप्तक म्हणतो त्याला समर्थ मंद्र सप्तक म्हणतात. तार सप्तकाचे नाव मात्र तेच आहे. गायकाला या तिन्ही सप्तकांत गाता आले पाहिजे. चीज तिन्ही सप्तकांत बांधलेली असावी. काव्यार्थ गीताचा विस्तार घोर (मंद्र) ते तार सप्तकापर्यंतचा असावा. गीत तालात व्यवस्थित बांधलेले असावे. रागाच्या वेळेनुसार ते गावे. गात गात जगावे. थकू नये. ईश्वरचिंतनात मग्न व्हावे. आपल्या विवंचना देवाला सांगाव्यात. जे काही हवे असेल ते त्याच्याकडून मागून घ्यावे. रागवेळेचा उल्लेख दोन्ही काव्यांत आलेला आहे. त्याअर्थी संगीतात रागवेळा समर्थांच्या पूर्वीच्या काळात निश्चित झालेल्या असाव्यात, असे दिसते. संगीतातील रागवेळेचे उगमस्थान 'सामवेद' आहे असे मानतात. प्रातः सवन, मध्यान्ह सवन व सायं सवन तेच दर्शवतात. प्रातः सवनाची स्वररचना निराळी, मध्यान्ह सवनाची स्वररचना निराळी आणि सायं सवनाची स्वररचना निराळी हे या तिन्ही सवनांचे वैशिष्ट्य होते. सामवेदातील ऋचा तशा म्हणल्या जात. रागांच्या वेळा त्या सवनापद्धतीप्रमाणेच निर्माण झाल्या असाव्यात, असे मानता येऊ शकते.

*संगीत रसाळ हरी किर्तन । ताल बद्ध तान मान ।*
*प्रेमळ आवडिचे भजन । अंतरा पासूनी ।*

हरिकीर्तनातील संगीत रसाळ, मधुर असले पाहिजे. आलाप-तानासहित गाणे परिपूर्ण असावे. गायनातील तालबद्धतेला समर्थ खूप महत्त्व देतात. तालबद्ध गायन श्रोत्यांना आनंद देते. गायक जे काही गातो ते सर्व तालात व्यवस्थित असले पाहिजे. आवडीचे भजन मन लावून प्रेमळपणे म्हटले पाहिजे. अंत:करणापासून त्यातील भाव प्रगट झाले तर त्याचा परिणाम श्रोत्यांवर पडतो. वरवरचे गाणे श्रोत्यांची, त्यांच्या मनाची पकड घेऊ शकत नाही. महर्षी वाल्मिकी कुश-लवांना गाताना कुठल्या कुठल्या गोष्टींचे तारतम्य ठेवावे हे सांगताना म्हणतात - 'रसाळ मुळे फळे सेवूनी रसाळता घ्या स्वरात भरूनी' गाण्यात रसाळता आणण्यासाठी रसाळ मुळे व रसाळ फळांचे सेवन करावे. तरच स्वरांत रसाळता येईल. कवी श्रेष्ठ कै. ग. दि. माडगुळकरांनी मोठे सुंदर काव्य या संदर्भात 'गीतरामायणात' लिहिले आहे. त्यात महर्षी वाल्मिकींच्या कुश-लवांना दिलेल्या सूचना आजही सर्वच गायकांना लागू होऊ शकतात. समर्थ रामदासांच्या सूचना देखील आज तितक्याच महत्त्वाच्या आहेत. त्यांना थातुर-

मातुर काहीही चालत नाही.

कसे गावे? समर्थ म्हणतात -

*दुसऱ्याचे अंतर जाणावे । आदर देखोन म्हणावे ।*
*जे आठवेल ते गावे । हे मुर्खपण ॥ १०-३-१६*

अतिशय महत्त्वाची गोष्ट समर्थांनी याठिकाणी सांगितली आहे.

गायकाने श्रोत्यांचे अंतरंग ओळखलेच पाहिजे. आपले गाणे श्रोत्यांना आवडत आहे का नाही? आपल्या गाण्याने श्रोते खूष आहेत का नाही? इत्यादी गोष्टी गायकाला चटकन समजल्या पाहिजेत. श्रोत्यांना आवडो किंवा न आवडो गायक गातच राहिला तर ती फार वाईट गोष्ट होईल. गायकाने श्रोत्यांच्या आवडीचा अंदाज घेऊन गायले पाहिजे, नसता श्रोते चुळबुळ करू लागतील, उठून जाऊ लागतील. श्रोत्यांची नाडी गायकाला अचूक ओळखता आली पाहिजे. काय गायचे ते मैफिलीपूर्वीच ठरविले पाहिजे. जे आठवेल तसे गाणे म्हणजे मूर्खपणा होय, असे समर्थ म्हणतात. किती वेळ गायचे व गाणे केव्हा संपवायचे हे गायकाला उमगले पाहिजे. श्रोत्यांना कंटाळा येईपर्यंत गात राहाणे शहाणपणाचे नाही. गायन कंटाळवाणे होणार नाही याची दक्षता गायकाने घेतली पाहिजे. आपले गाणे यशस्वी करण्याची गुरुकिल्ली समर्थांनी सांगितली आहे.

*ज्याची जैसी उपासना । ते चि गावे चुकावेना ।*
*रागज्ञान तालज्ञान । अभ्यासावे । १८-३-१७*

संगीतात रियाजाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. गायकाला रियाज सतत करावा लागतो. रियाज केला तरच त्याचे गाणे बहारदार होते. रागाचा व तालात गाण्याचा त्याला रियाज करावा लागतो. रियाजात असलेले रागच त्याने मैफिलीत गावेत म्हणजे गाताना चूक होणार नाही. मैफिलीत सरावातीलच प्रकार सादर करावेत. मैफिलीत प्रयोग चालत नाहीत. रियाजाने सूर व ताल अनुकूल होतात. ज्या रागावर रियाज नाही, जो ताल सरावात नाही, असा राग व ताल निवडल्यास गायकाची फजिती झाल्याशिवाय राहाणार नाही. रागज्ञान व तालज्ञान यांचा अभ्यास करणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते. रियाज नसला की गाण्याचा दर्जा कमी होतो आणि रियाज असला की दर्जा उंचावतो. ही गोष्ट समर्थांना ज्ञात होती. म्हणून त्यांनी ती नमूद केली आहे -

*केवळ कोमल कुशल गावे ।*
*कठीण कर्कश कुठे सांडावे । येकिकडे ॥ १४-४-१*

गायकाने रियाज करताना आपले गाणे मधुर व कोमल कसे होईल याकडे लक्ष द्यावे. आवाज मृदू व लवचिक होईल इकडे लक्ष असावे. आवाजातील कठोरपणा, कर्कशपणा, चोरटेपणा हे दोष रियाज करताना काढून टाकावेत. गायन हे मधुर व रंजक वाटले पाहिजे, अशी शिकवण समर्थ देतात. गाणे कसे असू नये, हेही समर्थ सांगतात. ते पाहा -

*गर्व गाणे गाऊ नये । गाता गाता गळू नये ।*
*गौप्य गुज गर्जो नये । गुण गावे ॥ १४-४-३*
*घष्टणी घिसणी घस्मरणे । घसर घसरु घसा खाणे ।*
*घुम घुमोची घुमणे । योग्य नव्हे ॥ १४-४-४*

गायकाच्या गाण्यात नम्रता हवी. गायकाने गर्वाने, अभिमानाने गाऊ नये. गाता गाता मध्येच गळून जाऊ नये. थकून जाऊ नये. गायक मध्येच थकला तर त्याचे गाणे कसदार होणार नाही. रियाजाची बैठक सात-आठ तासांची असेल तर तो तीन-चार तास न थकता मैफिलीत गाऊ शकेल. गायक थकला तर त्याचा परिणाम त्याच्या आवाजावर होतो व आवाज देखील थकलेलाच बाहेर पडतो. गाणे रंगणार नाही. मैफिल रटाळ होईल. मैफिलीत इतरांचे दोष दाखवू नयेत. उलट गुणच प्रगट करावेत. चांगल्या गायकाचे हेच लक्षण आहे. घस, घस, घिस, घिस करीत सारखा घसा साफ करीत व खाकरत खाकरत गाऊ नये. घशाला ताण देत गाऊ नये. वरील दोषांमुळे गायकाचा व त्याच्या गाण्याचा श्रोत्यांवर चांगला परिणाम

होत नाही. गाण्यापेक्षा खाकरण्याकडेच त्याचे लक्ष अधिक असते. हे सर्व दोष गायकाने टाळले पाहिजेत.

संगीत ही मोठी अवघड कला आहे. कष्टसाध्य कला आहे. अशी ही अवघड कला कोणापाशी शिकावी या संबंधी समर्थांचे विचार काय आहेत ते पाहू या.

*जाणत्या पासी गावे गाणे । जाणत्या पासी वाजविणे ।*
*नाना आलाप शिकणे । जाणत्या पासी ॥ १८-२-६*

संगीतासारखी अवघड कला शिकायची असेल, तर ती एका जाणत्या संगीततज्ज्ञाकडेच शिकायला हवी. नाना प्रकारचे आलाप, ताना, स्वरसमूह, बंदिशी, निरनिराळे राग व त्यांचे स्वरूप इत्यादींचे ज्ञान देणारा गुरू तेवढाच तज्ज्ञ व तयारीचा असला पाहिजे. तरच त्याच्या शिष्याला रागज्ञान, तालज्ञान होऊ शकेल. 'जाणत्यापासी' असे समर्थ म्हणतात त्या अर्थी त्यांना गुरू किती श्रेष्ठ दर्जाचा अपेक्षित आहे याची आपण कल्पनाच केलेली बरी! इतर शास्त्रांसारखाच संगीतविद्येचा गुरू तज्ज्ञ असला पाहिजे. तो ब्रह्मज्ञानी असेल तर उत्तमच. निदान तो भक्तिमार्गातील प्रवासी तरी असला पाहिजे. चांगला गुरू मिळणे, सुयोग्य गुरू मिळणे हे शिष्याच्या भाग्यातच असावे लागते. एकदा का असा चांगला गुरू मिळाला तरच त्या शिष्याचे गायन दर्जेदार, कसदार व श्रवणीय होईल. असे गाणे तयार झाल्यावर त्या गायकाने कोणासमोर गावे? समर्थ म्हणतात - जाणत्यापाशी, गायकाने आपले गाणे जाणकार श्रोत्यांसमोरच सादर करावे. श्रोते जाणकार असतील तरच गायक किंवा वादक कलाकार आपली कला अधिक चांगल्या रीतीने सादर करू शकेल. त्याची कला अधिक फुलेल. गायक, कलाकार जसा चांगला अपेक्षित अहे तसेच मैफिलीतील श्रोते चांगले, जाणकार अपेक्षित आहेत. मैफिलीची शिस्त श्रोत्यांनी पाळायला हवी. गायकाची तंद्री भंग होणार नाही. त्याला त्रास होणार नाही अशीच वर्तणूक मैफिलीत ठेवली पाहिजे. गाणे चालू असताना श्रोते मोठ्याने बोलत असतात. गायकाचे चित्त विचलित होते व जे श्रोते मन लावून गाणे ऐकत असतात त्यांना मैफिलीचा आनंद घेता येत नाही. गाणे ऐकावयास येणारे श्रोते विविध प्रकारचे असतात. काही स्वत:चा प्रतिष्ठितपणा मिरविण्यासाठी येतात. काही भेटीगाठीसाठी येतात. काही लोक गायकाची प्रसिद्धी ऐकून त्याला पाहाण्यासाठी येतात. जाणकार श्रोते गाणे ऐकण्यासाठी येतात. अशांची संख्या फारच कमी असते. अरसिक श्रोत्यांमुळे मैफिलीची शान बिघडते. जाणकार रसिक श्रोत्यांपुढे गाण्याचा समर्थांचा आग्रह रास्तच वाटतो.

संगीत ही हृदयाची भाषा आहे. गायकाला त्याच्या रागाच्या, सूरांच्या माध्यमातून आपले विचार, भावना व्यक्त करावयाच्या असतात. श्रोत्यांचे मन, कान गायकाच्या गाण्याकडे असेल तरच ते गाणे श्रोत्यांच्या हृदयात उतरेल आणि गायक व श्रोते एकाच लहरीत बुडून जातील. कलाकार व श्रोते एकाच वैचारिक पातळीवर असतील. श्रोत्यांना अलौकिक मैफिलीचा आनंद मिळेल. 'नाना आलाप' असा शब्दप्रयोग समर्थांनी केला आहे. प्राचीन काळी आलाप करण्यासाठी विशेष नियम होते व त्यानुसार आलाप करावे लागत. हे आलाप दोन प्रकारचे होते.

१. राग आलाप, २. रूपक आलाप. या दोन पद्धतीने आलाप केले जात. नाना प्रकारचे आलाप जाणकारांपाशी शिकावे असे म्हटले आहे, ते किती योग्य आहे हे आपणास समजून येईल. तज्ज्ञ गुरूशिवाय या प्रकारचे आलाप कोणीच शिकवू शकणार नाही. संगीतकला सहजासहजी साध्य होत नाही. त्यामुळे 'जाणत्यापाशी' शिकावे असे समर्थ म्हणतात. संगीत परिवर्तनशील कला आहे. हल्लीची आलापपद्धती पूर्वीपेक्षा खूप निराळी झाली आहे. शब्दाशिवाय आकारात गायलेल्या मधुर स्वरसमूहाला 'आलाप' म्हणतात. आलापाची गती संथ व सावकाश असते. आलाप राग बढतीचे मुख्य अंग आहे. धृपद, धमाराचे आलाप नोम - तोम चे आलाप असतात. रागगायनात काहीवेळा शब्द घेऊन

आलाप केले जातात. त्यांना 'बोल आलाप' म्हणतात. आजचे आलाप प्राचीन रागालापातून आलेले आहेत, असे मानतात. तरीही आधुनिक आलाप नियम आणि प्राचीन आलाप नियम यांत खूप फरक आहे, हे दिसून येते.

समर्थांच्या संगीत चिंतनात त्यांनी एक खूप महत्त्वाचा मुद्दा सांगितला आहे.

*अभ्यासे प्रगट व्हावे । नाही तरी झाकोन असावे ।*
*प्रगट होऊन नसावे । हे बरे नव्हे ॥ १८-७-१७*

गुरुकुल पद्धतीतील गुरु-शिष्याला परिपूर्ण ज्ञान झाल्याशिवाय बाहेर पाठवत नसत. कमीत कमी एक तप (१२ वर्षे) शिष्य गुरुगृही राहून ज्ञान संपादन करीत असे आणि नंतर तो गुरूच्या परवानगीने आपल्या ज्ञानाचा प्रभाव पाडण्यासाठी बाहेर पडत असे. संगीतकलेबाबतीतही असेच बंध पाळले जात होते. शिष्य तयार झाल्याशिवाय त्याला स्वतंत्र मैफील करण्याची परवानगी दिली जात नसे. शिष्य मैफील करण्याच्या योग्यतेचा झाला आहे अशी गुरुला जेव्हा खात्री वाटत असे तेव्हा स्वतंत्रपणे गाण्याची परवानगी दिली जात असे. त्याचा अभ्यास पूर्ण झाला तर तो मैफील रंगवू शकतो, श्रोत्यांचे तसेच संगीततज्ज्ञांचे समाधान करू शकतो, ताला, सुरांचे यथोचित ज्ञान झाले आहे, रागस्वरूप व त्याची मांडणी यथोचित करू शकतो या सर्व गोष्टींचा विचार करून गुरू त्याला परवानगी देत असत. मैफिलीचा अनुभव देण्यासाठी गुरू शिष्याला सोबत नेत असत. तानपुऱ्यावर बसवून अधून मधून स्वर लावण्याची संधी देत असत. त्यामुळे मैफिलीत कसे गावे याचा शिष्यांना वस्तुपाठच मिळत असे. गुरूच्या पाठीमागे गाऊन गाऊन त्याला आपोआपच सराव होत असे. अशा प्रकारचा सराव शिष्याला झाल्यावरच तो यशस्वी गायक म्हणून बाहेर पडत असे. असा तयार शिष्य बाहेर गायक म्हणून पडला की त्याची कीर्ती सतत वाढतच जाते. त्याला पाठीमागे पाहाण्याची वेळच येत नाही. जोपर्यंत चांगली तयारी होत नाही, चांगला रियाज होत नाही तोपर्यंत झाकोन असावे. प्रगट होऊ नये असे समर्थ म्हणतात. एकदा का गायक म्हणून बाहेर पडला की तो पुढेच जात राहिला पाहिजे. मिळालेली कीर्तीसुद्धा टिकवावी लागते. त्यासाठी रियाज, अभ्यास, चिंतन आवश्यक आहे. रियाजाचे सातत्य संपले की तो गायकही संपला, असे होते. एका तपाचा कालावधी निपुणता प्राप्त करण्यासाठी लागतो. घाई केली जात नाही. 'झाकोन रहावे' असे समर्थ म्हणतात ते याचसाठी. केव्हा एकदा मैफिलीत गायला मिळते असे बऱ्याच शिष्यमंडळींना वाटते व ते तयारी होण्यापूर्वीच मैफिलीत गाऊ लागतात. सुरुवातीला थोडे नाव होते पण हे फार दिवस चालत नाही. शेवटी ते संगीत क्षेत्रातून गायब होतात. एकदा का प्रगट झाले की अशा प्रकारे नाहीसे होणे समर्थांना मान्य नाही. म्हणून ते म्हणतात, - प्रगट होऊन नासावे । हे बरे नव्हे ॥ किती परखडपणे समर्थांनी आपले विचार मांडले आहेत ते आपल्याला समजून येते. संगीतविषयक समर्थांनी केलेले चिंतन व त्यातून त्यांनी केलेल्या सूचना व मार्गदर्शन सर्वच कलावंतांना योग्य दिशेला नेणाऱ्या ठरतील असेच प्रत्येक अभ्यासकाला वाटेल. संगीतक्षेत्रात स्थिरावलेल्या, स्थिर होण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या कलाकारांना समर्थांचे विचार म्हणजे वस्तुपाठच आहे.

शास्त्रीय संगीताच्या बंदिशी (चीजा) बहुतेक शृंगारिक आशयाच्या असतात. या सर्व चीजा परंपरागत, पिढ्या दर पिढ्या चालत आलेल्या आहेत. मोठे मोठें गायक कलाकार या चीजा म्हणताना आढळतात. कारण त्या त्यांना गुरूकडून मिळालेल्या असतात. समर्थांनी अशा बंदिशी कोठे ऐकल्यात कोणास ठाऊक? परंतु बंदिशीसंदर्भातही त्यांनी आपले विचार मांडले आहेत.

*वर्णि स्त्रियांचे आवेव । नाना नाटके हाव भाव ॥*
*देवा विसरे जो मानव । तो एक पढत मूर्ख ॥ २-१०-१९*

शास्त्रीय संगीत हे स्वरप्रधान संगीत आहे. त्यातील शब्दरचना गौण आहेत. त्यामुळे चीजांकडे व त्यांच्या अर्थाकडे न गायकाचे लक्ष असते, न रसिक श्रोत्यांचे. राग विस्तारासाठी व तालाचे बंधन पाळण्यासाठी चीजा

असतात. असाच समज सर्वांचा असतो. चीजा आहेत ना? त्याला काहीतरी शब्द आहेत ना? ती तालात व्यवस्थित स्वरबद्ध केलेली आहे ना? एवढेच गायकाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्या चीजेतून कोणता अर्थ ध्वनित होतो याच्याशी त्याचे काही देणे घेणे नसते. श्रोत्यांचेही चीजेच्या अर्थाकडे लक्ष नसते. गायक किती चांगल्या रीतीने चीज म्हणतो आहे, चीजेची स्वररचना किती सुंदर आहे, स्वरविस्तारासाठी गायक किती सुंदर उपयोग करतो आहे या गोष्टींकडे श्रोत्यांचे लक्ष असते. काय करायचाय अर्थ जाणून? त्यामुळे बऱ्याचशा चीजा अर्थ लक्षात न घेता म्हटल्या जातात.

मुलतानी रागातील एक प्रसिद्ध चीज पाहा. ताल-त्रिताल

*रुनक झुनक मोरी पायल बाजे । बीछुवा छुम छुम झननन साजे ॥*
*अंतरा : सेज चढत मोरी झांजर हाले, सास ननंद की लाजे ॥*

ती स्त्री शेज चढत असताना तिच्या पायातील पैंजण वाजत आहेत. पैंजण वाजत असल्यामुळे तिला सासूची व नणंदेची लाज वाटत आहे. त्या काय म्हणतील असे तिला वाटत आहे. अशा प्रकारच्या अनेक पारंपरिक चीजा गायक गातात. श्रोते 'वाह वा' म्हणत असतात. स्त्रियांच्या अवयवाचे वर्णन असलेल्या चीजाही बऱ्याचदा आपल्याला ऐकायला मिळतात. समर्थांच्या काळातही अशा बंदिशी होत्या का? असा प्रश्न पडतो. म्हणून त्यांनी वरील ओवीत हा विषय छेडला आहे. देवाला विसरून जो मानव स्त्रियांच्या अवयवांचे वर्णन बंदिशीत करतो त्याला समर्थ 'पढत मूर्ख' म्हणतात. समर्थांच्या काळात निश्चितच अशा प्रकारच्या चीजा काव्याच्या स्वरूपात असाव्यात. समर्थांची दृष्टी तर दूरवरची होती. त्यामुळे त्यांनी अशा चीजा नसाव्यात असे सुचविले आहे. रागदारी संगीताचे पावित्र्य सुरांबरोबर चीजांमध्येसुद्धा असावे, अशी रास्त अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

श्री समर्थ रामदास स्वामी स्वत: मोठे गायक व कीर्तनकार होते हे सर्वांनाच माहीत आहे. संगीताचा वापर त्यांनी समाजजागृतीसाठी केला हे त्यांच्या एकूण जीवनकार्याकडे बघून समजते. ते रामभक्त होते म्हणून 'रामदास'. शास्त्रीय संगीताच्या त्यांनी अनेक रागांत चीजा बांधलेल्या आहेत. काफी, शंकराभरण, केदार, रागेश्री, मारु, धनाश्री, हुसैनी, सुघराई, पावक, अहेरी, आसावरी, कल्याण, गौडि, वराळी, सारंग, रामाग्री, श्री, देसी, जयजयवंती, मालाश्री, वसंत, परज, देशांक, धृवक, हरिकल्याण, पहाडी, कानडा, कामोदी, मल्हार, सोरठ, वैराटिका, भैरव, ब्याहागडा, भैरवी इत्यादी. या सर्व रागांच्या चीजांच्या शब्दांकडे पाहिल्यावर व त्यांच्या अर्थाकडे पाहिल्यावर चीजा कशा असाव्यात याचे उत्तम मार्गदर्शन बंदिशकारांना मिळेल यात वाद नाही. मराठी व हिंदी या भाषेतून त्यांनी चीजा रचल्या आहेत. मृदंगाचे बोल त्यांनी रचले आहेत. त्यांनी डफगाणी रचली आहेत. समर्थांच्या चीजांचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, चीजांचा प्रमुख विषय प्रभू रामचंद्र आहेत किंवा आध्यात्मिक आहेत किंवा उपदेश आहे. समर्थांनी सर्वच प्रकारचे लेखन एकांतात घळीत केले आहे. त्यांचे ज्ञान सर्वस्पर्शी आहे. संगीत तर त्यांचा आवडता विषय असल्यामुळे त्यांच्या वाङ्मयात संगीताला प्राधान्य दिले गेलेले दिसून येते. समर्थांच्या लिखाणात संगीताचा कुठे ना कुठे उल्लेख येतोच. भारतीय संगीत कलेच्यादृष्टीने समर्थांचे लिखाण ऐतिहासिक पुराव्यासारखे आहे. त्यावरून बऱ्याच गोष्टींचे ज्ञान व उलगडा होत जातो.

*बहुतांचे समाधान । संगीत गायन ॥*

सर्वांचे समाधान करणारी ही संगीत गायनकला आहे, असे समर्थ म्हणतात. रसिक श्रोत्यांना आनंद मिळतो. स्वत: गायकाला त्याच्या गायनामुळे आनंद व समाधान प्राप्त होते. एवढेच नव्हे, तर प्रत्यक्ष देवाला देखील आनंद होतो. अशी ही सर्वांना आनंद देणारी कला आहे. समर्थांना उदास वाटू लागले तर ते देवाचे गुणवर्णन करणारे गाणे गाऊन आपली उदास झालेली मन:स्थिती ताळ्यावर आणत असत. दु:खाचे निवारण

करणारी ही संगीतकला आहे. संगीताचा आनंद घेणारे श्रोते भान हरपून सर्व विसरून संगीतकलेचा आस्वाद घेत असतात हे आपण जाणतो.

*दास उदास मनी गुण तुझे । कळत नकळत गातो दयाळा ।।*

समर्थ जेव्हा काही कारणास्तव उदास असत, निराश होत तेव्हा ते गाणे म्हणत. त्यामुळे त्यांची उदास वृत्ती, निराशा निघून जात असे. गाणे हा समर्थांचा सहजधर्म आहे. कळत-नकळत ते गायला सुरुवात करत असत. त्यांच्या प्रत्येक रचनेत, विचारांत संगीत भरलेले आहे. त्यांचा प्रत्येक शब्द, सूर, श्वास, संगीतमय आहे. ते स्वत: महान संगीततज्ञ, गायक व कवी होते. समर्थांची निरीक्षणशक्ती, आकलनशक्ती व त्यांची प्रतिभा अतिशय उच्च दर्जाची होती. समर्थांचे सर्व रागदारी उल्लेख त्यांना असलेल्या संगीतकलेबद्दलचे प्रेम, नादब्रह्माचे प्रेम दर्शवितात. संगीताद्वारे मिळणारे समाधान, आनंद व त्याद्वारे साध्य होणारे ईश्वर दर्शन, त्याची कृपा हे फायदे परातत्त्वाला स्पर्श करणारे ठरतात. समर्थांचे अंतरमन हे नेहमी सूरात रंगलेले दिसते. त्यांच्या मनातील तंबोऱ्याच्या तारा सतत झंकारत असल्या पाहिजेत. सप्तस्वरांचे संगीत त्यांच्या मनात रुंजी घालत असलेच पाहिजे. अस्थिरतेच्या काळात त्यांनी मनाची स्थिरता संगीतामुळेच प्राप्त केली असावी असे वाटते.

*पुण्य परायण सुंदर गायन । विसरवी देहभावा ।।*

संगीतकलेमुळे माणसाला पुण्यच प्राप्त होते. अशा प्रकारच्या पुण्याची प्राप्ती करून देणारे सुंदर सुरेल गायन देहभान विसरून टाकते. गाणाराही स्वत: देहभान विसरून जातो व श्रोतेही स्वत: देहभान विसरून जातात. याचा अनुभव गायकाला तर येतोच पण श्रोत्यांनादेखील येतो. संगीतकलेचे हे सामर्थ्य वर्तमानकाळातही प्रत्ययाला येते.

गायन हे सर्वांना वश करून घेण्याचे एक मोठे साधन आहे, हे समर्थ जाणत होते. कीर्तन हेच समर्थांच्या विचारांचे, प्रचाराचे मुख्य साधन होते. ते जेथे जेथे जात तेथे त्यांचे कीर्तन व्हायचेच. त्यांचे बोलणे आकर्षक व गाणे सुमधुर होते. त्यांच्या कीर्तनाला त्यामुळे अलोट गर्दी जमत असे. लोक त्यांच्या विचारांनी व गायनाने प्रभावित होत असत. त्यांचा आवाज मधुर, खडा, पहाडी, पल्लेदार व घुमारदार होता असे म्हणतात. हा आवाज कसा असेल असा जेव्हा मी विचार करतो, तेव्हा जाणवते की बहुधा तो संगीतोद्धारक स्व. पंडित विष्णू दिगंबर पलुस्करांसारखा असावा. तो आवाजही मी ऐकलेला नाही. परंतु त्यांच्या आवाजाबद्दल बरेच काही ऐकायला मिळते. त्यांचा आवाज मोठा, पल्लेदार, सुरेल होता असे वाचण्यात आले आहे. मोठ्या गर्दीतही त्यांनी आपल्या आवाजाने लोकांना आटोक्यात आणले होते, असे त्यांच्या चरित्रातून समजते. वर्तमानकाळात आपण सर्वांनी असा पल्लेदार, मोठा, घुमारदार आवाज ऐकलेला आहे. तो बुलंद आवाज भारतरत्न कै. पंडित भीमसेन जोशी यांचा. कदाचित समर्थांचा आवाज पंडित भीमसेन जोशींसारखा असावा. आपल्या सर्वांना हा विचार पटावयास हरकत नाही. समर्थांनी शिष्यांना संगीत शिकवले. समर्थांचे सर्वच शिष्य उत्तम गायक, कीर्तनकार व संगीततज्ञ होते असे त्यांच्या लिखाणातून दिसून येते.

*कोमल वाचा दे रे राम । विमळ करणी दे रे राम ।*
*संगीत गायन दे रे राम । आलाप गोडी दे रे राम ।*
*दस्तक टाळी दे रे राम । नृत्य कळा मज दे रे राम ।*

श्री समर्थांचे गुरू प्रत्यक्ष प्रभू रामचंद्र, जे संगीततज्ञ होते असे रामायणात दाखले सापडतात. अशा गुरूकडे किती आर्जवाने, विनम्र भावाने ते आपले मागणे मागताना दिसतात. काहीही मागायचे असेल तर ते आपल्या आराध्य दैवताकडे म्हणजे प्रभू रामचंद्रांकडे मागत. मनाच्या व्यथा ते रामाला सांगत असत. आपले मन ते रामाजवळ मोकळे करत असत. आपली आवडती संगीतकला रामाने द्यावी, अशी ते विनंती करीत आहेत. गायनकलेत असलेले आलाप गोड गाता यावेत । असे ते म्हणत आहेत. स्वरांत पुरेपूर गोडवा असावा, असे त्यांना वाटते. गाणे

परिपूर्ण होण्यासाठी तालज्ञान असावे हे माहीत असल्यामुळे ते 'दस्तक टाळी दे रे राम' असे म्हणतात. समर्थ रामाकडे नृत्यकलासुद्धा मागतात. नृत्यकलेमुळे हावभाव, हातवारे संयमित होतात. गायकाच्या चेहऱ्यावर त्याच्या मनातील भाव व्यक्त होतात. सूरांच्या व गीताच्या भावना गायकाच्या चेहऱ्यावर प्रगट होतात. त्या भावना पाहाण्यात श्रोत्यांना देखील आनंद मिळतो. समर्थ उत्तम कीर्तनकार होते. कीर्तन करताना नृत्यकलेमुळे पदन्यास कसा करावा, पावले कशी टाकावीत हे समजून येते. कीर्तनकाराला या सर्व गोष्टी अवश्य आल्या पाहिजेत. कीर्तन करता करता कीर्तनकार इतके रंगून जातात की, ते नृत्यही करू लागतात आणि ईश्वराच्या नामगर्जनेत श्रोतेही रंगून नृत्य करू लागतात. कीर्तनकाराची वाचा कोमल असावी, असे समर्थांना वाटते. त्यामुळे ते कोमल वाचा मागतात. त्याचबरोबर वागणे चांगले असावे, असे त्यांना वाटते. माणसाची करणी म्हणजे वर्तन, काम, व्यवहार हा चांगला असावा. चांगले वागण्याची, काम करण्याची बुद्धी लाभावी, असे समर्थांचे रामापाशी मागणे आहे. कुठलेही काम ईश्वरी कृपेशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. समर्थ जरी कुठलेही काम करावयास 'समर्थ' असले तरीही त्यांनी 'सत्कार्याचीच' मागणी केली आहे. समर्थांसारख्या संगीततज्ज्ञाला, सत्पुरुषाला, कीर्तनकाराला अशा मागणीची गरज काय? मला असे वाटते की, समर्थ ही शिकवण सर्वांना या निमित्ताने देत आहेत. इतरांनी परमेश्वराकडे अशाच प्रकारचे मागणे मागावे. विशेषत: संगीतक्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीने या मागण्याचा पाठपुरावा करावा. हे वरदान मागून घ्यावे. म्हणजे त्यांचे सांगितिक जीवन यशस्वी व समृद्ध होईल. जीवनात परमेश्वर सतत पाठिशी राहील. त्याची कृपा लाभेल. जीवनात सुरेलपणा येईल व इतरांनाही सुरेल करता येईल. यासाठी हे वरदान मिळविणे महत्त्वाचे वाटते. अध:पतनापासून वाचण्यासाठी असे वरदान संरक्षणकवच ठरते. परमेश्वर निश्चितच गायकांना अभय वचन देईल. कारण संगीतकला व संगीत कलाकार त्याला अतिशय प्रिय आहेत.

*राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तद्नंतरे ॥*

मानवी जीवनातील एकूणच व्यवहारात दुसऱ्यांची मने जाणून घेणे, राखणे आवश्यक असते. आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या व्यक्तींशी आपले वागणे, बोलणे चांगले असावे. दुसऱ्या व्यक्तीला आपल्या वागण्यामुळे, बोलण्यामुळे ठेच तर लागणार नाही ना? त्याचे मन दुखावले जाणार नाही ना? याचा विचार करून आपले बोलणे, वागणे असावे. आपल्या वागण्यामुळे, बोलण्यामुळे आपण जास्तीत जास्त माणसे जोडावयास हवीत. शत्रू निर्माण करू नयेत. अपशब्दांमुळे माणसे दुखावली, दुरावली जातात. तेव्हा संयमपूर्वक इतरांना न दुखावता आपले वागणे असावे, म्हणजे सर्व लोक आपल्याला अनुकूल होतील. हीच गोष्ट संगीतासाठी लागू आहे. गायकाचे संबंध समाजातील सर्व थरांतील लोकांशी चांगले असावेत. गायक हा प्रथम मनुष्य आहे व नंतर कलाकार. त्यामुळे त्याचे वागणे, बोलणे इतरांना त्रासदायक ठरू नये. गायकाला जे कार्यक्रम मिळतात ते त्याच्या दर्जेदार गायनाबरोबरच त्याच्या सर्वांबरोबर असलेल्या मैत्रीपूर्ण संबंधामुळे मिळतात. त्याचे जर संबंध ठीक नसतील, त्याचे वागणे ठीक नसेल तर त्याला हवे तसे कार्यक्रम मिळणार नाहीत. प्रत्येक गायकाचा चाहता वर्ग असतो. तो अधिकाधिक कसा वाढत जाईल, याचा प्रयत्न करावा लागतो. तो जितका जास्त तितका त्याचा 'उदोउदो' होतो. अशा संपर्कातूनच गायकाचे भाग्य उदयाला येऊ लागते. हा एक मूल्यवान सल्ला श्री समर्थ रामदासांनी गायक मंडळींना देऊन ठेवला आहे. वर्तमानकाळातील गायक मंडळींकडे पाहिल्यानंतर आपल्याला समर्थांनी सांगितलेल्या या उपदेशाचा अनुभव येऊ शकतो. ज्याचा संपर्क जास्त व चांगला, त्याला भरपूर कार्यक्रम मिळतात व इतरांना कमी, हे याचेच दर्शक आहे. म्हणून जास्तीत जास्त लोकांचे मन आपल्याला राखता आले पाहिजे. ते

अधिक फायद्याचे व यशप्राप्तीचे ठरेल, ही गोष्ट सर्वांनाच मान्य होण्यासारखी आहे. श्रोत्यांचे, लोकांचे, रसिकांचे मन ज्याला राखता आले, त्याचे भाग्य उजळलेच असे समजावे. समर्थ हेच सांगत आहेत म्हणून लोकांना सांभाळणे गरजेचे ठरते.

समर्थ रामदासांनी संगीतकलेविषयी अतिशय बारकाईने अभ्यास करून आपले विचार मांडले आहेत. संगीतातील प्रबंध गायन, धृपद गायन, मुर्च्छना, गमक, स्वरस्थाने, गुरू कसा असावा, शिष्य कसा असावा वगैरे कितीतरी गोष्टींविषयी समर्थांनी आपले चिंतन प्रगट केले आहे. 'चिंता करितो विश्वाची' असे म्हणणारे समर्थ रामदास यांनी संगीतकलेची सुद्धा चिंता केली आहे. समर्थकालीन संगीत व आजचे संगीत यांत निश्चितच फरक पडलेला आहे. तरीही समर्थांचे संगीतविषयक चिंतन आजच्या घटकेला, वर्तमानकाळातच नव्हे तर भविष्यकाळातही उपयुक्त ठरणारे आहे, असे त्यांचे विचार अभ्यासलेल्या व्यक्तीला वाटल्याशिवाय राहाणार नाहीत.

*दास म्हणे रे आवडी माझी ।*
*जाणती संगीत गाणे रे ॥*

संगीतकलेत दिव्य व अलौकिक शक्ती आहे. हे समर्थांसारख्या महापुरुषाने जाणले होते. संगीतामुळे निर्माण होणारी ऋजुता, रसिकता, संवेदनक्षमता, त्याचा होणारा दीर्घकाळाचा श्रोत्यांवरील परिणाम याविषयी त्यांना पूर्ण कल्पना होती. संगीतामुळे संस्कृतीचे रक्षण, संवर्धन व पोषण होते, हे त्यांना माहीत होते. संगीतमय वातावरणामुळेच माणसाचे जीवन धन्य होते. भारतीय संगीत ईश्वराची प्रार्थना करण्यासाठी, त्याचे गुणगान करण्यासाठी निर्माण झाले आहे, असे आपण मानतो आणि ही कला आध्यात्मिक विचारांच्या बैठकीवर आहे, असेही मानतो. माणसाच्या विचाराला आध्यात्मिक विचार, चिंतनाची बैठक असेल तर तो विचार चिरकाल टिकणारा असतो. संतांचे विचार यामुळेच शतकानुशतके, युगानुयुगे टिकून आहेत. भारतीय रागदारी संगीतकला जी टिकून आहे त्याचे कारणही हेच आहे. ज्या नादावर संगीतकला अवलंबून आहे, ती संगीतकला समर्थ रामदास प्रचीतीपूर्वक जाणतात. त्यांचे बोलणे, वागणे, लिहिणे सर्व अनुभवांतून उतरलेले आहे. संगीतामध्ये जे उत्तम, उदात्त, उन्नत आहे त्यांचा समर्थांनी अंगीकार केला आहे व ते आपल्याला उपलब्ध करून दिले आहे. संगीतात श्रवण, मनन, चिंतन यांना किती महत्त्व आहे हे त्यांनी स्पष्ट केले आहे. संगीताच्या संदर्भातील समर्थांचे विचार सहजपणे, गंमत म्हणून वाचण्यासाठी नाहीत. गांभीर्याने त्यांचा विचार समजून घेणे गरजेचे आहे. समर्थ समजण्यास तसे अवघड आहेत. परंतु त्यांचे विचार, त्यांच्या बंदिशी आजही संगीततज्ज्ञांनी व कलाकारांनी अनुसरण्यासारखे आहेत. त्यांचा सर्वसमोशक अभ्यास, कार्याची व्याप्ती, विषयांची अभिव्यक्ती हे सर्व आश्चर्यकारकच आहे. असे बहुढंगी, बहुश्रुत व्यक्तिमत्त्व क्वचितच बघावयास मिळते. अनेक विषयांचे त्यांना असलेले ज्ञान पाहून मन थक्क होते. मती गुंग होते. समर्थांना हे कसे काय जमले असेल?

संगीतकलेची ध्यनता गाणाऱ्या श्री समर्थ रामदासांच्या संगीतकार्याचा, संगीतचिंतनाचा शोध घेताना कोणत्याही जाणकार व्यक्तीचे मन भारावून जाते. आदराने मस्तक झुकते. त्यांच्या विद्वत्तेने मिळालेले संगीत मार्गदर्शन, संगीतक्षेत्रात काम करणाऱ्या असंख्य कलाकारांना, संगीततज्ज्ञांना, संगीत शिक्षकांना, अभ्यासकांना सतत प्रेरणा देत राहील हे निर्विवाद. समर्थांनी मनाचे श्लोक रचलेत. त्याप्रकारचा एक श्लोक मला सुचला. तो समर्थ सेवेत रुजू करतो आहे. त्यातून संगीतज्ञान, अभ्यासातून सूरप्राप्ती व ईश्वराची प्रसन्नता, दर्शनप्राप्ती होते.

*मना रे मना जाण संगीत ज्ञाना*
*अभ्यासाविना सूर तो आकळेना ।*
*श्लोकात पाहि मना तू सुराला*
*होईल प्रसन्न मग तो प्रभु राम राणा ॥*

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

# देवांचे दासबोधसंपादन कार्य

**डॉ. मुकुन्द नागेश देशपांडे**
*नवीवस्ती 'नागेश: मोताळा जिल्हा: बुलडाणा भ्रमणध्वनी ९३७२६९५९४७*

श्री समर्थसाहित्याचे मुद्रण इ.स. १८६० पासून सुरू झाले. या काळात दासबोधाच्या हस्तलिखित प्रती उपलब्ध झाल्या. ह.भ.प.ल.रा. पांगारकरांनी त्या सर्व हस्तलिखितांची पाहणी केली. परंतु शककालनोंद, प्रतलेखक यांचा उल्लेख नसल्यामुळे त्या प्रती निकालात काढल्या. एकोणिसाव्या शतकाचा मध्य म्हणजे अभ्यासकांच्या प्रेरणादायी अशा अतुलनीय कार्यकर्तृत्वाचा कालखंड आहे. यात वासुदेवराव केळकर, लो. टिळक यांसारख्या अधिकारी अभ्यासक व सत्पुरुषांचा समावेश आहे. वासुदेवशास्त्री यांनी मयेकर दप्तराचे घडवलेले दर्शन, बखर वाङ्मयाचे संपादन, डॉ. केतकरकृत कोशनिर्मिती, राजवाडेलिखित 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' हा शोधग्रंथ व गो. स. सरदेसाईकृत रियासती ही या काळातली संशोधन व संपादन क्षेत्रातली कामगिरी आहे.

नेमक्या याचवेळी समर्थभक्त शंकर श्रीकृष्ण देवांनी समर्थवाङ्मय संपादन व संशोधनाचे कार्य हाती घेतले. या चैतन्यदायी वातावरणाचा ठसा देवांच्या मनावर उमटला. श्रीमत् दासबोध संपादित करण्यापूर्वी माडगावकर, तेंडूलकर, गोंधळेकर, दातार व भट यांनीही दासबोधाची संपादणी प्रसिद्ध केली; परंतु त्यांनी स्वतंत्रपणे दासबोध संपादित केला नाही. श्री समर्थांचे समग्र वाङ्मय संपादित करून त्यात दासबोधाचा समावेश केला. माडगावकर संपादणीतील दासबोधादी रचनांचे आधारस्रोत डोमगाव परंपरेतील असले तरी माडगावकरांनी समर्थकृत रचनांचा पद्धतशीर शोध घेतला नाही, असा राजवाडेंचा त्यांचेवर आक्षेप आहे. माडगावकरांनंतर गंगाधर गोविंद गोंधळेकर यांची सटीप दासबोध संपादणी प्रसिद्ध झाली. गोंधळेकरांचे वैशिष्ट्य हे की, त्यांनी हस्तलिखितांची दखल घेऊन पाठसंहिता अध्ययनाला प्रारंभ केला. परंतु गोंधळेकरांच्या संपादणीत अपपाठ व अशुद्ध टीपा आहेत, असे राजवाडे म्हणतात. इ.स. १९१६ पर्यंत 'श्री समर्थ रामदासांचे समग्र ग्रंथ' या स्वरूपात दासबोधाची संपादणी झाली.

या पार्श्वभूमीवर देवांच्या दासबोधसंपादणीचे कार्य अपूर्व व वैशिष्ट्यपूर्ण ठरते. 'श्रीमत् दासबोध' संपादित करण्यापूर्वी देवांनी 'ग्रंथमाला' मासिकातील इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचा 'रामदास' विषयावरील लेख वाचला. देवांच्या समर्थवाङ्मय संपादन व संशोधनाचे बीज राजवाडेलिखित 'रामदास' लेखात आहे.

देवांनी इ.स. १९०५ मध्ये संपादनकार्यास सुरुवात केली तेव्हा ज. वा. मोडक व ओक प्राचीन ग्रंथाच्या संपादनाचे कार्य करीत होते. दोन-तीन हस्तलिखिते गोळा करणे, त्यानंतर त्यांची तुलना ग्रंथाचा संहितापाठ प्रस्थापित करणे अशी त्यांची संपादनपद्धती होती. याच

काळात वि. का. राजवाडे पुढे आले. ग्रंथसंपादणीची एक पद्धतीच राजवाडे यांनी घालून दिली. ती अशी की, प्राचीन ग्रंथांचे संपादन करीत असताना ग्रंथकाराच्या काळातील व सहवासातील व्यक्तीने लिहिलेल्या प्रतीचा शोध घेऊन संपादणी करावी असे त्यांचे धोरण होते. पांगारकरांनीही राजवाडे पद्धतीचे अनुसरण केले. तीच गोष्ट शंकर श्रीकृष्ण देवांची. देवांची दासबोध संपादणी प्रसिद्ध होण्यापूर्वी दासबोधाच्या ज्या संपादणी प्रसिद्ध झाल्या त्यात अनेक दोष व चुका असल्याचे राजवाडेंनी प्रतिपादन केले. म्हणूनच दासबोधाची शुद्ध व अत्रुटित आवृत्ती प्रसिद्ध करण्याची आवश्यकता देवांना वाटली. त्यामुळे अशा प्रतीचा शोध घेण्यास देवांनी सुरुवात केली. राजवाडेंनी प्रतिपादन केल्याप्रमाणे ग्रंथकारांच्या सहवासात असलेल्या व्यक्तीने लिहून काढलेल्या प्रतीचा शोध अखेर त्यांना लागलाच.

ग्रंथकाराच्या सहवासात लिहिली गेलेली प्रत समर्थस्थापित डोमगाव मठात असल्याचे देवांना समजले. डोमगाव मठातील प्रत अस्सल असल्यामुळे त्यांनी ती प्रत संपादित करावयाचे ठरविले. यासाठी त्यांनी चाफळ मठाचे महंत बापूसाहेब यांचे पत्र मिळवले. ते पत्र घेऊन देव डोमगावला गेले. देवांनी आणलेले पत्र पाहून बापूसाहेबांनी मूळ प्रतीची नक्कलप्रत त्यांना दिली. बापूसाहेबांनी दिलेल्या नक्कल प्रतीवरून दुसरी आणखी एक प्रत सत्कार्योत्तेजक सभेने तयार केली. ही प्रत घेऊन देव, पांगारकर व गो. का. चांदोरकर डोमगावला गेले व त्यांनी ती प्रत मठातील मूळ प्रतीशी ताडून पाहिली. त्यानंतर शके १८२७ मध्ये देवांनी आपल्या संपादित दासबोधाची प्रथमावृत्ती प्रसिद्ध केली. 'श्री समर्थांच्या मुखातून निघालेला एकही शब्द बदलता कामा नये' असे देवांचे धोरण होते. आपल्या संपादणीत त्यांनी तळटीपा दिल्या. संपादणीतील लेखनपद्धती, शब्दसंपदा व लकबी श्री समर्थांच्या भाषेनुसार पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. म्हणूनच कल्याणप्रतीची पुन्हा त्यांनी पाहणी केली. तिचे संस्करण केले. दुरुस्त्या केल्या. या दुरुस्त्यांना देव 'शोध' अशी संज्ञा देतात. हे शोध त्यांनी तळटीपांमध्ये दिलेले आहेत. ग्रंथकाराच्या ग्रंथात बदल करण्याचा आपल्याला अधिकार नाही. दासबोधाचा मूळ अस्सल संहितापाठ सादर करणे ही देवांची धडपड होती.

तरीही प्रथमावृत्ती सादर करून देवांचे समाधान झाले नाही. त्यामुळे शके १८२९ मध्ये त्यांनी दासबोधाची दुसरी आवृत्ती काढली. दुसऱ्या आवृत्तीत त्यांनी बदल केला नाही. 'मूळ ग्रंथ जसाच्या तसा छापला' असे देवांचे म्हणणे आहे. कठीण स्थळांचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी आणखी काही टीपा देणे त्यांना आवश्यक वाटले. या दुसऱ्या आवृत्तीचे एक वैशिष्ट्य आहे. ते वैशिष्ट्य म्हणजे विषयसूची. निबंधलेखक, व्याख्याते, शिक्षक इत्यादींसाठी विषय सूचीचा विशेष उपयोग होतो.

शके १८३२ मध्ये देवांच्या दासबोध संपादणीची तिसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली. यावेळी कल्याणप्रतीतील प्रत्येक चरण, इतकेच नव्हे तर, अक्षर अन् अक्षर ताडून, तपासून पाहाण्यात आले. तिसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत देव म्हणतात :

'या आवृत्तीच्या वेळी पोथीतील प्रत्येक चरण-नव्हे प्रत्येक अक्षर मी स्वत: तपासून पाहिले आहे. ग्रंथ छापत असता प्रत्येक तक्ता यंत्रावर पडण्यापूर्वी मी शोधून पाहिला आहे.''

तिसरी आवृत्ती संपादित करताना कल्याणपरंपरेतील चार हस्तलिखित प्रती देवांना उपलब्ध झाल्या. या चारही प्रती कल्याणशिष्यांच्या आहेत. कल्याणशिष्यांनीही दासबोधप्रतीचे लेखन कल्याणप्रतीच्या आधारे केले किंवा नाही, अशी कल्पना देवांच्या मनात चमकून गेली. ही सर्व मंडळी कल्याणपरंपरेतील असल्यामुळे त्यांच्या प्रतीचा संहितापाठ डोमगाव मूळ पाठाशी सुसंवादी असावा. म्हणूनच या चारही प्रतींची दखल देवांनी घेतली. त्यानंतरच

त्यांची तिसरी आवृत्ती प्रसिद्ध झालेली आहे. परंतु कल्याणशिष्य लिखित प्रतीमधील पाठ त्यांनी स्वीकारलेले दिसत नाही. यामागे कल्याणस्वामींचा मूळ पाठ जसाच्या तसा देणे हाच हेतू होता. कल्याणपरंपरेतील चार हस्तलिखित प्रती पुढीलप्रमाणे आहेत:-

(१) शके १६१५ कल्याणस्वामी शिष्य जयरामकृत

(२) शके १६१६ कल्याणशिष्य केशवस्वामीकृत

(३) शके १६२० कल्याणशिष्य मुद्‌गलस्वामीकृत

(४) शके १६२४ उंब्रजमठातील प्रत

वरील चारही प्रतींची मीमांसा देवांनी तिसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत केली आहे. समाप्तिलेख, अक्षरांचे वळण, संवत्सर, रचनाशक या मुद्द्यांना विशेष महत्त्व देण्यात आलेले आहे. तिसऱ्या आवृत्तीत पाठभेदांची यादीही आहे. हे सर्व पाठभेद हस्तलिखितातून उद्‌धृत केलेले आहेत. नमुन्यादाखल काही पाठभेद याप्रमाणे.

| दशक | समास | ओवी | |
|---|---|---|---|
| १ | ६ | ३ | 'अर्थावृताचे' असे चारही प्रतीत आहे. |
| १ | ७ | १७ | 'पदत्रासकर्तें' चारही प्रतीत |
| २ | १ | २७ | 'तोंड' उंब्रजमुद्‌गल प्रतीत |
| | | | 'तोड' बाकीच्या दोन्ही प्रतींत |

देवसंपादित दासबोध सटीप आहे, हे सर्वाविदीतच आहे. अस्सल संहितेप्रमाणेच ओव्यांच्या अर्थविवरणाचीही दखल त्यांनी घेतली. दासबोधातील जवळजवळ २७१ पेक्षा जास्त स्थळे देवांना अर्थदृष्ट्या दखलपात्र वाटतात. तळटीपांमध्ये या ओव्यांचे दोन-दोन, तीन-तीन अर्थ देण्यात आलेले आहेत. या ओव्या बहुअर्थक असल्याची भूमिका देव घेतात. देवांना बहुअर्थक वाटलेली स्थळे पुढीलप्रमाणे :

| दशक | समास | ओवी | |
|---|---|---|---|
| ४ | ४ | १३ | मार्ग होये परी अंतरिक्ष । |
| | | | जेथे सर्वही पूर्वपक्ष |
| ७ | २ | ५८ | माया बहुरूपी बहुरंग । |
| | | | माया ईश्वराचा संग । |
| ९ | ५ | २२ | येथे न बोलता जाणावे । |
| | | | बोलणे विवेका आणावे ।। |
| | | | आंधळे पाउली वोळखावे । |
| | | | विचक्षणे ।। |
| ६ | ७ | २८ | वस्तुभजन करीना । |
| | | | न करी ऐसोहि म्हणेना । |
| १२ | ५ | ८ | उन्मेष पराध्वनिपश्यंती । |
| | | | नाद मध्यमा शब्द चौथी । |

शुद्ध संहितापाठाप्रमाणेच देवांनी दासबोधातील दुर्गम स्थळांचीही दखल घेतली, हे वरील बहुअर्थक ओव्यांच्या उल्लेखावरून स्पष्ट होते. आत्मारामबुवा एक्केहळ्ळीकरांनी 'दासविश्रामधाम' ग्रंथात दासबोधातील दुर्गम स्थळांचा उलगडा केलेला आहे. अशा कूट ओव्यांचा अर्थ विशद करण्याचे जे धोरण आत्मारामबुवांसारख्या संप्रदायाच्या प्रमाणपुरुषांनी स्वीकारले त्याचेच अनुसरण देवांनी केल्याचे दिसून येते. दासबोधाच्या तिसऱ्या आवृत्तीत अर्थनिर्णायक तळटीपांची केलेली वाढ देवांच्या एतद्‌विषयक धोरणाची यथार्थताच सिद्ध करते. याबाबतीत श्रीधरपंत परांजपे यांचे शिष्य श्री रामानुज यांचीही त्यांना मदत झाली. त्यांनी काही कठीण ओव्यांचा अर्थ विशद करणारे टिपण उपलब्ध करून दिले. तिसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत यासंबंधीचा जो खुलासा आढळतो तो असा:

''श्री श्रीधरपंत परांजपे यांचे शिष्य श्री रामानुज यांस

विनंती केल्यावरून त्यांनी काही कठीण शब्दांचे व ओव्यांचे अर्थासह एक टिपण काळजीपूर्वक करून पाठविले होते. त्याचा पुष्कळ उपयोग झाला.''

सार्थ दासबोधसंपादणीचे पहिले संपादक महाराष्ट्रभाषा चित्रमयूर केरळकोकिळ कृ. ना. आठल्ये यांनाही दशक १५ समास ६ पहिल्या सहा ओव्या गूढ वाटल्या. 'पाच सप्तकोडी' या शब्दात अशा रचनांचे वर्णन कृ. ना.

आठल्ये करतात. के. ग. आठलेंचा उद्देश तर दासबोधातील कूटस्थळांची उकल करणे हाच आहे. म्हणूनच ते आपल्या संपादित ग्रंथाला 'गूढार्थदीपिका' असे नाव देतात.

धुळे येथील समर्थवाग्देवता मंदिरातील १५८ क्रमांकाच्या बाडात द.१५, स.६ 'पीतापासून कृष्ण जाले' या ओवीचा उल्लेख कूटरचना म्हणून करण्यात आलेला आहे. ही पोथी आकाराने प्रचंड असून, डोमगावी 'पोथा' नावाने तिची ख्याती आहे. या पोथ्यांतील हस्ताक्षर बेकाजी नारायण रंगमहाली या प्रतलेखकाचे आहे. यात वरील ओवीचा अर्थ सादर केलेला आहे. यावरून ही गोष्ट सिद्ध होते की, दासबोधअर्थ विवरणाला प्राचीन परंपरा आहे. प्रस्तुत बाडातील या स्थळाची जाणीव नानासाहेब देवांना निश्चित असली पाहिजे. देवांच्या शोधक नजरेतून अशी स्थळे सुटणे केवळ अशक्य वाटते. देवसंपादित दासबोधातील अर्थनिर्णायक टीपा लक्षात घेतल्या तर असे म्हणावेसे वाटते की, दासबोधाच्या अर्थविवरणाच्या परंपरेची दखल त्यांनी विलक्षण गांभीर्याने व जाणीवपूर्वक घेतलेली आहे. अशा प्रकारच्या गूढ रचनांचे वर्णन देवही 'कोडी' या शब्दात करतात. विशेषत: तिसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत अशा ओव्यांचा उल्लेख आहे. द.१५, स.६ मधील आरंभीच्या सहा ओव्या देवांनाही गूढ वाटतात. यासंबंधी देव म्हणतात :

'श्री दासबोधात तीन-चार जी कोडी आली आहेत. त्यांचा अर्थ परंपरेने श्रवण केलेल्या आत्माराम महाराजांनी 'धामात' दिला आहे. तो या आवृत्तीत त्या त्या ठिकाणी टीपात उतरून घेतला आहे.''

दासबोधाचा शुद्ध संहितापाठ व अर्थ विवरण याबाबतीत देव किती दक्ष, जागरूक व सापेक्षी होते, हे दिसून येते. प्रस्तुत संपादणीच्या एकूण ११ आवृत्त्या प्रकाशित झाल्या. त्यापैकी शके १८२७ पासून ते शके १८७९ पर्यंतच्या आवृत्त्यांत एकवाक्यता आढळते. वरील विवेचनावरून हेच स्पष्ट होते की, समर्थभक्त देवांनी दासबोधाचे संपादन मूळ संहिता, पाठ शककालनोंद या संहिताविषयक पैलूंना प्राधान्य व महत्त्व प्रदान करून केलेले आहे. यात कल्याणपाठच त्यांना अधिकृत वाटतो. कल्याणप्रत ही संहिताप्रकारांपैकी अधिकृत व प्रमाणसंहिता आहे. राजवाडेपद्धतीप्रमाणे ही संहिता समर्थांच्या शिष्यपरंपरेतून उपलब्ध झाली. श्री. समर्थांच्या अनेक शिष्यांपैकी कल्याणस्वामी समर्थांचे केवळ शिष्यच नव्हते, तर प्रतलेखकही होते. श्रीदासबोधाचे लेखनकार्य कल्याणांनी शिवथरघळीत केले अशी पारंपरिक समजूत आहे. परंपरेत तसे उल्लेख आहेत. समर्थांचा कवितासमुद्र कल्याण लिहीत असा उल्लेख समर्थांच्याच अनंत नामक शिष्याने आपल्या रचनेत केलेला आहे. शिष्यपरंपरेतून उपलब्ध झालेली प्रत स्वीकारून देवांनी दासबोधसंपादणी केली. पाठ-अपपाठांची चिकित्सा केली. त्यासाठी परंपरेतील केशवस्वामीसारख्या शिष्यांनी लिहिलेल्या प्रतींचा साक्षेपाने परामर्श घेतला.

तरीही कल्याणप्रतींच्या अभ्यासकांचे समाधान झाले नाही. 'कल्याणलिखित दासबोध हा मूळ दासबोध' या देवांच्या प्रतिपादनाला पहिले आव्हान ल. रा. पांगारकरांनी दिले. सहीशिक्का व शककाल नोंद असलेली दत्तात्रयस्वामींची प्रत त्यांनी प्रमाण मानली. डॉ. म.रा.जोशी शके १५८३ असा कालोल्लेख असलेली प्रत मिळाली व कल्याणप्रतीपेक्षाही शके १५८३ नोंद असलेली प्रत प्राचीन असल्याचे सिद्ध केले. सुप्रसिद्ध संशोधक डॉ. मु. श्री. कानडे यांचा मराठवाडा संशोधन मंडळाच्या १९७५ वार्षिकांकात 'दासबोधाची कल्याणलिखित प्रत' या शीर्षकाचा लेख प्रसिद्ध झाला. त्यात त्यांनी असा निष्कर्ष काढला की, दासबोधाची प्रत एकट्या कल्याणाची नसून, दशक व समासांचे लेखन अनेक शिष्यांकडून झाले होते. इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष देवही कल्याणप्रतीसंबंधात शंकाकुल झाले होते असे म्हणतात.

ते काहीही असले तरी देवांचे दासबोधसंपादणी

विषयक कार्य नजरेआड करता येत नाही. हस्तलिखित आधाराला घेऊन ग्रंथांचा मूळ संहितापाठ प्रस्थापित करीत पद्धतशीर व सशास्त्र ग्रंथ संपादणी करणे हे देवकार्य अभूतपूर्व आहे. गोंधळेकरांनी हस्तलिखित आधारास घेतलेले असले तरी माडगावकर संपादणीवर गोंधळेकर दासबोध संपादणी आधारलेली आहे. पुढे दातारांनी त्याला पद्धतशीर स्वरूप दिले. देवांनी तर पाठपाठांतराची चिकित्सा करीत मूळ संहितापाठ सिद्ध केला. या निमित्ताने दासबोधाच्या मूळ संहितापाठाचा प्रश्न ऐरणीवर आला.

तीच गोष्ट दासबोधओवीअर्थविवरणासंबंधी. २७१ पेक्षा अधिक ओव्यांना अर्थनिर्णायक टीपा देऊन दासबोधातील रचना अर्थदृष्ट्या किती महत्त्वपूर्ण आहे, हे देवांनी दाखवून दिले. दासबोधात अशी अनेक कूटस्थळे असून, ती अजूनही अस्पर्श आहेत. मला वाटते, नमुन्यादाखल काही रचनाबंधांवर तळटीपा देऊन दासबोधाच्या अभ्यासकांपुढे ओवीअर्थनिवारणाचे एक आव्हानच जणूकाही देवांनी उभे केलेले असावे. 'दासबोध सोपा वाटे ज्या नरा' हे संप्रदायातील प्रमाणपुरुषांचे वचन आजही आपल्याला अंतर्मुख करते. याचा अर्थच मुळी असा की, दासबोधातील - कूट म्हणा, प्रतीकात्मक म्हणा ओव्यांचे अर्थविवरण अभ्यासक व समर्थभक्तांनी करणे आवश्यक ठरते. या संदर्भात असा प्रश्न उपस्थित होतो की, देवांनी दासबोध सार्थरूपात संपादित का केला नाही? या प्रश्नाचे उत्तर असे की, समर्थस्थापित विविध मठातील कितीतरी हस्तलिखितांचा शोध, दासबोधाची मूळ संहिता या कार्याला बराच कालावधी लागल्यामुळे दासबोध सार्थ रूपात संपादित करणे त्यांना शक्य झाले नसावे. परंतु दासबोधाचा मूळ संहितापाठ व ओव्यांचे अर्थविवरण हे दोन प्रश्न देवांच्या समर्थवाङ्मय संपादन व संशोधनामुळे अभ्यासकांसमोर उपस्थित झाले, एवढे मात्र खरे.

सारांश, ग्रंथकाराला अभिप्रेत संहितापाठाचा शोध घेणे हा ग्रंथसंपादणीसंबंधीचा अत्यंत मोलाचा विचार - ही 'देवांचे देणे' आहे. म्हणूनच देवकार्य ऐतिहासिक आहे. हे कार्य त्यांनी अत्यंत साक्षेपाने, समर्थपणे व निष्ठेने केले. देवसंपादित सटीप दासबोध हा ग्रंथ संपादणीचा उत्तम आदर्श व वस्तुपाठ आहे. हस्तलिखितांची जाणीवपूर्वक दखल घेणारा संपादक हा संशोधक असावा, हे देवकृत समर्थवाङ्मयसंशोधनाचे सार आहे. याहीपुढे जाऊन असे म्हणावेसे वाटते की, देवांनी सटीप दासबोध संपादणीच्या रूपाने अभ्यासक व संशोधकांना एक विचारपीठ (School of Thought) उपलब्ध करून दिलेले आहे.

# दासबोधातील वेदांत

**डॉ. सौ. रजनी पतकी**
*४०१ इंदुप्रभा अपार्टमेंटस् प्लॉट नं ६,*
*कर्वेनगर. पुणे ४११०५२ फोन - ०२० २५४६०८१५*

दासबोध आणि आत्माराम हे ग्रंथ समर्थ रामदासांची वाङ्मयीन मूर्ती म्हणून प्रसिद्ध आहेत. या ग्रंथातून समर्थांचे व्यक्तित्व-वैचारिक बैठक, साधना, अभ्यास, भक्ती, ज्ञान, त्यांनी अनुभवलेला ईश्वराचा सगुण-निर्गुण साक्षात्कार, त्यांची ब्राह्मीस्थिती, संघटनाकौशल्य या अनेकांगांनी समजावून घेता येते. प्रस्तुत दोन ग्रंथांपैकी भाषा सुलभतेमुळे, दैनंदिन व्यवहार कुशलतेच्या मार्गदर्शनामुळे दासबोधाचा जनमानसावर खोलवर प्रभाव आहे. नवविधाभक्तीचे विविध आविष्कार, त्यास व्यवहार ज्ञानाची, चातुर्याची जोड, व्यक्तिमत्त्व विकासाची प्रभावी शिकवण या सर्वांची मांडणी समर्थांनी आत्मज्ञानाच्या दृढ पायावर केली आहे. ''ऐक ज्ञानाचे लक्षण । ज्ञान म्हणजे आत्मज्ञान । पहावे आपणास आपण । या नाव ज्ञान ।।'' (दास. ५.६.१) अशी पटकन् उलगडणारी आत्मज्ञानाची व्याख्या करून ''अरे जे झालेचि नाही । त्याची वार्ता पुससी कायी ।'' (दास. ८.३.१) असे म्हणून मायेच्या जगाचे दृश्य पुसून जिवाचे ब्रह्मत्व ज्ञात करून देण्याचे महत्त्वाचे कार्य समर्थांनी या ग्रंथात केले आहे. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हे ज्ञान त्यांनी एका वेगळ्या शैलीतून मांडले आहे. जड-चंचल-निश्चल असे त्रैत स्वीकारून अंतिमत: निश्चल तत्त्वात स्थिर कसे राहायचे याचे चिंतन त्यांनी केले आहे. समर्थांचा हा आगळ्या धाटणीने ब्रह्मज्ञान देऊन स्वरूपाप्रत नेणारा वेदान्त विचार समजावून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केला जात आहे. त्यासाठी प्रथम वेदान्त दर्शनाचा मागोवा घेणे उचित ठरेल.

### वेदांतदर्शन

वेदांतदर्शनास उत्तरमीमांसा, ब्रह्मसूत्र असेही म्हटले जाते. यामध्ये समन्वय, अविरोध, साधन व फलाध्याय असे चार अध्याय असून, या सर्वांतून ब्रह्म, ईश्वर, प्रकृति, जीवात्मा, पुनर्जन्म, मरणोत्तर अवस्था, कर्म, उपासना, ज्ञान बंध, मोक्ष यावर विवरण केले गेले आहे. समन्वय अध्यायात वेदांत वाक्याचा (उपनिषदातील वाक्यांचा) मूळ आशय प्रकट करून सर्व विचारांचा समन्वय केला आहे. अविरोध अध्यायात श्रुतींमधील परस्परविरोधी वाटणाऱ्या सिद्धांतांचा आशय सांगून अद्वैत प्रतिपादन केले असून, अवैदिक सिद्धांतातील त्रुटी दर्शविल्या आहेत. साधनाध्यायात जीवाला ब्रह्मलोकाची प्राप्ती होण्यासाठी ज्ञानाची आवश्यकता सांगितली आहे. चवथ्या अध्यायात जीवमुक्ती, परलोकगती इत्यादींचे विवेचन आहे.

वेदांतदर्शनात मुख्यत: ब्रह्मनिरूपण हा विषय आहे. यात शब्दप्रमाणाचे महत्त्व आहे. ''शास्त्रयोनित्वात्'' (१.१.३) या सूत्रातून याचे प्रतिपादन आहे. ब्रह्मसूत्रात जगताचे मूळ कारण ब्रह्म होय (निमित्त व उपादान

कारण), त्याची प्राप्ती करणे हा मनुष्यजन्माचा मुख्य हेतू आहे, याचे विवरण आहे. वेदांतदर्शनावर ज्या टीका लिहिल्या गेल्या आहेत त्यावरून अद्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैताद्वैत, द्वैत व शुद्धाद्वैत अशा पाच प्रमुख विचारधारा निर्माण झाल्या आहेत. या मतांचे प्रमुख आचार्य अनुक्रमे श्रीमत् शंकराचार्य (आद्य), श्रीमत् रामानुजाचार्य, श्रीमत् निम्बार्काचार्य, श्रीमत् मध्वाचार्य व श्रीमत् वल्लभाचार्य हे होत. श्रीमत् आदी शंकराचार्यांचा मायावाद अथवा विवर्तवाद सर्व प्रसिद्ध आहे. सामान्य जिवाला जग हे ब्रह्मस्वरूप न दिसता विविध नाम-रूपात्मक दिसते ते रज्जुसर्प न्यायाने होय. सत्यतत्त्वाचे ज्ञान झाल्यावर ब्रह्मस्वरूपच सर्वत्र प्रत्ययाला येते. अविद्या-माया संपते. जीव शुद्धस्वरूपात/आत्मस्वरूपात स्थित होतो; यास त्यांनी मुक्ती असे म्हटले आहे. श्रीमत् रामानुजाचार्यांच्या मते जीव व जड जगत् अर्थात् चित् व अचित् हे ब्रह्माप्रमाणेच नित्य व स्वतंत्र आहेत, ते ब्रह्माचेच अंश आहेत. श्रीमत् निम्बार्काचार्यांनी ब्रह्म व जीव यात एका बाजूने अभेद आहे, तर अन्य बाजूने भेद आहे; ईश्वर हा जिवाचा नियामक आहे, असे मत मांडले आहे. श्रीमत् मध्वाचार्यांच्या दृष्टीने ब्रह्म सत्य आहे तसेच जगतही सत्य आहे; परमात्मा स्वामी आहे व जीव त्याचा दास आहे. श्रीमत् वल्लभाचार्यांनी अद्वैतच प्रतिपादन केले आहे व माया मात्र स्वीकारली नाही; तर ब्रह्म हे केवळ शुद्धतत्त्व मानले आहे. ब्रह्मापासूनच जीव व जगत् प्रादुर्भूत होते आणि त्यातच ते लीन होते; असे ते मानतात.

ब्रह्म हे शब्दात वर्णन करता येत नाही. ते वाणी-मन अगोचर आहे. त्याची अनुभूती घेऊन जिवाला ब्रह्मस्वरूप होता येते. 'सच्चिदानंद' हे त्याचे स्वरूप असून ते एकमेव शाश्वत सत्य आहे. परमार्थप्राप्ती, मोक्ष म्हणजे हे सच्चिदानंदस्वरूप प्राप्त करणे हेच होय. असे अद्वैत तत्त्वज्ञान वेदांतदर्शनात दिसून येते; असे थोडक्यात म्हणता येईल.

महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम व समर्थ रामदास हे पाच प्रमुख संतश्रेष्ठ होऊन गेले. सर्वच संतांनी दर्शनशास्त्रांचा, त्यातील तत्त्वज्ञानाचा विचार केलेला दिसून येतो. ब्रह्म, प्रकृति, माया, जीव, जगत्, जड, चेतन, अज्ञान, ज्ञान, साधना, भक्ती इत्यादी शब्द व संकल्पना त्यांच्या वाङ्मयात दिसून येतात. समर्थ रामदासांनीही शिष्यांना सर्व शास्त्रग्रंथांची विशेषत: अद्वैत वेदांताची शिकवण दिलेली आहे. अर्थात् प्रत्येकाच्या प्रतिपादनाची शैली देश-काल, समाजस्थिती, राष्ट्रस्थिती, आर्थिक स्थिती व त्या समाजातील लोकांची मानसिकता यानुसार भिन्न-भिन्न असते. तद्वत शास्त्रातील रहस्य कुठल्या मर्यादेपर्यंत उलगडून दाखवायचे याचाही विचार त्यांनी तारतम्याने केलेला दिसतो. त्यामुळे समर्थांच्या दासबोधातील वेदांताचा विचार करताना समर्थकालीन देशस्थिती आपल्याला लक्षात घ्यावी लागते.

### समर्थकालीन देशस्थिती

समर्थांचा कार्यकाल इ.स. १७वे शतक (इ.स. १६०६ ते १६८२) हा होता. यावेळी पाच पातशाह्या महाराष्ट्राला घेरून होत्या. स्थानिक जनतेवर जुलूम जबरदस्ती होत होती. त्यांना नित्य-नैमित्तिक कर्मे करणे, व्यापार उदीम, शेती करणे अवघड झाले होते. त्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचे प्रयत्न चालविले होते. अशा वेळी समर्थांना, समाजामध्ये शारीरिक बलाची, मानसिक स्वास्थ्याची, संघटनेची, राजकीय स्थैर्यतेची गरज आहे, असे वाटणे नैसर्गिक होते. त्यानुसार त्यांनी बलशाली, बुद्धिमतां वरिष्ठं अशा हनुमंताची उपासना प्रसृत केली. त्यांचे दैवत असलेल्या प्रभु श्रीरामचंद्रांचा आदर्श लोकांसमोर ठेवला. रावणासारख्या दुष्प्रवृत्त सत्तांधांशी सामना करण्यासाठी त्यांना त्यांच्या सामर्थ्याची जाणीव करून देणे समर्थांना आवश्यक वाटले; संघटनेसाठी मठस्थापनेचीही जरुरी भासली. हे देशकार्य देवकार्य म्हणून त्यांनी अंगीकारले. लोकांना बलोपासना, ईश्वरोपासना याबरोबर देवकार्य म्हणून ज्ञानाची बैठक देणे त्यांना आवश्यक वाटले व त्यातून त्यांनी

दासबोधासारख्या समाजोन्मुख ग्रंथाची रचना करून लोकजागृतीचे महान कार्य केले; असे म्हणता येते. या सर्व पार्श्वभूमीवर त्यांनी दासबोधात जो वेदांत उपदेशिला त्याचा विचार आपणास करावयाचा आहे.

### दासबोधातील वेदांत

''मनास होय विश्रांति । समाधान'' (१.१.३७) व ''मनन कर्त्यास विशद । परमार्थ होतो ।'' (२०.१०.३१) या उपक्रम-उपसंहारामध्ये दासबोधातील शिष्यबोध विस्तारला आहे. दासबोधाची विषय विभागणी विद्वानांनी त्या-त्या दशकातील आशयानुसार केली आहे. तथापि वेदांताच्या अनुषंगाने पाहाता फक्त ''वेदान्त निरूपण'' अशा शीर्षकाचा संपूर्ण दशक जरी नसला तरी पहिल्या आठ दशकांत नवविधा भक्तीचे विविध पैलू उलगडताना समर्थांनी मायावादी वेदांताचा अद्वैत दृष्टीने सखोल विचार केला आहे. यद्यपि त्यांचे स्वत:चे तत्त्वज्ञान विशिष्ट पद्धतीने 'जगज्ज्योति' या दहाव्या दशकात त्यांनी विशद केले असले तरी त्याचा मूळ पाया वेदांत हा आहे. याचे कारण त्यांनी पहिल्या दशकाच्या सुरुवातीला दिले आहे. ते म्हणतात, वेगवेगळे ग्रंथ हे उपनिषद-वेदांतावर आधारित असतात; परंतु त्यात शास्त्रप्रचीतीसह आत्मप्रचीती येईल असे ज्ञान असते. दासबोधातही त्यांनी त्याचा अवलंब केला आहे. ''नाना ग्रंथांच्या संमती । उपनिषद वेदान्त श्रुती । आणि मुख्य आत्मप्रचीती । शास्त्रे सहित ।।'' (१.१.१५); असे म्हणून त्यांनी पुढे जे आधारग्रंथ दिले आहेत त्यात ''वेद आणि वेदान्त'' (१.१.१८) यांचाही उल्लेख केला आहे. समर्थांचा मुख्य भर उपासनेवर आहे; परंतु ''उपासना म्हणिजे ज्ञान । ज्ञाने पाविजे निरंजन । योगियांचे समाधान । येणे रिती ।।'' (२०.४.२२) असे म्हणून त्यांनी उपासना व ज्ञान यांचे एकत्रीकरण केले आहे. ''ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ।'' (५.६.१) हेही त्यांनी सांगितले आहे. आत्मज्ञान हा वेदांताचा मुख्य विषय असल्याने दासबोधात वेदांत विवेचन येणे स्वाभाविक आहे. समर्थांनी माया, ब्रह्म, मुक्ती यांचे निरूपण केले आहे. मायेचे निरूपण दशक ६ समास ३ व ५, दशक ११ समास ७ (चंचळ नदी रूपात माया), दशक १४ समास ९ (माया निरूपण), दशक १० समास ९ (प्रकृतिरूपात माया) इत्यादी ठिकाणी आले आहे. ब्रह्माचे निरूपण समर्थांनी ठिकठिकाणी केले आहे. दशक ६ समास २ व ४, दशक ७ समास २-३-४, दशक ९ समास १ व २, दशक ११ समास ८ (अंतरात्मा रूपात), दशक १३ समास ९, दशक १५ समास ३ व ४, दशक २० समास ४,६,७ व १० यामधील विशेष विवेचनाव्यतिरिक्त अन्यत्रही ब्रह्माचे उल्लेख दासबोधात आहेत. ब्रह्मज्ञानाचे शिक्षण देताना त्यांनी जे तत्त्वविवेचन केले आहे त्यासाठी त्यांनी सांख्यदर्शनाचा आधार घेतला आहे, असे दिसते. या सर्वांचा एकत्रित अभ्यास करून समर्थांनी मांडलेले वेदांत विचार जाणून घेण्याचा अल्प प्रयत्न पुढे केला जात आहे. माया निरूपण, ब्रह्म निरूपण व मुक्तीबाबत त्यांचे विचार या क्रमाने हा विषय जाणून घेता येईल.

### दासबोधातील माया निरूपण

वस्तुत: माया व ब्रह्म एकमेकांपासून वेगळे काढता येत नाही. ''अविनाश ते ब्रह्म निर्गुण । नासे ते माया सगुण । सगुण आणि निर्गुण । कालवले ।।'' अशी ही सरमिसळ आहे. सर्व जड वस्तू पाचभौतिक आहेत, त्यास आत्मा व्यापून आहे. मग आत्मस्थितीमध्ये माया कशी झाली तर, ''जैसी आकाशी वाहिली । झुळुक वायुची ।।'' परब्रह्मच केवळ सर्वत्र आहे पण चराचर होत जात राहाते. तत्त्व निरसन झाले की निर्गुणब्रह्मात ऐक्यता येते. ''आपला आपण शोध घेता । आपली तो मायिक वार्ता । तत्त्वांती उरले तत्त्वता । निर्गुण ब्रह्म ।।'' असा उलगडा समर्थ करतात. माया त्रिगुणात्मक आहे. त्यातून पंचमहाभूते व जड जगत् निर्माण झाले. त्यात चेतन (ब्रह्म) व्यापून आहे, म्हणून तत्त्वांचा विचार होणे आवश्यक आहे, (दास. ६. दशक ३), असे त्यांचे सांगणे आहे.

माया ही सगुण-साकार आहे, चंचल आहे, ब्रह्माची उपाधी आहे. माया भासते, आवडते, उपजते, मरते,

धरते, फुटते, तुटते, विटते, विकारी आहे. ती सर्व काही करणारी आहे, नाना रूपात्मक आहे, पाचभौतिक, अशाश्वत, लहान, असार, अलीकडची आहे. मायेने ब्रह्मस्थितीला आच्छादले आहे. माया प्रत्यक्ष आहे, स्थूलरूपात आहे, विषम, लक्ष्य, असत्, अल्प आहे. ज्ञानाने मायेचे निरसन होते. ब्रह्म याविरुद्ध आहे, ते सत्, शाश्वत, अनादि, अनंत, अरूप आहे. (दास. ६-द.५).

माया अचंचलात निर्माण झाली. ती नदीरूपात पाहाता अधोमुख वाहते आहे, अखंड आहे पण तिला कोणी पाहात नाही, तरीही त्यातच सर्व जगताचा व्यवहार सामावला आहे, त्यात सर्व वृत्तीही आहेत; मात्र वृत्तिशून्य झाल्यावर परब्रह्माची अनुभूती येते. (दास. ११.७)

मूळमाया । प्रकृति याविषयी समर्थ म्हणतात ''आकाशी वायु झाला निर्माण । तैसे ब्रह्मी मूळमाया जाण । (दास.१०.९.१). या वायूमध्ये त्रिगुण व पंचमहाभूते असतात. त्यात जाणीव असते. जाणिवेमध्ये संकल्प असतो पण ज्ञात्याला संकल्प नसतो, त्यास माया बाधत नाही. यासाठी आत्मज्ञान घ्यायला हवे. (१०.९.२२). हे सर्व समजण्यासाठी समर्थ वेदांतशास्त्रामधील कल्पान्ताच्या विचाराचा मागोवा घेतात. ''पृथ्वी जलापासून झाली । पुढे ते जळी मिळाली । जळाची उत्पत्ती वाढली । तेजापासूनी ।। ते जळ तेजे शोषिले । महातेजे आटोनि गेले । पुढे तेजचि उरले । सावकाश ।। तेज जाले वायूपासूनी । वायू झडपी तया लागोनि । तेज जाऊनि दाटणी । वायुचीच जाहली ।। वायु गगनापासूनि झाला । मागुता तेथेचि विराला । ऐसा हा कल्पांत बोलिला । वेदांतशास्त्री ।।'' (१४.९.६-९). विश्वाचा सर्व विस्तार गुणमायेचा असून ती मूळ प्रकृति आहे. ती शेवटी परब्रह्मात लय पावते. समर्थ म्हणतात, 'सगुण मायेचे ज्ञान घेऊन निर्गुण ज्ञान जाणावे लागते व आत्मैक्य ज्ञानाची अनुभूती घ्यावी लागते.' (१४.९.१३).

अशा प्रकारे समर्थांनी, 'मायेचा उद्‌भव झाल्यावर त्रिगुण व पंचमहाभूते यातून पंचीकरणाने सृष्टी दृग्गोचर होते व त्यात सर्वत्र चेतना स्वरूपात परब्रह्म व्यापून असते;' असे तत्त्वज्ञान स्वीकारले आहे. विश्वातील परब्रह्माची अनुभूती सर्वांना येत नाही त्याचे कारण मायेच्या सृष्टीमधील त्यांचे अस्तित्व होय. तेव्हा गुरुउपदेशाने, ज्ञानाने प्रकृति जाणून परब्रह्माची अनुभूती घ्यायची हा वेदान्तिक मार्ग, स्वत:च्या चिंतनाने त्यात थोडा बदल करून त्यांनी स्वीकारला आहे. या ज्ञानासाठी त्यांनी ब्रह्मनिरूपण केले आहे.

## दासबोधातील ब्रह्मनिरूपण

समर्थांनी नवविधा भक्तीला यद्यपि दासबोधात प्राधान्य दिलेले असले, तरी त्यांनी आत्मनिवेदनभक्तीवर भर देऊन सायुज्य मुक्तीला महत्त्व दिले आहे. त्यानुसार त्यांनी उपदेशावर जास्त लक्ष केंद्रित केले आहे. त्यांच्या दृष्टीने उपदेश हा ब्रह्मज्ञानाशिवाय पूर्ण होत नाही. ''ब्रह्मज्ञानाविण उपदेश । तो म्हणो नये विशेष । ध्यानेविण जैसे भूस । खाता नये ।।'' (६.२.२). ब्रह्मज्ञान ज्यात नाही तो उपदेश चोयट्या-नरोट्याप्रमाणे व्यर्थ होय. म्हणून ते ब्रह्मनिरूपण करतात. सृष्टीची रचना पाचभौतिक आहे, ती शाश्वत नाही. पंचभूते आणि त्रिगुण अशी अष्टधा प्रकृति आहे. या प्रकृतिस ते 'दृश्य' म्हणतात. दृश्य नाशवंत तर ब्रह्म शाश्वत आहे. ते म्हणतात, ''जे शस्त्रे तोडता तुटेना । जे पावके जाळिता जळेना । जे कालविता कालवेना । आपेकरूनी ।। जे वायूचेनि उडेना । जे पडेना ना झडेना । जे घडेना ना दडेना । परब्रह्म ते ।। ज्यासि वर्णचि नसे । जे सर्वांहूनि अनारिसे । परंतु असतचि असे । सर्वकाळ ।। दिसेना तरी काय झाले । परंतु ते सर्वत्र संचले । सूक्ष्मादि कोंदटले । जेथे तेथे ।। (६.२.१६.२०). समर्थ पुढे म्हणतात, हे परब्रह्म गुप्त आहे, पण गुरुमुखाने हा विचार उमजू लागतो. दृश्य जगतात जे देह दिसतात, तो तत्त्वांचा विस्तार आहे. तत्त्व निरसन झाल्यावर आत्माच उरतो. आत्म्याला जन्म-मृत्यू, पाप-पुण्य, यमयातना हे काही नसते. देहबुद्धीमुळे या सर्वांचा अनुभव येतो. ही देहबुद्धी विवेकाने निरसली की तो जीव देहातीत होतो, मोक्षपदी पावतो; आपण म्हणजे निर्गुण आत्मा आहोत, हे कळते. समर्थांनी

अध्यात्मश्रवण, सद्‌गुरुपदसेवन व त्यानंतर आत्मनिवेदन असा क्रम दिला आहे. आत्मनिवेदन हा शब्द येथे आत्मज्ञान, आत्मस्वरूपाची अनुभूती अशा अर्थी घेतला गेला आहे. समर्थांनी यास "ब्रह्मबोध" (६.२.४१-४२) म्हटले आहे. या बोधाने भक्त परब्रह्मी अभिन्न होऊन समाधान पावतो. तो अशा शांत स्थितीत येतो की, त्याला संसाराचे भय वाटत नाही. "आता होणार ते होईना का । आणि जाणार ते जाईना का । तुटली मनातील आशंका । जन्ममृत्यूची ।। (६.२.४४)

ब्रह्माचे वर्णन वस्तुत: करता येत नाही. परंतु ते उमजून घेण्यासाठी त्याची काही लक्षणे समर्थांनी सांगितली आहेत. आत्मा व ब्रह्म हे शब्द त्यांनी समानार्थी वापरले आहेत. "अयम् आत्मा ब्रह्म" अशी श्रुती आहे. समर्थ म्हणतात, 'आत्मा निर्मळ आहे. आकाशाची उपमा त्यास दिली तर त्यासारखे ते घनदाट, निर्मळ, निश्चळ, सदोदित, अखंड, उदंड, त्याहून वाड, सूक्ष्म आहे. ते दिसत नाही, भासत नाही, उमजत नाही, नासत नाही, येत नाही, जात नाही, हलत नाही, ढळत नाही, तुटत नाही, फुटत नाही, रचत नाही, खचत नाही, ते सतत सन्मुख आहे, निष्कलंक, निखळ व सर्वव्यापी, तसेच अविनाशी आहे. ते नित्यानित्य विवेकाने कळते. (६.३) ब्रह्म निर्गुण, निराकार, नि:संग, निर्विकार, व्यापक, शाश्वत, अच्युत, अनंत, कल्पनेरहित, दृश्यावेगळे, शून्यत्वानिराळे आहे. त्यास अनंत नावे आहेत पण ते नामातीत आहे. "यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह" हे उपनिषद वचन त्यांनी येथे आधारासाठी घेतले आहे. (७.२.१४)

समर्थांनी सातव्या दशकात समास तीनमध्ये "आता सांगतो ब्रह्मज्ञान" असे पहिल्याच ओवीत म्हटले आहे. या समासात त्यांनी वेदांतातील काही ब्रह्मविद्यांचा उल्लेख नामांतराने (चतुर्दश ब्रह्म) केला आहे. उदाहरणार्थ - उद्‌गीथ विद्या - ओमित्येकाक्षर ब्रह्म (७.३.६) उपकोसल विद्या - खं ब्रह्म (७.३.६)

भूमा विद्या - सर्व ब्रह्म (७.३.७)

दहर विद्या - चैतन्य ब्रह्म (७.३.७)

वैश्वानर विद्या - सगुण ब्रह्म (७.३.८)

भार्गवी-वारुणी विद्या - अनुभव ब्रह्म (७.३.८)

येथे समर्थांनी एकूण चौदा ब्रह्मांचा संकेत केला आहे. यामध्ये चौदा प्रकारे ब्रह्माचे चिंतन करण्यास शिकविणाऱ्या चौदा ब्रह्मविद्यांचे उल्लेख असावेत असे त्यातील नामांच्या साधर्म्यावरून म्हणता येते. उद्‌गीथ विद्या, संवर्ग विद्या, पर्यंक विद्या, मधुविद्या, पंचाग्नी विद्या, उपकोसल विद्या, वैश्वानर विद्या, दहर विद्या, भूमा विद्या, शांडिल्य विद्या, मन्थ विद्या, भार्गवी वारुणी विद्या, प्राणविद्या अशा या काही उपनिषद् विद्या आहेत. समर्थांनी प्रथमत: जो शब्दब्रह्माचा उल्लेख केला आहे, त्याचा अर्थ देताना 'अनुभवेवीण भ्रम । या नाव शब्दब्रह्म ।' (७.३.११) असे त्यांनी म्हटले आहे. थोडक्यात वेदांतामध्ये ब्रह्म जाणण्याचे जे चिंतन आहे त्यातून परब्रह्माच्या विविध आविष्कारांची जाणीव होते, त्यावरून प्रस्तुत ठिकाणी चौदा ब्रह्मांचे निरूपण समर्थांनी केले असावे.

नवव्या दशकात समास एक व दोन मध्येही समर्थांनी ब्रह्मज्ञानाचा ऊहापोह केला आहे. निराकार, निराधार, निर्विकल्प, निरामय, निराभास, निरावयव, निष्प्रपंच, निष्कलंक, निरुपाधि, निरूपम, निरालंब, निरपेक्ष, निरंजन, निरंतर, नि:संग, निर्मळ, निर्गुण, निश्चल, नि:शब्द, निर्दोष, निवृत्त, निष्काम, निर्लेप, निष्कर्म, अनाम, अजन्मा, अप्रत्यक्ष, अगणित, अकर्तव्य, अक्षय, अरूप, अलक्ष्य, अनंत, अपार, अढळ, अतर्क्य, अद्वैत, अदृश्य, अच्युत, अच्छेद, अदाह्य, अक्लेद्य या शब्दांतून येथे (स.१) परब्रह्माचे वर्णन येते. ('नेति नेति' असे हे वर्णन आहे.) यामधील प्रत्येक शब्दाचे अर्थ समर्थांनी या समासात उलगडले आहेत. ब्रह्माचा अनुभव फक्त सद्‌गुरुकृपेनेच येतो असे २९व्या ओवीत त्यांनी म्हटले आहे. समास दोनमध्ये ब्रह्मासंबंधी वेदांतशास्त्रात काय म्हटले आहे ते समर्थ सांगतात. - "दृष्टीस दिसे ते नासे । एतद्विषयी श्रुति असे । म्हणोनि जे दृष्टीस दिसे । ते स्वरूप नव्हे ।। स्वरूप ते निराभास । आणि दृष्य भासले साभास । भासास बोलिला नाश । वेदान्त शास्त्री ।।" (९.२.८.९)

ब्रह्म सबाह्य - अभ्यंतरी आहे. समर्थांनी सर्वब्रह्म व विमल ब्रह्म असा भेद केला आहे. सर्वत्र जे दृश्य आहे त्याला ब्रह्म व्यापून आहे (सर्वब्रह्म) पण त्या दृश्याचा निरास झाल्याशिवाय केवळ ब्रह्माची (विमल ब्रह्म) अनुभूती येत नाही. प्रकृति व तिला पाहाणारा पुरुष यांचा निरास झाला की शब्द नि:शब्द होतात, फक्त आत्मस्वरूप राहाते; असे समर्थ प्रस्तुत समासात सांगतात.

दशक अकरा समास आठमध्ये समर्थ अंतरात्म्याचे वर्णन करतात. ते म्हणतात तत्त्वज्ञानाने देहबुद्धीचा निरास व्हायला हवा, निर्मळ, निश्चल, परब्रह्म विवेकाने, हरिभक्तीने ओळखावे. तेराव्या दशकात समास नऊमध्ये समर्थ सांगतात की आत्मदर्शन घेतल्याने सर्व सुख प्राप्त होते, नंतर वासना वृत्ती राहात नाही. देहातील आत्मा सुखदु:खाच्या जाणिवेतून, मनाच्या वृत्तीतून जाणवतो. अशाप्रकारे आत्मा सर्व जगात राहून जग चालवतो. तो जगात जगदात्मा आहे तर विश्वात सूत्रात्मा आहे. पंधराव्या दशकात समास तीन व चारमध्ये समर्थ पंचीकरणाने बनलेल्या जगाकडे साक्षित्वाने पाहायला सांगतात. सर्वांत पहिला (वडील) अंतरात्मा आहे, त्याला मानावे. त्याला जाणण्यास जाणीवकला वाढविली पाहिजे, वृत्तीची निवृत्ती केली पाहिजे.

दशक वीसमध्ये समर्थांनी आत्म्याचे गुण सांगितले आहेत. ''आत्मयाचे नाना गुण । ब्रह्म निर्विकार निर्गुण । जाणणे एकदेशी पूर्ण । गुण आत्मयाचे ।। (२०.६.२७); असे म्हणून आत्मा सर्व जगात ओतप्रोत भरला आहे; असेही निर्देशिले आहे. या जगदंतरी असलेल्या आत्म्याची उपासना म्हणजेच आत्मारामाची उपासना त्यांनी प्रवर्तित केली आहे. या उपासनेनेच निरंजन होता येते, हे त्यांनी नि:संदेहपणे सांगितले आहे. (२०.६.३०) या दशकातील समास आठमध्ये समर्थांनी जड, चंचल, निश्चल असा भेद मांडून पिंडाचा शोध घेण्यास सांगितले आहे.

''पिंडाचा बरा शोध घ्यावा । तत्त्वांचा पिंड शोधावा । तत्त्वे शोधिता पिंड आघवा । कळो येतो ।। जडदेह भूतांचा । चंचळ गुण आत्मयाचा । निश्चळ ब्रह्मावेगळा ठाव कैचा । जेथे तेथे ।। निश्चळ, चंचळ आणि जड । पिंड करावा निवाड । प्रत्यया वेगळे जाड । बोलणे नाही ।। पिंडामधून आत्मा जातो । तेव्हा निवाडा कळो येतो । देह जड हा पडतो । देखत देखता ।। जड तितुके पडले । चंचळ तितुके निघोन गेले । जड चंचळाचे स्वरूप आले । प्रत्ययास ।। निश्चळ आहे सकळा ठायी । हे तो पाहणे नलगे कांही । गुण विकार तेथे नाही । निश्चळासी ।। जैसे पिंड तैसे ब्रह्मांड । विचार दिसतो उघड । जड चंचळ जाता जाड । परब्रह्मचि आहे ।। (ओव्या ११ ते १७).

समर्थांच्या मते देह जड आहे, जीवात्मा चंचळ आहे. जड चंचळाचे स्वरूप कळल्यावर, ''निश्चळ आहे सकळाठायी'' (२०.७.१६) याचा प्रत्यय येतो. मायेमुळे ब्रह्मावर आळ येतो (२०.७.१९) हा विचार त्यांनी स्वीकारला आहे. यास वेदांतात 'अध्यारोप' असे म्हणतात (रज्जू-सर्प या प्रकारे). हे कळण्यासाठी 'अध्यात्म श्रवण पंथेचि जाणे' (२०.९.१४) असे ते सांगतात. या श्रवणाने नाना प्रकारचे गोवे तुटोन जातात. (२०.९.१८). दासबोधाच्या शेवटच्या दशकात ब्रह्माविषयीचे चिंतन आहे. 'दृश्य सबाह्य अंतरी । ब्रह्म दाटले ब्रह्मांडोदरी ।'; 'परब्रह्म सकळास विसावा;' 'पिंड ब्रह्मांडाचा निरास । मग ते ब्रह्म निराभास ।' असे वर्णन करून ते म्हणतात, 'निर्गुण ब्रह्म ते निश्चळ' असे अंतरी बिंबल्यावर मायेचा हिशेब होतो, तत्त्वांचा निवाडा होतो, साध्य प्राप्त होते, साधनांचा ठाव राहात नाही, जन्म-मृत्यू संपतात. हे सर्व वर्णन उपनिषद् तत्त्वज्ञानाला अनुसरून आहे. या ज्ञानानेच मुक्ती मिळते असे ते म्हणतात.

### दासबोधातील मुक्तिनिरूपण

समर्थांनी दासबोधात मुक्तीची व्याख्या केली आहे : ''निर्गुणासी नाही जन्म मरण । निर्गुणासी नाही पाप पुण्य । निर्गुणी अनन्य होता आपण । मुक्त जाहला ।।'' (६.३.३३). यद्यपि वेदान्त तत्त्वज्ञानाचा अंगीकार करून अद्वैत व मायावाद समर्थांनी मांडला असला तरी त्यांनी त्रैत स्वीकारले आहे. देह जड व जीवात्मा चंचल असे ते सांगतात व या दोन्ही पलीकडे निश्चल ब्रह्म आहे;

असे त्यांनी म्हटले आहे. येथे भगवद्गीतेतील पुढील श्लोक आठवतो -

*यस्माद् क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तम: ।*
*अतोऽस्मि लोके वेदे च प्रथित: पुरुषोत्तम: ।। गीता १५.१८*

यात क्षर म्हणजे शरीर, अक्षर म्हणजे जीवात्मा अथवा क्षेत्रज्ञ व उत्तम पुरुष म्हणजे परब्रह्म असे त्रैत आहे. परब्रह्म जाणण्यासाठी ईश्वर तनु चतुष्ट्य म्हणजे १) कारण देह = महामाया, २) महाकारण देह = इच्छा, स्फुरण रूप मूळ प्रकृति, ३) सूक्ष्म देह = हिरण्यगर्भ, ४) स्थूल देह = विराट पुरुष याचे (चार देहांचे) निरसन करावे; असे समर्थ सांगतात. हे चारही देह निरसल्यावर ज्ञानाचे विज्ञान (अनुभूतिजन्य ज्ञान) होते. यासाठी श्रवण-मनन-निदिध्यासन ही वेदांतातील साधना त्यांनी दिली आहे. (१०.९.३०). त्यांनी सर्वसामान्य जनांसाठी त्यांना रुचेल व पचेल असे ज्ञान दिले असल्याने 'सगुणाच्या आधारे निर्गुण पावता येते; उपासनेचे शेवटी देव व भक्ताची अखंड भेट होते' (१८.२.३०); असा सोपा मार्ग प्रवर्तित केला आहे. श्रवण-मननाने माया-ब्रह्म कळते, मग निदिध्यासनाने मायेचे निरसन होते, ब्रह्मानुभूती येते (१५.४.३०) असे ते सांगतात. कर्म-उपासना-ज्ञान याविषयी बोलताना, 'ज्ञानाचे विज्ञान परब्रह्मानुभूती घेतल्यावर होते;' असे ते प्रतिपादन करतात; ''कर्म उपासना आणि ज्ञान । त्रिकांड वेद हे प्रमाण । ज्ञानाचे होते विज्ञान । परब्रह्मी ।।'' (१५.५.३२). उपासना व ज्ञान यांना ते एकच मानतात, ''ज्ञान आणि उपासना । दोन्ही एकचि पाहा ना ।।'' (१३.२.८) एवढेच नव्हे तर पुढे जाता ते म्हणतात की, परब्रह्माशिवाय जे काही विकारले आहे ते सर्व भ्रमरूप आहे त्यामुळे उपासना, ईश्वर हे सर्व मायेतच येते. एक परब्रह्म संचले । कदापि नाही विकारले । त्यावेगळे जे भासले । ते भ्रमरूप ।। मी तू हा भ्रम । उपासनाही भ्रम । ईश्वर हाहि भ्रम । निश्चयेसी ।।'' (१०.६.९व११). तरीही एक गुरू, एक देव यावर भाव ठेवावा. निर्गुण ज्ञान झाले तरी सगुणाकडे दुर्लक्ष करू नये. जप-ध्यान सोडू नये, परमेश्वराचे निष्काम भजन करावे. (७.७). नित्यानित्यवस्तु विवेक करावा असे सांगून समर्थ श्रीमत् शंकराचार्यांचा अवलंब करून विवेक, वैराग्य, शम-दमादी षट् संपत्ती, मुमुक्षत्व या साधन चतुष्ट्यावर ते भर देतात. तथापि समर्थांचा उद्देश समाज संघटन व शक्ती जागरण हा असल्याने त्यांनी सावधपणाने राजकारण करण्याचेही मार्गदर्शन केले आहे.

समाजबांधणी व्हावी म्हणून समर्थांनी वायुतत्त्वाची विशेष महती प्रगट केली आहे. संपूर्ण दहाव्या दशकात त्यांनी वायूमधील जगज्ज्योतीचे म्हणजेच शक्तियुक्त चैतन्यरूप परब्रह्माचे सर्वव्यापकत्व, सर्वज्ञत्व, सर्वसमावेशकत्व स्पष्ट केले आहे. या वायुतत्त्वाची उपासना वायुपुत्र हनुमंताच्या रूपाने त्यांनी दिली. शक्ति-बुद्धि-कर्मकुशलता आणि अध्यात्मज्ञान यांच्या बैठकीवर लोकांना निरपेक्ष कर्म करण्यास त्यांनी प्रवृत्त केले. हे निरपेक्ष कर्म हनुमंताप्रमाणे स्वामी रघुनाथासाठी करावयाचे आहे. रघुनाथ हा परब्रह्म आहे त्यास जाणावे (१३.२.२८) असे सांगून त्यांनी आत्मनिवेदन भक्तीला श्रेष्ठत्व दिले आहे, आत्मनिवेदन भक्ती निर्गुण भक्ती आहे, त्यासच ते मुक्ती मानतात. मननाने विज्ञान-ज्ञानानुभूती-साक्षात्कार झाल्यावर मन उन्मन होते, निर्गुण ब्रह्म अंतरी बिंबते, जन्म-मृत्यू संपतात, हीच मुक्ती होय. परंतु मुक्ताने समाजापासून दूर एकांतात जायचे नाही तर भगवंताच्या अधिष्ठानावर चळवळीचे सामर्थ्य दाखवायचे आहे, कारण हीच त्या काळाची गरज होती, असे त्यांनी सामान्यांच्या निदर्शनास आणून दिले व समर्थ असे शिष्य घडवले.

सुमारे चारशे वर्षांपूर्वी समर्थ रामदासांनी समाजास गुरु-शिष्य संवादाच्या रूपाने उपदेशिलेला 'ब्रह्मबोध' आजच्या तथाकथित प्रगत विज्ञानयुगात पण भ्रष्टाचरणाने ग्रस्त झालेल्या समाजात जास्तच गरजेचा आहे, हे वेगळे सांगायला नको!

# “श्री समर्थ रामदास लिखित ‘बाग प्रकरण’

***अश्विनी ज. केळकर***

*सी-६, मधुराज नगर हौसिंग सोसायटी, आयकर सोसायटीजवळ, पौड रस्ता, पुणे ४११०३८*

*चलभाष : ९४२२०६००८१*

आपला सह्याद्री आणि सह्याद्रीतील निसर्ग हे महाराष्ट्राला लाभलेले मोठे वरदान आहे. सह्याद्रीमध्ये वनस्पतींच्या जवळजवळ ५००० जाती आढळतात. त्यापैकी जवळपास २००० जाती या प्रादेशिक, म्हणजेच फक्त याच भागात आढळणाऱ्या अशा आहेत. वृक्षसंपत्तीच्या जपणुकीसाठी आणि संवर्धनासाठी पुरातन काळापासून आपल्याकडे प्रयत्न केले गेलेले आहेत. वेदांमधूनही याचे दाखले आढळतात. आपल्याकडचे, म्हणजे महाराष्ट्रातील अलीकडचे उदाहरण द्यायचे तर शिवाजीमहाराजांनीही वृक्ष आणि वनांच्या जतनाकडे विशेष लक्ष पुरवले होते. महाराष्ट्राची लोकगीते, लोककला, परंपरा, भाषा समृद्ध करण्यात इथल्या वृक्षसंपदेचा महत्त्वाचा वाटा आहे.

समर्थ रामदासांनी त्यांच्या आयुष्यातला मोठा कालखंड कृष्णा-कोयनेच्या परिसरात, कराड-सातारा-सज्जनगड-शिवथरघळ या भागात व्यतीत केला. आत्ताही हा भूप्रदेश वनसंपदेने समृद्ध आहे. साडेतीनशे वर्षांपूर्वी तर इथला निसर्ग मानवी हस्तक्षेपापासून अगदी लांब, अनाघ्रात असणार. समर्थांनी अतिशय चिकित्सक आणि अभ्यासू वृत्तीने इथल्या झाडाझुडपांची, वेलींची, फळाफुलांची ओळख करून घेतलेली होती. त्यांचा हा वनस्पतींच्या अभ्यासाचा व्यासंग पुढे त्यांनी लिहिलेल्या ‘बाग’ प्रकरणात दिसून येतो. परळी म्हणजेच सज्जनगडावरील मठाचे बांधकाम जेव्हा सुरू होते त्यावेळी समर्थांनी हे ‘बाग’ प्रकरण लिहिले. हे काव्य १९१६ साली श्री भट यांनी आणि १९२७ साली ह.भ.प.ल.रा पांगारकरांनी संपादित केलेल्या ‘श्री समर्थ रामदास समग्र ग्रंथ’मध्ये वाचायला मिळते.

निघाला स्वभावे बागेमध्ये काय लावावे । म्हणोनि घेतली नावे काहीएक । अशी सुरुवात करून ते या काव्यात जवळपास २७७ वनस्पतींची नावे सांगतात. बाग म्हटल्यावर आपल्या डोळ्यांसमोर येते तशी ही शोभिवंत झाडांची, शहराच्या सुशोभीकरणासाठी तयार केलेली बाग नाही. यात सह्याद्रीत ज्या वनस्पती सापडतात, वाढू शकतात, ज्या आपल्याला वेगवेगळ्या प्रकारांनी उपयोगी पडतात, अशा वनस्पतींची नावे दिलेली आहेत. यामध्ये काटेरी वनस्पती, फळझाडे, औषधी वृक्ष, लाकडासाठी उपयोगी असणारी झाडे, पालेभाज्या फळभाज्या, कंदभाज्या, सुगंधी वनस्पती, फुलझाडे असे वनस्पतींचे नाना प्रकार आलेले आहेत. या एकेक वनस्पतीचे वैशिष्ट्य पाहिले तर अतिशय वैविध्यपूर्ण आणि रंजक माहिती समोर येते.

यात सुरुवातीलाच दिलेल्या कांटी आणि रामकांटी या वनस्पती म्हणजेच बाभळीच्या वेगवेगळ्या जाती

आहेत. त्याच्यापुढेच येणारी फुलेकांटी हाही कदाचित बाभळीचाच प्रकार असावा. यातील रामकाठी बाभुळ सरळ वाढते आणि तिच्या या गुणामुळेच खुरप्याच्या मुठीपासून बैलगाडीच्या जूपर्यंत सगळी सणगं बनवायला ती उपयोगी पडते. बाभळीच्या डिंकाचे औषधी उपयोग तर आहेतच. यातच पुढे येणाऱ्या चिलारी, सागरगोटी, हिंवर, खैर याही बाभळीच्याच कुळातल्या (Family) वनस्पती होत. शेर, निवडुंग, सराटी (गोखरु), काचकुहिरी (खाजकुयली) ही नावे 'बाग' या प्रकरणात वाचून प्रश्नचिन्ह उभे राहाते. पण या प्रत्येकाचा काही ना काही औषधी उपयोग आहे. खाजकुयलीच्या शेंगा प्रचंड खाजऱ्या असतात. पण या शेंगा भाजल्या की त्यावरची खाजरी लव जळून जाते. मग त्याच्या आतल्या बिया काढून त्याची उसळ करतात. ती फार पौष्टिक असते! आयुर्वेदातही याचे उपयोग सांगितलेले आहेत. रक्तातील कोलेस्टेरॉल आणि शर्करेची पातळी राखण्यासाठी आणि पार्किनसन्स आजारावरतीही याच्या शेंगा गुणकारी आहेत! यातला निवडुंग म्हणजे फड्या निवडुंग किंवा तीनधारी निवडुंग आहे. निवडुंगाच्या या दोनच जाती प्रादेशिक आहेत. यांचेही औषधी उपयोग आहेतच. सराटा किंवा गोखरू ही वनस्पती मूत्रविकारांवर गुणकारी आहे.

आधुनिक वनस्पतिशास्त्रात, वनस्पतींचा अभ्यास करणे सोयीचे जावे म्हणून त्यांच्या फुलांच्या व इतर वैशिष्ट्यांनुसार प्रत्येक वनस्पतीचे वेगवेगळ्या कुळात म्हणजेच Familyत वर्गीकरण केले जाते. 'बाग' प्रकरणात अशा एकाच कुळातल्या वनस्पती एकत्र दिलेल्या सापडतात, भोंस, बरू, वाळा, मोळा, ऊस, कास या सगळ्या पोएसी कुळातल्या म्हणजेच गवतवर्गीय वनस्पती आहेत. याच कुळातल्या वेत, कळकी, चिवारी, बरु या बांबूच्या निरनिराळ्या जाती आहेत. भोपळा किंवा काकडीच्या कुळातल्या वेलीही एकत्र दिलेल्या आहेत. भोपळ्याच्या आकारावरून आणि उपयोगावरून पडणारे वक्र (गोल), गोल (लंबगोल), लंबायमान (लांबुळके), सांगडीचे (एकत्र जोडलेले) तसेच गंगाफळ, काशीफळ, क्षीरसागर, देवडांगर, दुधी, गंगारुढे, रुद्रविण्याचे असे वेगवेगळे प्रकार पाहणे मजेदार आहे. काकड्यांच्या स्थानिक प्रकारात चिबूड, वाळके, सेंदण्या, शेंदाडे, कुहिऱ्या यात आहेत. यात एक 'परोस पिंपळा' असे झाड आहे. हा परोस पिंपळा म्हणजेच परोसा पिंपळ किंवा परस पिंपळ. यालाच भेंडाचे झाडही म्हणतात. कोकणात बरेच ठिकाणी हा वृक्ष परसात लावलेला आढळतो. पिंपळाच्या पानांसारखीच पाने असणारा आणि घंटेच्या आकाराची केशरी, पिवळी, गुलाबी फुले येणारा हा वृक्ष अतिशय देखणा दिसतो. आयुर्वेदात हिवताप, दमा, आंव, अतिसारावरील उपचारात याचे महत्त्व सांगितलेले आहे. याशिवाय अडूळसा, हिरडा, विहाळ (बेहडा), गिळी (गेळा), आवळा, मोहा, धावडा, शिसू, शिरीष, कुंभा अशा कितीतरी वनस्पती यात दिलेल्या आहेत.

रामरायाच्या आणि हनुमंताच्या पूजेसाठी सुगंधी, विविधरंगी फुले तर हवीतच. जाईचे वेगवेगळे प्रकार, मोगरे, नेवाळी, चमेली, जास्वंद, कमळ, वेगवेगळे चाफे, पारिजातक अशी नाना प्रकारची फुले या काव्यात येतात. यापैकी बरीचशी फुलझाडे सज्जनगडावर आजही पाहायला मिळतात. कवठ, नारिंगे, सीताफळ, अंजीर, आंबे, डाळिंब अशी फळे, विविध फळभाज्या, चुका, चाकवत, माठ, शेपू, घोळ, यासारख्या फळभाज्या, कांदा, मोळकांदा (एक प्रकारचे ऑर्किड), लसूण, माईनमूळ, आले, रताळे यासारखे कंद अशी वनस्पतींच्या नावांची भलीमोठी जंत्री देऊन समर्थ या काव्याच्या शेवटी,

अठराभार वनस्पती नामे सांगावी किती । अल्प बोलिलो श्रोतीं क्षमा केली पाहिजे । असे विनम्रपणे म्हणतात!

एथनोबॉटनी ही वनस्पतिशास्त्राची एक शाखा आहे. त्यात लोकपरंपरा, लोककला, लोकसाहित्य इत्यादींपासून जोपासले गेलेले मानव आणि वृक्षवल्लींमधील साहचर्य

अभ्यासले जाते. या शाखेअंतर्गत आपल्याकडे काही विख्यात वनस्पतितज्ज्ञांनी या 'बाग' प्रकरणाचा अभ्यास केला आहे. लोकभाषेमध्ये एकच झाड वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या स्थानिक नावांनी ओळखले जाते तर काही पूर्णपणे वेगळी असणारी झाडे एकाच नावानेही ओळखली जातात. तसेच कालवशात काही स्थानिक नावे मागेही पडत जातात. अशा काही कारणांमुळे यातील काही वनस्पतींची अद्याप नेमकी ओळख पडलेली नाही. (उदा. एणके, अवीट, अव्हाटी, बसळा, खोळ, इत्यादी) केशर आणि देवदार या वनस्पती आपल्या माहितीप्रमाणे हिमालयाच्या परिसरातल्या आहेत. त्या इथल्या वातावरणात वाढू शकणार नाहीत. मग ही इतर कोणत्या स्थानिक वनस्पतींची नावे असावीत, तसेच सावा आणि सावी, मोहो आणि मोही, जास्वंद आणि हनुमंती जास्वंद अशी नावात थोडाफार फरक असणारी झाडे एकाच वनस्पतीच्या त्याकाळी माहिती असलेल्या वेगवेगळ्या जातींची आहेत का, असे प्रश्नही आहेत.

आज आपल्या अविचारी वृत्तीमुळे, आपल्याला लाभलेला वनसंपदेचा हा समृद्ध वारसा नष्ट होत चालला आहे. जंगलांचा ऱ्हास होतो आहे. सह्याद्रीतील जैवविविधता कमी होते आहे. पण अजूनही या प्रश्नाकडे पुरेशा गांभीर्याने पाहिले जात नाही. दुसरे असे की सहज उपलब्ध असणारी, लवकर वाढणारी, शोभिवंत परदेशी झाडे हल्ली सर्रास लावली जातात पण देशी झाडे मात्र आवर्जून लावली जात नाहीत. परिणामी, आधीच दुर्मिळ होत चाललेल्या देशी वनस्पती आता नामशेष होण्याचाही धोका आहे. आपण प्रत्येकाने वृक्षांच्या जतन आणि संवर्धनात खारीचा वाटा उचलणे अतिशय निकडीचे झालेले आहे. समर्थांनी लिहिलेल्या या काव्यातील या सर्व वनस्पती मिळवून सज्जनगड, चाफळ, शिवथरघळ अशा समर्थांच्या वास्तव्याच्या ठिकाणी त्यांचे संवर्धन केले. त्या प्रत्येक वनस्पतीची वनस्पतिशास्त्रीय माहिती, औषधी व इतर उपयोग वगैरे लोकांपर्यंत पोहोचवले तर हा वारसा मूर्त स्वरूपात, सुंदररीत्या जतन केला जाईल.

या लेखनासाठी डॉ. प्र.के.घाणेकर, डॉ. विनया घाटे, डॉ. मंदार दातार या वनस्पतितज्ज्ञांचे तसेच डॉ. कापरेकर या समर्थ वाङ्मयाच्या अभ्यासकांचे मार्गदर्शन व साहाय्य लाभले.

**''श्री समर्थ रामदास लिखित 'बाग' प्रकरण''**

*निघाला स्वभावें । बागेमध्ये काय लावावे ।*
*म्हणूनि घेतली नावे । काही एक ॥*
*कांटी रामकांटी फुलेकांटी । नेपती सहमुळी कारमाटी ।*
*सावी चीलारी सागरगोटी । हिंवर खैर खरमाटी ॥*
*पांढरफळी करवंदी तरटी । आवळी तोरणी चिंचोरटी ।*
*सिकेकाई वाकेरी घोंटी । करंज विळस समुद्रशोक ॥*
*अव्हाटी बोराटी हिंगणबेटी । विकळी टांकळी वाघांटी ।*
*शेर निवडुंग कारवेटी । कांटेशेवरी पांगेरे ॥*
*निरगुडी येरंड शेवरी । कासवेद कासळी पेरारी ।*
*तरवड उन्हाळ्या कुसरी । शिबी तिव्हा अंबोटी ॥*
*कांतुती काचकुहिरी सराटी । उतरणी गुळवेल चित्रकुटी ।*
*कडोची काटली गोमाटी । घोळ घुगरी विरभोटी ॥*
*भोंस बरु वाळा मोळा । ऊंस कास देवनळा ।*
*लव्हे पानि पारोस पिंपळा । गुंज कोळसरे देवपाळा ॥*
*वेत कळकी चिवारी । ताड माड पायरी पिंपरी ।*
*उंबरी अंबरी गंभिरी । अडुळसा मोही भोपळी ॥*
*साव सिसवे सिरस कुड । कोळ कुंभा धावडा मोड ।*
*काळकुडा भुता बोकडा । कुरंडी हिरंडी लोखंडी ॥*
*विहाळ गिळी टेंभुरणी । अवीट एणके सोरकिन्ही ।*
*घोळी दालचिनी । कबाबचीनी जे ॥*
*निंबारे गोडे निंब । नाना महावृक्ष तळंब ।*
*गोरक्षचिंच लातंब । परोपरीची ॥*
*गोधनी शेलवंटी भोंकरी । मोहो बिब्बा रायबोरी ।*
*बेल फणस जांब भरी । चिंच अंबसोल अंबाडे ।*
*चांफे चंदन रातांजन । पतंग मैलागर कांचन ।*
*पोपये खलेले खपान । वट पिंपळ उंबर ॥*
*आंबे निंबे साखरनिंबे । रेकण्या खरजूरी तूंते दाळिंबे ।*
*तुरडे विडे नारिंगे । शेवे कविट अंजीर सीताफळे ॥*

जांब अननस देवदार । सुरमे खासे मंदार ।
पांढरे जंगली लाल । पुरे उद्वे चित्रकी ॥
केळी नारळी पोफळी । आवळी रायआवळी जांभळी ।
कुणकी गुगुळी सालफळी । वेलफळी माहाळुंगी ॥
भुईचांफे नागचांफे मोगरे । पारिजातक बटमोगरे ।
शंखासुर काळे मोगरे । सोनतरवड सोनफुले ॥
जाई सखजाई पीतजाई । त्रिविध शेवंती मालती जुई ।
पाडळी बकुळी अबई । नेवाळी केतकी चमेली ॥
सुर्यकमळिणी चंद्रकमळिणी । जास्वनी हनुमंतजास्वनी ।
केशर कुसुंबी कमळिणी । बहुरंग निळायाति ॥
तुळसी काळी त्रिसेंदरी । त्रिसिंगी रायचचु रायपेटारी ।
गुलखत निगुलचिन कनेरी । नानाविध मखमाली ॥
काळा वाळा मरुवा नाना । कचोरे गवले दवणा ।
पाच राजगिरे नाना । हळदी करडी गुलटोप ॥

वांगी चाकवत मेथी पोकळा । माठ शेपु खोळ बसळा ।
चवळी चुका वेल सबळा । अंबुजिरे मोहरी ॥
कांदे मोळकांदे माईणमुळे । लसूण आलें रताळें ।
कांचन कारिजे माठमुळे । सुरण गाजरें ॥
भोंपळे नाना प्रकारचे । लहानथोर पत्रवेलीचे ।
गळ्याचे पेढ्या सांगडीचे । वक्र वर्तुळ लंबायमान ॥
गंगाफळ काशीफळे क्षीरसागर । सुगरवे सिंगाडे देवडांगर ।
दुधे गंगारूढे प्रकार । किनऱ्या रुद्रविण्याचे ॥
वाळक्या कांकड्या चिवड्या । कोहाळे सेंदण्या सेंदाड्या ।
खरबूजा तरबुजा कलंगड्या । द्राक्षी मिरवेली पानवेली ॥
दोडक्या पारोशा पडवळ्या । चवळ्या कारल्या तोंडल्या ।
घेवड्या कुहीऱ्या खरमुळ्या । वेली अळूचमकोरे ॥
अठराभार वनस्पती । नामे सांगावी किती ।
अल्प बोलिलो श्रोतीं । क्षमा केली पाहिजे ॥



# आत्मभावी व्यवस्थापन
# Spritual Management

*प्रा. डॉ. सोमनाथ जोशी, धुळे*
९४२२२८९४३२

---

**भावी प्रकल्पाची पार्श्वभूमी**

नवीन आशा उमेदीने ज्या २१व्या शतकाकडे आपण सर्वजण कुतूहलाने पाहात होतो त्याचे (भावी संशोधन प्रकल्प अंश) एक दशक पूर्ण झाले. ज्ञान व संशोधन यांचे परिस्फोट वाढत आहे. त्यामुळे आर्थिक, सामाजिक, राजकीय, व तांत्रिक स्थित्यंतरे वाढत आहेत. मानवी व्यक्तिमत्त्व अधिक गुंतागुंतीचे होत आहे. या नित्य स्थित्यंतरामुळे, अस्वस्थता व अशांतता मनात घर करते, परिणामत: ताणतणावाच्या खाली दडपलेले व्यक्तिमत्त्व निर्माण होते.

व्यक्तिमत्त्वावरील ताण नाहीसा करून, असुरक्षितपणाची जाणीव कमी करण्याचे कार्य व्यक्तीने स्वत:चे सुव्यवस्थापन केले तरच होऊ शकते. संभ्रमित व समस्याग्रस्त झालेल्या समाजाचा संघर्षमय गुंता सोडविण्याचा सुव्यवस्थापन हा एक रामबाण उपाय आहे.

सुव्यवस्थापनांकडून अपेक्षा केवळ समस्या निवारण करणे एवढ्यापुरते मर्यादित नसून, विविध कार्य, व्यक्ती, समाज व संस्था यांची प्रगती घडवून आणणे. त्यांची विकासाकडे अविरोध वाटचाल करणे हेही आहे.

वस्तुत: मानवाने जी प्रगती केली. निसर्गाची विविध रहस्ये उलगडली, तंत्रज्ञान क्षेत्रांत प्रमेय मांडून ती सिद्धतेस नेली ती व्यवस्थापनेच्या आधारेच होय.

''आपल्या इष्टतेच्या साध्यतेसाठी, जी योजनाबद्ध-सुसूत्रतेने म्हणजे योग्य पद्धतीने मांडणी केली व योग्य पद्धतीनेच कार्यवाही केली ती यंत्रणा म्हणजेच व्यवस्थापन होय.''

व्यवस्थापन ही कार्यात्मक संकल्पना आहे. तशी ती प्रगमनशील अशी संकल्पना आहे. हेतू, घटना, घटक, साधने, काळ व व्यक्ती यांच्या सहभागाप्रमाणे ती बदलत असते.

व्यवस्थापन हे कार्यास गती देणारे व अंतिम यश प्राप्त करून देणारे असे असल्याने तो २१व्या शतकातील परवलीचा शब्द झाला आहे, म्हणूनच आपापल्या क्षेत्रांतील उच्चतम ज्ञान, पदवी, कौशल्य प्राप्त झाल्यावरही अधिकार पदाकरिता व्यवस्थापन क्षेत्रांतील एम्.बी.ए सारखी पदवी घेण्याकडे बहुतेकांचा कल असतो.

बऱ्याच लोकांना ही संकल्पना अत्यंत आधुनिक (Modern Technic) आहे असे वाटते. आपल्या पौर्वात्य वाङ्मयात हा शब्द स्वतंत्रपणे कोठे योजला नसल्याने ही संकल्पना बाहेरून आयात केली असे वाटते. पाश्चात्त्य तत्त्वचिंतक श्री हेन्रीफॅयॉन यांनी ही आधुनिक व्यवस्थापनाची कल्पना २०० वर्षांपूर्वी मांडली होती. म्हणून त्यांना व्यवस्थापन शास्त्राचे जनक (Father of Modern

Management) असे म्हटले जाते.

अर्थात कालांतराने त्यांत खूप भर पडली. हरडॉकुटँन्झी (Herdockkuntiz) यांनी व्यवस्थापन हे शास्त्र अनेक कार्यांचा समूह आहे, तसे ते करवून घेण्याचे व सहभागाचे शास्त्र असे म्हटले आहे. Management is an art of getting things done by other but also getting things done with others.

लुथर मलिक यांनी व्यवस्थापनाचे PODSCORB हे सूत्र सांगितले [P- Planning नियोजन, O - Organization संघटन, D - Directing मार्गदर्शन, S - Staffing मनुष्यबळ / कार्यकर्ता / कर्मचारी, C - Coordination समन्वय, R - Reporting अहवाल / निवेदन, B - Budgeting अंदाजपत्रक / आर्थिकघडी]

आणखी यात २० शतकांत - निर्णय, नियंत्रण, विविध तंत्रज्ञान, नेतृत्व, संचलन क्षमता, दूरदृष्टी, आत्मविश्वास, प्रबळ इच्छाशक्ती, संतुलित मानसिक भावना इ. ची भर पडली.

अत्याधुनिक व्यवस्थापन कौशल्यात - प्रेरणा, आंतरव्यक्ती संपर्क (Inter personal Relationship) व संवाद (Communication Skill), नीती, कुशल ज्ञान, प्रशिक्षण, तणाव, नीती व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन, समय व्यवस्थापन इ. चा समावेश केला जातो.

हल्ली सर्व क्षेत्रांत असे व्यवस्थापनाचे पैलू दिसतात पण तरीही प्रत्येक क्षेत्रात आपणास काहीतरी त्रुटी आहे, आणखी काही हवे आहे अशी अस्वस्थ मनोवृत्ती दिसते. आपण राष्ट्रगुरू समर्थ रामदास स्वामींना आधुनिक व्यवस्थापन शास्त्रज्ञ मानतो. आजच्या कुठल्याही व्यवस्थापन शास्त्रांत चपखल बसेल अशी समर्थांची महंत व मठव्यवस्था होती, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची गनिमी काव्याची नीती आजही जगातल्या सर्व सैनिकी अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणांत, सैद्धांतिक नीती म्हणून शिकवली जाते. म्हणजे आपल्याकडे ही व्यवस्थापन कल्पना पूर्वीपासूनची आहे. विशिष्ट नाव नव्हते पण सुयश गमकतेचे सूत्र व तंत्र आपण प्रथमपासून वापरलेले आहे. भारतातील १४ विद्या व ६४ कला यामध्ये व्यवस्थापनाची व्यवस्थापन विद्या अंतर्भूत आहे. श्रीमद् भगवद्‌गीता वेदवेदांगे, उपनिषद, भागवत इ. पुराणे यात कार्याकार्यौ व्यवस्थित: / या शब्दांत तिचे श्री व्यासमहर्षी वर्णन करतात. श्रीमद् भागवताच्या चौथ्या स्कंदात दक्ष प्रजापती व राणी प्रस्तुती त्यांच्या तेरा कन्या, त्यांच्यासंबंधी घटना या संबंधीचे वर्णन व पृथु, अंग व वेन राजांच्या व्यवस्थापनेसंबंधी माहिती आहे. विश्वातील पहिला व्यवस्थापक म्हणजे मनूच व सर्वच मन्वंतर हे व्यवस्थापकीय परिवर्तनाचे दाखले आहेत. मनूचे प्रजाहित व्यवस्थापन व स्वयंशासनाचे व्यवस्थापन (Self management) यांचा उल्लेख भागवतात सुंदर वर्णिला आहे.

पूर्वीच्या ऋषींनी सर्व शास्त्रांची अनुभूती घेऊन मग संहिता निर्माण केली. त्यामुळे सर्व वाङ्मय हे निर्दोष झाले. श्री समर्थ रामदास स्वामींनी पण व्यवस्थापनाची प्रचीती, प्रबोध, प्रयत्न ही मुख्यसूत्र, तपश्चर्या, भ्रमण व अनुभूती यातून लिहिलीत.

म्हणून दासबोधात त्यांचा उल्लेख आहे.

उदा. १) अचूक यत्न करवेना । म्हणूनी केले ते सजेना ।।

२) सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे । परन्तु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ।।

३) आधी विद्यावंत व्हावे । उदंडची मिळवावे ।

४) विवेक आणि वैराग्य । युक्त महंते असावे ।

अशी पुष्कळ सूत्रे दासबोधातून आपणास काढता येतील. श्री समर्थ वाग्देवता मंदिरात अशा सूत्रांची यादी व काही घोषणा पत्रिकांच्या स्वरूपात भिंतीस लावलेल्या आहेत.

समर्थांच्या विवेक विषयांत नेहमीप्रमाणे - नीरक्षीर न्याय अपेक्षित असतो. व्यक्ति-कार्य-तत्त्व इ. बाबत

नदी ज्याप्रमाणे वाहताना प्रदूषित गोष्टी काठाला टाकत जाते, शुद्ध पाणी मधल्या धारेने पुढे जाते असे सहज होते. त्याप्रमाणे विवेचक क्रिया होणे अपेक्षित असते. विवेकाचा विचार करताना ऐहिक बाबींचाच विचार न करता देहबुद्धी हळूहळू सोडून शाश्वताची कास धरणे अपेक्षित आहे. जे क्षणिक आहे, कालौघात निष्फळ व कुचकामी ठरेल. तिकडे न गुंतता हे स्थिर शाश्वत त्यांचे चिंतन करणे म्हणजे विवेक.

श्रीमद् भगवद्गीतेत पण व्यवस्थापनाचे सूत्र सांगताना

*अधिष्ठांन यथा कर्ता करणंच पृथक्विधम् ।*
*विविधश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पंचकम् ॥*

म्हणजे अधिष्ठान आत्मबुद्धियुक्त ध्यास, कृती - दैवीसंपत्तियुक्त असा काया, मनाने, सक्षम कर्ता, करण (साधन) - विविधप्रकारची - समयानुसार, कार्याच्या आवश्यकतेनुसार, अशी योग्य यशदायी साधने व याकरिता योग्य प्रकारची अशी विविधांगी कार्यानीती (चेष्टा) प्रयत्न, दैव पंचकम् (फलाची अपेक्षा न करता-निष्काम कर्म) असे विवेकपूर्ण असे व्यवस्थापनाचे सारच सांगितले आहे.

या अनुषंगाने महंताचा आवश्यक गुण श्री समर्थांनी सांगितला तो म्हणजे वैराग्य. बहुतेक या शब्दाबद्दल खूप लोकांचा गैरसमज असतो. वैराग्य याचा अर्थ, पुष्कळांच्या दृष्टीने सर्व गोष्टींचा त्याग करणे, अंगाला भस्म लावून, भगवी कपडे घालून भिक्षा मागत फिरणे, कर्मसंन्यास घेणे - म्हणजे विरक्त किंवा वैराग्य हा गैरसमज आहे. रत म्हणजे रममाण होण्याची वृत्ती - आसक्त होण्याची वृत्ती किंवा आसक्ती. या आसक्तीमुळे कार्याच्या यशापयशांबरोबर मनाचे हिंदोळे वाढून आशा-निराशा वाढते. ताणतणाव निर्माण होतो. यातून शारीरिक/मानसिक व्याधींची उत्पत्ती होऊ शकते. त्यापेक्षा फलाची अपेक्षा न करता म्हणजे कर्मात समरस होऊन कर्म करणे - हेच योग्य कर्मफलाचा त्याग म्हणजे कर्माचा संन्यास (त्याग) नाही. उलट कर्म सतत करणे आहे. म्हणजे आसक्त न होता कर्म करत राहाणे याचा अर्थ विरक्त किंवा वैराग्य.

पाश्चात्त्यदृष्ट्या व्यवस्थापन चिंतनाचा विचार करत असता समर्थ विचाराचा त्यात आपण मागोवा घेत गेलो. पण मूळ विचारांतील दृष्टिकोनांचा यात विचार येथपर्यंत केला नाही.

याच चिंतनाचा आता आपण आत्मभावी व्यवस्थापन (Spiritual Management) किंवा पूर्णपणे आपल्या विचारांवर आधारित असा विचार करीत आहोत.

पाश्चात्त्य दृष्टीने फक्त शरीर+मन एवढेच व्यक्तीचे स्वरूप व त्याचे सामाजिक व भौतिक वातावरण याशी संपर्क (आंतरक्रिया) एवढेच व्यवस्थापनाचे चिंतन क्षेत्र. आपण यास अपूर्ण चिंतन म्हणतो.

आपल्या दृष्टीने शरीर+मन+आत्मा हे एवढेच व्यक्तीचे स्वरूप आहे, व समग्राचे चिंतन म्हणजे व्यक्ती, समष्टी+सृष्टी+परमेष्टीचे चिंतन हेच खरे चिंतन आपण समजतो. पाश्चात्त्य विचार फक्त व्यक्ती व परिसर ह्याच द्विस्तरावर विचार करते. पण आपण सूक्ष्मतेने विचार करत असल्याने पंचस्तरीय असा विचार करतो.

ही कल्पना प्रथम तैतिरीय उपनिषदात भार्गवी विद्या म्हणून आपल्या वाचनात आली. आद्य शंकराचार्यांनी मूळ परब्रह्म आणि यांतील फरक यादृष्टीने मांडली आणि व्यक्तिमत्त्वाबाबत योगी अरविंदांनी भारतीय मानसशास्त्रात व्यक्तिमत्त्वाची पंचस्तरीय कल्पना माडंली - ती विकासांच्या स्तराप्रमाणे उर्ध्वगामी आहे. पंचकोषाप्रमाणे याला नावे देता येतील. (योगी अरविंदांनी जी नामावली स्वीकारली (व्यक्तिमत्त्व) सिद्धांतात स्वीकारली तीच मी स्वीकारली).

**अन्नमय प्रथम स्तर -** प्रत्यक्ष कार्य करणारा व कार्यावर नियंत्रण ठेवणारा घटक.

**प्राणमय द्वितीय स्तर -** कार्यास ऊर्जा पुरविणारा त्याचे सुचारूपाने घडविणारा घटक.

**मनोमय तृतीय स्तर -** कार्याची दिशा व्यक्ती/संस्था इ. आशा अपेक्षा, आवड या दृष्टीने स्व (ऐहिकदृष्ट्या)

चा विचार करणारा घटक.

**विज्ञानमय चतुर्थस्तर -** कार्याची दिशा योग्य आहे काय? नियोजनाप्रमाणे चाललेले आहे का. कार्य बदलाला - व्यक्ती/यंत्रणा/संस्था - उद्दिष्ट साधन (कार्यानीतीत) आपत्कालीन व्यवस्थापन करावे कार्य । अधिक यश । विकास करण्याच्या दृष्टीने नवनिर्माण / सर्जनशीलता - काय आणता येईल. इत्यादी विचार करणारा घटक.

**आनंदमय पंचमस्तर -** ज्याच्या अस्तित्वामुळे सर्व कार्य घडून येते. पण जो कशात सहभागी नसतो. त्याचप्रमाणे व्यक्ती निरपेक्ष अशी पण कार्यात सतत प्रगती घडवून आणणारी यंत्रणा.

(ही जी मी सैद्धान्तिक बैठक मांडावयाचा प्रयत्न करीत आहे. त्यात सहभाग घेण्याचा गुण-दोष दाखविण्याची वाचकांस विनंती आहे.) आता व्यवस्थापनात ही संकल्पना कशी रुजवता येईल ते बघू.

**पंचस्तर व्यवस्थापनासंबंधी**

**अन्नमयः -** मघाशी संकल्पना पाहाताना अन्नमय स्तर म्हणजे प्रत्यक्षकार्य करणारी व्यवस्था. प्रत्यक्ष मानवी देह. संस्थेमधील यंत्रणा सृष्टीबाबत निसर्गाचे रूप (पिंडी ते ब्रह्मांडी) अशी व्यवस्था आपण मानतो. याठिकाणी व्यक्ती व संस्था याच बाबतीत विचार केला असल्याने अन्य सृष्टीचा वा गोष्टींचा विचार नाही.

व्यक्तीच्या दृष्टीने विचार केला असता मनुष्य (बळ) काया, वाचा, मनाने सक्षम असणे. कार्याप्रमाणे आवश्यक कौशल्याने युक्त असतो याप्रमाणे त्यांचे प्रशिक्षण होणे, तो घटक कार्यक्षम होणे हे अन्नमय स्तरांत अपेक्षित आहे. संस्थेत यंत्रणा कार्यक्षम असते.

**प्राणमयः स्तर -** व्यक्ती व यंत्रणा योग्य दिशेने चालायची असेल त्यास योग्य ऊर्जा हवीच. या ऊर्जा स्रोतावर आवश्यक नियंत्रण ठेवणे या स्तराचे कार्य. व्यक्तीच्या शरीरात निर्माण होणारी चयापचय व मनोकाय रसायने (Hormones) यांचे गती संबंधी नियंत्रण तसेच संस्था संबंधी योग्य भौतिक ऊर्जा व कर्मचाऱ्यांची साखळी यंत्रणा व मनोबल पण निर्माण करणारे स्तर.

**मनोमय स्तर -** व्यक्तीबाबत - व्यक्ती व बाह्य जगत यांच्याशी संपर्क निर्माण करणारी व्यवस्था म्हणजे मनोमय स्तर होय. व्यक्ती जीवनात व्यक्ती या स्वभावाप्रमाणे स्वसंबंधित (Self Relatedness), अपेक्षेप्रमाणे, रुचीप्रमाणे, कार्य करणारी व्यवस्था. जशी व्यक्तीची मनोव्यवस्था (Psyche) असते तसेच समूहात, संस्थेतपण समूह मनोवृत्ती (Social Psyche) असते. आपले नाव आपला बॉंड, ध्येय याबद्दल संस्था दक्ष असते. व्यक्ती व संस्था कार्य करीत असताना विभक्त घटकांतील आपलेपणा व्यक्त करणारी अंतर क्रियापण येथे अपेक्षित आहे.

**विज्ञानमय स्तर -** कुठलाही निर्णय घेणे - सिद्धांत/नियम तयार करणे व अमलात आणणे हे व्यक्ती व संस्थेचा आवश्यक भाग असतो. त्याकरिता आवश्यक महितीचे संकलन, आकलन, परीक्षण, उपयोजन, कौशल्यपूर्ण सहभाग त्यातून आनंद व अधिक नवीन चांगले कार्य / कृती / (मॉडेल) गतिमान / कल्पना, नवनिर्माण, सृजनशीलता - निर्माण होणे अपेक्षित असते त्याकरता अत्यावश्यक नियोजन, मूल्यांकन आपत्कालीन व्यवस्थापन व संस्थेचा व व्यक्तीचा विकासाचा मार्ग शोधणे. ह्याकरता याचे कार्य यामध्ये व्यक्ती, ऊर्जा, वेळ, यंत्रणा, यंत्र.

या सर्वांचे उत्तम व्यवस्थापन व कालोचित निर्णय असे असते. वर उल्लेखिलेले (PODSCORB) इ. सर्व सूत्र येथे विचारात घेतले जातातच.

**आनंदमय स्तर -** सर्व कार्याचे मूळ हेतू, व्यक्तीला/संस्थेला / समाजाला पूर्ण आनंद देणे हाच असतो. आनंद आपल्या सर्वांचे एक अविभाज्य अंग आहे. तो जसा साध्याच्या सिद्धतेने होतो तसा समर्पण व सेवेने होतो.

आजकाल आनंद ही कल्पना संकुचित झाली. स्वार्थ साधणे व भोगांची क्षणिक तृप्ती करणे एवढाच मर्यादित.

आशय सध्या विचार करणारे घेतात / आणि याचमुळे संघर्ष व तणाव निर्माण होतात. सर्वत्र सुखिनः सन्तु / नको पि दु:ख भाग भवेत्। अशी धारणा झाली की ह्या समस्या / ताण क्षणांत सुटतील.

आपण सर्वजण एकाच विश्वचैतन्याचे अंश असल्याने एकाच्या क्षतीवर दुसऱ्याचा आनंद असणार नाही. उलट, समर्पण, सेवेने प्रसन्नपणे सर्वांना आवश्यकतेची प्राप्तता होणे म्हणजे सर्वांतील विसंवाद जाऊन सुसंवाद निर्माण होणारे - सदा सुखन भवतुचे विचार निर्माण होणे म्हणजे आनंद व असा निर्माण करणारा स्तर आनंदमय स्तर आहे. हा प्रत्येक ठिकाणी असतो कारण तो स्वत:च चैतन्याचा अंश असतो.

असे देहभान जाऊन आत्मभाव देणारी पंचस्तरीय तात्त्विक मांडणी म्हणजे आत्मभावी व्यवस्थापन (Spiritual Management) होय.

आनंदमय स्तरात कर्मपूजा हीच ईश्वरपूजा. समर्पण वृत्तीने केलेली मानवी सेवा हीच परमेश्वर पूजा. प्रयत्न तोच परमेश्वर सर्वांठायी भगवंत व प्रचीती या सूत्राचा समावेश आहे.

**संदर्भ -** श्री समर्थांच्या दासबोधाच्या आधारे हा अभ्यासाचा प्रयत्न आहे.


१) (Sprinkling of Management in Dasbodh) - श्री. तांबवेकर, मुंबई.

२) समर्थांची व्यवस्थापनदृष्टी - प्रा. रमेश देशपांडे, सोलापूर.

३) यशस्वी व्यवस्थापनाची समर्थसूत्रे - नचिकेत प्रकाशन, नागपूर.

४) समर्थ रामदासांचे व्यवस्थापन - सुनिल चिंचोळकर, पुणे.

५) तैतिरीय उपनिषद.


या पुस्तकांचा आधार घेतला आहे. सुधारण्यास वाव आहे. एक अभ्यासक्रम करावा असा मानस आहे. म्हणून सूचनांचा स्वीकार आहे.

# समर्थ रामदासांची हिन्दी पदावली

**प्राचार्य रा. तु. भगत**
*अध्यक्ष - संत गाडगे महाराज अध्यासन,*
*शिवसुंदर, मोहिते पार्क, रंकाळा (प.), कोल्हापूर - ४१६०१२*

इ. स. १६०८ ते इ. स. १६८२ हा समर्थ रामदासांचा जीवन कालखंड. इ. स. १६४४ पासून १६८२ पर्यंत समर्थांच्या साहित्य निर्मितीचा कालखंड संस्मरणीय वाटतो. समर्थांची 'करुणाष्टके' म्हणजे समर्थांच्या साहित्य मंदिराचा पाया, तर 'दासबोध' म्हणजे शिखर मानले जाते. समर्थांची समग्र साहित्यरचना सागरासारखी सखोल आहे. त्यामध्ये ज्ञान, वैराग्य, परमार्थ, अनुभव आणि उपदेशासारखी तेजोमय रत्ने मिळतात. त्यांच्या साहित्यात काव्यसौंदर्यापेक्षा विचारसौंदर्य विलोभनीय वाटते. कारण त्यामध्ये मानव स्वभावाचे सूक्ष्म ज्ञान, अवलोकन आणि जीवनाकडे पाहाण्याचा विशिष्ट दृष्टिकोन आढळतो. विशेषत: आशयामधील 'उत्कटता' अत्यंत दुर्लभ गोष्ट वाटते. उत्कटतेबरोबरच प्रयत्नवाद, लोकोद्धार आणि विवेकसंपन्न वैराग्य आढळून येते.

समर्थ रामदास भ्रमणशील संत होते. दक्षिण भारतापासून उत्तर भारतापर्यंत तीर्थयात्रा करत भ्रमण करणाऱ्या समर्थांनी जनजीवन जवळून न्याहाळले. त्यामुळे मराठी भाषेबरोबरच हिन्दी भाषा-भाषी लोकांचे सान्निध्यही त्यांना लाभले. त्यातूनच उत्कृष्ट मराठी ग्रंथाबरोबरच हिन्दी पदांचीही निर्मिती झाली. 'समर्थ गाथा' या ग्रंथात समर्थांची काही हिन्दी पदे प्रकाशित झाली आहेत. तथापि धुळे येथील वाग्देवता मंदिरात उपलब्ध असलेल्या जीर्ण-शीर्ण बाडामध्ये समर्थांची असंख्य हिन्दी पदे उपलब्ध आहेत.

समर्थ रामदासांच्या हिन्दी पदावलीचा प्रतिपाद्य विषय 'भक्ती' आहे. 'राम' रामदासांचे आराध्य दैवत आहे. प्रभु रामचंद्राचे अंतर्दर्शन होताच समर्थ आनंदविभोर होऊन म्हणतात -

*'अंतर कि गत अंतर ज्याने ।*
*ज्यानत हे मन हो ॥१॥*
*रामदास कि अंतर लीला ।*
*आंतर भावन हो ॥२॥'* (बाड क्र. ५३)

तत्कालीन सामाजिक आणि राजकीय दुरवस्था पाहून समर्थ कर्मयोगी रामाची आराधना करतात. समर्थांचे 'राम' जसे निर्गुण आहेत तसे ते पतितपावनही आहेत. म्हणून समर्थ म्हणतात -

*'पतित पावन नाम तुम्हारो ।*
*कर हो प्रभु कुछ हित ॥१॥*
*रामदास कहै मैं अपराधि ।*
*कोन करै हो गणीत ॥२॥'* (बाड क्र. ५३)

रामदास 'राममय' होऊन म्हणतात की,

*'मेरे तो ग्यान ध्यान सब राम ।*
*केवळ दुई अक्षर को नाम ॥धृ॥'* (बाड क्र. १)

ज्ञान, ध्यान, राग, रंग, रस, तंत्र, मंत्र, सिद्धी, बुद्धी, आगम, निगम, योग, मुक्ती आणि भक्ती म्हणजे सर्व काही 'राममय' वाटते. समर्थांना! त्यामुळेच संसाराचा महासागर पार करावयाचा झाल्यास समर्थांना 'राम' मोठा आधार वाटतो.

*'रामदास कहे येक रामबीन ।*
*कोउ उतारे पार ॥१॥'* (बाड क्र. ५३)

समर्थांचे 'राम' सर्वशक्तिमय, सर्वव्यापक, आणि अखंड ज्योतिस्वरूप आहेत. अशा रामाचा परिचय आत्मज्ञानाशिवाय होऊ शकणार नाही. म्हणून समर्थ म्हणतात -

*'आत्मज्ञान की खबर न ज्याने ।*
*और ध्यान जबक हुआ तो कक्याजी ॥१॥'*
(बाड क्र. ११६६)

आत्मज्ञानाच्या बळावर 'अनहद ध्वनी' ऐकता येईल या गोष्टीवर समर्थांचा मोठा विश्वास आहे.

तत्कालीन हिंदू-मुसलमानांमधील झगडा पाहून समर्थ सर्व समाजासाठी ऐक्य भावनेचा सम्यक पाठ ठेवतात. जात आणि धर्म यांच्या नावावरील झगडा व्यर्थ आहे हे सांगताना समर्थ म्हणतात -

*'येक ही जुमीन येकहि पानी ।*
*येक आतश आसमान ॥१॥*
*येक बाउ आलम चलावत ।*
*येक ही चंद्रश्रुभान ॥२॥*
*रे भाई कायकु लडते लडते सब पडते ॥धृ.॥*
(बाड क्र. ५३)

अशा शब्दामधून समर्थांनी सामाजिक ऐक्य भावनेतून सामाजिक जागरण घडविले आहे. सर्वांसाठी एकच सूर्य प्रकाश देतो, सर्वांसाठी एकच आकाश, जमीन आणि पाणी असताना नाहक झगडा करण्यात काय अर्थ आहे? असा सर्वांसाठी समर्थ उपदेश करतात.

समर्थ रामदासांच्या हिन्दी पदावलीमध्ये करुणा, वात्सल्य, वीर आणि शांत रसांचा उत्तम आविष्कार आढळतो. 'लोकरंजना'पेक्षा 'लोकोद्धार'च समर्थांच्या हिन्दी पदावलीचा प्राण मानला जातो. तत्कालीन पद-भ्रष्ट समाज पाहूनच समर्थ सर्वांसाठी प्रयत्नवाद, पुरुषार्थ आणि क्षात्रधर्माचा तेजस्वी शब्दपाठ देतात. लोकांच्या भाषेत लोकहित साधण्यासाठीच समर्थांनी हिंदी पदरचना केली.

समर्थांच्या हिन्दी पदावलीत प्रसाद, माधुर्य आणि ओज हे तीनही काव्यगुण विद्यमान आहेत. प्रसाद गुणाने परिपूर्ण समर्थांचे हे एक पद -

*'महाराज मैं तो पतित ॥धृ.॥*
*पतित पावन नाम तुम्हारो ।*
*कर हो प्रभु कछु हित ॥१॥'* (बाड क्र. ५३)

शेवटी 'राम' हाच स्वास्थ्यपूर्ण समाजजीवनाचा आधार आहे असे सांगताना समर्थ म्हणतात -

*'कोउ न आवे सात ।*
*रामबीन कोउ न आवे सात ॥*
*यो ही मेरा योही मेरा ।*
*झुटी है सब बात ॥१॥*
*जो कछु है सो झुटा है रे ।*
*दो दिनका सांगात ॥२॥*
*दास कहै सुन हो जन चातुर ।*
*छोरी चले एक गात ॥३॥'* (बाड क्र. १३७)

हिन्दी पदावलीमधून समर्थ रामदासांनी सर्वांगीण समाज विकासासाठी केलेले विवेचन आजही सर्वांना अंतर्मुख करून सोडते.

**संदर्भ : समर्थ रामदासांची हिन्दी पदावली**
संपादक : प्राचार्य रा. तु. भगत

# ‘समर्थ’ कुटुंब संस्था : ‘माणूस’ घडवणारी प्रयोगशाळा!

**प्रवीण दवणे**

*ब ३०३ राजहंस, लुईस वाडी, ठाणे (पश्चिम) ४०० ६०४*

*नाना वेष नाना आश्रम । सर्वांचे मूळ गृहस्थाश्रम ।*
*येथे पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ।।*

तिन्ही लोक आनंदाने भरून पावण्याचे सामर्थ्य गृहस्थाश्रमात आहे. मात्र तो गृहस्थाश्रम कोणता-कसा अपेक्षित आहे ते संतश्रेष्ठ रामदासांच्या चिंतन सोबतीनं जाणून घेणे हीसुद्धा एक साधना आहे. समर्थ रामदासांचे विचार जाणून घेताना एक गोष्ट आपल्या ध्यानात येते ती म्हणजे ह्या संतश्रेष्ठाने कुठलीही गोष्ट नाकारलेली नाही, मात्र ती कशी स्वीकारावी याचे अत्यंत साक्षेपाने, सुस्पष्टपणे निरूपण केले. अध्यात्मातील गूढ संकल्पनांचे विलक्षण सोपेपणाने निरूपण करतानाचे संत रामदास विशेषत: गृहस्थाश्रमाचे विवेचन करताना अगदी वेगळे भासतात. एरवी त्यांच्यातील तपस्वी सद्‌गुरू समर्थरूपाचे दर्शन ठायीठायी होते; पण गृहस्थाश्रमासंबंधी ते जेव्हा बोलू लागतात, तेव्हा ते अगदी आपल्या घरातील कनवाळू, ज्येष्ठ जन्मजिवलग होतात. त्यांचे शब्द, पाठीवरचा मायाळू स्पर्श होतो. आपल्याला काय करावे, काय करू नये हे गृहस्थाश्रम धर्माबद्दल सांगताना त्यांच्या वाणीत एक आगळीच आपुलकी जाणवते. खरं म्हणजे गृहस्थाश्रमाबद्दल आपल्याला सांगताना ते दशदिशांचा आनंद त्रिलोकात वावरणारे समर्थ न वाटता पंचेद्रियांच्या पंचसंवेदनांचा प्रपंच सांभाळून आत्मिक आनंदाचीही साधना कशी करता येईल, हे सांगणारे ‘गृहस्थ’ होतात.

ह्या पृथ्वीतलाचे आनंदलोकात रूपांतर करताना बहुसंख्येने असणाऱ्या प्रापंचिकांच्या मदतीनेच ते साधावयाचे आहे, हे समर्थांना माहीत आहे. म्हणून अध्यात्माची जडजंजाळता क्लिष्ट करून ह्या सामान्य जनांना अधिक दूर लोटण्यापेक्षा उलट ते त्यांनी हौसेने स्वीकारलेल्या गृहस्थाप्रमाणेच गुण गाऊ लागतात. एक दिलासा देतात, बाबांनो, ‘आपण गृहस्थाश्रम स्वीकारला आहे म्हणजे काही पाप केलेले नाही बरे, उलट आत्मज्ञानासाठी विश्वात संचार करणाऱ्या तपस्वी साधकांनाही गृहस्थाश्रमी जनांची सोबत लागते’ असे सांगून अधिक सखोल नेण्यासाठी मायेची सोबत देतात.

*गृहस्थाश्रमी निर्माण जाले । आपला आश्रय टाकून गेले ।*
*परंतु गृहस्था गृही हिंडो लागले । कीर्तिरूपे ।।*
*या कारणे गृहस्थाश्रम । सकळामध्ये उत्तमोत्तम ।*
*परंतु पाहिजे स्वधर्म । आणी भूतदया ।।*

यातील ‘परंतु पाहिजे स्व-धर्म ’ ह्या त्यांच्या निरूपणात गृहस्थाश्रमाचा गाभा येऊ लागतो. ‘विश्व स्व-धर्म सूर्ये पाहो’ ह्या माउलींच्या पसायदानाशीच ह्या स्वधर्माचे नाते आहे. एखादी अवस्था, आयुष्यातील कर्तव्यांची अपरिहार्यता नाइलाजाने पूर्ण करण्यापेक्षा त्यात ‘स्वधर्म’ साधना आली तर कोणताही आश्रम उत्तमातला उत्तम

होऊ शकतो. म्हणून याला गृहस्थाश्रमही अपवाद नाही, हे समर्थ आवर्जून सांगतात. समर्थांच्या अशा आपुलकीच्या शब्दामुळे साधक-वाचकही त्यांच्या अधिक जवळ जाऊ शकतात. श्रोते आणि ग्रंथसाधक ह्यांच्याशी मनगुज सांगण्याची इतकी प्रस्तावना केली की मग समर्थांतले 'समर्थ' सद्‌गुरू गृहस्थाश्रमातील स्वधर्माचे निरूपण अधिक तपशीलपूर्वक करू लागतात.

गृहस्थाचे घर-त्याच्या गणगोतासह असलेला संसार अज्ञानाधिष्ठित असेल तर गुंता होऊ शकतो; पण त्याचवेळी जर अध्यात्माचे, आत्मशोधाचे अधिष्ठान असेल तर ती संधीही होऊ शकते. समर्थ–गृहस्थाश्रम हा कसा अर्थपूर्ण–सखोल होऊ शकतो आणि स्वयंकेंद्री संकुचितपणाहून विशाल होऊ शकतो याची 'गुरुकिल्ली'च हाती देतात.

*प्रपंची पाहिजे सुवर्ण । परमार्थी पंचिकर्ण ।*
*महावाक्याचे विवरण । करिता सुटे ॥*

परमार्थाच्या संचिताने, सद्‌गुरू सत्संगाच्या साधनेने ह्या प्रपंचात राहूनही अलिप्त राहता येते, हे 'अलिप्त'पण कर्तव्याविन्मुख नाही, ते कर्तव्य साधतानाही ज्ञानदृष्टीने मिळविता येते. हा वरवर साधा वाटणारा – पण गाभ्यातला संकेत समर्थ देतात. ते आता आपल्याला अधिक खोलखोल घेऊन जातात. समर्थांच्या कोणत्याही मुद्द्याचे मुख्य सूत्र हे 'अखंड ते सावधपण' हेच आहे. भूमिका कुठलीही असो– ती पूर्ण करताना गाफील राहाणे, वैचारिक सैल राहाणे ह्या संतश्रेष्ठाला मुळी मान्यच नाही. एकदा ते 'सावधपण' अंगीकारता आले की पुढचा पथ प्रकाशित होत जातो. प्रापंचिकाला हेच पुन्हा सांगण्याचा प्रयत्न समर्थ करतात.

*प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।*
*प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥*

आता इतके स्वच्छ सांगितल्यावर अजून काय हवे? आधी स्वेच्छेने प्रपंचात शिरकाव करायचा, गृहस्थाश्रम स्वीकारायचा आणि नंतर मात्र 'अप्रमाण' राहायचे हा दांभिकपणा समर्थांना मान्य नाही. असा अप्रामाणिक हा 'गृहस्थाश्रमी' होत नाही, होतो फक्त 'कुटुंबकाबाडी' । 'आश्रम' ही संकल्पना फक्त एका अवस्थेपुरती नाही, तर 'घर' हा 'आश्रम' होण्यासाठी प्रापंचिकाने जागरुकतेने तेथे विवेक रुजवायलाच हवा, हा आग्रह समर्थ धरतात. देहाचे–मनाचे अवघ्या संवेदनांचे आंतरिक श्रम जेथे निमून जातात– तो आश्रम असतो. केवळ देहपालनाची एक निवाऱ्याची जागा म्हणजे 'घर' नाही. तर ते मानवी जन्माचे आपल्यासह कुटुंबीयांचे आत्मिक कल्याण साधणारे संस्कारकेंद्र व्हावे– हे त्रिकालाबाधित सत्य समर्थ सांगून जातात. ज्याने परमार्थ विचाराशीच फारकत घेतली आहे असे कुटुंबकाबाडी फक्त दु:खीच होतात. कारण ह्या दु:खाचीच तर व्यवस्था त्यांनी आपल्या बेसावध कर्मांने केलेली असते ना!

*म्हणौन सावधानपणे । प्रपंच परमार्थ चालवणे ।*
*ऐसे न करिता भोगणे । नाना दु:खे ॥*

हा त्यांचा विचार प्रापंचिकाला अंतर्मुख करणारा आहे. परमार्थाचे अधिष्ठान विस्मरून गृहस्थाश्रम करणाऱ्या प्रापंचिकाबद्दल समर्थ व्याकुळ होतात. त्यांच्या स्वरात, सांगण्यातही एक करुणामय तळमळ निर्माण होते. अरे गृहस्था, परमार्थ सोडून जर प्रपंच करू पाहाशील तर फक्त मरणवेदना जगशील रे! आरंभी लौकिक रिपुरंगात जाणवणार नाही, पण पुढेपुढे परमकष्टी होशील.

*परमार्थ सांडून प्रपंच करिसी । तरी तू येमयातना भोगिसी ।*
*अंती परम कष्टी होसी । येमयातना भोगितां ॥*

ह्या समर्थांच्या वचनात हा कळवळा जाणवतो. समर्थांना प्रापंचिकांच्या मर्यादा पूर्ण माहीत आहेत; परंतु म्हणून 'परमार्थ अवघा चि बुडवावा' हे मात्र त्यांना मान्य नाही. सुखाने प्रपंच करतानाही, कुटुंबापलीकडेही एक अफाट विश्व आहे, प्राणिजन आहेत, समाज-कल्याणाची गरज आहे, याची जाणीव प्रापंचिकाला असणे आवश्यक आहे.

*प्रपंच सुखे करावा । परी काही परमार्थ वाढवावा ।*
*परमार्थ अवघा चि बुडवावा । हे विहित नव्हे ।।*

यातील 'परी काही परमार्थ वाढवावा' यामधून समर्थ गृहस्थाश्रमी व्यक्तीची झेपही जाणून आहेत. हे ध्यानात येते, पण म्हणून परमार्थाला सोडचिठ्ठी देणे त्यांना मान्य नाही. आजही आपल्याला, वय वाढले–तरी जाणीव न वाढलेले, व शेवटपर्यंत लंपटपणे कुटुंबीयांच्या छायेमायेला बिलगलेले प्रापंचिक दिसतात. आत्मीयता वेगळी व मायेचा गुंता वेगळा! प्रापंचिकाने कर्तव्य केलेच पाहिजे, पण केवळ 'माझे घर माझा संसार' म्हणजेच कर्तव्य नाही. भिंतींनी अडलेले घर– हे ज्ञानाने विश्वात्मक होऊ शकते. पण जरा पलीकडे पाहा तर खरे, हे समर्थांचे गृहस्थाला सांगणे आहे. केवळ विषयमग्न प्रापंचिकाच्या लाजिरवाण्या आसक्तीचा समर्थ अगदी संयत शब्दांत उपहास करतात. हा उपहास केवळ कुचेष्टेचा नाही, त्यात त्याची काळजी आहे, कर्दमातून त्याने साक्षी भावाच्या काठावर यावे, ही आस आहे.

*द्रव्य दारा तें चि तीर्थ । द्रव्य दारा तो चि परमार्थ ।*
*द्रव्य दारा सकळ स्वार्थ । म्हणे तो बद्ध ।।*

फक्त ऐहिकता–घर, संसार– या पलीकडे काही आहे, याची जाणच प्रापंचिकबद्धांना नसते. गमतीने ते म्हणतात– हे एवढेच त्यांना 'तीर्थ-परमार्थ' वाटते आणि अशा जीवनप्रवाहाचे संजीवन न कळलेल्या, थबकलेल्या, आटलेल्या जीवांना वाटते–आपल्याला प्रपंच कळलाय. खरेतर त्यांना मनुष्यजन्माचे 'अनमोल' कळलेलेच नसते.

*परमार्थविषई अज्ञान । प्रपंचाचे उदंड ज्ञान ।*
*नेणे स्वये समाधान । या नाव बद्ध ।।*

परमार्थ काय किंवा प्रपंच काय, केवळ बाह्य सोंगाढोंगात नाही, फक्त दिव्य परम समाधानात 'अंतरिची खूण' ज्याला जाणवते, त्यातच असतो. परमार्थाचा एक विकसित प्रपंच असतो, तर प्रपंचातही एक विकसित परमार्थ असतो. हे कळले नाही तर 'तयास प्राप्त झाला खेद । काळांतरी ।।' हे सत्य समर्थ सांगतात. अरे, गृहस्थाश्रम, प्रपंच ही एक देहाची, लौकिकाची अवस्था आहे. ती अवस्था मागे जाऊन परम आनंदाकडे निघायचे आहे, हे आत्ताच समजून घे! वेळ-काळ फक्त प्रपंचाच्या सोसात व विषयातून मिळणाऱ्या सुखाच्या भासातच घालवशील तर श्रमाशिवाय हाती काहीही येणार नाही.

*प्रपंच जाईल सकळ । येथील श्रम तो निर्फळ ।*
*आता काही आपुला काळ । सार्थक करू ।।*

समर्थांचे हे 'सांगणे' फक्त त्यांच्या समोर उपस्थित असलेल्या प्रापंचिकांपुरते नव्हते, आज-उद्या सर्वांच्या भवोद्धारासाठी–वेळेचे, काळाचे अर्थपूर्ण नियोजन करण्यावर त्यांचा भर आहे. त्यासाठी ज्याला सहजस्वार्थी विकारी जगात वावरण्याची संधी आहे, अशा सांसारिकाने जगण्यातले 'आडमार्ग' कायमचे त्यागावेत, हे पहिले सांगणे आहे. गृहस्थाश्रम साधणाऱ्या प्रापंचिकाने आपला व्यवसाय-नाती सांभाळताना पहिली गोष्ट केली पाहिजे ती, 'वाममार्गाचा त्याग'! भ्रष्ट मार्गाची संपत्ती, व्यसन, विषयलोभ हे माणसाला अधिकच गर्तेत नेतात. वर्तमानस्थितीत आपण हे अनुभवतो आहोत. माणूस रोषणाईत दंग आहे, पैशाप्रमाणे बाह्यसुखाचा चलनफुगवटा आहे; परंतु अर्थ व जीवनार्थ विरत चालला आहे. घराघरात आज दिसणारी अशांती कशामुळे आहे? तर जो तो 'अनमार्गी' म्हणजे उन्मार्गी झाला आहे. नात्यात ना विश्वास, ना लीनता, ना आदर. मग काल काय, आज काय गृहस्थाश्रमात सुखाचा वारा मिळेल तरी कोठून?

*सन्मार्ग तो जीवी धरणे । अनमार्गाचा त्याग करणे ।*
*संसारिका त्याग येणे । प्रकारे ऐसा ।।*

प्रपंच करताना, 'एक सूक्ष्म अंतर्त्याग' हवा; तरच नित्य उपासनेची बैठक जमवता येते. उत्तम श्रवण, मनन, चिंतन करता येते. आपली विहित कर्मे करतानाही नामस्मरण करण्याची बुद्धी होते, नाहीतर गृहस्थधर्माच्या

नावाखाली प्रपंचाचा चिखल करीत– त्यातच कीटक, जीवाणू होऊन जगत राहिला, तर ते काय जीवन आहे? समर्थांनी पुन:पुन्हा ह्या प्रपंचातील परमार्थ साधनेविषयी सांगितले आहे.

संत समर्थांची दु:खाकडे पाहाण्याची दृष्टी पूर्ण सकारात्मक आहे. प्रपंच म्हटला की, दबक्या पावलांनी येणारी दु:खेही आलीच. सुख–सुख– म्हणता म्हणता मागे केव्हा अवचित दु:खाची सावली येऊन उभी ठाकते ते कळत नाही. 'सगळे काही बरे चाललेय' अशा अवस्थेत जीवनाचे मोल कळत नाही. ईश्वराचे स्मरण करावे असेही वाटत नाही. किंबहुना काही दुरात्म्यांना अशा काळात 'तो' नाहीच, असाही शोध लागतो. शिखराकडे नेणाऱ्या वाटांची जशी आयुष्यात संधी असते, त्याप्रमाणे अशांतीच्या गर्तेत नेण्याचीही एक व्यवस्था असते. प्रापंचिकाचा हा काळ खरेतर सत्त्वपरीक्षेचा असतो. संत समर्थ म्हणतात– हाच तो क्षण–परमार्थ जाणून घेण्याचा! 'संसार' काय आहे, त्यातील असार काय आहे आणि जीवनाचे 'सार' काय आहे ते जाणून घेण्याचा हाच तो काळ! याचवेळी माणूस सद्‌गुरूकडे वळण्याची शक्यता दाट असते.

*जो संसारदु:खे दुखवला । जो त्रिविधतापे पोळला ।*
*तो चि अधिकारी जाला । परमार्थविषी ।।*

दु:खाकडे असेही 'पाहता' येते. वेदनेचे पंख करण्याची आणि परमार्थाच्या अवकाशात भरारी घेण्याची सकारात्मक दृष्टी समर्थ देतात. 'गृहस्थाश्रम' ही संसाराची पारमार्थिक अवस्था आहे. सर्वच प्रापंचिक 'गृहस्थ' नसतात, तसे सर्व संसार आश्रम नसतात. घराला व प्रपंचाला गृहस्थाश्रमाचे रूप येण्याची सदगुरुकिल्ली संत देतात.

*जया संसाराचा त्रास । तयासि च उपजे विस्वास ।*
*विस्वासबळे दृढ कास । धरिली सद्‌गुरूची ।।*

परिवर्तन ही साधना आहे. एका रात्रीतील ती किमया नव्हे, पण झाले पाहिजे ही ओढ तर हवी ना! प्रपंच करताना अवघ्या घराचा हा जाणीवपूर्वक दृष्टिकोन हवा की, ह्या प्रपंचाच्या साहाय्याने मनुष्यजन्माचे सार्थक करायचे आहे! एकदा का हा अंतरीचा सूर लागला की, व्यक्तीचा प्रपंच काय किंवा पंचेंद्रियांच्या, पंचसंवेदनांच्या सोबतीने करावयाचा जीवनाचा प्रपंच काय – 'नेटका' होत जातो.

प्रपंच 'नेटका' करण्याचे असंख्य पथ समर्थांनी प्रकाशमान केले आहेत. त्या पथावरील प्रत्येक पाऊल कसे अखंड सावधपणेच टाकले पाहिजे. ह्याकडे समर्थांचा कटाक्ष आहे. संतांच्या मांदियाळीत समर्थ हे असे योगिराज आहेत की, त्यांनी लौकिकाकडून अलौकिकाकडे जाण्याचे मार्ग - त्यातील अडथळे आणि उपाय - सर्व परखडपणे सांगितले आहेत. हे सांगताना समर्थांच्या प्रबोधन स्वरातील आरोह - अवरोहही आपल्याला अक्षरश: जाणवतात. गृहस्थाश्रम धर्म तेजाळण्यासाठी घ्यावयाच्या सर्व सावधानतेच्या सूचना ठायी ठायी केल्या आहेत. अभ्यासकांना त्यात पुनरुक्ती वाटते; पण साधकांना त्यात कळवळा जाणवतो.

प्रापंचिकाला काल-आज-उद्या सर्व काल जर खरी गरज असेल तर संस्कारांची! आज तर ह्या घर नावाच्या संस्कारकेंद्राची समर्थवाणीनेच शुद्धता होण्याची गरज आहे. आज वाढत चाललेला परस्परातील अ-संवाद! विसंवाद! अतिसंवाद! ज्येष्ठांविषयींचा पराकोटीचा अनादर! चैनविलासाला मिळालेली दुर्दैवी प्रतिष्ठा आणि त्यामुळे मन:शांती दूरच; पण घराघराचे होत चाललेले 'गॅस चेंबर्स' अशा काळात समर्थ पुन:पुन्हा आणि पुन:पुन्हा उगाळले पाहिजेत! समर्थवाणीला कधीच पर्याय नव्हता; वर्तमानस्थितीत तर तो अत्यंत अपरिहार्य आहे.

*आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थविवेका ।*
*येथे आळस करू नका । विवेकी हो ।।*

या अत्यंत प्रसिद्ध समर्थवाणीतील प्रत्येक शब्द विवेकाकडे नेणारा आहे. 'आधी' सर्वप्रथम प्राधान्य गृहस्थाश्रम नेटका होऊ द्या हो! मग 'घ्यावे' परमार्थ विवेका । यात तर खोच आहे. या नेटक्या प्रपंच साधनेतून

आपोआपच परमार्थविवेककडे जातो तोच गृहस्थ! परंतु त्या आधी जर काही या मार्गात आड येत असेल तर तो 'आळस'! समर्थांनी 'आळस आणि आळशी' ह्या मुद्द्यावर जेवढे प्रबोधन केले असेल, तेवढे कुणी केले असेल की नाही कुणास ठाऊक! हा आळस एक प्रकारचा नाही. देहाचाच नाही, विचाराचाही, श्रवण-मनन-चिंतनाचाही! ह्या केवळ एका आळसापोटी जी असंख्य दु:खाची पिलावळ दडली आहे, तेवढी अन्य कशात नसेल. समर्थांनी प्रापंचिकाला, गृहस्थाला आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीला - चैतन्याचा, तत्परतेचाच संस्कार दिला आहे. कुटुंबसंस्था गतिमान, प्रवाही व सर्व दु:खांसह-अमृतत्वाकडे न्यायची असेल तर कोणते आग्रह घरात हवेत, घरातल्या प्रत्येकाने-प्रत्येकाशी कसे वागावयास हवे - याचे निरूपण अनेक ठिकाणी केले आहे. कधी मायेने, कधी स्पष्टवक्तेपणाने, कधी सूचकतेने-कधी रूपकाच्या माध्यमाने, कधी एखाद्या दृष्टान्त कथेने! हे सर्व मांडणे हा प्रदीर्घ ग्रंथाचाच विषय आहे. मात्र गृहस्थाश्रमातून–परमार्थ साधनेकडे निघालेल्या कुटुंबसंस्थेतील आचार-विचारांचे त्यांचे काही आग्रह जाणून घेणे शक्य. विविध ज्ञानदशकातील अनेक समासातून ते संदर्भाप्रमाणे टिपले आहेत.

प्रपंचात काय–व्यवसायात काय पहिला संस्कार आहे–विवेकाचा! कुठलेही कर्म करताना 'विचार' हवाच! नाहीतर आधी म्हटल्याप्रमाणे आपण फक्त 'कुटुंबकाबाडी' होतो.

*विचार न करिता जे जे केले । तें तें वाऊगे वेर्थ गेले ।*
*म्हणोनि विचारी प्रवर्तले । पाहिजे आधी ।।*

एकदा का प्रापंचिकात 'विवेक' जागा झाला की आपोआपच तो साधक होतो; मग प्रपंच हा अडथळा होत नाही. ते एक संस्कारकेंद्र होते, नवी पिढी घडविणारे! उत्तम गुणांची ओढ–हा त्यातला महत्त्वाचा संस्कार! सात्त्विक, सर्वोत्तम गुणांचा ध्यास प्रत्येकाला असायला हवा. अशा माणसांची दिनचर्याच वेगळी असते. प्रत्येक क्षणाचा तो जागरूकतेनेच उपयोग करतो. समर्थांना–एकही क्षण कुणी वाया घालवणे हे मान्यच नाही. घरातील प्रत्येकाला जर वेळेचा उपयोग व मनुष्य जन्माबद्दलचे सार्थकपण याबद्दल अखंड सावध राहाण्याचा विवेक उमजला, तर काय मौज होईल! कुटुंबात जर वेळ कशात फुकट जात असेल तर व्यर्थ अहंकारात आणि षड्‌विकारांच्या अतिरेकात. कित्येकजण बाहेर अगदी शामळू ससे असतात; पण घरात पत्नी-मुले व विशेष म्हणजे आईबापावरही खेकसण्यातच त्यांना पौरुषाचे सार्थक वाटते. अशा भांडणघरात लक्ष्मी थांबते कशाला! जेथे सरस्वती नाही–तेथे लक्ष्मी नाही. मूर्खाची आणि पढतमूर्खाची अनेक लक्षणे समर्थ सांगतात. त्यातली बरीच आपली पाठही असतात; परंतु त्यातून समर्थांनी जो कुटुंबसंस्कार– सुसंवादाचे मोल सांगितले आहे त्याकडे अधिक ध्यान द्यावेसे वाटते. 'राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तदनंतरे ।।' हे वचन तर प्रसिद्धच आहे. हे 'बहुत' म्हणजे केवळ घराबाहेरचे घटक नाहीत. कुटुंबातल्याही व्यक्तींशी मन जुळते ठेवायला हवे.

*जिवलगांस परम खेदी । सुखाचा शब्द तो हि नेदी ।*
*नीच जनांस बंदी । तो येक मूर्ख ।।*

अत्यंत मोलाचा असा हा कुटुंबसंस्कार! स्वार्थासाठी सामान्यजनांसाठी गोड आणि स्वजनांशी मात्र तुसडेपणा समर्थांना मान्य नाही.

*घरीच्यावरी खाय दाढा । बाहेरी दीन बापुडा ।।*
*ऐसा जो कां वेड मूढा । तो येक मूर्ख ।।*

अशा लक्षणांतून प्रापंचिक जीवन जगणाऱ्या प्रत्येकालाच समर्थांनी साक्षेपाने जागे केले आहे. सुसंवादाचा आणि परस्परांच्या आदराचा, अतिशय मोठा मूल्यसंस्कार संत रामदासस्वामी सांगतात. प्रपंच करताना दूरदृष्टी असलीच पाहिजे, हा 'समर्थ' आग्रह आहे. त्यातील एक आग्रह किती साधा, लौकिक आहे पाहा! आज धनसंचयिका किंवा भविष्यनिर्वाहिका निघाल्या आहेत, पण समर्थांनी बचतीचा व कुटुंबातील सर्वांसाठी जो

धनविषयक विचार मांडला आहे, तो अंतर्मुख करणारा आहे. आजही आपण अनेकजण असेच पाहातो; जेवढे धन मिळवतात तेवढे सर्वच्या सर्व संपवून टाकतात; मग पुढे कठीण काळात त्यांची स्थिती शोचनीय होते. म्हणून बचत, काटकसरीचा मूल्यसंस्कार समर्थ देतात–

*मेळविती तितुके भक्षिती । ते कठीण काळी मरोन जाती ॥*
*दीर्घ सूचनेने वर्तती । ते चि भले ॥*

एवढे सुस्पष्ट, परखड पण आत्मीयतेने कुणी सांगितलेय? समर्थ, हा कुटुंबातील वर्तनाचाच संस्कार करतात. समर्थांनी लौकिकातील आणि परमार्थातील दोन्हीकडील व्यवहार स्वच्छ सांगितला आहे. आजच्या आपल्या सूत्रानुसार प्रापंचिकाला जे व्यवहारज्ञान व भान त्यांनी सांगितले तोही जीवनातील आवश्यक भाग आहे. कष्टाने जे संचित जमा झाले आहे, ते अविवेकाने उधळू नये. धनही अशा ठिकाणीच खर्च करावे, की ज्यातून काहीतरी नवे हाती येईल. बुद्धिमान व जागरूक शेतकरी आपल्याजवळील बीज नापीक जमिनीत पेरेल तर काय हाती येणार? प्रापंचिकानेही दूरदृष्टीनेच व्यवहार करावा.

*बीज उगवेलसे पहावे । तरी मग द्रव्य घालून घ्यावे ॥*

ही ओवी हेच सांगते. योग्य व्यवहाराचा हा संस्कार कुटुंबसंस्थांसाठी आजही कधी नव्हे एवढा मोलाचा आहे. घरात काय–जगात काय–'भल्याचि संगती धरावी' हे तर सांगतातच, पण विश्वात प्रिय होण्याचे महत्त्वाचे सूत्रही समर्थ सांगतात. ते म्हणजे–

*जगामध्ये जगमित्र । जिव्हेपासी आहे सूत्र ॥*

मधुर बोला, आपला खरंच कोण आहे ते जाणा, आर्ताचे अंतर शोधा. जगाला आपण आवडले पाहिजे असे वागा. मित्राच्या रूपात येणारा वैरी जाणून घ्या. अंधश्रद्धेला जन्मात थारा देऊ नका, हे सारे सारे समर्थांनी अगदी–अगदी सोप्या शब्दांत सांगितले आहे. समर्थांच्या काळातही अंधश्रद्धा व बुवाबाजीने उच्छाद मांडला होता, आजही तो कायम आहे. नि:संग संतांपेक्षा पंचतारांकित संत गृहस्थांना वश करीत आहेत. आजही धनासाठी हत्या होत आहेत. भ्रमाचे साम्राज्य तेवढेच आहे. कुटुंबात विवेक साधून जगू इच्छिणाऱ्या गृहस्थांना 'विवेकेविण जो भाव । तो भाव चि अभाव ।' अशा स्पष्ट शब्दांत समर्थ जागृत करतात. समर्थांच्या मूल्यशिक्षणाचा प्रमुख आधार जसा विवेक, अखंड सावधानता त्याप्रमाणे साधन सातत्यावर त्यांचा भर आहे. 'गृहस्था'कडे ते त्याचा आग्रह धरतात. आपल्या कुटुंबात 'भजन साधन अभ्यास । येणे पाविजे परलोकास । हे मूल्य रुजवायलाच हवे. ज्या घरात ग्रंथवाचन आहे, भगवद्‌भजन आहे, जीवनाचा जागेपणाने अभ्यास आहे, ते जीवनच संजीवन होते. हे अंती समर्थांचे सांगणे आहे. घर-संसार, साधक गृहस्थाने 'अखंड येकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा ।' हे सांगायला ते विसरले नाहीत. 'अभ्यास' ही एक निरंतर प्रक्रिया आहे. ती थांबू नये. ह्या अर्थाने कोणतीही प्रापंचिक दृष्टी 'जीवनाचा शिष्य'च आहे, साधना हवीच.

आज प्रसारमाध्यमांनी फक्त 'बघण्याचा' काळ घरादारात मांडला आहे. आणि काय काय 'बघावं' लागणार ठाऊक नाही; परंतु वाचन, मननाबरोबर 'श्रवणा'चा मूल्यसंस्कार समर्थ रुजवतात. समर्थांच्या काळात हरिकथा निरूपणाचे श्रवण त्यांना अपेक्षित असेल. आज अनेक मान्यवर वक्ते, चिंतनशील निरूपक व्याख्यानमालांमधून बोलत असतात. गृहस्थ–गृहिणीने नव्या पिढीला श्रवणाचीही सवय लावायला हवी. सतत संगणकाशी हाताचा व डोळ्यांचा खेळ खेळताना श्रवण राहून जाते. समर्थांचा श्रवणमूल्य संस्कार हेही त्यांच्या प्रबोधनाचे एक ज्ञानसूत्र आहे.

*आळसाचे संरक्षण । परमार्थाची बुडवण ।*
*या कारणे श्रवण । केले चि पाहिजे ॥*

सतत, उत्तम ऐकत राहिलेच पाहिजे. कुणाला तोचतोचपणा वाटला तरी हरकत नाही. सामान्यजन

अत्यंत अल्पपरिणामी असतात. त्यांना पुन:पुन्हा सांगत राहायला लागते. आपल्या घरातही आपल्यासह हा श्रवणाचा संस्कार आवश्यकच आहे.

*ऐकल्याविण कळेना । हे ठाऊके आहे जना ।*
*या कारणे मूळ प्रेरणा । श्रवण आधी ।।*

नामस्मरणाचा सातत्याचा आग्रहही एक मूल्यसंस्कार आहे. कुटुंबकबिला सांभाळताना, व्यवसाय करतानाही नामस्मरण करणे. हे जीवनातले कित्येक गुंते सोडवणारे आहे.

*चालता बोलता धंदा करिता । खाता जेविता सुखी होता ।*
*नाना उपभोग भोगितां । नाम विसरो नये ।।*

आदर्श गृहस्थाश्रमात प्रापंचिकाने, 'नामस्मरण' रुजविलेच पाहिजे. काही गोष्टी नुसत्या वाचनाने कळत नाहीत. त्याची अनुभूतीच यावी लागते. दोन वेळा जेवण, आणि ढोबळ दिनचर्येपलीकडे आपले 'घर' नेणे हे आजच्या काळात स्त्री-पुरुष-पति-पत्नी-आई-बाबा ह्या सर्वांचे प्रथम कर्तव्य आहे. मनाच्या अशांतीसह कुटुंबसंस्था तुटत–फुटत चालली असल्याचा भीषण काळ अगदी दारात आहे. अशा वेळी अक्षरश: जिवाच्या आकांताने वेढणाऱ्या विलासवादापासून कुटुंब वाचवण्याची गरज आहे. सामाजिक भ्रष्टता, विकारांना प्रतिष्ठा, आणि बुद्धिवादाच्या नावाखाली बुद्धिभेद, व्यावसायिकतेच्या नावाखाली लुच्चेगिरीला ऊत हे आजचे वर्तमान! त्यात वाढणारी आपल्या घरातील नवी पिढी वसुदेवाच्या डोक्यावरील पाटीवर असलेल्या तान्ह्या श्रीकृष्णासारखी वाचवायची असेल, तर घराला नुसता पालनकर्ता नको आहे, पोषणकर्ता हवा आहे. निसर्ग पालन करण्याचे काम करेलच; पण समर्थांना मनातील 'गृहस्थ' स्वत:सह भोवताली असलेल्या प्रियजनांच्या आंतरिक पोषणाचे काम करतो. हे पोषण संस्कारांचे! संवेदनांच्या तरलतेचे! सुदृढ जीवनाची त्वरेने साधना करण्यासाठी-मरणाचे स्मरण ठेवून, जीवनरूपी हरीभक्तीसी सादर होणे हाच मुळारंभ आहे.

मनुष्यजन्माची ही संधी आपले काहीही कर्तृत्व नसताना ह्या जन्मी लाभली, ती विवेकाने जाणून घेण्यासाठी हा प्रपंचयोग आहे. समर्थांनी जे जे सांगितले–विविध मुद्दे स्पष्ट करीत त्यांनी जे सविस्तरपणे मांडले– ते सर्वच परिपूर्ण माणूस घडण्याच्या ध्यासाने! त्यांच्या दृष्टीने कुटुंब-गृहस्थाश्रम ही 'माणूस' घडवणारी प्रयोगशाळाच!

गृहस्थधर्माने जर हा ध्यास जाणला तरच हा 'आश्रम' काहीसा कळला असे होईल. पुष्कळदा समर्थांनीच सांगितलेली पढतमूर्खाची नवी लक्षणे आपणही नव्या प्रतिभेने सादर करतो, अशा वेळी पुन्हा समर्थांचे स्मरण करून, अवघाचि आळस सारून पुन्हा उत्तमत्वाकडे निघणे हा प्रवास! त्या प्रवासात 'गृहस्थ' मग तो–ती कुणीही असो–काय करू शकतो हे समर्थवाणीच्या सोबतीने केलेला वेडावाकडा प्रयत्न. शिवधनुष्याप्रमाणेच हे श्रीरामधनुष्य पेलणे हे अशक्यच! पण त्यांच्याच आज्ञेने व्यक्त झालेले हे निरूपण त्यांनाच अर्पण.

।। श्री राम ।।

# चाफळक्षेत्राच्या हद्दीतील श्रीसमर्थांच्या संस्मरणीय वस्तू

*इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे*

श्रीरघुवीर रामचंद्र, श्रीरघुवीरपत्नी सीतादेवी व श्रीरघुवीरदास हनुमंत यांच्या हस्तस्पर्शाने, पादस्पर्शाने व वसतीने पवित्र झालेल्या व मानलेल्या वस्तू भारतवर्षात हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत व बलुचिस्तानापासून ब्रह्मदेशापर्यंत अक्षरश: लाखो आहेत. पर्वत, डोंगर, शिखरे, घाट, पठारे, नद्या, ओढे, शहरी, खेडी, देवळे यांना हजारो स्थळी राम, लक्ष्मण, सीता व मारुती यांची नावे असलेली दृष्टीस पडतात. श्रीकृष्ण व पाच पांडव यांचाही ठसा भारतवर्षांतील स्थळांत हजारोने मोजता येतो. ह्या दोहोंच्या खालोखाल बुद्धाच्या संस्मरणीय वस्तू या देशात सापडतात. ऐतिहासिक थोर पुरुषांचे स्मारक करण्याची ही पद्धती नामांकित संत, साधु, शककर्ते, कवी, शास्त्रज्ञ, श्रेष्ठी यांच्याही बाबतीत अवलंबिलेली स्थळोस्थळी अनुभवास येते. तुकाराम, ज्ञानोबा, दासोपंत, एकनाथ, शिवाजी, बाजीराव, नाना फडणीस, अहल्याबाई इत्यादी अनेक थोर व्यक्तींच्या संस्मरणीय वस्तू त्या त्या स्थळी प्रसिद्ध आहेत. महानुभावांनी चक्रधराच्यादेखील संस्मरणीय वस्तूंची यादी करून ठेवलेली मी छापली आहे. तशीच एक यादी पूर्वी चाफळास असताना श्री समर्थ रामदासस्वामी यांच्या संबंधाने चार लोकांना पुसून मी केली आहे. यादी माझ्या मते पूर्ण नाही. परंतु ती पूर्ण व्हावी, लोकांनी व भक्तांनी तीतील व्यंगे व उणिवा सुचवाव्यात, एतदर्थ ती छापून काढणे जरूर आहे. यादी चाफळ क्षेत्रापुरतीच तेवढी केली आहे. चाफळक्षेत्र म्हणजे चंद्रगिरीच्या डोंगरापासून रामपेठपर्यंतचा मांड नदीच्या दोन्ही तीराचा टापू, असा अर्थ मी करतो. समर्थ व क्वचित समर्थशिष्य व समर्थवंश यांच्या कोणत्याही कृत्याने, स्पर्शाने व संगतीने पवित्र झालेल्या वस्तूंची ही यादी ह्या टापूपुरती तेवढी आहे असे समजावे. ह्या सबंध टापूला चाफळखोरे असे नाव आहे.

१. **खुद्द चाफळखोरे.** खोऱ्याच्या पूर्वेस कृष्णानदी व उंबरजगाव. कृष्णानदी वरून चाफळखोऱ्याच्या पश्चिमेस पाहिले असता ते खोरे सहाच्या आकड्यासारखे दुबेळके दिसते. मांडनदीच्या उत्तरेस सुखठानापासून पर्वताची रांग निघून पश्चिमेस रामपेठेवरून रामघळ व वाघदरा या दोन स्थानांतून मांडनदीच्या दक्षिणेस पर्वतांची रांग संपते. मध्ये पश्चिमेस डोंगराचा चिंचोळा भाग निघतो. त्यामुळे खोऱ्याचे दुबेळके झालेले आहे व मूळ पश्चिम पर्वतापासून निघणारे दोन पाणलोट झाले आहेत. या दोन पाणलोटांचा चाफळ गावापाशी संगम होतो. संगमाच्या वरती दक्षिणेकडील पाणलोटाला मांडनदी म्हणतात. ह्या मांडनदीला नाणेघोळाकडील

म्हणजे उत्तरेकडील पाणलोट मिळतो. मांडनदी चाफळ व चरेगाव घेऊन उंबरेजच्या दक्षिणेस कृष्णेला मिळते. चाफळखोऱ्याचा ठोकळ नकाशा :



चाफळखोरे समर्थांच्या उद्योगाची मूळ कर्मभूमी. सबंध खोरेच रामदासी हवेने कोंदाटलेले आहे. चाफळखोऱ्याच्या पर्वत शिखरावरून उत्तरेस महाबळेश्वरपर्यंत, दक्षिणेस वारणेपर्यंत, पश्चिमेस कोयनाखोऱ्यापर्यंत व पूर्वेस माणदेशात शिखरशिंगणापूरपर्यंत नजर पोहोचते. समर्थांच्या नजरेने आनंदवनभुवनाचा जो प्रांत पवित्र झाला तो सर्व प्रांत प्रेक्षकाच्या नजरेचा व भक्तीचा विषय होतो.

२. **रामदासांचा मठ.** प्रथम ही केवळ कुटी होती. येथे प्रथम राहून दासांनी रामाच्या देवलयाचा व महाराष्ट्रधर्म प्रसाराचा व्याप केला. सध्या ह्या मठाच्या जागेवर मठ म्हणून इमारत आहे.

३. **रामाचे देवालय.**

४. देवालयाच्या घुमटाखालील योगविवरिका. हींत समर्थ कधीकधी ध्यानस्थ बसत असत.

५. देवळाखालील भुयार ऊर्फ तळघर. येथेही समर्थ बसत.

६. रामापुढील दासमारुती. समर्थांनी बसविलेला.

७. रामा मागील प्रतापमारुती. ह्या देवळातील प्रत्येक अणुरेणूला समर्थांचा पादस्पर्श, हस्तस्पर्श, पृष्ठस्पर्श व शरीरस्पर्श झालेला आहे. ही जागा समर्थांना फार प्रिय असे.

८. मागील मारुतीच्या पुढील डाव्या बाजूचा बकुळीचा महान जीर्ण वृक्ष. हा समर्थांनी स्वत: लावलेला. बकुळीला बहार आला असता येथे भ्रमर गुंजारव करतात.

९. मागील मारुतीच्या पुढील उजव्या बाजूच्या वृंदावनाच्या चार बाजूला असलेल्या मारुतीरायाच्या मूर्ती. मूर्ती समर्थांच्या वेळच्या. वृंदावन पुन:पुन्हा वेळोवेळी बांधलेले.

१०. रामाच्या देवळातील रामाच्या मूर्ती. खुद्द समर्थांनी स्थापिलेल्या.

११. समर्थांचे अस्थिस्थानचे वृंदावन. समर्थांचे देहावसान व अग्निसंस्कार सज्जनगडावर झाले. परंतु चाफळास शिष्यवृंदांनी काशीस नेण्याकरिता अस्थी ज्या जागेवर आणून ठेवल्या त्या जागेवर वृंदावन बांधले.

१२. शिंगणवाडीचा मारुती. समर्थस्थापित.

१३. शिंगणवाडीच्या मारुतीपुढील जोत्याचा वृक्ष. या जोत्यावर झाडाच्या छायेखाली समर्थ बसत. हे झाड चाफळखोऱ्यात आपल्या जातीचे एकच आहे म्हणतात. समर्थांनी कोठून आणून लाविले कोणास ठाऊक?

१४. शिवाजी महाराजांस उपदेश ज्याच्या तळवटी झाला तो चिंचवृक्ष. हा जीर्ण वृक्ष शिंगणवाडीच्या मारुतीच्या रस्त्यावर आहे. वृक्ष समर्थांच्या वेळीच दोन-चारशे वर्षांचा वृद्ध होता. आता त्याला जीर्ण म्हणण्यापेक्षा जख्ख म्हणणे जास्त शोभेल. सध्या वृक्षाच्या फांद्या कुजून, वृक्ष वार्धक्याने अगदी क्षीण व संकुचित झाला आहे. शिवसमर्थकाली वृक्ष पूर्ण ऐश्वर्यात होता. ह्या वृक्षाचे वय सध्या सात-आठशे वर्षांचे असावे. म्हणजे या वृक्षाने देवगिरीच्या

यादवांचा काळ पाहिला होता. सिंघणवाडी हे नावच मुळी यादववीर जो सिंघण त्याच्यावरून पडले आहे. या झाडाखालून सिंघण, शिवाजी, समर्थ, वगैरे इतिहासप्रसिद्ध महापुरुष गेलेले आहेत. महाराष्ट्रधर्म रक्षण्याचा पहिला वीरमंत्र शिवराजांस समर्थांद्वारा ह्या पुण्यवान व चिरंजीव वृक्षाखाली मिळाला.

१५. साखरबाव – शिंगणवाडीच्या मारुतीकडे जाताना वाटेत लागते.

१६. दासघळ – शिंगणवाडीच्या मारुतीच्या मागे जो डोंगर आहे त्यात असलेली.

१७. रामघळ – दोन मजली आहे ती.

१८. सिंघणवाडी – येथे मठ असून त्याभोवती समर्थनिर्मित विस्तीर्ण पुष्पवाटिका होती. त्या ठिकाणी त्यांच्या व शिवाजीराजांच्या वारंवार भेटी होत. कारण रायगडाहून चाफळास येताना आधीच शिंगणवाडी लागे. राजांचा रस्ता विजापूरच्या ताब्यातील उंबरज वगैरे पूर्वेकडील गावातून प्रथम जात नसे.

१९. कुबडीतीर्थ – रामघळीपासून जवळच आहे.

२०. केळोली येथील रामपेठ.

२१. जांभळी खालील म्हसोबा.

२२. कुंभारकीच्या शेतातील म्हसोबा.

२३. महाराच्या पादुका.

२४. रहाटगाडग्याचा नरसोबा. दाजीबा सांगलीकर समंध झाले, त्यांच्या नावाने या नरसोबाची स्थापना केवळ अलीकडील आहे. समर्थांशी संबंध नाही.

२५. मालवणच्या मुंज्यांनी बांधलेला नदीचा घाट व तट. मुंजे हे मालवणचे बडे सावकार. यांची गलबते समर्थांनी सुरक्षित बंदरास आणिली. याच तटाचा उद्धार पुढे उंबरजकर केशवस्वामींनी केला.

२६. माजगाव येथील मारुती. मारुतीशेजारील चार समाधी माजगावच्या पाटलांच्या आहेत. हे समर्थशिष्य होते.

२७. सुखठाणे. अंगापुराहून रामाच्या मूर्ती आणिताना विसाव्याकरिता ज्या जागी ठेवल्या ती जागा.

२८. केळोली येथील गौतमेश्वर. समर्थांनी उद्धार केला.

२९. नाणेगाव येथील लक्ष्मेश्वर. समर्थांनी उद्धार केला.

३०. चाफळ येथील चाफेश्वर. समर्थांनी उद्धार केला.

३१. माजगाव येथील विस्कटेश्वर. समर्थांनी उद्धार केला.

३२. दिवाकर गोसाव्यांची जागा. समर्थांनी दिवाकरास मठाशेजारी दिलेली.

३३. ढवळ्यांच्या मळ्यातील रामरंग यांची समाधी. हे रामरंग रत्नागिरी प्रांतातील वेळवंडच्या ढवळ्यांच्या कुळातले. यांच्याकडे प्रत्येक एकादशीस निरूपण करण्याचे काम होते.

३४. देवमळा.

३५. हणमंतओढा.

३६. रामटांके – मांगवाड्याजवळील.

३७. रामटांके शेरडुका जवळील.

३८. जाळगेवाडी येथील दिवाकरांचे शेत. समर्थांनी दिलेले.

३९. वनवासवाडी.

४०. रथ

४१. रथाचे वावर

४२. शहापूर येथील उत्सवमूर्ती

४३. शेवरीचे ऊर्फ घुसळखांबाचे झाड. येथे कल्याणांनी दासबोधाची पहिली नक्कल केली.

४४. हत्तीखाना. येथे शिवाजी महाराज आले असता कधीकधी त्यांचा हत्ती बांधीत. पुढे समर्थपश्चात येथे हत्तीखानाच झाला. हत्तीचे महातपण करणारे एक मुसलमान घराणे येथे आहे. मुसलमान हिंदुस्थानचे अवयव बनून गेले होते.

४५. बहिरू महार याचा धोंडा. सदाशिवशास्त्र्याशी महाराने वाद करून शास्त्रीबाबाची रग जिरवली ती जागा. हा धोंडा लोक अद्याप मानतात.

४६. मुंडेघळ ऊर्फ मुंड्यांच्या बाजूची घळ.

४७. रायघाट. शिवाजी राजे पालीवरून चाफळास येत तो घाट. रायगडाहून महाराज खालील मार्गाने चाफळास येत –रायगड-बीरवाडी-प्रतापगड-कोयनेचे डावे पठार-पाली-चाफळ- घोड्यावरून सुमारे दहा-बारा तास लागत. महाराज तलख घोड्यावरून प्रवास फार जलद करीत. रायगडाहून पुण्यास महाराज चार तासांत येत. पुण्यास येण्याचा रस्ता –

| | |
|---|---|
| रायगडमाथा – रायगडतळ (डोलीतून) | ·।· तास |
| रायगडतळ – बोचाघोळतळ (घोड्यावरून) | ·।· तास |
| बोचाघोळतळ – बोचाघोळमाथा (पायी) | १ तास |
| बोचाघोळमाथा – एल्याची पेठ (घोड्यावरून) | ·।।· तास |
| एल्याची पेठ – पाब्याचा घाट- मुळामुठा नदी घोड्यावरून | १ तास |
| मुळामुठा नदी – पुणे कसबा घोड्यावरून | १ तास |

कृष्णेच्या पलीकडील मुलूख जोपर्यंत महाराजांच्या ताब्यात आला नव्हता, तोपर्यंत चाफळास महाराजांना पालीवरून रायघाटाने यावे लागे.

४८. चंद्रगिरी–वसंतगड.

४९. दिवाकराच्या येथील पट्टाभिरामाच्या मूर्ती.

५०. दिवाकराच्या येथील सीताराममूर्ती. षट्चक्रांकित शाळीग्राम.

५१. बहिरेवाडीचा बहिरोबा. येथे कल्याणांना सर्पदंश झाला.

५२. समर्थांनी राममूर्तीस्थापनकाली आवाहन केलेल्या ग्रामदेवता –
(१) खोनोलीची नीनाई
(२) कारव्याची धानाई
(३) दुसाळ्याची जानाई
(४) चाफळची नांदलाई
(५) दाढोलीची खंडूआई
(६) दाढोलीची सोमजाई

५३. कुंभारडोह. हा डोह हणमंतओढा व मांडनदी यांच्या संगमाजवळ होता. या डोहावर देवालयाकरिता समर्थांनी स्थलशुद्धी केली व तत्रस्थ पितृदेवतांना गती दिली. कुंभारडोहात समर्थ स्नान करीत. त्या काळी डोहात खोल पाणी होते. सध्या डोह भरून गेला आहे.

५४. मांडनदीच्या पुलाजवळचा वटवृक्ष. समर्थकालीन. ह्या वटवृक्षावरील मर्कटांच्या लीला समर्थ पाहात.

५५. महारुद्रस्वामींची समाधी. तीत पश्चिमाभिमुख पहिल्या लक्ष्मणस्वामींची समाधी व पूर्वाभिमुख दुसऱ्या लक्ष्मणस्वामींची समाधी. उत्तरेस हणमंतस्वामींची स्त्री राजसबाई इचें वृंदावन आहे. पूर्वेस साखरे नावाच्या संन्याशाची समाधी आहे.

५६. चाफळगावास कसबा केला तर त्या वेळेस पेठेंत मारुतीची स्थापना समर्थांनी केली.

५७. भाबेवाडीचा वेताळ. येथे श्रीसमर्थांनी विठ्ठल गोसावियास चाफळक्षेत्रीं रामसेवा करीत यावन्मरण राहावे म्हणून आज्ञा करून दिवाकर गोसावी पारपत्याधिकारी यांचे स्वाधीन केले.

५८. बाजार. रामाच्या देवळासमोरील पटांगणात समर्थांनी बाजार भरविण्याची वहिवाट पाडली व चाफळ कसबा म्हणजे पेठेचा गांव केला.

मूळ एक लहानशी चाफळवाडी होती. तिला महाक्षेत्रत्व समर्थांच्या मुळे आले. समर्थांच्या पूर्वी चाफळखोऱ्यात नाणेघोळ हे मुख्य तर्फेचे गाव असे. तर्फ नाणेघोळ अशी भाषा होती. नाणेघोळास देशमुख, देशपांडे राहात. समर्थ चाफळास आल्यावर तर्फ नाणेघोळ कागदपत्रात व मायन्यात तसेच राहिले; परंतु खोऱ्यात महत्त्व चाफळास आले. चाफळास मोठी ब्राह्मणवस्ती होऊन पेठ वसली. तेव्हा नाणेघोळचे देशपांडे मागे

पडले व नवे देशपांडे चाफळास नांदू लागले. देशमुख नाणेघोळासच राहिले. समर्थांच्या संस्मरणीय अशा ५८ वस्तू वर नमूद केल्या आहेत. त्यांना चाफळ येथील ब्राह्मणवस्ती व वाणीउदम्यांची पेठ, या वस्तूची पुष्टी दिली म्हणजे चाफळखोऱ्यातील संस्मरणीय वस्तूंची संख्या ५९ होते. समर्थांच्या चरित्रातील आणिक कितीतरी संस्मरणीय वस्तू या खोऱ्यात असतील. त्यांचा तपास एकदम एका खेपेस होणे शक्य नाही. एखाद्या वृक्षाशेजारी, शेतात, घळीत, दगडापाशी, जातीत किंवा देवळापाशी सहज गोष्टी निघतानिघता समर्थविषयक उल्लेख सहज कोणीतरी बोलून जातो. असे उल्लेख जमविण्यास खोऱ्यात वर्ष-सहा महिने राहिले पाहिजे. गावात, रानात व लोकात, घाटावर हिंडले-फिरले व बोलले पाहिजे. यात्रा, सण, रथ, उत्सव, कुळधर्म, श्राद्धे, काठ्या, पताका, द्वारे, गौरी, गणपती इत्यादी अपूर्व प्रसंगी प्रश्न करून माहिती काढली पाहिजे. कारण नसताना समर्थासंबंधाने नवीन काही माहिती सांगा, असा प्रश्न करून माहिती मिळण्याचा संभव अगदी नसतो. माहिती सहजासहजी कारणपरत्वे काढली तरच मिळते. वर ५९ वस्तू दिल्या आहेत. पैकी काहींचा तपशील दिला आहे. काहींचा तपशील रामदासांच्या बखरीत व इतरत्र दिला असल्यामुळे दिला नाही.

संस्मरणीय वस्तूंपैकी काही वस्तू आता अगदी जीर्ण झाल्या आहेत. त्यांचा पुनरुद्धार लवकर न केला तर त्या अल्प काळात नामशेषही राहाणार नाहीत. उदाहरणार्थ, श्रीशिवछत्रपतींना श्रीसमर्थांनी ज्या चिंचवृक्षाखाली प्रथमोपदेश केला तो चिंचवृक्ष खाली नवे जोते घालून व खणून मुळास खत घालून जगेल तितक्या दिवस जगविला पाहिजे व इतकेही करून लवकर मेलाच तर मृत्यूपूर्वी त्यांच्या पुढे डांब रोवून तत्स्मारक अशी एखादी पाटी उभारली पाहिजे. साकरबाव, सिंगणवाडीच्या मारुतीपुढील अनामक वृक्ष, अस्थिवृंदावन, मुंज्यांचा घाट, कुबडीतीर्थ, रामघळ, रामाच्या देवळाच्या गच्चीवरील भेग, वगैरे सर्वच वस्तू आता थोड्याफार जीर्ण झाल्या आहेत. त्यांचा उद्धार लवकर केला नाही तर समर्थ व शिव यांच्या संबंधीच्या चाफळ येथील संस्मरणीय वस्तू फक्त मी केलेल्या यादीत राहातील. सबब या कामाकरिता एखादे उद्धारकमंडळ स्थापणे जरूर आहे.

# श्री समर्थांचा सुंदर मठ कोणता?

## *समर्थहृदय शंकर श्रीकृष्ण देव*

(१) श्रीरामदाससंप्रदायांचे संशोधन पुष्कळ झाले आहे असे कोणाला वाटत असेल तर खुशाल वाटो, पण खरी स्थिती अशी आहे की, श्रीसमर्थ चरित्रातील कितीतरी प्रसंग अजून आपणास कळावयाचे आहेत व कितीतरी कोडी उलगडावयाची आहेत व त्यासाठी झाले आहे त्यापेक्षा शतपट संशोधन व्हावयास पाहिजे. हे सर्व प्रसंग आणि कोडी ही सारख्याच महत्त्वाची आहेत. कारण श्रीसमर्थ चरित्रातील सर्वच भाग गुरुभक्ताला सारखे प्रिय असणार. परंतु कोणाकोणाला काही कारणांमुळे काही विशिष्ट प्रश्नांचे महत्त्व विशेष पटत असते. त्या प्रश्नांची उत्तरे आपणास लवकर मिळावीत म्हणून ते उतावीळ झालेले असतात. पण आपणास सर्वच प्रश्न सारख्या महत्त्वाचे असल्यामुळे यथावकाश सर्वांचाच विचार करावयाचा आहे. त्यात त्यांच्याही प्रश्नांची वेळ केव्हातरी येणारच आहे. असो.

(२) आज एक लहानसा प्रश्न मनात असा आला आहे की, श्रीसमर्थांच्या मठांपैकी एका मठाला सुंदर मठ म्हणत, तर तो सुंदर मठ कोणता? सुंदर मठ नावाचा दुसरा कोणता निराळा मठ नसून, सुंदर मठ म्हणजे चाफळचाच मठ होय असे मी कित्येक वर्षे समजत होतो.

*परंतु येकवचनी देव येक । जेणे सोडिले देव अनेक ।*
*सेवाहीन मी सेवक । त्याचा म्हणवी ॥१॥*
*समर्थें अंगिकार केला । नाना संकटीं रक्षिला ।*
*त्याचिया अन्नें पिंड वाढविला । जन्मवरी ॥२॥*
*मारुतीसारिखे सेवक । तेथें मी मानवी रंक ।*
*नवल सामर्थ्याचे कौतुक । काये सांगों ॥३॥*
*समर्थ आणि दीनानाथ । वैभवें समर्थांहून समर्थ ।*
*जेणें माझे मनोरथ । पूर्ण केले ॥४॥*
*जें जें मनें अभिळासिलें । तें तें समर्थें पुरविलें ।*
*मज दीनास वाढविलें । मर्यादेवेगळे ॥५॥*
*समर्थानें समर्थ करावें । तरीच समर्थ ह्मणवावें ।*
*त्रैलोक्यास पडिलें ठावें । सामर्थ्य ज्याचें ॥६॥*
*अजिंक्य रजनीचर माजले । देव कारागृहीं घातले ।*
*ह्मणोनि वैकुंठीहून पातले । देव सोडवावया ॥७॥*
*देवमात्र जाजावला । ह्मणोनि कैपक्षी पावला ।*
*भुवनकंटक निर्दाळिला । दशमुख शत्रु ॥८॥*
*जिहीं त्रैलोक्य जिंकिलें । त्यास मर्कटाहातीं मारविलें ।*
*भुवनत्रय आनंदविलें । दाशरथीनें ॥९॥*
*देवाचे बंद सोडविले । देव स्वस्थानीं स्थापिले ।*
*प्राणीमात्र आनंदविले । रामराजें ॥१०॥*
*बिभीषणास दिधली लंका । सुरवराची फिटली शंका ।*
*समर्थें रामदास रंका । नवाजिलें[१] ॥११॥*
*सुंदर मूर्ति सुंदर गुण । सुंदर कीर्ति सुंदर लक्षण ।*
*सुंदर मठीं देव आपण । वास केला ॥१२॥*

---

१. नावाजिलें.

*गिरिकंदरीं सुंदर वन । सुंदर वाहाती जीवन ।*
*त्यामधें सुंदर भुवन । रघुनाथाचें ॥१३॥*
*सुंदर पाहोन वास केला । दास संनिध ठेविला ।*
*अवघा प्रांत चि पावन केला । कृपाळुपणें ॥१४॥*
*बावी पोखरणी झरे । टांक विशाळ सुंदरें ।*
*ठाईं ठाईं विशाळ मनोहरें । स्थळें निर्मिली ॥१५॥*
*कडे कपाटें दरे दर्कुटें । पाहों जातां भय चि वाटे ॥*
*ऐसे स्थळीं वैभव दाटे । देणें रघुनाथाचें ॥१६॥*
*अंतर्निष्ठ अखंडध्यानी । संनिध रामवरदायिनी ।*
*विश्वमाता त्रैलोक्यजननीं । मूळमाया ॥१७॥*

या गोड प्रकरणाकडे वाचकांचे पूर्वी लक्ष गेले नसेल तर आतातरी त्यांनी ते मननपूर्वक वाचावे, अशी प्रार्थना आहे. हे पूर्वी अप्रकाशित असलेले प्रकरण मालेतील तिसऱ्या भागाच्या प्रस्तावनेत सहजगत्या दिले, तेव्हा सुंदर मठ म्हणून चाफळच्या मठाहून भिन्न एखादा मठ असेल, अशी मला शंकाही आली नाही. वरील ओव्यांपैकी १२ ते १५ ओव्यांत जे वर्णन आहे ते चाफळला लागत नाही, असेही नाही. पाहों जाता भय चि वाटे । हे १६ व्या ओवीतले चरण वाचून एक शंका यावी व कदाचित त्यावेळी आली असली तरी, आज नाही पण त्या काळी भयच वाटावे, अशी कदाचित त्यावेळची वनश्री असेल, असे मी माझ्या मनाचे समाधान करून घेतले असले पाहिजे. संनिध रामवरदायनी । या शेवटच्या ओवीतील चरणाकडे मात्र त्यावेळी जावे तसे लक्ष गेले नाही, हे खरे.

*प्रतापगिरीचे ठाईं । आदिशक्ती विराजते ॥*

ती रामवरदायिनी माता चाफळला काही जवळ नाही, हा विचारच त्यावेळी सुचला नाही. सुंदर मठ म्हणजे चाफळचा मठ असे मनाने घेतल्यामुळे, इतका बारीक विचार करण्याचे कारणच पडले नाही.

(३) सुंदर मठ म्हणजे चाफळचा मठ नसावा अशी अंधुक शंका प्रथम

*समर्थें चाफळअधिष्ठानीं श्रीराम संस्थापिले ।*
*मग सुंदर मठीं समर्थांचे रहवे जालें ।*
*नाना गिरिकंधरीं दासविहिरें निर्मिले ।*
*नाना मठ करविले लोकोद्धारा ।*

ही समर्थप्रतापांतील सातव्या समासाची दुसरी ओवी वाचून आली. चाफळला रामाची स्थापना झाल्यावर समर्थ सुंदर मठी राहावयास गेले. म्हणजे सुंदर मठ कोठे दुसरीकडे होता की काय, असे नुसते मनात आले.

(४) पुढच्याच समासाची दुसरी ओवी वाचून आलेली शंका दुणावली. ती ओवी अशी –

*समर्थें सुंदर मठी गणपति केला ।*
*दोनी पुरुष सिंधुरवर्ण अर्चिला ।*
*सकळ प्रांतासी मोहछह दाविला ।*
*भाद्रपदमासपर्यंत ॥*

हल्लीचा महाराष्ट्र समजतो की, गणपति-उत्सव विशेष प्रमाणावर आपण सुरू केला, पण श्रीसमर्थांनीच गणपतिमहोत्सवाचाही उपक्रम केला होता. असो. ही दोन पुरुष उंचीची गणपतीची मूर्ती चाफळास कोठे, कधी होती असेही कोठे वर्णन नाही व तसे कोणी सांगतही नाहीत. चाफळ मठाहून भिन्न असा सुंदर मठ होय, असे निर्विवाद वाटू लागले. पण दुसरा सुंदर मठ कोणता हे काही कळेना. खरोखरच तो फार सुंदर असला पाहिजे. चाफळच्या वनश्रीला हा लाजविणारा असा सुंदर मठ असला पाहिजे. तेथे पुन्हा श्रीराम, मारुती, गणपती हे असले पाहिजेत. मठाच्या जवळपास

*बावी पोखरणी झरे । टांकी विशाळ सुंदरें ।*

असली पाहिजेत.

कडे कपाटें दरे दर्कुटें । पाहों जाता भय चि वाटे ॥ असे ते स्थळ असले पाहिजे. प्रतापगडच्या जवळपास कोठेतरी हे रम्य ठिकाण असावे.

(५) असे हे रम्य स्थान कोणते? हा सुंदर मठ कोणता? या प्रश्नाचे उत्तर कागदपत्रांच्या नवव्या भागाने

दिले. लेखांक २६ हे खरोखरच फार महत्त्वाचे पत्र आहे. ते दत्ताजी त्रिमलांनी दिवाकरांना लिहिलेले आहे. त्यात शिवसमर्थांच्या भेटीचा एक मोठा चमत्कारिक प्रसंग दिलेला आहे. दत्ताजीपंत लिहितात –

राजश्री छत्रपती यजमान कर्नाटकातून स्वारी करून श्री रामदासस्वामींच्या दर्शनास सज्जनगडासी आले ते समई

श्रीस प्रार्थनायुक्त विनंती केली की श्रीं नी पूर्वी बिरवाडीचे

मुकामी श्री सिवथरी प्रांती असता मधे माहानदी महापुर

आणी अकस्मात रात्री पलंगापासी येऊन चमत्काररूपे

दर्शन दिल्हे कितेक चित्तीं होतें ते चि आसीर्वाद दिल्हे

दुसरे दिवशी सिवथर प्रांतीं सुंदर मठी भेटी जाली

(६) सुंदर मठ म्हणजे शिवतरचा मठ याविषयी आता शंका उरत नाही. आजही ते स्थान अत्यंत रमणीय आहे. मग त्यावेळी तर त्याचा सुंदरपणा अवर्णनीय असला पाहिजे. सुंदर मठ म्हणजे शिवतरचा मठ ही कल्पना होण्यापूर्वीच या मठाचे आपण मागे जे एका लेखांकात वर्णन केले आहे, त्यात त्यास आपण पृथ्वीवरील स्वर्ग म्हटले आहे, इतकी त्याची अनुपम रमणीयता आहे. पण समर्थही ज्या मठाला सुंदर म्हणत त्याची आज काय दशा झाली आहे! तो काळही गेला व रायगडच्या सान्निध्यामुळे जे महत्त्व आले होते ते स्थानमाहात्म्यही उरले नाही आणि आता कोणाला जरूरही राहिली नाही. कालमहिमा गेला, स्थानमाहात्म्य उरले नाही व महंतपणाचे सामर्थ्य कोणात नाही. मग दुर्दशा न होईल तर दुसरे काय होईल?

(७) शिवतर हे स्थान श्रीसमर्थांना फार प्रिय होते, असे दिसते. तेथे त्यांचा रहिवास पुष्कळ होत होता. आपणास याची पूर्वी कल्पना नव्हती. बखरीत या स्थानाचा कोठे उल्लेख नाही.

*मग सुंदर मठीं समर्थांचे रहवे जालें ।*

असे प्रतापात गिरिधर म्हणतात आणि शक १५९७ व १५९८ या दोन सालांत श्रीसमर्थ शिवतरी राहात होते ही गोष्ट कागदपत्रांवरूनही सिद्ध होत आहे. कागदपत्रांतील लेखांक १५ व १६ ही श्रीशिवछत्रपतींची महिपतगडच्या व सज्जनगडच्या हवालदारांना आज्ञापत्रे आहेत, त्यात छत्रपती म्हणतात, ''श्री रामदास गोसावी सिवतरीं राहतातीं.''

(८) चरित्रग्रंथातील माहितीला कागदपत्रांचे प्रत्यंतर मिळाले किंवा कागदपत्रांवरून सिद्ध होणारी गोष्ट चरित्रग्रंथातही दिलेली आढळली म्हणजे श्री चरित्राचे चिंतन करणाराच्या मनाला जो आनंद होत असतो तो अवर्णनीय होय. लेखांक २६ तील वर जो थोडासा उतारा आला आहे त्यावरून असे दिसते की, एकदा श्रीशिवछत्रपती बीरवाडीस होते व श्रीसमर्थ शिवतरी होते. बीरवाडी व शिवतर यांच्यामध्ये जी नदी आहे तिला महापूर आला होता. असे असता श्रीसमर्थ एकाएकी रात्री शिवराज निजले होते तेथे पलंगापाशी प्रगट झाले व छत्रपतींच्या चित्तात होते तेच नेमके मनोरथ पूर्ण होतील म्हणून आशीर्वाद देऊन अदृश्य झाले आणि मग दुसरे दिवशी उभयतांची शिवतरी भेट झाली. ही जी तत्कालीन कागदपत्रांतील माहिती तिला समर्थप्रतापात बरोबर प्रत्यंतर आढळते.

*शिवराजें शिवतरीं चमत्कार देखिले ।*
*करतळस्फोटक स्मरणें तात्काळ शमले ।*
*स्वप्नीं समर्थ प्रसाद देऊनि गेले ।*
*महा नदी उतरूनियां ॥ स. प्र. ३-६५*

या ओवीत ज्या प्रसंगाचा उल्लेख केला आहे तोच प्रसंग २६ व्या लेखांकात वर्णिलेला होय, याविषयी काहीतरी शंका वाटते काय?

(९) प्रसंग फार महत्त्वाचा आहे. गुरुभक्तांची मने त्याने उल्हसित होणार आहेत. श्रीसमर्थप्रतापासारख्या अत्यंत विश्वसनीय चरित्रग्रंथात त्याचे वर्णन आले असून

तत्कालीन कागदपत्रांनी त्याची यथार्थता सिद्ध झाली आहे. त्याच्या सत्यतेविषयी शंका घेण्याला कारण नाही आणि म्हणूनच सांप्रदायिकांना आशा करण्याला जागा झाली आहे. प्रत्यक्ष श्रीशिवछत्रपतींनी ती घडलेली गोष्ट स्वमुखे दत्ताजीपंतास सांगितली! तरीही तिजविषयी शंका घेण्याइतका कोण पापी असेल? प्रसंग खरा आहे. त्याचा अर्थ लावण्यात चिकित्सक मनाने वाटेल तेवढे कौशल्य लढवावे! इतकी गोष्ट निर्विवाद आहे की, एकदा छत्रपती बीरवाडीस असून श्रीसमर्थ शिवथरी होते व मध्ये महानदीस पूर आला असता श्रीसमर्थांनी एकाएकी रात्री छत्रपतींना चमत्काररूपे दर्शन दिले. या वर्णनावरून इतके उघड होत आहे की, श्रीसमर्थांचा स्थूल देह एका ठिकाणी राहून अनेक ठिकाणी प्रकट होई. आता वरुणगावची ती गोष्ट खरी मानल्यावाचून कोठे सोय आहे?

*ऐका कोण्ही येक कृष्णातीरीं वरुणग्रामीं ।*
*समर्थ पातले सद्गुरूस्वामी ।*
*आतां आमंत्रणें सांगों आम्ही तुझी ।*
*प्रीतिभांडणें सकळांचीं ।।स.प्र. १४-२९*
*समस्तांची येक अवस्था ।*
*समस्तांची येक आस्था ।*
*आतां कैसी करावी व्यवस्था ।*
*समर्थस्वामी विचारिती ।।३०।।*
*आक्रा घरीचीं आमंत्रणें घेतलीं ।*
*येकाचीं येकासी कळों नाहीं दिधलीं ।*
*घरोघरीं पुर्णे वर्णे घातलीं ।*
*बोलावणीं आलीं मागें पुढें ।।३१।।*
*समर्थें येका दुबळ्या भक्तासी लाभ दिधले ।*
*तक्र आंबिल जेऊनि स्वानंदें बैसले ।*
*इकडे घरोघरीं आक्रा ठाईं गेले ।*
*श्रीहनुमानस्वामी समर्थ ।।३२।।*
*ज्या त्यासी वाटे समर्थ आपुले घरीं ।*
*येकांतभोजनें सारिती बरीं ।*
*तांबुल घेताती मंचकावरी ।*
*सुमनशैय्या पादसंव्हनें ।।३३।।*
*मुख्य प्राणनाथ निधान ।*
*समर्थस्वामींचे रूप महिमान ।*
*भाविकासी भावासारिखा देव फळद्रूप आपण ।*
*संकल्प विकल्प जाण न धरावा ।।३४।।*

श्रीसमर्थांच्या अनिरुद्ध संचाराला जेथे स्थलमर्यादा घालू शकत नाही, तेथे कालाची तरी कितपत आडकाठी असू शकणार? प्रत्यक्ष एका घरी असून जर ते अनेकांच्या घरी जात, तर ते १५४० त मात्र होते आणि आता १८४० त नाहीत, असे कोणत्या तोंडाने म्हणावे? १८४० तही दुबळ्या भक्ताचे कोड पुरविण्याला त्यांना काय प्रत्यवाय आहे? प्रत्यवाय त्यांना नाही, हरकत आम्हां पाप्यांची आहे! त्यांचेकडून ना नाही, ना आमची आहे! ते अधीर झालेले आहेत. आमच्याच ठिकाणी दर्शनेच्छा इतकी तीव्र उत्पन्न झाली नाही! काय करावे!

*येथें बोल नाहीं सद्गुरूसी ।*
*हें अवघें आपणापासीं ।।*

तो आपल्या वरचा शब्द उडण्याची कधीतरी वेळ येईल काय?

(१०) सरतेशेवटी, आणखी एका श्रीसमर्थकृत अप्रकाशित प्रकरणात सुंदर मठाचा उल्लेख आला आहे, ते प्रकरण देऊन हा लेख संपवू. ते प्रकरण टाकळीमठातील ११ व्या बाडात व डोमगावमठातील १४ व्या बाडात आढळते.

।। श्रीराम ।।

*यथायोग्य घालावें वय । अन्वय प्रसंग चुकों चि नय ।*
*स्छूळ स्छूळ सूक्ष्माचें कार्य । चमत्कारें ।।१।।*
*सूक्ष्में स्छूळ राखावें । उभय भागें मिळोनि जावें ।*
*तरीच भक्त म्हणवावें । कांहीं येक ।।२।।*
*क्षणा भक्त क्षणा अभक्त । क्षणा वेक्त क्षणा अवेक्त ।*
*क्षणा शक्त क्षणा अशक्त । हें तों बाश्कळ ।।३।।*
*वायकोळ वायकोळ । कळकळ कळकळ ।*
*भेदाभेद चळवळ । निरंतर ।।४।।*
*निरंतर आंतरला । चेवोनि मागुता चेवला ।*

*अवघा गलबला चि केला । आयुष्याचा ॥५॥*
*येकें येकासी सेविलें । येकें येकासी अभिळासिलें ।*
*येकें येकासी दृढ धरिलें । सावकास ॥६॥*
*येकें येकासी केलें सख्य । येकें येकासी दिलें सौख्य ।*
*येकें येकासी दिधलें मुख्य । वंचिलें नाहीं ॥७॥*
*ऐसा आंतर स्नेह बळकट । अखंड लागोनि गेली चट ।*
*विचारें तरी आंतरपट । उडोनि गेला ॥८॥*
*कळहो होऊनि तुटला । आनंद आनंदीं मिसळला ।*
*नुस्ता भक्त चि उरला । देव कोठें ॥९॥*
*हद जाली सीमा जाली । प्रचित प्रचीतीसी आली ।*
*कैसी आनंदवेळ वाहिली । सुंदर मठीं ॥१०॥*
*दोनी मठ येक चि जाले । दोनीं मठ येक चि चाले ।*
*मननसीळ निवाले । येणें शब्दें ॥११॥*
*भक्ती सकळासी आहे मान्य । आंतरनिष्ठ परम धन्य ।*
*दास म्हणे अनन्य । कोणासी असो ॥१२॥*

प्रपंच हा स्थूल आहे व परमार्थ सूक्ष्म होय. मनुष्याने विचार करून प्रपंच आणि परमार्थ हे दोन्ही चालवावे, तरच स्वत:स विवेकी म्हणवावे, नाहीपेक्षा क्षणात केवळ परमार्थाच्या गोष्टी करावयाच्या तर दुसऱ्या क्षणात प्रपंचाच्या भाराखाली अगदी दडपून जायचे हे शुद्ध बाष्फळपणाचे लक्षण होय, घटकेत व्यर्थ बडबड करायची तर घटकेत मोठी कळकळ दाखवायची, घटकेत हातपाय गाळून थंड होऊन पडायचे तर पुन्हा घटकेत गरम होऊन उद्योगास लागण्याचा आविर्भाव आणायचा, म्हणजे आयुष्याचा नुसता खेळखंडोबा होय. मनुष्याला काहीतरी एक धोरण पाहिजे, कोठेतरी त्याचा दृढभाव असावा, कोणावर तरी विश्वास लागतो, कशावर तरी निस्सीम प्रेम पाहिजे. तरच त्याच्या हातून काही लोकोत्तर कार्य होईल. अशी एकनिष्ठ, कर्तृत्ववान, अनुभवी मंडळी श्रीसमर्थांच्या निशाणाखाली सुंदरमठी जमली होती. म्हणून त्यांच्या हातून पराकाष्ठेचे भगीरथ उद्योग झाले. त्याकाळी राजकारण आणि धर्मकारण, रायगडची शक्ती आणि शिवथरची युक्ती एक झाली होती. धर्म आणि राज्य ही वेगळी न राहाता त्यांचा समास झाला होता. चहूकडे धर्मराज्य झाले होते. प्रपंच हा असा करावा आणि परमार्थ हा असा चालवावा, अशी भक्ती असावी, भक्ती तर सर्वमान्य आहेच, पण ज्ञानाची कोटी काही विशेष होय.

(११) अशी या बारा ओव्यांची गोळाबेरीज आहे. ती जर बरोबर असेल तर, त्या काळी महाराष्ट्राने

*कैसी आनंदवेळ वाहिली । सुंदर मठी ॥*

याची वाचकांनी कल्पनाच करावी!

# श्री हनुमंत स्वामिकृत श्री समर्थांची बखर

*गणेश शंकर देव*

**प्रस्तावना**

**(१) या बखरीचे महत्त्व**

आपल्या त्रिखंडात्मक श्रीसमर्थचरित्राच्या, नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ''श्री समर्थावतार'' या प्रथम खंडातील ''ग्रंथारंभ'' या प्रकरणात आधारभूत ग्रंथांना नमन करताना ती. शंकर, श्रीकृष्ण ऊर्फ नानासाहेब देव यांनी प्रथम स्थान या बखरीला दिले आहे. त्या ठिकाणी ३ ते ६ या परिच्छेदात ती. नानासाहेब लिहितात –

**''(३) हनुमंत स्वामीकृत श्रीसमर्थांच्या बखरीचे महत्त्व**

श्री हनुमंत स्वामीकृत श्रीसमर्थांच्या बखरीचे मजवर अनंत उपकार आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या तिचे प्रामाण्य कसेही असो, प्रथम तिने माझे मन श्रीसमर्थचरणांकडे वेधून घेऊन मला कायमचे ऋणी करून ठेवले आहे. तुमच्याप्रमाणेच मीही ती सर्वस्वीच प्रमाण मानतो, असे नव्हे, पण म्हणून मी तिला दूर सारीत नाही. बडोदे येथील लक्ष्मण महाराजांच्या मठातील आचारविचारवान निष्ठावंत रामदासी कै. दादामहाराज मला एकदा म्हणाले, तेच मी सर्वांना सांगेन. दादामहाराज म्हणाले, जसे रोज श्रीमत ग्रंथराज दासबोधातील दोन समास आणि श्री श्लोक मनाचे अकरा नित्य नियमाने वाचायचे, तसाच प्रत्यही नियमाने बखरीतील काही भाग क्रमश: वाचीत जावा. मीही सर्वांना नम्रतापूर्वक सुचवीन की, काय चिकित्सा करावयची असेल, ती पुढे करा, आधी भक्तिभावाने बखर वाचा, ती वाचून श्रीसमर्थचरणी तुमचे भक्तिप्रेम जडले, म्हणजे मग करवेल तितकी चिकित्सा साऱ्या जन्मभर करा, त्या चिकित्सेने तुमचे भक्तिप्रेम दृढावतच जाईल; पण आपण आधीच संशयवृत्तीने चिकित्सा करूं लागूं, तर श्रीसमर्थ आपणाकडे पाठ फिरवतील आणि त्यांचे चरण मात्र आपणांस दुरावतील.

**''(४) तिचे प्रामाण्य**

श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरात बखरीच्या ज्या अनेक प्रती आहेत, त्या पाहून असे दिसते की, या बखरीवर वेळोवेळी अनेक संस्कार झाले असावेत. ही बखर रचली गेली तेव्हापासूनच तिच्यावर आक्षेपही घेण्यात आले होते, असे बाडांक ३९६ तील एका पत्रावरून दिसते. पण हे सर्व खरे असले तरी बखरीत वर्णन केलेले सर्व प्रसंग, दिलेल्या शकमित्या, सांगितलेल्या सर्व गोष्टी केवळ निराधार आणि काल्पनिक असतील, असे मानणे कठीण आहे. माझ्या अल्पमतीला पटेल, तेथे मी बखरीला शरण जाऊन तिचा आधार घेणार आहे.

### ''(५) एकंदर बखरीचे स्वरूप

ऐतिहासिक पुराव्यांत बखरींपेक्षा कागदपत्रांचे महत्त्व विशेष होय, असे प्रतिपादण्यात येत असते. हे प्रतिपादन मला सर्वस्वी मान्य करवत नाही. आज जगात सर्वत्र चाललेले राजकारण आपण पाहातच आहोत. तसेच त्याचे स्वरूप पूर्व काळातही असले पाहिजे. राजकारण सर्वकाळी सारखेच असणार. राजकीय धोरणामुळे, कागदपत्रातील मजकूर खराच असतो, असे आजचे राजकारण पाहून आपणास खात्रीने म्हणता येईल काय? तीच कथा सर्व काळच्या राजकारणी कागदपत्रांची. ते काही असो, मला स्वत:ला कागदपत्रांइतक्याच बखरीही महत्त्वाच्या वाटतात. बखरीची भाषा, ही मला जिवंत वाणी वाटते. ती जिवंत माणसांनी जिवंत लोकांसाठी लिहिलेली असते. कोणतीही एखादी पूर्वकालीन बखर घ्या आणि हल्लीच्या काळात जे ऐतिहासिक ग्रंथ लिहिले गेले आहेत, किंवा लिहिले जात आहेत त्यांच्याशी ताडून पाहा. तुमच्या तत्काळ लक्षात येईल की, एकाची वाणी जिवंत माणसाची असते, तर दुसऱ्याची मेलेल्या माणसाची असते. स्वातंत्र्य हे जिवंतपणाचे लक्षण होय व पारतंत्र्य म्हणजे मृत्यूच. स्वातंत्र्यात सत्य निर्भय असते, पारतंत्र्यात सत्यकथनाला भ्यावे लागते. स्वातंत्र्यात मन मोकळे असते, पारतंत्र्यात त्यावर दडपण पडलेले असते.

''स्वातंत्र्याच्या काळात बखरी लिहिल्या गेलेल्या असल्यामुळे वाचकाच्या मनाला त्या फार चटका लावतात. हनुमंत स्वामीकृत बखरीची गोडी आमच्या भाषेत केव्हाही येणे शक्य नव्हे. आम्ही मेलेली माणसे. आताशी कोठे जिवंत होऊ पाहात आहोत. श्रीसमर्थांचीच बखर असे नव्हे, तर स्वतंत्र काळात लिहिलेली कोणतीही बखर पाहा व अलीकडच्या काळातील कोणत्याही लेखकाच्या ऐतिहासिक लिखाणाशी ती ताडून पाहा, म्हणजे दोहोंतला फरक सहज दिसून येईल. हा दोष हल्लीच्या लेखकांचा, तुमचा, माझा किंवा आणखी कोणाचाही नसून तो भिन्न परिस्थितीचा परिणाम होय.

### ''(६) तात्पर्य

तात्पर्य, हनुमंत स्वामीकृत बखरीला माझे शतशः प्रणाम आहेत. तिची भाषा फार मोहक आहे. श्रीसमर्थ कार्यात माझा जन्म तिच्यापोटी झाला, याचा मला केव्हाही विसर पडत नाही. मी तिला माझी आई मानतो. आईच्या कुशीत निजताना बालकाला जो निरतिशय आनंद होत असतो, त्याचा अनुभव बखर वाचीत असता मला येत असतो.''

### (२) ही प्रत

अशी ही बखर म्हणजे श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरातील बाडांक १८५२ होय. ती प्रकाशित करण्याचा योग सभेला आज आला. मात्र ''श्रीसमर्थावतार'' ग्रंथाच्या परिशिष्टातील 'बखरीवरून शकावली'' हे परिशिष्ट ती. नानासाहेबांनी या प्रतीवरून केलेले नव्हे. सुमारे ६०-६१ वर्षांपूर्वी शके १८१० मध्ये यदुवंशीय ठक्कर गोवर्धनदास लक्ष्मीदास यांनी मुंबई येथे जगदीश्वर छापखान्यात छापून प्रसिद्ध केलेल्या बखरीच्या दुसऱ्या आवृत्तीवरून त्यांनी ती शकावली तयार केली आहे. बखरीची पहिली आवृत्ती त्याही पूर्वी अठरा वर्षे म्हणजे शके १७९२ त निघाली होती.

बाडांक १८५२ ती. नानासाहेबांना आंबड येथील रा. विनायकराव देशपांडे यांचेकडून मिळाले. त्या बाडाची शके १८३२ चैत्र शुद्ध १५ ला तयार केलेली नक्कल आम्हांस आयती मिळाली. ती नक्कल मुळाबरोबर ताडून पाहून आता प्रसिद्ध होत आहे.

वास्तविक श्री. समर्थ वाग्देवता मंदिरातील या बखरीच्या इतर प्रतींबरोबर ही प्रत ताडून पाहून आढळणारे विशेष येथे देता यावयास हवे होते, पण ते होऊ शकले नाही. इतके मात्र खरे की, या प्रकाशनाने आम्ही मात्र एका ऋणातून मुक्त होत आहोत.

१८७१ पौष शुद्ध १० **गणेश शंकर देव**
चिमाजी अप्पा पुण्यतिथी, धुळे

# श्रीसमर्थ रामदास व श्रीशिवछत्रपती

*कै. नरसिंह चिंतामण केळकर*

आमचे धुळ्याचे मित्र नानासाहेब देव यांनी आज तीस-पस्तीस वर्षे जो श्रीसमर्थसेवारूपी यज्ञ अखंड चालविला आहे त्याचे अवभृतस्नान पुढील आठ-पंधरा दिवसांत धुळे येथे व्हावयाचे आहे. त्या प्रसंगी प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या लेखसंग्रहात एखादा लेख मीही लिहावा अशी त्यांनी आग्रहपूर्वक मागणी केली. ती अमान्य करणे अशक्य आहे. एक तर ते करतात हे सत्कार्य तर आहेच; परंतु त्यांनी आपल्या कार्याविषयी इतकी निष्ठा आजवर प्रकट केली आहे की, त्यांच्या कार्याकरिता त्यांनी एखादा लेख लिहून मागण्यासारखी विनंती केल्यास ती मजसारखा मनुष्य अमान्य करू शकणारच नाही, इतकी बलवत्तम पात्रता त्यांनी आपल्या निष्ठेने प्राप्त करून घेतली आहे. आपला लौकिक व्यवहार सांभाळून त्याबरोबरच एखादे ध्येय डोळ्यांपुढे ठेवून त्याची उपासना इतक्या निरलसपणे केल्याची उदाहरणे फारशी दाखविता येणे शक्य नाही. असो. मी जो लेख लिहिणार, त्यात "श्रीसमर्थ रामदास व श्रीशिवछत्रपती" यांच्यासंबंधाने कोणताही नवीन ऐतिहासिक असा शोध नाही, तर महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासाच्या पार्श्वभागी प्रचंड पर्वतशिखरांप्रमाणे शोभणाऱ्या वरील दोन व्यक्तींच्या संबंधाविषयी एक मुद्दा होय. मुद्दा म्हटला म्हणजे त्यात 'अस्ति' असे म्हणणारा व 'नास्ति' असे म्हणणारा असे दोन प्रतिपक्षी सहजच येतात. परंतु तो मुद्दा शाबीत अगर नाशाबीत करण्यासाठी पुढे आणलेल्या किंवा आणता येण्यासारख्या पुराव्याची चर्चा मी करणार नाही. तशी चर्चा पूर्वी पुष्कळ झालेली आहे. तीतही मी कधी विशेष भाग घेतला नाही. तथापि कोणत्याही पक्षाचा अभिमान न धरला तरी तो मुद्दा स्वतंत्र रीतीने महत्त्वाचा ठरतो. म्हणून त्याविषयी केवळ सारासार विचारदृष्टीने काय म्हणता येईल तेवढेच व तेही फार थोड्या शब्दांत मांडण्याचा प्रयत्न मी या लेखात करणार आहे.

हा मुद्दा असा : 'श्री समर्थ रामदास व श्री शिवछत्रपती' हे दोन महापुरुष समकालीन होते. हिंदू धर्माभिमानी होते, महाराष्ट्राभिमानी होते व लहानशा महाराष्ट्र देशातच वावरत होते, ही गोष्ट सिद्ध आहे; परंतु त्यांचे परस्परसंबंध कशा प्रकारचे होते, अशा मुद्द्याचा प्रश्न कोणाही विचारी मनुष्यास सुचणारा आहे. तथापि या मुद्द्याच्या चर्चेच्या क्षेत्रात श्रीसमर्थाभिमानी लोकांकडूनच प्रथम पदन्यास होऊन 'अस्तिपक्षी' सिद्धांत मांडण्यात आला. त्याचा आशय जवळजवळ असा की, श्रीसमर्थ रामदास हे श्रीशिवछत्रपतींचे शेवटी शेवटी दीक्षागुरू झाले. इतकेच नव्हे तर अगदी प्रथमपासून त्यांचीच शिकवण व प्रेरणा श्रीशिवछत्रपतींना लाभली होती. त्याप्रमाणेच त्यांचे हातून पुढे कार्य झाले. अर्थात त्या कार्याचे श्रेय हस्तक या

नात्याने छत्रपतींकडे असले तरी चालक या नात्याचे म्हणजे श्रेष्ठ प्रतीचे श्रेय श्रीसमर्थांकडेच येते. हा सिद्धांत श्रीशिवछत्रपतींच्या अभिमानी लोकांना न खपून त्यांनी अशी बाजू उलट मांडली की, या उभय विभूतींची गाठ प्रत्यक्ष एखाद दुसरा वेळच पडली. त्यातून जी प्रथम पडली ती शिवाजी महाराजांनी आपले कार्य पुष्कळसे सिद्ध व हातावेगळे केल्यावरच पडली, यामुळे त्याचे श्रेय समर्थ रामदासांना देणे योग्य नाही. हे बहुतेक सर्वच्या सर्व शिवाजी महाराजांनाच देणे न्यायाचे होईल.

या दोन बाजूंच्या विधानात वरील मुद्द्यांमध्ये वादग्रस्तता कशाविषयी आहे हे सहज दिसून येईल, व त्या वादात उपलब्ध असलेल्या सर्व ऐतिहासिक कागदपत्रांचा कसून उपयोग करण्यात आलेला आहे. काही बाकी राहिलेली नाही. पण एका बाजूने या उभयतांची भेट शक्य तितक्या आधीच्या काळी ओढण व दुसऱ्या बाजूने ती भेट शक्य तितक्या उशिराच्या काळाकडे खेचणे यावरच बहुतेक तर्कचातुर्य खर्च झाले आहे. जसे काही एक भेट शाबीत झाली म्हणजे लगेच त्या भेटीवरून बाकी सर्व गोष्टी एकदम सिद्ध होतात किंवा ती भेट झाली नाही असे शाबीत झाल्याने प्रतिपक्षाची इतर सर्व विधाने ढासळून पडतात. केवळ या भेटीचा कालनिर्णयच ठरवावयाचा तर मलाही पुढे आलेल्या कागदोपत्री पुराव्यावरून काही निश्चित मत बनविता येईल. पण ते मत त्या भेटीच्या कालाच्या विषयापुरतेच असेल. परंतु माझी विचारसरणी या दोन विभूतींच्या परस्परसंबंधाविषयी अगदी स्वतंत्र आहे, ती इतिहाससंशोधनाची नाही. लौकिक व्यवहार, जगाची रीत, मनुष्यस्वभाव, इतर अनुभव व सारासार विचार यावरच ती आधारलेली आहे. म्हणून ती भेट फार आधी झाली की उशिरा झाली याचे महत्त्वच मला वाटत नाही. म्हणून माझे म्हणणे काय ते थोडक्यात मांडतो.

प्रथम या वादाविषयी मला म्हणावयाचे ते असे की, जगात कोत्या दृष्टीचे लोक एक चूक नेहमी करतात. ती अशी की, ते कार्यकारणभाव हा अगदी नेहमी एकेरी असतो असे मानतात. कोणतेही कार्य घेतले तर त्याचे कारण कोणते तरी एकच म्हणजे एखाद्या सुईचे टोक ठेवून दर्शविता येण्यासारखे असते, असे ते घेऊन चालतात. पण त्या कार्याची कारणे अनेक व विविध असून एकाच काळी फलद्रूप किंवा प्रभावी होऊ शकतात. हा दुसरा सिद्धांत खरा मानल्यास कार्याच्या श्रेयाची वाटणी करायची तर त्या श्रेयाचे अनेक व लहानमोठे भाग यथाप्रमाण करावे लागतात. पण तेच कार्याचे कारण एकच अद्वितीय असे म्हटले म्हणजे त्याचे श्रेय मुळीच न विभाग करिता सर्वच्या सर्व एकालाच देणे क्रमप्राप्त होते. जणू काही हे श्रेय विभाज्य किंवा अविभाज्य म्हणून मांडणे ती एखादी संसारोपयोगी मिळकत म्हणून! पण कित्येक वेळा व्यावहारिक स्वार्थापेक्षाही तात्त्विक स्वार्थ अधिकच दुर्दम ठरतो व त्या दुर्दमपणाने तत्त्वाची म्हणजे सत्याची हानी होते.

शिवाजी महाराज व समर्थ रामदास यांचे समग्र निरनिराळे चरित्र स्वतंत्र रीतीने लक्षात घेऊनच त्यांच्या संबंधाविषयी मत बनविणे हे कोणत्याही एखाद्या कागदपत्राच्या आधारे मत बनविण्यापेक्षा अधिक सत्याकडे नेणारे होईल. शिवाजी महाराजांनी लौकिक स्वराज्य स्थापिले. त्यात त्यांच्या अनेक हेतूंपैकी स्वधर्म रक्षण हा एक हेतू होता. समर्थ रामदास यांनी अवनत महाराष्ट्रधर्माला उत्तेजन देऊन उन्नती प्राप्त केली व स्वत:चा एक पंथ, सांप्रदाय व दीक्षा धर्म निर्माण केला. त्यात उदयोन्मुख स्वराज्याची मदत झाली. स्वराज्याची मदत घ्यावी, असा एक वर्धिष्णु हेतू होता. आणि शेवटी ईश्वरकृपेने या दोघांचेही हेतू सफल झाले. हे पाहाण्याचे सुख दोघांनाही जिवंतपणी मिळाले व एकंदरीने महाराष्ट्र समाजाला त्या दोघांच्या उद्योगाचा पुष्कळच फायदा झाला. एवढ्या स्थूल विचाराने आमचे समाधान होण्याला काय हरकत? पण व्यक्तिविषयक अहंकाराने जसे एखाद्या क्षुल्लक गोष्टीचेही सर्व श्रेय आम्ही आपल्याकडे ओढू पाहातो त्याचप्रमाणे गतकाळच्या एका मोठ्या म्हणजे स्वराज्य स्थापनेच्या

पराक्रमाचे श्रेय आम्हाला विशेष प्रिय असणाऱ्या विभूतीला म्हणजे एकट्या रामदासांना किंवा एकट्या शिवाजींना मिळण्याची आकांक्षा धरून आम्ही अप्रत्यक्षरीत्या आमचा व्यक्तिगत अहंकार उजऊ पाहातो. पण या तात्त्विक भांडणात विद्यमान कालातील काही व्यावहारिक गोष्टींची हानी होते, इकडे लक्ष जात नाही. एकच मर्माची गोष्ट सांगावयाची तर समर्थ, समर्थदीक्षा, शिवाजी, स्वराज्य असल्या मोठ्या गोष्टी बाजूला पडून या वादाला कित्येक ठिकाणी व प्रसंगी ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचेही क्षुद्र स्वरूप प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही काय?

असो. माझी स्वतंत्र भूमिका दोन सिद्धांन्तांवर आधारलेली आहे. जगात सकृतदर्शनी एक व्यक्ती अनेक उद्योग करीत असलेली दिसली तरी खास स्वत:चा तिचा असा म्हणजे ज्याभोवती त्याचे सर्व जीवित, मन, भावना, उद्योग घिरट्या घालीत असतात असा कोणता तरी एकच उद्योग खरा असतो. आणि दुसरा सिद्धान्त हा की, मुख्य ध्येयाच्या उपासनेने मनुष्य आपले व्यक्तिकार्य साधीत असला तरी त्याच्या गौण, दुय्यम व आपातत: घडणाऱ्या उद्योगांनी तशाच दुसऱ्या ध्येयवादी व्यक्तींच्या उपासनेला मदत होत असते. पण तिचेही महत्त्व इतके असते की, अशी अवांतर मदत मिळाल्याशिवाय कोणाही ध्येयवादी माणसाचे कार्य केवळ स्वत:च्या प्रयत्नाने सफल होणारच नाही. याविषयी कदाचित असे समीकरणही बांधता येईल.

''ज्याची मूळ कल्पना व ध्येय त्याचा मुख्य उद्योग + इतरांची सक्रिय सहानुभूती व त्या रीतीने मिळणारे अवांतर साहाय्य = कार्यसिद्धी.

या समीकरणानेच जगातील कोणत्याही महत्कार्याच्या सिद्धीचा प्रश्न सोडविता येतो. हे समीकरण सतराव्या शतकातील पुनरुज्जीवित महाराष्ट्राला लावले असता स्वराज्यसिद्धीच्या दृष्टीने शिवाजी मुख्य व रामदास अमुख्य व धर्मजागृतीच्या दृष्टीने रामदास मुख्य शिवाजी अमुख्य असेच ठरेल. म्हणून शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेच्या महत्पराक्रमाचे श्रेय स्थूलपणे त्याचे त्यालाच देऊन टाकून मोकळे न होता शिवाजीला स्फूर्ती रामदासांकडून मिळाली म्हणून त्या पराक्रमाचे श्रेय मुख्यत: रामदासांना असे ठरवू पाहाण्यात केवळ हास्यास्पदता पदरी येते. आता धर्म हा राज्यापेक्षा श्रेष्ठ की राज्य हे धर्मापेक्षा श्रेष्ठ? असा स्वतंत्र वाद कोणास घालायचा असल्यास त्याने खुशाल घालावा. परंतु त्यामुळे कोणा एकाचे श्रेय काढून दुसऱ्यास द्यावे लागत नाही. स्वराज्य नसते तरी रामदासांनी केवळ आपल्या निष्ठेने धर्म पुन्हा पायावर उभा केला असता असे वाटेल तर म्हणावे. ह्याला मी नाही म्हणणार नाही. व स्वराज्यसिद्धीविषयी शिवाजीचे श्रेय काढून समर्थांना त्याचा इतरही बाबतींत गुरू व आद्य प्रेरक ठरवून सर्व श्रेय रामदासांच्या पदरी घालणे मला अन्यायाचे वाटते. शिवाजीपेक्षा रामदास श्रेष्ठ हे ठरविल्याने ज्याच्या मनाचे समाधान होणार आहे त्याला ते इतर रीतीने मी प्राप्त करून देऊ शकेन. म्हणजे उदाहरणार्थ प्रथम रावणाचे सर्वस्वी उज्ज्वल वर्णन करून अशा रावणाला रामाने मारले या एका वाक्याने जसे रामाचे श्रेष्ठपण दर्शविता येते. त्याप्रमाणे शिवाजीला स्वराज्यस्थापनेचे सर्व श्रेय देऊन एवढ्या मोठ्या हिंदवी स्वराज्यसंस्थापकाने शेवटी समर्थांची औपचारिक का होईना पण सांप्रदायिक दीक्षा घेतली असे म्हटल्याने रामदास हवे तितके श्रेष्ठ ठरत नाही काय? ते ठरविण्याला स्वराज्यविषयक शिवाजीच्या लौकिक उद्योगात रामदासांच्या प्रेरणेची व आशीर्वादाची लुडबुड सिद्ध करण्याचा आग्रह कशाला धरायला पाहिजे. याहीपेक्षा अधिक तात्त्विक बनून अशी कोटी करावी की, रामदास हे 'श्री' होते व शिवाजी हे फार तर 'राजश्री' होते. म्हणजे समर्थांची 'श्री' निरुपाधिक तर शिवाजींची 'श्री' उपाधिदूषित. मग ही उपाधी स्वराज्याची का असेना! नि:श्रेयसापुढे लौकिक अभ्युदय हा गौण ठरणार आणि खरी गोष्ट ही अशीच होती की, धर्माविषयी रामदास व शिवाजी हे एकाच मताचे होते. तो धर्म चातुर्वर्ण्यात्मक व सनातन वैदिक होय. त्या धर्माच्या दृष्टीने सतराव्या शतकात ब्राह्मणाला क्षत्रिय वर्ग गुरू

मानीत होते, व रामदासांची योग्यता म्हणजे ब्रह्मचर्य व स्वार्थरहित राहून रामदास हे गुरू करण्याला योग्य असे शिवाजीलाही वाटले. म्हणून शिवाजीने त्यांची दीक्षा घेतली व आपण तलवारीने मिळविलेले राज्य टिकण्यास व यशाला येण्यास अशा गुरूचा आशीर्वाद उपयोगी पडेल अशी त्याची भावना होती. पण "तू स्वराज्य मिळविण्याचा उद्योग केलास व तडीस नेलास तो कोणत्या आधारावर?" असे शिवाजीला कोणी विचारले असते तर त्याने ब्राह्मणाच्या आशीर्वादाकडे बोट दाखविले नसते, तर आपल्या छातीकडे ते दाखविले असते. किंवा कोणी म्हणेल की, शिवाजी इतका अविनयी नव्हता, याचा अर्थ तो स्वत:कडे बोट न दाखवता भवानी देवीकडे दाखविता. पण हे ग्राह्य मानले तरी स्वराज्यविषयक उद्योगाच्या प्रेरणेचे श्रेय शिवाजी रामदासांकडे खचित न देता, यात मला बिलकूल शंका वाटत नाही. एकाचा अन्यायाने अपहार करून त्याचा भार दुसऱ्याच्या शिरावर लादू पाहाणारे हे आम्हीच म्हणजे संकुचित दृष्टीचे लोक. शिवाजी व रामदास या दोघांनाही हे माहीत होते की, ज्याचा उद्योग त्याने करावा. आणि ते दोघेही तसेच स्वतंत्र बुद्धीने करीत होते. म्हणजे प्रत्यही उठल्याबरोबर किंवा शेवटी झोपी जाता रामदासाचे विचार धर्म व संप्रदाय यांच्या प्रचाराविषयीचे व शिवाजीचे विचार स्वराज्यसाधन व रक्षण याविषयीचेच असणार. रामदासाने तलवारीला मान दिला असता तर ती लहानशा कुबडीत गुप्त रीतीने ठेवण्यापुरता. शिवाजी महाराजानेही सनातन वैदिक धर्माला राजकारणात मान दिला असला तर तो मी मिळवतो हे राज्य देवब्राह्मणांकरिता असे मधूनमधून म्हणण्यापुरताच. मठात शिवाजी व रामदास यांची प्रत्यक्ष भेट झाल्यास रामदास उच्चासनावर बसून शिवाजी जमिनीवर गुडघे टेकून बसलेला दिसला असता, पण राजधानीतील दरबारात याचे उट्टे निघाल्याशिवाय राहिले नसते. म्हणजे तेथे सिंहासनावर शिवाजीच बसला असता व रामदासाला स्वतंत्र आसन मांडले असते तरी सिंहासनापेक्षा चार अंगळे तरी खचित खाली मांडण्यात आले असते. संप्रदायदीक्षेत जपाच्या माळेलाच प्रामाण्य हे शिवाजीने मान्य केले असते, पण सनदापत्रे यावर किंवा राजकारणी हुकमावर शिक्कामोर्तब यालाच खरे प्रामाण्य, हे रामदासांनीही कबूल केले असते. तात्पर्य, स्वत: 'श्री' व 'राजश्री' या दोन्ही आपापला व्यवहार संबद्ध व स्वतंत्र दोन्ही प्रकारचा सुरळीत निभावून नेण्याला समर्थ होत्या, त्या इतक्या की, मिळविलेल्या सगळ्या राज्यांची सनद गुरू म्हणून समर्थांच्या झोळीत का व कशी टाकावी हे शिवाजी पूर्णपणे जाणून होता. व उलट रामदासही जाणून होता की, झोळीत पडलेली संपूर्ण स्वराजाची सनद दडपून न बसता ती शिवाजीला का परत करावी व किती गोडीने परत करावी. राजपदाप्रमाणे गुरुपदालाही मान आहे. तसेच राजपदालाही गुरुपदाप्रमाणे मान आहे. पण ते दोन्ही वेगवेगळ्या कामांकरिता स्वतंत्र आहेत, हे जाणणारे जाणत होते. शिवाजीने सनातन धर्मसमजुतीप्रमाणे ब्राह्मणाला धर्मगुरू मानले तरी आपल्या घरच्या स्वयंपाक्याला त्याने कधी नमस्कार केला नाही. रामदासानेही क्षात्रश्रीचा परामर्श अशाच विवेचक बुद्धीने घेतला असेल. म्हणजे जो मान शिवाजीला देई तोच त्याच्या हुजऱ्याला त्याने दिला नसता. मग तो केवढाही शुद्र कुळीतला क्षत्रिय असेना का? आपणही ही विवेकबुद्धी चालवली तर आपणालाही हे कबूल करावे लागेल की, राजकारणातली शिवाजीची धोरणे शिवाजीच सांभाळता व चालविता. ती रामदासाला चालविता आली नसती. आणि गुप्त मंडळ्या स्थापून धर्मबुद्धी जागृत करण्याचे महत्कार्य रामदासांनी ज्या तंत्राने व धोरणाने केले असते ते शिवाजीला साधले नसते. एकीकडे सतेज ब्रह्मचर्य व दुसरीकडे धारातीर्थावर काम करणारा तितकाच सतेज क्षत्रिय वीर. यात कमी-अधिक प्रत लावण्याची कारवाई कृपण बुद्धीच्या मंडळींशिवाय दुसऱ्या कोणालाही सुचणार नाही. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर एकेरीच असले पाहिजे, अनेकविध असत नाही किंवा कोणत्याही पराक्रमाचे

कर्तृत्व एकेरीच असते, अनेकविध असत नाही. कोणत्याही साध्याचे साधन एकच असले पाहिजे. अनेकविध असू शकत नाही किंवा कोणत्याही मोक्षाचा मार्ग एकच असणार, अनेकविध असू शकत नाही, असे मानणारी कृपण अव्यवहारी बुद्धी ही सनातन असून जुन्या युगाप्रमाणे आज नव्या युगातही आपल्याला दिसून येत नाही काय?

शिवाजी व रामदास यांचे संबंध कसे व काय होते याविषयी आपण जवळजवळ अनुमानांवरच भिस्त ठेवावी लागेल. इतका थोडा कागदोपत्री पुरावा आहे. परंतु आपल्या हिंदू समाजाची व सर्वसामान्यरीत्या मनुष्यस्वभावाची ठेवण लक्षात घेता या दोघांचेही कार्य स्वतंत्र रीतीने चालले असावे व त्यांनी एकमेकांविषयी मनाने शुभचिंतन सतत ठेवले असले तरी एकमेकांच्या सल्लामसलतीवर किंवा प्रत्यक्ष मदतीवर आपले कोठलेही कार्य अवलंबून ठेवले नाही असे मला वाटते. किंचित थट्टेने म्हणायचे तर असे म्हणता येईल की, दोघे एकमेकांना नमस्कार करीत, इतकेच नव्हे तर करू इच्छितही. पण तो नमस्कार दुरून. 'दुरून नमस्कार' याचा अर्थ निंदात्मक घ्यायचा नाही. पण दुरूनचा खरा अर्थ असा की, अनेक कार्यांचे अंतिम ध्येय क्वचित एकच असले तरी त्यातील प्रत्येक कार्याचे उपध्येय, म्हणजे तात्कालिक ध्येय, वेगवेगळे असते. शिवाय प्रत्येक कार्याचे मंत्रतंत्र, नियम, विधी, निषेध, आचार– या सर्व गोष्टी एकमेकांशी न जुळणाऱ्या व कदाचित अडचण उत्पन्न करणाऱ्याही असू शकतात. शिवाय, प्रत्येक कार्यकर्त्या माणसाची मनोरचनाही अशी काही वेगवेगळी बनून जाते की, तशा दोन मनोवृत्ती एकात एक सोयीने बसून कार्य प्रभावी होऊ शकत नाही. म्हणून ज्याचे काम त्यानेच करावे. त्यापुरते दुसऱ्याला परका मानून दूर ठेवावे व फार तर दुरून त्याविषयी आदर दर्शवून आशीर्वाद द्यावा, इतकेच घडते व तेवढेच श्रेयस्कर ठरते. अंतिम स्थितीत अनेक कार्यांच्या परिणामांचा फायदा किंवा लाभ अदृश्य- रूपाने मुख्य ध्येयाला होत असतोच.

मी जे हे अनुमान म्हणून वर सांगितले त्याला तुमच्या-आमच्या पिढीतील राजकारणी पुरुष व साधुसंत किंवा धार्मिक सत्पुरुष यांच्या संबंधाचा दाखला मदतच करू शकेल. हिंदुस्थान देश हल्लीच्या हीन स्थितीतून वर येऊन त्याला सत्ता व स्वातंत्र्य मिळावे ही गोष्ट लोकमान्य टिळकांसारख्या राजकीय पुढाऱ्यांना जितकी इष्ट वाटत होती तितकीच ती या एक-दोन पिढ्यांतील अनेक धार्मिक सत्पुरुषांनाही इष्ट वाटत होती यात संशय कसला? पण टिळक व त्यांचे समकालीन धार्मिक सत्पुरुष यांचे संबंध कितपत आले व जे आले त्यांचे स्वरूप काय होते याची मला थोडीबहुत माहिती आहे असे मी म्हटले तर यात विशेष बढाई करतो, असे सहसा कोणी म्हणणार नाही. ही माझी माहिती मी सोदाहरणही सांगू शकेन. परंतु ती सांगण्याला खासगी व्यक्तींचा व गोष्टींचा उल्लेख करावा लागेल म्हणून मी ती गोष्ट करीत नाही. परंतु त्या माझ्या माहितीवरून मी निश्चयात्मक सांगू शकतो की, राजकीय पुढारी या नात्याने जशी कोणाही धार्मिक सत्पुरुषाकडून स्फूर्ती टिळकांना मिळाली नाही किंवा मिळण्याची अपेक्षा त्यांनी केली नाही, त्याचप्रमाणे हिंदुधर्मरक्षण हे टिळकांना इष्ट होते तरी आपल्या उद्योगाने आपण कोणा धार्मिक सत्पुरुषाला स्फूर्तिकार, प्रेरणामूल होऊ शकू, असेही त्यांना कधी वाटले नाही. एकाच वेळी टिळक व असे सत्पुरुष हयात असता त्यांच्या परस्परभेटी किती थोड्या झाल्या आणि झाल्या त्यात औपचारिक सभ्यता व आदरबुद्धी यांच्या प्रदर्शनाचाच प्रकार बहुतेक सर्व कसा होता याविषयीची माहिती मनोरंजक होईल; पण ती देता येत नाही. माझे म्हणणे इतकेच की, शिवाजी व रामदास यांच्या परस्परसंबंधाविषयीचे जे मत मी वर मांडले आहे त्याविरुद्ध ऐतिहासिक कागदपत्री पुरावा नाहीच, पण त्रिकालाबाधित सारासार विचार म्हणजे स्थूल तारतम्य, इतकेच नव्हेतर विद्यमान कालातील माझा प्रत्यक्ष अनुभवही त्या मताला अनुकूल असाच आहे.

रामदास व शिवाजी यांच्यासंबंधीचे खरे स्वरूप काय याची चिकित्सा याहून अधिक करण्याचे कारण नाही. व ही चिकित्सा करण्याची संधी मिळवून दिल्याबद्दल मी रा. देव यांचा आभारी आहे.

## श्रीसमर्थरामदासस्वामी व छत्रपतिशिवाजीमहाराज यांज संबंधाने

# चाफळखोऱ्यातील एक स्त्रीगीत

### *संशोधक - इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे*

१ खालील स्त्रीगीत चाफळास रा. बापूराव उपाध्ये यांच्या येथील एका मुलीच्या तोंडून ऐकिले. गाणे कोण्या रंगनाथगुरुबाई नामक कवयित्रीने केले. गाणे जुने आहे असे चाफळचे लोक सांगतात. कवयित्री कोण कोठील वगैरे माहिती चाफळास कोणास नाही. याचा अर्थ असा की गाणे जुने आहे. भाषेवरून गाणे शंभर वर्षांचे जुने आहे की दोनशे वर्षांचे जुने आहे की पाचपंचवीस वर्षातले आहे, ह्या त्रिविध शंकेचा परिहार करता येणे मुष्कील आहे. कारण भाषा बरीच अर्वाचीन दिसते. गाणे रामदासकाली रचिले असून उत्तरोत्तर जुनी भाषा अर्वाचीन होत जाऊन ती अगदी अलीकडील बनली असण्याचा संभव आहे.

२ गीतात वर्णिलेला प्रसंग असा :— रामदास एकदा कोणत्याशा दुखण्याने आजारी होते. दुखण्यावर वाघिणीचे दूध हवे होते. ते पैदा करण्याचे अवघड कृत्य कोणाही ब्राह्मणशिष्याच्याने होईना. ही वार्ता छत्रपति शिवाजीमहाराजांच्या कानावर गेली. तेव्हा महाराज चाफळास तातडीने आले. शिंगणवाडीच्या मारुतीच्या जवळील रानात वाघीण होती व ती नुकतीच व्याली होती. तिच्याकडे परमभक्तोत्तम शिवाजीराजे गेले व तिची काकुळतीने दुधाकरता त्यांनी विनवणी केली. महाराजांच्या प्रेमळ विनवणीने वाघिणीचे मन मेणाहूनही मऊ झाले व ती उग्र वाघीण गाईहूनही गाय बनली. शिवाजी महाराजांच्या ठाई अपत्यप्रेमाची भावना वाघिणीला झाली व पान्हा फुटून पिलांप्रमाणे ती महाराजांना चाटू लागली. महाराजांनी मग तिचे दूध काढले व ते आपल्या गुरुमाउलीला समर्पण केले.

३ असे हे कवित्व आहे. ह्यात वास्तविक भाग किती व कवित्वभाग किती, हे पृथक् करण्याचे काम वाचकांवरच सोपविणे बरे. कदाचित पाळीव वाघिणीचे दूध दरवेश्याकडून महाराजांनी पैदा करविले असेल. कुत्रीच्याप्रमाणे पाळीव वाघिणीचे दूध दरवेशी कारण पडल्यास काढतात म्हणून सांगतात. गीतात रानातल्या वाघिणीचे दूध महाराजांनी काढले म्हणून म्हटले आहे, ते कदाचित कवित्व असू शकेल. एवढे मात्र खरे की, श्रीसमर्थ व श्रीशिवराय यांची एकमेकांवरील भक्ती इतकी अपूर्व होती की ती प्रेमळ अशा एका तत्कालीन कवयित्रीच्या प्रतिभेला उद्दीपित करती झाली. शकुंतलेला पाखरांनी दूध पाजिले किंवा रॉम्यूलसाला लांडगीने थान दिले, ह्या पुराणकथांहून शिवसमर्थांची ही कथा जास्त विश्वसनीय भासते. लोकांची मने वश करण्याची कला शिवराजाच्या ठायी असामान्य होती. हिंस्रपशूंना ही द्रव आणण्याची कला महाराजांच्या आटोक्यात नसेल कशावरून? तत्रापि, एकदम एखाद्या रानातील वाघिणीला महाराजांनी आपल्या

करामतीने गाय बनवावे, हे जरा अद्भुत दिसते; परंतु कविसृष्टीत अद्भुत हेच वास्तविक असते, या बाबीकडे लक्ष्य दिल्यास, शंका राहाण्याचे कारण राहात नाही.

### गीत

*वाघिणी ग मज बाळाते निजदुग्ध चि दे गे माये ।*
*व्याकुळ व्यथेने केले । रामदासगुरुमायेला ।*
*तुझिया स्तनिचे दुग्ध । औषध असे हे त्याला ।*
*तद्दुःखे बहु घाबरलो । तुजपाशी धावत आलो ।*
*रूपाते तुझिया भ्यालो । काकुळती येतों माये ।*
*वाघिणि ग मज बाळातें । निजदुग्ध चि दे गे माये ॥१॥*
*गर्जना माझिया रागे । करिता वन सर्व दणाणे ।*
*तरि बाई नाहिं मी आलो । तुज पाशीं कपटपणानें ।*
*जिजाबाई माउली ऐशी । मानिली लीनपणानें ।*
*भक्षावें मम देहासी । मग तुजला इच्छा कैसी ।*
*देउनि दुग्ध गुरूसी । मग येतों मी लवलाही ।*
*वाघिणी ग मज बाळातें । निजदुग्ध चि दे गे माये ॥२॥*
*त्या करुणावचनें तेव्हां । पाषाण तरु पाझरले*
*रामदासगुरुमायेचें । हृदय बहु प्रेमें भरलें ।*
*गाय जशी वाघिण जाली । निष्ठुरपण तिचें सरलें ।*
*पाडसास प्रेमें जैशी । इच्छेनें चाटी त्याशी ।*
*कनवाळुपणानें पाहें । (शिवपुण्य फळाला आलें).*
*वाघिणि ग मज बाळातें । निजदुग्ध चि दे गे माये ॥३॥*
*हेरंब षण्मुख तिसरा । नृप होय उमेचा तान्हा ।*
*पात्रांत धार काढी । गोकुळीचा जैसा कान्हा ।*
*तुंब पात्र भरुनि राहे । वाघिणीचे वंदुनि पाये ।*
*पण घेउनि सत्वर जाये । रंगनाथगुरुबाईला ।*
*वाघिणि ग मज बाळातें । निजदुग्ध चि दे गे माये ॥४॥*

४ तिसऱ्या प्रहरी करमणुकीच्या वेळी घरातील व शेजारच्या आयाबाया व मुलीबाळी व तान्हुलीपान्हुली एकत्र जमली असता हे स्त्रीगीत आठदहा वर्षांच्या कोवळ्या मुली प्रेमळपणाने व भक्तिभावाने गातात. काव्यदृष्टीने पाहाता गीतात शांतरस, करुणरस व अद्भुतरस तुडुंब भरले आहेत हे सांगणे नलगे. मुद्दाम सांगावयाची गोष्ट म्हणजे ह्या काव्यात इतिहासरस ही ओतप्रोत प्रतीयमान होतो. शिवाजी कोण व रामदास कोण यांची ओळख अर्भकांना हे गीत करून देते. आजपर्यंत चाफळखोऱ्यातील अर्भकांना ह्या गीताने राष्ट्रपितर जे शिवसमर्थ त्यांची ओळख करून दिली. ह्या पुढे नागपुरापासून तुंगभद्रपेर्यंतच्या व पश्चिमसमुद्रापासून माहुरपर्यंतच्या महाराष्ट्रातील अखिल बाळबाळिकांना हे गीत राष्ट्रेहितासाचे बाळकडू पाजणार नाही काय?

# कवी विनायक जनार्दन करंदीकर

**देवांचे मित्र व सहकारी**

**जन्म : इ. स. १८७२ देहावसान : इ. स. १९०९**

---

**कवी विनायककृत**

**परापूजा**

(श्रीशंकराचार्यांच्या मूळ संस्कृतावरून)
पद [चाल. चंद्रकांत राजाची...]

*चराचरीं तूं आवाहन ये काय तुझ्या कामीं?*
*सकलधारा द्यावें तुजला काय आसना मीं?* १
*निर्मल जो, त्या केले ठरती अर्ध्यपाद्य वाया*
*कर वाहेना आचमन तुला शुद्धाला द्याया* २
*घालू कैसें तुला निर्मला देवा! स्नानातें?*
*विश्वोदर तूं तुला वहावा पट कवण्या हातें?* ३
*निरालंब तूं उपवीताचें महत्त्व तुज नाहीं*
*नसे वासना, फुलें सुवासिक निष्फल त्या ठायीं* ४
*गंधाची थोरवी कोणती नसे लेप ज्याला,*
*स्वतां रम्य तूं, फिकी तुजपुढें पडे रत्नमाला* ५
*सदा तृप्त तूं, नैवेद्याची काय तुला वाणे,*
*विभो! तुष्ट तुज कसें करावें म्या तांबूलानें?* ६
*नसे अनंता! प्रदक्षिणेचें बल माझ्याठायीं,*
*अभिन्न तूं मी, मग कवणाच्या लागावें पायीं?* ७
*तुजला स्तवितां हात टेंकिले जेथें वेदांनी,*
*कशी टिकावी तेथें वाणी मग बापुडवाणी?* ८
*स्वयंप्रकाशी काय त्यापुढें नीरांजनज्योती?*
*विसर्जन तुला कोठें? विश्वे नांदविसी पोटीं* ९
*कळून सारें सजलों देवा! तुझ्या पूजनासी,*
*भय न लेंकरा वाटे जाया निजजनकापाशी* १०
*चुकले मुकले शब्द मुलाचे गोडच जनकातें,*
*बालिश लीला बघून त्याच्या मनी हर्ष दाटे* ११
*अजाण मी लेंकरूं, तुजकडे जनकाचें नातें,*
*तव सेवेचा देवा! ओढा असें मात्र मातें* १२
*येईल तशी करितों सेवा गोड करुनि घ्यावी,*
*पुण्यपदाची जोड वत्सला! विनायका द्यावी* १३

# सत्कार्योत्तेजक सभेचे स्व. श्रीमती जा. र. देशपांडे मुक्तद्वार वाचनालय, धुळे

## (तालुका अ वर्ग वाचनालय)

यशस्वी जीवनाला अज्ञानाचा फार मोठा अडथळा असतो. ते अज्ञान नाहीसे करून सर्व संबंधित क्षेत्रात पुरेसे ज्ञान संपादन करणे व जीवन यशस्वी करणे शक्य असते; परंतु ज्ञानाच्या त्या त्या क्षेत्रात प्रत्यक्षात उतरावे लागते. समाज हा ज्ञानी व प्रबुद्ध झाला पाहिजे. समाजातील प्रत्येक व्यक्ती संपादित ज्ञानावर भौतिक व आध्यात्मिक विकास साध्य करून आपला उपयोग समाजासाठी व राष्ट्रासाठी झाला पाहिजे. यासाठी कै. नानासाहेब शंकरराव देवांनी दि. १९ मे १८९३ रोजी स्थापन केलेल्या येथील सत्कार्योत्तेजक सभेचे दि. ५/४/१९७९ या दिवशी अभ्यासकांसाठी फार पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या ग्रंथालयाचे (१) समर्थ वाग्देवता मंदिर (संदर्भ ग्रंथालय), (२) सर्वांसाठी सत्कार्योत्तेजक सभा मुक्तद्वार वाचनालय व ग्रंथालय, धुळे असे २ स्वतंत्र विभाग सुरू केले. ''जिथे ग्रंथ नाही! जिथे ज्ञान नाही तिथे सौख्य नाही!!''

आज हे वाचनालय समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक विचार प्रबोधनास हातभार लावणारी व बालमनावर संस्कार करणारी सत्कार्योत्तेजक सभेची शाखा आहे. इतकेच काय पण सत्कार्योत्तेजक सभेचे कार्य पाहिल्यास सत्कार्योत्तेजक सभा हे एक मुक्त विद्यापीठच आहे. समाजाच्या सर्वांगीण उन्नतीमध्ये या ॠग्वेदकालापासूनचा बहुमोल विचारांचा ग्रंथरूपी खजिना आजच्या पिढीस उपलब्ध करून देण्याबरोबरच भावी पिढीसाठी जनत करून ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सुरू आहे.

''सत्कार्योत्तेजक सभेचे सन १९९२-९४ हे वर्ष' शताब्दीवर्ष म्हणून साजरे केले. आज मुक्तद्वार वाचनालय सभेचे स्वतंत्र अंग होऊन ३३ वर्षे पूर्ण झाली आहेत. वाचनालय व ग्रंथालय सभेच्या प्रशस्त इमारतीत विराजमान झाले आहे.

**सेवाव्रत ग्रंथपाल -**

कै. सौ. मंगलाताई वैशंपायन यांनी वाचनालयाच्या स्थापनेपासून ते सन १९९६ या कालावधीपर्यंत सेवाव्रत ग्रंथपाल पद सांभाळले. कै. सौ. मंगलताई शरद वैशंपायन यांनी आपल्या परिवारासह वाचनालयास अपत्याप्रमाणे, तळहातावरील फोडाप्रमाणे जपले व वाढविले होते वाचनालयात कार्यरत असणाऱ्या सेवकवर्गात अत्यंत खेळीमेळीने वावरत असत. किंबहुना आपल्या मुलांप्रमाणे इतर सेवकांना वागवित असत. वाचनालयास लागणारे छोटे-मोठे लेखनसामग्री, इतर साहित्य त्या स्वत: खर्च करून आणीत असत.

**कै. सौ. मंगलाताई वैशंपायन महिला विभाग-**

कै. सौ. मंगलाताई वैशंपायन यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीमुळे वाचनालयाने महिला विभागाचे ''कै. सौ. मंगलाताई वैशंपायन महिला विभाग' असे नामकरण करण्यात आले.

**वाचनालयास तालुका 'अ' वर्ग प्रदान :** वाचनालयाने केलेल्या यशस्वी वाटचालीची दखल घेऊन शासनाकडून मार्च सन २००२ ला तालुका 'अ' वर्ग दर्जा प्रदान करण्यात आला याबद्दल तत्कालीन मा. ग्रंथालय संचालक मा. श्री. मेश्रामसाहेब, साहाय्यक ग्रंथालय संचालक मा. श्री. म. वि. उरणे, ग्रंथालय निरीक्षक श्री. अे. पी. ढोणे यांची संस्था ऋणी आहे यावेळी वाचनालयाचे माजी अध्यक्ष कै. क. द. देशमुख व माजी कार्यवाह श्री. ज. ह. करवीर यांचे फार मोलाचे सहकार्य आहे. तसेच कै. मंगलाताई वैशंपायन यांच्या निधनानंतर वाचनालयाचे कामकाज थोडे दिवस ठप्प झाल्यामुळे, त्या परिस्थितीत कर्मचारी वर्गाने वाचनालयास माजी ग्रंथपाल श्री. राजेश वर्मा व सध्याचे ग्रंथपाल श्री. रविकिरण बागुल, सहाय्यक ग्रंथपाल गोरख सूर्यवंशी, लिपिक मनिष बीडकर यांच्या मदतीने वाचनालयास चालना मिळाली. यांचे कार्य पाहून माजी कार्यवाह श्री. ज. ह. करवीर यांनी रु. ४०,०००/- ची देणगी देऊन ''ग्रंथदेवघेव विभाग व कार्यालयासाठी' 'करवीर दालन' (हणमंत बाळाचार्य करवीर यांचे स्मरणार्थ) ची निर्मिती करण्यात आली.

## वाचनालयाचे नामकरण

दि. २२ ऑक्टो. २००४ रोजी श्री. दत्तात्रय रघुनाथ देशपांडे व श्रीमती अंजली अशोक ओक यांनी रु. २, ७५,०००/- देणगी दिली व त्यांच्या इच्छेप्रमाणे वाचनालयाचे नामकरण 'सत्कार्योत्तेजक सभेचे स्व. श्रीमती जानकीबाई रघुनाथ देशपांडे' मुक्तद्वार वाचनालय असे करण्यात आले.

## राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकत्ता यांचेमार्फत मा. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र 'झेरॉक्स यंत्र' भेट

सन २०११-१२ या वर्षांत वाचनालयाच्या कामाने प्रभावित होऊन मा. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिफारशीने राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कोलकत्ता यांचेकडून रु. ३८२२०/- चे 'झेरॉक्स यंत्र' भेट मिळाले याबद्दल मा. श्री दि. श्री. चव्हाण मा. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, मा. अशोक गाडेकर सहाय्यक ग्रंथालय संचालक, नाशिक विभाग नाशिक तसेच राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान यांची संस्था आभारी आहे.

## सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धा परीक्षा

श्री समर्थ रामदासांनी सांगितल्याप्रमाणे शरीर मजबुतीकरता बलोपासना व मनावर उचित संस्कारासाठी 'मनाचे श्लोक' आवश्यकता सांगितली आहे. त्याप्रमाणे वाचनालय योगासन, सूर्यनमस्कार, मनाचे श्लोक पाठांतर, चित्रकला, हस्ताक्षर, निबंध स्पर्धा यांचे यशस्वी आयोजन करीत असते. या संपूर्ण स्पर्धेचे स्पर्धा प्रमुख म्हणून श्री ज. भा. उपासनी हे काम पाहातात.

वाचनालय हे एक कुटुंब असून, वाचक हा या कुटुंबाचा प्रमुख घटक असल्याने त्यांच्या अडीअडचणी मांडण्याच्या दृष्टीने 'तिळगूळ समारंभ व वाचक मेळावा' या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

## वाचन साहित्य व ग्रंथसंपदा

''ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे'' असे ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शि. रा. रंगनाथन यांनी म्हटले आहे. त्याप्रमाणे वाचनालय हे वाचन साहित्य ग्रंथसंपदेने अधिकाधिक समृद्ध होत आहे. त्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल-

वाचनालयात मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील दैनिक वर्तमानपत्रे-२०, साप्ता.-१२, पाक्षिक-०५, मासिक-६० व दिवाळी अंक-६० इत्यादी वाचनसाहित्य विपुल प्रमाणात उपलब्ध असून, वाचनालयाची ग्रंथसंपदा ही २२,६२१ एवढी आहे. यात संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी, अर्धमागधी, पाली भाषेतील शास्त्रीय ग्रंथ, धार्मिक, ऐतिहासिक, चरित्र, आत्मचरित्र, कथा, कादंबऱ्या, नाटक, प्रवासवर्णने, एकांकिका, बालसाहित्य तसेच महाभारत, रामाणय, श्रीमद्‌भागवत, दासबोध, वेद, पुराणे, उपनिषद, आरोग्य, तत्त्वज्ञान, ज्योतिष,

आयुर्वेद, निसर्गोपचार तसेच सर्व धर्मीय ग्रंथ, स्पर्धा परीक्षेसंबंधी व बालसाहित्य विपुल उपलब्ध आहे. दरवर्षी वाचनालय रु. ८४०००/- ची ग्रंथ खरेदी करून ग्रंथसंपदेत भर टाकीत असते. याशिवाय दात्यांच्याकडून भेटीच्या स्वरूपात मिळालेल्या ग्रंथांची मोलाची भर पडत असते.

**आज मुक्तद्वार वाचनालयाचे स्वतंत्र अंग होऊन ३३ वर्षे पूर्ण झाली आहेत. खालीलप्रमाणे दालने**

१) सर्वसामान्य वाचकांसाठी प्रशस्त दालन
२) विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाकरिता स्वतंत्र दालन
३) कै. मंगलाताई वैशंपायन महिला दालन
४) बालकांसाठी स्वतंत्र दालन
५) ग्रंथदेव-घेव करिता 'करवीर दालन'
६) वाचनालयाकरिता स्वतंत्र प्रशासकीय कार्यालय

अशी सहा दालने वाचकांसाठी उपयोगात आणली जातात. वर्षभरात १० ते १५ हजार स्त्री, पुरुष व बालवाचक याचा लाभ घेत आहेत.

वाचनालयात पुस्तकांनी सुशोभित केलेली ६२ कपाटे आहेत. तसेच १० मोठी व मध्यम आकाराची ८ टेबल्स, १५ बाके आणि २५ खुर्च्या आहेत.

**परिरक्षण अनुदान -**

मा. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून दरवर्षी वाचनालयास रु. २, ५६,०००/- परिरक्षण अनुदान मिळते.

**वाचनालयाची गरज**

वाचनालयाची आजची परिस्थिती पाहाता दिवसेंदिवस वाचकांची तसेच वाचन साहित्यांची, ग्रंथसंपदेची संख्या वाढतच आहे, तरी या वाढत्या संख्येला समायोजित करण्यासाठी इमारतीचा विस्तार होणे आवश्यक आहे तरी स्वतंत्र खोल्या बांधणे, फर्निचर, कपाटे याकरिता दात्यांनी सढळ हाताने मदत करावी ही विनंती.

वाचनालयाची प्रगती व उत्कर्ष होत आहे यांचे श्रेय वाचनालयाचे कार्यरत असलेले अध्यक्ष-वसंत रा. जोशी, कार्यवाह-अनिल वि. साठ्ये, कोषाध्यक्ष-पद्माकर खं. वैद्य व कार्यकारी सदस्य तसेच वाचक, सभेवर प्रेम करणारे आणि वाचनालयाचे सेवक वर्ग

१) श्री. रविकिरण अ. बागुल (एम. ए. बी. लिब.) - ग्रंथपाल
२) श्री गोरख ए. सूर्यवंशी (१२ वी, एल. टी. सी.) - सहा. ग्रंथपाल
३) श्री मनिष वा. बिडकर (१२वी एल. टी. सी.) - लिपिक
४) श्री. राजू ल. बिडकर (बी. ए.) - ग्रंथालय सहा.

यांनाच आहे.

**बालकांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांना आपलेसे वाटणारे मुक्तद्वार वाचनालय**

मुक्तद्वार वाचनालय हे खऱ्या अर्थाने सर्वांना मुक्त असायला हवे– त्याप्रमाणे वाचनालयाने बालकांपासून ते ज्येष्ठ/श्रेष्ठांपर्यंत आपल्या सेवेचे प्रतिबिंब दाखविले असल्याकारणाने सर्वांना आपले वाचनालय हे आपल्या कुटुंबाप्रमाणे वाटत असते, सर्वांना उन्हापासून सावली, थंडीपासून ऊब देणारे वाटत असल्याने त्यांचा ओढा सातत्याने आपल्या वाचनालयाकडे येत आहे 'मायेची पाखर व प्रेमाची साखर' हे वाचनालयाचे ब्रीद असल्याने आपले मुक्तद्वार खऱ्या अर्थाने सर्वांना आपलेसे वाटत आहे.

सत्कार्योत्तेजक सभेचे स्व. श्रीमती जानकीबाई रघुनाथ देशपांडे मुक्तद्वार वाचनालय, धुळे, आपणा सर्वांना ग्रंथसेवा, संदर्भ सेवा, इतर सर्व वाचन सेवा देण्यात सज्ज आहे तरी अधिकाधिक संख्येने वर्गणीदार होऊन सेवेचा लाभ घ्यावा ही विनंती.

आपलेच
व. रा. जोशी, अध्यक्ष    अ. वि. साठ्ये, कार्यवाह
प. खं. वैद्य, कोषाध्यक्ष
सत्कार्योत्तेजक सभेचे स्व. श्रीमती जा. र. देशपांडे
मुक्तद्वार वाचनालय, धुळे

# रामेण रामदासेन लिखितम् वाल्मिकी रामायण – राष्ट्रीय परिषद

**_श्री. शरद कुबेर_**

*भक्तिधाम, पारसनीस कॉलनी, सातारा, ९८९०५२३६९०*

धुळे येथील श्री समर्थ वाग्देवता मंदिराची अधिष्ठात्री देवता म्हणजे 'रामेण रामदासेन लिखितम् वाल्मिकी रामायणम् ।' ही श्री समर्थांच्या हस्ताक्षरातील संपूर्ण सात कांडांची २४६०० श्लोकांची वाल्मिकी रामायणाची पोथी होय. सुमारे ४०० वर्षे इतकी जुनी पण अगदी सुस्थितीत असलेली, जिवापाड जतन केलेली ही प्रत आहे. वाल्मिकी रामायणाच्या संशोधित आवृत्या (Critical Editions) २० व्या शतकात लाहोर, बडोदा, पुणे, मद्रास, बंगलोर येथे झाल्या. पं. सातवळेकर इ. विद्वानांचीही वाल्मिकी रामायणाची प्रतही उपलब्ध आहे. पण आश्चर्य म्हणजे समर्थहृदय देवांचे संशोधन कार्य माहीत असूनही 'रामेण रामदासेन लिखितम् वाल्मिकी रामायणम् ।' या प्रतीचा अभ्यास या संशोधित आवृत्त्यांत झालेला दिसत नाही. एका दृष्टीने या संशोधित आवृत्त्यांमधील ही उणीव जाणकारांच्या लक्षात येते.

'रामेण रामदासेन लिखितम् वाल्मिकी रामायणम् ।' या प्रतीचे संशोधन आणि प्रकाशन या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील काही जाणकार विद्वान अभ्यास करीत आहेत. या अभ्यासाची रूपरेषा ठरविण्यासाठी १० ऑक्टोबर २०१० रोजी एक बैठक होऊन प्रतीप्रत तयार करण्यासंबंधी काही धोरणात्मक निर्णय घेतले होते. त्यानुसार प्रतीप्रत तयार करून, ती मूळ प्रतीशी ताडून, आवश्यक ते बदल करून संगणकीय कच्ची प्रत तयार झाली. त्याचे मुद्रण शोधन करण्याचे कामही बराच काळ चालेल.

या स्तरावर वाल्मिकी रामायणाचा ध्यास आणि अभ्यास असणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील विद्वानांना पाचारण करून त्यांचे मार्गदर्शन घेण्याचे श्रीसमर्थ वाग्देवता मंदिराच्या विश्वस्तांना वाटले. त्या दृष्टीने योग्य ती पावले टाकून 'रामेण रामदासेन लिखितम् वाल्मिकी रामायणम् ।' राष्ट्रीय रामायण परिषद आयोजित केली होती.

दोन दिवसांच्या ५ ज्ञानसत्रांच्या या परिषदेत ३० शोधनिबंधांचे वाचन आणि त्यावर चर्चा झाली. पं. वसंतराव गाडगीळ, भांडारकर प्राच्य विद्या संशोधन केंद्राचे प्रा. डॉ. गणेश थिटे, विशाखापट्टमच्या आंध्र विद्यापीठाच्या प्रा. डॉ. सौ. रमणा, तंजावरच्या रामदासी मठाचे बी. रामचंद्र, प्रा. डॉ. सौ. शेवतेकर, मुंबई विद्यापीठाच्या रा. ज. भांडारकर संस्कृत प्राध्यापिका डॉ. सौ. उमा वैद्य, प्रा. राम वेळापुरे, प्रा. डॉ. सौ. आराणके, प्रा. डॉ. अंजली पर्वते, श्री. सुधाकर कुलकर्णी आदींचे भविष्यातील अभ्यासाच्या दृष्टीने मार्गदर्शन लाभले. निबंध वाचनात नवोदितांचाही सहभाग लक्षणीय होता. श्री समर्थांच्या हस्ताक्षरातील प्रतीची लेखनपद्धती, सौंदर्यस्थळे, अनुवादाच्या भावानुभूती हे विषय निबंध-वाचनात महत्त्वाचे

होतेच, पण वाल्मिकी रामायणाच्या संदर्भात अभ्यासपूर्ण निबंधाचे आधुनिक दृक्‌श्राव्य तंत्रासह सादरीकरणही झाले; त्यात अन्य भाषेतील, पंथातील रामायणे, अध्यात्म रामायण, उत्तररामचरित, तुलसी रामायण यांचा तौलनिक अभ्यास, रामायणावरील अन्य प्रबंध, रामायणातील वैज्ञानिक, सामाजिक आणि विशेषत: स्त्रीविषयक वैशिष्ट्यपूर्ण निबंधांचेही वाचन झाले.

राष्ट्रीय संस्कृत दिनाच्या सुमुहूर्तावर उद्‌घाटन झालेल्या या परिषदेत बहुतांश निबंध सोप्या सुगम संस्कृत भाषेत वाचले गेले. त्यावरील चर्चाही संस्कृतमध्येच रंगली.

या सर्व कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन व्याकरण शास्त्री निलेश वैशंपायन, प्रा. डॉ. सौ. सुषमा दाते, सौ. शेलकर, सौ. अरुंधती आपटे यांनी संस्कृत व मराठी भाषेत केले. विशेष म्हणजे सूत्रसंचालकही निबंध वाचक होतेच.

या राष्ट्रीय परिषदेत बीजभाषण प्रा. डॉ. गणेश थिटे यांचे 'रामेण रामदासेन लिखितम् वाल्मिकी रामायणम् ।' या प्रतीचे वैशिष्ट्य आणि त्याच्या अभ्यासाची दिशा या विषयावर होते. उद्‌घाटन धुळे येथील प्रमुख जिल्हा न्यायाधीश न्या. बा. न. देशपांडे यांनी केले. अध्यक्षस्थान मा. विनोद सुराणा, संभाजीनगर यांनी भूषविले.

श्रीसमर्थ वाग्देवता मंदिराचे कार्याध्यक्ष प्रा. डोंगरे, सत्कार्योत्तेजक सभेचे डॉ. वि. आ. चितळे, भारतीय विद्या संशोधन केंद्राच्या सौ. प्रा. निफाडकर, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सौ. शेवतेकर यांनी व त्यांच्या लहानथोर सहकाऱ्यांनी परिषद यशस्वी होण्यासाठी खूपच परिश्रम घेतले.

एकूणच या दोन दिवसांच्या ज्ञानसत्रातून अत्यंत चांगल्या स्तरावर विचारमंथन झाले आणि नवनीत रूपाने पुढील कार्याचे दिग्दर्शनही लाभले. ही या परिषदेची यशस्विता आहे.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

# संत श्री निंबरगीकर महाराज यांचे तत्त्वज्ञान

*गुरुनाथ महाराज कोटणीस, 'कैवल्यधाम' सांगली.*

**संत श्री निंबरगीकर महाराज यांची संक्षिप्त माहिती**

विजापूर जिल्ह्यात निंबरगी ह्या गावी श्री नारायणराव भाऊसाहेब महाराज निंबरगीकर ऊर्फ गुरुलिंग जंगम महाराज ह्या नावाने एक संत होऊन गेले. त्यांचा जन्म नीलवाणी जातीत शके १७१२ मध्ये झाला, व त्यांचे निर्वाण शके १८०७ चैत्र शुद्ध द्वादशी १२ स शुक्रवार तारीख २७ माहे मार्च सन १८८५ रोजी रात्री ११ वाजता झाले. वयाची पहिली ३१ वर्षे प्रपंचात घालविल्यावर परमार्थाचे रहस्य समजून घेण्यासाठी त्यांनी पुढची ३६ वर्षे परमार्थ साधनेत घालविली व साधन सिद्धता झाल्यावर शेवटची २८ वर्षे लोकानुग्रह व परमार्थ-बीजारोपण करण्यात घालविली. त्यांच्या शिष्यमंडळींत श्री लक्ष्मीबाई आक्का-महाराज व श्री रघुनाथप्रिय-साधुमहाराज, ही दोघे मुख्य होत. श्री रघुनाथप्रिय-साधुमहाराज यांचेकडून श्री निंबरगीकर महाराज ह्यांनी प्रमुखत: दोघांस अनुग्रह देवविला. त्यापैकी श्री रामचंद्रराव महाराज यरगट्टीकर, यांनी चिमड येथे मठ स्थापिला, व त्यांचे शिष्य माझे वडील ब्रह्मीभूत तीर्थरूप तात्यासाहेब कोटनीस हे होत. तसेच श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर ह्यांनी इंचगेरी येथे मठ स्थापिला व त्यांचे शिष्य गु. प्रो. रामभाऊ रानडे हे होत.

श्री निंबरगीकर महाराज यांच्या तत्त्वज्ञानाची रूपरेषा-संप्रदाय-साधन पद्धति-उपासना व त्यांच्या जीवनात उमटलेले तत्त्वज्ञान क्रमश: पाहाण्याचे मी आज योजिले आहे.

श्री निंबरगीकर महाराज यांचे तत्त्वज्ञान त्यांच्या उपासनेत प्रतीत झाले असल्याने त्यांचा आध्यात्मिक जीवनाचा ठसा आपणास तेथे उमटलेला दिसून येणार आहे. याकरिता त्यांचे जीवनचरित्र, उपासना-बोध यांचा आपण अभ्यास केला पाहिजे.

श्री निंबरगीकर महाराज यांचे चरित्र साधार लिहिलेले– ''कैवल्यपुरुष खंड-१ ला व त्याचा भाग २ रा'' :

निंबरगी येथे श्रीलक्ष्मीबाई आक्कासाहेब महाराज या नावाच्या, श्री निंबरगीकर महाराज यांच्या सान्निध्यात अखेरपर्यंत असलेल्या व नंतर श्रीक्षेत्र चिमड येथे मठात शेवटपर्यंत वास्तव्य करून राहिलेल्या एक महान अधिकारी शिष्या होत्या. त्यांचे मुखातून श्रवण केलेले श्री निंबरगीकर महाराज यांचे संपूर्ण चरित्र साधार आणि सविस्तर लिहून ब्रह्मीभूत परमपूज्य तीर्थरूप श्री तात्यासाहेबांनी सांप्रदायिकांवर अनंत उपकार आणि अनुग्रह करून ठेविला आहे की, ज्या उपासनेच्या योगाने महाराजांनी काय सिद्धांत प्रस्थापित केले आहेत अशी जिज्ञासा मुमुक्षुंच्या अंतरात उत्पन्न होईल.

**''कैवल्य-वैभवा''तील श्री निंबरगीकर महाराज यांचे**

**वाङ्मयासंबंधी खुलासा :**

श्री निंबरगीकर महाराज यांची एकवीसच पदे असून ती श्री रामचंद्ररावजी महाराज यरगट्टीकर चिमड यांचेकडे असलेली व त्यांचे नित्य पाठात असणारी व श्री तात्यासाहेबांच्या सारख्या परमप्रिय शिष्याला प्रसाद म्हणून दिलेली, आम्ही ''कैवल्य-वैभव'' पुस्तकात प्रसिद्ध केली आहेत. त्यांत त्यांचे अंत:श्चारित्र्य आणि त्यांचे जीवनाशी निगडित असलेले तत्त्वज्ञान यांचा सुंदर मिलाफ झालेला आहे, की जो ओघ आजतागायत श्रीमहाराज यांचे कृपेने चिमड आणि इंचगेरी शाखेत जिवंतपणाने वाहतो आहे.

या श्रीनिंबरगीकर महाराज यांच्या २१ पद्यातही काही पदे प्रक्षिप्त असावीत असे कोणी मानतात. पण दुसरे ''गुरुलिंगजंगम'' कोणी झालेले नसल्याने व त्यांचे पट्टशिष्यांचे म्हणजे श्रीरामचंद्ररावजी महाराज यांचेसारख्या, श्रीभाऊसाहेब महाराज उमदीकर यांचे प्रिय अधिकारी बंधूकडे ती संग्रही व नित्य उपासनेत असल्याने संशयाला त्यात काही जागा आहे, असे मला वाटत नाही. शिवाय पदांची संख्या फार मोठी असती तर त्यामध्ये असा प्रक्षिप्त पदांचा संभव उत्पन्न होणे शक्य असते. उदाहरणार्थ– श्रीनामदेवराय व श्रीतुकाराम महाराज यांचे काही अभंग एकच आहेत. मुद्रिकाच तेवढी निराळी. ''*संतचरणरज लागतां सहज*'' हाही अभंग अशाच पैकी आहे. परंतु तसाही प्रश्न या बाबतीत उत्पन्न होण्यासारखा नाही.

**श्री निंबरगीकर महाराज हे प्रत्यक्ष शिवच होत :**

श्री निंबरगीकर महाराज यांचा अवतार खुद्द परमात्म्याचाच असून, त्यांना श्री काडसिद्धांचा अनुग्रह झालेला होता. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ''गुरुलिंगजंगमांचा'' जो अधिकार पद्यांत वर्णन केला आहे तो अधिकार श्री निंबरगीकर महाराज यांचा असून, गुरुलिंगजंगम म्हणजे प्रत्यक्ष शिवच. असे त्यांनी ध्वनित केले आहे. ज्ञानेश्वरीमध्येही १८ व्या अध्यायात भक्तवात्सल्य प्रगट करताना श्री ज्ञानेश्वर महाराजांनी १।२ ओव्यांत गुरुलिंगजंगमांचे स्वरूप आणि माहात्म्य वर्णन केले आहे.

श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात :

*''गितार्थाचा आवारु । कलशेंसीं महामेरु ॥*
*रचूनि माजी श्रीगुरू - । लिंग जें पुजीं ॥*

१८-१७८१ ज्ञानेश्वरी.

[गीतार्थाच्या आवारात अठराव्या अध्यायरूपी कळसासह महामेरू पर्वत तयार करून त्या ठिकाणी श्रीगुरुमूर्तीची (शीवपिंडीची) मी पूजा करीत आहे. ॥ १७८१]

*''तें तू गुरुलिंग जी माझें । जे येकलेपणींचे विरजें ॥*
*जयालांगी वोलांडिजे । अद्वैतबोधु'' ॥*

१८-१५७० ज्ञानेश्वरी.

[ज्याच्या प्रेमाकरिता अद्वैत-बोधाचे उल्लंघन करावे लागते व जी एकाकीपणाला मदत करते, अशी माझी गुरुमूर्ती तू आहेस.]

अर्थात् या दृष्टीने श्रीज्ञानेश्वर महाराजांनी वर्णन केल्याप्रमाणे हा अवतारू असल्याने साधन-संप्रदाय लुप्त झालेला श्रीकाडसिद्धांचा पूर्ण कृपानुग्रह संपादून त्यांनी साधन संप्रदाय पुन्हा प्रगट केला. श्री निंबरगीकर महाराज हे परमात्म्याचे अवतार किंवा श्री गोरा कुंभार यांनी म्हटल्याप्रमाणे :

*''ब्रह्ममूर्ति संत जगीं अवतरले ।*
*उद्धाराया आले दीन जनां'' ॥१॥*

असे ते चालते बोलते ब्रह्म होते.

*''ते चालतें ज्ञानाचें बिंब । तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ ॥*
*येर माणुसपण तें भांब । लौकिक मागु ॥''*

१०-७७ ज्ञानेश्वरी.

[ते ज्ञानाची चालती मूर्ती आहे, त्याचे अवयव ते सुखाला फुटलेले अंकुर आहेत; परंतु (त्याचे ठिकाणी

दिसणारा) माणूसपणा हा लोकांच्या दृष्टीला होणारा भ्रम आहे. ॥७७॥]

ही ज्ञानेश्वरीतील ओवीही आमच्या म्हणण्याची सत्यता पटवीत आहे. श्री निंबरगीकर महाराज यांच्या एका पदावरून हे स्पष्ट होत आहे.

*''प्रणवस्वरुपा नीनु । पठिसि नोडुवे नानु ॥*
*गुरुलिंगजंगमानीने । नानु नीने ॥३॥''*

''कैवल्य वैभव'' पद १३ वे.

महाराज म्हणतात– ''देवा तू प्रणवस्वरूप आहेस तर मी त्याचा जप करणारा आहे. अशा रीतीने मी सदैव तुझ्या संगतीतच आहे. गुरुलिंगजंगम तूच आहेस.''

ज्याचा आपण जप करतो त्याचा अंश आपल्यात असल्याशिवाय तो जप होऊ शकत नाही. म्हणून–

*''भृंगीचिया अंगीं कोण ऐसें बळ । शरीर अढळ केलें तीही ॥१॥*
*काय तिनें जप मुद्रा साधियेली । म्हणोनी झाली तेचि रूप ॥२॥''*

–श्री जनाबाई

या श्री जनाबाईंच्या उक्तीप्रमाणे महाराज म्हणतात,

''देवा तूच गुरुलिंगजंगम आहेस.'' म्हणजे त्यापेक्षा महाराज कोणी निराळे उरले नाहीत. हीच अनन्यगतिक भक्ती, अशा कोटीला गेलेले संत हे–

*''पूज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ती कानीं नायकावी ॥*
*हा अमुका ऐसी नोहावी । चेसि लोकां ॥१३-१८८॥''*

ज्ञानेश्वरी

[आपली पूज्यता आपण डोळ्यांनी पाहू नये, आपली कीर्ती आपण कानांनी ऐकू नये, हा एक अमुक मनुष्य आहे, अशी आपली लोकांना आठवणच होऊ नये; ॥१८८॥]

या श्री ज्ञानेश्वर महाराजांनी वर्णिलेल्या भूमिकेत गेलेले असतात.

गुरुलिंगजंगम म्हणजे शंकर : गुरू म्हणजे श्रेष्ठ व जंगम म्हणजे चैतन्ययुक्त.

चैतन्ययुक्त श्रेष्ठ लिंग असे आत्मरूप. म्हणजे गुरुलिंगजंगम.

गुरुलिंगजंगमापासून सर्व मार्ग उत्पन्न झाले. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी त्यांचा अधिकार एका अभंगात सांगितला आहे. :

**अभंग**

*''गुरुलिंगजंगम । तेणे दाविला आगम ।*
*आधी व्याधी झाली सम । तेणे पावलों विश्राम रे ॥१॥*
*देहभाव जेथें विरे । ऐसें साधन दिलें पुरें ।*
*बापरखुमादेवीवरें । विठ्ठलु रे ॥२॥''* श्री ज्ञानेश्वर महाराज

हा अधिकार सिद्ध करून साधनमार्ग प्रस्थापित करणेकरिता प्रत्यक्ष गुरुलिंगजंगम अवतीर्ण झाले, व भक्त होऊन ते आत्मरूपाशी तादात्म्य झाले, हे लक्षात घेण्यासारखे आहे. हा त्यांचे जीवनातील तात्त्विक सिद्धांत आहे.

**श्री निंबरगीकर महाराज यांची गंगासागर भक्ती**

गंगाजलरूप, समुद्र जलरूप, दोघेही एकच. पण गंगा समुद्राकडेच धाव घेते. ही जी गंगासागर भक्ती ती श्री निंबरगीकर महाराज यांचे जीवनात उत्तमत्वाने प्रचीतीस येत आहे, म्हणून ते देवाला म्हणतात–

*''अंद्दीत्य स्वामी इंदील्ला । एंदिमादरनिम्म अगली नाइल्ला ॥पला॥*
*निर्बैला नीनु । निर्विकारनु नानु । सगुणरुपा नीनु शरण माडुवें नानु ॥*
*अंद्दिल्ला स्वामी इंद्दील्ला ॥१॥''* कैवल्य-वैभव, पद १३ वे

''पूर्वी किंवा आता व केव्हाही देवा, मी तुला सोडून नाही. तू निराकार तर मी निर्विकार आहे. तू सगुणरूप आहेस म्हणून मी तुला शरण आहे.''

गंगा ही समुद्राकडे जाते, पण त्यातील काही पाणी गटारातही जात असेल. गटारात गंगोदक जाणे हे आमचे जीवन व समुद्रात मिळून पुन्हा सतत गंगेचा ओघ समुद्राला मिळणे व पुन्हा सांगावयास परत न येणे

आणि तेथील निरुपाधिक मौजा अनुभवणे, हे श्री निंबरगीकर महाराज यांचे जीवन. यात काय आनंद असेल, तो तत्त्वज्ञानीच जाणतील.

श्री निंबरगीकर महाराजांनी निरुपाधिक जीवनात मुक्तता कशी आहे, हे दाखविले आहे :

सद्‌गुरुकृपेने वैषयिक जीवन आटते, व ते अनंत अमर्याद निरुपाधिक होऊन भक्तपणाने निरपेक्ष भक्तिप्रेमाने अखंड आनंदाचा आस्वाद घेते. ज्याचे उपाधिभूत जीवनास परमात्मजीवन सांगाती आले, तो परदेशी, गरीब, बद्ध होत नाही. त्याला उपाधी व तद्‌जन्य विषय काय करणार? म्हणून महाराज म्हणतात–

*''ना ह्यांग बडव । ना ह्यांग परदेशी ॥*
*नीयन्न सरियविरलू ॥ पल्ला ॥*
*गुरुलिंगजंगमन गुर्वा कंडवरिणे ॥*
*गुणवंरिविरेल्ला माडुवदुयेनू ॥३॥''* कैवल्य-वैभव, पद ४ थे

''तू माझा सांगाती असताना मी गरीब व परदेशी कसा होईन? ज्यांनी या सद्‌गुरूची खूण पाहिली त्यांना हे विषय काय करणार?''

संतांची खरी श्रीमंती म्हणजे अंत:करणाचे समाधान.

यावरून पाहाता अंत:करणाचे समाधान ही खरी श्रीमंती असून, वैषयिक समाधान अंती तळमळ उत्पन्न करणारे असल्याने त्यात पूर्णता निर्माण होत नाही व ''सुखस्य नंतरम् दु:खम्.'' याप्रमाणेच स्थिती होते.

विषयात समाधान नाही. अंत:करणात समाधान आहे. गार पाण्यात समाधान असेल तर हिवाळ्यात दु:खदायी का होते? यावरून अंत:करणातच समाधान आहे. विषयात नाही, हे दिसून येईल.

**ज्ञानज्योती प्रगट करण्याची श्री निंबरगीकर महाराजांनी सांगितलेली कला :**

ज्ञात्याकडून अंत:करण मऊ करून नामामतान ज्ञानज्योती प्रगट करणे हाच शिवाचा म्हणजे गुरुलिंगजंगमाचा अनुभव आहे.

*''कल्लु मेत्तग माडिकोळ्ळण्णा ॥*
*बल्लवनु केळि । कल्लु मेत्तग माडिकोळ्ळण्णा ॥ पल्ला. ॥*
*कल्लू मेत्तग माडिकोळ्ळी कल्लु-सक्करिकिंत संवियो ॥*
*सार अमृत सुरिद नीनू ज्ञानज्योती तुंबि कोळ्ळो ॥१॥''*
कैवल्य-वैभव, पद ६ वे

''अंत:करण हा एक कठीण धोंडा आहे. ज्ञात्याकडून तो मऊ करावयाची कला शीक. मग तो खडीसाखरेप्रमाणे गोड होईल. अंत:करण मऊ केले म्हणजे तुला नामामृत मिळेल व ज्ञानज्योती तुझ्या अंत:करणात भरून राहील.''

अंत:करण गोड होऊन समाधानाला आले तर दुसऱ्याची अंत:करणे दुखावली जाणार नाहीत आणि असे झाले तर जगात अनर्थ घडतील काय? याकरिताच महाराज नेहमी परमेश्वराची मनाच्या ओढीतून आपणास सोडीव व मनाचा पीळ उकलून टाक अशी प्रार्थना करीत ते म्हणतात–

*''मनसिन मुरगी नी तिद्दिसो देवा । मनसिन मुरगी तिद्दिसो देवा ॥ पल्ला ॥*
*बलिदवगे आर्जव माडूतलेद । डवरिगे नूसिय नुडियुतलेद ॥*
*गुलिंगजंगम चरणक्के न्यंबदे । अडवियल्ली चरस्याडूतलेद ॥३॥''* कैवल्य-वैभव, पद १ ले प्रकरण ३.

''हे परमेश्वरा, मला मनाच्या ओढीतून सोडीव. गुरुचरणी लीन न होता मन आडरानात फिरते. म्हणून तू माझ्या मनाचा पीळ उकल.''

ज्याचे अंत:करण इतके समाधानाला आले, त्याच्या ठिकाणी दुर्वासना प्रवर्त होऊन आपत्ती भोगणेचा प्रसंग त्यांच्यावर येईल काय? कधीच नाही. म्हणूनच महाराजांनी साधकाने कसे वागावे यासंबंधी प्रत्यक्ष आईबापही असा बोध करणार नाहीत. असा व लहान मुलांनाही समजेल असा सुलभ भाषेत बोध केला आहे. महाराज म्हणतात–

**श्री निंबरगीकर महाराजांनी साधकास केलेला बोध : (कैवल्य-बोध)**

१) साधकांनी मनाच्या अधीन होऊ नये.

२) साधकांनी परद्रव्याची अपेक्षा करू नये.
३) काया कष्टवून पोटाला मिळवावे.
४) दुसऱ्याला हळहळ देऊन, फसवून, जबरीने अगर कोणत्याही वाईट रीतीने त्याचे पैसे घेतले, तर घेणाऱ्याला सहस्रावधी पटीने जास्त हळहळ देऊन, ते द्रव्य याच्या घरातून जाईल. गेल्यावाचून राहाणार नाही.
५) परस्त्रीला पाहू नये. पाहिल्याने दृष्टी भ्रष्ट होते. भ्रष्ट दृष्टीला आत्मस्वरूप दिसावे तसे दिसत नाही.
६) परस्त्रीचा समागम करू नये. त्याने मुक्तीला धक्का बसेल.
७) साधकांनी सद्‌गुरूच्या चरणावर दृढविश्वास ठेवून साधन करीत असावे.
८) दुसऱ्यावर कधीही भार घालू नये.
९) दुसऱ्यांना दुर्भाषा वापरू नये.
१०) दुसऱ्यांचा विश्वासघात करू नये.
११) दुसऱ्याच्या मनास कोणत्याही रीतीने दु:ख देऊ नये.
१२) दुसऱ्यांनी आपणास मारिले तरी ते आपण मुकाट्याने सोसावे, म्हणजे शांतिसुख मिळत जाते.
१३) साधकांनी आपल्या हातून करवेल तितका परोपकार करावा.
१४) भूतमात्राच्या ठिकाणी दया ठेवावी, म्हणजे देवाला संतोष होतो.
१५) आत्म्याचे साधन करीत असले म्हणजे संसारात कोणतेही कष्ट सोसावे लागणार नाहीत व कसे करू ही स्मरणी स्वप्नात देखील येणार नाही.
१६) मनातील काळजीने काही मिळत नाही. यास्तव या रीतीने चिंता न करिता आत्मस्वरूप कशाने जास्त दिसू लागेल व कधी नामामृत मिळेल याचीच चिंता करीत राहावे.

**श्री निंबरगीकर महाराजांनी निर्माण केलेल्या साधन सांप्रदायाचे वैशिष्ट्य :**

या दृष्टीने गुरुकृपेने साधन-अभ्यासाने एकदेशी झालेले जीवन ऊर्ध्वमुख करून ज्यांनी सर्वात्मरूप केले त्यांनाच याच देहात परमानंदांची प्राप्ती होते. हे दाखवून साधन-संप्रदाय प्रगट करण्याकरिताच श्री निंबरगीकर महाराज यांचा अवतार झाला. साधकांची चिंता त्यांनी दूर केली. ऐहिक जीवनात चिंतेशिवाय एक प्राणी तरी सापडेल काय? नाही. पण त्या सर्वांना निश्चिंत जर कोणी केले असेल तर श्री निंबरगीकर महाराजांनीच. म्हणून या संप्रदायाचे वैशिष्ट्य आहे.

**साधनाच्या योगाने प्रपंचही सुखरूप होतो हेच महाराजांच्या तत्त्वज्ञानाचे सार होय :**

कोणी म्हणतात साधनेत काय आहे. पण साधन कोणालाही सुटले नाही. कोणत्याही सांप्रदायाचे आद्य-प्रवर्तक हे सर्व महान साधनी पुरुष होते, असे आपणास नि:संशय रीतीने दिसून येईल. समर्थ म्हणतात–

**ओव्या**

*"जो सिद्धाचाही सिद्ध । ज्ञान वैराग्य प्रसिद्ध ।।*
*सामर्थ्यसिंधू अगाध । कैलासीचा राणा ।।१।।*
*तोहि सिद्ध परी करी साधन । सर्वकाळ रामचिंतन ।।*
*ध्यान धारणा अनुष्टान । चुको नेदी ।।२।।*
*ऐसे अपार महामती झाले । तरी साधन करिती ।।*
*तेथे मानव ते किती । बापुडे किंकर ।।३।।"*

यावरून याचे वैशिष्ट्य ध्यानी येणार आहे. साधनमार्ग बराच काल लुप्त झाल्याने सिद्ध साधन-भक्तीने स्वयंसिद्ध स्वरूप होण्याचा मार्ग श्री निंबरगीकर महाराज यांनी प्रगट केला की, ज्यायोगे तो वंदनीय झाला आणि प्रो. रानडे यांच्यासारखे मोठमोठे तत्त्वज्ञानी त्या मार्गाचे अनुयायी झाले. परमात्मरूप हे उपाधिभूत झाल्याने अनेक जीव हे सुखदु:खाच्या फेऱ्यात सापडले. पण संप्रदाय उपासना पद्धतीने जे सर्वात्मरूप अंत:करण ऐक्यतेत आले ते मात्र श्री निंबरगीकर महाराज यांच्याप्रमाणे किंवा अगदी

अलीकडच्या काळात बोलावयाचे झाल्यास श्री तात्यासाहेबांचे प्रपंच उत्तम करूनही परमार्थरूप किंवा सुखरूप झाले, हेच त्यांच्या तत्त्वज्ञानाचे सार होय.

### सिद्ध संप्रदाय व नाथसंप्रदाय यांचा संबंध :

सिद्ध संप्रदाय व नाथसंप्रदाय ही भावंडे आदिनाथ शंकरापासून निर्माण झाली. नाथसंप्रदायात रिद्धी-सिद्धी चमत्काराचे अवडंबर, तर सिद्ध संप्रदायात सहजतेत सर्व ईषणांची निवृत्ती. नाथसंप्रदायात हटयोग व राजयोग यांचा सुंदर मिलाफ. तर सिद्धसंप्रदायात सहज साधना व निष्काम भक्ती यांचा पवित्र संगम. की ज्या साधनांचा आसरा सर्व पंथांना घेणे भाग आहे. या साधनेत अशा प्रकारची आत्मप्रचीती प्राप्त होते. म्हणूनच गुरुप्रचीतीवाचून जन्माचे साफल्य नाही. या सिद्धांताच्या प्रत्ययाकरिता पुढील उदाहरण उपयोगी पडण्यासारखे आहे.

एक ब्राह्मण प्रवासास निघाला असता एका झाडाखाली उतरला आणि तेथे त्याने आपला भात तयार केला. तो भात एका काटकीने ढवळीत असता जवळच असलेल्या एका गुराख्याचे त्या ब्राह्मणाकडे सहज लक्ष गेले. कर्मधर्म-संयोगाने त्या झाडावर दोन पिंगळे बसले होते आणि त्यातील एक पिंगळा आपल्या सोबत्यास उद्देशून– ''आता पहाहं या ब्राह्मणाने हा भात खाल्ला की, हा तत्काळ मरणार आहे.'' असे सांगत होता. गुराख्याला पिंगळ्याची भाषा समजत असल्यामुळे वरील शब्द ऐकताच तो गडबडून गेला आणि ब्राह्मणास म्हणू लागला, ''भटजीबुवा! तुम्ही हा भात खाऊ नका. त्यापासून तुम्हांस धोका आहे.'' स्वत:जवळचे तांदूळ, घासलेपुसलेले स्वच्छ भांडे आणि निर्मळ पाणी या सर्वांच्या शुद्धतेविषयी भटजीची पूर्ण खात्री असल्यामुळे त्याने गुराख्यास धुडकाहून लावले. तेव्हा गुराखी त्यास म्हणाला, ''भटजीबुवा! तुम्ही म्हणता ते सर्व खरे असेल, पण ज्या काटकीने तुम्ही भात ढवळीत आहात ती चांगली आहे याविषयी तुम्ही कशी खात्री करता?'' हे शब्द ऐकताच भटजी चमकला आणि त्याने काटकी मोडून पाहिली. तेव्हा त्यास असे दिसून आले की, ती काटकी पोकळ आहे, तिजमध्ये एक लहानसे सापाचे किरडू शिरले आहे. ते धगीने मेल्यामुळे त्याच्या तोंडातून गरळ बाहेर पडले आहे आणि ते काटकीच्या तोंडापर्यंत उतरले आहे! हे पाहाताच भटजींची तत्काळ खात्री झाली आणि त्याने तो भात टाकून दिला. या उदाहरणात पिंगळ्याची भाषा ही शास्त्रप्रचीती म्हणता येईल, गुराख्याने दिलेली सूचना ही गुरूप्रचीती म्हणता येईल आणि भटजीला आलेला प्रत्यक्ष अनुभव ही आत्मप्रचीती म्हणता येईल.

### रेवणनाथ व रेवणसिद्ध दोन होत :

रेवणनाथांनाच कोणी रेवणसिद्ध मानतात. पण तशी वस्तुस्थिती नाही. रेवणनाथ हे रेवातीरी पडलेल्या श्री शंकराच्या रेतापासून झाले.

रेवणसिद्धांच्या उत्पत्तीची हकीगत निराळी आहे. ती अशी :

रमक नावाच्या देवीने कोलहापूर क्षेत्री साधनविहीन नामधारी सिद्धांची जेव्हा परीक्षा पाहिली व त्यांना बंदीत टाकले. अशा नऊ कोटी सिद्धांनी आदिनाथ शंकराची प्रार्थना करताना श्री सोमेश्वराचे पिंडीतून रेवणसिद्ध प्रगट झाले. (श्रीसिद्धांतसार)

*''शंकरा पासुनि परंपरा शुद्ध । तो स्वयें शंकर सोमेश्वर प्रसिद्ध ॥ ते पिंडीमाजीं उदेले रेवणसिद्ध । स्वयंभु आदिगुरू आदिनाथ ॥१६५॥''* श्री सिद्धांतसार, अध्याय १८

यावरून रेवणसिद्ध व रेवणनाथ हे निराळे कसे हे दिसून येईल.

### रेवणसिद्ध व काडसिद्ध यांचा संबंध :

*''रेवणसिद्धा पासाव महामंत्र मूर्ती । निर्मिला स्वयें मंत्राकृती ॥ नेणवे तयाची स्वरूप । पहातां पडली भ्रांति ब्रह्मादिकां ॥१६६॥ निरीक्षितां वेळावलें ब्रह्मादिक हरी-हर । ऋषिमुनी देवादिक किन्नर ॥*

*म्हणती सिद्ध पुरुषाचा नेणवें पार । हा परम पवित्र मरुळसिद्ध ॥१६७॥*
*मरूळ झाले सकळ सुरवर । म्हणोनि मरूळसिद्ध नाम साचार ॥*
*येरवीं लीला त्याची अगोचर । नेणवें पार मंत्रमूर्तीचा ॥१६८॥''*
श्री सिद्धांतसार, अध्याय १८ वा

''मरुळ'' किंवा ''मरळ'' या कानडी शब्दाचा अर्थ ''माहीत'' असा आहे. मरुळसिद्ध करवीर क्षेत्री आल्यावेळी रमकदेवी मोहीत झाली व भुरळ पडून शरण आली. पण गुरूंना विचारून कृतार्थ करतो असे मरुळसिद्धांनी सांगितले व श्री रेवणसिद्धांना येणेबद्दल प्रार्थना केली. त्याप्रमाणे ते करवीर क्षेत्री आले व भिक्षा मागितली. तो पूर्वपद्धतीप्रमाणे भिक्षा घालणेस रमकदेवी विष घेऊन आली. तो सर्व विष नाहीसे झाले. देवी शरण आली. श्री रेवणसिद्धांनी तिचे मर्दन करून कवटीची किनरी केली व तिला पुन्हा पूर्ववत केले. अशाप्रमाणे मायेला जिंकले. कानडीत ''काड'' धातूचा अर्थ त्रास देणे, छळणे असा आहे. ''माइगे काडिदा'' म्हणजे मायेस छळले. म्हणून रेवणसिद्धांचा ''काडसिद्ध'' हा अवतार होय. म्हणजे रेवणसिद्ध - मरुळसिद्ध व काडसिद्ध अशी परंपरा होती.

## श्री निंबरगीकर महाराज यांचे सद्‌गुरू श्रीकाडसिद्ध हेच होत :

याच काडसिद्धांनी श्री निंबरगीकर महाराज यांना अनुग्रह दिला. श्री काडसिद्धांचे शिष्य मुप्पिनमुनि यांच्याकडून श्री निंबरगीकर महाराज यांना अनुग्रह झाला असे कोणी म्हणतात. परंतु श्री निंबरगीकर महाराज यांच्या सान्निध्यात अखेरपर्यंत असलेल्या महान अधिकारी शिष्या श्री लक्ष्मीबाई आक्का यांच्या मुखाने श्री निंबरगीकर महाराज यांचे सद्‌गुरू महाराज यांचे सद्‌गुरू श्री काडसिद्धच होत, असे कळलेले श्री तात्यासाहेबांनी ''कैवल्य पुरुष खंड पहिला'' या ग्रंथात ''महाराजांची गुरुपीठिका'' प्रकरण ४ थे पान २१ यात नमूद करून ठेविले असल्याने तेच कोणत्याही रीतीने ग्राह्य करता येणेसारखे आहे.

## सिद्धसंप्रदायाचे साधन :

सिद्धसंप्रदायाचे साधन ''शिवदिन'' चतुराक्षरी मंत्र ''हा जपतांचि भावें । आसन मुद्रावीण सहज तारिल स्वभावें ॥१॥ अशा प्रकारचे सहज व अकृत्रिम होते, की ज्याने आत्म्याचा साक्षात्कार होऊन परमानंदच व्हावयास पाहिजे. उपनिषदात म्हटले आहे.

*''मम् सुखं साधनाधीनं तद् दुःखमेव च ।*
*अकृत्रीमं अनाद्यंतं तद् सुखं सात्विकं विदुः ॥१॥''*

[जे सुख अन्य साधनांवर अवलंबून असते ते दुःखच समजावे. आणि जे सुख अकृत्रिम आहे, व ज्याला प्रारंभ व शेवट नाही, अशा सुखाला महात्मे सात्त्विक सुख समजतात.]

## श्री निंबरगीकर महाराज यांचे सद्‌गुरू मुप्पिनमुनी नसून श्री काडसिद्धच होत.

श्री निंबरगीकर महाराज यांचेवर श्री काडसिद्धांचा अनुग्रह झाल्यावर त्यांनी एक पद्य केले आहे. ते फार मार्मिक आहे.

## पद

*गुरुचरणकमलदल्लि भृंग वागो नी ॥*
*गुरुचरणकमलदल्लि भृंग वागो नी ॥ पल्ला ॥*
*मुप्पिनमुनिय हिडिदवचन कप्पुगोरळ काडसिद्ध ॥*
*निद्देगेड होगी साष्टांग वागो नी ॥३॥*
कैवल्य-वैभव, पद १० वे प्रकरण ३ रे

या पदावरून मुप्पिन मुनींनी महाराजांना श्री काडसिद्धांचेकडे नेऊन त्यांचेकडून अनुग्रह दिला असे दिसते. कारण शेवटच्या कडव्याचा अर्थ असा आहे :
''मुप्पिन मुनींनी सांगितल्याप्रमाणे काडसिद्धाला जाऊन त्यांचेपुढे नमस्कार घाल.'' या पदाच्या ध्रुपदात म्हणतात–

''सद्‌गुरूच्या चरणकमलीं भृंग होऊन राहा.'' हा बोध महाराजांनी आपल्या मनाशीच केला आहे. यावरून श्री निंबरगीकर महाराजांचे सद्‌गुरू श्री काडसिद्ध हे निर्विवाद होय.

**संप्रदाय व उपासना पद्धती :**

श्री निंबरगीकर महाराज हे नित्य ''सिद्धांतसार'' नामक ग्रंथ वाचत असून, रोज सायंकाळी ''दासबोध'' सांगत असत. ''समर्थकृपेची वचने तो हा दासबोध'' असे त्या बोधाचे स्वरूप सांगता येईल. श्री निंबरगीकर महाराज यांचे परमशिष्य श्री रामचंद्रावजी महाराज यांनी गुर्वाज्ञेप्रमाणे चिमड येथे मठ स्थापून आपले गुरुस्थानी असलेले श्री रघुनाथप्रिय साधुमहाराज यांची समाधी श्री निंबरगीकर महाराजांचे आज्ञेने बांधून त्यांना देव करून बसविले. श्री निंबरगीकर महाराज यांचे अंत:करण किती श्रेष्ठ होते, हे यावरून दिसून येईल. श्री निंबरगीकर महाराजांनी श्री रामचंद्रावजी महाराज यांचेकडे वंशपरंपरा पूर्ण कृपेने परमार्थ दिला असल्याने श्री रामचंद्रावजी महाराजांनी आपल्या उपासनेस पंचपदी, शेजारती व काकडारतीची जोड दिली. श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर यांनीही पुढे संप्रदाय वाढवून आपल्या उपासनेस योग्य असे श्री पांडुरंगाचे आज्ञेने त्रिकालभजन निर्माण केले. साधनाला भजनाची जोड मिळाली. या साधनाचे ठिकाणी दृढता निर्माण होण्यास्तव श्री रामचंद्रावजी महाराज यांचे आज्ञेने श्री तात्यासाहेबांनी सांगलीस नित्य कीर्तनाची जोड दिली; की ज्यात श्रोतावक्ता पांडुरंग होऊन जावा.

**सांप्रदायात बहिरंगाचे स्तोम माजविण्यास मार्ग नाही :**

अशा प्रकारे उपासन-साधनात्मक हा सोज्वळ संप्रदाय असल्याने याला बुवाबाजीचे स्वरूप केव्हाही येऊ शकले नाही. यात बहिरंगाला वावच नाही. परद्रव्य नरकासमान व परनारी मातेसमान अशी याची शिकवण असल्याने हा संप्रदाय अगदी प्रापंचिकांनाही आदर्श होऊन राहिला आहे. जे कोणी हा संप्रदाय जाणून घेतील ते सर्व संत होतील, असे श्री रामचंद्रराव महाराज सांगतात :

*''जाणूनि जे जन धरतील पंथ ।*
*ते ते झाले तव पदीं संत ॥६॥''*

कैवल्यमार्ग, (पद) पान १२

शिवाय सिद्ध-साधकांचे मूळ ठिकाण कोणते ते दाखवून संप्रदाय-साधन व त्याचा परिणाम काय आहे, ते एका कडव्यात सांगितले आहे. ते म्हणतात :

*''धन्य ते स्थळ महा सिद्धाचें । झळकतें शिखर वायुसुताचें ॥*
*होसि पावन नरा जा वेगीं । प्रकट बोलति जया निंबरगी ॥३॥*
*धन्य ते नर तया स्थळिं जाती । ते स्वयें स्वस्वरूपी मिळती ॥*
*लावुनियां ऐक्य निशाणीं । भोगिति परम पद निर्वाणीं ॥४॥''*

कैवल्यमार्ग, पान १०

**श्री निंबरगीकर महाराजांच्या प्रासंगिक पद्यातील शिकवण :**

**साधनाने चित्ताची शुद्धी होते.**

(१) श्री निंबरगीकर महाराज, निंबरगी येथील विहिरीवर नित्याप्रमाणे स्नानास गेले. स्नान करून वर येत असता एक मोठा नाग वरून खाली विहिरीत येत होता. नाग त्यांचेकडे फुत्कार टाकीत येताना त्यांना दिसला. दुसरी वाट नव्हती, तेव्हा डोळे मिटून त्यावेळी तेथल्या तेथे–

*''ॐ नाम कायुवदु नामद बलवू । ॐ नाम कायुवदु ॥ पल्ला ॥*

कैवल्यवैभव, पद २ रे प्रकरण ३ रे

हे पद स्वयंस्फूर्त वाणीने म्हणताच तो नाग निघून गेला. यावरून या साधनाचे माहात्म्य ध्यानात येईल.

(२) मानापमानाचे गोवे दूर होतात, हे त्यांचे–

*''नुसिया नुडिदान्याके । श्री बलभीमा ॥ नूसिया नुडिदान्याके ॥ पल्ला. ॥''*

कैवल्यवैभव पद १४ वे, प्रकरण ३ रे

या प्रासंगिक पद्यावरून उत्तमत्वाने दिसून येते.

(३) त्यांची कूटपदेही फार बहारीची आहेत.

(४) एका पद्यात खिरीचे रूपक करून महाराजांनी त्यात परमार्थाची लयलूट करून टाकली आहे.

*"बेल्ल कुट्टुण बारम्मा । ईव्वरू कुडि । नेल्ल कुट्टुण बारम्मा ।। पल्ला. ।।"*

कैवल्यवैभव, पद १२ वे प्रकरण ३ रे

(५) एक-दोन पदांत (कैवल्यवैभव पदे ९ व १५ प्रकरण ३ रे) त्यांनी सवाल टाकलेले तर कोणासही थक्क करून सोडणारे आहेत.

(६) "भुर्ता तोरिद गुरुबीन मोरतू नाईरळे ह्यांगे गुरूबीगयेनु अधिकउंटे परकेपर वाद वस्तु ।। पल्ला. ।।" कैवल्यवैभव, पद २० प्रकरण ३ रे

या पदात पूर्ण आध्यात्मिक अनुभव दिला आहे.

*(७) "ध्यान करो गुरू साहेबजीका सबकुच करता मालक है ।।*
*भजन करो गुरू साहेबजीका सबकुच करता मालक है ।।ध्रु.।।*
*चार वेद सब मुखसे वाचे गुरूविना कोई तरता है ।।*
*कच्ची ककडी दरदधुनीमें खूब स्वाद क्या पकता है ।।*
*कहत गुरूलिंगजंगम साधु अलखनिरंजन न्यारा है ।।३।।"*

कैवल्यवैभव, पद ३ रे प्रकरण ३ रे

श्रुतिस्मृतींनी सांगितलेल्या आत्मज्ञानाची प्राप्ती गुरूशिवाय होणार नाही. कारण, त्या तत्त्वाशी आपणास समरस होऊन नामधारक बनावयाचे आहे आणि आत्मानुभव घेणेचा आहे. तो भाग श्रुतिस्मृतींनी वर्णिलेला गुरुसंप्रदायाशिवाय आकलन होणार नाही.

**नाम, नामी व नामधारक यांचा संबंध :**

नाम, नामी व नामधारक यांचा संबंध लक्षात येणे जरुरीचे आहे. नाम म्हणजे स्फोट, नाद, नादाची मूळतत्त्वे ज्यात आहेत ते नाम, तेच सजीव नाम. नामाला मोड आला पाहिजे, तरच सजीव नाम. अशा नामामध्ये व नामीमध्ये भेद नाही. त्यांची उपासना करतो तो नामधारक होय.

कसल्याही कुशाग्र बुद्धीच्या मनुष्याच्या तर्काला ही गुरुकिल्ली समजण्याजोगी नाही. त्यासंबंधी श्री तात्यासाहेबांनी "कैवल्यपुरुष खंड पहिला" या ग्रंथात मार्मिकपणे विवेचन केले असून, आत्मज्ञानाचे माहात्म्य व गुरूची आवश्यकता ही त्यात साधार दाखविली आहेत. जिज्ञासूंनी ती अवश्य पाहावीत. त्यावरून संप्रदायाचे महत्त्व ध्यानी येणार आहे.

**श्री निंबरगीकर महाराज यांचा संप्रदाय व त्याची शाखा :**

या दृष्टीने विश्व-धर्मास अनुसरणारी उपासना पद्धती श्री निंबरगीकर महाराज यांनी आचरणात आणून संस्थापिली. यालाच साधन-संप्रदाय किंवा चिन्मय-संप्रदाय म्हणतात. याचे मूळ निंबरगी हे असून, त्याचा आस्वाद चिमड व इंचगेरी संप्रदायात अखंड आजतागायत मिळतो आहे, की ज्या योगे हजारो लोक या साधनेने तृप्त होऊन जात आहेत.

श्री निंबरगीकर महाराज हे गुरुलिंगजंगम झाले.

अविश्रांत साधनाने श्री निंबरगीकर महाराज हे गुरुलिंगजंगम स्वत:च झाले. हे त्यांच्या–

*"ईसुदिना ईनालकु वेदा । ब्यारे ब्यारे भाविसुतिद्दे ।।"*

कैवल्यवैभव, पद ११ वे प्रकरण ३ रे

या पदावरून दिसून येईल. याच पदात सर्व धर्मपंथांचे मूलभूत तत्त्व एकच आहे, हे दाखविलेले आहे. "One God, one Law, one Element" श्री निंबरगीकर महाराज यांचे निर्याण.

*"न्यासरादिनो जन्म ब्यासरादितो" ।।*

कैवल्यवैभव, पद २१ वे प्रकरण ३ रे

हे पद देह ठेवण्यापूर्वी महाराजांनी केले आहे. या पदात आपणांस जन्माचा कंटाळा आला असे महाराजांनी

सुचविले आहे. हे पद केल्यावर ते फार दिवस भूतलावर राहिले नाहीत. पार्थिवनाम संवत्सरे, शालिवाहन शके १८०७, चैत्र शुद्ध द्वादशी १२ शकवारी (ता. २७ मार्च १८८५ इ. रोजी) रात्रौ अकरा वाजता श्री निंबरगीकर महाराजांनी पश्चात आपली चिरकाल कीर्ती ठेवून श्री तुकाराम महाराजांचे निर्याणाचे अभंग म्हणून त्यातील शेवटचा अभंग :

*''भजन पूजन साधुनि बळें । जिंकीयेलें कळिकाळ ।।१।।*
*अहो गर्जताती तिन्ही । टाळ ऐकताती कानीं ।।२।।*
*जड देह कैसा घेऊनी । गेला तुकाराम वाणी ।।३।।''*

कैवल्य-मार्ग, अभंग ४५, प्रकरण ५ वे

हा झाल्यावर त्यांनी नामस्मरण करीत श्री क्षेत्र निंबरगीस शेवटचे नेत्र झाकले.

## श्री निंबरगीकर महाराजांच्या निर्याणाचा निश्चित काल :

महाराजांच्या निर्याणाच्या तिथीसंबंधी थोडा मतभेद आहे. कोणी शुक्रवार चैत्र शुद्ध द्वादशी १२ शके १८०७ ही निर्याण तिथी मानतात. तर कोणी शुक्रवार चैत्र शुद्ध १२ द्वादशी उपरांतिक १२ त्रयोदशी शके १८०७ मानतात; परंतु त्या सालच्या पंचांगात पाहाता १२ द्वादशी ४६-घटका १९ पळे आहे. (पंचागात ते दिवशी सूर्योदय सकाळी ६ वाजता आहे.) यावरून ते दिवशी १२ द्वादशी रात्री १२ वाजून ३५ मिनिटे अखेर ठरते. तेव्हा त्यांच्या निर्याणाच्या वेळी म्हणजे रात्री ११ वाजता द्वादशीच होती, त्यावरून त्यांच्या निर्याणाचा दिवस व वेळ चैत्र शुद्ध १२ द्वादशी शके १८०७ हाच ठरतो.

## अभंग

*''शालिवान शके अठराशें सातात । पार्थिव संवत्सरांत उत्तरायण ।।१।।*
*चैत्र शुद्ध द्वादशी आणि भृगुवार । रात्रौ द्वितीय प्रहर पाचवे तासीं ।।२।।*
*तयेवेळी स्वयें अभंग म्हणोनी । स्वरुपीं मिळोनी ऐक्य झालें ।।३।।*
*नारायणरूपी नारायण झाले । कीर्तीरूपें उरले दासापाशीं ।।४।।''*

कैवल्य-मार्ग, अभंग ३५, प्रकरण ५ वे

## श्री निंबरगीकर महाराज हे श्री तुकाराम महाराज यांचा अवतार होय :

महाराजांनी श्री तुकाराम महाराज यांचे निर्याणाचे जे अभंग शेवटी म्हटले होते, त्यातील शेवटचा चरण ''जडदेह कैसा घेउनी । गेला तुकाराम वाणी ।।'' असा आहे, व हा चरण म्हणून होताच नामस्मरणात त्यांनी आपला देह आत्मसुखापाशी मिळवून टाकला असल्याने संप्रदायातील सर्व अनुयायी त्यांना श्री तुकाराम महाराज यांचेच अवतार मानतात, हे यथायोग्यच होय.

मिश्र या नावाच्या अधिकारी ख्रिश्चन भक्ताशी भगवान रामकृष्ण परमहंस बोलत असताना त्या संवादात मिश्र म्हणतात :

''या देशात चार द्वारवान आहेत. मुंबई प्रांतात तुकाराम, काश्मिरात, Robert Inichael येथे रामकृष्ण व पूर्वेस एक दुसरा आहे.'' पान २५७ वर प्रो. आठवले यांनी दिलेल्या ''हृत्पद्म'' नावाच्या ग्रंथातील या उताऱ्यावरून पाहाता आमच्या विधानास अधिकच पुष्टी येत आहे. कारण, त्या वेळी मुंबई प्रांतात श्री निंबरगीकर महाराज हेच प्रसिद्ध सत्पुरुष होऊन गेले.

## समारोप :

इतक्या विवेचनावरून श्री निंबरगीकर महाराज यांच्या जीवनात प्रतिबिंबित झालेले तत्त्वज्ञान काय स्वरूपाचे होते हे ध्यानी येईल. हे संकलित करण्याकरिता या परंपरेतील अनुभवी व विद्वत्‌रत्न गु. मा. रामभाऊ रानडे म्हणतात :

''निंबरगीकर महाराजांचा संप्रदाय हा कर्नाटकातील

सर्व धर्मपंथांच्या ऐक्याचा पाया आहे. ते स्वत: एक थोर लिंगायत गृहस्थ होते व ते पारमार्थिक जीवनाला ललामभूत असे संत होते. ही गोष्ट मी माझ्या आध्यात्मिक अनुभवांनीच केवळ नव्हे तर महाराष्ट्र, उत्तर हिंदुस्थान व कर्नाटक ह्या प्रांतातील संतांचे ग्रंथ व शिकवण आणि जगातील इतर सर्व धर्मांच्या मतप्रणालिका यांची तुलना करून आपल्याला सांगत आहे.''

निंबरगी हे गाव विजापूर जिल्ह्यातील एका कोपऱ्याला असले, व श्री निंबरगीकर महाराजांची कीर्ती फार दूरवर पसरली नसेल, तरी ते बकुल वृक्षाप्रमाणे आहेत. एखाद्या कोपऱ्यात असलेल्या बकुलवृक्षाच्या पुष्पांचा आल्हादकारी सुगंध ज्याप्रमाणे दूरवर पसरतो, त्याप्रमाणे श्री निंबरगीकर महाराजांच्या मंगलमय अध्यात्मज्ञानाचा सुगंध योग्य काली सर्व जगभर पसरल्यावाचून राहाणार नाही. येथे जगन्नाथ पंडितांच्या पुढील श्लोकातील दृष्टांत लागू पडतो.

*''निसर्गादारामे तरुकुलसमारोपसुकृती ।।*
*कृती मालाकारो बकुलमपि कत्रापि निद्धे ।।*
*इदं को जानीते यद्यामिह कोणांतरगतो ।।*
*जगज्जालं कर्ता कुसुमभरसौरभ्यभरितम् ।।''*

[''विविध प्रकारचे वृक्षांचे समूह लावणाऱ्या निसर्गत:च चतुर अशा कोण्या एका कर्तबगार माळ्याने आपल्या बागेत बकुल वृक्षास सुद्धा कोठेतरी स्थान दिले. तथापि या बागेत एका कोपऱ्यात लावलेला हा बकुल-वृक्ष आपल्या फुलांच्या समृद्धीने सर्व जगतरूपी जाळे (म्हणजे संसार) सुगंधित करणारा होईल, अशी प्रथमत: कोणाला कल्पना आली असेल बरे?'']

गु. प्रा. रामभाऊ रानडे, स्वत:च्या जीवनाला श्री निंबरगीकर महाराजांनी कसे वळण लाविले, याविषयी ते म्हणतात :

''कोणत्याही गोष्टीचे गुण-माहात्म्य तिच्यातील सत्यता व तिचे परिणाम यांवरून ठरविले जाते. अर्थात निंबरगीकर महाराजांचे आपण सर्व शिष्य चांगल्या रीतीने वागलो, आपले जीवन कर्तव्यपूर्ण व भक्तिमय असले, तर आपले आचार व उच्चार, व सर्वसाधारणपणे आपली नैतिक योग्यता यावरूनच आपल्या सद्‌गुरूंचे थोरपण ठरविण्यात येईल. याच गोष्टींना जग त्यांच्या थोरवीची गमके मानतील. या दृष्टीने मी निंबरगीकर महाराजांच्या आध्यात्मिक संदेशाकडे पाहात आहे.'' असो.

यापेक्षा अधिक विवेचन करावयास पाहिजे असे मला वाटत नाही. शेवटी, महाराष्ट्र व कर्नाटक या सीमेवर राहाणाऱ्या या थोर विभूतीचे म्हणजे श्री निंबरगीकर महाराज यांचे चरित्र श्री तात्यासाहेबांनी एका पद्यात गोविले आहे. त्यात त्यांचा अवतार, गुरुपरंपरा, संप्रदायाचे रूप उत्कटत्वाने बिंबविले आहे. ते येथे म्हणून मी माझे विवेचन संपवितो.

*''धन्य निंबरगी क्षेत्र भूतळीं । जेथें अवतरले ।।*
*संतराय श्री तुकाराम ते । तारक जगीं जाहले ।।धृ.।।*
*मूळ प्रल्हाद तेंचि अंगद । उद्धव पुढे जगतीं ।।*
*नामदेव मग तुकारामचि । पूर्ण ब्रह्म ज्योती ।।१।।*
*अवतारी या नाम नारायण । राव हें धरियेलें ।।*
*गुरुलिंगजंगम साधू ऐसे । प्रगट जन बोले ।।२।।*
*सिद्ध गिरीश श्री काडसिद्ध । महामुनिवर पद धरुनी ।।*
*त्यांचे अनुग्रहे सिद्ध साधन । दावियले करुनी ।।३।।*
*सत्पथ-लोप झाला ऐसा । अनुभव दाखविला ।।*
*नामरूपाचा लाभ कैसा । मार्ग प्रगट केला ।।४।।*
*पतितपावन गुरुपदकमलीं । ठाव निरंतर ।।*
*दीन होऊनी मागतसे हा । दास अष्ट प्रहर ।।५।।''*

# श्रीसमर्थ वाग्देवता मंदिराची अधिष्ठात्री देवता

## रामेण – रामदासेन लिखितम् श्री वाल्मिकी रामायणम्

### *कै. शंकर श्रीकृष्ण देव*

महाराष्ट्राचे हे केवढे भाग्य की, श्रीसमर्थांनी लिहिलेली ९१० पत्रसंख्येची वाल्मिकीय रामायणाची संपूर्ण प्रत उपलब्ध व्हावी! समर्थांच्या हातचे वाल्मिकी रामायण असा ग्रंथ या प्रतीवरून छापून निघावा, असे मनात फार येते. हल्ली छापलेल्या ज्या प्रती आहेत त्यांशी ताडून पाहाता फार फरक आढळतो. या प्रतीवरून रामायण जरूर छापले जावे व श्रीसमर्थाभिमानी महाराष्ट्र मनात आणील तर त्वरित छापलेही जाईल, ती प्रत प्रत्येक महाराष्ट्रीय शिरोधार्य मानील! १८५६ ज्येष्ठ वद्य ५ शनिवार (१-६-३४)

**ही पोथी मिळाली कशी?**

गेल्या श्रावणात हैदराबादेहून परत येत असता मार्गात काही तास इंदुरबोधन येथे मठात उतरलो होतो, तेव्हा श्रीसमर्थदास यांची, बीड मठातील काही कागदपत्रे त्यांनी दरम्यान मिळविली होती ती आमच्या हवाली केली. त्यात दोन कागद महत्त्वाचे होते : एक १६५३ भाद्रपद शुद्ध १३ चा होता व दुसरा १६६६ कार्तिक शुद्ध ११ चा होता. दोन्ही कागद भीमाजी गोसावी यांनी येसोबा गोसावी याज करून दिले होते. भीमाजी आणि येसोबा हे उभयता श्रीसमर्थ प्रतापकार गिरिधर यांचे बंधू होत. १६५३च्या कागदाने या उभयतांत वाटणी झाली होती, तरी काही वस्तू सामाईक राहिल्या होत्या. त्यांची विभागणी १६६६ तील कागदाने करण्यात आली होती. दुसरा कागद प्रस्तुत प्रसंगी विशेष महत्त्वाचा होय. देवार्चन, वाल्मिकी रामायण, अध्यात्म रामायण व पन्नास रुपये अशा वस्तू सामाईक होत्या. पंचांनी पन्नास रुपये निमे निम वाटून दिले. देवार्चन येसोबाकडे होते व ते वडील म्हणून ते पंचांनी त्यांच्याचकडे राहावे असे ठरविले, परंतु भीमाजी गोसावी यांच्या विनंतीवरून येसोबा गोसावी यांनी ते स्वसंतोषाने भीमाजी गोसावी यांस दिले. अध्यात्मरामायण ग्रंथसंख्या सहा हजार– येसोबांजवळ होते व वाल्मिकी रामायण ग्रंथसंख्या चोवीस हजार– भीमाजीबावांजवळ होते. दोन्ही मिळून तीस हजार ग्रंथसंख्या झाली. प्रत्येकाच्या वाट्याला पंधरा हजार ग्रंथसंख्या आली. सहा हजारांचा अध्यात्मरामायण ग्रंथ येसोबांजवळ होताच व वाल्मिकी रामायणांपैकी नऊ हजारांचा ग्रंथ भीमाजींनी येसोबांस द्यावा असे ठरले. तो नऊ हजारांचा ग्रंथ म्हणजेच बाळकांड, अयोध्याकांड व सुंदरकांड ही तीन कांडे होत. म्हणूनच ही तीन कांडे येसोबांच्या परंपरेतील श्रीराम बुवा यांच्या मठात आली व ग्रंथ अपुरा राहू नये म्हणून शंभर-दीडशे वर्षांनी तत्कालीन पुरुषांनी इतर चार कांडे लिहवून ग्रंथ पुरा केला होता. अर्थात बाकीची चार कांडे भीमाजीबावांच्या परंपरेतील

सीताराम बाबा यांच्या मठात असली पाहिजेत, अशी कल्पना झाली. सीताराम बुवा गत झाले आहेत, त्यांचा मुलगा गंगाराम अज्ञान असून मठ पंचांच्या ताब्यात आहे. गंगाराम श्रीसमर्थदासांच्याच जवळ असतो. परवा जांबेहून परतताना त्यास बोलविले होते. त्यास घेऊन बीडास गेलो. त्यांच्या मठात अस्ताव्यस्त पडलेला संग्रह पेट्यांत भरून ज्येष्ठ शु. ७ (ता. २१-५-३४) स. धुळ्यास रवाना करून आम्ही परंडा, डोमगाव भागात जाऊन आलो. दरम्यान येथे येऊन ठेपलेला संग्रह स्वस्थपणे व्यवस्थित लावीत असता नेमकी ती चार कांडे आढळली व आम्हास अत्यानंद झाला. त्या आनंदाचा उपभोग सर्वांस घेता यावा म्हणून पूर्वी मिळालेल्या सबंध रामायणाची व आता मिळालेल्या चार कांडांची आज येथे आधी नोंद करून मग बीड येथील इतर जुन्या नव्या संग्रहाकडे वळू.

### ही पोथी केव्हा लिहिली?

ही दोन्ही बाडे प्रेक्षणीय, आदरणीय, चिंतनीय आहेत. ६५३ तील आदी, अयोध्या आणि सुंदर अशी तीन कांडे आणि या अंकांतील चार कांडे मिळून संपूर्ण रामायण होत आहे. प्रत्येक कांडाच्या शेवटी जो लेखनकाल दिला आहे, त्यावरून असे दिसते, प्रथम साहजिक आदिकांड लिहिले गेले. आणि नंतर पंधरा दिवसांच्या आत आरण्यकांड लिहिले गेले. ही दोन्ही कांडे १५४४ च्या माघात लिहिली गेली. नंतर १५४५च्या आश्विनात किष्किंधाकांड व मार्गशीर्षात सुंदरकांड अशी कांडे पुरी झाली आणि १५४६ची वैशाख शुद्ध ३ या शुभ दिवशी युद्धकांड पुरे झाले. ही पांच कांडे १५४४च्या माघापासून तो १५४६ च्या वैशाखापर्यंत म्हणजे सरासरी सव्वा वर्षात लिहिलेली आहेत. ती श्रीसमर्थांनीच लिहिलेली असतील तर त्या वेळी त्यांचे वय पंधरा-सोळा वर्षांचे होते व टाकळीस पुरश्चरण चालू होते. नंतर एकवीस वर्षांनी प्रथम उत्तरकांड १५६७ च्या कार्तिकात लिहिले गेले. आणि त्यानंतर ४ वर्षांनी शेवटी अयोध्याकांड लिहिले जाऊन रामायणाची प्रत पूर्ण झाली. या दोन सालांत श्रीसमर्थ मसूर, शहापूर, चंद्रगिरी, चाफळ या भागात होते. पहिल्या पाच कांडांच्या आणि या दोन कांडांच्या लेखनातही कालपरत्वे पडलेला फरक दिसून येत आहे.

### रामेण रामदासेन म्हणजे कोण?

पण मुख्य प्रश्न असा, ही कांडे कोणी लिहिली? रामेण रामदासेन, रामेन राघवनाम्ना, रामेण रामदासेन सह गोपिनाथेन म्हणजे कोणी? मला शंका उरली नाही, पण चिकित्सकांचा शिक्कामोर्तब झाला पाहिजे. रामेण रामदासेन म्हणजे रामीरामदासांनी म्हणजे श्रेष्ठांनी अशी काही काळ शंका उद्‌भवली होती व तिला श्रीसांप्रदायिक विविध विषयांक ४७ याने किंचित बळकटीही आणली होती. त्या विविध विषयांत तडवळे मठपती जगन्नाथ महाराज यांनी अशी माहिती नमूद केलेली आहे की, श्रेष्ठांचे पाळण्यातले नाव राम होते. पण ही माहिती उघड चुकीची दिसते. श्रेष्ठांच्या दोघा मुलांपैकी एकाचे नाव रामजी होते व श्रेष्ठांचे नाव राम असते तर त्यांच्याच मुलाचे नाव राम कसे ठेवण्यात आले असते? श्रेष्ठांपेक्षा श्रीसमर्थांनाच लहानपणी राम म्हणून संबोधण्याचा फार संभव होता. त्यांचा जन्मच मुळी श्रीरामजन्माच्या तिथीला आणि घटकेला झाला होता. दासविश्रामधामाच्या पंधराव्या अवधानात श्रीसमर्थांची जी छत्तीस नावे दिली आहेत त्यात राघोबा हे एक नाव आहे. जयरामस्वामी श्रीसमर्थांना राघोबा म्हणून हाक मारीत, तेही उगीच नव्हे. रामीरामदास हे श्रीसमर्थांचेही नाव होते व ते त्यांच्या कवितेतही कित्येक ठिकाणी योजिलेले आहे. श्रीसमर्थांपाशी काही काळ असलेले वेणाबाईंच्या परंपरेतील गिरिधर यांच्या मठात हे रामायण मिळावे, ही गोष्टही कमी महत्त्वाची नाही. वेणाबाईंच्या परंपरेत रामायणे व्हावी, अशी श्रीसमर्थांची आज्ञा होती व त्या आज्ञेप्रमाणे गिरिधरांनी

सात प्रकारची रामायणे रचिली. ही (श्रीसमर्थप्रताप १९-६०/६२ पाहा) अशी आज्ञा करतानाच स्वत: लहानपणी लिहिलेली प्रस्तुतची श्रीवाल्मीकी रामायणाची प्रत श्रीसमर्थांनी गिरिधरांच्या हवाली केली असण्याचा फार संभव आहे. येसोबा व भीमाजी १६५३ मध्ये इतर सर्व पोथ्यापुस्तके वाटून घेतात, पण अध्यात्म रामायण आणि वाल्मीकीरामायण असे दोन ग्रंथ सामाईक ठेवतात व अखेरीस १६६६ मध्ये वाल्मीकी रामायणाची कांडे वाटून घेतात. हा प्रकारही हेच सुचवितो की, त्यांनाही ही प्रत महत्त्वाची वाटत होती. श्रीसमर्थांचे हस्ताक्षर एकाच कडे का दोघांही कडे असावे, हीच भावना कांडे वाटून घेताना त्यांची असावी. तात्पर्य, रामेण राघवनाम्ना, रामेण रामदासेन म्हणजे श्रीसमर्थांनीच होय!

**।। श्रीराम समर्थ ।।**

**श्री रामेण रामदासेन लिखितम् वाल्मिकी रामायणाचे स्थूल स्वरूप बीड मठ वाल्मिकीय रामायणाची पोथी बाड क्र. ६५३ पत्र संख्या ९२६**

**(श्री) आदिकांड (पत्रे ७०)**

(१) मुख्यपृष्ठावर प्रत्येक कांडाचे सर्ग आणि श्लोक यांची एकूणात दिलेली आहे, ती अशी

| | | |
|---|---|---|
| ६४ | प्रथमकांडे | २८५० |
| ८० | द्वितीयकांडे | ४१७० |
| ११४ | तृतीय कांडे | ४१५० |
| ६४ | चतुर्थकांडे | २९२५ |
| ४३ | पंचमकांडे | २०४५ |
| ११२ | षष्ठकांडे | ४५०० |
| ९० | सप्तमे कांडे | ३९६० |
| ५६७ | | २४६०० |

(२) ग्रंथारंभी दोन श्लोक दिले आहेत ते :

*जयति रघुवंशतिलक: कौशल्याहृदयनंदनो राम: ।*
*दशवदननिधनकारी दाशरथि: पुंडरीकाक्ष: ।।१।।*
*नम: तस्मै मुनीशाय श्रीयुताय तपस्विने ।*
*सर्वज्ञानाधिवासाय वाल्मीकिमुनये नम: ।।१।।*

(३) शेवटी कांडाचा लेखनकाल वगैरे दिला आहे तो :

।। शक संवत् १५४४ ।। दुंदुभिनाम संवत्सरे माघ शुद्ध १३ रवौ अस्मिन् शुभदिने रामेण रामदासेन लिखितमिदं पुस्तकं ।। ।। श्रीरघुनाथार्पणमस्तु ।। ।। रमाकांतप्रीयो भवतु ।। ।। श्रीराम राघव रमैश्वर रामचंद्र राजीवनेत्र रघुवर्य रमेश ईश ।। श्रीरामभद्र भुवनेश्वर तीर्थपाद कंठे करोमि सततं तव नाममालां ।।१।।

याच शेवटच्या पानाचे चित्र येथे दिले आहे. मूळ पोथीच्या पत्राचा आकार १०.६'' × ६'' आहे. समास सोडून नुसत्या लेखनाचा गाभा ८.९'' × ४'' आहे. चित्रांतील लेखनाचा गाभा ७'' × ३.९'' आहे. यावरून मूळ प्रतीच्या आकाराची वाचकास कल्पना होईल.

**(स) अयोध्याकांड (पत्रे १४१)**

(१) या कांडाच्या शेवटी दिलेला लेखनकाल वगैरे:

श्रीमत् शक १५७१ विरोधीनाम संवत्सरे ह्युत्तरायणे फाल्गुनमासे कृष्णपक्षे सप्तम्यायां पुण्यतिथौ अस्मिन् शुभदिने राघवनाम्ना कश्चित्सपुरुषचरणानुचरस्तेनालेखि ।।

**(म) अरण्यकांड (पत्रे १४४)**

लेखनकाल – १६९१ विरोधीनामसंवत्सरे मार्गशीर्ष कृष्ण ८ अष्टमी सौम्यवासर

**(र्था) किष्किधाकांड (पत्रे १२२)**

लेखनकाल – १६९२ विकृतीनामसंवत्सरे भाद्रपद शुद्ध सप्तमी इंदुवासरे.

**(य) सुंदरकांड (पत्रे ७३)**

(१) आरंभी श्लोक दिला आहे तो :

*कूजंतं रामरामेति मधुरं मधुराक्षरं ।*
*आरुह्य कविताशाखां वंदे वाल्मीकिकोकिलं ।।*

(२) शेवटचे पृष्ठ जीर्ण झाल्यामुळे कोणी अलीकडेच त्यावर निराळा कागद डकवून मूळचा मजकूर त्या कागदावर उतरला आहे. पण कागद उजेडात धरला म्हणजे मूळ मजकूरही कष्टाने लागतो. लेखनकाल वगैरे :

श्रीमद्राम कृपानिधे रघुवर श्रीरामसीतापते श्रीरामेश दयालयाद्यविजयानंदैक देव प्रभो । श्रीरामाव्यय सुंदरैककरुणासिंधो रमानायक श्रीदेवेश सुखार्णवाप्रतिम हे मां त्राहि मामुद्धर ।। श्रीमत् शके १५४५ रुधिरौद्गारीसंवत्सरे मार्गशीर्षमासे शुक्लपक्षे प्रतिपदायां गुरुवासरेऽस्मिन् शुभदिने रामेण रामदासेन लिखितमिदं रामायणं सुंदकांडं समाप्तं ।। श्रीमद्रमारमण जानकीजीवन पतीतपावन सुरवरवंदन मानसमोहन रावणमर्द्दन वालिनिकंदन सज्जनरंजन पापनिवाररण कारण रघुवर देव नमामि नमामि नमामि ।।

**(न) युद्धकांड (पत्रे २४४)**

लेखनकाल - १६९३ खरनामसंवत्सरे पौषवद्य १३ त्रयोदश्यां भानुवासरे

**(म:) उत्तरकांड (पत्रे १३२)**

लेखनकाल - १६९४ नंदनसंवत्सरे फाल्गुन कृष्ण त्रयोदश्यां रविवासरे

वाचकांच्या लक्षात येईल की, यातील आदिकांड, अयोध्याकांड व सुंदरकांड या तीन कांडांची ग्रंथसंख्या सुमारे ९००० असून, ती तीन कांडे श्रीराम मठांतील पूर्वजांच्या वाटणीला गेली होती. आता उरलेली जी चार कांडे परवा मिळाली ती तपशीलवार पाहू.

बाड क्र. ६५४ पत्र संख्या ४२६

**वाल्मिकीय रामायणांपैकी चार कांडे**

**(रा) आदिकांड (पत्रे ८०)**

(१) आरंभी कूजंतं रामरामेति हा श्लोक आहे.

(२) शेवट केला आहे तो:

श्रीरमारमण दूषणमर्द्दन जानकीजीवन दशरथनंदन अहिल्योद्धरण पतीतपावन राजीवलोचन मनमोहन रघुनंदन सहलक्ष्मण प्रीतो भवतु ।। ।। श्रीशक १५४४ दुंदुभिर्नामसंवत्सरे माघ वदि १२ रवौ अस्मिन् शुभदिने रामेण रामदासेन सह गोपिनाथेन लिखितमिदं पुस्तकं ।। ।। श्रीरामार्पणमस्तु ।। ।। श्रीरामभद्र भुवनेश्वर दूषणारे राजीवलोचन रमेश जगन्निवास । कोदंडधारि करुणैकरस श्रियेश कंठे वहामि सततं तव नाममालां ।।

**(म) किष्किंधाकांड (पत्रे ७२)**

(१) आरंभी मुखपृष्ठावर सुंदर चित्र काढले आहे. त्यात पक्षी उडत आहेत, वानर वृक्षावरून झेपावत आहेत, वाघ भक्ष्य शोधीत आहेत, हरिणे भयभीत होऊन पळत आहेत, सुग्रीव रामाला शरण येत आहेत, लक्ष्मण रामाच्या पाठीशीं सावधानतेने उभा आहे, इत्यादी देखावा चित्रित केला आहे. या चित्राचा फोटो घेतला पाहिजे.

(२) कांडाची समाप्ती केली आहे ती :

किष्किंधाकांडसर्गातिप्येकैकाक्षरलेखने । यांति न्यायेन वर्णैश्च लोकशुभ्रैश्च निर्मित: ।। यांति न्यायप्रवृतस्य तिर्यचोपि सहायतां । अपंथानं तु गच्छंतं सोदरोपि विमुंचति ।। श्रीमत् शके १५४५ संवत्सरे आश्विन वदि दशम्यायां पुण्यतिथौ अस्मिन् शुभदिने रामेण लिखितमिदं पुस्तकं ।। ।। श्रीमद्रमारमण जानकिजीवन दशरथनंदन पतीतपावन अहिल्यातारण कौशल्यानंदवर्द्धन जनरंजन मानसमोहन सुंदरवदन कमलनयन करुणार्णव परमहंसनिषेवितचरण दशशतवदनवंदितराम मनविश्राम कैवल्यधाम नमोस्तु ते ।।

**(दा) युद्धकांड (पत्रे १७३)**

(१) कूजंतं रामरामेति हा श्लोक आरंभी आहे.

(२) शेवटचा मजकूर :

श्रीमद् शके १५४६ ।। रक्ताक्षीनामसंवत्सरे वैशाख शुद्ध तृतीयायो पुण्यतिथौ अस्मिछुभदिने दिवा शुभलग्ने रामेण परोपकारार्थेऽलेखि ।। तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु ।। दशरथनंदन रावणमर्द्दन पतीतपावन मानसमोहन अहल्यातारण त्रिदशवंदन कारण भूतपरात्पर राजिवनयन जनमनरंजन जनश्रमनाशन रघुनंदन तव दासोहं ।। ।। राम अवाप्तसकलकाम कैवल्यधाम मनविश्राम नाथ नमामि ।।

**(स) उत्तरकांड (पत्रे १०१)**

शेवटचा मजकूर - नमोस्तु रामाय सलक्ष्मणाय देव्यै च तस्यै जनकात्मजायै । नमोस्तु रुद्रेंद्रयमानिलेभ्यो

नमोस्तु चंद्रार्कमरुद्रणेभ्य: ।। ।। यत्र यत्र रघुनाथकीर्तनं तत्र तत्र कृतमस्तकांजलिं । बाष्पवारिपरिपूर्णलोचनं मारुतिं नमत राक्षसांतकं ।। ।। एकमेतत्पुरावृत्तमाख्यानं भद्रमस्तु व: । प्रव्याहरतु विस्रब्धं बलं विष्णो: प्रवर्ततां ।। ।। रामं रामानुजं सीतां भरतं भरतानुजं । सुग्रीवं वायुसूनुं च प्रणमामि पुन: पुन: ।। ।।... ।।

रामेण रामदासेन

*परगुणपरिदानप्रस्तुताशेषकृत्या*
*निजगुणकलिताभिर्लोकमामोदयंत: ।*
*अविदितपरदोषज्ञानपीयूषपूर्णा:*
*करकृतमपराधं क्षंतुमर्हंति संत: ॥*

श्रीमत्तुलस्यै नम: ।। ।। हरि: ॐ ।। ।।... ।। रामेण रामचरितं प्राप्तं यदुकुलोद्भवं । अनेन जगदीशोयं रामचंद्र: प्रसीदतु ।।१।। शके १५६७ पार्थिवसंवत्सर कार्तिक शुद्ध दशम्यां शुभदिने कांड उत्तरं समाप्तं ।।

**।। श्रीरामसमर्थ ।।**

## श्रीरामदासी संशोधनाचे उपांत्य फळ

श्रीरामदासी संशोधनाचा हा विजय होय. दहा-पाच ओळींचे एखाद-दुसरे पत्र नव्हे, तर स्वत: श्रीसमर्थांनी बालवयात उतरून घेतलेली चोवीस हजार श्लोकांची वाल्मिकीय रामायणाची संपूर्ण प्रत उपलब्ध झाली असून, ती आज महाराष्ट्रदेवतेच्या चरणी अर्पण करावयाची आहे. एखादा श्रीमान् विद्यासंपन्न, पूर्वजाभिमानी, गुणग्राहक, उत्साही, स्वतंत्र देशांत असला प्रसंग मोठ्या राष्ट्रीय उत्सवाचा मानला गेला असता! कल्पना करा. मोठमोठे मथळे घालून ही बातमी वर्तमानपत्रांनी जाहीर केली असती, जगभर तारा फडकल्या असत्या, सर्वत्र कुतूहल, आनंद आणि अभिमान यांचे साम्राज्य पसरले असते. कल्पना कशाला, असले अपूर्व प्रसंग इतर भाग्यशाली देशांतून मोठ्या थाटाने साजरे झाल्याचे आपण वाचले आहे. पण आमच्या आजच्या भंगलेल्या शापित महाराष्ट्राला त्याचे काय होय! पूर्वजांच्या असल्या जुन्या ठेवण्याची, 'पुरलेली मढी' म्हणून संभावना करणारे पुरुष आज महाराष्ट्रात आढळतात! आपण अन्य काही विशेष पराक्रमाच्या गोष्टीत गुंतलेले असतो, अशा भ्रमांत असणारे लोक ही मढ्यांची भाषा बोलत असतात व इतर भोळे लोक न जाणता तिचाच उच्चार करीत असतात. पण आज आम्ही मढी बनलो आहोत, का आमचे पूर्वज, याचा हे लोक थोडासा तरी विचार करतील काय? जाणते जाणतात की, दिसण्यात जिवंत असलेले आम्ही प्रेतवत होऊन पडलो आहोत आणि आमचे गेलेले पूर्वज कीर्तिरूपाने चिरंजीव आहेत. पूर्वजांच्या अभिमानाची थोडीशी जरी धुगधुगी आमच्यात उरलेली असेल, तर 'संशोधन म्हणजे जुनी मढी उकरून काढण्याचा धंदा होय.' असली अभद्र भाषा बंद पडली पाहिजे. आमचे सर्वस्व गेले, तरी आमच्यातील सहृदयता गेली न पाहिजे. पूर्वजांचा यथायोग्य गौरव करण्याचे आमच्यात सामर्थ्य उरले नसले, तरी त्यांच्या विषयीची आमची आदरबुद्धी नष्ट झाली न पाहिजे.

**।। श्रीरामसमर्थ ।।**

## आता पुढे काय?

आत्तापर्यंत समर्थहृदय नानासाहेब देवांचे तळमळीचे उद्‍गार आपल्या हृदयावर कोरले गेले असतीलच! श्रीसमर्थांनी मूर्तरूपातील हा अमृत ठेवा आपल्या हाती दिला त्यास सुमारे चारशे वर्षांचा काळ लोटला. नानासाहेब देवांनी अविश्रांत कष्ट करून हे संशोधनातील रत्न आपल्यापुढे पैलू पाडून ठेवले, त्यास १०५ वर्षांहून अधिक काळ लोटला. त्यांच्या अंतरीचे आर्त आणि या हस्तलिखिताच्या वैभवाची नोंद करूनही ८० वर्षांचा काळ लोटला. पारतंत्र्य जाऊन स्वातंत्र आले; देवांना कोण आनंद झाला! आता तरी स्वकीय, राज्यकर्ते या अमोल ठेव्याकडे पाहातील, त्याचे कोडकौतुक करतील, समर्थांचे म्हणवणारे आम्ही 'राष्ट्रप्रेमी' या श्रीसमर्थ वाग्देवता मंदिराच्या अधिष्ठात्री देवतेस राष्ट्रमंदिराच्या अधिष्ठानी मानू अशी वृथाच आशा देवांच्या पैलतीरी लागलेल्या नेत्रांत चमकत होती. स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षे झाली.

पैलतीरी लागलेले देवांच्या नेत्रातील तेज झाकळले त्यासही ५५ वर्षे झाली.

काहीच घडलेले दिसत नव्हते ते आमच्या स्थूल दृष्टीस!

जगन्नियंत्याच्या कालगणनेत या अनमोल रत्नासाठी कोंदण घडविण्याचे कार्य सूक्ष्मतेने चालूच होते.

१९६१ इसवीमध्ये ह्या हस्तलिखिताच्या दीर्घायुष्यासाठी नवीनच आलेल्या लॅमिनेशन पद्धतीने प्रत्येक पत्रास आवरण घातले गेले. कै.द.वा.जोशी यांनी स्वत: ते तंत्र शिकून घेतले आणि या हस्तलिखितासाठी वापरले.

१९८०च्या दरम्यान सर्व ९५६ पत्रे, प्रत्येक कांडानुसार तपासून त्याची सुबक बांधणी केली गेली. डॉ. वि. आ. चितळे आणि श्री. ज. भा. उपासनी यांनी मोठ्या चिकाटीने हे काम केले.

रामेण रामदासेन लिखितम् श्री वाल्मिकी रामायणम् साठी काचेचा सुंदर लाकडी देव्हारा स.भ.गुरुमूर्ती शामाताई, भक्तिधाम, सातारा यांनी मंदिरास अर्पण केला.

आणि आता...

श्रीसमर्थांच्या कृपेची अनुभूती येत आहे.

श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरात येणारे भाग्यवंत आपल्याला श्रीसमर्थांचे – श्रीसमर्थांचेच हस्ताक्षर पाहायला मिळणार या आंतरिक आर्ततेने चिंब झालेले आम्ही पाहातो. विग्रह मूर्तीला स्पर्श करताना जाणवणारा अंतर्बाह्य शुचिर्भूत भाव त्यांच्या थरथरत्या हाताने रामेण रामदासेन लिखितम् वाल्मिकी रामायणाच्या पोथीपत्रास स्पर्श करताना दिसून येतो. आपल्या भाग्याचा आपल्यालाच हेवा वाटावा असे भाव त्यांच्या मुखकमलावर दृश्यमान होतात. अशी ही हस्तलिखित पोथी त्याच स्वरूपात प्रकाशित करण्यास अनुकूल काल लाभतोय असे दिसत आहे.

श्रीसमर्थ कोणाच्या अंत:करणास काय प्रेरणा देत आहेत ते कल्पनेच्या आवाक्यात येत नाही. केवळ स्वप्नात घडाव्यात अशा घटना घडून केवळ दोन महिन्यांत प्राथमिक खर्चाची सोय झाली. प्रचंड खटाटोपाच्या प्रकल्पासाठी योजना मूर्तस्वरूप घेत आहे असे दिसते. तेव्हा त्याचे स्थूल स्वरूप सर्व जाणकारांच्या विचारार्थ आणि साहाय्यासाठी मांडावे असा मानस आहे.

## काय आहे प्रकल्पाचे स्वरूप?

रामेण रामदासेन लिखितम् श्रीवाल्मिकी रामायणम् या श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरातील हस्तलिखित प्रतीचे शास्त्रशुद्ध संपादन करणे असा हा प्रकल्प आहे.

या प्रकल्पाचे मुख्य ३ टप्पे आहेत.

**(श्री)** रामेण रामदासेन लिखितम् श्री वाल्मिकी रामायण आहे तसे छापून सर्वांना आत्महितार्थ उपलब्ध करून देणे. या टप्प्यात खालील बाबी अंतर्भूत आहेत.

(१) सर्व कांडातील पृष्ठे तपासणे, क्रमाने लावणे, सर्व सर्ग तपासणे, ओव्यांचा क्रम तपासणे.

(२) प्राथमिक संपादन समिती स्थापन करणे. यामध्ये जुन्या हस्तलिखितांचा अभ्यास असणारे जाणकार, संस्कृत भाषेचा आणि विशेषत्वाने श्रीवाल्मिकी रामायणाचा अभ्यास असणारे विद्वमान्य पंडित आणि संगणक व प्रकाशन क्षेत्रातील तज्ज्ञ यांचा समावेश असेल. ही समिती श्रीसमर्थ वाग्देवता मंदिराच्या अधिपत्याखाली राज्यस्तरावरील असेल.

(३) मूळ प्रतीचे डिजिटलायझेशन, स्कॅनिंग करणे, हार्डकॉपी करणे, आवश्यक तेवढ्याच सी.डी. काढून प्राथमिक संपादन समितीच्या सदस्यांना देणे.

(४) जेथे जेथे गरज भासेल तेथे आवश्यक त्या सर्व नोंदी करणे, आणि त्यातील निवडक नोंदी तळटीपा म्हणून समाविष्ट करणे.

(५) हस्तलिखित प्रतीच्या सी.डी.वर संस्करण करून पाण्याचे किंवा अन्य डाग, फिसकटलेली अक्षरे स्वच्छ करणे, गरज पडेल तेथे नवीन अक्षरे घडवून बसविणे आदी तांत्रिक बाबी पाहून हस्तलिखिताची प्रत प्रकाशनयोग्य बनविणे.

(६) ह्या हस्तलिखितांसंबंधी सर्वसमावेशक सविस्तर टिपणी मूल्यांकन, समीक्षण या स्वरूपात नव्हे – पण यथार्थदर्शी तयार करणे, आवश्यक तेथे परिशिष्टांमधून पूरक माहिती देणे.

(७) स्वच्छ, सुंदर हस्तलिखित, विद्वन्मान्य टीका–टिपणी आणि सुंदर प्रकाशनांस पूरक अशा सर्व बाबींचा यथायोग्य विचार करून संस्था आणि आपल्या प्रतीचे स्वामित्व मिरविणारा भाग्यवंत, या उभयतांसंबंधी प्रकाशनार्थ योग्य मार्गदर्शन करणे.

(८) प्रत्यक्ष प्रकाशन आणि त्याचे वितरण.

**(रा)** उपलब्ध असलेल्या आणि होऊ शकणाऱ्या श्री वाल्मिकी रामायणाच्या हस्तलिखित प्रतीचा अभ्यास करणे, श्रीसमर्थांनी कोणत्या हस्तलिखितावरून प्रत तयार केली असावी त्याचा शोध घेणे. उपलब्ध हस्तलिखितांची संशोधन दृष्टीतून समीक्षा करणे.

हा टप्पा व्यापक आहे. त्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील श्री वाल्मिकी रामायणाच्या हस्तलिखित प्रतींचे जे जे विद्वान अभ्यासक आहेत, ज्या संस्था त्यासाठी कार्य करीत आहेत, त्यांच्याशी संपर्क साधून संकलन करणे, हा महत्त्वाचा भाग आहे. त्यामध्ये अनेक जाणत्यांचा सहभाग असलेली राष्ट्रीय पातळीवरील समिती स्थापन करून हे कार्य करणे. उपलब्ध झालेल्या सर्व हस्तलिखितांचे संशोधन झाल्यावर त्याचे संरक्षण करणे व वेळोवेळी अभ्यासकांना हे संशोधन उपलब्ध करून देणे यासाठी स्थायी स्वरूपातील योजना बनविणे.

**(म)** या प्रकल्पाचा शेवटचा टप्पा म्हणजे श्रीसमर्थांनी लिहिलेल्या श्री वाल्मिकी रामायणाची प्रचलित अक्षरवाटिकेत पाठावृत्ती तयार करणे, त्याचा भावार्थ देणे, आवश्यक तेथे टीपा, परिशिष्टे देऊन जाणत्या अभ्यासकांना आणि भाविकांना वाल्मिकी रामायणाची एक आदर्श प्रत उपलब्ध करून देणे. वरील दोन टप्पे कार्यान्वित असतानाच हेही काम स्वतंत्र समितीतर्फे चालू ठेवणे. योग्य अशी प्रकाशन प्रत तयार करून त्याच्या प्रकाशनार्थ योग्य ती तजवीज करणे.

असा हा अद्वितीय हस्तलिखिताचा संशोधन प्रकाशन प्रकल्प आहे. स्वदेशाभिमानी, स्वराष्ट्राभिमानी, स्वभाषाभिमानी राष्ट्रभक्तांनी यथाशक्ती सहभाग देणे उचित ठरेल.

**श्री देव प्रशस्ती**

**रा) परमपूजनीय परमहंस परिव्राजकाचार्य भगवान श्री श्रीधर स्वामी महाराज**

*श्रीरामं मारुतीं वन्दे रामदासं सुनिर्मलम् ।*
*परब्रह्मस्वरूपं हि सच्चिदानन्द विग्रहम् ॥१॥*
*दुर्गुणानां परित्यागः सद्गुणानां समाश्रयः ।*
*व्यवहारक्रमोद्बोष परमार्थप्रदायकः ॥२॥*
*गुणिनां कीर्तनं तद्वदनुकरणश्च सर्वतः ।*
*मार्गोऽयं परमार्थस्य व्यावहारिक जीवनात् ॥३॥*
*गुणिनः सज्जना भक्ता ज्ञानवैराग्यसंयुताः ।*
*आत्मानन्देन संतृप्ता जगदुद्धारकारकाः ॥४॥*
*समर्थवाङ्मयं येन क्रोडीकृत्य प्रकाशितम् ।*
*शङ्करः श्रीकृष्ण देवो भगीरथ प्रयत्नवान् ॥५॥*
*अयं मयादृतः सम्यग्यथा सर्वैःसमादृताः ।*
*शान्तो विद्वान् सद्गुणी च वाग्मी च सुलेखकः ॥६॥*
*गृहस्थोऽपि विरक्तोऽयं भक्तिमान् ज्ञानवान् सुहृत् ।*
*दयावान् मधुभाषी च दक्ष्यदाक्षिण्य संयुतः ॥७॥*
*कर्मयोगी महानात्मा यशोवान् कीर्तिमानपि ।*
*निर्मिता सुधिया येन सत्कार्योत्तेजिका सभा ॥८॥*
*जम्बु क्षेत्रे समर्थानां प्रतिमा येन स्थापिता ।*
*वाग्देवता मन्दिरं च निजग्रामे सुनिर्मितम् ॥९॥*
*कार्यत्रयमिदं सर्वं जगदुद्धारकारणम् ।*
*जेजीयतां मुक्तिदं च भक्तिदं भुक्तिदं तथा ॥१०॥*
*"आरामःकल्पवृक्षाणां विरामः सकलापदाम् ।*
*अभिरामस्त्रिलोकानां रामः श्रीमान् स नः प्रभुः" ॥११॥*
*समस्तसन्मङ्गलानि भवन्तु इति शं सर्वेजनाः सुखिनो भवन्तु ।*

**म) प्रार्थना**

*नानादेवसमारंभा राष्ट्रधर्मप्रकाशिका ।*
*सदाप्परणदीपाढ्या सत्कार्योत्तेजिका सभा ॥१॥*
*यस्याः प्रयत्नकृतनिश्चयिभिस्सुसभ्यै- ।*
*र्निद्राक्षुधादितनुपोषणमप्युपेक्ष्य ।*
*ग्रंथास्समर्थपथगादिमठेषु गुप्ताः ।*
*संगृह्य लोककुशलाय सुमुद्रिताश्च ॥२॥*
*जीर्णोद्द्धारनिधिं विधाय कतिचित् स्थानानि संस्कृत्य स -*
*ज्जम्बुक्षेत्रगते समर्थजननस्थाने बृहन्मंदिरम् ।*
*कृत्वा सुप्रतिमां निधाय च ततः स्कन्धाख्यदेशे महद् ।*
*ग्रंथानां निचयाय सुष्ठु रचितं वाग्देवतामंदिरम् ॥३॥*
*समर्थग्रंथगर्भस्य सम्यगभ्याससिद्धये ।*
*कृतः समर्थसङ्गोऽथ हृदयं च प्रकाशितम् ॥४॥*
*तस्याः समर्थभक्तानां हृदयानंदवर्धनः ।*
*पञ्चाशदब्धभूतोऽयं भूयात् स्वर्णमहोत्सवः ॥५॥*

**दा) श्रीदेव प्रशस्ती तथा महाराष्ट्रस्य जीवनम् । प्राचार्य नी. शं. नवरे**

*देववंशे समुत्पन्नः । श्रीकृष्णतनयः सुधीः ॥*
*धुळेपुरी कृता वासः । शंकर नामेति विश्रुतः ॥१॥*
*वाक्कीलत्वं परित्यज्य । सभामस्थापयत् शुभाम् ॥*
*सत्कार्योत्तेजिकानाम्नीम् । सर्वेषां प्रेरणावहा.. ॥२॥*
*जन्मभूमौ समर्थानाम् । मंदिरं समकल्पयत् ॥*
*समर्थ - ग्रंथ भाण्डारम् । पुरस्कारमथाकरोत् ॥३॥*

श्रीदेव उवाच

*स्मरणं हि समर्थानाम् । महाराष्ट्रस्य जीवनम् ॥*
*तथा विस्मरणं तेषाम् । मरणं नैव संशयः ॥१॥*

**स) देवस्त्वम् मूर्तिमान् । प्राचार्य नी. शं. नवरे**

*यत्नो देवो हि विज्ञेयः । समर्थोक्तिरियं त्वया ॥*
*सत्या कृता प्रयत्नेन । नात्रस्तोकोऽपि संशयः ॥१॥*
*त्वया कृते ग्रंथरत्ने । समर्थ-हृदयं स्फुटम् ॥*
*लक्ष्यते नाति यत्नेन । वाचकेनेति निश्चितम् ॥२॥*
*देवोपनामा देवस्त्वम् । मूर्तिमानिति मे मतिः ॥*
*अतः परमया भक्त्या । नमामि त्वां पुनःपुनः ॥३॥*

मानपंचक

# ब्रह्मांडव्यापिनी रामोपासना

*"कुळ या जगदीशाचें । धन्य वंश भूमंडळीं ।*
*आपलीं वाटती सर्वें । धन्य तूं गा रघोत्तमा ।।*
*देव हा सर्वांतरात्मा । वात हा त्याजपासुनी ।*
*वातसुत हनुमंत । रामसेवक हा जनीं ।।*
*वन्ही हा जानकी पिता । सूर्य हा वंश भूषणु ।*
*भूमी ही सीतेची माता । आजा आपोनारायणु ।।*
*शिव तो राघवा ध्यातो । राम ध्यातो सदाशिवा ।*
*सरव्यत्वें चालती दोघे । प्रसिद्ध ठाऊके जनी ।।*
*विरंची सुत विष्णूचा । पुराणे सांगती बहु ।*
*शारदा नाति देवाची । गणेश मित्रकुमरु ।।*
*शक्ती ते शक्ती शिवाची । शिवशक्ती समागमे ।*
*अंश जे चंद्रमौळीचे । ते सर्व प्रभूचे सखे ।।*
*येकचि अंश विष्णूचे । देवमात्र भूमंडळीं ।*
*एकांशें चालती सर्वे । यालागी सर्व एकची ।।*
*चंद्र तो लक्ष्मीबंधु । मंगळ मेहुणा नभीं ।*
*शरीरसंमधें सर्वे । त्रैलोक्याची उपासना ।।*
*रामउपासना ऐसी । ब्रह्मांडव्यापिनी पहा ।*
*राम कर्ता राम भोक्ता । रामरूप वसुंधरा ।।"*

– समर्थांचे सृष्टिविज्ञान



# समर्थ रामदासांची कृष्णभक्ती

**सुधाकर चिंचोलकर, कर्वेनगर पुणे ५२**

समर्थ रामदास आणि संत तुलसीदास यांची रामभक्ती साऱ्यांनाच ठाऊक असते. विशेषत: पंढरपुरात विठ्ठलाचे दर्शन घेतल्यानंतर कमालीच्या आर्ततेने त्यांनी विठ्ठलाला रामरूपात पाहून 'काय केले चापबाण?', 'कोठे गेली सीतामाई?' असे प्रश्न केले. 'इथे कमरेवर हात ठेवून का उभा आहेस?' असे विचारले. संत तुलसीदास मथुरेतील कृष्ण मंदिरात गेले तेव्हाही असाच प्रसंग घडल्याचे तुलसीदासांच्या चरित्रातही आढळते. त्या दोघांची रामभक्ती होतीच तशी गाढ.

मात्र समर्थ स्वत: राम आणि कृष्ण हे दोन्ही विष्णूचेच अवतार आणि म्हणून एकरूप होते हे चांगलेच जाणत होते. विठ्ठल म्हणजेच श्रीकृष्ण आणि रुखमाई म्हणजे कृष्णाची पट्टराणी रुक्मिणी हे सारे महाराष्ट्र जाणत असताना ते महाराष्ट्रधर्म जाणणाऱ्या समर्थांना ठाऊक नव्हते असे कसे म्हणता येईल? समर्थांनी राम, कृष्ण आणि विठ्ठल यांच्याबद्दल लिहिलेला आपण एक अभंगच बघूया.

समर्थ म्हणतात,

*''राम अयोध्येचा वासी*
*तोच नांदे द्वारकेसी*
*कृष्ण नामाते धरिले*
*बहु दैत्य संहारिले ॥१॥*

*सखया मारुती लागुनी*
*रूप दावी चापपाणी*
*पुढे भूभार उतरिला*
*पांडवासी सहाय्य झाला ॥२॥*

*आता भक्तांचियासाठी*
*उभा चंद्रभागेतटी*
*राम तोचि विठ्ठल झाला*
*रामदासासी भेटला'' ॥३॥*

वरील दुसऱ्या कडव्यातील 'सखया मारुती लागुनी, रूप दावी चापपाणी' ही कथा तर विलक्षण गोड आहे. कृष्ण आणि अर्जुन एकदा भ्रमण (आजचा लोकप्रिय शब्द पर्यटन!) करीत 'रामसेतू'पाशी आले. अर्जुनाला वाटले, राम जर एवढा थोर धनुर्धर होता तर त्याने बाणांचा सेतू का उभारला नाही? कृष्णाने विभुती योगाच्या अध्यायात 'राम:शस्त्रभृतामहम्' म्हणजेच 'शस्त्रवीरात राम मी' असे सांगितले होते. मग अशा थोर धनुर्धराने बाणांचा पूल का उभा केला नाही? ती कथा सांगते, त्याच क्षणी तेथे मारुतीराय प्रकट झाले. अर्जुनाची शंका निरसन करू लागले. ''अंगद, सुग्रीव, नल, नील, जांबुवन्त अशा पराक्रमी, सामर्थ्यशाली महावीरांना तो पूल धारण करू शकला नसता. तो कोसळला असता'' कथा सांगते की, हनुमंताला न ओळखणाऱ्या अर्जुनाने

पैज लावली. अर्जुनाने बाणांचा सेतू उभारला. हनुमंतांनी मारलेल्या उडीने तो कोसळला. पैजेप्रमाणे अर्जुन अग्निकाष्ठ भक्षण करायला तयार झाले. कृष्णाने लीला केली. पुन्हा बाणांचा सेतू करायला सांगितले. यावेळी पुलाला खाली सुदर्शन चक्राचा भक्कम आधार दिला. पूल कोसळला नाही. मारुतीने भारतीय युद्धात पुढे अर्जुनाच्या रथावर ध्वजस्तंभावर आरुढ होऊन भुभु:कार करून पैजेची शर्त पूर्ण केली. त्यावेळी मारुतीला कृष्णाने रामरूपात दर्शन दिले तो संदर्भ या 'सखया मारुती लागुनी, रूप दावी चापपाणी' अभंगात आहे.

हा एवढा एकच पुरावा आहे असे नाही. रामदासांच्या कृष्णाच्या भक्तीचे पुरावे 'समग्र समर्थ साहित्यात' जागोजाग आढळतात. पण त्यासाठी समग्र समर्थ साहित्य वाचायला हवे. डॉ. मधुकर रामदास जोशी या विद्वान प्राध्यापकांनी संपादित केलेला ग्रंथ वाचायला हवा. तुम्हाला अनेक पुरावे मिळतील. पृष्ठ क्रमांक ३१६ वर समर्थ लिहितात,

*"राहो सर्वकाळ गोविंदाचे नाम*
*कीर्तन उत्तम यादवांचे ॥१॥*
*पीतांबर धारी प्रगटे मुरारी*
*मथुरेमाझारी कारागृही ॥२॥*
*कारागृही माता-पिता वासुदेव*
*तेथे आले देव सोडविण्या ॥३॥"*

हे कृष्णचरित्र तब्बल ९० श्लोकांचे आहे. १८० ओळींचे आहे. त्या ९० श्लोकांत पुतना वध, कालिया-मर्दन, दही-दूध-लोण्याची चोरी, गोपींच्या गोड तक्रारी, गोवर्धन पूजा, अक्रूराचे गोकुळात आगमन, त्याबरोबर बलराम-कृष्णाचे मथुरेला निर्गमन, तेथे चाणूर-मुष्टीक कंस वध हे सर्व सविस्तरपणे वर्णन केले आहे. त्याचा शेवटही मोठा हृदयंगम केला आहे. आपले अवतारकार्य संपले आहे हे लक्षात घेऊन परिवार अर्जुनाकडे सोपवून उद्धवाला बोलावून घेऊन उपदेश केला आणि अवतार समाप्तीची कल्पना दिली. त्याचा शेवटचा श्लोक असा लिहिला आहे.

*"उपदेसीला दास श्रीकृष्णे आपुला*
*अवतार जाला पूर्ण आता ॥९०॥*

समर्थ रामदासांनी लिहिलेल्या आरत्याही सर्व मराठी माणसांना माहीत असतात. 'सुखकर्ता दु:खकर्ता' ही गणपतीची आरती, 'लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा विषे कंठ काळा, त्रिनेत्री ज्वाळा' ही शंकराची आरती, 'सत्राणे उड्डाण हुंकार वदनी' ही मारुतीची आरती, भीमा आणि चंद्रभागा पुढे ज्या नदीला मिळतात त्या कृष्णा नदीचीही आरती लिहिली आहे, तर भगवान कृष्णाची आरती त्यांनी लिहिली तर त्यात नवल ते काय?

समर्थ कृष्णाच्या आरतीत लिहितात

*"जय जय यादवा रे जय जय यादवा*
*तुझे ध्यान लागले रे माधवा ॥धृ.॥*
*होसी भक्ताचा कोंवसा, भवार्णवी भरवसा*
*भार फेडीला महीचा कैवारी तू पांडवाचा*
*दास म्हणे मनोहर, कृष्ण अवतार आठवा ॥१॥*
*जय जय यादवा रे जय जय यादवा*
*तुझे ध्यान लागले रे माधवा ॥धृ.॥*

भगवान श्रीकृष्णाची आरती लिहून समर्थ थांबले नाहीत. समर्थांनी भगवद्गीतेची देखील आरती लिहिली आहे.

समर्थ लिहितात,

*"जय देवी जय देवी जय भगवद्गीते*
*आरती ओवाळू अध्यात्म सरिते ॥धृ.॥*
*अर्जुनासी मोह उत्पन्न झाला*
*सांख्यमते त्याचा कृष्णे निरसिला*
*अष्टदशाध्यायी उपदेश केला*
*युद्धालागी पार्थ मग सिद्ध झाला ॥१॥*
*जयदेवी जयदेवी जय भगवद्गीते*
*आरती ओवाळू अध्यात्म सरिते ॥धृ.॥*

समर्थ रामदासांनी ६० श्लोकांत भागवत कथाही वर्णन केली आहे. भागवत कथा ही तर मूलत: कृष्णकथा

आहे, हे आपण सारे जाणतो. व्यासांची प्रतिभा भागवत लिहिताना भक्तिरसात चिंब न्हाऊन निघते.

कृष्णाने केलेल्या दूध-दही-लोण्याच्या मित्रांसह चोऱ्या, गोपींनी तक्रारी करणे आणि यशोदेने गणपतीकडे नवस बोलणे याचे फार गोड वर्णन समर्थांनी केले आहे.

समर्थ लिहितात

*"गोपिकांचे गृही श्रीहरी भक्षी नवनीत*
*गोपी जाऊनी यशोदेपाशी सांगती वृत्तान्त ॥*
*ऐसी वार्ता कानी पडता माता घाबरली*
*जाऊनी एकदन्तापाशी नवस बोलली ॥*
*यशोदेचे नवस पूर्ण झाले म्हणोनिया*
*व्रते तुझी नर-नारी करतील मोरया ॥"*

समर्थांचे सारेच वाङ्मय अत्यंत वाचनीय आहे. नुसते वाचनीय नव्हे, तर आचरण करावे, अनुकरण करावे असे आहे. 'दासबोध' आणि 'मनाचे श्लोक' तर घरोघर पोहोचलेले वाङ्मय आहे. समर्थांनी लिहिलेल्या आरत्याही अनेकांना मुखोद्गत असतात. त्यांनी लिहिलेली करुणाष्टके, विविध स्तोत्रे (भीमरूपी महारुद्रा वज्रहनुमान मारुती सारखी) भारुडे, गोंधळ, वासुदेव, डफगाणी हे पाहिले की थक्क होण्याशिवाय आपण काही करू शकत नाही.

समर्थ आणि तुलसीदास हे दोघे महान रामभक्त चैतन्य महाप्रभू आणि मीराबाई या महान कृष्णभक्त. नरसी मेहता आणि कबीर हे आणखी दोन वैष्णव भक्त. हे पाच उत्तर भारतातील संत, महाराष्ट्रातील संतपंचक ज्ञानेश्वर-नामदेव-एकनाथ-तुकाराम-रामदास आणि आचार्य पंचक शंकराचार्य-रामानुजाचार्य-मध्वाचार्य-वल्लभाचार्य-सायणाचार्य या साऱ्यांनीच कृष्णाबद्दल लिहिले आहे.

राम आणि रामभक्त हनुमान तसेच कृष्ण आणि कृष्णभक्त अर्जुन हे आपल्याला देव आणि भक्त यांच्यातील अद्वैताचे दर्शन घडवितात आणि हे दर्शन घडविणाऱ्या संत, आचार्य, महानुभवांचे आपण सदैव ऋणी राहिले पाहिजे. अंशत: ऋण फेडण्यासाठी त्यांच्या शिकवणीबर हुकूम वागले पाहिजे.

# श्री समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे

## *अमृत महोत्सव स्मृतिग्रंथासाठीचे पृष्ठदात्यांची नावे.*

**१००० रु. पेक्षा जास्त**

| अनु. | पृष्ठदात्यांचे नाव | गाव |
|---|---|---|
| १) | श्री रामदास स्वामी संस्थान | सज्जनगड |
| २) | भक्तिधाम | सातारा |
| ३) | श्री. पुरुणमल बा. अग्रवाल | धुळे |
| ४) | श्री समर्थ सेवा मंडळ | सज्जनगड |
| ५) | अध्यक्ष श्रीधर सेवा मंडळ | वरदहळ्ळी |
| ६) | श्री गुरुदास स्वामी गुरू पादुका आश्रम | शिरसी |
| ७) | श्री. ल. तु. बाणाईत | नासिक |
| ८) | श्री. अनुराधा वि. देवकुळे | सातारा |
| ९) | श्री. भास्कर खं. वैद्य | सांगली |
| १०) | स. भ. कौस्तुभ महाराज | मिरज मठ |
| ११) | अध्यक्ष श्री समर्थ मंदिर | जांबसमर्थ |
| १२) | गणेशनाथ महाराज संस्थान | शिवथरघळ |
| १३) | पी. आर. कन्स्ट्रक्शन | धुळे |
| १४) | श्री. भीमराज गोस्वामी मठ | तंजावर |
| १५) | सद्गुरू दिगंबरदास महाराज चॅरिटेबल ट्रस्ट | पुणे |
| १६) | विजय नागरी सहकारी पतसंस्था | संगमनेर |
| १७) | श्री सत्कार्योत्तेजक सभा | धुळे |
| १८) | भारतीय विद्या संशोधन केन्द्र | धुळे |
| १९) | स्व. जानकीबाई देशपांडे मुक्तद्वार वाचनालय | धुळे |

**५०० रु. प्रत्येकी**

| | | |
|---|---|---|
| १) | राजेंद्र गोविंद मुळे | धुळे |
| २) | शामकांत मनोहर गजेंद्रगडकर | धुळे |
| ३) | डॉ. प्रतिभा अग्निहोत्री | धुळे |
| ४) | संजय मधुकर याज्ञिक | धुळे |
| ५) | श्रीरंग विष्णू कुळकर्णी | धुळे |
| ६) | डॉ. आनंद जामकर | धुळे |
| ७) | श्री. शेखर श्रीराम रुद्र | धुळे |
| ८) | डॉ. सौ. अरुंधती संजय गद्रे | धुळे |
| ९) | डॉ. सौ. आरती बरीदे | धुळे |
| १०) | श्रीमती निलिमा पाटील | धुळे |
| ११) | श्री. संदीप करान्डे | पुणे |
| १२) | प्रसाद भदे | नागपूर |
| १३) | लक्ष्मण क्षिरे | धुळे |
| १४) | प्रशांत हसबनीस | नासिक |

| | | | |
|---|---|---|---|
| १५) श्री. जयंत जोशी | धुळे | ४८) श्री. अच्युत लक्ष्मण ओगले | धुळे |
| १६) श्री. आशिष कदम | सातारा | ४९) डॉ. श्री. अनिल जोशी | धुळे |
| १७) श्री. शिवशंकर पंडित | सातारा | ५०) डॉ. सौ. अरुणा जोशी | धुळे |
| १८) अपर्णा शि. पंडित | सातारा | ५१) श्री. प्रमोद बळवंत दीक्षित | धुळे |
| १९) कु. रिद्धी शि. पंडित | सातारा | ५२) सौ. निलीमा प्रमोद दीक्षित | धुळे |
| २०) चि. रोहन शि. पंडित | सातारा | ५३) श्री. शंकरलाल के. लोढा | धुळे |
| २१) श्रीमती गिरीजाबाई पंडित | सातारा | ५४) डॉ. प्रकाश नरहर वाणी | धुळे |
| २२) श्री. केशव नागराज | सातारा | ५५) श्री. रविंद्र गजानन बेलपाठक | धुळे |
| २३) श्री. रमेश असर | पुणे | ५६) श्री. सतिश विष्णु साठ्ये | धुळे |
| २४) श्रीमती विद्याताई पुरोहित | सज्जनगड | ५७) डॉ. महेश कृष्णराव घुगरी | धुळे |
| २५) श्री. विदार | पुणे | ५८) डॉ. मंदार श्रीपाद म्हसकर | धुळे |
| २६) डॉ. वि. आ. चितळे | धुळे | ५९) सौ. वैदेही श्रीराम देशपांडे | धुळे |
| २७) सौ. जयश्री वि. चितळे | धुळे | ६०) डॉ. मकरंद बाळकृष्ण पटवर्धन | धुळे |
| २८) श्री. मृगांक म. परांजपे | विलेपार्ले | ६१) डॉ. प्रकाश शामराव चौधरी | धुळे |
| २९) डॉ. सौ. शुभांगी परांजपे | विलेपार्ले | ६२) डॉ. नंदकुमार विश्वनाथ द्रविड | धुळे |
| ३०) डॉ. कल्याणी मराठे | सांगली | ६३) डॉ. सौ. मृदुला नंदकुमार द्रविड | धुळे |
| ३१) डॉ. श्री. प्रियदर्शन चितळे | सांगली | ६४) श्री. दिपक यशवंत मोरे | धुळे |
| ३२) श्रीमती रोहिणी कुलकर्णी | धुळे | ६५) श्री. य. द. मोरे | धुळे |
| ३३) श्री. भालचंद्र गणेश शुक्ल | धुळे | ६६) श्री. माधवराव आ. चितळे | औरंगाबाद |
| ३४) श्री. मुकुंद सिताराम ओगले | धुळे | ६७) श्री. वसंत रा. जोशी | धुळे |
| ३५) श्री. प्रकाश गंगाधर पाठक | धुळे | ६८) सौ. सरिता चं. जोशी | धुळे |
| ३६) यशवंत चॅरिटेबल ट्रस्ट | धुळे | ६९) श्री. रामचंद्र वसंतगडकर | सातारा |
| ३७) श्री. मधुकर ताटके | सातारा | ७०) सौ. शारदा शेवतेकर | धुळे |
| ३८) सौ. अरुंधती ताटके | सातारा | ७१) श्री. शरदराव वा. कुबेर | सातारा |
| ३९) सौ. पद्मा श. नगरदेवळेकर | धुळे | ७२) सौ. जानकी रामचंद्र कुलकर्णी | सातारा |
| ४०) श्री. संजीव प्र. कुलकर्णी | धुळे | ७३) श्री. शा. रा. खांडेकर | सातारा |
| ४१) श्री. विश्वास वि. नकाणेकर | धुळे | ७४) श्रीमती सुजाता दळवी | सातारा |
| ४२) सौ. क्षमा वि. नकाणेकर | धुळे | ७५) सौ. सरोजिनी अ. कदम | सातारा |
| ४३) श्री. सुहास चौक | धुळे | ७६) श्री. पद्माकर ख. वैद्य | धुळे |
| ४४) डॉ. श्री. अरविंद कृ. महाजन | धुळे | ७७) सौ. सुनंदा प. वैद्य | धुळे |
| ४५) श्री. पद्मनाभ महाराज संस्थान मठ | धुळे | ७८) सौ. योगिनी र. वैद्य | धुळे |
| ४६) श्री. दिवाकर गंगाधर तांदळस्कर | धुळे | ७९) डॉ. अभय वि. लिमये | पुणे |
| ४७) श्री. दहिवेलकर अॅन्ड कंपनी | धुळे | ८०) डॉ. विणा अभय लिमये | पुणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ८१) प्रा. श्री. भास्कर खं. वैद्य | सांगली | ११४) मातृमंदिर विश्वस्त मंडळ | निगडी, पुणे |
| ८२) सौ. सुमती भा. वैद्य | सांगली | ११५) श्री. विनायक म. दाते | मुलुंड |
| ८३) सौ. सुमती सदाशिव ए. नाईक | धुळे | ११६) श्री. उल्हासबुवा गोसावी | कन्हेरीमठ |
| ८४) श्री. पी. एस. अग्रवाल | धुळे | ११७) प्रा. देवेंद्र दि. डोंगरे | धुळे |
| ८५) श्रीमती आशा कदम | सातारा | ११८) सौ. लता देवेंद्र डोंगरे | धुळे |
| ८६) श्री. काशिनाथ दा. गायकवाड | धुळे | ११९) श्री. अतुल सु. चाफेकर | सातारा |
| ८७) श्री. एम. बी. पाटील | धुळे | १२०) सौ. मीराबाई बं. लोहार | धुळे |
| ८८) श्री. शिवाजीराव पी. पवार | धुळे | १२१) श्री. अरुण श्री. भंडारी | धुळे |
| ८९) श्रीमती मालती श. ब्रह्मे | वसई | १२२) श्री. सुनिल वि. देव | धुळे |
| ९०) श्री. विष्णू शंकर साठ्ये | धुळे | १२३) प्रा. डॉ. सोमनाथ त्र्यं. जोशी | धुळे |
| ९१) प्रा. वा. वा. गोगटे | सांगली | १२४) सौ. शशिकला सो. जोशी | धुळे |
| ९२) डॉ. सौ. उमा वैद्य | मुंबई | १२५) श्री. उदय सो. जोशी | धुळे |
| ९३) श्री. विनोदशेठ भन्साळी | धुळे | १२६) सौ. शुभदा उ. जोशी | धुळे |
| ९४) सौ. प्राजक्ता वा. गोगटे | सांगली | १२७) डॉ. आशुतोष ना. माळी | संगमनेर |
| ९५) श्री. शंकर आर. राव | नासिक | १२८) डॉ. अर्चना आ. माळी | संगमनेर |
| ९६) सौ. प्रमोदिनी चं. मोरे | कोरोची | १२९) मा. विजयराव ठोंबरे | पुणे |
| ९७) श्री. चंद्रकांत मोरे | कोरोची | १३०) श्री. राजाराम वि. कुलकर्णी | पुणे |
| ९८) श्री. मधुसूदन लाटकर | पुणे | १३१) सौ. तेजश्री ज. कुलकर्णी | पुणे |
| ९९) श्री. अरुण वा. कुलकर्णी | सातारा | १३२) श्री. प्रमोद ग. कुलकर्णी | सांगली |
| १००) डॉ. सौ. सुषमा श. दाते | धुळे | १३३) सौ. पुजा ज. कुलकर्णी | पुणे |
| १०१) श्री. अमोल एम. मोहिते | सातारा | १३४) श्री. प्रविण प्र. भिसे | पुणे |
| १०२) डॉ. कु. मेदिनी मु. जोशी | पुणे | १३५) श्री. अशोक वि. कुलकर्णी | कोल्हापूर |
| १०३) सौ. मुग्धा मु. जोशी | पुणे | १३६) श्री. सुधीर अत्रे | धुळे |
| १०४) श्री. बाळकृष्ण ग. जोशी | सातारा | १३७) श्री. गिरीश जोशी | धुळे |
| १०५) श्री. प्रमोद बा. सोनसळे | नासिक | १३८) श्री. विजय धनगर | धुळे |
| १०६) श्री. अनिल वं. जोशी | नासिक | १३९) श्रीमती मोहिनी चांगले | धुळे |
| १०७) श्री. मकरंद र. वसंतगडकर | सातारा | १४०) सौ. विमल ठाकरे | धुळे |
| १०८) श्री. अनिल र. वसंतगडकर | सातारा | १४१) सौ. प्रभावती सोनवणे | धुळे |
| १०९) सौ. उषा अ. वसंतगडकर | सातारा | १४२) सौ. अलका वैद्य | धुळे |
| ११०) श्री. सुभाष चो. अग्रवाल | धुळे | १४३) सौ. संगिता मराठे | धुळे |
| १११) डॉ. भारत कुलकर्णी | जालना | १४४) श्री. राजु चव्हाण | धुळे |
| ११२) श्री. संजय पारुंडेकर | सातारा | १४५) श्री. संजय गिरासे | धुळे |
| ११३) श्री. शंकरलालजी श्री. जोशी | धुळे | १४६) सौ. ज्योती प्रमोद चिटगोपेकर | औरंगाबाद |

१४७) श्री. अक्षय उदयराव नाकाडे मालेगाव (वाशिम)
१४८) कु. स्वरा माधवराव महाजन मालेगाव (वाशिम)
१४९) श्री. श्रीराम रोडे मालेगाव (वाशिम)
१५०) सौ. सविता रोडे मालेगाव (वाशिम)
१५१) श्री. सुनिल चिंचोलकर पुणे
१५२) सौ. शैलजा केशव जोशी अकोला
१५३) श्री. सुरेश तोपखानेवाले जबलपूर
१५४) सौ. गितांजली तुळापूरकर बंगलोर
१५५) सौ. रुपाली परांजपे बंगलोर
१५६) सौ. उमा साहू पुणे
१५७) श्रीमती विभावरी दातार पुणे
१५८) श्री. दीपक न्यायाधीश दुबई
१५९) श्री. गिरीश शिरसाळकर दुबई
१६०) डॉ. किशोर निमखेडकर दुबई
१६१) रविंद्र गवांदे दुबई
१६२) श्री. सुजय पाटील दुबई
१६३) श्री. संजय जाधव दुबई
१६४) श्री. महेश शुक्ल दुबई
१६५) श्री. अशोक काळे दुबई
१६६) श्री. अविनाश जव्हारकर दुबई
१६७) श्री. सचिन कोडोलीकर दुबई
१६८) श्री. परेश काछिया दुबई
१६९) श्री. मिलिंद हुनगुंद दुबई
१७०) श्री. राजेश दिवटे दुबई
१७१) श्री. सलील जामखेडकर दुबई
१७२) श्री. अमर पंडित दुबई
१७३) श्री. विलास इकाळे दुबई
१७४) श्री. शेखर दातीर दुबई
१७५) सौ. मानसी मुतालिक दुबई
१७६) सौ. स्वाती वाळिंबे पुणे
१७७) श्री. भा. वा. सातवळेकर पुणे
१७८) सौ. उषा रास्ते गुलबर्गा
१७९) श्री. शामसुंदर सिद्धांती नांदेड
१८०) सौ. सीमा जोशी पुणे
१८१) सौ. अपर्णा अभ्यंकर सांगली
१८२) सौ. स्मिता दीपक तुंगार पुणे
१८३) स्वामी माधवनाथ बोध प्रसारक मंडळ पुणे
१८४) श्री. अनंत भागवत औरंगाबाद
१८५) श्री. शंकर जाधव औरंगाबाद
१८६) श्री. शामराव जवळगीकर पुणे
१८७) श्री. श्रीराम सबनीस पुणे
१८८) श्री. रमेश देशपांडे नागपूर
१८९) श्री. वसंतराव गाडगीळ नागपूर
१९०) सौ. लीलाताई गाडगीळ नागपूर
१९१) श्री. बाळासाहेब काजरेकर पुणे
१९२) डॉ. एस्. एन्. देशपांडे धुळे
१९३) सौ. शुभदा हेमंत लव्हेकर औरंगाबाद
१९४) कै. सुधीर एकनाथ कुलकर्णी
१९५) सौ. सुप्रिया रमेश गोसावी चिंचवड
१९६) श्री. जनार्दन रघुवीर झेंडे चिंचवड
१९७) श्री. जयंत रघुनाथ पिंपळोदकर चिंचवड
१९८) श्री. हेमंत राणे धुळे
१९९) श्री. अरुण वसंत जोगळेकर धुळे
२००) सौ. वृंदाताई निफाडकर धुळे